पेंडसे-कुल-वृत्तान्त

कृ. वि. पेंडसे

पेंडसे-कुल-वृत्तान्त

संपादक

कृष्णाजी विनायक पेंडसे

सेवानिवृत्त अकाउंटन्ट, मिलिटरी अकाउंटस् डिपार्टमेंट

शक १८६०] मूल्य तीन रुपये [सन १९३८

प्रकाशक
कृष्णाजी विनायक पेंडसे
२२३ अ, सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते, बी. ए.
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें २.



निवेदन

नोकरीपेशांत एकाद्या विषयाचा व्यासंग करण्यास फारच थोड्यांना वेळ मिळतो. तसा ज्यांना मिळत असेल व मिळालेल्या फुरसतीच्या काळांत जे एकाद्या आवडीच्या विषयाचा दीर्घकाल व्यासंग करीत असतील ते भाग्यवान होत. राजसेवा चालू असतां आम्हांस तशी संधि मिळाली नाहीं. सेवानिवृत्त झाल्यावर मिळालेल्या फुरसतीचा कांहीं सदुपयोग करावा असा विचार मनांत आला. तत्पूर्वी कांहीं कुलवृत्तान्त वाचण्यांत आले होते. त्यावेळीं आपले कुलाचाहि असा वृत्तान्त व्हावा असें वाटत असे. सेवानिवृत्त होऊन पुण्यास परत आल्यावर नवीन प्रसिद्ध झालेले एकदोन कुलवृत्तान्त वाचण्यांत आले. त्यामुळें पूर्वीची इच्छा पुनः जागृत झाली व रिकामा वेळ या कामीं खर्च करावा असें वाटलें. परंतु इतिहास किंवा ग्रंथलेखन याचा अल्पहि परिचय नाहीं. सर्व तारुण्याचा काळ मिलिटरी अकाऊन्टस खात्यांत हिशेब तपासण्यांत (ऑडिट) गेलेला. तेव्हां "अंकाभ्यासजड" बुद्धीस वाङ्मयनिर्मिति या सदरांत पडणारें काम कसें झेंपेल याबद्दल मन साशंक होतें. कांहीं कुलबंधूंशीं याविषयीं बोलतांना त्यांनीं हें काम हातीं घेण्यास प्रोत्साहन दिलें. याच सुमारास कांहीं जुने ऐतिहासिक कागदहि पहाण्यांत आले. तेव्हां कुल-वृत्तान्ताचें कार्य करावयाचें ठरवून ता. ९ फेब्रुवारी १९३७ चे केसरींत तो उद्देश जाहीर केला. इतर वर्तमानपत्रांतूनहि कुलबंधूंस कळावें म्हणून या विचारास प्रसिद्धि दिली.

वर्तमानपत्रांतील प्रसिद्धीमुळें लोकांस कुलवृत्तान्ताचें काम सुरू आहे इतकें कळलें. परंतु त्यांत विनंति केल्याप्रमाणें फारच थोड्या लोकांनीं म्हणजे १० जणांनीं माहिती भरून पाठविण्याचे तक्ते आम्हांकडे मागितले. त्यामुळें वर्तमानपत्रीय प्रसिद्धीवर निवळ अवलंबून राहतां आलें नाहीं. म्हणून निरनिराळ्या संस्थांचे सभासद, स्थानिक व प्रांतीय संस्थांचे मतदार, सरकारी व निमसरकारी खात्यांतील

नोकर वगैरेंच्या याद्या पाहून व परिचित मंडळींकडे चौकशी करून पेंडसे यांचे पत्ते मिळविले. अशा सुमारें ३०० गृहस्थांकडे कुलवृत्तान्ताची छापील विस्तृत प्रश्नपत्रिका पाठवून माहिती मागविली. अनेकांस दोनतीन स्मरणपत्रें पाठवावीं लागलीं. तीन पत्रांचाहि जेथें उपयोग झाला नाहीं अशा सुमारें २७ लोकांकडे पोंहचल्याबद्दलची सही यावी म्हणून प्रश्नपत्रिका रजिस्टर करून पुनः पाठविल्या. १८ जणांनीं इतक्याउपरहि या गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं. अशा व्यक्तींची माहिती त्यांच्या परिचित इतर व्यक्तींकडून शक्य तितकी मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. या कामीं एकंदर ८०० च्यावर पत्रें पाठवावीं लागलीं. त्यामुळें आज असें म्हणतां येतें कीं पेंडसे कुलांतील ज्ञात अशी एकहि व्यक्ति नाहीं कीं जिचें नांव या पुस्तकांत आलें नाहीं.

पत्रव्यवहारानें अवश्य ती माहिती सर्व ठिकाणांहून न आल्यामुळें व कांहीं ठिकाणीं आलेल्या माहितींत उपयुक्त भर पडेल असें वाटल्यामुळें बराचसा प्रवास करावा लागला. या प्रवासांत सातारा, सांगली, मिरज, हरीपूर, कोल्हापूर, इचलकरंजी, गणेशवाडी, नागपूर, उमरावती, अकोला, भुसावळ, नाशिक, त्र्यंबक, डाकोर, सिद्धपूर, बडोदें, अहमदाबाद, मुंबई, सावंतवाडी, गुळधुवें, कोचरें, रत्नागिरी, नेवरें, गोळप, धामणी, धामापूर, मेटें, खेड, दापोली, दाभोळ, मुर्डी, आंजर्लें, गिम्हवणें, पेण, रोहें, बिरवाडी, तळें, केळशी, महाड, कामशेत, दौंड इत्यादि गांवीं गेलों. एकंदर प्रवास ४००० मैल झाला, समक्ष गेल्यावर त्या त्या गांवच्या लोकांनीं आनंदानें शक्त्यनुसार माहिती दिली.

ही हकीकत सविस्तर सांगावयाचा हेतु कोणाची निंदा करावी, किंवा एकाद्या भावी कुलवृत्तान्तलेखकास निरुत्साही करावें असा नाहीं. परंतु वस्तुस्थिति निदर्शनास यावी व माहितींत कांहीं अपुरेपणा राहिला असल्यास तो कोणत्या कारणानें राहिला हें ध्यानीं यावें हा आहे.

त्र्यंबक, नाशिक, डाकोर, सिद्धपूर, काशी वगैरे क्षेत्रांतील उपाध्यायांकडून त्यांच्या वह्यांतील नामावळ्या आणिल्या. त्र्यंबक येथील दोन उपाध्यायांनीं आपलेजवळील लेखांचे उतारे घेऊं दिले नाहींत. ज्यांच्याकडून माहिती मिळाली अशा क्षेत्रोपाध्यायांचीं नावें पृ. ६९ वर त्यांच्या पत्त्यांसह दिलीं आहेत. त्याचा उपयोग क्षेत्रीं जाणाऱ्या पेंडसे मंडळीस होईल अशी आशा आहे. या माहितीचा उपयोग वंशावळी जमविण्याचे कामीं बराच झाला. याबद्दल या उपाध्यायांचे आम्ही आभारी आहों. पूर्वजांनीं केलेल्या यात्रेचें पारमार्थिक फल त्यांचे पदरीं पूर्वीं पडलें आहेच पण इतक्या कालावधीनें त्यांचें पुण्य आज निराळ्या रीतीनें इतिहासलेखनास साधन म्हणून त्यांच्या वंशजास उपयोगी पडेल अशी त्यांस कधीं कल्पनाहि आली नसेल. या लेखांचें हें महत्त्व लक्षांत घेऊन यात्रेकरूंनीं उपाध्यायांस अवश्य लेख लिहून देत जावेत.

ऐतिहासिक दृष्ट्या उपयुक्त अशी बरीचशी माहिती सरकारदप्तरीं मिळते

म्हणून पुणें येथें असलेल्या पेशवे दप्तरांतील कागदपत्र पाहण्याची परवानगी मध्य-भागचे कमिशनरसाहेब यांजकडे मागितली. सदर दप्तर कुलवृत्तान्त लिहिण्याचे दृष्टीनें किती उपयुक्त आहे याची तरफदारी एलिअनेशन ऑफिसतर्फे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचे चौथ्या प्रकरणाच्या २९ व्या परिच्छेदांत सरकारनेंच केली आहे. त्यामुळें परवानगी मिळेल अशी आशा वाटत होती. परंतु मे. कमिशनरसाहेबांनीं कांहीं एक कारण न देतां परवानगी नाकारली. यामुळें आज या ऐतिहासिक सांठ्याचा उपयोग या पुस्तकाचे कामीं झाला नाहीं हें दुर्दैव होय. तथापि हा प्रयत्न येथेंच सोडून न देतां वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दाद मागण्यांत आली आहे. पुण्यास जो नुक-ताच कुल-वृत्तान्त-संघ स्थापन झाला आहे याचें कारणहि वरील नकारच होय. मे. कमिशनरसाहेबांकडून जरी असा नकार मिळाला तरी आम्हांस लिहावयास आनंद वाटतो कीं बुधगांव संस्थानाधिपति श्रीमंत राजेसाहेब यांनीं आमचे विनंतीस मान देऊन हरीपूर येथें असणाऱ्या तीन पेंडसे इनामदार कुटुंबांची वंशावळ, संस्थानचे कागदपत्रांतील माहिती गोळा करून इतिहाससंशोधनास मदत या दृष्टीनें आम्हांकडे पाठविली, याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

माहिती जमविण्याचे कामीं पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाचे ग्रंथसंग्रहाचा आम्हांस बराच उपयोग झाला.

या पुस्तकांत ९ प्रकरणें आहेत. प्रत्येक प्रकरणाचे आरंभीं त्यांत आलेल्या विषयांचें स्वरूप लिहिलें आहे. वंशावळींत असलेल्या सर्व व्यक्तींची माहिती उप-लब्ध झाली नाहीं. जी माहिती मिळाली तिच्यांतील सर्व ग्राह्य भाग सातवे प्रक-रणांत दिला आहे. कोणाचें मन दुखविलें जाईल अशा तऱ्हेची माहिती देण्याचें शक्य तितकें टाळलें आहे. व्यक्ति विद्यमान असून जेथें माहिती मिळाली नाहीं तेथें केवळ त्या व्यक्तीचें नांव देऊन पुढें पिढीचा आंकडा दिला आहे. ज्या व्यक्ति जिवंत आहेत किंवा मृत आहेत हें निश्चित समजलें नाहीं, त्या जिवंत आहेत असें आम्ही मानिलें आहे. घर बांधण्याकरितां जमविलेल्या सामानांतून घर बांधून झाल्यावर कांहीं साहित्य उपयोगांत न आल्यामुळें शिल्लक उरतें, त्याप्रमाणें या वृत्तान्ताकरितां जमविलेल्या माहितीपैकीं कांहीं माहितीचा उपयोग जास्त तप-शिलाचे अभावीं आम्हांस पुस्तकांत करितां आला नाहीं. अशी सर्व माहिती प्रक-रण ९ मध्यें दिली आहे. वाचकांनीं तिकडे विशेष लक्ष देऊन तिची संगति पुस्त-काचे मजकुराशीं कशी लावितां येईल तें आम्हांस कळवावें. पुस्तकाच्या शेवटीं व्यक्तींची सूची अकारादि क्रमानें जोडिली आहे. नांवाच्या समोर त्या व्यक्तीची माहिती कोणते पृष्ठांत आली आहे त्याचे अंक घातले आहेत. या पुस्तकांत ज्या ठिकाणीं व्यक्तीचे नांवापुढें कंसांत दोन आंकडे दिले आहेत तेथें पहिला घराण्याचा क्रमांक व दुसरा पिढीचा क्रमांक समजावा. जेथें एकच आंकडा आहे तेथें तो पिढीचा आहे असें समजावें.

व्यक्तींचीं छायाचित्रें पुस्तकांत छापावीं या हेतूनें सर्व कुलबंधूंस छाया-

चित्राची प्रत पाठविण्यास सुचविलें होतें. परंतु सर्वांकडून तीं आलीं नाहींत. आलीं तेवढ्यांचा यांत संग्रह केला आहे.

तारीख ९ फेब्रुवारी १९३७ पासून ८ आगस्ट १९३८ पर्यंतचे दीड वर्षाचे मुदतींत मिळालेल्या माहितीचा या वृत्तान्तांत समावेश केला आहे. सुरुवातीस जी माहिती मिळाली ती आतां एक वर्षापूर्वींची झाली आहे, हें ध्यानांत येईल. अगदीं अलीकडे ज्यांच्याकडून ती आली ती त्या मानानें ताजी आहे हें सांगावयास नकोच.

आज मिळाली तेवढी माहिती एकत्रित करून या पुस्तकांत दिली आहे. हा वृत्तान्त वाचून यांत असणाऱ्या उणीवा कशा दूर करितां येतील याचा विद्वान् कुलबंधूंनीं विचार करावा व यांत प्रकाशित न झालेली माहिती कोणाजवळ असल्यास ती आम्हांकडे पाठवावी अशी विनंति आहे. कांहीं चुकीची माहिती समाविष्ट झाली असल्यास ती स्पष्टपणें कळवावी. सरकारी दप्तरखान्यांतील कागदपत्र पाहण्याचे बाबतींत यश आल्यास नवीन माहिती उपलब्ध होण्याचा बराच संभव आहे. प्रकाशनालायक नवीन माहिती बरीच जमल्यास वृत्तान्ताचा दुसरा खंड तयार करितां येईल व त्यावेळीं यांत राहिलेल्या उणीवा दूर करितां येतील. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कुलवृत्तान्त प्रसिद्ध झाला तेव्हां माहिती एकत्र करण्याचें काम आतां संपलें असें नसून कामाचा हा पहिला खंड आहे व कार्यास सुरुवात आतांच झाली आहे असें समजावें. प्रत्येक पिढीस म्हणजे २५–३० वर्षांनीं वृत्तान्ताची सुधारून वाढविलेली आवृत्ति निघावी. म्हणजे माहितीचा धागा अखंड चालू राहील.

कुलवृत्तान्तग्रंथ म्हणजे 'हजार मनुष्यांनीं खपून तयार केलेलें पक्वान्न' होय. त्यामुळें त्यास हातभार लावणाऱ्या सर्व व्यक्तींचे आभार मानणें उचित होय तथापि सर्वांचा उल्लेख करून आभार मानणें शक्य नाहीं. सर्वांचे आभार मानितां येत नाहींत म्हणून ते कोणाचेच मानूं नयेत हें योग्य होणार नाहीं. म्हणून कांहींचा नामनिर्देश करीत आहों. केसरीचे उपसंपादक श्री. यशवंत नरसिंह केळकर यांनीं प्रथमपासून या कार्यांत आपलेपणानें लक्ष घालून मातुलकुलाबद्दलचें आपलें प्रेम व्यक्त केलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. कार्यास सुरवात झाल्यावर एक अनपेक्षित अनुकूल गोष्ट घडून आली ती अशी. पुण्याचे प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. दत्तोपंत आपटे यांचे नेतृत्वाखालीं कुल-वृत्तान्ततज्ज्ञ रा. विष्णु विनायक परांजपे व त्यांचे सहकारी रा. चिंतामणि शंकर दातार, पांचवडकर, यांजकडून पुण्यास चितळे-कुल-वृत्तान्त तयार झाला. त्यानंतर वेलणकर-कुल-वृत्तान्ताचेंहि काम झालें. यामुळें आम्हांस वृत्तान्तरचनेचें प्रत्यक्ष चाललेलें काम पहावयास मिळालें व त्यांनीं त्यांच्या अनुभवाचा फायदा दिला याबद्दल या त्रिवर्गांचे; तसेंच, भारत इतिहास संशोधक मंडळाचे रा.शंकर नारायण जोशी,वांईकर यांचें ऐतिहासिक माहिती मिळवून ती संगतवार लावण्याचे कामीं आम्हांस फार साहाय्य झालें याबद्दल त्यांचे आम्ही

आभार मानतों. रा. विष्णु विनायक परांजपे यांनीं परगांवीं जाऊन माहिती आणिली, रत्नागिरी जिल्ह्यांतील आमचे प्रवासांत आमचे स्नेही रा. कृष्णाजी केशव काळे यांनीं बरोबर येऊन साहाय्य केलें, रा. गोपाळ गणेश आचवल यांनीं स्वतः जवळील माहिती दिली, मिरजेचे रा. दामोदर मोरेश्वर भट, व हर्णैचे रा. जगन्नाथ वासुदेव जोशी, पंचनदीकर यांनीं माहिती मिळविण्यास साहाय्य केलें; केसरी, कुलाबा समाचार, महाराष्ट्र, ज्ञानप्रकाश वगैरे वृत्तपत्रांचे संपादकांनीं विनंतिपत्रें छापिलीं, लोकसंग्रह कारखान्याचे व्यवस्थापक रा. शंकर रामचंद्र दाते यांनीं छपाईचें काम काळजीपूर्वक चांगलें करून दिलें, श्रीपरमहंसकेवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमींचे वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे) यांनीं श्रीपूर्णानंदस्वामींचें छायाचित्र दिलें, व कोल्हापूरचे रा. विश्वनाथ बाळाजी मोडक यांनीं भगवद्भक्त गोविंदशास्त्री यांचे चित्राचा ब्लॉक वापरण्यास दिला. तसेंच केळशीचे रा. विष्णु शंकर परांजपे, रत्नागिरीचे डॉ. अच्युत वासुदेव जोशी व इतर अनेक सद्गृहस्थांनीं कोणत्या ना कोणत्या प्रकारें साहाय्य केलें याबद्दल या सर्वांचे आम्ही आभारी आहों.

घरचें कार्य निघालें म्हणजे कुटुंबांतील मंडळी व आप्तेष्ट हे साहाय्य करतात. त्याप्रमाणें घरांतील मुलांपासून तों अपरिचित पेंडसे मंडळींपर्यंत अनेकांनीं या कामीं आम्हांस साहाय्य केलें. घरचे मंडळींचे आभार मानण्याची प्रथा नाहीं म्हणून आम्ही त्यांचे आभार मानिले नाहींत. 'मिष्टान्नमितरे जनाः'. घरच्या माणसांस पिठलेंभाताचे श्रमभोजनानेंच आनंद होतो. असें असलें तरी कांहींचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. कुलवृत्तान्त हें सर्व कुलबंधूंचें काम आहे या भावनेनें जमविलेल्या माहितीचें संकलन करण्याचे कामीं सेवानिवृत्त होऊन पुण्यास सुखवस्तु राहणारे रा. गणेश पांडुरंग (१४–१०) यांनीं, पूर्व परिचय नसतांहि आमचे घरीं सहासात महिने रोज येऊन मदत केली ही आपुलकी तरुणांस अनुकरणीय आहे. क्षेत्रोपाध्यायांकडील माहिती आणण्याकरितां आम्ही त्र्यंबकला गेलों त्या वेळीं डॉ. काशीनाथ केशव (३–१०) यांनीं रा. विष्णुपंत गोडसे यांस बरोबर पाठवून माहिती आणण्यास साहाय्य केलें. आंजर्ल्याचे रा. गोविंदशास्त्री (१२–७) यांनीं परगांवीं जाऊन माहिती मिळविली. वेरळचे उत्साही शिक्षक रा. दिनकरपंत (१४–१०) यांनीं खेड, वेरळ वगैरे ठिकाणची माहिती पाठविली व दापोलीहून खेडला मुद्दाम आमचेबरोबर येऊन तेथील मंडळींच्या भेटी करविल्या. प्रो. गजाननराव (१२–७) यांनीं बडोदें, अहमदाबाद वगैरे भागांतील माहिती मिळविण्याचे कामीं मदत केली. कोल्हापूर भागांत रा. दत्तात्रेय बाळकृष्ण (१२–८) यांची व मुंबईस बलभीम एजन्सीचे रा. परशुराम महादेव (१७–७) यांची मदत झाली. नाशिकचे रा. पांडुरंग काशीनाथ (१३–९) यांनीं तेथील क्षेत्रोपाध्यायांकडील माहिती मिळवून देण्यास मदत केली. पुण्याचे रा. सीताराम बाळकृष्ण (१२–८) यांनीं प्रकृतीचें अस्वास्थ्य असतांहि मुद्रितें तपासण्याचे वेळीं साहाय्य केलें. स्वतःचे कुटुंबाची माहिती अनेकांनीं पाठविली परंतु जुने कागदपत्र

पाहून सविस्तर माहिती पाठविणारे म्हणून पुढील गृहस्थांचा उल्लेख करीत आहों. धामापूरचे रा. केशव राजाराम (२-१०); वाडचाचे रा. चिंतामणि केशव (१०-८); पालघरचे रा. विष्णु रंगनाथ (१७-६); सातान्याचे रा. गणेश कृष्ण (१५-८); नागपूरचे रा. सा. गोविंद रामचंद्र (५-८); वेणगांवचे रा. श्रीरंग शिवराम (२६-७) व तळचाचे रा. पुरुषोत्तम विठ्ठल (६-८). प्रस्तुत वृत्तान्तास आजचें स्वरूप प्राप्त होण्यास वरील सर्व गृहस्थांचा हातभार लागला आहे.


पुस्तक तयार करण्यास झालेला खर्च व त्याची व्यवस्था याबद्दलची माहिती पृ. ३७४ वर परिशिष्टांत दिली आहे.

कुलवृत्तान्त हें एक प्रकारचें पितरांचें पूज्यस्मरण—पितृश्राद्ध आहे. या कामांत दोन वर्षें गेलीं त्यामुळें तो काल सार्थकीं लागला असें मनास समाधान वाटतें. सर्व कुलबंधु हें पुस्तक संग्रहीं ठेवून ह्या समाधानांत अंशभागी होतील अशी आशा आहे. कुलाच्या वैभवाचीं, देशहिताचीं व धर्महिताचीं महत्कार्यें, कुलबांधवांचे हातून कुलस्वामी व कुलदेवता यांच्या कृपेनें होवोत, अशी त्यांच्या चरणीं नम्र प्रार्थना आहे. ही अल्पसेवा श्रीआदित्यनाथयोगेश्वरीचरणीं अर्पण असो.

पुणें, मार्गशीर्ष शुद्ध १
शक १८६०, देवदिवाळी.

कृष्णाजी विनायक पेंडसे.

श्रीजोगेश्वरी



जोगाईचें आंबें (जि. बीड)

देवीचा मुख्य उत्सव मार्गशीर्ष महिन्यांत होतो. दर शुक्रवारीं देवीचा छबिना काढतात. वार्षिक उत्सवाकरितां सरकारी उत्पन्न १७५ रुपये आहे. आंबें या गांवाजवळच उत्तरेच्या बाजूला एका कुंडांतून जयवंती नदी निघाली आहे.

परळी वैजनाथाहून आंबें १४ मैल आहे. बार्शी (लाइट) रेल्वेच्या येडसी स्टेशनवरून मोटार सकाळीं ९ वाजतां आंबाजोगाईकडे जाण्यास निघते.

श्रीआदित्यनाथ



श्रीआदित्यनाथ म्हणजे सूर्य होय. मूर्तीचे दोन हातांत दोन कमळें आहेत. जवळ दोन बाजूस दोन स्त्रिया आहेत. चित्रांत त्यांपैकीं एक दिसत आहे. ह्या आदित्यनाथाच्या पत्नी आहेत. त्यांचीं नांवें राज्ञी व निक्षुभा आहेत. श्रीआदित्यनाथ हा नेवरें, ता. रत्नागिरी येथील ग्रामदेवता आहे. याचा वार्षिक उत्सव रथसप्तमीचे दिवशीं होत असतो.

अनुक्रमणिका

घराण्यांचीं नांवें क्रमांकांसह देऊन त्यांपुढें घराण्याच्या वंशावळीचीं
व माहितीचीं पृष्ठें दिलीं आहेत.

पेंडसे-कुल-वृत्तान्त

प्रकरण १ लें

प्रयोजन

मनुष्यमात्राचा स्वभावच असा आहे कीं, त्यास स्वतःचे कुलाचा अभिमान असतो. कोणाचा तो कृतींत दिसतो व कोणाचा तो दिसून येत नाहीं इतकेंच. ज्यांच्या ठिकाणीं स्वकुलाभिमान असल्याचें दिसून येत नाहीं, त्यांच्यांत तो नसतो असें म्हणतां येणार नाहीं. न दिसण्याचीं अनेक कारणें संभवतील. त्यांतील दारिद्र्याचें दडपण हें एक कारण आहेच. अमुक थोर पुरुष माझे कुलांत होऊन गेले अथवा मी त्यांचा वंशज आहे असे सहज निघालेले स्वाभिमानाचे उद्गार अनेक वेळ आपण ऐकतों हें या मनोवृत्तीचेंच दर्शक आहे. हा कुलाभिमान योग्य मर्यादेंत ठेवण्याची खबरदारी घेतली म्हणजे तो दोषास्पद होत नाहीं व कार्यप्रवृत्तीस उपकारक होतो.

जिवंत राष्ट्रास आपलेपणाचा अभिमान पाहिजे. प्रथम स्वतःची ओळख, नंतर कुटुंबप्रेम अशा परंपरेनेंच स्वदेशाभिमान उत्पन्न व्हावयाचा. या दृष्टीनें पूर्वेतिहासाचे माहितीवरून स्वत्वाची जाणीव उत्पन्न होण्यास मदत होते. शिवाय आपल्या घराण्याचा पूर्वापर व खरा इतिहास कळल्यास आपल्या पूर्वजांच्या मनोवृत्ति कशा होत्या, त्यांच्या अंगीं मुख्यत्वेंकरून कोणकोणते गुण होते, त्यांचें शील कसें होतें, त्यांच्या वेळच्या परिस्थितींत व आतांच्या परिस्थितींत जो काय फरक झाला असेल तो राष्ट्रहिताचे दृष्टीनें कितपत इष्ट किंवा अनिष्ट आहे, यांचा तुलनात्मक दृष्टीनें विचार करण्यास घराण्यांचे स्वतंत्र इतिहास बाहेर पडणें अत्यंत जरूरीचें आहे. अशा प्रकारचा ब्राह्मण घराण्यांचा सविस्तर व साधार इतिहास लिहिण्याचा उपक्रम कै. गोविंद विनायक आपटे यांनीं केला. आजपर्यंत बर्वे, सहस्रबुद्धे (वाईकर), पटवर्धन (संस्थानिक), रास्ते–गोखले, पानसे, सरदेसाई–मावळंकर, परांजपे, थत्ते, कोल्हटकर, गोळे, चितळे, वेलणकर व नगरकर (अभ्यंकर) या कुलांचे इतिहास प्रसिद्ध झाले आहेत. साठे, भावे, सोमण, भिडे, आठल्ये, धडफळे, खरे, धामणकर, केळकर, फडके, गद्रे, जोगळेकर, ढापरे, मराठे, जाधव (साठम), पंचनदीकर जोशी वगैरे घराण्यांच्या इतिहासाचें काम चालू आहे असें कळतें. भारत–इतिहाससंशोधक–मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत वाढारकर–

निंबाळकर यांचाहि इतिहास प्रसिद्ध झाला आहे. मोडक घराण्याचा वृत्तान्त लिहिण्याचा प्रयत्न १० वर्षांपूर्वी झाला होता.

राष्ट्राचा इतिहास हा त्यांतील कुळांच्या इतिहासाचाच बनलेला असतो. यामुळें खरे व विस्तृत कुलेतिहास जितके होतील तितके अवश्य पाहिजे आहेत; व त्यामुळें महाराष्ट्राच्या इतिहासाचें संगतवार ज्ञान होण्यास पुष्कळ मदत होईल यांत शंका नाहीं. पेंडसे कुळाचा इतिहास या दृष्टीनें होणें अवश्यच ठरतें. कुल—वृत्तान्त बरेच प्रसिद्ध झाले व होत आहेत, यावरून विचारी लोकांस त्याची आवश्यकता पटली आहे हें उघड होय. सबब येथें आवश्यकतेबद्दल चर्वितचर्वण करण्याची जरूरी नाहीं.

कुल—वृत्तान्ताचे कालदृष्ट्या साधारणतः दोन भाग पडतात.एक ऐतिहासिक कालांतील माहितीचा व दुसरा चालू पिढीचा. या दुसऱ्यास परिचय-प्रकरण अगर डायरेक्टरी म्हणतां येईल. ऐतिहासिक काळांतील माहितीच्या प्रसिद्धीकरणानें वर लिहिल्याप्रमाणें राष्ट्रीय इतिहासाच्या दृष्टीनें फायदे होतीलच.शिवाय परिचय-प्रकरणांत चालू पिढीची माहिती एकत्र प्रसिद्ध झाल्यानें ती सर्व कुलबंधूंस कळून त्यांच्यांत आपलेपणाचा भाव उत्पन्न होईल व त्या योगानें परस्परांस एकमेकांची माहिती होऊन यथाशक्ति साहाय्यहि होण्याचा संभव वाढेल व कुलसंघटना घडून येईल. आपटे व सरदेसाई—मावळंकर यांनीं संमेलनें भरविण्याची कल्पना काढून हें कार्य कसें होऊं शकेल हें दाखविलें आहे. आपटे यांचीं चार पांच संमेलनें झालीं. सरदेसाई यांनीं आपलें पहिलें संमेलन शक १८४८ त आपले मूळ गांवीं म्हणजे मावळंगें येथें भरवून एक नवीनच अनुकरणीय प्रथा पाडिली आहे. कायमनिधि जमवून त्यांतून आपद्ग्रस्त कुटुंबीयांस, तसेंच होतकरू गरीब विद्यार्थ्यांस विद्यार्जनाकरितां मदत करणें वगैरे कामें करतां येतील असें त्या संमेलनाचे वृत्तान्तावरून दिसून येईल.

महाराष्ट्रांत ब्राह्मण समाज हा शिक्षित व पुढारलेला समजला जातो. त्या समाजांतील एका पोटविभागास—कोंकणस्थांस—चार पांचशें वर्षांपूर्वी आपले पूर्वज कोठें होते, मूळ आपलें वास्तव्य कोठें होतें, कोंकणांत केव्हां व कोठून आलों वगैरे गोष्टी निश्चित सांगतां येत नाहींत, हें एक मोठें आश्चर्य आहे. याचें कारण इतिहास लिहून ठेवण्याची अनास्था अगर त्या प्रांतीं राज्यकर्त्यांचे वारंवार होणारे खांदेबदल अथवा समुद्रसान्निध्यामुळें वारंवार होणारी चांच्यांची लूटमार ह्यांपैकीं कोणतेंहि असो. तेव्हां आज मिळेल तेवढी माहिती तरी एकत्र करून ठेवावी व पुढें जास्ती संशोधन व संकलन व्हावयास ती साधनीभूत व्हावी, हें आणखीहि एक कारण, हें कार्य हातीं घेण्याचें आहे. संशोधनाचें कार्य संपून संकलन करण्याची वेळ अद्यापि आली नाहीं. आज एक लहानशी गोष्ट सांपडली, उद्यां तिच्याशीं संबंध नसणारी दुसरी गोष्ट सांपडली, तशीच भलती तिसरी एक परवां सांपडली. ह्या गोष्टी अशा स्वरूपांत पाहणाऱ्याला त्याचें फारसें महत्त्व

वाटत नाहीं. पण ज्या वेळीं या सर्व शोधांचा उपयोग करणारा संकलनकार पुढें येतो त्या वेळीं या शोधाची खरी किंमत ध्यानांत येते. १०।१२ घराण्यांचे इतिहास यद्यपि प्रसिद्ध झाले आहेत व तितकेच त्या मार्गांत आहेत; तथापि त्यांवरून सर्व-सामान्य जनतेंत त्याबद्दल फार आस्था उत्पन्न झाली आहे असें अनुमान काढणें चुकीचें ठरेल. माहितीसाठीं मागणी केली असतां असेल तेवढी माहिती तत्परतेनें दिली जाते असें नाहीं. पुष्कळांजवळ माहिती नसते. जुनी श्राद्धतर्पणाची प्रथा लोकांतून—विशेषतः शहरवासीयांतून—नाहींशी होत आहे. श्राद्धतर्पण करणाऱ्या व्यक्तीजवळ निदान पूर्वजांच्या तीन पिढ्या व वडिलांचे व मातोश्रींचे जवळचे संबंधी यांची माहिती असे. ती प्रथा मोडूं लागल्यामुळें पणज्याचें नांवहि माहीत नसलेलीं माणसें आढळतात; नांव लिहितांना महाराष्ट्रांत व्यक्तीचें नांव, पित्याचें नांव व आडनांव असें लिहिण्याची प्रथा असल्यामुळें वडिलांचे नांवाबरोबर आज्याचें नांव सहजच येतें म्हणून तें माहीत असतें. बंगाल अथवा पंजाबांतील प्रघाताप्रमाणें एकेरी नांवांची प्रथा असती तर आज्याचेंहि नांव स्मरणांत राहावयाचें नाहीं. मग वडिलांचे चुलते, आत्या, मावशी व मामा यांचे नांवांची गोष्टच बोलावयास नको. कालपरत्वें ही श्राद्धतर्पणाची प्रथा जरी मोडावयाची असली तरी त्याची जागा, इतर तऱ्हेनें माहिती कोठें तरी लिहून ठेवली तर भरून निघेल, पण असें होत आहेसें दिसत नाहीं. कुल–वृत्तान्ताकरितां माहिती जमवीत असतां ही गोष्ट स्पष्टपणें निदर्शनास आली. ही उणीव भरून निघावी म्हणून कुटुंबाची माहिती लिहून ठेवण्याकरितां निरनिराळीं सदरें असणारा 'कुलग्रंथ' या नांवाचा एक आराखडा एका गृहस्थानें प्रसिद्ध केला आहे. त्याचा उपयोग किती होतो हें कालांतरानें ठरेल. आज मिळालेली माहिती या पुस्तकांत समाविष्ट केली आहे. प्रत्येक पेंडश्याचे घरांत हें पुस्तक असावें अशी अपेक्षा आहे. या पुस्त-काचे शेवटीं कांहीं कोरीं पृष्ठें ठेविलीं आहेत, त्यांवर यापुढें होणाऱ्या कौटुंबिक महत्त्वाच्या गोष्टी नमूद करून ठेविल्यास माहितीचा धागा अखंड चालू राहील. व निराळा 'कुलग्रंथ' बाळगण्याची आवश्यकता उरणार नाहीं. लिहून ठेवावयाची माहिती पुढील स्वरूपाची असावी.

१. जन्मस्थळ, शक, मिति.
२. नांव, पाळण्यांतील व टोपण दोन्ही.
३. शिक्षण, विश्वविद्यालयीन परीक्षांचे शक.
   (अ) शिष्यवृत्ति अगर बक्षिस मिळालें असल्यास.
४. विवाहकाल–शक–मिति.
   (अ) मुलाचे बाबतींत वधूचें माहेरचें व सासरचें नांव, जन्मस्थळ व काल.
   (आ) पित्याचें संपूर्ण नांव व गांव.
   (इ) मुलीचे बाबतींत पतीचें पूर्ण नांव व गांव, जन्मस्थळ, काल व व्यवसाय.

५. स्थलांतर झाल्यास त्याचें कारण, काल व स्थळ.
६. व्यवसाय–सविस्तर हकीकत.
७. विशेष आवड.
८. मृत्यूचा काल व स्थळ.
९. कौटुंबिक स्थितीवर महत्त्वाचा परिणाम करणाऱ्या गोष्टी.

असल्या ग्रंथास लागणारी माहिती न मिळण्याचें आणखी एक कारण म्हणजे माहिती पुरविली असतां त्या माहितीचे आधारावर मिळकतीसंबंधीं वा इतर गोष्टींसंबंधीं कोणा भाऊबंदाकडून कांहीं त्रास होईल अशी वाटणारी भीति हें होय. सामाजिक, कौटुंबिक किंवा ऐतिहासिक महत्त्वाखेरीज जुन्या कागदांस आतां इतर प्रकारची किंमत राहिली नाहीं. तेव्हां कागदपत्राच्या प्रकाशनानें कोणी उपटसुंभ आतां पुढें येऊन आपल्याजवळ जी काय थोडी मिळकत असेल ती बळकावील ही भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. शिवाय मध्यंतरीं बराच काळ लोटल्यामुळें जुन्या कागदाच्या प्रकाशनानें नष्ट झालेल्या हक्कांचें पुनरुज्जीवन होण्यास 'मुदतीचा कायदा' हा प्रचंड व दुस्तर पर्वत रस्त्यांत आडवा पडलेला आहेच. शक १६४० मध्यें एका घराण्यांतील पुरुषानें त्या काळची सविस्तर कौटुंबिक हकीकत लिहून ठेविली असल्याचें कळल्यावरून ती स्वतः जाऊन वाचून पाहण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी झाला. ज्या गृहस्थाजवळ तें लिखाण आहे त्याच्या मतें त्यांत ऐतिहासिक महत्त्वाचें कांहीं नाहीं; परंतु कुल–वृत्तान्त–लेखकाजवळ इतर बरीच माहिती जमलेली असते, व त्याचे दृष्टीस त्या कागदांत कांहीं उपयुक्त आढळतें, हें त्याचे ध्यानांत सांगितलें असतांहि आलें नाहीं. हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर यांतील कागदपत्र पाहून वर सांगितलेली गैरसमजूत नाहींशी होऊन जर जुने कागदपत्र उजेडांत आले तर तो एक लाभच होईल.

प्रकरण २ रें

भृगुकुलोत्पन्न पेंडसे

पेंडसे हें उपनांव महाराष्ट्रांतील चित्तपावन (चिपळुणे-चिपुळणा-चिपोळणा-चिपोळा) वा कोंकणस्थ या नांवानें ओळखिल्या जाणाऱ्या ब्राह्मण समाजांत आहे. हें नांव ब्राह्मणांचे इतर पोट जातींत अगर ब्राह्मणेतरांत इतर कांहीं आडनांवां-प्रमाणें—गोरे, गोळे व काळे इत्यादि—आढळत नाहीं. कोंकणस्थांचीं चौदा गोत्रें, गोत्रप्रवर्तक सात ऋषि (१ कश्यप, २ भरद्वाज, ३ वसिष्ठ, ४ विश्वामित्र, ५ भृगु, ६ अंगिरस व ७ अत्रि) असून, सात गटांत विभागलीं गेलीं आहेत. पेंडसे यांचें गोत्र जामदग्न्य असून तें भृगु गटांतील आहे. कोंकणस्थांत भृगु गटांतील दुसरें गोत्र वत्स आहे. म्हणूनच पेंडसे यांचा शरीरसंबंध वत्स गोत्रियांशीं होत नाहीं. जामदग्न्य गोत्र पंचप्रवरी व त्रिप्रवरी असल्याचा उल्लेख आढळतो; परंतु पेंडसे हे पंचप्रवरी आहेत. वत्सगोत्रीय काळे पंचप्रवरी व त्रिप्रवरी आढळतात, त्या-प्रमाणें पेंडसे त्रिप्रवरी आढळले नाहींत. भार्गव, च्यवन, आप्नवान, और्व व जाम-दग्न्य हे ते पंचप्रवर होत. भृगु कुलांत या पंच प्रवरांचीं ९२ गोत्रें व आप्नवान, च्यवन व भार्गव या त्रिप्रवरांचीं ९ गोत्रें असून शिवाय इतर प्रवरांचीं अनेक गोत्रें असल्याचा उल्लेख प्राचीन ग्रंथांत आढळतो. कोंकणस्थांत मात्र वर सांगितलेल्या दोन गोत्रांचेच लोक आढळतात. देवरुखे व देशस्थ यांत शौनक, भार्गव, कुत्स वगैरे भृगु कुलांतील गोत्रांचे लोक आहेत.

जामदग्न्य गोत्रांतील लोक फक्त आश्वलायन सूत्राचे आहेत. इतर कांहीं गोत्रांप्रमाणें आश्वलायन व हिरण्यकेशी अशा दोन्ही सूत्रांचे नाहींत, यावरून पेंडसे हे ऋग्वेदी आहेत हें निराळें सांगावयास नको.

कोंकणस्थांचे गोत्रावळींत अग्निहोत्री, कुंटे, पेंडसे व भागवत अशीं चार आड-नांवें जामदग्न्य गोत्राचीं सांगितलीं आहेत. यांतील अग्निहोत्री व भागवत हीं आचारांवरून मागाहून पडलेलीं आडनांवें आहेत. अग्निहोत्री हे मूळचे पेंडसे व भागवत हे कुंटे होत असें समजतें. हीं सोडून दिलीं तर पेंडसे व कुंटे अशीं दोनच आडनांवें उरतात. ८० वर्षांपूर्वी छापलेली गोत्रमालिका 'द्वावेतौजामदग्न्याश्च-प्रोक्तौ पेंडसकुंटकौ' हीं दोनच आडनांवें दाखविते. ही गोत्रमालिका किती जुनी आहे व त्यांत दिल्याप्रमाणें पूर्वी कोंकणस्थांचीं ६० च उपनामें होतीं किंवा नाहीं याबद्दल विद्वानांत मतभेद आहे; परंतु पेंडसे हें नांव त्यांत असल्यामुळें ती जुनी मानिल्यास पेंडसे हें नांव जुनें असून मूळ ६० उपनांवांतील एक आहे एवढें मान-ण्यास नड नाहीं.

गोत्र व प्रवर हे कुलपरंपरा किंवा गुरुपरंपरा दाखवितात याबद्दल अली-

कडील विद्वानांत एकमत नाहीं. प्रस्तुत तो वाद बाजूस ठेवून सध्यां रूढ असलेल्या समजुतीस अनुसरून गोत्र व प्रवर हे कुलपरंपरा दर्शवितात असें या ठिकाणीं मानण्यास हरकत नाहीं. कोणाहि व्यक्तीस आपले पूर्वजांबद्दल शक्य तितक्या जास्त माहितीची जिज्ञासा साहजिकच असणार, म्हणून पेंडसे यांच्या या पांच प्रवरकार पूर्वजांबद्दल उपलब्ध असलेली माहिती पुढें दिली आहे. ही माहिती वेद व पुराणें यांतील म्हणजे फार जुन्या काळची आहे. त्या काळीं एकाच नांवाच्या अनेक व्यक्ति असण्याचा संभव असल्यामुळें एका व्यक्तीची माहिती दुसरे व्यक्तीचे माहितींत मिसळली गेली असल्याचा संभव आहे हें ध्यानांत येईलच. ही माहिती मुख्यतः वे. शा. सं. चित्रावशास्त्री यांनीं संपादिलेल्या प्राचीन चरित्रकोशाचे आधारें दिली आहे.

भृगु—भृगूंना अग्नि प्रथम सांपडला. भृगु हे अनेक दिसतात. प्रजापतीपासून भृगु, अंगिरस व आदित्य उत्पन्न झाले. कोणी म्हणतात वरुणापासून झाले व म्हणून वारुणि भृगु असें म्हणतात.

१. स्वायंभव मन्वतरांत हा स्वायंभुव मनूचा जांवई, व शंकराचा साडु होय. दक्षकन्या ख्याति ही याची बायको. विष्णूचे छातीवर यानें लाथ मारिली. ही लाथ विष्णूनें श्रीवत्स चिन्ह म्हणून धारण केली.

२. वैवस्वत मन्वतरांत हा वरुणापासून झाला. यानें नहुषास शाप देऊन इंद्रपदापासून च्युत केलें. याला संजिवनी विद्या येत होती. यानें जमदग्नीस पुनः जिवंत केलें. हा गोत्रकार आणि मंत्रकारहि आहे. भृगूला दिव्या व पौलोमी अशा दोन स्त्रिया होत्या. पौलोमीला च्यवन झाला. च्यवनाला सुकन्येपासून आप्नवान व आप्नवानाला नाहुषीपासून और्व झाले. अशा क्रमानें हजारों भार्गव व परशुराम वगैरे उत्पन्न झाले.

याच्या नांवावरील ग्रंथ:—भृगुस्मृति, भृगुगीता, भृगुसंहिता, भृगुसिद्धांत व भृगुसूत्र. यानें वास्तुशास्त्रावर ग्रंथ केला आहे.

भार्गव—हें एका कुलाचें नांव आहे. च्यवन, गृत्समद इत्यादिकांना हें कुलनाम आढळतें. सध्यां भार्गव नांवाचे ब्राह्मण भडोचला असून त्यांनीं परशुरामाला निःक्षत्रिय पृथ्वी केल्यानंतर अवभृथ स्नानाचा संकल्प सांगितला होता.

च्यवन—ऋग्वेदांत याला च्यवान असें म्हटलें आहे. याला सर्वानुक्रमणीनें भार्गव म्हटलें आहे, व हा भृगूचा पुत्रहि आहे. हा अश्वींचा उपासक होता, म्हणून याला अश्वींनीं म्हातारपणीं तारुण्य दिलें व सुंदर स्त्री दिली. गांवाच्या बाहेर असलेल्या जख्खड व भेसुर दिसणाऱ्या याला, पोरांनीं धोंडे मारिले, वगैरे गोष्ट पुराणांप्रमाणेंच ब्राह्मणांतहि आढळते. येथें याला दाधिच म्हटलें आहे. हा सामांचा द्रष्टा आहे.

भृगु ऋषीची भार्या पुलोमा. तिच्या उदरीं भृगुवीर्यापासून गर्भसंभव झाला. नंतर भृगु ऋषि जलाशयावर स्नानास गेला असतां त्याच्या आश्रमांत पुलोम

नांवाचा एक राक्षस आला. त्यानें भृगुपत्नीचें रूप पाहून तिला पळविलें. त्या राक्षसाला दमन असें म्हटलें आहे. ती त्याच्या भीतीमुळें वाटेंतच प्रसवली, म्हणून त्या बालकास च्यवन असें नांव प्राप्त झालें. नंतर त्या च्यवनाच्या दिव्य तेजानें तो राक्षस जळून खाक झाला, व पुलोमा, याला घेऊन आश्रमीं परत आली. हा वेदवेदान्तांत अतिशय निष्णात होता व यानें अतिशय मोठी तपश्चर्या केली. तपश्चर्या करीत असतां याच्या अंगावर एक वारूळ वाढलें, तरी याला त्याचा पत्ताच नव्हता. त्याच रानांत राजा शर्याति हा आपल्या परिवारासह क्रीडा करण्याकरितां आला असतां त्याची रूपवती मुलगी सुकन्या ही आपल्या सख्यांसह फिरत फिरत त्या वारुळापाशीं आली. तोंच, तिला आंत कांहीं तरी चकाकत आहेसें दिसलें. तेव्हां तिनें तें काय आहे हें पाहण्याकरितां आंतील त्या चकचकीत पदार्थास कांटयानें टोंचलें. त्यामुळें या ऋषीचे डोळे फुटले. तेव्हां यानें अतिशय संतप्त होऊन सर्व सेनेसह राजाचा मलमूत्रावरोध केल्यामुळें तो राजा हात जोडन च्यवनास शरण आला. च्यवनानें "तुझी मुलगी मला दे" असें सांगितलें. राजा या गोष्टीस कबूल झाला व सुकन्येचें वृद्ध च्यवनाबरोबर लग्न झालें. नंतर ती त्याच रानांत आपल्या भर्त्यासमवेत राहात असतां एके दिवशीं अश्विनीकुमारांनीं तिला पाहिलें व आमच्याबरोबर चल, असें ते म्हणाले. पण तिनें आपल्या पातिव्रत्यानें त्यांस दिपवून आपल्या नवऱ्यास 'तारुण्य द्या' असें ती त्यांना म्हणाली. नंतर च्यवन हा अश्विनीकुमारांच्या प्रसादाच्या योगानें तरुण झाला. या उपकाराची फेड करण्याकरितां हा आपले श्वशुरगृहीं गेला व यानें त्याजकडून एक मोठा यज्ञ करवून त्या यज्ञांत अश्विनीकुमारांस हविर्भाग देऊं लागला. पण ही गोष्ट इंद्राला पसंत न पडून त्यानें च्यवनास मारण्याकरितां वज्र उगारतांच च्यवनानें त्याचे नाशार्थ मद नामक राक्षस उत्पन्न केला. त्यास पाहतांच इंद्र घाबरला, व त्या गोष्टीला कबूल झाला. या वेळेपासूनच अश्विनीकुमारांस यज्ञांत हविर्भाग देऊं लागले. एकदां च्यवनानें प्रयाग क्षेत्रीं उद्‌वास व्रतास आरंभ केला. हा रात्रंदिवस पाण्यांत जाऊन बसे व सर्व मासे याच्याभोंवतीं जमा होत. एका प्रसंगीं कांहीं कोळ्यांनीं मासे धरण्याकरितां जाळें लाविलें. तें बाहेर काढतांच माश्यांबरोबर च्यवनहि बाहेर आला; तेव्हां सर्व कोळी घाबरून जाऊन ते राजा नहुषाकडे गेले. राजानें ऋषीची षोडशोपचारें पूजा करून तुम्हांस काय पाहिजे तें मागा असें तो म्हणाला. तेव्हां च्यवन म्हणाला, "माझी योग्य किंमत करून ती तूं या कोळ्यांस दे." राजा आपलें सर्व राज्य देण्यास कबूल झाला, तरी ऋषीची योग्य किंमत होईना. तेव्हां गविजात नामक ऋषीनें राजास गोधन देण्यास सांगितलें. राजानें गाई देतांच हा अतिशय संतोषित झाला व यानें नहुषास गोधनाची महती कथन केली. आपल्या कुळांत पुढें भिन्न जातित्वाचा दोष उत्पन्न होणार, ही गोष्ट याला तपःसामर्थ्यानें कळली व याला कारण कुशिकाचा वंश आहे, असें जाणून त्याच्या वंशाचा नाश करावा, या उद्देशानें हा कुशिकाकडे

गेला व म्हणाला, " हे राजा, मला तपश्चर्या करावयाची आहे, करितां तूं आपल्या भार्येसह माझी अहर्निश सेवा कर. " राजानें हें ऋषीचें म्हणणें कबूल केलें. नंतर च्यवनानें सुग्रास भोजन आणण्यास सांगून तें येतांच त्याचें जाळून भस्म केलें. नंतर हा राजपर्यंकीं निद्रावश झाला, आणि राजा भार्येसह याचे पाय रगडीत बसला. याप्रमाणें हा एकाच कुशीवर २१ दिवस निजला. तोंपर्यंत राजा कांहींहि न खातां तिष्ठत होता. २१ दिवसांनंतर झोंपेंतून जागा होऊन हा एकदम पळूं लागला. हा क्षणांत दिसे, क्षणांत नाहींसा होई; अशा स्थितींतहि राजा याच्यामागें पळत होता. नंतर च्यवन एकदम दिसेनासा होतांच राजा राजवाड्यांत परत आला व पाहतो तों च्यवन निजलेलाच. कांहीं वेळानें हा जागा झाला व परत पुन: दुसऱ्या कुशीवर २१ दिवस निजला. नंतर जागा होतांच च्यवनानें रथाला घोड्यांच्याऐवजीं एका बाजस कुशिकास व दुसऱ्या बाजूस त्याच्या भार्येस जोडलें; व आपण स्वत: हातांत चाबक घेऊन त्यांस वडवीत अरण्यांतून रथ हांकूं लागला. येणेंप्रमाणें त्यानें कंटाळावें, आपणांविषयीं तिरस्कार दाखवावा व मग आपण त्यास जाळून भस्म करावें म्हणून यानें त्यांचा नाना तऱ्हांनीं छळ केला, पण तो कांहीं हरेना. सरतेशेवटीं प्रसन्न होऊन यानें त्या राजास "तुझ्या कुळांत ब्राह्मण उत्पन्न होईल" असा वर दिला व एक बाग निर्माण करून त्यास स्वर्गसुख दाखविलें. याला मनुपुत्री आरुषीपासून और्वनामक एक पुत्र झाला. याचा आश्रम गयेंत होता. च्यवन हा एक उत्कृष्ट वक्ता असून सप्तर्षींपैकीं एक होय. याला प्रमति नांवाचाहि मुलगा होता. हा भृगुगोत्री एक प्रवरहि आहे. हा मंत्रकार होता. हा धर्मशास्त्रकार असून अपरार्क व मिताक्षरा या ग्रंथांत याच्या धर्मशास्त्राचा उल्लेख आला आहे गोदानाच्या वेळीं म्हणावयाचे मंत्र, कुत्रा, चांडाळ, प्रेत, चिताधूम, मद्य, मद्यपात्र इत्यादिकांना स्पर्श झाला असतां घ्यावयाचें प्रायश्चित्त, गोवधाबद्दलचें प्रायश्चित्त इत्यादि विधींबद्दलचे याचे पुष्कळ श्लोक व सूत्रें या दोन्ही ग्रंथांत आलेलीं आहेत. भास्कर संहितेंतील जीवदान तंत्राचा हा कर्ता आहे. हेमाद्रि, माधवाचार्य व मदनपारिजात या तीन ग्रंथांत याचे आधार आहेत. च्यवनभार्गवाचें स्थान अलिबागेपासून सहा मैलांवर असलेल्या चौल (चंपावती) गांवीं होतें.

अप्नवान—भृगूच्या वंशांतील हा एक गोत्रकार आहे.

और्व—और्व ही भृगूच्या मोठ्या कुळाची शाखा असावी. और्व हें गोत्र असल्याचा उल्लेख आहे. पंचविंश ब्राह्मणांत दोन और्वांचा सन्मानानें उल्लेख आलेला आहे.

च्यवन ऋषीची भार्या मनुपुत्री आरुषी, हिच्या पुत्राचें नांव उर्व.

कृतवीर्य नांवाचा एक हैहयवंशीय राजा होता. त्याचे उपाध्याय भृगुकुलोत्पन्न होते. कृतवीर्यानें पुष्कळ यज्ञ करून भृगूंना पुष्कळ संपत्ति दिली होती. पुढें कृतवीर्याच्या वंशजांना द्रव्याची टंचाई भासूं लागली. तेव्हां त्यांनीं आपले उपाध्यायां-

कडे द्रव्याची मागणी केली. कांहींनीं भीतीनें कांहीं दिलें, व कांहींनीं जमिनींत पुरून ठेवलें. एका भार्गव ऋषीचें घर खणून पाहतां कांहीं द्रव्य सांपडलें. त्याबरोबर कृतवीर्याचे वंशज संतापून गेले व भार्गव ऋषि शरण आले असतांहि त्यांची कत्तल सुरू केली. इतकेंच नव्हे तर गर्भाचाहि नाश सुरू केला. तेव्हां भयामुळें भृगुवंशांतील स्त्रिया हिमालय पर्वतावर निघून गेल्या. त्या जात असतां एका स्त्रीनें आपला गर्भ गर्भाशयांतून काढून मांडींत ठेवला. ही गोष्ट एका स्त्रीनें राजास कळविली. तेव्हां हैहय त्या वंशाचा वध करणार तों, शंभर वर्षें मांडींत राहिलेला तो गर्भ बाहेर आला. त्याच्या तेजानें ते क्षत्रिय नेत्रहीन झाले. पुढें त्या अंधळ्या क्षत्रियांनीं और्वास प्रसन्न हो म्हणतांच त्यांस दृष्टि प्राप्त झाली. हा मातेच्या ऊरुपासून उत्पन्न झाला म्हणून यास और्व असें नांव पडलें.

मोठा झाल्यावरहि हैहयवंशीय राजांनीं आपल्या ज्ञातिबांधवांस त्रास दिला म्हणून यानें त्यांच्या संहारार्थ तप चालविलें. पण पितरांनीं याला आम्हांस मृत्यु यावा म्हणून आम्हींच हें अन्यायाचें कृत्य केलें; आम्हीं मेल्याबद्दल तूं क्रोधाविष्ट होऊं नकोस म्हणून सांगितलें. तेव्हां पितरांच्या समाधानार्थ यानें आपला क्रोधाग्नि समुद्रांत सोडिला. वरील कथा पराशराला राक्षसांच्या नाशापासून परावृत्त करण्याकरितां वसिष्ठानें सांगितली. याचें उग्र तप पाहून ब्रह्मदेवानें यास सरस्वतीकरवीं समुद्रांत टाकिलें व तेथें अग्नितीर्थ उत्पन्न झालें.

अयोध्याधिपति वृकपुत्र बाहु यास त्याच्या शत्रूंनीं—हैहय व तालजंघ यांनीं, राज्यच्युत केल्यावर तो याच्या आश्रमापाशीं आला असतां मृत्यु पावला. तेव्हां त्याची पत्नी सती जाऊं लागली. पण ती गरोदर आहे असें पाहून तिला और्वानें सती जाण्यापासून निवृत्त केलें. पुढें ती सगर नांवाचा पुत्र प्रसवली. या सगराला और्वानें अनेक अस्त्रांचें व शस्त्रांचें शिक्षण दिलें व रामाचें प्रख्यात आग्नेयास्त्र शिकविलें. नंतर सगरानें हैहय, तालजंघ, यवन या सर्वांस जिंकिलें, तेव्हां वसिष्ठानें त्यास राज्याभिषेक केला. राज्याभिषेकाचे वेळीं हा आला व यानें केशिनी, सुमती, प्रभा व भानुमती या सगराच्या पत्न्यांना संतानवृद्धिदायक वर दिले. यानें सगराचा अश्वमेध केला.

याचा पुत्र ऋचीक. परीक्षितास शाप झालेला ऐकल्याबरोबर जे ऋषी त्यास भेटण्यास आले होते त्यांत हा एक होता. याचें नांव अग्नि असून ऊर्वाचा वंशज असल्यामुळें यास और्व असें नांव पडलें असावें. तसेंच याचा काळ जमदग्नीनंतर असावा. याच्या नांवाचा उर्वीवर म्हणजे पृथ्वीवर असणारा असा अर्थ असावा. और्व मध्यदेशांत राहिले व तेथेंच त्यांचीं लग्नें झालीं, असें, जमदग्नि गंगातीरीं राहत असे, अशा माहितीवरून दिसतें. पण ब्रह्मांडांत हा नर्मदेवर होता असें दिसतें. यानें सगरास मदत केली; पण रामायणांत भृगूनें मदत केली म्हणून दिलें आहे. हा शेवटचा और्व होय. सगरानें हैहयादिकांचा नाश केला असतां तो सर्व पराक्रम

परशुरामानें केला असें म्हणतात. असें होण्याचें कारण ओर्वानें त्यास रामाचें आग्नेयास्त्र शिकविलें होतें हें असावें. हा भृगुगोत्री असून मंत्रकार होता.

२. याचा पिता भृगुवंशीय ऊर्व हा तप करीत असतां सर्व देव व ऋषी यास भेटण्यास आले. नंतर ऋषींनीं यास विवाह करून प्रजोत्पादन करण्याची विनंति केली. तेव्हां 'पत्नीशिवाय प्रजोत्पादन माझ्यासारख्या तपस्व्यास अशक्य आहे अशी या ऋषींची कल्पना आहे' असें वाटल्यावरून "हा पहा मी पुत्र उत्पन्न करितों, पण तो भयंकर होईल" असें यानें ऋषींस बजावून सांगितलें; व आपली मांडी अग्नींत घातली. नंतर एका दर्भाचे काडीनें तिचें मंथन करून त्या मांडी-पासून एक पुत्र निर्माण केला. त्याचेंच नांव और्व होय. पुत्राबरोबर उत्पन्न झालेली माया ऊर्वानें हिरण्यकश्यपूस दिली. हा जन्मल्याबरोबर खावयास मागूं लागला व यानें जगताचा दाह करण्यास आरंभ केला. याप्रमाणें तीन दिवस दाह केल्यावर ब्रह्मदेव येऊन त्यानें ऊर्वाची प्रार्थना केली; व आपण जेथें राहतों त्या समुद्रांत या बालकास स्थान देण्याचें कबूल केलें, व म्हणाला, "मी व हा बालक युगांतीं सर्व पदार्थांचा नाश करूं" असें कबूल केल्यावर हा और्वाग्नि आपलें तेज पितरांत टाकून समुद्रांत राहण्यास गेला. हाच युगांतीं प्रलयकारक, पातालांतील विषाग्नि, विष्णूच्या मुखांतून निघालेला व शंकराच्या तृतीय नेत्रांत राहणारा होय. यास वडवामुख, वडवानल, संवर्तक व समुद्रप हीं नांवें आहेत. हाच और्वाग्नि होय.

३. मालव (माळवा) देशांत राहणारा एक ब्राह्मण. याच्या स्त्रीचें नांव सुमेधा, व मुलीचें नांव शमिका. आपल्या मुलीचें यानें शौनकाचा शिष्य धौम्य-सुत मंदार याच्याशीं लग्न लाविलें. विवाहोत्तर कांहीं दिवसांनीं आपली स्त्री मोठी झाली असें जाणून तिला तो नेण्याकरितां और्वाच्या घरीं आला. और्वानें दोघांस आनंदानें निरोप दिला. मार्ग क्रमीत असतां वाटेंत ते दोघे भृशुंडीस पाहून हंसले. याबरोबर त्यानें यांस 'वृक्ष व्हा' असा शाप दिला. त्याप्रमाणें हे वृक्ष झाले. और्व व शौनक शोध करीत असतां हे वृक्ष झाले असें त्यांस कळलें. तेव्हां त्यांना फार खेद झाला. त्यांनीं देवाची आराधना केली. और्व अग्निरूपानें शमी वृक्षांत राहिला; व शौनक मंदाराची मुळी घेऊन त्याची गणेशाची मूर्ति बनवून तिचें पूजन करीत आश्रमीं गेला. दोघांच्या अनुष्ठानांमुळें शमी मंदार गणेशास प्रिय झाला.

जमदग्नि—याचा ऋग्वेदांत अनेक वेळां निर्देश आला आहे. यांत मित्रा-वरुण, अश्वी आणि सोम यांच्याशीं जमदग्नीचा संबंध दिसतो. सौदासाच्या यज्ञांत वसिष्ठपुत्र शक्तीनें वादांत विश्वामित्राचा पराजय केला व त्याला यज्ञांतून हांकून दिलें. तेव्हां जमदग्नीनें सूर्यापासून ससर्परी नांवाची वाणीचें सामर्थ्य वाढ-विणारी विद्या आणून विश्वामित्राला दिली व त्याच्या कुलाची वृद्धि केली. ससर्परी म्हणजे भाषणांतील कौशल्य. जमदग्नीला या ठिकाणीं वयोवृद्ध म्हटलें आहे. पुढील वाङमयांतहि हा विश्वामित्राचे बाजूचा असून वसिष्ठाच्या प्रतिकूल आहे;

पण हरिश्चंद्राचे राजसूयांत विश्वामित्र होता, वसिष्ठ ब्रह्मा व जमदग्नि अध्वर्यु होते. यानें चतुरात्र नांवाचा यज्ञ केल्यामुळें याच्या वंशांत कोणी दरिद्री निपजला नाहीं. असित, अत्रि, कण्व व वीतहव्य यांच्याबरोबर याचा निर्देश आहे. हा अक्षरब्रह्माचा उपदेश करीत असे. वेदप्रचाराकरितां व ब्रह्माच्या उपदेशाकरितां इंद्रानें याची योजना केली होती. इतरहि पुष्कळ ठिकाणीं याचा उल्लेख आहे. हा मोठा तपस्वी होता. जमदग्निभार्गवाचीं ऋग्वेदांत बरींच सूक्तें आहेत.

हा भृगु कुलांतील ऋचीक नांवाच्या ऋषीस गाधी राजाची कन्या सत्यवती हिचेपासून झालेला पुत्र होय. याचे बापाचें नांव भृगु असेंहि आढळतें. याला आर्चिक असें पैतृक नांव होतें. रेणुका ही याची स्त्री होती. तिच्यापासून याला रुमण्वान्, सुषेण, वसुमान्, विश्वावसु व परशुराम असे पांच पुत्र झाले.

जमदग्नि हा अत्यंत रागीट होता. एकदां हा लीलेनें बाण सोडीत होता व ते बाण आणावयास रेणुकेस सांगत होता. ती वेळ कडक उन्हाची असल्यामुळें रेणुका दमली व विश्रांतीस्तव एका झाडाखालीं बसली. त्यामुळें तिला बाण परत आणण्यास उशीर झाला. तेव्हां याला राग येऊन यानें तिला उशिराचें कारण विचारलें. रेणुकेनें उशिराचें कारण सांगतांच हा सूर्यावर संतापला व बाणानें सूर्यास वेधण्यास तयार झाला. तेव्हां सूर्य याला शरण येऊन त्यानें याला छत्री व पादत्राण दिलें. याचप्रमाणें त्यानें "मी तुझ्या उदरीं येईन" असें जमदग्नीस सांगितलें. पुढें तो परशुरामाच्या रूपानें जमदग्नीच्या उदरीं जन्मला.

एकदां रेणुका सरोवरावर स्नानास गेली असतां त्या ठिकाणीं चित्ररथ किंवा चित्रांगद आपल्या भार्यासह क्रीडा करीत होता. त्याचें ऐश्वर्य पाहून तिच्या मनांत त्याच्याविषयीं अभिलाष उत्पन्न झाला व ती त्याची क्रीडा पाहात तेथेंच थोडा वेळ उभी राहिली. त्यामुळें घरीं जाण्यास तिला जरा विलंब लागला. परंतु तेवढ्यावरून हा फार संतापला व यानें आपल्या पुत्रांस तिचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. परंतु परशुरामाशिवाय इतरांनीं याचें ऐकिलें नाहीं, त्यामुळें जमदग्नीनें त्यांचाहि वध केला. पुढें परशुरामानें आपल्या मातेचा शिरच्छेद केला तेव्हां प्रसन्न होऊन परशुरामास वर मागावयास सांगितलें असतां परशुरामानें वराच्या योगानें आपल्या मातेस व भावास जिवंत करविलें.

इतका जरी हा रागीट होता तरी पुढें पुढें हा अत्यंत शांत बनला. एकदां हा खराच शांत बनला आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां क्रोध सर्परूपानें पितृतिथीचे दिवशीं याच्याकडे आला. त्या दिवशीं जमदग्नीनें श्राद्धाकरितां खीर केली होती, त्या खिरींत सर्परूप क्रोधानें आपली गरळ टाकिली, परंतु हा क्रोधावर मुळींच रागावला नाहीं. तेव्हां क्रोधानें याची स्तुति केली. स्त्रीपुत्रादिकांच्या वधाचा विचार करतां जमदग्नीस पश्चात्ताप झाला व क्रोधामुळें हा अनर्थ झाला, म्हणून यानें क्रोध सोडला.

जमदग्नीनें गंगातीरीं एक हजार वर्षें तप करून इंद्रापासून कामधेनु मागून

घेतली. त्याच वेळीं इंद्रानें यास एक दैदीप्यमान व ईश्वरांशभूत असा पुत्र होईल, असा वर दिला. कश्यपानें याला षडक्षर मंत्र दिला होता.

पुढें एकदां हैहय देशचा राजा कार्तवीर्य हा ससैन्य जमदग्नीचे आश्रमास आला. जमदग्नीनें त्याचें कामधेनूच्या साहाय्यानें उत्तम प्रकारें आदरातिथ्य केलें. कार्तवीर्यास जमदग्नीच्या ऐश्वर्याचा हेवा वाटून त्यानें कामधेनूस बलात्कारानें ओढून चालविली. त्या वेळीं कामधेनूनें आपल्या शरीरापासून बरेच यवन उत्पन्न करून त्यांच्याकडून कार्तवीर्याचा पराभव करविला. पुढें कार्तवीर्यानें जमदग्नीचे आश्रमाचा विध्वंस करून कामधेनु हरण करून नेली. हें परशुरामास कळतांच त्यानें कार्तवीर्यास ठार मारून गाय सोडवून आणली. पण कार्तवीर्यास ठार केलें, ही गोष्ट जमदग्नीस पटली नाहीं. कार्तवीर्यपुत्रांनीं पित्याच्या वधाचा सूड घेण्याकरितां परशुराम आश्रमांत नाहीं हें पाहून, जमदग्नीस २१ बाणांनीं विद्ध करून मारून टाकिलें. पुढें परशुरामास हें कळतांच त्यानें सर्व क्षत्रियांचा २१ वेळां निःपात करून जमदग्निवधाचा सूड घेतला.

कार्तवीर्यानेंच जमदग्नीस मारल्याचाहि कांहीं ठिकाणीं उल्लेख आहे. वैवस्वत मन्वंतरांतील हा सप्तर्षींपैकीं एक होता. जमदग्नीनें प्रथम श्राद्ध सुरू केलें. हा भृगुकुलांतील गोत्र व प्रवरहि आहे.

वरील माहितीवरून जमदग्नि गंगातीरीं व और्व मध्यदेशांत राहात असत; गुजराथेंत नर्मदातीरावरील भडोच गांवीं, परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केल्यावर अवभृथ स्नान केलें, त्या वेळीं त्यास मंत्र सांगणारे, भार्गव ब्राह्मण राहात होते वगैरे समजतें. हल्लींहि या नांवाचे ब्राह्मण त्या प्रांतांत आहेत. कोंकणांत कुलाबा जिल्ह्यांतील चौल (चंपावती) येथें च्यवन भार्गवाचें स्थान होतें हेंहि पुष्कळांस माहीत असेल. यावरून गंगातीरीं असलेले आर्य प्रथम नर्मदातीरीं आले व नंतर तेथून महाराष्ट्रांत (दंडकारण्यांत) आले असें म्हणतात त्यास ही माहिती विसंगत दिसत नाहीं.

भृगूपासून उत्पन्न झालेली ही कुलगंगा जामदग्न्यांपर्यंत कशी आली इतकी माहिती वर लिहिल्याप्रमाणें, प्राचीन ग्रंथांवरून कळते. त्यानंतरचे काळांत या नदीचा प्रवाह कसा वाहात होता हें आज उपलब्ध असलेल्या माहितीवरून कळत नाहीं. सरस्वती नदीप्रमाणें हिचा प्रवाह गुप्त वाहात होता, तो राजापूरचे गंगेप्रमाणें एकदम अर्वाचीन काळांत म्हणजे सुमारें साडेतीनशें वर्षांपूर्वी–शक १५२१ मध्यें–कोंकणांत रत्नागिरीजवळ नेवरें येथें पेंडसे व कुंटे उपनामरूपी दोन फांट्यांनीं वाहतांना दिसूं लागला.

हा प्रवाहहि फार जोराचा नाहीं. कोंकणस्थांच्या ३००, ३५० उपनांवांपैकीं फक्त चारच आडनांवें जामदग्न्यगोत्री आहेत. यावरून एकंदर कोंकणस्थांत हें गोत्र, किंबहुना हें भृगुकुल अल्पसंख्य आहे हें ध्यानांत येईल. सवाशें वर्षांपूर्वीं रास्ते यांनीं वाई येथें अग्रहारदानासाठीं निवडलेल्या कोंकणस्थ ब्राह्मणांत इतर

सहा गटांचे ब्राह्मण आहेत. फक्त या भृगुगटाचे नाहींत. तसेंच विश्वविद्यालयाचे परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या याद्या पाहिल्या असतां या गटांतील व विशेषत: जामदग्नीगोत्रीय आडनांवांचे लोक फारच थोडे आढळतात. ह्यावरून वरील विधानास पुष्टि येते.

वरील अगदीं अलीकडील उल्लेख व प्राचीन ग्रंथांतील उल्लेख यांचे मधील काळांत कोंकणांत जामदग्न्यगोत्री ब्राह्मण असल्याचा दाखला मिळतो. पहिला उल्लेख शक १३१३ मधील ताम्रपटांत आहे. हा ताम्रपट शक १३१३ प्रजापति संवत्सरीं, वैशाख वद्य ३०, सौम्यवासरीं विजयानगरचे राजवटींत वेंगुर्लें तालुक्यांतील कोचरें गांवांत २४ ब्राह्मणांस २५ वृत्ति दिल्याबद्दलचा आहे. या २४ ब्राह्मणांत २ जामदग्न्य-वत्सगोत्री व ५ जामदग्न्यगोत्री आहेत. पेंडसे यांचें एक घराणें (क्रमांक १५) मूळ कोचरें येथील आहे. यावरून कदाचित् या घराण्याचा पूर्वज या जामदग्न्यगोत्रीय ब्राह्मणांतील एक असेलहि. या पांच ब्राह्मणांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

१.	जामदग्न्य गोत्रस्य	ऋक्शाखाध्यायिन:		महादेवपुत्र वामनभट्टस्य	वृत्तिरेका.
२.	,,	,,	,,	केशवभट्टपुत्रानंतभट्टस्य	,,
३.	,,	,,	,,	रामकृष्णभट्ट विष्णुभट्टस्य	,,
४.	,,	,,	,,	विठ्ठलभट्ट वासुदेवभट्टस्य	,,
५.	,,	,,	,,	बाहरिभट्टपुत्र महादेवभट्टस्य	,,

(मठगांवचा शिलालेख आणि कुडाळ प्रांताचा प्राचीन इतिहास. अ. ब. वालावलकरकृत. परिशिष्ट लेखांक १.)

दुसरा आधार म्हणजे कुडाळ देशस्थ प्रभु घराणें हें जामदग्न्य–वत्सगोत्री आहे हा होय—हें घराणें कोंकणस्थ ब्राह्मणांतील मात्र नव्हे.

कोंकणस्थांचीं उपनामें अमुक एका कारणानें पडलीं असा निश्चित शोध अद्याप लागत नाहीं. हीं नांवें प्रचारांत येण्याचीं अनेक कारणें असावींत असें वाटतें. बिवलकर, पेठकर, दाभोळकर, जोगळेकर, दारशेतकर, चिपळूणकर, रहाळकर वगैरे नांवें राहण्याचे ठिकाणावरून; वैद्य, भट, स्वयंपाकी, जोशी, व्यास वगैरे वृत्ति व धंद्यांवरून; परांजपे, मनोहर, काळे, गोरे वगैरे व्यक्तिविषयक गुणांवरून; जामदार, पागे, पोतदार, मुजुमदार, हसबनीस वगैरे हुद्यांवरून; महाजन, वर्तक वगैरे गांवांतील अधिकारपरत्वें प्रचलित झाल्याचें दिसतें. केळशी येथील पेंडसे हे याच कारणानें महाजन उपनांव लावतात. सर्व नांवांची उपपत्ति आज सांगतां येत नाहीं. ज्यांची उपपत्ति सांगतां येत नाहीं अशांपैकींच पेंडसे उपनांव आहे. पेंडसे हें पेंडसा ह्या एकवचनी शब्दाचें अनेकवचनी रूप आहे हें ध्यानांत येईलच. जुने कागदपत्रांत " बाळ पेंडसा " अशासारखे एकवचनी शब्दप्रयोग आढळतात, व कोंकणांत अद्याप वाक्प्रचारहि तसा चालू आहे. अक्षर-

वटिका व शब्दार्थ पाहून कांहीं जणांनीं आपले तर्क कळविले आहेत ते पुढीलप्रमाणें :--

१. 'पेण' गांवचे राहणारे मनुष्यास 'पेण'चा असें म्हणतात. त्याचा अपभ्रंश होऊन पेंणसा असें रूप झालें.

२. 'पेंडसा' या शब्दाचा शब्दकोशांत अर्थ दिला आहे तो असा : पावसाळा संपल्यावर घराच्या वाश्यांवर पसरून टाकलेल्या गवताच्या पेंढ्या, भारे, ओमण. यांवरून ज्यांच्या घरीं खूप भातशेती असून पेंढाहि खूप आहे अशांना पेंडसे म्हणण्याचा रिवाज पडला असावा. कोंकणांत घरावर " पेंडसा घेणें " असें म्हणण्याची पद्धति आहे, त्याचा अर्थ घरावर पेंढा चढविणें असा आहे.

३. पेंडस या नांवाचें दोन हात लांब लांकडी दांडा असलेलें आणि चापट सरळ टोंक असलेलें खोदण्याचें एक लोखंडी हत्यार आहे, त्यावरून पेंडसा शब्द झाला असावा.

४. पेण या शब्दाचा मिरवणुकीच्या वेळीं पालखी उभी राहण्याचें ठिकाण असा एक अर्थ आहे. ज्याचे घराजवळ पालखी उभी राही तो 'पेणचा' व नंतर पेंडसा.

वर सुचविलेल्या उपपत्तींस कांहीं प्रत्यंतर पुरावा मिळत नसल्यामुळें त्यांतील कोणतीहि उपपत्ति आज ग्राह्य मानतां येत नाहीं व पेंडसे आडनांवाचे उगमाचा प्रश्न आज तरी अनिर्णीतच राहात आहे.

आडनांवें रूढ झाल्यास आज सातआठशें वर्षें झालीं असावीं असें म्हणतात. त्यापूर्वीं गोत्रें सांगण्याची प्रथा होती असें जुने ताम्रपट व शिलालेख यांवरून दिसतें. तीच गोत्र उच्चारण्याची प्रथा अद्यापि श्राद्धतर्पणादि धार्मिक कृत्यांत आहे. उपनामाचा उच्चार करीत नाहींत. कोंकणस्थांचे आडनांवाचा सर्वांत जुना उल्लेख इ. सनाचे १४ वे शतकांतील आढळतो. पेंडसे या नांवाचा उल्लेख इतका जुना आढळत नाहीं. पहिला उल्लेख शक १५२१ मधील म्हणजे ३४० वर्षांपूर्वींचा उपलब्ध झाला आहे. कर्यात नेवरें याखालीं अनेक वाडे होते; व त्या वाड्यांतून कोण लोक राहात होते याची यादी टोळवाडचे रा. गोविंद विश्वनाथ साठ्ये यांजकडे रा. गोपाळराव आचवल यांस पाहण्यास मिळाली. तींत वाडा 'चिंचवली' स राहणारे लोकांत 'पेंडसा' असल्याचा उल्लेख आहे व वाडा 'उमर (उत्तर)' येथें 'कुंटा' होता. वाडा चिंचवली येथें असणारे लोकांची यादी :—

कोलटकर, गदरा, भिडा, ओगुला, म्हसकर, पाटणकर गांव-उपाधिक, चिपळूणकर, काळमानी देसाई कोलटकर, रामदेवमानी देसाई, केसमानी देसाई, खरे कुललिखीत–कर्यातिमजकूर, नारमनी देसाई पाटणकर, **पेंडसा.**

केळशीचे पेंडसे हे तेथील महाजन असल्यामुळें कागदोपत्रीं महाजन हें उपनांव लावूं लागले. त्यांस व मुर्डी वगैरे गांवांतील पेंडसे मंडळीस ते पेंडसे अस-

त्याची पूर्ण स्मृति आहे म्हणून त्यांचाहि या वृत्तान्तांत समावेश केला आहे. महाजन आडनांव लावणारे सर्व पेंडसे आहेत असें अनुमान यावरून करणें बरोबर नाहीं. प्रत्येक गांवचे महाजन निरनिराळे उपनांवांचे लोक आहेत. आंजर्ल्यांचे महाजन भट आहेत. नागांवचे कुंटे आहेत. नागांवचे महाजन मूळचे कुंटे, तेव्हां केळशीचे महाजनहि कुंटे असले पाहिजेत; पण ते आपणांस पेंडसे म्हणतात व म्हणून पेंडसे हेहि कुंटेच होत अशी एका गृहस्थानें समजूत करून घेऊन तसें पत्रद्वारें कळविलें, पण ती कशी निराधार आहे हें सहज ध्यानांत येईल.

प्रकरण ३ रें

मूलस्थान

पेंडसे यांचीं ३० घराणीं आहेत. या सर्वांचें कोंकणांत मूळ गांव कोणतें हें आज निश्चित सांगतां येत नाहीं; कारण यांपैकीं कांहीं घराण्यांतील व्यक्तींस आपलें मूळचें गांव कोणतें हें माहीत नाहीं. ज्या घराण्यांस आपले मूळ गांवची स्मृति आहे त्यावरून सर्वांचें एकच गांव ठरवितां येत नाहीं. तथापि रत्नागिरी जिल्ह्यांतील कोणते भागांत हें कुल ज्ञात अशा जुन्या काळीं राहात होतें हें ठरवितां येतें किंवा कसें तें पाहूं.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सर्वांत जुना उल्लेख शक १५२१ मधील नेवरें गांवचा आहे. आज या गांवांत एकहि पेंडसे कुटुंब नाहीं. गांवांत कोणतेहि ठिकाणास पेंडसे यांचें नांव चालत नाहीं. तथापि तेथें पूर्वीं पेंडसे यांची वस्ती होती ह्यास आणखी एक पुरावा सांपडतो. नेवरें येथील ग्रामदेवता आदित्यनाथ आहे. हें देवालय बऱ्याच जुन्या काळचें असल्याचें मंदिर पाहतांच ध्यानांत येतें. या देवळाचा उल्लेख पुळें येथील गणपतीच्या देवालयांत पुराण कोणी सांगावें याबद्दल वाद उपस्थित झाला होता, त्यासंबंधांत इ. स. १७६४ मधील आढळतो. ... ...

" देशकांनीं नेवरें येथें आदित्यनाथाचे देवालयीं बापट यांस बोलावून त्यांस विचारितां 'आमचे जवळ भुक्त लिखित नाहीं व आमचा साक्षी कोणी नाहीं' असें सांगितलेवरून देशकांनीं शेंडे यांस पत्र दिलें. " ... . सन खमस सीतैन मया व अलफ (गणपतीपुळें—महात्म्यवर्णन—पृ. ३१).

श्रीआदित्यनाथ यास केळशी, रेवदंडा व मुर्डी येथील घराणीं आपला कुलस्वामी मानतात. यावरून हीं घराणीं मूळ नेवरें येथून केळशी—मुर्डी—आंजर्लें या भागांत राहावयास गेलीं असलीं पाहिजेत. मुर्डीचे महाजनकीचे वादांत

" कृष्णाजी बापूजी याचा बाप वसणीकडून तीस वर्षांपूर्वी मुर्डीस येऊन राहिला " असा मुद्दा उपस्थित केला गेला होता. तसेंच नेवरें गांवचे आसपासचे गांवांतून बरींच घराणीं केळशी मुरुड भागांत राहावयास आलीं आहेत. नेवऱ्याहून कोल्हटकर मुरुड व आंजर्लें येथें व नाचण्याहून घाणेकर आंजर्ल्यास आले. मुरुडचे सोमण व केळशीचे वर्तक (कुंटे) यांचें कुलदैवत आदित्यनाथ आहे त्या अर्थी हीं घराणींहि नेवऱ्याकडून मुरुड व केळशी येथें आलीं असावीं. यावरून पेंडसे नेवऱ्याहून केळशी व मुर्डी येथें आले असें नक्की समजण्यास कांहीं हरकत नाहीं. पेंडसे व कुंटे ह्यांचें गोत्र जामदग्न्य असून यांची जोडी नेवरें येथें जशी आढळते तशीच केळशी येथें महाजन व वर्तक या नांवानें दिसते. मुर्डीस ही जोडी होती; परंतु स. १६८८ चे राज्यक्रांतींत गांव उध्वस्त झाला असतां कुंटे व पेंडसे दोघे गांव सोडून गेले. परंतु कुंटे परत आले नाहींत त्यामुळें आज कुंटे तेथें नाहींत. त्यांचें नांव एका ठिकाणास बरेच दिवस चालत होतें. पुढें त्यास " ब्रहिरीचा आगर " म्हणूं लागले.

घराणें ७ (केळशी) व घराणें १२ (मुर्डी) हीं नेवरें येथील होत; व त्या घराण्यांचा एकमेकांशीं निकट नात्याचा संबंध होता, ह्याची जाणीव ५० वर्षांपूर्वीपर्यंत एकमेकांस चांगली होती व ते थोडें फार एकमेकांचें अशौच मानीत असत. क्रमांक ६, ८, ९ व १० हीं घराणीं केळशीचीं होत हें निश्चित माहीत आहे. म्हणजे एकंदर सहा घराण्यांचें ज्ञात मूलस्थान नेवरें हें होय.

१६ वें घराणें केळशी, मुर्डी किंवा श्रीवर्धनचें असावें असें म्हणतात. २३ वें घराणें (तळें–श्रीवर्धन) हें बहुधा केळशीचेंच असावें; कारण स. १७८१ मध्यें 'कृष्णाजी रघुनाथ' केळशीस असल्याचा उल्लेख आहे. या अनुमानाचीं सविस्तर कारणें या घराण्यांतील व्यक्तींची माहिती देतांना प्रकरण ७ मध्यें दिलीं आहेत. हीं दोन घराणीं केळशी–मुर्डी गटांतील आहेत, असें मानिल्यावर एकंदर ८ घराणीं नेवरें येथील मानितां येतील.

शक १५२१ मधील नेवरें येथील उल्लेखानंतरचा निर्देश शक १५४५ चा गोळप येथें पेंडसे असल्याचा उपलब्ध झाला आहे. या सुमारास 'विष्णु,' दुसरे (धामापूर) घराण्याचा मूळ पुरुष, गोळप येथून धामापुरास राहावयास गेला. आज गोळप येथें एकहि पेंडसे कुटुंब नाहीं. तथापि त्यांची स्मृति, नेवऱ्याप्रमाणें अद्याप तेथें नामशेष झाली नाहीं. तेथील कांहीं ठिकाणांस पेंडसे यांचीं ठिकाणें म्हणतात. गोळप गांवचे वांटपाचे जुने कागदांत पेंडसे नांव आहे, व इ. स. १७३२ चे सुमारास काशीभट वासुदेवभट नावलेकर यांस मिळालेल्या सनदेंत पेंडसे यांचे शेताचा उल्लेख आहे. आपलें मूळ गांव गोळप असें १, २, ३, ४ व ५ क्रमांकाचे घराण्यांतील मंडळी सांगतात. घराणें १३ वें हें तेथून निघून गुहागरमार्गें चौकास आलें असें म्हणतात. २९ वें घराणें गुहागराहून नाशिक व नंतर किवळें येथें आलें. यावरून त्याचा व १३ वे घराण्याचा संबंध असावा. २४ वें घराणें (रोहें) आपलें मूळ गांव पावस अगर मेटें सांगतें. पावस व गोळप हीं गांवें एकमेकांजवळ

आहेत व पूर्वी गोळप-पावस असें जोडीनें म्हणण्याचा प्रघात असे. यावरून १३, २४ व २९ हीं घराणीं मूळ गोळपचीं असावींत असें मानिलें म्हणजे एकंदर ८ घराणीं गोळपचीं होत असें ठरतें.

घराणें २७ मधील मंडळीस आपलें मूळ गांव निश्चित सांगतां येत नाहीं. कोणी आंजर्लें, कोणी पावस, कोणी तळें वगैरे म्हणतात. यांपैकीं कोणतेंहि एक मानलें तर या घराण्याचा समावेश नेवरें अगर गोळप यांपैकीं एका कुटांत होईल म्हणजे नेवरें व गोळप या दोन कुटांत एकंदर १७ घराणीं होतात.

२६ वें घराणें (वावशी) सावित्री नदीतीरावरील कोंकणांतील क्षेत्र हरेश्वर येथून उकसाण, जि. पुणें येथें आलें. त्या गांवांत त्यास अग्निहोत्री म्हणून पेशवाईंत इनाम मिळालें होतें. आज हरेश्वरास पेंडसे नाहींत, परंतु पूर्वी ते तेथें होते हें निश्चित आहे. तेथील ४२ तीर्थोपाध्यायांत १ कृष्णंभट व २ रामभट (यांचें घर आडाजवळ, ब्रह्मतीर्थासमीप होतें) हे दोन पेंडसे होते. या घराण्यांतील दुसरे पिढींत हीं दोन नांवें आढळतात. सध्यां हरेश्वराजवळ म्हणजे श्रीवर्धन येथें पेंडसे आहेत, पण ते या घराण्यांतील नाहींत; ते गोळप गटांतील घराणें क्रमांक ३ व नेवरें गटांतील घराणें क्रमांक २३ यांतील आहेत. त्यावरून हें घराणें गोळप-नेवरें भागांतून हरेश्वराला आलें असावें. केळशी गांवहि नदीपलीकडे फार दूर नाहीं.

२५ वें घराणें कोठिंबें येथील होय. या घराण्याचा व २६ वे घराण्याचा तीन दिवसांचा सोवेरसुतक संबंध आहे; यावरून हीं मूळचीं एकच होत हें निश्चित होय. २१ वें घराणें करंजगांवचें. विद्यमान व्यक्तींकडून मूळ ठिकाणांबद्दल कांहीं माहिती मिळत नाहीं. पेशवे यांचे उपाध्ये कर्वे होत. त्यांस पेशव्यांकडून करंजगांव इनाम मिळालें. त्या वेळीं त्यांचेबरोबर इतर ब्राह्मण कुटुंबें तेथें हरेश्वर-श्रीवर्धन भागांतून राहावयास आलीं. त्यांतच हें पेंडसे कुटुंब असावें. २१ व २५ हीं दोन्ही घराणीं अशा रीतीनें २६ वे घराण्याशीं संलग्न झालीं म्हणजे हीं तीन घराणीं, तसेंच त्र्यंबकेश्वराचे माहितीवरून २८ वें घराणें हें मूळ श्रीवर्धनचें असावें असें दिसतें, म्हणून तेंहि नेवरें अगर गोळप कुटांतील असलें पाहिजे असें ठरतें.

१४ वें घराणें हें मेटें येथील मूळचें नसून तेथें घाटावरून गेलें असावें असें म्हणतात. श्रीत्र्यंबकेश्वरचे माहितींत यांचे पूर्वजांनीं वास्तव्याचें ठिकाण चिपळूण सांगितलें आहे. यावरून तें चिपळूणमार्गें मेटें येथें गेलें असावें, अगर चिपळूण हें मेटयाशेजारील मोठें गांव म्हणून त्याचा उल्लेख केला असावा. तसेंच या घराण्याची एक शाखा सातारा जिल्ह्यांतील तारळें गांवीं बरेच दिवस आहे. ३० वें घराणें हेंहि मेटयाचें असावें. यांतील मंडळी कल्याण, भिवंडी व चौक इकडे आहेत. त्यांजकडून विश्वसनीय माहिती मिळूं शकत नाहीं. प्रचलित दंतकथा अशी आहे कीं, धामापूर (घराणें २) चे व मेटयाचे

पेंडसे हे मूळचे एक आहेत. ही वृद्ध लोकांनीं सांगितलेली दंतकथा खरी मानल्यास १४ व ३० हीं दोनहि घराणीं गोळपचीं म्हणतां येतील. चितळे-कुलवृत्तान्ताचे प्रस्तावनेंत असें म्हटलें आहे कीं, " कांहींच्या मतें चितळे हे नेवऱ्याहून चिपळुणास आले व तेथून इतरत्र राहावयास गेले. " याप्रमाणें मेटें घराण्याचेंहि असणें असंभवनीय नाहीं.

२२ वे (आवास) घराण्याचें मूळ गांव विद्यमान व्यक्तींकडून कळत नाहीं; परंतु हें घराणें मूळ सोमेश्वर, तालुका रत्नागिरी, येथील असावें. प्रकरण ९ मधील सुटक वंशावळी क्रमांक ४, ५ व ६ वरून असें दिसतें कीं, आवास व सासवनें येथील पेंडसे मूळ सोमेश्वरचे असून तेथून शेकाची बिरवाडी व नंतर आवास-सासवनें येथें गेले. ८ वें घराणें सध्यां शेकाचे बिरवाडीस आहे. त्याचा व या घराण्याचा संबंध आज जुळवून दाखवितां येत नाहीं; तथापि हीं दोन्ही एक असण्याचा बराच संभव दिसतो.

येथपर्यंत वर २४ घराण्यांचे मूलस्थानांबद्दल विवेचन केलें, यावरून रत्नागिरी तालुक्यांतील नेवरें, गोळप व सोमेश्वर येथून पेंडसे मंडळी उत्तर दिशेकडे कशी गेली हें ध्यानांत येईल. १७ व १८ हीं घराणीं संगमेश्वर तालुक्यांतील परचुरी व १९ वें घराणें चिपळूण तालुक्यांतील हेदवी आपलें मूळ ठिकाण सांगतात. परचुरी व हेदवी हीं गांवेंहि नेवरें-गोळप यांचे उत्तरेसच आहेत; त्यावरून तेथून निघालेली कांहीं मंडळी रस्त्यांत परचुरी व हेदवी येथें राहिली असावी असें अनुमान चुकीचें ठरणार नाहीं. कासारवेली, टोळवाड व सडे-पिरंदवणें येथेंहि जुन्या काळीं पेंडसे यांचें वास्तव्य असल्याचा उल्लेख आहे. सड्यांतील पेंडश्यांचें ठिकाण "जुन" चे भावे यांजकडे आहे असें म्हणतात. सडे-पिरंदवणें येथील " बाळ पेंडसा " यांचा मुलगा धामापूर घराण्यांत दत्तक गेल्याचा दाखला मिळतो.

वर आलेल्या माहितीवरून पेंडसे यांची वस्ती पूर्वकाळीं, नेवरें, गोळप, सोमेश्वर, सडे-पिरंदवणें, टोळवाडी, कासारवेली येथें होती असें सिद्ध झालें. हीं सर्व गांवें रत्नागिरीचे पंचक्रोशींत आहेत. आज जिल्ह्याचें ठाणें म्हणून जें महत्त्व रत्नागिरीस आहे तें पूर्वीं नव्हतें. कर्यात नेवरें, व पावस हीं त्या काळीं मोठीं ठिकाणें होतीं.

कोचरें (क्रमांक १५) घराणें या विधानास सकृद्दर्शनीं अपवादात्मक दिसेल. कारण हें गांव वेंगुर्लें तालुक्यांत म्हणजे नेवरें-पावस यांचे दक्षिणेस आहे व तेथील मंडळी नेवरें-पावसकडून तिकडे गेली असें आज निश्चित सांगतां येत नाहीं. परंतु ज्याप्रमाणें मूळ ठिकाण सोडून बरीच मंडळी उत्तर दिशेस गेली त्याचप्रमाणें एकादें कुटुंब दक्षिण दिशेस गेलें असेल. याचे उलट म्हणजे सर्व मंडळी कोचरें भागांतून नेवरें-पावस भागांत आली असतील असें मानण्यास कांहीं आधार नाहीं. ३० घराण्यांपैकीं एकच घराणें कोचरें हें आपलें मूळ गांव सांगतें. यावरून रत्नागिरी-पंचक्रोशी हेंच पेंडसे यांचें मूल वसतिस्थान होय.

प्रकरण ४ थें

ऐतिहासिक कागदपत्रें व उल्लेख

१. पाहणी

महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचा काल हा आपणां महाराष्ट्रीयांस अभिमान बाळगण्यासारखा आहे. विशेषतः त्या काळांत इतर भरतखंडवासीयांनीं आपला हेवा करावा असा थोरवीचा मान या महाराष्ट्रानें आपल्या कर्तृत्वानें संपादन केला असल्यामुळें त्या कालांतील आपल्या पूर्वजांचें वृत्त आदरपूर्वक पाहणें हें आपलें आवडतें व आवश्यक कार्य सहजच होऊन बसलें आहे. अशा त्या इतिहासकालांत पेंडसे कुलांतील व्यक्तींनीं कांहीं कामगिरी केली असेल तर ती कोणची हें प्रस्तुत थोडक्यांत पाहावयाचें आहे.

ही पाहणी करण्यांतील आशय उघडच हा आहे कीं, शतका दोन शतकांनंतरची पेंडसे मंडळी कालमानानुसार प्रगतिपथावर आपलें पाऊल टाकीत आहेत कीं आणखी कोठें दुसरीकडे ही मंडळी चालली आहे हें ध्यानांत यावें, व हेंच इतिहासाचें उद्दिष्ट आहे. येथेंच हेंहि सांगितलें पाहिजे कीं, आतांप्रमाणें गत कालांतील सर्व पेंडसे मंडळींचें वृत्त कळून येणें अशक्य. पण तशांतहि " स्थितस्य गतिश्चितनीया " या न्यायानें जें उपलब्ध होईल तेवढ्याची पाहणी करणें प्राप्त आहे.

पेंडसे कुलांतील व्यक्तींचें इतिहासकालांतील कार्य प्राधान्येंकरून आढळतें तें, राज्यकारभारांतील अठरा कारखान्यांपैकीं लेख्यशाला म्हणजे दफ्तरखाना हें जें एक प्रमुख अंग, तें अव्यंग राखणें व त्यांतील तज्ज्ञत्व परिपूर्णपणें अंगीं असणें हें होय. पेंडसे मंडळीची ही उल्लेखनीय कामगिरी बाजीराव बल्लाळ म्हणजे थोरले बाजीराव ह्यांचे राजवटीपासून तों शेवटचे बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दीचे अखेरीनंतरहि, अव्वल इंग्रजींत सुद्धां, ठळकपणें दिसून येते. यासंबंधीचे आद्यंताचे दोन उल्लेख पे. द. भाग २४ लेखांक १४९ (ऐ. प्र. क्रमांक ८ पहा) व पे. द. भाग ४१ लेखांक ३२२ (ऐ. प्र. क्रमांक ३७ पहा) यांमध्यें आले आहेत.

त्या काळीं आऊत सोडून राऊत होणारे जसे मराठे मंडळींत लोक आढळतात त्याचप्रमाणें लेखणीबरोबर खड्गहि घेऊन शिपाई बाण्याची कामगिरी करणारे महाराष्ट्र ब्राह्मण आढळतात. ह्या नियमास हें पेंडसे घराणें अपवाद नाहीं. मात्र प्राधान्येंकरून कारकुनीची व त्या मानानें अल्पतः शिपाईगिरीची, यांची कामगिरी आढळते. त्याचप्रमाणें सावकारी, पंडिती, व वैदिकी करणारे, तसेंच वकील व खोत आणि महाजन असलेले पेंडसे घराण्यांतील पुरुष आढळतात. यांतहि प्रांतभेदानें व्यवसायभेद झाला आहे हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. कोंकण सोडून देशावर

आल्यानंतरचे कारकुनी, शिपाईगिरी, सावकारी व वकिली हे व्यवसाय या मंडळींचे झाले आहेत. आणि खोत, महाजनकी हे विलायतेंत म्हणजे कोंकणांत असतांचे व असलेल्यांचे व्यवसाय आहेत. भिक्षुकी व शास्त्री हा पेशा कोंकण व देश या दोन्ही प्रांतांत सामान्य आहे. ह्यावरून गांवकामदार या नात्यानें कोंकणांत व राज्यकारभारांतील कामगिरी करणारे देशांत आल्यावर असा वाढता फरक इतर कोंकणस्थ कुटुंबीयांप्रमाणें येथेंहि निदर्शनास येतो.

आतां ही वरील कामगिरी कोणीं व केव्हां केली हें पाहूं. वर उल्लिखित केलें आहे त्याप्रमाणें मुख्य प्रधान थोरले बाजीराव यांचे कारकीर्दींत जे ह्या लेख्यशालेवरील अधिकारी होते त्यांचें नांव गणेशपंत पेंडसे (१३–४) हें होय. ह्यांजविषयींचा निर्देश असलेलें पत्र नानासाहेब पंतप्रधान यांच्या कारकीर्दींत म्हणजे इ. स. १७५६ प्रारंभींचें आहे. पण ह्या गणेशपंतांकडे ज्या कागदांची चवकशी करावी म्हणून तेथेंच दोनदां आवर्जून सांगितलें आहे ते कागद लक्षांत घेतां गणेशपंतांकडे ही दफ्तरदारी नानासाहेबांचे वडिलांपासून म्हणजे थोरले बाजीराव यांच्या राजवटीपासूनहि असावी असें अनुमानिल्यास चालेल असें वाटतें. पत्रांत तर थोरले नानासाहेब म्हणजे बाळाजी विश्वनाथ यांचाहि उल्लेख प्रसंगानें केला आहे. या उल्लेखाचें कारणहि लक्षांत घेण्याजोगें आहे. महाराष्ट्र राज्यांत आंग्रे या आरमारी घराण्याचा अंतर्भाव बाळाजी विश्वनाथांच्याच करवीं झाला. त्या वेळीं कान्होजी आंग्रे यांशीं या नानांचा जो करारनामा झाला तो, तसेंच 'राव' म्हणजे बाजीराव यांशीं मानाजी आंग्रे यांचा सन १७३४ मध्यें जो तह होऊन हिशेबहि झाला तो आणि श्री. चिमाजीअप्पा ह्यांशींहि इ. स. १७३९ मध्यें झालेला तह हे तिन्ही तह व हिशेब गणेशपंत पेंडशांना माहीत असतील; ह्यांचे कागद दफ्तरांतून तेच काढून देतील, असें नाना फडणवीस यांचे वडिलांनीं म्हणजे जनार्दनपंत फडणविसांनीं मोरोबादादाचे वडिलांस म्हणजे आपल्या भावास कळविलें आहे. राघोबादादाबरोबर उत्तर हिंदुस्थानचे स्वारींत (स. १७५३–५५) राजकारणी महत्त्वाचे कामावर हे होते असाहि उल्लेख तिकडील पत्रांत आढळतो. यांचीं २५–३० पत्रें ग्वाल्हेरीस उपलब्ध झालीं आहेत. तीं पाहिलीं म्हणजे हे मोठे मार्मिक लेखक असून स्पष्टवक्तेहि होते असें दिसतें. यानंतर ह्या कामगिरीवर पेंडसे व्यक्तींचा उल्लेख सवाई माधवरावांचे वेळचा आढळतो. थोरले माधवरावांचे कारकीर्दींतील उल्लेख हातीं आला नाहीं इतकेंच, पण तेव्हांहि ह्या अधिकारावर पेंडसे पुरुष असले पाहिजेत हें निभ्रांत खरें आहे. सवाई माधवरावांचे वेळचा उल्लेख निदर्शनास आला आहे तोहि लक्षांत घेण्याजोगा आहे. पुणें ही त्या काळीं महाराष्ट्र साम्राज्याची राजधानी असल्यामुळें आतां ज्याला आपण **इंपीरियल गव्हर्नमेंट** म्हणतों त्या अधिसत्तेचें मुख्य दफ्तर किंवा लेख्यराजमंदिर येथेंच होतें. त्या दफ्तरास तेव्हां "एकबेरजी चालतें दफ्तर" असें संबोधिलें आहे. या दफ्तरखान्यांत कृष्णाजी गणेश पेंडसे (१३–५) हे असत. ह्यांना

स्वतःकरितां ७०० रुपये, यांच्या पदरच्या नोकराचाकरांसाठीं १२० रुपये वर्षास मिळावयाचे, आणि सन्मानार्थ १५० आंखाचें वस्त्र देण्याचाहि यांना मान असे. ह्यावरूनहि कृष्णाजीपंतांच्या साम्राज्य दफ्तरांकडील अधिकारीपणाची प्रतीति मिळते. ह्यानंतर रामचंद्र गोविंद (१–७), गोविंद सदाशिव (२–८) व गणेश कृष्ण (१३–६) यांचे उल्लेख याच दप्तरीं कारकुनीवरील कामदार म्हणून आले आहेत. ह्या कारकुनींतहि शिलेदारांकडील कारकून, लष्करी कारकून म्हणून कांहीं व्यक्ति सांगतां येतात. केसो महादेव (१५–४) हे परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या लष्करांत असल्याचें चेनगिरीच्या मुक्कामचे त्यांचे पत्रावरून समजतें. (ऐ. प्र. क्रमांक १९) हें पत्र त्यांनीं कुरुंदवाडकर पटवर्धन त्र्यंबकराव यांस लिहून लष्करवार्ता कळविली आहे. परशुरामभाऊ पटवर्धन कैदेंत असतां त्यांजकरितां दंड भरून त्यांची मुक्तता करणारे मंडळींचे यादींत लक्ष्मण महादेव पेंडसे (१५–३) यांचा उल्लेख आला आहे. सदाशिव बहिरव (२६–४) व त्यांचे पुत्र नीळकंठ सदाशिव हे कुरुंदवाडकर पटवर्धन यांचे घोडेस्वारांच्या पथकांत अधिकारी होते असें समजतें. याशिवाय सदाशिवपंत पेंडसे, शिंद्याकडील आपाजीराम दाभोळकर यांच्याकडे शिंद्यांचे स्वारींत उत्तरेस असल्याचें आढळतें. तिकडील कागदपत्रांत यांचें नांव इ. स. १७८७ पर्यंत सांपडतें.

शिलेदारांकडील कारकून राव ऊर्फ पांडुरंग राम हे असून ह्यांस दुसऱ्या मानाजीकडे त्यांचे वडील राघोजी आंग्रे हे मृत्यु पावल्यानें दुखवटयाचीं वस्त्रें देऊन पाठविलें आहे (इ. १७९३ मे १३). राघोपंत पेंडसे (१३–५) हे चांगले प्रतिष्ठित असून नाना फडणविसांचे अत्यंत विश्वासांतले व अधिकारी कारकून होते. हे नानांचे वाड्यांत दप्तर संभाळून असत; व तसे ते असल्यामुळेंच दौलतराव शिंदे यांनीं त्यांना लष्करांत धरून नेऊन मारझोड करून त्यांजकडून कळलेल्या माहितीस अनुसरून १६ लक्ष रुपयांचें जवाहीर मिळविलें आहे (इ. १७९८ मार्च २१). पुढें हे राघोपंत लोहगड किल्ल्यावर जाऊन राहिले. या राघोपंतांप्रमाणें दुसरे आतमीय व राजकाज करणारे विश्वासू कारकून लक्ष्मणपंत पेंडसे (१३–५); ह्यानीं नाना व परशुरामभाऊ पटवर्धन यांचें ऐक्य करून, नानांकडील श्रीविष्णूच्या तुळशी व पटवर्धनांकडील गणपतीच्या दुर्वा एकमेकांस देऊन **उभयतांमधील सख्य** दृढ करण्याचें कार्य केलें आहे. यानंतर बाळाजीपंत पेंडसे (१४–७) हे पेशवाईचे ऱ्हासकाळांत कारस्थानी म्हणून उल्लिखित आहेत. खुशरुशेट मोदी व श्री. आपासाहेब पेशवे यांच्या सल्लामसलतींत व विचारांत हे बाळाजीपंत प्रमुख आहेत. त्या काळीं कारकून या शब्दाचा अर्थ जसा लेखनकर्म करणारा तसाच मुत्सद्दी व राजकारणी असाहि असे, असें ठिकठिकाणचे उल्लेखांवरून म्हणावें लागतें. अशांपैकींच हे राघोपंत, लक्ष्मणपंत व बाळाजीपंत होत. ह्याच काळीं राजाश्रित म्हणून सदाशिवपंत पेंडसे (७–५) यांचें नांव आढळतें. दुसरे बाजीरावांनीं फुलगांवीं नवी वसाहत करून शहर उठवावयाचें योजिलें होतें, त्यांत घर बांधण्यासाठीं

सदाशिवपंतास दोन हजार रुपये बाजीरावांकडून मिळाले होते. त्याप्रमाणें सदाशिवपंतांनीं फुल शहरीं "घर मात्र तयार केलें परंतु राहत नाहींत" असा त्यांविषयीं उल्लेख भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या ग्रंथांत आला आहे. ह्याच कारकुनींतील वरची श्रेणी म्हणजे दिवाणगिरी किंवा व्यवस्थाधिकारीपण; हें व्यवस्थापकत्व पेशव्यांच्या दत्तक वंशजाचे बाबतींत पेंडसे यांजकडे आलें होतें. अमृतराव रघुनाथ पेशवे यांचे चिरंजीव जे विनायकराव त्यांच्या नारायणराव व माधवराव या दोन्ही दत्तक मुलांची व्यवस्था रामचंद्रराव पेंडसे (१४–८) यांजकडे सर्वस्वी होती. हें काम रामचंद्रपंतांनीं उत्तम व दक्षतापूर्वक करून वाहवा मिळविली. रामचंद्रपंतांबद्दलचें तत्कालीन अधिकाऱ्यांचे हें मत ऐ. प्र. क्रमांक ४० मध्यें आढळेल.

पेंडसे कुलांतील व्यक्तींच्या अर्वाचीन इतिहासकालांतील कामगिऱ्यांपैकीं कारकुनी कसबाचें शेवटचें उदाहरण सांगून त्यांच्या इतर अधिकारांविषयीं व ऐतिहासिक कागदपत्रांतून येणाऱ्या विशेषांविषयीं लिहूं. प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें राजदप्तराविषयीं ह्या पेंडसे घराण्यांतील व्यक्तींची तज्ज्ञता निदर्शनास येण्याची वेळा पेशवाईअखेरीस प्राप्त झाली. राज्यक्रांति झाली. पेशवाई किंवा मराठी राज्य नष्ट झालें आणि परकीय आंग्लाईच्या मोहनी राजवटीस प्रारंभ झाला तेव्हां जुनीं इनामें चालविण्याचें कुंपणी सरकारचें धोरण असल्यामुळें त्या प्रकारचें मराठी राज्यांतील राजपत्रें इत्यादि कागद पाहण्याचें काम चालू झालें. अशांत खऱ्याबरोबर खोट्याहि सनदा वगैरे कागद क्वचित् समाविष्ट होऊं लागले. तेव्हां अमका कागद त्यावरील अमुक लक्षणामुळें खरा वा बनावट आहे हें पारखण्याची वेळ आली. अर्थात् हें काम एरागबाळाच्यानें कसें होणार ? त्याला त्यांतील पिढीजाद तज्ज्ञच हवा. मग चिटणीशी, फडणिशी, घडणी, दफाते इत्यादि सर्व प्रकारचे दफ्तरखान्यांतील कागदपत्रपद्धति पूर्णपणें विदित असलेल्या गणेश कृष्ण ऊर्फ रावजी पेंडसे (१३–६) यांची सर्वांस आठवण झाली. रावजी तर एव्हां कोंकणांत जाऊन राहिले होते. मग मुद्दाम त्यांस निमंत्रण पाठवून आणिलें. व नंतर हें काम चालीस लागलें. रावजींनीं कागद पाहतांच, एकादा निष्णात वैद्य रोगी पुढून जातांच जसें त्याच्या आजाराचें अचूक निदान करतो, त्याप्रमाणें त्या कागदाच्या खऱ्याखोट्याचा तत्काळ सलक्षण निर्णय सांगावा. अशांपैकीं रावजींची एक जबानी पेशवे दफ्तर भाग ४१ मध्यें प्रसिद्ध झाली आहे. ती इतिहाससंशोधकांसहि मार्गदर्शक होऊन राहिली आहे. रावजींचें या दृष्टीनें आवर्जून उल्लेख करण्यासारखें दुसरें काम म्हणजे राजवाडे खंड २ या ग्रंथांत प्रसिद्ध झालेली पेशवे शकावली होय. ही शकावली सुविस्तृत असून मराठी साम्राज्याच्या पहिल्या अर्ध शतकांतील बारीकसारीक गोष्टींचे व हालचालींचे काल सांगणारी आहे. ही शकावली सुमारें १५९ पानें आहे. इतिहासाचार्य राजवाडे ह्यांनीं या शकावलीविषयीं प्रस्तावांत "प्रस्तुत शकावली पेशव्यांच्या बारनिशींतून व दफात्यांतून जुळविलेली असून जुळविणारा मोठा प्रामाणिक लेखक असावा असें वाटतें. पेशव्यांच्या

दफ्तराची बरीच माहिती असणारे प्रसिद्ध पेणसे हे ह्या शकावलीचे कर्ते असावेत" असें म्हणून गौरवोद्‌गार काढले आहेत. आम्हांलाहि येथें हें लिहावेंसें वाटतें कीं, पेंडसे घराण्यांतील या कारकुनी कामाचा परिपाक शकावलीरूपानें सिद्ध झाला ही मोठीच कथनीय व अभिमानार्ह गोष्ट झाली. राजदफ्तराची परिपूर्ण माहिती असल्यानें कारकुनी गुणाची पूर्णता जबानींत जरी प्रत्ययास आली असली तरी त्याहून त्या माहितीची अधिक उपयुक्तता या शकावलीरूपानें प्रचीतीस आली, हें खरोखर अभिनंदनीय होय यांत शंका नाहीं. राज्यकारभारविषयक एकाद्या खात्याची अगदीं यथातथ्य व परिपूर्ण माहिती असणाऱ्यानें त्या खात्यासंबंधीं बारीक मोठी माहिती देऊन विवेचक असा ग्रंथ लिहिला तर तें जसें त्याचें सर्वोपयोगी व गुणदर्शक कृत्य होय तसेंच येथेंहि घडलें आहे, असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. येथें इतिहासकालीन विविध पत्रपद्धतीचे नियम व त्याचे अपवाद यांसह लक्षणें सांगितलीं आहेत असें नाहीं; पण त्या पत्रांतून त्या कालांतील राजकीय व्यक्तींच्या हालचाली कालानुक्रमानें सांगितल्या आहेत. व म्हणून ही शकावली कारकुनीपणाचें नमुनेदार फळ निर्विवाद आहे.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें पेंडसे मंडळींनीं कारकुनीचीं महत्त्वाचीं कामें पुण्यास म्हणजे राजधानींत केलीं, तशींच गोविंद रघुनाथ (६–२), आबाजी रघुनाथ (६–४), महादाजी रघुनाथ (६–४), हरी दत्ताजी (९–४), दिनकर हरी (९–५) वगैरे मंडळींनीं तळें, घोसाळें, अवचितगड वगैरे किल्ल्यांवर कामें केल्याचा उल्लेख सांपडतो.

कारकुनीच्या खालोखाल पेंडसे मंडळीची इतिहासकालीन कामगिरी शिपाईगिरींतील आहे. पानपतच्या लढाईंत यांचा एक पुरुष विश्वनाथ हरी (१३–४) घोडेस्वारांचा पथकदार होता. व तो त्या संग्रामांत वीरस्वर्ग पावला. पुणें नगरची कोतवाली बाबूराव राम (२०–५) ह्या पेंडसे पुरुषाकडे होती. ह्यापूर्वीं ती केशवराव केतकरांकडे असे. बाबूराव रामांकडे ही कोतवाली इ. १७६७ ते ७२ पर्यंत अधून मधून दिसते. पेशवे दफ्तर भाग २२ पृ. १०६ वर यांची प्रथम नेमणूक झाल्याचें सांगितलें आहे. पण त्याच्या पुढल्या वर्षीं १७६८ च्या एप्रिलमध्यें ही कोतवाली यांजकडून निघून जनार्दन हरीस सांगितल्याचें माधवराव रोजनिशींत (पृ. २३३) आलें आहे. तेथें पेंडसे हें उपनाम बाबूराव रामास जोडलेलें नसलें तरी पेशवे दफ्तरांतील उल्लेखावरून तें पेंडसेच आहे हें निश्चित. पुणें नगरची कोतवाली ही लहानसहान अधिकाराची जागा नव्हे, हें त्या कोतवालीकडील कामें व प्राप्ति पाहिली असतां सहज दिसून येतें. बाजारपेठेंतील मातबर कजिया असला तर तो कोतवालांनीं निर्णीत करावयाचा, वजनेंमापें, नगरांतील जागेची खरेदीविक्री, नगरची खानेसुमारी, व्यापाऱ्यांवरील व इतर हजाम वगैरेवरील कर व त्यांचा बंदोबस्त, चोरी शिंदळकी यांचा बंदोबस्त व शासनाधिकार, राजकीय वा इतर फंदफितुरी उघडकीस आणून त्यांस शिक्षा करणें इत्यादि कामें

कोतवालीकडे असत. वार्षिक तनखा चार हजारांपर्यंत ह्या कोतवालीस मिळावयाचा; शिवाय मानपान, पदरीं कारकून, शिपाई व शिबंदीहि असे. या कामांपैकीं राजकीय फितुरीचा बंदोबस्त झाल्याचें वृत्त सांगतांना बाबूराव राम यांचा निर्देश इ. स. १७७२ च्या ऑक्टोबरांतील ऐ. ले. लेखांक १२०७ मध्यें आला आहे. सांप्रत ज्यास डिटेक्टिव्ह म्हणतात त्यास त्या काळचें नांव 'नजरबाज' असे. हें चारचक्षूंचें काम, त्या लेखांकांत सांगतांना राघोबादादांनीं केलेला फितूर उघडकीस आणून त्यांत असलेल्या दादांचे म्हणजे सांबाचे गणांस अटकेंत ठेविल्याचें निवेदन केलें आहे. पेंडसे यांजकडे हें शिपाईगिरीचें काम असल्यामुळें त्यांचे पदरीं सैन्याचें पथकहि असणें स्वाभाविक आहे. आणि त्याचीच जागा पेंडसे यांची पागा म्हणून पुण्यास सदाशिव पेठेंत शनीचे पाराजवळ सांप्रत सांगितली जाते ती असावी.

त्यानंतर पेंडसे व्यक्तींचे उल्लेख वैदिक, शास्त्री, व सावकार म्हणून आलेले आढळतात. वैदिक व शास्त्री :—केशवभट (इ. स. १७४९), उत्तम वैदिक व स्नानसंध्याशील ब्राह्मण म्हणून इनाम मिळविणारे नारायणभट लक्ष्मणभट (इ. १८०४ ऐ. प्र. क्रमांक २६–२७), सदाशिवभट गोविंदभट (१५–३, ऐ. प्र. क्रमांक २८), गोपाळभट महादेवभट (१५–३ ऐ. प्र. क्रमांक २९), चिंतामणभट रामभट (१५–२), कर्जत तालुक्यांतील कोठिंबें येथील तीन पेंडसे वैदिक, तसेंच मावळ तालुक्यांतील उकसाण येथील इनाम मिळविणारे अग्निहोत्री, विष्णुभट वेदाध्ययनी (इ. स. १८२२ गुर्लहोसूर येथील), सीतारामशास्त्री श्रीवर्धनकर (३–९). सावकार (नाईक) :—भास्कर बल्लाळ, केळशीकर (१–५), बाबूराव विश्वनाथ ऊर्फ लक्ष्मण, अक्षी-नांगाव (१–४) व त्यांचे पुत्र राघो बाबूराव (१–५). सरदाराप्रमाणें सावकारहि आपले पदरीं शिलेदार व सैनिक बाळगीत असत व सरकारास जरुरीचे वेळीं मदत करीत व त्यांचे खर्चासाठीं पैसा घेत. वर उल्लेख केलेले सावकारांचे वंशज रामचंद्र दत्तात्रेय (१–१२) हे हल्लीं पुण्यास राहतात. त्यांचे घराजवळच " पेंडसे यांची पागा " म्हणून जो भाग ओळखिला जातो तो आहे. यावरून कदाचित् ही पागा ह्या सावकारांची असूं शकेल.

पेंडसे कुळांतील इतिहासकालीन उल्लेखांत आणखी एका गोष्टीचा स्वतंत्र निर्देश करण्याजोगा जो भाग आढळतो तो, त्यांचा पेशवे घराण्याशीं सोयरिकीचा घडलेला संबंध हा होय. राघोबादादा यांच्या तिसऱ्या पत्नी ह्या भिकाजी नाईक पेंडसे (७–४) यांची कन्या मथुराबाई होत. तसेंच बाळाजीपंत पेंडसे (१४–७) यांची मुलगी दुसऱ्या बाजीरावास दिली होती; त्यांचें नांव सरस्वतीबाई.

नाना फडणविसास नऊ स्त्रिया होत्या. त्यांतील सहावी स्त्री यशोदाबाई ही पेंडसे नांवाच्या कारकुनाची कन्या. हीस एक मुलगी झाली होती. ती लहानपणींच मृत्यु पावली (खरेकृत नाना फडणविसांचें चरित्र आवृत्ति ३ री, पृ.२३१)

पेंडसे कुलाचा अधिकारदृष्टचा प्रमुख नामनिर्देश त्यांजकडे असलेल्या (१) मौजे मुर्डी, (२) केळशी व (३) मौजे वणोशी येथील महाजनकी

विषयींचा येतो. यासंबंधींचे कांहीं अप्रसिद्ध कागद येथें नव्यानेंच प्रकाशित होत आहेत. येथें हीहि एक गोष्ट नमूद करावीशी वाटते कीं कोंकणांतील जुने पुराणे ऐतिहासिक कागद आजवर फार थोडेच संशोधन होऊन प्रसिद्ध झाले आहेत. अलीकडे असे हे कुलवृत्तान्त प्रसिद्ध होत आहेत त्यांत तेवढ्यापुरते प्रसंगानें कांहीं कागद प्रकाशित होत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. असे जरी थोडथोडे कागद प्रसिद्ध होत राहिले तरीहि त्यायोगें, महाराष्ट्र वाङ्मयांत उपयुक्त भर टाकण्याचे कामीं अशा कुलवृत्तान्त-ग्रंथांची आवश्यकता सिद्ध होत आहे हें लक्षांत येईल. तिकडील ग्रामव्यवस्थेचें रूप, सामाजिक रीति, तसेंच तिकडील भिन्न भिन्न समाजांच्या पूर्वपीठिका देशापेक्षां निराळ्या आहेत, हें तिकडील कागदपत्रांवरून निदर्शनास येतें. कोंकणांतून जसे पेशवाईंत लोक आपल्या अभ्युदयाकरितां देशावर आले तसे शिवकालांत व त्यापूर्वींहि देशावरील लोक कोंकणांत येऊन आपली जीवनयात्रा समाधानानें घालवूं लागले होते हें ऐतिहासिक सत्य, ह्या व आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या देशावरील घराण्यांतील कागदांवरून लक्षांत येईल. वर्तक, खोत, महाजन, देसाई, चौगुले या गांवकींतील व प्रांतीय वृत्ति देशावर नाहींत. देवदेवतांचीं स्थानें व त्यांचे पूजाविधि व उत्सवांतील मानपान यांवरूनहि जुनी माहिती आपणांस कळून येऊन ऐक्याचा परिपोष होईल. असो. पेंडसे यांच्या जुन्या वृत्तींत मुर्डी येथील महाजनकी ही प्रमुख आहे. ही त्यांची महाजनकी शेजारचे ग्रामस्थ भट यांनीं आत्मसात् केली. असें करण्यास काय कारण घडलें हें पाहण्यासारखें आहे. जुन्या राजवटींत दुष्काळ, रोगराई ह्या आपत्प्रसंगापेक्षां राजकीय क्रांतिप्रसंगानें प्रांतावर होणाऱ्या आक्रमणानेंच जनतेवर येत असलेली आपत्ति अधिक कष्टदायक झालेली आहे. अशाचपैकीं एकदां इ. स. १६८८–८९ त " भालेराई होऊन गांव उध्वस्त झाले व तेथील सर्व लोक परागंदा झाले. " कांहीं दिवसांनीं गांवांची पुनर्वस्ती होऊं लागली व तेव्हां ठिकाणझाड्याचे जुने दाखले मोडले आणि शेजारच्या आंजर्लें **ग्रामस्थांनीं** (भटांनीं) मुर्डी गांव वेगळा न **धरतां एकच व आपल्यांत** जमा धरला; आणि अशा प्रकारें मुर्डी गांवचे पेंडसे यांचे महाजनकीचे वतनाचा लोप झाला. थोडक्याच दिवसांत हें, महाजन पेंडसे ह्यांस कळून त्यांनीं आपले परंपरागत वर्तनासाठीं झगडा केला. त्या निमित्तानें झालेले कागद, उपलब्ध झाले ते पुढें दिले आहेत. त्यांत हें, महाजनकीचें वतन सरखेल तुळाजी आंगरे यांचे अमदानींत पेंडसे यांस मिळालें. पण पुनः पुनः हें भांडण चालूच राहिलेलें दिसतें. या भांडणांत घेतलेल्या साक्षी, केलेली चवकशी, इत्यादि प्रकार न्यायदान पद्धतींतील इतिहासास उपकारक आहेत. पेंडसे महाजन खरे ठरले व त्यांजकडून हरकी १५० रुपये आणि भट महाजन खोटे ठरले म्हणून त्यांजपासून गुन्हेगारी ४०० रुपये घेतली आहे. १५० रुपये पोत्यास जमा होतांना दोन रुपये साडेपांच आणे पोतदारी घेतली आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

ह्याच कागदांतून ' देवस्तान पडणें ' म्हणजे देव घालणें; शेतांतून दुरस्ता नदी येणें; व्यक्तीचें नांव लिहितांना बाळाजी कृष्ण बीन कृष्णाजी बल्लाळ, हरी रघुनाथ बीन राघो हरी असें जोडनांव लिहिणें; रेवेचा पऱ्हा आला तो खाडीस मिळाला; शिमग्याची सहाण; जोसकींतील गुमास्त्यास लग्नास पावला, व्रतबंधास चव्वल व चूडाकर्मास एक आणा देऊन ठेवणें; बाधेकरी; भाभे; गृहस्थपणें सांगोन समजाविलें; दैवयोगें–देवबलेंकरून; इत्यादि शब्द, वाक्प्रचार, लेखनप्रकार वगैरे मराठी भाषेच्या अभ्यासकांस संग्राह्य व विवेच्य वाटतील.

सवाई माधवराव पेशवे यांचे काळीं आबाजी बल्लाळ पेंडसे (३०-२), भास्कर पांडुरंग (३०-३), व महादाजी बल्लाळ (१२-४) यांनीं जंगलगर्क, दर्यागर्क, खाजणी व बेमरामती जमीन घेऊन ती सुपीक करून, तशीच नवसाध्य जमीन लागवडीस आणून संपादन केली आहे.

याप्रमाणें पेंडसे घराण्याचे आजचे ऐतिहासिक कागदपत्रांवरून दर्शित होणारी माहिती आहे.

* * * *

२. कागदपत्रें व उल्लेख

या प्रकरणांतील पत्रें, सनदा, उल्लेख वगैरे कालानुक्रमानें लाविले आहेत. हे कागद ज्यांनीं दिले त्यांचा नामनिर्देश अगर उल्लेख, जेथें आढळले त्याचा स्थळनिर्देश प्रत्येक क्रमांकांत वर डाव्या बाजस केला असून उजवीकडे कालनिर्णयार्थ शक, सन दिले आहेत. ज्या व्यक्तीचा उल्लेख त्यांत प्रामुख्यानें आहे तिचें नांव जाड ठशांत ओळीच्या आरंभीं, घराणें व पिढीच्या क्रमांकासहित दिलें आहे.

प्रसिद्ध झालेल्या पेशव्यांच्या रोजनिशा, ऐतिहासिक लेखसंग्रह वगैरे कागदपत्रांत आलेले सर्व उल्लेख येथें दिले नाहींत. शक्य तेथें व्यक्तीचे माहितींत त्याचा निर्देश केला आहे.

मोडींत लिहिलेल्या ऐतिहासिक कागदांत विरामचिन्हें नसतात, परंतु अर्थबोधार्थ कांहीं ठिकाणीं तीं दिलीं आहेत.

गोविंद गणेश पेंडसे
आंजर्ले
बाळाजी कृष्ण (१२–३)

१

श. १६७५ माघ व. ९
इ. १७५४ फेब्रु. १५

श्री

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री तुळाजी आगरे सरखेल ता। बाळाजी कृष्ण बिन कृष्णाजी बलाल पेंडसे माहाजन मौजे मुर्डी

तर्फ केळसी सुभाप्रांत दाभोळ सुाा आर्बा खमसेन मया व अलफ तुवा हुजूर जंजिरे विजयदुर्गचे मुकामी येऊन विदित केले की मौजे मजकूरचे महाजनकीचें वतन पुरातन आपले वडील परंपरागत चालवीत असतां प्रांतमजकुरी भालेराई होऊन गाव उध्वस्त जाहले तेसमइ आपले वडील परागंदा होऊन देशांतरास गेले तेव्हा मागे गाव काही दिवस ठिकाणझाडयाचे दाखले मोडोन वसाहत जाहले तेसमइ गात्र अलाहिदा होता तो कसबा आजर्ले या खाले ग्रामस्ताही लाउन दोनी वतनाचे येक वतन म्हणून भोगवटा आज तागायत पाडून वतनासी आपणांस लागो देत नाही आणी नाहीतो कज्या करितात अशास आपण नातवान आहे आपली बरहक मनसुफी करून आपले वतन खरे अैसे जाहले तरी कृपाळु होऊन आपली स्थापना करावी म्हणून विनंती केली त्यावरून पेशजी जंजिरे सुवर्णदुर्गाहून प्रांतातील सीम झाडे वगैरा गावगनाचे साक्षकरीने तकरीरा कागद कतबे यानिसी आले ते व हाली जंजिरे मजकुरास आज्ञा करून दाखले व ग्रामस्त आणविले ते येऊन सविस्तर हकिकत मनास आणिता कसबा मुरुड ताा पंचनदी येथील दुर्गाउछाहाचे दिवसी गावगनाचे ग्रामस्तास आमंत्रण लिखिते पूर्वापार प्रविष्ट होतात तेथे मुरुडी व कसबा म्हणून निराळी पत्रे जातात व मौजे मजकूरची व कसबा मजकूरची हदमहदूद सीमा पुरातन आहे ते सीमे आत सावीज पडेल तरी दोनी गावीचे देवधर्म पानमान भिन्न घेतात माहाजन वर्तक व उपाध्ये जोसी भिन आहेत व कांहीं परागंदा जाहले परंतु दाखले आहेत व सदरहू तकरीरा साक्ष पत्रावरून कसबा व मुरुडी भीन अैसे होऊन पुरातन माहाजन वतनदार तू खरा अैसा पंचाईतमते निवाडा जाहला यावरून तुझे माहाजनकीचे वतन पुरातनप्रमाणे तुझे दुमाला करार केले असे आपले पुत्रपौत्रादि वंषपरंपरेने वतनाची खटपट चाकरी असेल ते चालऊन आपला पानमान मुशाहिरे याचा उपभोग करीत जाणे. हरी रघुनाथ बिन राघो हरी माहाजन कसबे मजकूर यास मुरुडी गाव माचे माहाजनकीचे वतनास अर्थाअर्थी संमध नाही. आपली जि (रा) येत व बागायेत व घरठाण असेल ते कमावीस कर्णे हरदूजणचे मनसुफीचा निवाडा करून भोगवटीयास आज्ञापत्रे सादर केली. सबब तुझे माथा हरकी* रुपये १५० दीडशे करार केले असत. पोता वसूल देऊन सुखरूप राहणें. हरी रघुनाथ मनसुफीस लटका पडला सबब त्यास गुनेगारी* च्यारशे करार केले असत जाणीजे रवाना छ २२ रबिलाखर मोर्तब असे.

---

* वतंदाराचे कजियांत मनसुबीमुळें जो खोटा होईल त्याजपासीं गुन्हेगारी व खरा होईल त्याजपासी हरकी वतनाचे उत्पन्न व वाद्याची ताकत पाहून घेत होते.
(पे. द. भाग ४५ क्रमांक ४८)

गोविंद गणेश पेंडसे } आंजर्ले

२

{ श. १६७५ फा. शु. ८
इ. १७५४ मार्च २

बाळाजी कृष्ण (१२–३)

श्री

सीका

आज्ञापत्र राजश्री * सरखेल ता। बाळाजी कृष्ण पेंडसे महाजन मौजे मुरडी ता। केळसी सुहुर सन आर्बा खमसेन मया व आलफ रसद जमा पोता जंजीरे सुवर्णदुर्ग येणे मौजे मजकूर व कसबे आंजरले हरदुगांव कसबे आंजरले म्हणोन मनसुबी लागली त्यास हुजुर मनसुबीचा न्याय होऊन मौजे मुरडी व कसबे आंजरले दोनी गाव भीन भीन जाहले व मुरडीची माहाजनकी तुमची खरी जाहली सबब हरखी जमा गु॥ खुद

१५० येन बारवीन हरखी
२।-॥ पोतदारी
१५२।-॥

येकूण येकसे सवाबावन दीड आणा जमा असत छ ७ जमादिलावर पा। हुजुर मोर्तब.

गोविंद गणेश पेंडसे } आंजर्ले

३

{ श. १६७७
इ. १७५५

बाळाजी कृष्ण (१२–३)

करीना बाळाजी कृष्ण पेंडसे वस्ती मौजे मुर्डी ता। केळसी प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग सु॥ सीत खमसेन मया व अलफ सेवेसी लेहून दिल्हा करीना ऐसाजे. मौजे मजकूर हा गांव आपला दायाज दहा दिवसाचा कृष्णाजी बापूजी पेंडसे याची तेथील महाजनकी वतनी व वर्तकपण मराठे यांचे. व उपाध्ये व धर्माधिकारी विद्वांस व जोशी भानजोशी हा. स्थाने श्रीविमलेश्वर स्वयंभू शिवालय व श्रीगणपती व श्रीलक्षुमीनारायण देवी सालबा देवी ग्रामदेव क्षेत्रपाल श्रीकालेश्वरी ये प्रमाणे देवस्थानें. व गांवाची चतुःसीमा गांवाचे ईशान्येस गांव सुकोंडी व पूर्वभागीं मौजे कोंगळे व दक्षिणेस खाडी व खाजण. व पश्चिमभागीं दुरस्ता शेतांमधून नदी आली आहे. तें सुकोंडीपासून रेवेचा पऱ्हा आला तो खाडीस मिळाला. येकूण पश्चिम उत्तर आंजर्ले येणें प्रमाणें गांवची रचना आहे. सदरहू गांवचे माहाजनकीचे वतनाचा उपभोग कृष्णाजी बापूजी करीत असतां त्यांचे बायकोस देवाज्ञा झाली. पोटी संतान कन्या दोन होत्या त्या निजसुरे आंजर्लेकर उपाध्ये यांचे घरी पालीग्रहणास ठेऊन आपण महायात्रेस गेले. यात्रेहून येऊन गांवीं रहावें

* मानाजी आंग्रे यांस 'वजारतमाव' व तुळाजीस 'सरखेल' हा किताब देऊन शाहूछत्रपतीनें त्या उभयतांत समजूत केली होती. अर्थात् हें पत्र तुळाजीचें आहे.

तों मागें राजक्रांती झाली. त्यामुळें गांव उजाड जाहला. याजकरितां कसबें दिवें येथें बिऱ्हाड करून राहिले. गांवकरी लोकही राजक्रांतीमुळें तेथेंच जाऊन राहिले होते. ऐशीयासी कृष्णाजी बापूजी याचा काळ समीप आला. आमचा बाप कुटुंबासहवर्तमान तेथें होता. कृष्णाजी बापूजी यानें आमच्या बापास सांगितलें कीं आपला काळ समीप आला. प्रसंगीं तुम्ही येथें आहां. आपणाजवळ द्रव्यसंग्रह संपदा नाहीं मुर्डीगांव येथील महाजनकीचें वतन व आगर दोन. शेतें येणेंप्रमाणें आपले आहेत. तीं तुमचे स्वाधीन करितों आणि माझें उत्तरकार्य तुम्ही करणें म्हणून सांगितलें. याचे साक्षी माझे येणे प्रमाणें राजश्री भास्कर नाईक पेंडसे केळशीकर व नारूभट आंजर्लेकर व चिमणभट विद्वांस उपाध्ये मुर्डीकर व रामाजी खरवळे केळशीकर व महादेवभट निजसुरे आंजर्लेकर उपाध्ये यांचे साक्षेनसी सांगितलें त्याप्रमाणें कृष्णाजी बापूजी यांसी देवाज्ञा झाली. उत्तरकार्य कृष्णाजी बाळाजी याणें केलें. राज्यक्रांत सरल्यानंतर आमचे पिते कुटुंबासहवर्तमान गांवीं आले. कसबे आंजर्लें येथील आगर महामूर केला. आणि मुर्डी येथील आगर महाभूर करावयासी जंजिऱ्याहून सरखेलीची सनद नेली. ते विसो हरी माहाजन यांनीं घेतली आणि आगरांत नारायण जोशी ठेविला. दुसरा आगर आपण महामूर केला. पुढें माहाजनकीचा कारभार करावा तो विसो हरी माहाजन व कृष्णाजी पेंडसे याची कलागत जाहली. कलागतीस विसो हरी कडून देवस्तान पडोन आपला चुलता रामाजी पेंडसा मृत्यु पावला. त्याजवर रामाजी वर्तक व विसो हरी भट याची भुतांविशी मनसुबी होत होती. तेव्हां आम्हांकडेस भूत पडोन नास झाला, हे गोष्टी निघाली होती. तेव्हां खरें खोटें करावें तरी कलह वाढतो याजकरितां कलागतीस पाठ देऊन उगेंच राहिलों. व राघो हरी भट यांनीं गृहस्थपणें सांगून समजाविलें त्याजवरोन उगेंच राहिलों. मुर्डीस श्रीदुर्गाउत्साहाची पत्रें निराळी येतात. कसबे मुरुड व केळशी वेळास येथील यात्रेची पत्रें येतात. मुर्डीचे आंत सावज पडलें तरी मुर्डीस नेतात. आंजर्लें यांत पडलें तर आंजर्लें यांसी न्यावें. याप्रमाणें चालत असे. चैत्री व शिमगे याची सहाण व होळी मुर्डीची निराळी. आंजर्लें याची निराळी. आंजर्लें येथील जोशीपणाचे वृत्तीस वेळासकर जोशी यासी आणून ठेविलें. त्यांस लग्नास पावला, व्रतबंधास चव्वल चूडाकर्मास आणा येक येणेंप्रमाणें देऊन ठेविलें. ते मुर्डी खेरीज आहे. मौजे मुर्डी हा गांव ओसाड असतां...ने खोत्या करून कमाविशी केली. रा भान जोशी वृत्तीवान मौजे मजकूर व रा अवजी बल्लाळ कारखानीस जंजिरे सुवर्णदुर्ग व रा कृष्णाजीपंत घाणेकर येणेंप्रमाणें बाधेकरी यांणीं खोत्या केल्या होत्या येणेंप्रमाणें गांवचे दाखले आहेत. मनास आणून आज्ञा कर्तव्य ते करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

गोविंद गणेश पेंडसे
आंजर्ले
गोविंद कृष्ण (१२–३)

४

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री बालंभट खरवले यांसी प्रीतीपूर्वक गोविंद कृष्ण पेंडसे माहाजन मौजे मुर्डी आशिर्वाद उपरी. मौजे मजकूरची माहाजनकी तुमचे माये आज्यानें आम्हांस दिली. तुम्ही कृष्णाजी बापूजी पेंडसे माहाजन यांचे नातू यास्तव येक आगर उत्तम मध्यवस्तीचा ऐसा पाहून व येक सेत बिघा पावेतो ऐसे सुरलित माहाजनकीचे आमचे चालों लागल्यावर सदरहू येक आगर व येक सेत तुम्हांस देऊं. बहूत काय लिहिणें हे आसिर्वाद.

साक्ष

केशवभट विद्वांस उपाध्ये मुर्डीकर दत्ताजी बलाल माहाजन केलसी द. खु.

गोविंद गणेश पेंडसे
आंजर्ले
गोविंद कृष्ण (१२–३)

५

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे शेवेसी,

विनंती सेवक रामाजी[1] माहादेव मो जंजिरे सुवर्णदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ २१ माहे...... पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें व प्रांत मजकूरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचें आज्ञापत्र छ २९ रमजानचें छ १९ जिल्हेजी सादर जालें. तेथें आज्ञा कीं महादेवभट बिन रघुनाथभट महाजन कसबें आंजरलें ता० केलसी यांचा व गोविंद कृष्ण पेंडशा याचा मुरडीगांव निराला किंवा आंजरल्याचा वाडा येविसीचा कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली. त्यास येविसींच्या सड्या साक्षी सरकारच्या अमलात तुम्ही व राजश्री नारो त्रिंबक याणी घेतल्या ते सर्व कागदपत्र हुजूर मनास आणितां गांव येक किंवा दोन हा सिद्धांत त्या कागदावरून होत नाहीं. पुन्हा सड्या घ्याव्या लागतात. याकरितां मुर्डी अमानतल गुदस्ता केली आहे. त्यास हल्लीं हरदुजण साक्षदाराचे साक्षीस राजी होऊन यादीवर सह्या करून दिल्या त्यावरून साक्षीदारांची नावनिशी देऊन हुजूरून रा सखो केशव कारकून पाठविले आहेत. तरी याजबरोबर सुभाचा चौकस कारकून देऊन श्रीवेलेश्वर देव कसबें केलसी याच्या देवालयीं[२] जमा करून त्याच्या प्रथकाकारें हुजूरच्या कलमझाड्याप्रमाणें चौकशीनें साक्षी लेहून घेवून हुजूर रवाना करणें म्हणोन आज्ञा. त्याजवरून आज्ञेप्रमाणें साक्षीदारांच्या सड्या[१] घ्यावयास सुभाहून रा पांडुरंग

---

१ रामाजी महादेव बिवलकर हे शके १६७७ (स. १७५५) मध्यें अंजनवेलचे मामलेदार होते. (पे. द. भाग ४० क्रमांक ८७)

२ वतनाचे कजिया बद्दल साक्षीदार यांची लिहीली घेणें जाल्यास, वतनदार असतील त्याजला देवालई अथवा कृष्णा, भीमा, गंगा या नद्यांचे स्नान घालून त्यांच्या सड्या लिहून घ्याव्या अशी चाल वतनदारीचे साक्षीची आहे. (पे. द. भाग ४५ क्रमांक ४८)

अनंत कारकून मानिल्हेजवळ पाठवून त्यासी यादी पाो साक्षीदार जमा करून श्रीच्या देवालयीं प्रथकाकारें सड्या लेहून घेतल्या, त्याचा लखोटा सखो केशव याहीं करून सुभांहून लखोटेयावर मोर्तब करून लखोटा सड्याचा शेवेसीं रवाना केला आहे. त्यावरून सविस्तर विदित होईल. सड्याचा लखोटा भवानजी जासूद याजबरोबर पाठविला आहे. सेवेसी श्रुत हो हे विज्ञापना.

गोविंद गणेश पेंडसे } ६
आंजर्ले

कृष्णाजी बाळाजी (१२–२)

राजमान्य राजश्री समस्त ग्रामस्त याप्रतीं

अन्नपूर्णाबाई खरवली हल्ली वस्ती बिरवाडी आशीर्वाद उपरी. लिहावयासी कारण कीं मौजे मुरडी येथील माहाजनकी माझा बाप कृष्णाजी बापुजी पेंडसे याची, तो माहाजनकीचा उपभोग भालेराई पावेतों करीत असतां त्याचें पोटीं आम्ही दोघी मुली जाहलों. त्यावर मातोश्री देवाज्ञा झाली. त्यामुळें आम्ही लहान मुली म्हणून तीर्थरुपाहीं मजला निजसुरे यांचे घरीं पालग्रहाणानिमित्त ठेविले. आपण महायात्रेस गेले. तेथून आल्यावर माझा शरीरसंबंध निदसुरे यांचे मतें खरवळे यांजकडे केला कारण कीं निदसुरीं आपली मावस सासू म्हणून तिनें बारा वर्षे पालीग्रहण करावें ऐसा पत्कर घेऊन आपले घरीं वाढविली. फिरोन श्रीरामेश्वर यात्रेस करोन येऊन दंग्यामुळें दिवे यांत घर करून राहिले. तेथें मजला दहा वर्षाची नेली. कांहीं दिवस तेथें राहिल्यावर उदराची वेथा तीर्थरुपास जाहली. त्यानें अत्यावस्त राहिले तेव्हां कृष्णाजी पेंडसे राजक्रांतिमुळें कुटुंबासहवर्तमान दिवे यास आले होते त्यास बोलावून आणून सांगितलें जे तुम्हीं माझे सन्निध आहां माझा काळ समीप आला. तरी तुम्ही माझी उत्तम गत करणें आणि माझे वतन मौजे मुर्डी येथें महाजनकीचे व आगर दोन व शेतें आहेत. त्याचा उपभोग तुम्ही करणें म्हणून राजश्री भास्कर नाईक पेंडसे केळशीकर व रा नारुभट आंजर्लेकर व चिमणभट विद्वांस उपाध्ये मुर्डीकर व रामाजी खरवले घरधनी आपले व महादेवभट निदसुरे आंजर्लेकर उपाध्ये यांचे साक्षीनसी सांगितले त्याप्रमाणें कृष्णाजी बाळाजी पेंडसे यानी तिर्थरूप वारल्यानंतर सांगितल्याप्रमाणें क्रियाकर्मांतर केलें ऐसे असोन पूर्वलोप करून पेंडसा कांहींच मुर्डीचा नव्हे म्हणतां परंतु मुर्डी आद्यग्राम तेथील उपाध्ये विद्वांस माझे मातुलवंशी हे वर्तमान तुम्हांस सर्वांस ठाऊकें असोन वतनाचा लोप करितां हें उचित नव्हे कळावें.

साक्ष लिहल्या समयीं. **हरीराम ठोसर वर्तक**, केळशी

गोविंद गणेश पेंडसे
आंजर्ले
गोविंद कृष्ण (१२–३)

७

श्रीमंत राजेश्री विसाजीपंत सुभेदार स्वामीचे सेवेशीं पोष्य नारो कृष्ण व धोंडो विश्वनाथ मो सुवर्णदुर्ग साष्टांग नमस्कार विनंति ता छ २९ सावान पावेतों येथील वर्तन येथास्थित असे विशेष. राजश्री बापुजी रघुनाथ भट महाजन आंजर्ले याचा व गोविंद कृष्ण पेंडसे याचा न्याय राजश्री नारो त्रिंबक देशमुख यांनीं करून भट मशारनिल्हेकडे माहाजनकी चालती केली. पेंडसे हुजूर जाऊन सांगितली त्यावरून आपणाकडे न्यायाची आज्ञा झाली. त्यास पेंडसे यांनीं श्यामलाकडील दाखले याचे पत्र पन्नास वर्षांचे दाखविलें, भट महाजन यांनीं ९० वर्षांचा तेथीलच दाखला सांगितला. यावरून उभयतांनीं राजपुरीस जाऊन पुन्हां तेथून निवडून येईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी याप्रमाणें कतबे घेतले उभयतांस श्यामलांकडे जंजिरे यास पत्र देऊन रवाना केलें त्यास पेंडसे यास याद गांवगन्नाची व पत्र दिलें तें फिरोन माघारीं आणवावें ऐसा निश्चय होऊन त्यास पुसिलें तेव्हां आम्हाजवळ आहे अैसे सांगितलें यावर जंजिरे याहून येथें लिहून आलें कीं पेंडसे यांनीं पत्र आपणाजवळ दिलें आहे तें पाठवावें म्हणून लिहून आलें. त्याचा जाबसाल तीर्थरूप राजश्री पंतसुभेदार यांजकडे घालवून लिहिलें मग तेथून काय जाबसाल गेला तो न कळे. उभयतांस दाखले यांसाठी जंजिरे यांस पाठविलें असतां पेंडसे याची यादपत्र माघारें आणविलें, याची दिलात काय तें नकळे. याकडील पत्र जाते म्हणजे पुढील मजकूर कळता तें न झालें यास्तव दोघांसही स्वामीकडे पाठविलें असेत. तरी पुढील आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करितील.

पे. द. २४ ले. १४९
रबिलाखर २३
गणेशपंत (१३–४)

८

श. १६७७ पौष व. १०
इ. १७५६ जाने २६

जनार्दन फडणीस—ती. रा. बाबूराव फडणीस

जनार्दन देव व मानाजी आंग्रे याजकडील मजकुराचीं पत्रें पाठविली ती वाटेस राउतानी गमावली. हली हे पत्र पाठवीत आहे. कानोजी आंगरे व थोरले नाना यांचा तहनामा जाला आहे. त्या आलीकडे राव सन खमस सलासीनामध्यें कुलाबियास गेले होते तेसमई मानाजी आंगरे याचा तह झाला आहे. त्याजकडील हिसेबहि केला आहे तो गणेशपंत पेंडसे यास ठाऊक असेल अथवा दप्तरी असेल त्याचा शोध करऊन पाठवून द्यावा. त्याउपर आर्बा[१] आर्बैनमध्यें आपा कुलाबियास गेले होते ते समई मानाजी आंग्रे याचा तह जाला असिला त्याबााहि गणेशपंत यास पुसोन असिला तर पाठवून द्यावा.

---

१ हा शब्द अधिक पडला आहे.

गोविंद गणेश पेंडसे
आंजर्ले

१

शं. १६७९
इ. १७५७

बाळाजी कृष्ण (१२–३) श्री

यादी दस्त बालाजी कृष्ण पेंडसे याणी मुरडी गांव निराळा म्हणोन तकरीर लिहून दिली त्याचा शोध सुा समान खमसेन मया अलफ बी ता

तकरीर

मौजे मजकूर हा गांव आपला दायाद दहा दिवसांचा कृष्णाजी बापू पेंडसा माहाजन, वर्तक मराठे, धर्माधिकारी व उपाध्ये विद्वांस, जोशी भानजोशी देवस्थानें श्रीविमलेश्वर स्वयंभू व गणपती व श्रीलक्ष्मीनारायण देवी सालबा देवी ग्रामदेव क्षेत्रपाल व चाचवलीकर श्रीकालेश्वरी येणेंप्रो देवस्थानें व गांवची चतुःसीमा गांव ईशान्येस सुकोंडी पूर्वभागीं कोंगळें दक्षणेस खाडी व खाजण पश्चमभागीं दुरस्ता सेतांमधून नदी आली आहे ते सुकोंडी पासून रेवेचा पऱ्हचा आला तो खाडीस मिळाला येणेंप्रो चतुःसीमा गांवची रचना आहे. अैसीयासी कृष्णाजी बापू महाजनकीचे वतनाचा उपभोग करीत असतां बायकोस देवाज्ञा जाहली. पोटीं संतान दोन कन्या होत्या. ते निजसुरे उपाध्ये आंजर्लेकर यांचे घरीं पाळीग्रहणास ठेवून आपण महायात्रेस गेला. यात्रेहून आला तो मागें राजक्रांति जाहली त्यामुळें गांव उजाड जाहला याकरितां कसबे दिवे येथें बिऱ्हाड करून राहिला. गांवकरी लोकहि राजक्रांतीमुळें तेथेंच राहिले होते ते व आमचे बाप कुटुंबसहवर्तमान तेथें होते. ते समयीं कृष्णाजी बापू याचा काल समीप आला. तेव्हां कृष्णाजी बापू याणें आमच्या बापास सांगितलें जे आपणाजवळ द्रव्यसंग्रह संपदा नाहीं मुरडी गांव येथील माहाजनकीचे वतन व आगर दोन व सेतें येणेंप्रो आपलें आहे हें तुमचे स्वाधीन करतों आणि माझें उत्तरकार्य तुम्ही करणें म्हणोन सांगितलें. त्यावरी कृष्णाजी बापू यांस देवाज्ञा जाहली. उत्तरकार्य आपले बापानें केलें. पुढें राजक्रांति सरल्यानंतर आपले पिते कुटुंबसहवर्तमान गांवीं आले को आंजर्लें येथील आगर मामूर केला आणि मुरडी येथील आगर मामूर करावयाची जंजिराहून सरखेलीची सनद नेली ते विसो हरी माहाजन याणी घेतली. आणि आगरांत नारायण जोसी ठेविला. दुसरा आगर आपण मामूर केला पुढें महाजनकीचा कारभार करावा तो विसो हरी माहाजन व आमचे पिते यांची कलागत जाहाली. कलागतीस विसो हरीकडून देवस्तानें पडून आपला चुलता रामाजी पेंडसा मृत्यु पावला. त्यावरी रामाजी वर्तक व विसो हरी माहाजन यांची भुताविसीं मनसुबी होत होती. तेव्हां आम्हांकडे भुतें पडोन नाश जाहला हे गोष्ट निघाली होती तेव्हां खरें खोटें करावें तरी कलह वाढतो याकरितां कलागतीस पाठ देऊन उगेच राहिलों व राघो हरी माहाजन याणी गृहस्थपणें सांगोन समजाविलें. मुर्डीस श्रीदुर्गाउत्छाहाची पत्रें निराळी वेळास केळसी व मुरूड येथील येत असतात. मुर्डीचे सीवे आंत सावज पडिलें तरी मुर्डीस न्यावें आंजर्लें याचे सिवे आंत पडिले तरी आंजर्लें यास

ऱ्यावे याप्रा चालत असे. चैत्री व सिमगे याची साहाण व होळी मुर्डीची निराळी व आंजर्लें याची निराळी. आंजर्लें याचे जोसीपणाचे वृत्तीस वेलासकर जोसी यासी आणून ठेविलें त्यास लग्नास पावला व व्रतबंधास चवल येणेंप्रा देऊन ठेविले ते मुर्डी खेरीज आहे. मौजे मुर्डी गांव ओसाड असतां बाधे यानें खोत्या कमाविस केली. भानजोसी वृत्तिवान मौजे मजकूर व कृष्णाजीपंत घाणेकर व आवजी वलाल कारखानीस येणेंप्रा बाधेकरी यांनीं कमाविस खोत्या केल्या होत्या. येणेंप्रा दाखले आहेत. कृष्णाजी बापू पेंडसा भालेराई मध्यें परागंदा जाहला. तोपर्यंत दोनी गांव वेगळे त्या अलीकडे दाहा पंधरा वर्षें वेगळे चालत होते त्या अलीकडे दोन गांव येक कधीं जाले हें आपणांस ठाऊक नाहीं येणेंप्रा तकरीर.

शोध

कृष्णाजी बापू महाजन मुरडी गांव निराळा याचें वर्तमान तरी पूर्वी ठिकाण सालबा देवीचें तेथें कृष्णाजी बापू पेंडसे याचे वडील वसणीहून येऊन राहिले म्हणोन हरी रघुनाथ भट माहाजन सांगतात व गांवकरी याच्याही तकरीरेमध्यें पेंडसा वतनदार मुरडीस होता परंतु माहाजन ऐसें ठाऊक नाहीं व गांव निराळा हें ठाऊक नाहीं एक व मराठा वर्तक त्यास मुरडीमध्यें बाधेकरी मराठा सराफाचे ठिकाणावरी रयेतावा करून राहिला होता म्हणोन भट माहाजन सांगतात व धर्माधिकारी व उपाध्ये विद्वांस त्यास धर्माधिकारी व आपस्तंभ उपाध्या प्राचीन भाभे आश्वलायन उपाध्ये निजसुरे याचा व विद्वांसाचा कजिया आहे. निजसुरे उपाध्येपण आपले म्हणतात. व जोशी भानजोशी तरी जोशीपणाची वृत्ति शांडिल्य-गोत्री...येक निमेनिमे विभाग करून घेतले आहेत. तेव्हां जोशी निराळा ऐसें नाहीं ग्रामदेव क्षेत्रपाल व चाचवलीकर कालेश्वरी तरी ग्रामदेव झाडाखालीं त्यास चिरा दगड पाया नाहीं ऐसें कोठेंही असत नाहीं. चतुःसीमा लिहून दिल्या आहेत त्यास सुकोंडी कोंगळेकरांनीं मुरडी निराळी म्हणोन लिहून दिलें आहे. परंतु मुर्डी आंजर्लें याचे सीमेची ठाऊक नाहीं तेव्हां एकत्र. आंजर्लें याच्या मौजे पाडलें, आडें, लाणवडी, सुकोंडी, कोंगळे पावेतों टाकल्या आहेत. त्या एकत्र आंजर्लें याच्या ऐसें दिसोन येतें...मुर्डीचे सीमेंतील मुरडीस जाते म्हणोन पेंडसे म्हण-तात त्यास मनास आणतां कानोजी सांबऱ्या याचे बापापासून आलीकडे देवबलें-करून कांहीं नेत होता. सांबऱ्या पुरातन वतनदार नव्हे म्हणोन भट माहाजन वगैरेनीं लेहून दिल्हें आहे यावरून याचे प्रमाण दिसोन येत नाहीं. श्रीदुर्गांची आमंत्रणपत्रें मुर्डीस निराळीं येतात म्हणोन पेंडसे म्हणतात त्यास मनास आणिता प्राचीन आपण मुर्डीस येत होते सांप्रत पन्नास वर्षें आलीकडे दुसरें पत्र आंजर्ल्यास येऊं लागले म्हणोन मुरडीकरांचे तोंडून खरें जाहालें तेव्हां तेही प्रमाण नाहीं. चैत्री मुर्डीची निराळी पेंडसे म्हणतात त्यास मनास आणतां सालबादेवी मुर्डीमध्यें आहे. तेथें चैत्र शुद्ध अष्टमीस सर्व मिलोन जेवणास मात्र जावें चैत्रीचा उस्छाह येकतंत्र श्रीजोरी पासून दुर्गेचा होत असतो तेव्हां तेंही प्रमाण नाहीं.

होली सिमगेयाची व साहाण मुरडीची निराळी पेंडसे म्हणतात ऐसीयासी भट महाजन वगैरे म्हणतात पुरातन चाचवलीकर कालकाईची होळी व साहाण होत आहे. वरकड सिमगेयाचा खेल श्रीजोरी देखील गांवमध्यें जातो तो अर्धा जोरीचे देवलाहून निघोन मुर्डीस सालबा देवीस जाऊन खालीं उभाघरास धुळवड देखील जाते तेव्हां दाखला प्रमाण नाहीं. व वेळासकर जोसी गांवमध्यें आणिलें त्यास मुरडीमध्यें मान नाहीं म्हणोन पेंडसे म्हणतात तरी हरजोसी वेळासकर याणी तकरीर लेहून दिल्ही कीं पुरातन आम्हांस मानस्ती मुरडींत देखील चालत होती त्यास नारंभट विद्वांस यांनीं अडथळा केला त्यापासून कटकट होत्ये तेव्हां आलीकडेच अडथळा जाला ऐसें दिसोन येते व पेंडसे यास कृष्णाजी बापू दिवे यांस मृत्यु पावला ते समई आपली माहाजनकी व आगर ठिकाणें दोन व सेतें आपणांस देऊन उत्तरकार्य करावें म्हणोन पेंडसे म्हणतात ऐसीयासी ते समई ग्रामस्त वतनदार साहासात तेथें होते ते त्यास बलावून साक्षीनें लेहून घ्यावें होतें तें न केलें तेव्हां दाखला प्रमाण दिसोन येत नाहीं व बाधेकरी यानीं मुर्डीच्या खोत्या केल्या होत्या म्हणोन पेंडसे यांनीं लेहून दिल्हें त्यास मनास आणितां भानजोसी व कृष्णाजीपंत घाणेकर याणी बागाइती आगराचा ईजारा खोती केल्या होत्या परंतु येकत्र आंजर्लें चालत होतें व आवजी बलाल याणीं खोती केली होती म्हणोन पेंडसे याणी लिहिलें आहे, त्यास मनास आणतां कोंड चाचवली येथें पांच सात कुणबी ठेवून खोती केली होती ते समईं सांबऱ्या कुणबी आडें याहून आणून ठेविला होता. म्हणोन भट माहाजन सांगतात. यावरून दाखला प्रमाण दिसोन येत नाहीं. व पेंडसे यांनीं लेहून दिल्हे कीं कृष्णाजी बापू पेंडसा भालेराई पूर्वीं परागंदा जाला तोपर्यंत गांव मुरडी निराळी व आलीकडे दाहा पंधरा वर्षें दोन गांव निराळे चालत होते आलीकडे दोन गांवचा येक गांव कधीं जाला हें आपणांस ठाऊक नाहीं म्हणोन पेंडसे म्हणतात. ऐसीयासी भालेराईस वर्षें सत्तर बहात्तर जालीं तेव्हां पंचावन सत्तावन वर्षें येक आंजर्लें जाहालें ऐसें पेंडसे याचे करिन्यावरून दिसोन येतें. ऐसीयासी हे गोष्ट प्रमाण दिसोन येत नाहीं व पेंडसे यांनीं लिहून दिल्हे आहे कीं आपले वडील धामधुमीमुळें परागंदा होऊन दिवे यास गेले होते. सुरक्षीत जालीयावरी गांवीं आले आणि आंजर्ल्याचे आगर मामूर करून मुरडीचे आगराची मामूरी करावयाची सनद नेली ते विसो हरी माहाजन याणी घेऊन आगर नारायण जोसी यासी दिला म्हणोन लिहून दिले. त्यास मनास आणितां गांव वसाहत जाली यास पनास पंचावन वर्षें जालीं आणि मुरडीचे आगरास नारायण जोसी यासी दिल्हे यास वर्षें ३८ जाहालीं तेव्हां अंतरसूत तेव्हां ते साक्ष प्रमाण दिसोन येत नाहीं.

गोविंद गणेश पेंडसे } आंजर्ले **१०** { श. १६८४ माघ शुद्ध ३ इ. १७६३ जाने. १७

गोविंद कृष्ण (१२–३) श्री

राजश्री सदाशिव विस्वनाथ हवालदार ताा केळसी गोसावी यासी सुाा सलास सीतेन मया व अलफ गोविंद कृष्ण पेंडसे वास्तव्य मुरडी याचे घर आगरात आहे त्यास गणेश रघुनाथ भट हे पेंडसे याचे घरीं जाऊन घर मोडावयासी लागले. येकेकडील कुड मोडीला. माणसास जेवण कराल तरी शपथ घातली घराहून बाहेर जाणें नाहीं तरी मोडून घालवितों म्हणोन फारच अतीसय केला कुटुंब येक दिवस उपोसित राहिलें यावरून पेंडसे याणीं येऊन सदरहू प्रा वर्तमान निवेदन केलें. त्याजवरून गणेश रघुनाथ भट यासी आणून ताकीद केली कीं तुम्ही उभयेताचा न्याये जाहाला नाहीं हुजूर पुणेंयास न्याये नीवडणेंच आहे तावत्काल पावेतों घर सेतवाडीसी समंध नाहीं. कजीया करून घालवावयासी प्रयोजन नाहीं. हुजूरून न्याय निवडून येईल त्याप्रमाणें उभयेतानी वर्तावें म्हणोन निक्षूण ताकीद केली असतां भट याणीं न अैकतां परभारा दुराग्रह पेंडसे यावर केल्यावरून हुजूर पुणेंयासी गेले म्हणोन कळलें त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे तरी पेंडसे याजकडे सेते खुद सेतकीची व अरधेलीची व आगर आहेत त्याची जप्ती करून चौकशी सरकारतर्फेनें तुम्ही करणें आगरांतील वीत गेलें असेल त्याची खबरदारी करून लेहून ठेवणें पेंडसे याची माणसें आगरांतील घरांत आहेत त्याप्रमाणें राहूं देणें भट या उपरी कजिया करीतील तरी चौकीचे लोकांस ताकीद करून एकंदर कजिया करू न देणें पेंडसे पुणेंयासी हुजूर गेले भटही हुजूर जाणार यास सुखरूप जाऊ देणें. फडशा करून घ्यावा येविसीं ताकीद करणें राा छ २ माहे रजब पाा हुजूर.

पे. द. भा. २२ पृ. १०६

बाबूराव रामचंद्र (२०–५) **११** { श. १६८९ इ. १७६७

बाबूराव राम पेंडसे हा पुण्याचा कोतवाल. ह्यापूर्वी केशवराव केतकर होते.

ऐ. ले. ले. १२०७, ०८, १२, १४ { श. १६९४ आश्विन शु. १३ इ. १७७२ आक्टो. ९

राघोबादादाचे बंदोबस्ताबद्दल यानें पांडुरंगराव पटवर्धन यांस पत्र लिहिलें आहे.

स. मा. रो. ३–२९ } **१२** { श. १६९६ ज्येष्ठ शु. ६
सु. ११७५ रखर ५ } { इ. १७७४ जून १५

एकबेरजी चालतें दप्तर

कृष्णाजी गणेश (१३–५)

	ऐन रु.	सेवकार्थ	कापडआंख रु.	
कृष्णाजी गणेश पेंडसे	७००	१२१	१५०	६०
				८८१
	पैकी सेतसनद रु. वजा			१००
				७८१

रामचंद्र गोविंद (१–७) { श. १७२० वैशाख शु. ६
{ इ. १७९८ एप्रिल २३

दु. बा. २०२ रामचंद्र गोविंद पेंडसे	२५०		५०	२०
सु. ११९८ जिल्काद ६ ,,				२७०
	दस्तक १			१ खंडी १० बैल

गोविंद सदाशिव (२–८)

गोविंद सदाशिव पेंडसे	२५०		५०	२०
				२७०

गणेश कृष्ण (१३–६)

दु. बा. २०३ गणेश कृष्ण पेंडसे	दस्तक २	४ खंडी ४० बैल
सु. ११९८ जिल्काद ६		

स. मा. २–२४६ } **१३** { श. १६९६ कार्तिक व. ४
सु. ११७५ रम. १७ } { इ. १७७४ नोव्हें. २२

महादाजी बल्लाळ (१२–४)

महादाजी बलाळ पेंडसे महाजन मौजे मुर्डी हे पुरंधर मुकामी येऊन तालुके सुवर्णदुर्ग येथील पड जमीन आणि दर्यागर्क खाजणी जमीन लागवडीस आणून पिकाऊ करणेबद्दल माफी व कमधारा मिळावा. तसेच नवसाध्य ठिकाणांची लावणी व्हावी अशाकरतां पेशवे यांजकडे विनंति करतात. व त्याप्रमाणें त्यांस कौल मिळाला आहे.

गोविंद गणेश पेंडसे { आंजर्ले } **१४** { श. १६९७ आषाढ व. ४ इ. १७७५ जुलै १६ }

गोविंद कृष्ण (१२–३) श्री

० श्री ~

सीका

श्रीराजाराम नर-
पति हर्षनिधान माधव-
राव नारायण
मुख्य प्रधान

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ता। गणेश रघुनाथ व बाबाजी रघुनाथ व नारो रघुनाथ भट माहाजन का। आंजरलें ता। केलसी तालुके सुवर्ण-दुर्ग सु॥ सीत सबैन मया व अलफ गोविंद कृष्ण पेंडसे माहाजन मौजे मुर्डी ता। मा।र याचा व तुमचा मौजे मा।रविसी कजिया लागोन मनसुबी हुजुर पडिली होती त्याचा निवाडा होऊन पेंडसे वादास खरे जाले. सबब त्याजपासून हरकी सरकारात घेऊन मौजे मजकूर सरकारात जप्त होता तो मोकला करून पुर्ववत् प्रा। महाजनकी सेतभात सुधा पेंडसे याजकडे चालवावयाविसी पेशजी सनद सादर जाली असता व त्या प्रा। सुभाहून चीठ्या दिल्हृया असतां तुम्हीं धटाई करून मौजे मा।रची सेते पेंडसे यास लाऊ देत नाही मारामार करितां सुभाचे ताकीदीस मानीत नाही म्हणोन हुजूर विदीत जाले. अैशास याचा तुमचा येवि-सीचा इनसाफ होऊन हुजूर फडशा जाला त्या प्रा। सरकारची पत्रे सादर जाली असे असता मागती धटाई करून कज्या करितां हे बेकैदी कार्याची नाहीं. हाली येविसी तुम्हांस हुजूर यावयाची आज्ञा केली असे तरी देखत आज्ञापत्र तिघेजण निघून हुजूर येणे. दिरंग लाविल्यास मुलाहिजा होणार नाहीं. या कामास गाडदी दि॥ आबदुल कादर याजकडील आ। ३ तीन पा। आहेत यास मसाला* रुा। ५० देविले असेत आदां करणे जाणिजे छ १७ जमादिलावल आज्ञाप्रमाण. लेखनसीमा.

---

* प्रतिवादी शहरातच आहे तर त्यास शिपाई बा।र चिठी पाठऊन आणवीत होते. हरगांवी आहेत त्यास पत्र हुजुरचे अथवा ज्याजकडे मनास आणावयाची आज्ञा होईल त्याचे शिपाई याबरोबर जाऊन त्यास आणवीत. फिर्यादीन मात-बर अपराध समजाविला तर असामी व अपराध पाहून मसाला होत होता. इनसाफानें प्रतिवादी खरा झाल्यास मसाला परत देवीत होते. (पे. द. भा. ४५ क्रमांक ४८)

जगन्नाथ वासुदेव जोशी हर्णै } **१५** { श. १७०३ भाद्र. व. २ इ. १७८१ सप्टं. ४

बाबूराव रामचंद्र (२०–५)　　श्री

श्री

सीका　　श्रीमत् पंत
प्रधान चरणीं
तत्पर मोरो
बापूजी निरंतर

अज स्वारी राजश्री मोरो बापूजी सुभेदार प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग ताहां बाबूराव राम, उपनाम पेंडसे, गोत्र ज्यामदग्नी सूत्र आश्वलायन खोत महाजन मौजे वणोशी तर्फ पंचनदी मामले जाफराबाद सुभा दाभोळ सुरू सन इसने समानीन मियां व आलफ. शके १७०३ प्लवंग नामसंवत्सरे तुम्ही जंजिराचे मुक्कामीं सुभांस येऊन विदित केलें कीं मौजे मजकूर येथील खोती महाजनकीचें वतन आपलें वडिलोपार्जित वौषपरंपरागत भोगवटा चालत असतां भालेराई समयीं आपले आजे दादो बल्लाळ पेंडसे, आपले तीर्थरूप लहान येका वर्षाचे असतां घेऊन परागंदा झाले. उपरांत गांवीं येऊन वसाहत करावी तों अंजनवेल अजम याकूबखान यांहीं घेतली. आपले आजे परागंदा असतांच शांत जाहाले. आपले तीर्थरूप, रामाजी दादाजी जाणते जाहल्यावर गांवीं येऊन आबाद व्हावें तों अंजनवेलीस महसरा महाराज छत्रपतीचा बसला यामुळें गांव ओसाड होता. आपले तीर्थरूप गांवाच्या ओढीनें आले ते दंग्यामुळें हर्णैसच राहिले. त्यावर राजश्री तुळाजी आंगरे सरखेल, यांनीं अंजनवेल सर केल्यावर वेदमूर्ति धोंडभट पाटणकर यांनीं आपले तीर्थरुपांस पुसोन गांवची वसाहत केली. आपले तीर्थरूप महायात्रेस जाऊन आले ते राजपूर सुभ्यात निजामपुरास राहिले. स्वराज्य जाहल्यावर गांवीं यावयाचा मजकूर धोंडभट पाटणकर यांजवळ बोलले. त्यावरोन धोंडभट पुण्यास जाऊन वो कृष्णंभट पाटणकर यांचे हिमाइतीनें गांवची सनद घ्यावयाचा यत्न करूं लागले. तों आपण लहान पुण्यास असतां वो धोंड जोशी पंचनदीकर यांणीं श्रीमंत भाऊसाहेब यांजवळ मजला उभा करून हा गांवचा धणी या मुलाचें वतन,,याची दाद धण्यांनीं लाऊन याचा गांव याचे (दुमाले) करवावा. हा आमचा यजमान आम्ही त्या गांवचे ज्योतिषी, असें विदित केल्यावरून श्रीमंतांहीं रामाजी महादेव माजी मामलेदार यांस आज्ञा केली कीं पेंडसे याचा गांव पेंडसे याचे स्वाधीन करणें. त्यावरोन रामाजी[१] महादेव यांची सनद सुभांस व गांवास घेऊन

१. हे बिवलकर. ह्यांची अंमलदारी श. १६७७–९४ दिसते. चरित्रकोशांत ह्यासच वसईच्या मोहिमेंत ते होते असें म्हटलें आहे. पण त्या मोहिमेंतील रामाजी महादेव वेगळे. त्यांचें उपनाम जोशी.

उपभोग करूं लागले. तीर्थरूप गांवीं राहून आपण रोजगारास पुण्यास गेलों तो पंधरा सतरा वर्षें घरीं आलों नाहीं. गांवचा उपभोग तीर्थरूपांनीं केला. त्यावर अशक्तपणामुळें गांवची खटपट न होये, याजकरितां नारो विश्वनाथ आधारकर एक साल तक्षिमेस मेळवून उपरांत बाळाजी नारायण घांगुर्डे यांजपासोन गांवची वहिवाट करविली गांवचा तोटारोटा हिशेबामुळें देणें पडला तो आपण पुण्याहून वारिला. गांवीं तीर्थरूप असतां सेवट कुळंब गांवीं न लागे अशक्त फार जाहले तेव्हां हर्णैस येऊन राहिले. उपरांत गांवची वहिवाट चालली पाहिजे याकरितां वो कृष्णजोशी पंचनदीकर हे थोर आणि आपले स्नेही यास्तव त्यांस सांगोन त्याचे विद्यमानें बाळाजी दाबके याचे हवाला गांव वहिवाटीस करितां आपला चिरंजीव घरीं येईतों तुम्ही वैवाट करावी घरीं आल्यानंतर तो करील; असा करार करोन दाबके यांस वैवाट सांगितली. त्यावर कृष्ण जोशी वाईस राहावयासी गेले. तीर्थरूप हर्णैस येऊन राहिल्यावर कांहीं दिवशीं दिवंगत झाले. आपण घरांत नव्हतों. उपरांत वो धोंड जोशी पंचनदीकर पुण्याहून कोंकणांत आले होते ते समयीं मौजे मजकूरची वैवाट दाबके यांजकडून काढून बाळाजी केशव टिळक मेहुणे सबब त्यांस वैवाट सांगितली. तेव्हां गांवचे कुळंबी त्याचे रजा तलबेंत न चालत. याकरितां जोशीबावा सुभांस येऊन सरकारची चिठी घेतली कीं गांव पेंडसे यांस चालवावयास सामर्थ्य नाहीं सबब पेंडसे याचे निसबतीनें टिळकांचे रजा तलबेंत चालणें म्हणून चिठी घेऊन वैवाट टिळकांनीं दहा वर्षेंपर्यंत चालविली त्यावर आपण समान सबैनांत (श. १६९९) कोंकणांत पुण्याहून येणार असें धोंड जोशी पंचनदीकर यांस समजले यावर हुजुर गैरवाका समजाविला कीं मौजे मजकूर येथील वतनदार परागंदा आहे तो हर्जीर होये तों आपणांकडे कमावीस चालवावी म्हणून समजाऊन सनद घेतली ते सुभांस आली. आपणांस तेथें हें समजलें नव्हतें. आपण येतां सनद घेतली कीं बाबूराव राम पेंडसे यांचे तीर्थरूप सन सीत सीतैनपर्यंत श. १६८७ गांवचा अनुभव करीत आले ते शांत जाहले. बाबूराव रोजगारास पुण्यास होते यामुळें गांवची वैवाट यांजकडून राहिली आहे ते हल्लीं कोंकणांत आले आहेत यांचे तीर्थरूप चालवीत होते त्याप्रमाणें यांचा वतनी गांव यांजकडे चालवणें म्हणून हुजूरची सनद आणिल्यावरून सुभांहून पूर्ववत् प्रमाणें आपला गांव आपणाकडे चालता केला. उपरांत धोंड जोशी यांनीं सनद आगोदर गैरवाका हुजूर समजाऊन घेतल्या अन्वयें ताकीदपत्रेंहि हुजुरून घेऊन पाठवीत गेले. त्याची सुभा चौकशी होतां आमचा गांव वतनी खरा असा समजांत आल्यावरून आमचा गांव आम्हांकडे चालविला. तावत्काळ वो विश्वनाथ जोशी पंचनदीकर मौजे मजकूरची ज्योतिषपणाची वृत्ति चालवीत असतां कांहीं बोलले नाहीं. अलीकडे **सन तिसां** सबैनांत (श. १७००) पुण्याचे मुकामीं सुभांची स्वारी असतां विश्वनाथ जोशी यांनीं समजाविलें कीं हरबाजी बाळाजी करमरकर गांवचा महाजन त्यांनीं आपल्यास मौजे मजकूरची महाजनकी दान दिली त्याचे दानपत्र आपल्याजवळ आहे असें खोटें

समजाऊन त्या दानपत्राची तालीक म्हणून दाखवून सुभांचें पत्र जंजिरा आणिल्यावरोन मौजे मजकूरची कमाविसी पीकसुद्धां सराईस जोशी यांचे स्वाधीन करविली. त्यावर सुभांची स्वारी जंजिरा आल्यावर चौकशी करून आमची लागवड, सबब पीक आमचे हवाला करविलें. गांवची कमावीस जोशी यांजकडे चालविली त्या दिवसापासोन आपण फिर्याद आजतागायेत सुभांस आहे. तरी मौजे मजकूर येथील खोती महाजनकीचें वतन पूर्वार्जित याची साक्ष सडी भोग्य पाहून वाजवीचे रीतीनें न्याय होऊन आमचें वतन आमचें स्वाधीन करविलें पाहिजे म्हणून विनंति. त्यावरोन मनास आणितां मौजे मजकूर येथील खोती महाजनकीची वैवाट वतनी भोगवटे याचे रीतीनें चौकशी करावयाची पंचाईत नेमोन मनास आणितां तकरीर व वर्तणुकेस जामीन पेंडसे व जोशी यांचे घेतां तुम्ही तकरीर व जामीन दिला. जोशी तकरीर व जामीन न देत. तेव्हां सख्ती करून तकरीर मात्र पंचाइतांनीं घेतली. वर्तणुकेस जामीन दिल्हा नाहीं तेव्हां असल दानपत्र करमरकर यांनीं दिलें म्हणून सांगत होते तें आणवितां जोशी बोलों लागले कीं, साठ वर्षांचें पत्र पोथींन सांपडलें होतें तें पत्र आजपावेतों आपणास ठाऊक नव्हतें. व पाहिलेंही नव्हतें. पोथींत दृष्टीस पडलें त्याची नकल करून पुण्याचे मुकामीं सुभांस दाखविलें. त्यावरोन गांव आम्हांकडे चालविला. हल्लीं ते असल पत्र सरकारांत आणविलें त्यास ज्या पोथींत पत्र होतें ती पोथीच गलथ जाहली सांपडत नाहीं ऐसें बोलोन वादास उभे न राहातसे जाहले. धटाईच्या गोष्टी बोलों लागले. शोध पाहातां तें पत्र कोणासही ठाऊक नाहीं. धोंड जोशी चुलत बंधु यांसही ठाऊक नाहीं. जोशीपणाची वृत्ति चालवितात मौजे मजकुरी वृत्तीसंमंधें जाणें येणें नित्य असतां पत्राचा मजकूर भाषणांत असावा तो नाहीं. साठ पन्नास वर्षेपर्यंत जाहालीं असें पत्र असल्यास त्याचा कांहीं दाखला पुरावा किंवा वैवाटींत यावें तें येत नाहीं. सन तिसां सबैनांत तालीक दाखविली आणि चिठी घेतली मागें कोठेही मजकूर केल्याचा पता लागत नाहीं. असल पत्र पाहून निर्णयात आणावें तों तें असल पत्रच हारपलें म्हणतात. यावरोन पंचाईतमतें विश्वनाथ जोशी पंचनदीकर हे दानपत्राचा संमंध लावून मौजे मजकूरच्या खोती महाजनकीच्या वतनास खटला करितात आणि पेंडसे यांस पेचांत पाडितात. तें आधावतीनें खोतीच्या स्वार्थाकरितां मात्र खोटें साधन करीत होते असें पंचाईत मतें ठरलें. त्यावरोन पाहातां पुण्याचे मुकामीं दानपत्राची तालीक दाखवून गांवीं चिठी घेतली ते समयीं असल पत्राचा आक्षेप असावा, परंतु जोशी थोर, पत्र नसतां खोटी तालीक दाखवितील हे निशा कशावरोन पडावी ? हल्लीं चौकशीच्या अर्थी सडचा भवरगांव व गांवकरी येथील वतनदारांच्या घ्यावयाची सुभांहून कारकून पाठवून मौजे कोळथरें येथें श्रीकोळेश्वराचे देवालयीं घेतल्या त्या सुभा आल्यावर त्यांतील सारांश मनास आणितां वतनदारांनीं सत्योत्तरें लिहून दिल्हें त्यांत जोशी यांच्या साधनाचा अर्थ करिन्याच्या अन्वयें किमपि पुरत नाहीं व करमरकर मौजे मज-

कूरचा महाजन ऐसेंही सडयांत दाखल्यास येत नाहीं. कोण्हाचे लिहिण्यांत वाडा धातोंडी येथें करमरकर राहात होता तेथें आगर मात्र करीत होता असें सडींत एकदोघांचें आहे. त्याचा दाखला मनास आणितां हरबाजी बाळाजी करमरकर धातोंडीस राहात होता; तो आगर वो भास्करभट साठे वस्ती कवाड प्रांत कल्याण यांस दान दिला. त्याचें दानपत्र पंचेचाळीस सत्तेचाळीस वर्षांचें साठे यांजवळ आहे त्याजवर साक्ष वो कृष्ण जोशी पंचनदीकर आग्निहोत्री हे विश्वनाथ जोशी यांचे चुलतबंधु यांची स्वदस्तुरें आहे. त्या पत्रांत करमरकर महाजन ऐसीं अक्षरें नाहींत तोच आगर विश्वनाथ जोशी म्हणतात कीं आपणांस दान दिला आहे. म्हणून दानाच्या पत्राची तालीक दाखवितात. महाजनकी व आगर दान म्हणून तालिकेंत लिहिलें अशास तालकेवर साक्ष भास्करभट साठे याची लिहिली आहे. आणि हें दानपत्र असलच भास्करभट साठे याजवळ आहे. त्यावर साक्ष कृष्ण जोशी पंचनदीकर यांची आहे. तेव्हां जोशी तालीक दाखवितात तो मजकूर खोटा असा ठरला. याखेरीज दुसरा दाखला त्रिंबकपंत करमरकर कल्याणप्रांतीं कवाडास आहे त्याची उमर पाऊणशें वर्षें तो हल्लीं जिवंत आहे त्याचें पत्र तुम्हीं आणून दाखविलें. हरबाजी बाळाजी करमरकर हा आपला दाईज मौजे बुरोंडी येथील वतनदार त्याची क्रिया आपण केली ऐसें साफ त्यांणीं लिहिलें आहे. तेव्हां करमरकर वाडा धातोंडी मौजे वणोशी येथील तेथें करमरकर सुखवस्तु आगर करून होता. महाजन असा दाखल्यांत येत नाहीं याखेरीज तिसरा दाखला मौजे मजकूर येथील कोंड तिवरें येथें भंडार माड करून जोगोजी भंडारी चाळीस पन्नास वर्षें होता तो वतनदार म्हणवूं लागला, सबब स्वराज्यांत रामाजी महादेव मामलेदार याचे कारकिर्दीत **रामाजी पेंडसे** यांनीं सुभांस आणून पंचाईत मागोन फडशा होतां भंडारी खोटा पडला. येजीत खत रामाजी पेंडसे यांस दिलें त्यांत खोत महाजन पेंडसे यांस लिहिलें आहे. त्या पत्रावर देशमुख देशपांडे यांची साक्ष आहे व जोशीही समक्ष होते परंतु पेंडसे यांस कोण्ही तूं वतनदार नव्हेस असें म्हटलें नाहीं. यावरोन भंडारी यांचें येजीत खत तुम्हांजवळ आहे तें खरें. आणखी वो धोंड जोशी पंचनदीकर पुण्याहून हर्णैस आले होते तेसमयीं सुभांस पेंडसे यांचा मजकूर पुसतां श्रीमंत भाऊसाहेबांजवळ बाबूराव लहान यांस उभा करून वतनदार गांवचा म्हणून सांगोन आपला येजमान याकरितां यांचें साहित्य केलें हें खरें म्हणून धोंड जोशी समक्ष बोलले. व वो कृष्ण जोशी आग्निहोत्री पंचनदीकर हे निजामपुरीं राजपूर सुभ्यांस जाऊन रामाजी पेंडसे यांस तेथोन गांवीं वणोशीस आपले वतनावर या म्हणोन सांगोन साहित्य उपराळा आपला येजमान म्हणून केलें होतें हेंही दाखल्यांत पुरलें. यावरोन विश्वनाथ जोशी पंचनदीकर हे मौजे मजकूरच्या खोतीविसीं कज्या सांगतात तो स्वार्थपर खोटा. दानाचें असल पत्र नाहीं व करमरकरांचेही वतनाचा दाखला नाहीं. सडी साक्षीदारांचे मतेंही करमरकर गांवचा वतनदार असें दाखल्यांत येत नाहीं. बुरोंडीचा वतनदार म्हणून त्याचे दाईजाचें पत्र

व वो कृष्ण जोशी व धोंड जोशी पंचनदीकर यांहीं तुमचे तीर्थरूपांचें साहित्य करून गांवीं वैवाटीचे प्रकर्णी उपराळे केले परंतु वतनाचा लोभ धरून किमपि संदर्भ लाविला नाहीं. तेव्हां विश्वनाथ जोशी वृत्ति चालवित असतां कांहीं बोलले नाहीं. आतां दानाची सबब लावून खटल्यास उभा राहून खोती मात्र करणार. फडशाचे समयीं अस्सल दानपत्र नाहीं पुसतां हरवलें म्हणतात. वरकड साधन सडी साक्षीचें कांहींच न पुरे. वादास उभे राहा म्हणतां धटाईस मात्र येतात. यावरोन मौजे मजकूरच्या खोती महाजनकीच्या वतनास जोशी भांडतात ते खोटे असें ठरावांत पंचाईतमतें आलें. यावरून व तुमचा मौजे मजकुरीं खोती महाजनकीचा भोगवटा तुमच्या बापांनीं केला. व मागें तो तुमच्या वडिलांचा निर्वेध भोगवटा चालल्याचा पता पुरत आला. यावरून मौजे वणोशी येथील खोती महाजनकीचें वतन तुमचें खरें हें जाणोन तुमचें वतन तुमचे हवाला केलें असे. तरी मौजे मजकूरचें खोती महाजनकीचें वतन चालत आल्याप्रमाणें चालवीत जाणें. विश्वनाथ जोशी पंचनदीकर यांणीं वावगा कजिया खोतीच्या वतनाविसीं केला होता. त्याचा फडशा होतां जोशी खोटे पडले तुमचें वतन असें खरें ठरलें. सबब वादाचा फडशा लिहून सुभांहून तुम्हांस पत्र द्यावयाचा करार जाहला. यासंबंधें तुम्हापासोन जीवन-मवाफीक हरखी नख्त रुपये ७५ अंके पाऊणशें सरकारांत पोतां जमा करून हें पत्र भोगवटेयास तुम्हास सादर केलें असे. तरी मौजे मजकूर येथील खोती महाजनकीचे वतनाचा तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें उपभोग करून खोती महाजनकीसंबंधें गांवीं मानपान व वेठबेगार व जमीन रकमी भरडी व बागायती अनुभव करून सुखरूप राहणें. जाणिजे छ १५ माहे रमजान. मोर्तब सुद.

महेश्वर दर० ची बातमीपत्रें भा. १ ले. ७०　}　**१५ अ**　{　श. १७०४ आषाढ व. ७ इ. १७८२ जुलै ३१

विठल शामराज (मु. महेश्वर)—पुणें

.... हें पत्र एकांतीच पाहून फिरून तात्या पेंडश्याच्या हवाला करावें.

हा उतारा ज्यांतून घेतला त्या ग्रंथांत म्हणजे महेश्वरदरबारच्या बातमी-पत्रांत ह्या विठल शामराजचीं तात्यांना उद्देशून लिहिलेलीं पत्रें (६०–६५–७१–७३–७८–८८–९२–९६–१०६––११२) आहेत. पण ह्यांतील तात्या हे, तात्या पेंडसेच होत असें निर्विवादपणें सांगतां येत नाहीं. कांहीं पत्रांतील लिखाणावरून तर तात्या म्हणजे हरिपंततात्या फडके हेच असावेत असें स्पष्ट वाटतें. ले. ६५ चे पत्रांत लेखक हरिपंततात्याचे दिमतीनें होळकरांकडे होता असें स्पष्ट म्हटलें आहे. ले. ६०, ६५ व ८८ यांत ' श्रीमंत राजश्री तात्यासाहेब ' असें लिहून पुढें ' चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार ' असें लिहिलें आहे. बाकीच्या सात पत्रांत ' राज-श्रिया विराजित रा. रा. तात्या ' असें लिहून ' कृतानेक सा. नमस्कार ' असें लिहिलें आहे. तात्यासाहेब व तात्या अशा दोन व्यक्ति असतील अगर लेखकानें एकाच

व्यक्तीस निरनिराळे प्रसंगीं निरनिराळ्या तऱ्हेनें लिहिलें असावें. दोन व्यक्ति मानिल्यास पहिलीं तीन पत्रें ज्यांस लिहिलीं आहेत ती व्यक्ति दुसरीं सात पत्रें ज्यास लिहिलीं आहेत तिजपेक्षां मानानें मोठी असावी असें दिसतें. अशा जर दोन व्यक्ति कल्पिल्या तर पहिली व्यक्ति 'हरिपंततात्या फडके' व दुसरी व्यक्ति 'तात्या पेंडसे' असू शकेल. हे तात्या कोणते घराण्यांतील व यांचे मूळ नांव काय हें आज कळत नाहीं. ज्या पत्रांतील हा उतारा आहे तें पत्र नाना फडणवीस यांस लिहिलेलें असावें. त्यावरून राघोपंत व लक्ष्मणपंत पेंडसे असे दोघेजण नानांचे विश्वासांतील होते त्यांपैकीं एक असेल. व त्याचें टोपण नांव तात्या असू शकेल. सर्व लेखांकांतील तात्या, पेंडसेच असावेत असें विविधज्ञानविस्तारांत म्हटलें आहे तें पटत नाहीं (वि. वि. वर्ष ५५ अं. ६).

मुर्डी घराण्यांतील **महादेव बाळाजी** (४) यांना तात्या म्हणत असत. हे श. १६९६ त पुरंधरास होते (क्रमांक १३ पहा). तसेंच अरुण येथून त्यांनीं मुर्डीस हुंडी पाठविली होती (प्रकरण ५ मधील वांटपपत्र पहा) यावरून ते, त्या वेळीं देशावर होते. पत्रांत उल्लेखिलेले तात्या हे असतील काय ?

पे. द. भा. ४ पृ. ३०
मुा कोपरगांव

१६

श १७०९ कार्तिक शु. ३
इ. १७८७ नोव्हें. १२

व्यंकटेश सदाशिव (७–६)

कृष्णाजी जनार्दन—नानाफडणीस

व्यंकट सदाशिव पेंडसे (श्री. आनंदीबाई पेशवे यांस भेटण्यास) येथें आले आहेत.

पे. द. भा. ४ पृ. ४९

श. १७१० चैत्र व. १४
इ. १७८८ मे ५

व्यंकट सदाशिव पेंडसे याचे चुलत बंधु केसो महादेव यांचे घरीं आहे त्यास देवी आल्या आहेत म्हणोन (आनंदी) बाई समाचारास गेली होती.

गोपाळ सदाशिव पेंडसे
पुणें
आबाजी बल्लाळ (३०–२)

१७

श. १७११ ज्येष्ठ व. ७
इ. १७८९ जून १५

श्री

सीका

श्री०
माधवराव बल्लाळ प्रधान
चरणि तत्पर भिकाजी
गोविंद निरंतर

छ मो अनाम देशमुख व देशपांडे ताा वनखल यांसी भिकाजी गोविंद

सुभेदार तालुके विसापुर सुा तीसैन मया व आलफ आबाजी बलाल पेंडसे वास्तव्य मौजे तुराडे ताा तुगारतन प्रांत करनाला. यानी सुभा येऊन विनंत केली की मौजे तुपगांव ताा वनखल मुरंजन येथें जंगलगर्क बेमरामती जमीन सेत भोरकस पांचसात बिघे अजमासे आहे. तेथें श्रम साहास करून मवलग पैका खर्चून नूतन बांध बांधल्यास कांहीं येक दिवसानी सेताची जमीन व्हावयाजोगी आहे. त्यास जमीनीस माफी इस्तावा व पुढे हलका सिरस्ता नकदी उगवणी वतनी सेत करार करून दिल्यास पैका खर्चून बंदिस्त करू म्हणोन सालगुदस्ता विनंती केली त्याजवरून आज्ञा जाहली की सेताची बंदिस्त करणें. पुढें सुभांतून कारकून देऊन खर्चाचा व जमीनीचा अजमास करून माफी ईस्तावेयाचा कौल देऊन वतनी सेत करार करून दिल्हे जाईल. त्याजवरून साल गुदस्तापासून शेताचे बंदिस्तीस पैका खर्च केला आहे त्यास अजमास करावयासी कारकून पाठऊन कौल दिल्हा पाहिजे म्हणोन त्याजवरून सदरहू अदमास करावयासी सदासिव बाबजी आगाशे कारकून यासी पाठविले त्यानी जमीनीचा व खर्चाचा अजमास करून आणिला ते

जमीन जंगलगर्क	खर्चाचा अजमास रुो
माल ठेपसुधा अजमासे	५४८।·।। झा खर्च
नजर माजना बिघे ०८	२५१॥≶॥ पुढें जमीनीस खर्च व्हावयाचा वगैरा
	८००

सदरहू जमीन आठ बिघे व खर्चाचा अजमास रुो आठशे करून आणिला. त्याजवरून मनास आणिता जमीन थोडी व खर्च बहुत श्रमसाहास केल्यास पाचा साता वर्षाने जमीन तयार होईल नव बंदिस्त करणार त्यास श्रमाप्रमाणें माफी इस्तावा व पुढें वतनी शेत करार करून दिल्ह्यासिवाय पैका खर्चून व मेहनत करून कोणी बंदिस्त करणार नाहीं. त्याजवरून कीर्दीवर नजर देऊन कौल अलाहिदा दिल्ला असे. त्यास तुम्ही मशारनिल्हेस कौलाचे अन्वये वतनपत्र गांवकरीयाचे व भोवरगांवकरीयाचे साक्षीनिसी व तुमचे सिकेमोर्तबानिसी करून देणें या पत्राची नकल करून घेऊन असलपत्र मशारनिल्हेस भोगवटियासी परतोन देणे. जाणिजे छ २० रमजान मोर्तब सुद.

गोपाळ सदाशिव पेंडसे पुणें } **१८** { श. १७११ आश्विन व. ११ इ. १७८९ आक्टो. १५

भास्कर पांडुरंग (३०–३) श्री

कौल महाल ठाणे तुपगांव ता वनखल ताो विसापूर राजश्री भास्कर पांडुरंग पेंडसे वाा मौजे तुराडे ताा तुंगार्तन सुाा तीसैन मया व अलफ. तुम्ही मौजे तुपगावच्रे मुकामी विनंति केली की मौजे आसरोटी ताा माार येथील शेत बाधण पेसजीपासून जंगलगर्क नाकीर्दसार जमीन खराब आहे त्यात टेप व ओहोल मातबर आहे. सलास सबनचे पाहणीस ओसीक जमीन आहे. मोजणीत आली नाही. हाली नव बंदिस्त करणार त्यास खर्च बहुत लागेल श्रम फार करावे लागतील. जमीन लागवडीस साफ करावयास पाच सहा वर्षे लागतील जमीन अजमासे साहा सात बिघे निघोन बंदिस्तीस व टेप साफ करावयास व ओहोल भरावयास च्यारशे रुपये लागतील. जमीनीचा व खर्चाचा अजमास पाहोन माफी इस्तावा साले पोख्त दिल्हेयाविना आंगसुटका होणार नाही. म्हणोन त्याजवरून मनास आणिता शेत जंगलगर्क आहे तुम्ही नव बंदिस्त श्रमसाहास करून बाधणार जमीन अजमासे साहासात बिघे निघेल खर्च बंदिस्तीस व टेप साफ करावयास व ओहोल भरावयास च्यारशे रुाो अजमासे लागतील नूतन शेत करितां सरकारची किफायत हे समजोन आबादीवर नजर देऊन माफी इस्तावा साले करार माफी इाा सन इहिदे तिसैन ताा सन इहिदे आशरेन साल सुाा ११

वितपसील इस्तावा ईाा इसने आशरीन ताा सन सबा आशरीन साले सुाा ६
येकूण जमीन अजमासे बिघे सात
दर बिघा उगवणी रुाो

३।। पहिले साली सन इसने आशरीन दर -।।- प्राों
७ दुसरे साली सन सलास आशरीन दर १ प्राों
१०।। तिसरे साली सन आर्बा आशरीन दर १।। प्राों
१४ चवथे साली सन खमस आशरीन दर २ प्राों
१७।। पाचवे साली सन सीत आशरीन दर २।। प्राों
२१ साहावे साली सन सबा आशरीन दर ३ प्राों

येकूण येणेंप्राों माफी इाा सन इहिदे तिसैन ताा सन इहिदे आशरीन साले अकरा पैाा पहिले साल सन इहिदे तिसैन दुसरे साल सन इसने तिसैन तिसरे साल सन सलास तिसैन चवथे साल सन आर्बा तिसैन पाचवे साल खमस तिसैन साहावे साल सन सीत तिसैन सातवे साल सन सबा तिसैन आठवे साल सन समान तिसैन नववे साल सन तिसा तिसैन दाहावे साल सन आशरीन अकरावे साल सन इहिदे आशरीन माफी पुरल्या नंतर इस्तावा इाा सन इसने आशरीन ताा सन सबा आशरीन साले साहा पैाा पहिले साली सन इसने आशरीन दर बिघा रुाो अर्धा दुसरे साली सन सलास आशरीन दर बिघा रुाो येक तिसरे साली सन आर्बा आशरीन

दर बिघा रुा दीढ चवथे साली सन खमस आशरीन दर बिघा रुा दोन पाचवे साली सन सीत आशरीन दर बिघा रुा अडीच साहावे साली सन सबा आशरीन दर बिघा रुा तीन येणे प्रमाणे माफी व इस्तावा भरल्यानंतर पाहणी करून सवाई सुट देऊन दर बिघा खरीफास रुा तीन प्रा खेरीज बाबती उगवणी करीत जाणे शेताची बंदिस्त करून आबादी करणे जाजती उपसर्ग लागणार नाही कौल असे जाणिजे छ २५ माहे मोहरम.

मोर्तब सुद

ऐ. ले. ले. १३९८ भा. ९ रखर १० }　　**१९**　　{ श. १७१३ मार्ग. शु. १२ इ. १७९१ डिसें. ७

केसो महादेव (१५–४)

केसो महादेव पेंडसे—(त्रिंबकराव रघुनाथ कुरुंदवाडकर पटवर्धन) मुकाम लष्कर नजीक चेनगिरी. इकडील वर्तमान तरी श्रीमंत रा भाऊसाहेबांस बरें वाटत नाहीं याजमुळें येथें मुकाम जाहला आहे. पंडितराव यानीं औषध दिल्यापासून किंचित् आरोग्य जालें आहे. श्रीमंत रा हरिपंततात्याकडन नित्य पत्रें येत असतात कीं, पत्र पावतांच निघोन येणें. परंतु भाउसा पट्टणास जाऊन मोर्चे लाविले म्हणजे जाऊं असें म्हणतात. भाऊसोचें व आमचे यजमानांचें ठीक नाहीं काय होतें पाहावें. विज्ञापना.

स. मा. रो. १–१६९ सु. ११९३ रम ३० }　　**२०**　　{ श. १७१४ वैशाख शु. २ इ. १७९३ मे १२

पांडुरंग रामचंद्र (४–४)

मानाजी* आंगरे यांचे तीर्थरूप राघोजी आंगरे मृत्यु पावले सबब दुखटा पाठविला, त्यास विद्यमान राजश्री राव ऊर्फ पांडुरंग राम पेंडसे कारकून शिलेदार याजबरोबर पाठविला. जाफरखानी चिपणी, एकूण आंख २४८

ऐ. ले. १० पृ. ५१११ रम २० }　　**२१**　　{ श. १७१८ फा. शु. ८ इ. १७९७ मार्च २०

राघो महादेव (१३–५) विठोबा—(पटवर्धन यांस)

रा. बाळाजीपंत जोशी यांस रा. नानांचे खाजगीचे कारकून **राघोपंत पेंडसे** —

* हा मानाजी दुसरा.

याणी बोलावून नेऊन खानापूरचे कारकुनीचा फडशा करून देणे म्हणोन ताकीद केली आहे. पुढें काय होईल तें न कळे....

(ऐ. ले. १० पृ. ५३१४, ५३६२ वर ह्याच वृत्ताचा अनुवाद आहे.) { श. १७२० चैत्र शु. ४ इ. १७९८ मार्च २१

'रा. भाऊ कापशे व **राघोपंत पेंडसे**—नानाकडील—यांजला शिंदे याणी लष्करांत नेले. नानाकडील ऐवजाची ‡ माहितगारी त्यास पुसली. त्याणी आपणास माहितगारी आहे तितका ऐवज दाखविला.'

ऐ. पत्रव्य० ले. ३४१

२२

राघो महादेव (१३–५)

अंताजी आचवल (कुरबाईकर नबाब)—

लष्करांत जाण्याविषयीं विनंती लिहिली, त्याजवरून रा. **राघोपंत पेंडसे** याजवळ आज्ञा झाली कीं, स्वारी कोठे केली आहे कां? त्यास ओढेकराकडील भवरासे याची फडणिसी आहे, तेथें दोन वर्षें राहून फडणिसीचें लिहिणें आकारलें, यावेगळें कोठें गेलों नाहीं. वरकड सरकारचे कानूकायदे समजावयाचे ते त्या मार्गीत पडल्यावर स्वामींचे आशीर्वादें अवघड पडणार नाहीं. येविसीची विनंती फिरोन **पेंडसे** करतील....

ऐ. ले. १० ५५६१, ५६०५ } ५५९७, ५६०२ }

२३

{ श. १७२० आश्विन शु. २, ९ इ. १७९८ आक्टो. ११, १८

लक्ष्मण महादेव (१३–५)

लक्ष्मणपंत पेंडसे

नाना फडणविसाचे खातरजमेचे गृहस्थ. नानांचेकडून पत्र व विष्णुवरील तुळशी परशुरामभाऊ पटवर्धनांकडे ऐक्यासाठीं घेऊन गेले व परत येतांना भाऊंनीं दिलेल्या गणपतीवरील दुर्वा व पत्र घेऊन आले. अशा रीतीनें नानांचें व भाऊंचे ऐक्य केले.

---

‡ पृ. ५३६४ वर त्यांनीं '१६ लक्षांचे जवाहीर सांगितलें ते ज्या गृहस्थाचे घरीं होते तेथून नेले' असें वाक्य आहे.

ऐ. ले. भाग १० ले. ४०२१

२३ अ

{ श. १७१९ आषाढ व. ८
इ. १७९७ जुलै १७

लक्ष्मण महादेव (१५–३)

यादी रु. १६०० लक्ष्मण महादेव पेंडसे

(पुण्याहून पटवर्धनांकडील मंडळीची यादी रा. बाबा काळे यांनीं मिरजेस पाठविली त्या यादींतील हें नांव आहे. परशुरामभाऊ पटवर्धन कैदेंत असतां दंड भरून त्यांची सुटका करावयाचें घाटत असतां कोणी किती दंड भरावा याबद्दल ही यादी तयार केली होती.)

भा. वर्ष श. पृ. ९२

२४

{ श. १७२२ ज्येष्ठ
इ. १८०० जून

राघो महादेव (१३–५)

राघोपंत पेंडसे, भाऊ कापसे नानाचे वाड्यांत होते, त्यांनीं नानाचे रुमाल जाळून पळाले. सांपडले नाहींत.

ऐ. ले. पृ. ६४५२

{ श. १७२२
इ. १८००

नानाकडील **रावोपंत पेंडसे** लोहगड किल्ल्यांत पळून गेले.

गोविंद गणेश पेंडसे }
आंजर्ले }

२५

{ श. १७२३ भाद्र. शु. २
इ. १८०१ सप्टेंबर १०

कृष्णाजी गोविंद (१२–४)

श्री

राजश्री रंगोपंत असवलकर गोसावी यांस अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो आनंदराव धुमाल रामराम विनंति उपरी राजश्री कृष्णाजी गोविंद पेंडसे महाजन मौजे मुर्डी ताा केलसी यानीं पुणेंयाचे मुकामी येऊन विदित केलें कीं मौजे मजकूरचे महाजनकीविसीं आम्हाजवळ आंजरले येथील भट महाजन खटला करीत होते. त्याची पंचायत* आंगरे याचे वेलेस व स्वराज्यांत होऊन आमची महाजनकी आम्हाकडे करार करून देऊन आंगरे याचे निवाडपत्र व सरकार हुजूरचीं पत्रें आम्हास करून दिली. त्यासमई मौजे मजकूरचे महाजनकी संमंधे व गावकी सेते व आगर पूर्ववतप्रमाणें आमची आम्हाकडे चालती केली त्याप्रमाणें आम्हाकडे चालली. अलीकडे पाच सात वर्षें

---

* वतनदारीची पंच्याईत करावयास देशमुख देशपांडे महाल मजकुरचे अगर परमहालचे वतनदार बसवून इनसाफ करीत. (पे. द. भा. ४५, क्रमांक–४८)

आंजरलेकर यानीं सुभाहून सरकारच्या चिठचा नेऊन सेते आगर घेतले आहेत त्यास आंगरे याचे निवाडपत्र व हुजूरचे पत्रांआन्वयें सेते व आगर आम्हाकडे चालविले पाहिजे म्हणोन त्याजवरून तुम्हास लिहीलें असे. तर मौजे मजकूरचे महाजनकी संमंधे व गावकी सेते व आगर आंजरलेकरानीं घेतली असतील ती साल मजकूरचे पीकसुद्धां पेंडसे महाजन मुर्डीकर याचे स्वाधीन करणें पेंडसे आगराची व सेताची लागवड करून सरकार दस्ताची उगवणी करतील सेते व आगर याचे स्वाधीन करून आंजरलेकरातील कोणाचें बोलणें आसल्यास मनास आणुन फडशा करणें रा। छ १ जमादिलावल सु॥ ईसने मयातेन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंति.

एच्. जी. बेनगिरी }
हावेरी }

२६

{ श. १७२६ कार्तिक शु. १२
{ इ. १८०४ नोव्हें. १४

नारायण लक्ष्मण

श्री

मा। आनाम देशमुख व देशपांडे पा। रायरी हुबली यासी केशवराव बाळकृष्ण सरसुभा प्रांत कर्नाटक सु॥ खमस मयातेन व अलफ वा। रा। नारायण बीन लक्ष्मणभट उपनाम पेंडसे वास्तव्य रत्नागिरी गोत्र जमदग्नी सुत्र आश्वलायन हे कुटुंबवत्सल स्नानसंध्याशील सत्पात्र यास चालवीले असता श्रीमंताचे राज्यास श्रेयस्कर जाणोन मौजे बुध्याल पा। मार पै॥ इनाम जमीन मार १ येक मार करार करून दिल्ही असे तरी चतुःसीमापूर्वक याचे दुमाला करून याचे पुत्रपौत्रादि वैंसपरंपरेने चालवणे हे पत्राची नकल घेऊन असल पत्र भोगवटियास परतोन देणें जाणीजे छ १० साबान मोर्तब सुद. मोर्तब सुद.

एच्. जी. बेनगिरी }
हावेरी }

२७

{ श. १७२६ कार्तिक शु. १२
{ इ. १८०४ नोव्हें. १४

नारायण लक्ष्मण

श्री

वेदमूर्ति राजमान्य राजश्री नारायेणभट बीन लक्ष्मणभट उपनाम पेंडसे वास्तव्य रत्नागिरी गोत्र जमदग्नी सुत्र आश्वलायन स्वामीचे सेवेसी विद्यार्थी केशवराव बाळकृष्ण सरसुभा प्रांत कर्नाटक सां। नमस्कार विनंती उपरी तुम्ही कुटुंबवत्छल स्नानसंध्याशील सत्पात्र चालविले असतां श्रीमंताचे राज्यास श्रेयस्कर जाणोन मौजे वुध्याल पा। रायरी हुबळी पा। इनाम जमीन मार १ येक मार करार करून दिल्ली असे तरी चतुःसीमापूर्वक पुत्रपौत्रादि वैंसपरंपरेने आनभऊन सुखरूप राहणे रा। छ १० साबान सु॥ खमस मयातेन व अलफ बहुत काय लिहीणें लोभ करावा हे विनंती.

दत्तात्रेय पांडुरंग पेंडसे } २८ { श. १७२८ आश्विन शु. ९
हरीपूर इ. १८०६ आक्टो. २० संगमेश्वर

सदाशिव गोविंद (१५–३) सीका श्रीगणेश

वेदमूर्ति राजश्री सदाशिवभट बिन गोविंदभट उपनाम पेंडसे गोत्र ज्यामदग्नि सूत्र आश्वलायन वास्तव्य मौजे कोचरे प्रांत कुडाल हाली वस्ती मजरे क्षेत्र हरीपूर कसबे सांगली प्रांत मिरज स्वामी गोसावी यांसी—

द शेवक गंगाधरराव गोविंद दिमत राजश्री पंतप्रधान नमस्कार सुरू सन सबा मया तैन व अलफ शके १७२८ क्षयनाम संवत्सर तुम्ही पेशजी सन तीसा समानीनात किले मिरज येथील मुकामी येऊन विनंति केली की आपण कुटुंबवत्सल योगक्षेम चालला पाहिजे त्यास कसबे मजकुरी कृष्णातीरी श्रीसंनिध ब्राह्मणास अग्रहार करून द्यावयाकरितां कैलासवासी गोविंदपंत नाना याणी हुजूर श्रीमंतापाशी विनंति करून जमीन नेमून घेऊन क्षेत्र हरीपूर वसविलें आहे. तेथें आम्हास राहावयास घर बांधून देऊन योगक्षेमार्थ अग्रहारापैकी काही नूतन इनाम जमीन करून दिलीया स्नानसंध्यादि षट्कर्मे आचरोन श्रीमंतास व श्रीमंताचे राज्यास अभीष्टचिंतन करून सुखरूप राहू म्हणोन त्याजवरून मनास आणिता तुम्ही थोर सत्पात्र तुमचे चालविल्यास श्रीमंतास व श्रीमंताचे राज्यास श्रेयस्कर जाणून क्षेत्री तुम्हांस घर बांधून देऊन कुटुंबाचे योगक्षेमास आग्रहारापैकी साडेसात हाताचे दोरीच्या मोजणीने वहीत जिरायत जमीन बिघे

॰१६ सन तीसा समानीनात जमीन काली
॰॥· सन ईहिदे तीसेनात मली
॰१६॥·

येकून साडेसोला बिघे जमीन तुमचे दुमाला झाली आहे त्यास हाली तुम्ही निवेदन केले की सदरहू इनाम जमीनीचे चतुःसीमापूर्वक भोगवटीयास पत्रे कृपाळू होऊन करून दिल्ही पाहिजे त्यावरून चतुःसीमेचा जाबता आणविला बी तपसील प्रत वसला काली जमीन सोला विघे यासी चतुःसीमा

१ पूर्वेस गणेशभट ताम्हनकर याचें इनाम शेत १ पश्चमेस बाबाजी मोरेश्वर बापट शेत रयतावा १ दक्षणेस व्यासाचार्य याचें इनाम शेत १ उत्तरेस मार्ग सांगलीस जावयाचा

प्रत वसला मली जमीन अर्ध बिधा यासी चतुःसीमा

१ पूर्वेस गायरान १ पश्चमेस श्रीकृष्णा १ दक्षणेस श्रीकृष्णेस जावयाचा मार्ग १ उत्तरेस रामचंद्रभट पंडित

येणेंप्रमाणें साडेसोळा बिघे जमीन चतुःसीमापूर्वक कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तरपटीदेखील इनाम तिजाई खेरीज हकदार व इनामदार करार करून देऊन तुम्हास हें पत्र सादर केले असे तरी तुम्ही पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने क्षेत्रीं वास्तव्य

करून इनाम जमीन अनुभऊन सुखरूप राहाणें जाणिजे छ ८ माहे साबान बहुत काय लिहिणें. मोर्तब सुद.

अनंत दत्तात्रेय पेंडसे सातारा

गोपाळ महादेव (१५–३)

२९

श. १७२८ आश्विन शु ९
इ. १८०६ आक्टो. २०

श्रीगणेश

आनाम देशमुख देशपांडे मिरज यासी अज स्वारी राजश्री गंगाधरराव गोविंद दिमत राजश्री पंतप्रधान ता मोकदमानी कसबें सांगली प्रांत मिरज सुरू सन सबा मया तैन व अलफ शके १७२८ क्षयनाम संवत्सरे वेदमूर्ति राजश्री गोपाळभट बिन महादेवभट उपनाम पेंडसे गोत्र जामदग्नि सूत्र आश्वलायन वास्तव्य मौजे कोचरें प्रांत कुडाळ हाली वस्ती मजरें क्षेत्र हरीपुर कसबे मजकूर यानी पेशजी सन तिसेनात किले मिरज येथील मुकामीं येऊन विनंति केली कीं आपण कुटुंबवत्सल योगक्षेम चालला पाहिजे यास कसबे मजकुरी कृष्णातीरी श्रीसंनिध अग्रहार करून द्यावयाकरितां कैलासवासी गोविंदपंत नाना याणी हुजूर श्रीमंतापासी विनंति करून जमीन नेमून घेऊन क्षेत्र हरीपूर वसविलें आहे. तेथें आम्हास राहावयास घर बांधून देऊन योगक्षेमार्थ अग्रहारापैकीं कांहीं नूतन इनाम जमीन करून दिल्हिया स्नानसंध्यादि षट्कर्में आचरोन श्रीमंतास व श्रीमंताचे राज्यास अभीष्टचिंतन करून सुखरूप राहूं म्हणोन. त्याजवरून मनास आणिता भटजी थोर सत्पात्र याचे चालविल्यास श्रीमंतास व श्रीमंताचे राज्यास श्रेयस्कर जाणून क्षेत्रीं घर बांधून देऊन कुटुंबाचे योगक्षेमास अग्रहारापैकीं साडेसात हाताच्या दोरीच्या मोजणीनें वहीत जिरायत जमीन काली ८८ बिघे एकूण आठ बिघे जमीन भटजीचे दुमाला जाहली आहे त्यास हली त्याणी निवेदन केलेली सदरहू जमीनीचे चतुःसीमापूर्वक भोगवटीयास पत्रे कृपाळू होऊन करून दिल्ही पाहिजेत त्याजवरून चतुःसीमेचा जाबता आणविला बी तपसील

१ पूर्वेस सुवाशास्त्री याचें इनाम शेत १ दक्षणेस व्यासाचार्य याचें इनाम शेत १ पश्चिमेस धोंडभट गोडसे याचें इनाम शेत १ उत्तरेस मोरभट वाटवे याचें इनाम शेत

येणेंप्रमाणें चतुःसीमापूर्वक कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तरपटीदेखील इनामदार करार करून देऊन तुम्हास हें पत्र सादर केले असे. तर भटजी क्षेत्रीं वास्तव्य करून राहतील याजकडे सदरहू आठ बिघे जमीन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवणें. तुम्ही या पत्राची नकल लिहून घेऊन असल पत्र भटजीजवळ भोगवटीयास परतोन देणें जाणिजे छ ८ माहे साबान मोर्तब सुद.

भा. वर्ष पं. प्र. श. पृ. ९९
इ. संग्रह ऐ. स्फु. ले. भा. २ पृ. २३

३०

श. १७३३
इ. १८११

बाळाजी नीळकंठ (१४–७)

बाळाजीपंत पेंडसे याची कन्या सरस्वतीबाई माहुलीस खाशाचें* लग्न झालें.

पे. द. ४१ ले. ५८

३१

श. १७३५ आषाढ शु. ७, ८
इ. १८१३ जुलै ५, ६

बाळाजी नीळकंठ (१४–७)

६ रजबचें वर्तमान......बाळाजीपंत पेंडसे यांजकडील भगवंतपंत येऊन मोधीसी बोलून गेले.

रामचंद्र

७ रजबचें वर्तमान......खुसरवजी मोधी प्रातःकाळीं थोरले सरकारवाड्यांत आले. दिवाणखान्याचे पछमेकडील खोलींत बिछाइत होती. तेथें श्रीमंत रा. आप्पासाहेब होते जेठीबा, विनायकपंत सबनीस व रामचंद्रपंत पेंडसे ऐसे बोलण्यांत होते.

ऐ. सं. साहित्य खं. २
पृ. ७१ ले. २४७

३२

श. १७३९ कार्तिक शु. ६
इ. १८१७ नोव्हें. १४

अमृत बळवंत (१४–८)

गणेश बळवंत (१४–८)

श्रीमंत सौ सरस्वतीबाई काल रात्रौ अस्पर्श जाली. म्हणोन त्याचे जाण्याचा बेत सासवडास जाला होता. बरोबर मी व अमृतराव पेंडशे यानी जावे म्हणोन आज्ञा जाली होती. अमृतराव व गणपतराव पेंडशे यास प्रथम दिवसापासोन आज्ञा जाली आहे कीं सरस्वतीबाईजवळ असावे. याजकरतां त्याचे विद्यमानचे शंभर स्वार व शंभर पायदळ ठेवावयास त्यास आज्ञा जाली.

ऐ. सं. सा. खं. २ ले. २४९

३३

श. १७३९ का. शु. ८
इ. १८१७ नोव्हें. १६

गणेश बळवंत (१४–८)

घरचे घोड्याची सोय रा. गणपतराव पेंडशे अगर आबा पुरंदरे याजकडे

---

*दुसरे बाजीरावाचें. हीस एक मुलगी झाली होती. पण ती लहानपणींच वारली.

करून लिहून पाठवावे म्हणोन आज्ञा. त्यास पेंडशे यांजकडे सोय आहे. घोडी सरंजामसुधा व त्याबरोबर कारकून कोणता द्यावयाचा असेल तो देऊन रवाना करावयास आज्ञा जाली पाहिजे.

ऐ. सं. साहित्य. खं. २ लें. २५९

३४

श. १७३९ माघ शु. ५ इ. १८१८ फेब्रु. २१

अमृत बळवंत (१४–८)
गणेश बळवंत (१४–८)

श्रीमंत सौ सरस्वतीबाई यांस अमृतराव पेंडसे याणी घेऊन निघाले. समागमे गणपतराव मी व दहापांच आा बारगीर या प्रों वाटेनिराळे उजवे बाजूस निघोन गेलो...त्या घाईंत बाईस वमन जाले व ढाल जाले ऊन मनस्वी बहुत वाखा जाला. त्यासमई एक आफतागिऱ्या भेटला. मुलूख मोगलाई.

रा. खं. २५ ले. १०८

३५

श. १७४६ माघ इ. १८२५ जाने–फे.

विष्णुभट–विद्यार्थी—गुर्लहोसूर वाडा.

विष्णुभट पेंडसे यांचा क्रम राहिला व सूत्रअरण राहिले. ह्यांना धोतरजोडा दिल्याची नोंद आहे.

इतिहाससंग्रह ऐ. स्फु. ले. भाग ३ पृ. ३२

३६

रामचंद्र दामोदर (१४–८)

विनायकराव पेशवे ह्यांनीं नारायणराव व माधवराव असे दोन मुलगे दत्तक घेतले होते आणि त्यांची सर्व व्यवस्था **रामचंद्र राम पेंडसे** ह्या नांवाचे गृहस्थ हिंदुस्थान सरकारच्या देखरेखी खालीं पाहात असत. विनायकराव इ. स. १८५३ त वारले. चित्रकूट जवळ कारवी गांवीं हे राहात. रामचंद्र राम ह्यांजविषयीं बांद्याचे कलेक्टर यांनीं उत्तम सर्टिफिकेट दिलें आहे.

पे. द. ४१ ले. ३२२

३७

{ श. १७६८ ज्ये. शु. १
{ इ. १८४६ मे २६

गणेश कृष्ण (१३–६) जबानी

गणेश कृष्ण ऊर्फ रावजी पेंडसे उमर वर्षे ६४, कसब कारकुनी वस्ती पेठ मेहुणपुरा शहर पुणें–एजंट साहेब यांचे रुबरु लिहून दिल्हे आम्ही पेशवाई-पासून दप्तरांत कामावर होतों, इंग्रजी अंमलांतहि तें काम केलें. हल्लीं पेन्शन घेऊन घरीं आहों. एजंट साहेबांनीं सुा तिसासितैन्न सालचे जखर ५ चें माधव-राव बल्लाळ प्रधान याणी लिहिलेले नीळकंठराव सिंदे यांचें नांवचें दाखविलें तें पाहिलें. हें पत्र पेशवे सरकारचे दप्तरांतून जाहलेलें व खरें असें आमचे नजरेस येत नाहीं. याचें कारण–फडणीस किंवा चिटणीस यांजकडील कारकुनाचे हातचें लिहिणें नाहीं. पत्रांतील मजकूर व तेरीख एकाचेच हातचे आहे. भेद मालूम पडावे म्हणून वळण चकवून लिहिलें आहे; सिका खुद व मुतालिकी यासी मिळत नाहीं; सिक्याचें क्षेत्र अधिक, अक्षर गोबरें वांकडेतिकडे व मिळत नाहीं, सिका करावयाची चाल–सिंदे हे सरदार आहेत तर त्याचे पत्रांत–पाठीमागें २।३ वली टाकून असे ते नाहीं, वलीवर सिका येईल तरी चिंता नाहीं. या पत्रास तर सिका-करण्याबद्दल बुध्या जागा कोरी टाकली; लेखनसीमा हे सिका अखेरीस आहे, क्षेत्रहि अधिक; पत्रांत बरोबरीचे शब्द आहेत; विनंति केली असे अदबीचे शब्द नाहींत; ऐसियांसी असे लिहितील, गांवगनाचें नांव चालते वलीनें लिहिले. पत्रांत फक्त वंशपरंपरा असें आहे; निष्ठपणे असें आहे, एकनिष्ठपणें पाहिजे. चालविण्यास मुजाहीम होणार नाहीं हे शब्द पेशवाईंत नसत; दरकदार याचें चिन्ह आहे; तेरीख लिहून महिना लिहितील माहे असे लिहिणार नाहीं तें आहे सिंदे हे बहुत काय लिहिण्याचे योग्यतेचे तेथें आज्ञा प्रमाण आहे. पत्रावर बार आहे ते दुसरे रखा-नेत शेवटचे बाजूस आहे; कागद मोडल्याचे साध आला असेल तेथें मधे बार म्हणून लिहावयाचे चालते. कागद फाडून लिहणार नाहींत कातरून लिहितील. या कारणा-वरून बनावट सही गणेश कृष्ण पेंडसे द. खु.

सही इंग्रजी साहेबांची.

गणेश कृष्ण पेंडसे }
सातारा }

३८

{ श. १७७० ज्येष्ठ शु. ५
{ इ. १८४८ जून ६

वासुदेव हरी (१५–६) श्रीगणपती जयति

राजश्री गणपतराव चव्हाण हिमत बहादुर गोसावी यांस—

मा। अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित चिंतामणराव पांडुरंग आशीर्वाद विशेष उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष.

चि. रा. धुंडीरावतात्या व गणपतरावबावा यांचा लग्नाचा निश्चय ज्येष्ठ वा। ३ मंदवारी केला आहे. शरीरसंबंध धुंडीरावतात्या यास वासुदेवपंत पेंडसे यांची कन्या व गणपतरावबावा यास चि. रा. रामाजी नाईक भिडे यांची कन्या वधू नेमस्त केल्या आहेत. तरी तुम्ही समारंभास यावे. रा। छ ५ रजब सु॥ तीसा अबैन मयातेन अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती लेखन सीमा

सीका
श्रीगणपती

गणेश कृष्ण पेंडसे सातारा } **३९** { श. १७७४ कार्तिक व. ८ स. १८५२ डिसें. ४

वासुदेव हरी (१५–६) श्रीगणपती जयति

तीर्थस्वरूप राजश्री वासुदेवपंत मामा पेंडसे, वडिलांचे सेवेशीं आपत्य धुंडीराव चिंतामण. सा. नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २१ स पावेतों क्षेम असो विशेष. आपणांस घर बांधावयास कसबे सांगली येथें जागा ती. कै. विठ्ठलराव बापूसाहेब यांचे वाडयाचे जाग्या पा। जागा पूर्वपश्चिम गज ७२ बाहात्तर व उत्तरदक्षण गज २५ पंचवीस. यासी चतु:सीमा पूर्वेस सरकारी जागा व पश्चमेस रस्ता व उत्तरेस राजश्री चिंतो गणेश भिडे यांचे घराची भिंत व दक्षणेस सरकारी जागा येणेंप्रों चतु:सीमापूर्वक जागा आपणांस दिली असे तर सदरहू जाग्यांत घर बांधोन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें नांदणूक करून सुखरूप राहावे सु॥ सलास खमसेन मयातेन व अलफ. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

४०

रामचंद्र दामोदर (१४–८) इ. १८५७

Extract from Appendix A, Page 303 of Vol. v, History of the Indian Mutiny of 1857–58 by Kaye and Malleson, cabinet edition.

Not only so but the same gentleman (Mr. F. O. Mayne) gave a special certificate to the regent of Ki'rwi' (who was also a trustee of the Benaras Temples) dated February 4, 1859. A copy of that document, now before me states : " Ramchandra

Ram Paindsay, has always borne a high character for loyalty and respectability during the Mutiny of 1857. Being a relation of the Ki'rwi' Peshwa, he was placed in a difficult position and discharged his duty both towards the British Government and towards his master most faithfully, at the risk of his life, and with frank and open loyalty to Government. It was he who saved the life of Mr. Cockerell, joint magistrate of Kirwi. Though he has at present frankly refused any reward for his loyal and faithful services, yet he must be well paid whenever he stands in need." This was signed by Mr. F. O. Mayne. Yet the reward Ramchandra Ram received was the pillage of the Benaras Temples of which he was trustee.

Page 138

The Rao of Kirwi Madhavrao was in 1857 a boy of but nine years, under the tutelage of Ramchandra Ram, a man enjoying the confidence of the Govt. of India, and appointed by it to watch the interest of the young Rao during his minority....... The affairs of the principality (Kirwi) were practically conducted by Ramchandra Ram, the nominee of the Govt. of India.

प्रकरण ५ वें

मुर्डीचे महाजनकीचा वाद

(आंजर्ले व मुर्डी हे गांव एक अगर निराळे ?)

संभाजी महाराज यांस दिल्लीचे औरंगजेब बादशाहानें इ. स. १६८९ मध्यें रत्नागिरी जिल्हयांतील संगमेश्वरास पकडून वडू येथें ठार मारिलें. त्या सुमारास कोंकणांत मोंगल सैन्यानें जी लुटालूट वगैरे केली, त्यामुळें कोंकणपट्टींतील पुष्कळ गांव उध्वस्त झाले. लोक आपली जंगम चीजवस्त व जीव वांचविण्यासाठीं घरदार सोडून देशोधडीस गेले. या प्रसंगीं आंजर्ले–मुर्डी, तपें केळशी, तालुका सुवर्णदुर्ग, सुभा दाभोळ येथील लोक शिद्दीयाचे ताब्यांत असलेल्या मुलुखांत म्हणजे जंजिरा संस्थानांत गेले. हा भाग मोंगलाचे लूटमारीपासून सुरक्षित होता. कारण तो मराठ्यांचे ताब्यांत नसून मुसलमान सुभ्याचे ताब्यांत होता. इतर लोकांबरोबर मुर्डीचे कृष्णाजी बापूजी पेंडसे व आंजर्ल्यांचे कृष्णाजी बल्लाळ पेंडसे दिवें येथें राहावयास गेले. हा गांव त्या काळीं तपे होता सबब मोठा असला पाहिजे. कृष्णाजी बापूजी हे मुर्डीचे महाजन होते. मुर्डीस कृष्णाजी बापूजीचे वडील शके १५७० चे सुमारास बसणीहून येऊन राहिले असें या वादांत भटातर्फे सांगण्यांत आलें आहे. कृष्णाजी बल्लाळ हे आंजर्ल्यांचे चार चौगुल्यांपैकीं एक होते.

स्वराज्य नांदत असतां, म्हणजे संभाजीचे वेळीं (मोंगलांनीं कोंकण जिंकण्यापूर्वी) कृष्णाजी बापूजी मुर्डीस राहात असतां त्यांची पत्नी (मुर्डीचे उपाध्ये विद्वांस यांची कन्या व राधाबाईची नणंद) निवर्तली. यांस पुत्रसंतान नव्हतें. दोन मुली होत्या. त्यांस आंजर्ल्यांचे उपाध्ये नित्सुरे यांजकडे पालग्रहणास ठेवून तो महायात्रेस गेला. तेथून परत आल्यावर एका मुलीचा विवाह केळशीचे रामाजी खरवळे (डोंगरे) यांजबरोबर केला, व आपण श्रीरामेश्वर यात्रेस गेला. परत येऊन पाहातो तों भालेराई होऊन गांव उध्वस्त झाला होता. म्हणून दिवे येथें जाऊन बिऱ्हाड करून राहिला. तेथें असतां उदराचे विकारानें कालवश झाला. मरणसमयीं पुत्रसंतान नसल्यामुळें आपला दायाज दहा दिवसाचा कृष्णाजी बल्लाळ यांस बोलावून सांगितलें कीं, माझी उत्तरक्रिया तुम्ही करून मला सद्गति मिळेल असें करणें व माझी मुर्डीची महाजनकी, शेतें व आगर वगैरे मिळकत घेणें. हें तोंडीं मृत्युपत्र त्यानें १ चिमणभट विद्वांस, उपाध्ये मुर्डी, २ रामाजी खरवळे केळशीकर जांवई, ३ दिवे येथील एक अधिकारी गणेशपंत, ४ भास्कर नाईक पेंडसे, केळशीकर (१–५), ५ नारुभट आंजर्लेकर, व ६ महादेवभट निजसुरे आंजर्लेकर, यांस साक्षीस ठेवून केलें. मृत्युसमयीं जांवई हयात होते व महाजनकी मागत होते. पण ती

त्यांस न देतां आपले दायाज यांस दिली. यावरून आपले कुळांतच मिळकत व मानपान राहावे असें पूर्वकालीं लोकांस वाटत असे हें निदर्शनास येतें.

कांहीं वर्षांनंतर स्थिरस्थावर होऊन कोंकणपट्टीचा हा भाग कान्होजी आंग्रे यांचे अमलाखालीं आला. त्या वेळीं पूर्वी परागंदा झालेले बरेच लोक आपआपले गांवीं परत आले. त्यांत कृष्णाजी बल्लाळ हाहि इ. स. १७१०–१७२० चे सुमारास आला व त्यानें सुवर्णदुर्गाहून कान्होजी आंग्रे यांची बायको सखुबाई हिजजवळून सनद घेऊन मुर्डीतील आपले आगरांत रोपे घालण्यास सुरुवात केली. तों आंजर्लीचे विसो हरी महाजन यांनीं ती सनद घेतली व लावणीस हरकत घेतली. त्यामुळें भांडण झालें. त्या भांडणांत कृष्णाजी बल्लाळचा भाऊ रामाजी नांवाचा होता त्यावर भटांकडून देवस्तान पडून तो पांच वर्षें आजारी पडला व त्यांतच मरण पावला. त्याची बायको त्याजबरोबर सती गेली. या आजारामुळें व राघो हरी भट वगैरे कांहीं लोकांचे मध्यस्थीनें हें भांडण कांहीं दिवस बंद होतें. देवाची आराधना करून त्यांजकरवीं शत्रूंचा नाश करणें यास देवस्तान घालणें वा देवस्तान पडणें असें म्हणतात. अशाच तऱ्हेनें आंजर्लीचे रामाजी वर्तक व विसो हरी भट महाजन यांची भुताटकीविषयीं मनसुबी होत होती व तें भांडण बरेच दिवस चालत होतें, असा उल्लेख बाळाजी कृष्ण पेंडसे यानें या महाजनकीचे वादांत आपले बाजनें केला आहे. यावरून अशा तऱ्हेनें देवस्तान पडण्याची कल्पना त्या काळीं ब्राह्मण वर्गांतहि सामान्य रीत्या रूढ होती, असें मानण्यास हरकत नाहीं.

पुढें तुळाजी आंग्रे यास इ. स. १७४५ मध्यें सरखेली झाली त्या वेळेस देहझाडे* (गांवझाडे) होऊं लागले. त्या वेळेस मुर्डीतील पेंडसे यांचें ठिकाण आंजर्लीचे भट महाजन सालबादेवीचे नांवानें कागदोपत्रीं लावूं लागले, व मुर्डी हें गांव स्वतंत्र नसून आंजर्लें याचा तो वाडा आहे व आपण सर्व गांवचे महाजन आहों असें म्हणूं लागले. त्यामुळें पुन्हां भांडणास इ. स. १७५१–५२ मध्यें सुरुवात झाली. या वेळीं कृष्णाजी बल्लाळ हयात नव्हता असें दिसतें. कारण वादांत त्याचा मुलगा बाळाजी कृष्ण याचें नांव आढळतें.

तुळाजी आंग्रे यांचेकडे मनसुबी पडली असतां उभयपक्षाचे साक्षीदारांस सुवर्णदुर्गीं (हर्णै बंदर) चे अधिकाऱ्यानें श्रीकमलेश्वर देवालयांत बोलावून लेखी तकरीरा लिहून घेतल्या व त्या विजयदुर्गास तुळाजी आंग्रे यांजकडे पाठविल्या. तेथें तो साक्षीपुरावा पाहण्यास पंचाईत व त्या प्रांतींचे वतनदार बसवून न्याय झाला. भट खोटे ठरून त्यांजकडून पेंडसे यांस अजितपत्र करून दिलें (ऐ. प्र. क्रमांक १ पहा). ही गोष्ट शक १६७५ श्रीमुख संवत्सरीं म्हणजे इ. स. १७५३ मध्यें घडली. त्या वेळीं विजयदुर्ग हें आंग्रे यांचें मुख्य ठाणें होतें. (कान्होजी आंग्रे यांनीं सन १६६२ मध्यें सुवर्णदुर्गास इमारती करून कुलाब्यास सन १६९८ मध्यें राहावयास गेले व इ. स. १७२८–२९ मध्यें वारले.)

* गांवांतील मिळकतीची चौकशी करून यादी करणें.

या वादांत बाळाजी कृष्ण यानें दिलेला करीना ऐ. प्र. क्रमांक ३ मध्यें दिला आहे.

शक १६७६ मध्यें नानासाहेब पेशवे यांनीं आंग्रे यांजकडून सुवर्णदुर्ग किल्ला घेतला. या परिस्थितीचा फायदा भट यांनीं घेऊन पेशवे यांजकडे तक्रार केली कीं तुळाजी आंग्रे यांनीं मनसुबी जबरदस्तीनें करून आपणांस अन्याय केला. त्यामुळें पुनरपि वादास तोंड लागलें व भटांनीं धटाईनें पेंडसे यांचे वहिवाटीस हरकत केली. अखेर वादी प्रतिवादी पुण्यास जाऊन तेथें करार झाला कीं श्रीदेव केळशी येथें साक्षी घ्याव्या. हुजूरहून या कामाकरितां कारकून सखो केशव यांस साक्षी-पुरावा गोळा करण्यास पाठविलें. त्याबरोबर सुवर्णदुर्ग येथील कारकून पांडुरंग अनंत हा केळशीस गेला. तेथें साक्षीदारांस बोलावून श्रीबेलेश्वराच्या देवळांत सड्या घेतल्या. मुसलमान साक्षीदारांस हजरतसाहेबाचे दरग्यांत नेलें होतें. साक्षीदारांची यादी उपलब्ध झाली आहे त्यावरून त्या वेळीं कोण कोण साक्षीस आले होते व आसपासचे गांवांत प्रमुख कोण होते हें समजतें. हे सर्व कागदपत्र भवानजी जासुदाबरोबर पेशवे यांजकडे सुवर्णदुर्गचे रामाजी महादेव यांनीं पाठविले (ऐ. प्र. क्रमांक ५). दरम्यान मुर्डी गांव सरकारांत जप्त होता. पुण्यास आलेले कागदपत्रांतील पुरावा पाहून मुर्डी हा गांव स्वतंत्र असून आंजर्ले याचा वाडा नव्हे, असा पेंडसे यांचे तर्फेचा निकाल पेशवाईंतील पुण्याचे सुप्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री बाबा प्रभुणे यांनीं शक १६९७ मन्मथनामसंवत्सरीं दिला. तोहि निकाल भट धटाईनें मानीतना. म्हणून गाडदी पाठवून गणेश रघुनाथ, बाबाजी रघुनाथ, व नारो रघुनाथ भट यांस हुजूर येण्यास आज्ञा केली व मसाला रु. ५० देवविले (ऐ. प्र. क्रमांक १४). तेव्हां हा ५०–६० वर्षे चाललेला वाद एकदांचा मिटला, असें दिसतें. या वतनाचे वादाचे पायीं पेंडसे यांस बराच खर्च झाला व त्यामुळें त्यांस बरेंच कर्ज झालें. शक १७२४ मध्यें झालेलें वांटपपत्र पुढें छापलें आहे त्यांत अडीच हजार रुपये कर्ज असल्याचा उल्लेख आहे.

भट हे आंजर्ल्यास कसे आले हें या ठिकाणीं सांगितल्यास अप्रस्तुत होणार नाहीं. शिवरायानें आंजर्ल्यानजीकचा समुद्रकिनारा जिंकून तो ताब्यांत घेण्यापूर्वी विजापूरकरांतर्फे या भागांत शिरके व्यवस्था पाहात असत. शिरके यांनीं आपले उपाध्ये म्हणून भटांस केतकीहून आंजर्ल्यास आणिलें व ग्रामस्थ मंडळीस विनंति करून त्यांस गांवांतील सहावा मान देवविला. महाजन, वर्तक, धर्माधिकारी, जोशी व उपाध्ये हे पंचमाने (पांच मानकरी) होत. दातीर हे आंजर्ल्याचे महाजन होते. शिरके यास शिवाजी महाराजांनीं मोडून काढल्यावर व दातीर परगांवीं गेल्यावर भट आपणांस महाजन म्हणवूं लागले.

वणोशी (तर्फ पंचनदी) गांवचें महाजनकीचें वतन पेंडसे यांचें होतें. तथापि भालेराईमुळें मुर्डीप्रमाणेंच त्या गांवाबद्दलहि वाद उत्पन्न झाला होता. अखेर पेंडसे

यांचे बाजूचा निकाल झाला (ऐ. प्र. क्रमांक १५). वारंवार होणाऱ्या राज्यक्रांतीमुळें कोंकणपट्टीचे वस्तीस कसा दुःसह त्रास होत होता हेंहि यावरून समजतें.

श्री

वांटपपत्र

वांटपपत्र खासगत राजश्री नारो माहादेव व कृष्णाजी गोविंद पेंडसे महाजन मौजे मुर्डी व चौगुले कसबे आंजर्ले तर्फ केलसी तालुके सुवर्णदुर्ग सुाा सलास मयातैन व अलफ शके १७२४ दुंदुभी नाम सवछरे कार्तीक वद्य १३ त्रयोदशी ते दिवसी केले वांटपपत्र ऐसी जे उभयता आजपर्यंत येकत्र होतो त्यास हाली उभयताचे मते विभक्त होऊन वांटण्या करून घ्याव्या असें ठरलें. त्याजवरून आपले वतनी आगर व सेते जमीनी व वरकस वगैरे बी तपसील अदमासें जमीन.

मौजे मुर्डी येथील आगर ठिकाणे व भातसेत व खारी व वरकस वगैरे जमीनी अदमासे जमीन बिघे

२ आगर बागाईत ठिकाणे अजमासे जमीन बिघे

१ घरवाडी पुरातन ठिकाणे

१ नारो माहादेव याजकडे पूर्वेकडील वाटणी. निमे

१ कृष्णाजी गोविंद याजकडे पच्यमेकडील वाटणी. निमे

२

ठिकाणे दोन. याच्या पुरातन विहिरी दोन जुन्या होत्या. त्या कोसलल्या सबब पच्यमेकडील वाटणीत चिरेबंदी विहीर बांधली आहे व पूर्वेकडील वाटणीत चिरेबंदी घरटा बांधिला आहे. त्यास पूर्वेकडील वाटणीत चिरेबंदी विहीर बांधावयाची आहे व पच्यमेकडील वाटणीत चिरेबंदी घरटा बांधावयाचा आहे. त्यास पूर्वेकडील वाटणीत विहीर बांधिते समई निमेनिम ऐवज लागेल तो उभयतानी लाऊन बांधावी व पच्यमेकडील वाटणीत घरटा बांधावयाचा तो उभयतानी रुपये निमेनिम लाऊन बांधावा. सदरहू घरटा व विहिरीचे मोकाबल्याप्रमाणें इमला करावा.

१ ठिकाण बागजमीन अजमासे ८१।। यासी वाटणी निमेनीम

१ दक्षणेकडील वाटणी नारो माहादेव याजकडे
जमीन अजमासे ८।।।-

१ उत्तरेकडील वाटणी कृष्णाजी गोविंद याजकडे
जमीन अजमासे बिघे ८।।।-

२

ठिकाण येक याच्या वाटण्या दोन निमेनिमप्रमाणें यास विहीर पुरातन येक आहे. तिचे पाणी पुरत नाहीं व कोसलली आहे. सबब नवी चिरेबंदी विहीर

बांधावयाची आहे त्यास बांधत्या समई रुपये लागतील ते निमेनिमप्रमाणें लाऊन दोन्ही वाटण्याचे मध्ये जमिनीत बांधावी

२ येकूण कलम

१ सेत जमीन अजमासे बिघे

१ सेत नई सेत पाटचा दोन
९ पाटचा भार
९ चोंढे
चोंढे सहा
१ सेत चौखंडा चोंढे दोन
१ सेत दुरे चोंढे दोन
१ सेत नई सेत चोंढे दोन
१ सेत चोंढे ७
१ सेत भुतवाडी बुा चोंढे
१ सेत भुतवाडी खुर्द चोंढे
१ सेत खेत्रुपाल चोंढे दोन
१ सेत मुलवस चोंढे तीन
१ सेत चाभार चोंढे दोन
१ सेत आंबसेत.........जमीन अजमासे
बिघे चोंढे
१ सेत पाहाल नजीक आंबसेत चोंढे ५
१ सेत पाणताबा चोंढे चार
१ सेत बोरसेत चोंढे दोन

१ सेत कुडेटी
१ सेत बांधलेवाडाजवळील
१ सेत कातल कुडईजवळ चोंढे नवे २
१ गौलवाडचावरील चोंढें नवे २
१ सेत गवणावरील एकंदर चोंढे ९
१ आटसाजवळची कुडई
५ कुडेटी पांच
१ सेत खारी जमिनी
१ नदी जवळची खार
१ घरवाडीचें दक्षणेकडील खार
१ बोरशेताजवळील खार
३ खारी तीन

१६ सेते व कुडेटी व खारी मिलोन सदरे सोला यासी वाटण्या दोन जमीन सरस निरस उभयतानी निमेनिम वाटून घ्याव्या कलम

१ कुडदली व वरकसी जमीनी व गवताच्या वगैरे आहेत त्या निमेनिमप्रमाणें सरस निरस उभयतानी वाटून घ्याव्या कलम

४ च्यार कलमे सदरी लिहिल्याप्रमाणें उभयतानी चालावे येणेंप्रमाणें करार.

कसबे आजर्ले येथील आगर ठिकाणे व भातसेते व वरकसी जमीनी व गवताच्या वगैरे जमीनी अजमासे बिघे

२ वागायत आगर जमीनी ठिकाणे दोन जमीन अजमासे
१ घरवाडी जमीन अजमासे बिघे ८≈। यासी वाटणी निमेनिमप्रमाणें
१ नारो माहादेव याजकडेस दक्षणेकडील वाटणी निमे जमीन अजमासे ८१८२॥ येकण येक बिघा अडीच पांड

१ कृष्णाजी गोविंद याजकडेस उत्तरेकडील वाटणी निमे जमीन अजमासे बिघे ०१०२॥ येक बिघा अडीच पांड
२ ०=।

ठिकाण येक याच्या वाटण्या हाली दोन केल्या. याची विहीर पुरातन उत्तरेकडील वाटणीत आहे ती कोसलली आहे. त्यास चिरेबंदी बांधावयाची त्यासी विहीर बांधावयासी खर्च लागेल तो उभयतानी करून दोन्ही वाटण्याचे मध्ये निमेनिम जमीनीत बांधावी व दक्षणेकडील वाटणीस चिरेबंदी घरटा व घराचा इमला आहे तो नारो माहादेव याजकडे वाटणीत राहिला. सबब कृष्णाजी गोविंद उत्तरेकडील वाटणींत घर बांधो लागतील त्या वेळेस सदरहू इमल्याप्रमाणें मशारनिल्हेस निमे ऐवज नारो माहादेव याणी द्यावा. कलम.

१ ठिकाण आगर नजीक तरीबंदर जमीन अजमासे पांड ९ नऊ यासी वाटणी निमेनिमप्रमाणें

१ दक्षिणेकडील वाटणी नारो माहादेव याजकडेस जमीन अजमासे पांड ००४॥

१ उत्तरेकडील वाटणी कृष्णाजी गोविंद याजकडेस जमीन अजमासे पांड ००४॥

२ ०।४

१ ठिकाण येक जमीन पांड अजमासे नऊ कलम

२

१ सेतजमीनी सावणे येथील जमीन अजमासे बिघे

१ सेत बाकाली जमीन अजमासे बिघे ०२। यकूण बिघे सवादोन यासी वाटणी सरसनिरस निमेनिम

१ नारो माहादेव याजकडेस येक बिघा अडीच पांड ०१०२॥

१ कृष्णाजी गोविंद याजकडेस येक बिघा अडीच पांड ०१०२॥

२ सवादोन बिघे जमीन ०२।.

१ सेत काबडेपाल जमीन अजमासे बिघे ०२०१

यांसी वाटणी सरसनिरस निमेनिमप्रमाणें

१ नारो माहादेव याजकडेस ०१०॥.

१ कृष्णाजी गोविंद याजकडेस ०१०॥.

२ ०२०१

१ सेत कुडेटे जमीन ०३ खजुरीवरील यासी वाटणी सरसनिरस निमेनिमप्रमाणें बरोबर.

१ सेत पाडावयाची जमीन कोलगे याचे वडाजवल गवताचे लागातील आपली आहे ती निमेनिम वाटून घ्यावी.

४ च्यार कलमे सेतजमीनीची लिहिली आहेत. त्याप्रमाणें उभयतानी

सरसनिरस वाटून निमेनिमप्रमाणें घ्यावी. कलम

१ वरकसी जमीनी गवताचे लागाच्या अजमासे विघे

१ नीगुड बावी

१ गडग्यातील सर्व पाडल्याचे सीमेजवल

२ कुंभारखाणीतील

१ कोबड-पालाचे सेतावरील दोन्हीकडील जमीन

१ शलहासनाची सर्व

६

सर्व सायाची जमीन आहे ती सरसनिरस निमेनिमप्रमाणें वाटन घ्यावी.

४ मौजे मुर्डी

४ कसबे आंजर्ले

८

१ वतन समंधे हरयेक जाबसाल वगैरे खर्चवेच लागेल तो उभयताचा निमेनिमप्रमाणें

९

कलमे नऊ सदरी लिहिलेप्रमाणें उभयतानी चालावे. पुढें कोणेविसी परस्परे तंटा राहिला नाहीं. सदरहू लिहिल्याप्रमाणें मान्य नारो माहादेव पेंडसे माहाजन मौजे मुर्डी व चौगुले कसबे आंजर्ले हस्ताक्षर खुद. सदरहू लिहिल्याप्रमाणें मान्य कृष्णाजी गोविंद पेंडसे माहाजन मौजे मुर्डी व चौगुले कसबे आंजर्ले हस्ताक्षर अंताजी गोविंद पेंडसे

साक्ष

लिा प्रमाणें उभयता धणी समक्ष कृष्णाजी नारायण सिंत्रे खोत मौजे सुकोंडी व कोंगळे तर्फ केळशी ताो सुवर्णदुर्ग १

लिा प्रमाणें उभयताचे समक्ष साक्ष केसो बलाळ गोखले माहाजन वेळणेश्वर ताो अंजनवेल हाली सुखवस्तु आंजर्ले १

पत्राप्रमाणें साक्ष चिंतामण सेट आंजर्लेकर पोतदार सोनार १

लिहिल्याप्रमाणें साक्ष बहिरव जोसी कृष्णं जोसी वेळास्कर कसबे आंजर्ले तर्फ केळशी

श्री

यादी खासगत राजश्री नारो माहादेव व कृष्णाजी गोविंद पेंडसे माहाजन मौजे मुर्डी व चौगुले कसबे आंजर्ले ताा केलसी ताो सुवर्णदुर्ग सुरू सन मयातैन व अलफ शके १७२४ दुंदुभी नाम सवछरे मार्गसीर्ष शुाा १३ ते दिवसी केले.

वांटपपत्र ऐसीजे. आपण विभक्त जालो त्यास लोकाचे कर्ज देणे आहे त्याची नावनिसी.

किता

५० सदाशिव विश्वनाथ काणे
२३० रामचंद्रपंत सोमण मुरूडकर
२५ नारंभटीण वैदीण
२५ धोंडो केशव साठचे आंजर्लेकर
५० रामचंद्रपंत काणे वाा मुर्डी
७५ मोरो लक्ष्मण राहालकर
वाा मुर्डी
१०० गोपाल केशव विध्वांस

५५५

गाव समंधे खर्चास वगैरे गुा
अंताजी गोविंद
३० सर सुभा विनायकपंत गोडबोले
१४६ किता अंताजी गोविंद व
नारो महादेव

१७६

७५रुा किता गुा कृष्णाजी माहादेव
कोलटकर वाा आंजर्ले

किता

५० चिमणाजी हरी वायंगणकर
हाली पुरेखत ७५ रु.
३३४ गंगाधरभट बापट वाा आंजर्ले
१२९ पहिले
८० नवे सेत
१२५ नवे सेत

३३४

३८४

पेशजी माहादाजी बलाळ याचे गुजार-
तीचे माा चे हातची खते आहेत ते
वगैरे रुा
३६९ द्वारकाबाई जोसीण खत नसे
३२५ दादो शंकर भागवत खत आठसे
३०० विसाजी हरी बाम माहाजन
कोलथरेकर
३०० बच्याजीपंत भानू माहाजन
काा वेळास

१२९४

रुा
५५५ किता
३८४ किता
१२९४ किता
१७६ किता
७५ किता

२४८४

पौो वजा पेशजीचे देणेदार आहेत त्याची खते असतील त्यातील पावती वजा होऊन बाकी देणे निघतील ते त्याणी फडशा करून मागितल्यास अथवा आपल्यास अैवज मिलाल्यास त्याचा फडशा नारो माहादेव व कृष्णाजी गोविंद यानी करून माहादाजी बलाळ याचे हातची व नावची खते आहेत ती काढून आणावीत.
रुा

५ पें. कु. वृ.

३२५ दादो शंकर भागवत खत रुो ८०० पौो पावती होऊन बाकी रुो
३०० विसाजी हरी बाम कोलथरेकर खत पैाा पावती वजा होऊन बाकी देणे निघतील ते रुो
३०० बचाजीपंत भानू यांस खत तीनसे याचे अरुणचे मुकामी माहादाजी बलाळ याणी लिहून दिल्हे आहे त्यास अरुणाहून बाबाजी बलाळ साठचे यांचा ऐवज आम्ही देणे होता त्याचे रद कर्जास अरुणाहून माहादाजी बलाळ याणी हुंडी दोनसे रुो याची......ची पाठविली ते बचाजीपंत भानू नारो चिमणाजी याचे बंधु याणी हुंडीबाबत साठचे यास रुो न देता रद कर्जास आपले घेतले ते रुो २०० दोनसे बाकी देणे निघतील त्याचा फडशा व्हावयाचा रुो

९२५

यासी वाटणी तीन हिसे

३०८। नारो माहादेव याणी फडशा करावा रुो
६१६।।। कृष्णाजी गोविंद याणी फडशा करावा रुो

९२५

बाकी तूर्त देणे १५५९ रुो यासी वाटणी

नारो माहादेव पेंडसे माहाजन याजकडे वाटणी हिसा येक ५१९।।। रुो पैकी वजा मशारनिल्हे लहान सबब कृष्णाजी गोविंद व अंताजी गोविंद याणी वाटणी प्रमाणें फडशा करावयाचे कबूल केले ते माानिल्हेचे वाटणीकडे जमेस आहेत ते रुो ५० बाकी नारो माहादेव याणी फडशा करावा रुो ४६९।।।

च्यारसे पावणेसत्तर रुो माार निल्हेनी कर्जाचा व्याजसुद्धा फडशा करावा येणेंप्रमाणें करार कलम १

कृष्णाजी गोविंद व अंताजी गोविंद याजकडे हिसे दोन १०३९। रुो ऐन वाटणी दोन हिस्से ५० चिरंजीव नारो माहादेव लहान सबब त्याचे वाटणीपैकी वारावयाचे करार केले ते १०८९।. दाहाशे सव्वायेकूणनंवद रुपये माार निल्हेनी हिशेब व्याजसुद्धा कर्जाचा फडशा करावा येणें प्रमाणे करार कलम १

चौवीसे चवऱ्यासी रुपये ऐन देणे त्याजपैकीं तूर्त तहकूब सवानउसे रुपये ठेविले आहेत त्याचे फडशा समई वाटण्या सदरी लिहिल्या आहेत त्याप्रमाणें फडशा करावा बाकी फडशा करावयाचा पंधराशे येकुणसाठ रुो याच्या वाटण्या बाजूस लिहिल्या आहेत त्याप्रमाणें फडशा करावा येणेंप्रमाणें करार कलम १

लोकाकडे आपले कर्ज येणें त्यास माहादाजी बलाळ व कृष्णाजी गोविंद याचे कारकीर्दीतील माहादाजी बलाळ मृत्यु पावले त्या शकापर्यंत मागील येणें असेल तें नारो माहादेव व कृष्णाजी गोविंद याणी यथाविभागे वाटून घ्यावे. कलम २

कलमे दोन सदरी लिहिल्याप्रमाणें उभयतानी चालावे. गुरे व हंडे भांडे कापड वस्तवानी वगैरे उभयतांनी वाटून समजोन घेतले असे. पुढे तंटा राहिला नाहीं. सदरहू लिहिल्याप्रमाणें मान्य नारो माहादेव पेंडसे महाजन मौजे मुर्डी व चौगुले काा आंजर्ले हस्ताक्षर खुद. सदरहू लिहिल्याप्रमाणें कृष्णाजी गोंविद पेंडसे माहाजन मौजे मुर्डी व चौगुले कसबे आंजर्ले मान्य हस्ताक्षर राघो कृष्ण पेंडसे खुद.

साक्ष

सा। प्रा। उभयेता धणी समक्ष साक्ष कृष्णाजी नारायेण सित्रे खोत मौजे सुकोंडी व कोंगले ता। केलसी ताा सुवर्णदुर्ग १

लिहिल्याप्रमाणें उभयताचे समक्ष साक्ष उभाघरचे घरी पुढील दारचे ओसरीवर केसो बलाल गोखले माहाजन वेलणेश्वर ता। अंजणवेल १

लिहिल्याप्रमाणें साक्ष बहिरव जोशी कृष्णं जोशी वेलास्कर कसबे आंजर्लें तरफ केळशी.

चिरंजीव राजश्री नारो महादेव पेंडसे माहाजन मौजे मुर्डी यासीप्रती कृष्णाजी गोंविद पेंडसे माहाजन मौजे मुर्डी अनेक आशिर्वाद उपरी. तुमची व आमची विभक्तपणाची शके १७२४ दुंदुभी नाम संवत्सरे कार्तिक वद्य १३ त्रयोदशी ते दिवशीं फारखत जाहाली. उभयतांचे मते कर्जाच्या वगैरे वाटण्या करून घेतल्या त्यांत लोकाचे देणे आहे. त्यापैकी तूर्त फडशा करावयाचा ठराव झाला आहे त्यांत तुमचे वांटणीस कर्ज रुपये ४६९।।।· एकूण च्यारशे पावणेसत्तर रुपयांचा फडशा तुम्ही सावकाराचा करावात त्यास तुमचे व आमचे मते व्याजाची तोड करून रुपये घेतले येणेप्रमाणें बी।। रुा

४६९।।।. मुद्दल
१९५ गाहाणवट वगैरे रुा ५८५
२७४।।।. व्याजी कर्जाऊ
४६९।।।.
१६६। व्याज उक्ते
६३६

येकूण व्याज व मुद्दल मिळोन सहाशे छत्तीस रुपये तुम्हापासून घेतले असत सावकाराचा फडशा करणे तो आम्ही परभारा करू येविसीचा तुम्हाकडे लढा राहिला नाहीं. मिति ज्येष्ठ शुा। २ शके १७२७ क्रोधनाम संवछरे बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद हस्ताक्षर पांडुरंग बाळकृष्ण पेंडसे माहाजन मौजे मुर्डी.

साक्ष

लिहिले प्रमाणे उभयता समक्ष साक्ष केसो वामन गोखले वेळणेश्वर तालुके आंजनवेल १

लिहिले प्रमाणें साक्ष बहिरव जोसी कृष्ण जोसी वेलासकर कसबे अंजरले तर्फ केळशी १



श्रीभावेश्वरी (भावाई-भावे) : कोचरें, ता. वेंगुर्लें, जि. रत्नागिरी

श्रीभावै देवी ही कोचरें गांवची ग्रामदेवता आहे. हें गांव वेंगुर्ल्यापासून ८–१० मैलांवर आहे. सावंतवाडीहून अगर वेंगुर्ल्याहून कुडाळमार्गें मोटारनें कोचऱ्यास जातां येतें. देवी कमळावर बसलेली असून दोन बाजूस दोन हत्ती आहेत. त्यांच्या सोंडेंत जलपूर्ण कुंभ आहेत. अशा मूर्तीस श्री अथवा गजलक्ष्मी किंवा गजगौरीहि म्हणतात. खालच्या बाजूस ११ उपासक असून ते नृत्यवादनादि करीत आहेत. देवीजवळ दोन्ही बाजूंस एकेक भक्त बसलेला आहे. खोदीव काम चांगलें आहे. मूर्ति बहुधा मुसलमान पूर्वकालीन असावी.

पेंडसे यांचे क्षेत्रोपाध्ये

त्र्यंबक—१. वे. शा. सं. **वासुदेव वामनभट पाटणकर**, घ. नं. ५१, परशुराम मंदिराजवळ. २. वे. शा. सं. **त्र्यंबकभट वामन फडके**. ३. वे. शा. सं. **गजाननभट घैसास**. ४. वे. शा. सं. **धोंडभट रामचंद्र फडके**. ५. वे. शा. सं. **कृष्णाजी चिंतामणि अग्निहोत्री**.

नाशिक—१. वे. शा. सं. **अंबादास बाबूराव पाराशरे**, गंगामंदिर घ. नं. ४४५८, पंचवटी. २. वे. शा. सं. **बाबाभट काळे**, कृष्णमंदिर. ३. वे. शा. सं. **वामनभट अनंत दाते**, कारंज्याजवळ, रविवार पेठ.

काशी—१. वे. शा. सं. **धुंडिराज बाळकृष्ण ऊर्फ बाबूभटजी देव**, घ. नं. $\frac{३२}{१०}$ हत्तीगल्ली, ब्रह्माघाट. २. वे. शा. सं. **सीताराम गोपाळ दीक्षित चितळे**, चितळे गल्ली, घर नं. जुना $\frac{३}{७}$०, नवा $\frac{२१}{७}$ ब्रह्माघाट.

डाकोर—१. वे. शा. सं. **सोमेश्वर बापालाल अध्वर्यु**, म्युनिसिपल ऑफिसजवळ. २. वे. शा. सं. **हरीहरभाई**.

प्रकरण ६ वें

वंशावळी

पेंडसे कुलांतील ३१ घराण्यांची माहिती मिळाली आहे. त्यांत ३० विद्यमान व १ अविद्यमान आहे. या घराण्यांना खुणेसाठीं पूर्वजांच्या राहण्याच्या ठिकाणांवरून नांवें दिलीं आहेत. एकापेक्षां अधिक घराण्यांचें एकच ठिकाण आढळलें त्या ठिकाणीं सध्यांचें वास्तव्याचें ठिकाण भेद दाखविण्यासाठीं जोडलें आहे. उदा. गोळप–पुणें; गोळप–धामापूर. वंशावळीचा क्रम पिढ्या व व्यक्ति किंवा छपाईच्या सोयीप्रमाणें लाविला नाहीं. मूळ वास्तव्याचे स्थानांवरून जीं घराणीं एकमेकांशीं संबंधित असण्याचा संभव आहे तीं जवळ यावींत म्हणून त्यांचा क्रम एकापुढें एक

लाविला आहे. म्हणजे गोळप मूळगांव सांगणारीं पांच घराणीं क्रमांक १ ते ५ मध्यें देऊन नंतर केळशीचीं पांच घराणीं दिलीं आहेत.

(१) मोठी वंशावळ मांडतांना, डावें व उजवें पृष्ठ मिळून एक भाग कल्पिला असून, अशा एका किंवा अनेक भागांमध्यें ती वंशावळ दिली आहे.

(२) पिढ्यांचे आंकडे मोठ्या वंशावळींत दोहों बाजूस व लहान वंशावळींत फक्त डाव्या बाजूस घातले आहेत.

(३) जी वंशावळ अनेक भागांत मांडावी लागली, तिच्या पहिल्या भागांत आरंभींच्या सर्व पिढ्या एकदां दिल्या असून पुढील भागांत अवश्य असलेल्या पिढीपासून आरंभ केला आहे.

(४) वंशविस्तार वरून खालीं अशा क्रमानें दिला आहे.

(५) वंशविस्तार थोड्या जागेंत राहून तो सहज आकलन व्हावा म्हणून कांहीं ठिकाणीं बंधूंचीं नांवें एकाखालीं एक लिहिलीं आहेत. अशा ठिकाणीं फक्त वरचे नांवास पिता–पुत्र–संबंध दाखविणारी उभी रेघ जोडली आहे व हाच संबंध त्या पिढींतील खालच्या नांवांशींहि आहे असें समजावें. तसेंच पुढील पिढींतील नांवांचा संबंध फक्त खालचे नांवांशींच आहे असें समजावें.

(६) बंधूंचीं नांवें प्रथम देतांना तीं सर्व एकत्र दिलीं आहेत. ज्येष्ठ बंधूंचें नांव प्रथम व नंतर क्रमानें इतर बंधूंचीं नांवें दिलीं आहेत.

(७) ज्येष्ठ बंधूचा वंशविस्तार प्रथम पूर्ण करून नंतर कनिष्ठ बंधूचा विस्तार दिला आहे.

(८) कांहीं नांवें कोणाशीं न जोडतां वंशावळींत दाखविलीं आहेत. कारण त्या नांवाचे व्यक्तीचा पिता–पुत्र–संबंध समजला नाहीं. फक्त त्या नांवाच्या व्यक्ति त्या पिढींत होत्या इतकेंच ज्ञात आहे.

(९) व्यक्ति असून तिचें नांव कळलें नाहीं अशा ठिकाणीं |____| ही खूण दिली आहे.

(१०) जिवंत व्यक्तीच्या नांवाजवळ उजव्या बाजूस * ही खूण केली आहे. दत्तक गेलेली व्यक्ति जनकगृहीं अविद्यमान मानली असून जिवंत असल्याची खूण केली नाहीं.


(११) एकाच पृष्ठांत अनेक वंशावळी असतील तेथें त्यांच्यामध्यें सीमादर्शक आडवी अगर उभी दुरेघी घातली आहे.

(१२) एकाच पिढींत एकच व्यक्ति असलेल्या आरंभींच्या कांहीं पिढ्या पहिल्या एका ओळींत उजवीकडून डावीकडे अशा क्रमानें मांडल्या आहेत.

(१३) विद्यमान व्यक्तींचें राहण्याचें ठिकाण खालचे बाजूस दिलें आहे. हीं ठिकाणें वरून खालीं अशा क्रमानें मांडलीं आहेत. अनेक व्यक्तींच्या खालीं गांवाचें नांव एकच असल्यास त्या सर्वांचें तेंच ठिकाण आहे असें समजावें. कांहीं व्यक्तींचें निश्चित ठिकाण समजलें नाहीं तेथें नुसती – रेघ दिली आहे.

[घराणें १ लें, गोळप—पुणें—रामपूर पृ. ७१ ते ७३]

(माहिती पृ. १५०–१५६)



[घराणें १ लें, गोळप—पुणें—

३ नारायण (मागें पृ. ७१)

४ बळवंत

५ रामचंद्र

६ जगन्नाथ विष्णु नारायण

७ गोविंद रामचंद्र विनायक सदाशिव हरी

८ नारायण यशवंत विष्णु शंकर गोपाळ महादेव केशव*
कृष्ण दिगंबर* जगन्नाथ*
लक्ष्मण

९ भगवान* पंढरीनाथ* श्रीनिवास* पुरुषोत्तम* गणेश* वासुदेव*
माधव* नारायण*
गंगाधर*

१० अच्युत* भालचंद्र* प्रभाकर*
वसंत* शरच्चंद्र*

मुंबई	उमरावती	उमरावती	नागपूर	नागपूर	नागपूर	नागपूर
उमरावती	उमरावती	नागपूर	पुणें		यवतमाळ	नागपूर
उमरावती	उमरावती				यवतमाळ	नागपूर

रामपूर पृ. ७१ ते ७३]

३

४

५

लक्ष्मण ६

गंगाधर रामकृष्ण ७

वामन* त्र्यंबक विठ्ठल वैजनाथ* सखाराम* ८
विश्वंभर


दामोदर* दत्तात्रेय* प्रभाकर* मनोहर* जनार्दन* ९
रामचंद्र* भास्कर* लक्ष्मण* श्रीराम*

१०

नागपूर —— उमरावती अकोला उमरावती
नागपूर उमरावती उमरावती अकोला उमरावती
अकोला उमरावती

[घराणें २ रें, गोळप—

(माहिती



धामापूर पृ. ७४ ते ७७]

पृ.१५६–१६८)

२


मागाहून आलेली माहिती
वासुदेव केशव (७) चे आणखी पुत्रः–
१ हरी, २ विष्णु

३


४

५


६



[घराणें २ रें, गोळप—


७ बापूजी (मागें पृ. ७४)
८ मोरो विठ्ठल रामचंद्र
९ दामोदर राजाराम
१० जगन्नाथ बाळकृष्ण गोपाळ* बापूजी जनार्दन* केशव* दामोदर*
११ सदाशिव चिंतामणि* महादेव* कृष्ण* दत्तात्रेय श्रीराम* अच्युत* श्रीकृष्ण*
विश्वनाथ*
पुरुषोत्तम* नारायण* गोविंद*
परशुराम* वासुदेव*
जयराम*
१२ दामोदर* वसंत*
बुरंबाड मुंबई महाड मुंबई मुंबई धामापूर नांदिवडें धामापूर
खालापूर माखजन नांदिवडें धामापूर
काशी धामापूर नांदिवडें
महाड धामापूर नांदिवडें
धामापूर

धामापूर पृ. ७४ ते ७७]


७
नारायण
पांडुरंग
८
जनार्दन
९
धोंडो
कृष्ण
१०
नारायण रामचंद्र*
हरी*
लक्ष्मण*
विनायक*
वासुदेव*
११
पद्माकर*
दिगंबर*
प्रभाकर*
हनुमान*
भालचंद्र*
वसंत*
यशवंत*
रघुनाथ*
१२
यवतमाळ ठाणें
ठाणें ठाणें
यवतमाळ ठाणें
ठाणें ठाणें
ठाणें
ठाणें ठाणें
ठाणें
ठाणें

[घराणें ३ रें, गोळप—

(माहिती

३ नारायण—२ हरी—१ कृष्ण

४ गणेश बाळाजी

५ महादेव नारायण (पुढें पृ. ८२)

६ {सदाशिव त्र्यंबक} केशव

७ मोरेश्वर विश्वनाथ गोविंद वासुदेव (पुढें पृ.८०)

८ गोपाळ लक्ष्मण मुकुंद हरी

९ सखाराम कृष्ण* गोविंद सीताराम विश्वनाथ दत्तात्रेय*

१० {गजानन शिवराम* परशुराम* विष्णु नरहरी काशीनाथ* रघुनाथ पुरुषोत्तम*

११ {अच्युत* धुंडीराज* त्र्यंबक* रामचंद्र* यशवंत* नीळकंठ* काशीनाथ
विश्वनाथ* मोरेश्वर* पुरुषोत्तम*
गोपाळ*

२ सीताराम* मुकुंद* विश्वनाथ* प्रभाकर* पांडुरंग*

गोरेगांव गोरेगांव गोरेगांव रेवदंडा रेवदंडा पुणें पुणें यवतमाळ
गोरेगांव रेवदंडा रेवदंडा पुणें पुणें यवतमाळ
गोरेगांव रेवदंडा रेवदंडा पुणें
गोरेगांव पुणें पुणें

चौल—श्रीवर्धन पृ. ७८ ते ८२]

पृ. १६८–१८१)　　३

४

हरिभट　　५

बचाजी　रामचंद्र (पुढें पृ. ८०)　महादेव साबाजी　गणेश आबाजी　रघुनाथ　६

विनायक　गोपाळ　नारायण　७

काशीनाथ　रामकृष्ण　विष्णु　महादेव　८

गणेश*　देवीदास*　केशव　मोरेश्वर　गणेश　९

विश्वनाथ* मधुकर*　वसंत* गोपाळ*　नरहरी*　रामचंद्र* श्रीकृष्ण*　अनंत श्रीपाद*　नीलकंठ*　दामोदर* दत्तात्रेय*　१०

भालचंद्र* वसंत* शरच्चंद्र*　विजय*　११

रघुनाथ*　गोविंद*　१२

यवतमाळ　यवतमाळ　यवतमाळ　जबलपूर　नागपूर　इंदूर　नागपूर
अलीपूर　यवतमाळ　नागपूर　नागपूर　इंदूर　नागपूर
यवतमाळ　यवतमाळ　नागपूर
पुणें　पुणें　नागपूर

[घराणें ३ रें, गोळप—

६							रामचंद्र (मागें पृ. ७९)	
७	वासुदेव (मागें पृ. ७८)						अनंत	भास्कर
८	महादेव	गोपाळ	जनार्दन	सदाशिव	गोविंद	रामचंद्र नारायण	यादव (जनार्दन)	
९	त्र्यंबक	केशव	परशुराम भास्कर मधुसूदन*	पांडुरंग* श्रीधर	शंकर*		सदाशिव	
१०		काशीनाथ*			माधव*		जनार्दन	महादेव* वासुदेव*
११		भालचंद्र*					केशव*	गजानन* चिंतामणि*
		पुणें पुणें	पुणें	मुंबई	पुणें पुणें		श्रीवर्धन	श्रीवर्धन श्रीवर्धन श्रीवर्धन श्रीवर्धन

चौल—श्रीवर्धन पृ. ७८ ते ८२]

६

जनार्दन श्रीधर (पुढें पृ. ८२) ७

बाळकृष्ण दाजी ८


पांडुरंग अनंत नारायण* भास्कर* जगन्नाथ रामचंद्र ९
दिनकर
भिकाजी*

रामकृष्ण* गणेश* विनायक* विष्णु* हरी* गोविंद* गंगाधर* १०
दत्तात्रेय* सीताराम*

अनंत* रामचंद्र* रघुनाथ* ११
प्रभाकर*
सुरेश*


दादर दादर डुमरा मुरुड श्रीवर्धन श्रीवर्धन श्रीवर्धन
दादर मुरुड मुरुड दादर मुरुड श्रीवर्धन
मुरुड मुरुड श्रीवर्धन
मुरुड

[घराणें ३ रें, गोळप—चौल—श्रीवर्धन पृ. ७८ ते ८२]




[घराणें ४ थें, गोळप—अक्षी—नागांव]

(माहिती पृ. १८१–१८३)




[घराणें ५ वें, गोळप—नाशिक—धौम]

(माहिती पृ. १८३–१८७)



[घराणें ६ वें, केळशी—तळें]

(माहिती पृ. १८८–१९३)



[घराणें ७ वें, केळशी

(माहिती

२ भिकाजी—१ तुकदेव

३ गणेश

४ भिकाजी

५ गणेश रामचंद्र नारायण वासुदेव सदाशिव गोपाळ वापू

६ विश्वनाथ परशुराम तात्या बाबजी ऊर्फ बचाजी व्यंकटेश काशीनाथ रामचंद्र बाळाजी सखाराम

७ गंगाधर (दाजी) अनंत

८ नारायण गोविंद विष्णु विनायक गणेश गणेश


९ विश्वनाथ दत्तात्रेय* रामचंद्र* अनंत धोंडो* गणेश* महादेव* [ ]* कृष्ण* दत्तात्रेय*

१० गोपाळ* वामन* भास्कर* पद्माकर* प्रभाकर* मुरलीधर* श्रीपाद*


उमरावती अकोला अकोला उमरावती उमरावती पनवेल
उमरावती अकोला अकोला यवतमाळ पनवेल
उमरावती अकोला यवतमाळ
अकोला

पृ. ८६ ते ८८]

पृ. १९३–१९९)




[घराणें ७ वें, केळशी पृ. ८६ ते ८८]



[घराणें ८ वें, केळशी—बिरवाडी]

(माहिती पृ. १९९–२०१)



[घराणें ९ वें, केळशी—

(माहिती

२ बाळाजी—१ हरी

३ पांडुरंग

४ बल्लाळ

५ मोरेश्वर (आबा)

६ बाळकृष्ण, नीळकंठ, दिनकर (बापू)　　बाबाजी

७ वासुदेव, गणेश　　भिकाजी　　भास्कर


८ मोरेश्वर*　　श्रीधर*　　गोविंद*　　आत्माराम

९ अनंत*　　दिनकर* यशवंत* दत्तात्रेय*　　गजानन* बल्लाळ* चिंतामणि*　　हरी* भालचंद्र* मधुसूदन*　　गंगाधर* विनायक*　　वासुदेव* सदाशिव* भास्कर*　　त्र्यंबक*

१० विठ्ठल* भार्गव*


रेवदंडा	सांगली	रेवदंडा	रेवदंडा	रेवदंडा	रेवदंडा	रेवदंडा
ठाणें	मुंबई	रेवदंडा	रेवदंडा	रेवदंडा	रेवदंडा	
ठाणें	मुंबई	रेवदंडा	रेवदंडा		रेवदंडा	
ठाणें		रेवदंडा			रेवदंडा	

रेवदंडा]
पृ. २०१–२०६)




[घराणें १० वें, केळशी—

(माहिती



वाडें पृ. ९२ ते ९४]

पृ. २०७–२११)



[घराणें १० वें, केळशी—वाडें पृ. ९२ ते ९४]

६	वामन (मागें पृ. ९३)	श्रीधर (मागें पृ. ९३)	दामोदर (मागें पृ. ९३)
७	रामकृष्ण	परशुराम, नरहर* ; व्यंकटेश* ; मुकुंद*	गोविंद, वासुदेव, केशव, गोपाळ ; भास्कर, विठ्ठल
८	राजाराम* ; बाबू	वासुदेव* (परशुराम-नरहर यांचा) ; मुरलीधर* (व्यंकटेश यांचा)	नीळकंठ* (गोविंद-गोपाळ यांचा)
९	वामन*, विष्णु* (राजाराम यांचे)		
	वाडें, पुणें, पुणें	वाडें, वाडें ; वाडें, पुणें ; वाडें	बडोदें


[घराणें ११ वें, हुबळी]

(माहिती पृ. २११–२१२)

१	सखाराम
२	बाळाजी
३	पांडुरंग ; गोविंद
४	शंकर* (पांडुरंग यांचा)
	हुबळी

[घराणें १२ वें, मुर्डी पृ. ९५ ते ९९]


(माहिती पृ. २१२–२४१)



[घराणें १२ वें, मुर्डी


५								
६	वामन (मागें पृ. ९५)							
७	गणेश बाळकृष्ण					भिकाजी केशव	श्रीधर	शिवराम
८	सीताराम*	परशुराम	आत्माराम*	दत्तात्रेय*	शांताराम	भार्गव	जयराम*	शंकर
९	गणेश*	मोरेश्वर* विष्णु*	दिगंबर* अवधूत* एकनाथ* सुधाकर*	मधुसूदन*			मधुसूदन* प्रभाकर*	श्रीकृष्ण*
	पुणें धुळें	बडोदें बडोदें	मुर्डी मुर्डी मुर्डी मुर्डी मुर्डी	कोल्हापूर कोल्हापूर			मुर्डी मुर्डी मुर्डी	केळशी

पृ. ९५ ते ९९]




नाशिक मुर्डी मुंबई मुर्डी मुंबई मुर्डी मुर्डी मुर्डी
नाशिक दारेसलाम दापोली मुंबई मुंबई मुर्डी
दारेसलाम मुंबई मुर्डी
मुंबई

[घराणें १२ वें, मुर्डी


४ अनंत (मागें पृ. ९५)
५ लक्ष्मण परशुराम महादेव (तातो)
६ दामोदर रामकृष्ण सदाशिव विनायक
७ पुरुषोत्तम सखाराम अनंत विठ्ठल* सीताराम
८ गजानन* लक्ष्मण* * धोंडो* दत्तात्रेय* भास्कर मोरेश्वर*
९ एकनाथ* नरसिंह* यशवंत* जनार्दन* विनायक* कमलाकर*
अनंत* वसंत* विठ्ठल* मुरलीधर*
मुर्डी मुर्डी पुणें दापोली दारेसलाम मुर्डी मुर्डी दारेसलाम
पुणें दापोली पुणें इचलकरंजी मुर्डी दारेसलाम
पुणें मुर्डी
पुणें

पृ. ९५ ते ९९]


४
त्र्यंबक
बाळाजी
५
जनार्दन
विष्णु
शिवराम
केशव
गणेश*
६
कृष्ण*
नारायण*
पांडुरंग*
गोविंद*
वामन*
७
हृषीकेश*
जगदीश*
सुरेश*
अनंत*
दिनकर*
नारायण*
८
९
पुणें
पाथरडिह्री
पाथरडिही
पुणें
आंजर्लें
मुंबई
आंजर्लें
पुणें
पाथरडिह्री
आंजर्लें
आंजर्लें
आंजर्लें

[घराणें १३ वें, चौक—

(माहिती

२ बल्लाळ—१ पिलदेव

३ हरी रामचंद्र (पुढें पृ. १०२)

४ अनंत विश्वनाथ

५ सदाशिव पांडुरंग वासुदेव

६ विश्वनाथ अनंत सखाराम भास्कर

७ बळवंत पांडुरंग गंगाधर प्रभाकर पुरुषोत्तम वासुदेव

८ सीताराम काशीनाथ दिनकर पांडुरंग


९ विश्वनाथ पांडुरंग* कृष्ण सदाशिव सखाराम* गोविंद* विष्णु* दत्तात्रेय* दामोदर*

१० चिंतामणि* महादेव* विनायक* बळवंत* मोरेश्वर* वासुदेव* सदाशिव* दत्तात्रेय* रघुनाथ* मधुकर* प्रभाकर*


११ रामचंद्र* (शिवाजी) प्रतापसिंह* अजितसिंह* जयसिंह* उदयसिंह*

पुणें पुणें | वार्शी पुणें पुणें | नाशिक मुंबई | पुणें | धुळें कल्याण मिरज कल्याण पुणें | पुणें चौक चौक | चौक चौक | चौक चौक चौक चौक


पंचनदी पृ. १०० ते १०३]
पृ. २४१-२५१)



[घराणें १३ वें, चौक—


३ रामचंद्र (मागें पृ. १००)
४ महादेव
५ बावाजी
६ मोरेश्वर
हरी
७ रघुनाथ
त्र्यंबक
बाळकृष्ण
परशुराम
दामोदर
गोपाळ
वामन
८ भास्कर
यशवंत
चिंतामणि
एकनाथ*
वासुदेव*
शंकर
दत्तात्रेय
विनायक
हरी
९ विष्णु*
गोपाळ*
प्रभाकर*
चिंतामणि*
दिगंबर*
बाळकृष्ण*
वसंत*
१० मोरेश्वर* रघुनाथ*
नारायण* विनायक*
पुणें
पुणें
पुणें
पुणें
पुणें
पुणें
पुणें
पुणें
दारेसलाम
—
पुणें
पुणें
पुणें

पंचनदी पृ. १०० ते १०३]



[घराणें १४ वें,

(माहिती

१ नारायण

२ नागदेव बाळंभट (पुढें पृ. ११७)

३ गोविंद

४ रामभट

५ चिंतामणि बाळंभट

६ विष्णु पांडुरंग यज्ञेश्वर बाळ सदाशिव चिंतामणि जनार्दन परशुराम काशीनाथ

७ विठ्ठल परशुराम सदाशिव रामभट गणेश बाळ गोविंद काशीनाथ कृष्ण (बाळ)

८ चिंतामणि विश्वनाथ पांडुरंग* सखाराम काशीनाथ परशुराम

९ विष्णु* नारायण दामोदर*

१० नरहरी* श्रीपाद*

११ चिंतामणि* सुधाकर*

मेटें मेटें


डभोई डभोई

डभोई

औंढा (नागनाथ)
औरंगाबाद

मेटें पृ. १०४ ते ११७] १

पृ. २५१–२८१) २



[घराणें १४ वें,

५							
६	जनार्दन (मागें पृ. १०५)						
७	विष्णु	वामन					रघुनाथ
८	बळवंत	वामन	जनार्दन गणेश	रामचंद्र	मुकुंद		जयराम
९	त्र्यंबक	दामोदर*	गोविंद*	महादेव नारायण हरी*	पांडुरंग*	अच्युत	रघुनाथ* काशीनाथ*
१०		शंकर*	विष्णु* दत्तात्रय* प्रभाकर*	गणेश*	विनायक* श्रीराम*		वसंत*
११		बळवंत*	केशव*				
		खेड नागपूर नागपूर	पुणें पुणें पुणें पुणें नागपूर	मंडणगड मंडणगड	खेड खेड खेड		आंबिवली धोत्रामोहोर धोत्रामोहोर

मेटें पृ. १०४ ते ११७]

नारायण (मागें पृ. १०५) ५

भिकंभट अनंत (पुढें पृ. १०८) } ६
हरी (पुढें पृ. ११०)

रावजी गणेश धोंडभट शिवराम (पुढें पृ. १०८) } ७
सीताराम चिमणाजी (पुढें पृ. १०८)
महादेव (पुढें पृ. १०८)
पांडुरंग (पुढें पृ. १०८)
विश्वनाथ (पुढें पृ. १०८)
बहिरो

गंगाधर बळवंत विनायक विश्वनाथ गणेश } ८

कृष्ण दत्तात्रेय* भास्कर कृष्ण विनायक मोरेश्वर } ९
गोपाळ
चिंतामणि

जयंत* रामचंद्र* बाळ केशव नारायण नथो मंगळमूर्ति } १०
धोंडो

रघुनाथ विश्वनाथ* ११

धोत्रामोहोर भुसावळ नाशिक
भुसावळ

[घराणें १४ वें,


(मागें पृ. १०७ वरून चालू)

पिढी								
६								अनंत (मागें
७	शिवराम	चिमणाजी	महादेव	पांडुरंग		विश्वनाथ		दामोदर
८	काशीनाथ	केशव नारायण	कृष्ण	वीरेश्वर	धोंडभट गणेश	सखाराम	भार्गव	काशीनाथ
९			दत्तात्रेय नारायण	भिकाजी*	आत्माराम	गोरेश्वर*		परशुराम
१०			राजाराम*	पांडुरंग* रघुनाथ* जगन्नाथ* हनुमंत* जनार्दन*		सखाराम*	कृष्ण* गजानन*	
११						नारायण*		

पुणें	खेड खेड खेड खेड खेड खेड	खेड खेड खेड	खेड खेड

मेटें पृ. १०४ ते ११७]

पृ. १०७)



जोरार (रांची)	खेड	खेड	दादर
नागपूर	खेड	खेड	दादर
जोरार		खेड	दादर
जोरार			

[घराणें १४ वें,

५					सदाशिव (मागें पृ. १०५)			
६	हरी (मागें पृ. १०७)				परशुराम			
७	भास्कर				रामचंद्र लक्ष्मण		पिलाजी	
८	मोरेश्वर				नारायण	हरी	जनार्दन	
९	विनायक		दामोदर	हरी	रामचंद्र		गणेश*	माधव*
१०	भास्कर दत्तात्रेय नारायण*	गोविंद*	कृष्ण*	रामचंद्र लक्ष्मण दत्तात्रेय* गणपति रघुनाथ* जगन्नाथ*			यशवंत* भास्कर* लक्ष्मण* वसंत*	दामोदर* अनंत*
११	यशवंत* अनंत* वासुदेव*	केशव* अरविंद* रामचंद्र*	वसंत* यशवंत*					
	पुणें पुणें पुणें पुणें	नांदगांव पुणें पुणें पुणें	नागपूर नागपूर नागपूर	मुरुड उमरावती मुरुड			धुळें धुळें धुळें धुळें धुळें	धुळें धुळें धुळें

मेटें पृ. १०४ ते ११७]

५

नरसो वामन ६

दाजी ७

परशुराम* सदाशिव आप्पाजी (सदाशिव) शंकर ८


विष्णु* भालचंद्र* श्रीराम* जयराम* गंगाधर* ९

अच्युत* दिनकर* गोविंद* गोपाळ*
चंद्रशेखर* सीताराम* गजानन* विष्णु*
रामकृष्ण* शशिकांत* १०


११

पारोळें धुळें वेरळ कुर्ला वेरळ
धुळें पुणें खेड कुर्ला वेरळ
धुळें वेरळ कुर्ला वेरळ
वेरळ वेरळ


[घराणें १४ वें,


४ केशव (मागें पृ. १०५)
५ लक्ष्मण
धोंडभट (पुढें पृ.११४)
महादेव (आबाजी) (पुढें पृ.११५)
६ वासुदेव
रघुनाथ
जगन्नाथ
७ विश्वनाथ
नारायण
८ सखाराम
गोविंद
वामन
धोंडो
श्रीधर
९ पांडुरंग
अनंत
भार्गव
विष्णु*
वासुदेव*
दिनकर*
कृष्ण*
विश्वनाथ* (गोपाळ)
बाळकृष्ण
१० गणेश*
गणेश*
मोरेश्वर*
यशवंत*
गजानन
शंकर*
११
पुणें
नगर
नगर
नगर
नगर
नगर
कराची
कराची
कराची
—

मेटें पृ. १०४ ते ११७]


४
५
दामोदर
काशीनाथ
६
हरी
मोरेश्वर
बाळकृष्ण
गणेश
हरी
रामचंद्र केशव
७
सदाशिव
उद्धव
त्र्यंबक
सीताराम
नारायण
बाळाजी गोपाळ
वामन
८
शंकर
रंगनाथ*
महादेव*
बाबू
गणेश
नारायण
९
त्र्यंबक*
१०
केशव*
११
मुंबई
मेटें
मेटें

[घराणें १४ वें,


५ धोंडभट (मागें पृ. ११२)
६ नीळकंठ
गंगाधर
७ चिंतामणि
बळवंत
८ गंगाधर
अमृत
नीळकंठ
गणेश
९ भिकाजी
विनायक
कृष्ण
गोपाळ
गोविंद
रामचंद्र
१० विष्णु
कृष्ण
काशीनाथ
सखाराम
हरी
नारायण
वामन
श्रीधर
वामन*
पुरुषोत्तम*
११ रामचंद्र
गणेश*
शंकर*
रघुनाथ*
सदाशिव*
अनंत*
विष्णु
वासुदेव*
ज्ञानदेव*
गजानन*
१२ नारायण*
पुणें
पुणें
पुणें
पुणें
सोलापूर
पुणें
अहमदाबाद
अहमदाबाद
अहमदाबाद
अलाहाबाद
ग्वाल्हेर

मेटें पृ. १०४ ते ११७]

महादेव (आबाजी) (मागें पृ. ११२) ५

विनायक ६

विठ्ठल ७

चिंतामणि रामचंद्र ८

गंगाधर हरी सदाशिव मोरेश्वर विनायक* कृष्ण गोविंद* ९


चिंतामणि* विनायक गोविंद शंकर* विष्णु* सदाशिव* १०

गंगाधर* रामचंद्र वसंत* शंकर* व्यंकटेश* लक्ष्मण* गोपाळ* कमळाकर* दत्तात्रेय* दिगंबर* ११

१२

जत	बेळगांव	बडनगर	बडनगर	—	अकोला
जत		बडनगर	बडनगर		अकोला
पुणें		बडनगर	बडनगर		
		बडनगर	बडनगर		

[घराणें १४ वें,


२
३
४ बाळंभट (मागें पृ. १०५)
५ भास्कर
६ जनार्दन केशव नारायण (बल्लाळ)
७ कृष्ण भास्कर
८ गोपाळ भार्गव वासुदेव गोविंद रामचंद्र विष्णु
परशुराम महादेव
जनार्दन*
९ लक्ष्मण प्रभाकर पुरुषोत्तम* सीताराम दत्तात्रेय* दामोदर केशव हरी
रघुनाथ* नरहरी*
वामन* गोविंद*
१० वैजनाथ* गजानन* पंढरीनाथ* बाळकृष्ण* मुरलीधर* घनश्याम*
११ माधव* श्रीकृष्ण*
(मधु)
मुंबई दादर मुंबई खोपी पुणें बिलेंपालें मेटें मेटें
मुंबई दादर दादर खोपी पुणें
मेटें
पुणें

मेटें पृ. १०४ ते ११७]

बाळंभट (मागें पृ. १०४) २

महादेव ३

सदाशिव बाळ ४

गुंडो कृष्ण महादेव बाळंभट भास्कर ५

विश्वनाथ सदाशिव गोपाळ केशव ६

बाळकृष्ण महादेव* यशवंत ७

गणेश* रघुनाथ* पुरुषोत्तम* विष्णु* विश्वनाथ* सदाशिव* पांडुरंग अनंत* मारुति* विनायक* नारायण* ८

सीताराम* मुकंद* ९

१०

११

पुणें इचलकरंजी	तारळें तारळें	तारळें तारळें तारळें तारळें	मुंबई	तारळें तारळें	तारळें तारळें

[घराणें १५ वें, कोचरें

(माहिती

१ रामभट (सखाराम)

२ महादेव (दादंभट) गोविंद (पुढें पृ. १२०) चिंतामणि (पुढें पृ. १२०) हरी (पुढें पृ. १२४)

३ गोपाळ वासुदेव रामचंद्र

४ भिकाजी बाळंभट अनंत

५ { बळवंत महादेव विश्वनाथ रामचंद्र रामचंद्र लक्ष्मण विठ्ठल

६ { कृष्ण* गणेश नारायण विठ्ठल गोविंद* वासुदेव दत्तात्रेय विनायक* विष्णु गंगाधर धोंडभट

७ { गजानन* बडू* बाळ* अनंत* रघुनाथ वामन* वासुदेव गणेश प्रभाकर हरी नारायण*

८ श्रीराम* कमळाकर* पद्माकर*

९ { भालचंद्र* रामचंद्र* लक्ष्मण*

हरीपूर — पुणें पुणें पुणें सातारा सातारा पुणें बडोदें बडोदें बडोदें सांगली बडोदें बडोदें बडोदें

पृ. ११८ ते १२७]
पृ. २८१–३०३)

१

विश्वनाथ (पुढें पृ. १२६) कृष्ण २

लक्ष्मण जनार्दन ३

मोरभट विश्वनाथ सखंभट महादेव ४

महादेव बाबल रामचंद्र भास्कर नारायण विनायक प्रभाकर गणेश येसंभट वामन गणेश ५

विश्वनाथ त्र्यंबक सखंभट सीताराम बाळाजी रामकृष्ण गोविंद विष्णु विश्वनाथ कृष्ण बाळकृष्ण लक्ष्मण ६


विठ्ठल गजानन* दत्तात्रेय शिवराम* दत्तात्रेय ७

शंकर* दत्तात्रेय दामोदर* विश्वनाथ* गोविंद* रामकृष्ण* प्रभाकर* ८


पुरुषोत्तम* मधुकर* वसंत* मुकुंद* प्रभाकर* अनंत* ९

बडोदें बडोदें बडोदें गंगरवा आंवळेगांव आंवळेगांव आंवळेगांव
बडोदें गोरेगांव आंवळेगांव
बडोदें गोरेगांव
बडोदें गोरेगांव

[घराणें १५ वें, कोचरें


२ गोविंद (मागें पृ. ११८)
चिंतामणि (मागें पृ. ११८)
३ सदाशिव हरी पांडुरंग
गणेश विठ्ठल
नागेश
बाबूभट
रघुनाथ
४ धोंडभट
चिंतामणि विष्णु (बाबू)
रघुनाथ नारायण
५ पांडुरंग
गणेश
चिंतामणि
वासुदेव हरी
चिंतामणि
रामचंद्र बाबूभट
गणेश
विश्वनाथ
६ दत्तात्रेय*
गोपाळ दाजी (नारो)
दिनकर*
दत्तात्रेय
वामन महादेव केशव
दत्ताराम
विष्णु
वासुदेव*
७ भालचंद्र*
बाबूभट* सखाराम*
गोविंद* कृष्ण* गणेश*
भास्कर*
८ श्रीपाद*
हरीपूर
इचलकरंजी मुंबई
गुळधुवें पेडणें
गुळधुवें सांवतवाडी बैलहोंगल बैलहोंगल
गुळधुवें रत्नागिरी

पृ. ११८ ते १२७]


२
रामभट
विनायक (पुढें पृ. १२२)
३
अनंत
केशव
श्रीधर
वासुदेव
४
विनायक (दाजी)
बाळंभट
रामभट
५
नारायण*
केशव
विष्णु
दादोबा
आत्माराम
अनंत दाजी
नारायण
६
विश्वनाथ*
अनंत रामचंद्र
चिंतामणि*
दत्तात्रेय
दत्तात्रेय*
कृष्ण
७
विनायक*
सदाशिव*
गंगाधर*
नारायण*
८
गुळधुवें
गुळधुवें
सांगली
हरीपूर
हरीपूर
हरीपूर
हरीपूर
हरीपूर

[घराणें १५ वें, कोचरें

३ विनायक (मागें पृ. १२१)

४ महादेव (आप्पा) कृष्णंभट धोंडभट

५ शिवराम नीळकंठ गोविंद मोरेश्वर (जीवभट)


६ विनायक* महादेव सीताराम काशीनाथ* दत्तात्रेय वामन रावजी वासुदेव (दत्तात्रेय)

७ विश्वनाथ* वासुदेव* सीताराम* श्रीकांत* वसंत गणेश* गोविंद* विष्णु* गोपाळ कृष्ण* महादेव* वसंत* धोंडो*

८ माधव* मधुकर* नारायण* ऊर्फ विष्णु यशवंत* मोरेश्वर*


खानापूर पुणें बेळगांव — — सांखळी गडहिंग्लज सांगली गडहिंग्लज कोल्हापूर कोल्हापूर कोल्हापूर कोल्हापूर उगार उगार मुंबई कवळें मुंबई सांगली

पृ. ११८ ते १२७]




३
विश्वनाथ
४
रामभट
सदाशिव
सखाराम
नारायण
५
बाळकृष्ण
सीताराम
पांडुरंग
पद्माकर
दामोदर
गोपाळ
विष्णु
लक्ष्मण
भलंभट
विश्वनाथ
रघुनाथ
६
सदाशिव*
विश्वनाथ*
गणेश*
श्रीपाद*
ऊर्फ
बाबू
नारायण
गणपति
गुंडभट*
दिनकर
रामकृष्ण
वासुदेव
परशुराम
७
रामनाथ*
वासुदेव*
(देवीदास)
बाळकृष्ण*
नारायण*
पांडुरंग*
सीताराम*
दामोदर*
वामन*
त्र्यंबक
रामचंद्र*
लक्ष्मण
८
कवळें
कवळें
कवळें
कवळें
कवळें
कवळें
कवळें
आजरें
आजरें
आजरें
आजरें
आजरें
आजरें
आजरें

[घराणें १५ वें, कोचरें




२ हरी (मागें पृ. ११८)
३ महादेव नारायण (पुढें पृ. १२६)
४ सदाशिव कृष्ण
५ हरी मोरेश्वर परशुराम विष्णु
६ गोविंद बाळंभट वासुदेव
७ कृष्ण विष्णु गोविंद गोपाळ
८ गणेश* हरी* नारायण रामचंद्र* बाळ महादेव* चिंतामणि* दत्तात्रेय* गोपाळ* पुरुषोत्तम
९ केशव वामन* लक्ष्मण* हणमंत* विश्वनाथ गजानन वासुदेव* यशवंत श्रीपाद* भालचंद्र* गणेश* दामोदर*
१० गंगाधर* शरच्चंद्र* भालचंद्र* विश्वनाथ* पुरुषोत्तम* दामोदर* प्रभाकर*
सातारा सातारा सातारा सातारा सातारा सातारा
सातारा सातारा सातारा सातारा
सातारा सातारा
कोरेगांव
सांगली सांगली सांगली
हैद्राबाद सोलापूर
पुणें सांगली
पुणें मुंबई


पृ. ११८ ते १२७]　　　　२


३
केशव
४
विनायक
नारायण
महादाजी
गणेश
बल्लाळ
गोपाळ
५
चिमणभट
भास्कर
गोविंद
दामोदर
पुरुषोत्तम
भास्कर
राजाराम
वासुदेव
६
गणेश
मोरेश्वर
गणेश
विनायक
धोंडदेव
बाळकृष्ण
७
गोविंद
महादेव*
केशव
नारायण
८
९
१०
कोडोली (पारगांव)

[घराणें १५ वें, कोचरें


२ विश्वनाथ (मागें पृ. ११९)
३ नारायण (मागें पृ. १२४) नारायण
४ गोविंद गणेश गंगाधर
५ पांडुरंग मोरेश्वर रामभट विश्वनाथ केशव
६ बाळंभट चिंतामणि वामन वासुदेव हरभट गणेश नारायण धोंडभट
७ गणेश गंगाधर* विश्वनाथ गोपाळ*
८ वामन* कृष्ण चिंतामणि रामचंद्र लक्ष्मण*
९ हरी* दामोदर* मोरेश्वर* यशवंत*
अकलूज गणेशवाडी सांगली
अकलूज
उगार
उगार
जमखिंडी
उगार

पृ. ११८ ते १२७]



२
३
४
जीवभट
५
श्रीधर
त्र्यंबक
नीळकंठ
६
बाळंभट
दामोदर
जगन्नाथ
बाळंभट
विष्णुभट
७
सदाशिव
दामोदर
दत्तात्रेय*
गोविंद
श्रीधर
गुंडो
विनायक
८
भालचंद्र*
रघुनाथ*
विश्वनाथ*
केशव*
धुंडीराज*
नारायण*
त्र्यंबक*
९
मुरलीधर*
गोविंद*
हणमंत*
जमखिंडी
जमखिंडी
गणेशवाडी
गणेशवाडी
सांगली
गणेशवाडी
कासेगांव
कासेगांव
कासेगांव
सांगली
सांगली

[घराणें १६ वें,


(माहिती

१	बळिराम							
२	बाबूभट	नारायण			महादेव			
३	कृष्णशास्त्री	अनंत	सदाशिव	जनार्दन	जनार्दन			
४	रामशास्त्री लक्ष्मण चिंतामणि	बाळकृष्ण दामोदर	गणेश		रामेश्वर	नारायण		
५	कृष्ण		विष्णु		बाबू	बाबू शंभु	पांडुरंग जनार्दन	
६	दत्तात्रेय		विठ्ठल		रामचंद्र कृष्ण			
७	अंबादास (नारायण) गुंडो* कल्लेश्वर*		लक्ष्मण					
८								

गुलबुर्गा
गुलबुर्गा

वाडखोल]

पृ. ३०३-३०६)




[घराणें १७ वें, केळवें—

(माहिती

१	विश्वनाथ						
२	रामकृष्ण		शिवराम				
३	सिद्धेश्वर पांडुरंग		सदाशिव	यादव			
४	महादेव	विश्वनाथ	पुरुषोत्तम नारायण	रघुनाथ			
५	दामोदर	रामकृष्ण		गणेश चिंतामणि		सीताराम	नीळकंठ
६		दत्तात्रेय* गणपति*		मोरेश्वर	गंगाधर भास्कर	भिकाजी रावजी गजानन	आत्माराम*
७		शरच्चंद्र* चंद्रकांत*		लालजी* रघुनाथ* विश्वनाथ* गोविंद*	भालचंद्र* विनायक*		त्र्यंबक*
८							
		बडोदें बडोदें बडोदें बडोदें		मुंबई मुंबई मुंबई मुंबई	बडोदें बडोदें		दहिसर दहिसर


माहीम पृ. १३० ते १३२]

पृ. ३०६–३१३)




पालघर पालघर दादर
पालघर दादर
दादर

[घराणें १७ वें, केळवें—माहीम पृ. १३० ते १३२]




[घराणें १८ वें, गिम्हवणें]

(माहिती पृ. ३१३–३१५)



[घराणें १९ वें, हेदवी]

(माहिती पृ. ३१६–३१८)



[घराणें २० वें, वणोशी—पंचनदी]

(माहिती पृ. ३१८–३२०)

४ रामाजी गोसावी—३ दादोपंत--२ गणेशपंत (बल्लाळ)—१ कृष्ण

५ (रघुनाथ) बाबूराव

६ मोरेश्वर

७ वामन (मुला) सदाशिव नारायण

८ महादेव गणेश हरी

[घराणें २१ वें, करंजगांव]

(माहिती पृ. ३२०–३२१)

१ कृष्ण

२ वासुदेव

३ गोपाळ गोविंद बाळंभट हरभट

४ रामचंद्र कृष्ण श्रीधर श्रीधर दामोदर

५ यशवंत* वामन* लक्ष्मण* नारायण जगन्नाथ गोपाळ* दत्तात्रेय* मोरेश्वर*

६ अनंत* गोरख* धुंडीराज*

— — पुणें सोलापूर सोलापूर सोलापूर सोलापूर

सोलापूर सोलापूर

[घराणें २२ वें,

(माहिती

२ कृष्ण—१ महादेव

३ महादेव

४ कृष्ण विठ्ठल

५ रघुनाथ जनार्दन

६ कृष्ण विष्णु वासुदेव

७ महादेव त्र्यंबक गजानन* गणेश*

८ श्रीनिवास* नीळकंठ* रंगनाथ* महीपति* रामकृष्ण* विश्वनाथ चिंतामणि*
शंकर* रघुनाथ*
नारायण*

९ भालचंद्र* केशव* माधव* श्रीधर*
जयंत* हरी* पद्माकर*
प्रभाकर*
वसंत*
मनोहर*

मुंबई दादर दादर पुणें पुणें सासवनें हाशिवरें
मुंबई दादर दादर पुणें मुंबई दादर
दादर दादर पुणें सासवनें दादर
दादर
दादर
दादर

सोमेश्वर—आवास]

पृ. ३२१–३२३)

२

३

गोविंद ४

महादेव रामचंद्र गोपाळ नारायण बापू बाजी आप्पाजी ५

गोविंद विनायक जयराम रामकृष्ण ६

बाळकृष्ण रघुनाथ (रावजी) बापू गोपाळ* नारायण* ७


सदाशिव* जनार्दन* विष्णु* अनंत* दत्तात्रेय* रामचंद्र ८

अच्युत* कृष्ण* परशुराम* वामन* ९

दादर दादर दादर दादर दादर सासवनें आवास आवास आवास आवास

[घराणें २३ वें,

(माहिती


१ रघुनाथ
२ कृष्ण
बहिरव
३ बल्लाळ
वासुदेव
४ गणेश
महादेव
बहिरव
रामकृष्ण
सीताराम
५ रंगो उर्फ बळवंत
विष्णु
विष्णु*
गोविंद
गणेश सदाशिव जगन्नाथ*
वैजनाथ रामचंद्र*
विनायक*
६ शंकर*
गणेश* महादेव* नारायण* विश्वनाथ* सीताराम*
नारायण*
रामकृष्ण*
शंकर* प्रभाकर*
रघुनाथ* अच्युत* गणेश* विष्णु*
७ *
गणेश* गोविंद*
विष्णु* कृष्ण*
गागोठणें
नागोठणें
जळगांव दादर दादर दादर दादर दादर
इंदूर इंदूर इंदूर
इंदूर इंदूर
श्रीवर्धन श्रीवर्धन
मुरुड मुरुड मुरुड
श्रीवर्धन श्रीवर्धन श्रीवर्धन श्रीवर्धन श्रीवर्धन

श्रीवर्धन—तळें]

पृ. ३२३–३२८)

१

२

नारायण मोरेश्वर अनंत ३

त्र्यंबक रघुनाथ गणेश ४
महादेव
कमळाकर

गजानन* वासुदेव* नारायण रामचंद्र* गंगाधर दत्तात्रेय ५
गजानन जनार्दन
रामचंद्र* श्रीधर
नारायण


प्रभाकर माधव* दत्तात्रेय* महादेव* नारायण* ६
विश्वनाथ* महादेव* गोविंद* बाळकृष्ण*
द्वारकानाथ* नथू* गोपाळ* यशवंत*
शिवाजी* रघुनाथ*

७

माटुंगा माटुंगा बिरवाडी अडखळ दिवेआगर
माटुंगा माटुंगा बिरवाडी अडखळ दिवेआगर
माटुंगा बिरवाडी अडखळ दिवेआगर
बिरवाडी अडखळ
बिरवाडी अडखळ

[घराणें २४ वें,

(माहिती


१ रामचंद्र
२ कृष्ण
गोविंद मोरेश्वर
३ गोपाळ
भिकंभट
बापू विनायक
केशव
४ वासुदेव नारायण
आप्पाभट
सदाशिव
५ विष्णु
विठ्ठल
रामचंद्र
६ मोरेश्वर
विश्वनाथ*
परशुराम*
बाळकृष्ण*
पांडुरंग*
दत्तात्रेय नारायण*
वामन*
७ अनंत विनायक*
अनंत
मोरेश्वर* नरहरी* केशव*
रामचंद्र* सदाशिव विनायक* जयराम*
अनंत* चिंतामणि* श्रीधर* पुरुषोत्तम
गजानन* लक्ष्मण* नीळकंठ विष्णु*
८ पिलू*
पेण
शिरवली
नाशिक नाशिक
मुरुड पुणें मुरुड मुरुड मुरुड
तळें माणगांव तळें तळें
रोहें रोहें रोहें रोहें
पुणें पुणें पुणें पुणें

रोहें]
पृ. ३२९–३३१)

बाळाजी

कृष्ण   चिंतामणि   विनायक
गणेश*

दामोदर   वामन*
गोविंद*
शंकर*
कृष्ण

ठाणें
ठाणें
ठाणें
ठाणें

[घराणें २५वें, कोठिंबे]

(माहिती पृ. ३३१–३३२)

१ मोरेश्वर अथवा गोविंद

२ विनायक

३ नारायण

४ गोविंद

५ विनायक* पुरुषोत्तम


६ प्रभाकर*

—


वेणगांव

[घराणें २६ वें, उकसाण—


(माहिती



वावशा पृ. १४२ ते १४४]
पृ. ३३२–३३६)




[घराणें २६ वें, उकसाण–वावशी पृ. १४२ ते १४४]



[घराणें २७ वें, राहुरी]

(माहिती पृ. ३३७–३३९)



[घराणें २८ वें, शहापूर—माहुली] (माहिती पृ. ३३९–३४१)

२ कृष्ण—१ गोविंद

३ सखाराम सदाशिव

४ आबाजी भिकाजी गणेश

५ { कृष्ण, सखाराम } गोविंद केशव, गोपाळ, कृष्ण सदाशिव

६ त्र्यंबक*

७ प्रभाकर* सुधाकर* भालचंद्र*

दादर, दादर दादर दादर

[घराणें २९ वें, गुहागर—किवळें] (माहिती पृ. ३४१–३४२)

२ रामाजी—१ जनार्दन (आपा)

३ विसाजी सदाशिव आबाजी गोविंद त्र्यंबक


४ { गोपाळ, गणेश } वामन विनायक* विष्णु*, दिनकर हरी

५ श्रीधर नीळकंठ* गोपाळ*


६ सुरेंद्र*

किवळें, किवळें किवळें, पुणें, पुणें

[घराणें ३० वें, चौक—मेटें] (माहिती पृ. ३४२–३४३)



[घराणें ३१ वें, गोळप—आगाशी] (माहिती पृ. ३४३–३४४)



या घराण्याची माहिती उशीरां आली म्हणून हें घराणें मूळ गोळपचें असूनहि याला गोळपच्या इतर घराण्यांशेजारीं स्थान देतां आलें नाहीं.

प्रकरण ७ वें

घराणें व व्यक्ति यांची माहिती

सहाव्या प्रकरणांत ३१ घराण्यांच्या वंशावळी दिल्या आहेत. त्याच क्रमानें येथें घराणें व व्यक्ति यांची माहिती दिली आहे. प्रत्येक घराण्याची माहिती देतांना आरंभीं पुढील गोष्टी दिल्या आहेत. १ घराण्याचा मूळ पुरुष, २ राहण्याचें मूळ ठिकाण, ३ सध्यांचीं वास्तव्याचीं गांवें, ४ मध्यंतरीं वास्तव्य असलेलीं गांवें, ५ घराण्यांत संपादन केलेलें वतन, ६ कुलदेवता, ७ कुलाचार, ८ इतर घराण्यांशीं संबंध जोडण्यास उपयुक्त होणारी माहिती वगैरे, ९ पिढ्या, १० एकूण व्यक्ति व ११ जिवंत व्यक्ति.

व्यक्तीची माहिती देतांना व्यक्तीच्या स्वतंत्र चरित्रांत जशी विस्तृत माहिती दिलेली असते तशी या कुल–वृत्तान्तांत दिलेली नसून ती थोडक्यांत दिली आहे. व्यक्तीचें नांव ओळीच्या आरंभीं जाड ठशांत दिलें असून मजकुराचा भाग दुसऱ्या ओळीपासून थोडा आंत घेतला आहे. जिवंत व्यक्तीच्या नांवामागें * ही खूण केली आहे. व्यक्तीच्या नांवापुढें कंसांत घातलेला आंकडा हा वंशावळींतील पिढीचा आहे. पुढें जन्म व मृत्यु यांचे शक व मिती (शक मिळाले नाहींत तेथें इ. सन दिले आहेत), नंतर व्यक्तीचें शिक्षण, व्यवसाय, कर्तृत्व इत्यादि माहिती दिल्यावर भार्या व श्वशुर यांचीं नांवें दिलीं आहेत. अनेक भार्या असल्यास प्रत्येकीचे पुत्र कोणते हें जेथें निश्चित समजलें तेथें तसा निर्देश केला आहे. प्रत्येक भार्येच्या कन्या तिच्या नांवानंतर दिल्या असून विवाहित कन्येच्या पतीचे नांवाचा उल्लेख केला आहे. व्यक्तीच्या माहितींत ऐतिहासिक संबंध असल्यास तो समजण्यासाठीं चवथ्या प्रकरणांतील क्रमांक कंसांत ऐ. प्र. क्र. हीं अक्षरें घालून त्यांपुढें दिला आहे. तसेंच मोठे गांवांत राहणाऱ्या व्यक्तींचा उपलब्ध पत्ता दिला आहे. ज्येष्ठ बंधूची माहिती दिल्यावर त्याचा वंशविस्तार प्रथम देऊन नंतर कनिष्ठ बंधु व त्याचा वंशविस्तार यांची माहिती दिली आहे. व्यक्तीच्या नांवामागें श्रीयुत, राजश्री, सौभाग्यवती, श्रीमती इत्यादि उपपदें स्थलसंकोचास्तव वापरलीं नाहींत. कांहीं नांवांचा निरनिराळ्या पद्धतीनें उल्लेख केला जातो हें सर्वांस माहीत असल्यामुळें त्यांचें येथें स्पष्टीकरण केलें नाहीं. एकाच व्यक्तीबद्दल अनेकांकडून आलेल्या माहितींत क्वचित् विसंगति आढळली तेथें तारतम्यानें माहितीचा संग्रह केला आहे. जीं छायाचित्रें आम्हांस मिळालीं तीं त्या त्या व्यक्तीच्या माहितीच्या जवळपास दिलीं आहेत. चित्राखालील व्यक्तींच्या नांवांचा क्रम डावीकडून उजवीकडे समजावा. पेंडसे कुलांतील व्यक्तीचे छायाचित्राखालीं उपनांव दिलें नाहीं. व्यक्ति इतर कुलांतील असल्यास उपनांव दिलें आहे.

संक्षिप्त अक्षरांचा खुलासा खालीलप्रमाणें :—

ज = जन्म	स = इसवी सन
मृ = मृत्यु	श = शालिवाहन शक

गोळप गटांतील घराणीं (१ ते ५)

पेंडसे कुलांतील पांच घराणीं मूळ गोळपचीं होत. गोळप हें गांव रत्नागिरी जिल्ह्यांत रत्नागिरीपासून ६ मैलांवर आहे. या गांवांत १ रवळनाथ (पिंडी), २ हरिहरेश्वर, ३ क्षेत्रपाळ, ४ महालक्ष्मी, ५ विठोबा रखुमाई, ६ जाखादेवी, ७ सत्येश्वर, ८ गणपति, ९ दत्तात्रेय, १० धानगादेवी अशा दहा देवदेवता आहेत. जोशी यांस हा गांव इनाम आहे. या गांवांत ब्राह्मणवस्ती बरीच आहे. परंतु कोणी पेंडसे सध्यां येथें राहात नाहींत. पूर्वीं येथें पेंडसे यांचें वास्तव्य होतें याचा पुरावा उपलब्ध आहे.

१ येथील कांहीं ठिकाणांस अद्यापि पेंडसे यांचीं ठिकाणें असें म्हणतात. त्यांची मालकी सध्यां काळे, जोशी, गोगटे वगैरेंकडे आहे.

२ वे. शा. सं. नावलेकर, राहणार गोळप यांजवळील जुने कागदांत गांवांत असणाऱ्या भिक्षुकांची यादी आहे त्यांत केशवभट पेंडसे यांचा उल्लेख आहे.

३ गोळप गांवाचे वांटपाचा एक कागद (पावस येथील कागदांपैकीं) उपलब्ध झाला आहे. त्यांत खालीलप्रमाणें मजकूर आहे.

वांटप गांव मौजे गोळप तर्फ पावस :—लाहारी

१ म्हादो कालमानी	१ हरभट कुळकर्णी
८०० खासा	८५६ खासा
बाबू गोविंद	उपाध्या
केशव लिमया	३६ देवळेकर
५० म्हसकर	४५ करंबेळकर
७५ नारजोशी	४७५ ...
१३० जोगळेकर	२१५ पेंडसा नी॥
५१६ ...	नारो हरी
२७५ पेंडसा	६७२ खासा
२४० पींगा	२१५ ...
३३५ गडबोला	२१० ओगला
३१० करंदीकर	

४ गगनबावड्याचे पंत अमात्य यांजकडून काशीभट बीन बाबूदेवभट उपनांव नावलेकर यांस सन १७३२ चे सुमारास गोळप येथें इनाम जमिनीचा दाखला मिळाला आहे. त्यांत चतुःसीमा सांगतांना पूर्वेस व उत्तरेस पेंडसे यांची जमीन असल्याचा उल्लेख आहे. (सदर कागद हल्लीं त्यांचे वंशजाजवळ आहेत.)

घराणीं १, २ व ५ हीं अनुक्रमें आपला कुळस्वामी केशवराज, लक्ष्मीकेशव व कीर्तिकेशव सांगतात. परंतु यांचेपैकीं एकहि गोळपला नाहीं. लक्ष्मीकेशव कोळीसऱ्यास आहे. गोळपला यो(जो)गेश्वरीचें देऊळ नाहीं. परंतु रा. बापूसाहेब गोगटे खोत यांजकडे या देवीचा उत्सव नवरात्रांत असतो.

हीं पांचहि घराणीं जरी मूळ गोळपचीं आहेत तरी उपलब्ध वंशावळी एकत्र करून यांचा मूळ पुरुष एक दाखवितां येत नाहीं. तथापि घराणें क्र. २ मधील कृष्ण (पिढी ४), घराणें क्र. ३ मधील कृष्ण (पिढी १) व घराणें क्र. ५ मधील कृष्ण (पिढी १) ही एकच व्यक्ति असावी असें मानल्यास हीं तीन घराणीं एकत्र होऊं शकतील. परंतु तसा खात्रीचा पुरावा न मिळाल्यामुळें तीं स्वतंत्रच ठेविलीं आहेत.

गोळप सोडल्यावर ही मंडळी उत्तर दिशेनें प्रवासास लागली. कांहीं रत्नागिरी जिल्ह्यांतील धामापूर (ता. संगमेश्वर) व हेदवी (ता. चिपळूण) येथें व कांहीं कुलाबा जिल्ह्यांतील श्रीवर्धन, चौल, अक्षीनागांव या कोंकणच्या भागांत राहिली व कांहीं देशावर पुणें, रामपूर (सोलापूर), नाशिक, व धौम येथें आली.

घराणें १ लें, गोळप—पुणें—रामपूर

(वंशावळ, पृ. ७१ ते ७३)

या घराण्याचा मूळ पुरुष गणेश. हें घराणें मूळचें गोळप, जि. रत्नागिरी येथील असून दोनशें वर्षें तरी पुण्यास आहे. पुण्याचे डॉ. रामचंद्र दत्तात्रेय (१२) यांचे घरांत सध्यां असलेली विहीर श्री. सदाशिवरावभाऊ पेशवे यांस मानाचा नारळ देऊन खणिली आहे असें म्हणतात. या घराण्याची एक शाखा सोलापूर-जवळील रामपूर येथें गेली व तेथें स्थायिक झाली.

सध्यां यांचें वास्तव्य पुणें, मुंबई, अकोला, उमरावती, नागपूर व यवतमाळ येथें आहे. पूर्वी अष्टें, केळशी, पळस्पें, मालेगांव, रामपूर, धानोरें, परतवाडा, बडनेरें बिबीचें, ब्रह्मावर्त व सोलापूर येथें यांचें वास्तव्य असल्याचें आढळतें.

विश्वनाथ केशव (३) यांचे वंशांतील मंडळींच्या कुलदेवता:— कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची भवानी व आंबे येथील जोगाई. देवदिवाळीला गोळप येथील पुढील देवांस नैवेद्य दाखवितात. श्रीगणपति, श्रीरवळनाथ व जाखादेवी (पान एक, मुदा दोन), श्रीहरिहरेश्वर, श्रीक्षेत्रपाल, श्रीसत्येश्वर, श्रीधावगादेवी, श्रीवाडेश्वर, व योगेश्वरी (पान एक, मुदा दोन) श्रीजाखाई, श्रीजोखाई. घरांत लग्न, मुंज वगैरे झाल्यास कुलस्वामीचे दर्शनास जातात व मंगलकार्य झाल्यावर अंबाबाईचा गोंधळ घालतात.

या घराण्यापैकीं नारायण केशव (३) यांच्या वंशांतील मंडळी केशवराज तुळजापूरची भवानी, आंब्याची जोगेश्वरी, कोल्हापूरची महालक्ष्मी या कुलदेवता मानितात व त्यांस वर्षप्रतिपदा, विजयादशमी व कार्तिक शुद्ध प्रतिपदा या दिवशीं नैवेद्य दाखवितात; देवदिवाळीस दाखवीत नाहींत. चैत्री,आश्विनी व माघी पौर्णिमेस देवीला नैवेद्य दाखवितात. चंपाषष्ठीस खंडोबाचें नवरात्र असतें. आश्विनांतील नवरात्रांत अखंड दीप, माळ, उठतीबसती सुवासिनी व ब्राह्मण असतो. घरांतील एका व्यक्तीस धान्यफराळ असतो. बारसें व लग्न झाल्यास बोडण भरतात. मुलाचें लग्न झाल्यानंतर कुलस्वामिनीस ओहर जावें लागतें.

या घराण्यांत पिढ्या १३, एकूण व्यक्ति १०३ व जिवंत व्यक्ति ३५ आहेत.

विश्वनाथ केशव (३) भार्या काशी.

गोविंद नारायण (६) भार्या रमा.

रामचंद्र गोविंद (७) हे इ. स. १७९७ मध्यें पेशवे दफ्तरांत कारकून होते. यांस पगार रु. २५० व $\frac{५०}{३००}$ आंखाचें कापड मिळत असे (दुसरे बाजीराव रोजनिशी ११–२०२). बापू गोखले पत्रव्यवहारांत यांचा वेणूबाईचे लग्नाकरितां बोलवावयाचे गृहस्थांचे यादींत समावेश आहे (रा. खं. २५, ले. ३८, स. १७९८). (ऐ. प्र. क्रमांक १२ पहा). भार्या उमा.

विष्णु भिकाजी (१०) मृ. स. १८९४ दोषी ताप. शिक्षण व्हर्नाक्युलर फायनल. सर्व्हे डिपार्टमेंटमध्यें नोकरी होती. सेवानिवृत्त होऊन पुण्यास राहात. विशेष गुण : आपल्या संबंधीं दुसऱ्यास केव्हांहि त्रास न देणें, मितव्यय व परमार्थ-गोडी. भार्या आनंदी, पुण्याचे ज्ञानेश्वरी सांगणारे प्रसिद्ध नानामहाराज साखरे यांची मुलगी. कन्या गंगा, पुण्याचे मोरेश्वर कृष्ण आपटे दीक्षित यांची पत्नी.

* **गणेश विष्णु** (११) ज. पुणें, स. १८७४. ओव्हरसीअरची परीक्षा पास. पी. डब्ल्यु. खात्यांत ओव्हरसीअर होते. सध्यां पेन्शनर असून पुण्यास स्वतःचे घरांत (सदाशिव पेठ, घर नं. २२६) राहतात. मितव्यय व परमार्थगोडी हा यांचा विशेष गुण आहे. यांची शरीरप्रकृति निकोप असून शरीर धिप्पाड आहे. भार्या सरस्वती, भिडे यांजकडील. विवाह स. १८८८.

बाळकृष्ण गणेश (१२) ज. नागपूर, स. १८९८; मृ. स. १९१६. शिक्षण मॅट्रिक पर्यंत. विद्यार्थिदशेंत मृत्यु.

* **वामन गणेश** (१२) ज. बेळगांव, स. १९११. बी. एस्सी. १९३४ त होऊन सध्यां मुंबईस वेस्टर्न इंडिया ऑईल डिस्ट्रिब्युटिंग कंपनींत नोकरी आहे. भार्या शांता (मीनाक्षी), आजऱ्याचे दामोदर धोंडो बेहरे यांची मुलगी. विवाह स. १९३५. एक कन्या आहे.

* **नारायण गणेश** (१२) ज. नागपूर, स. १९१८. मॅट्रिक होऊन सब–ओव्हर-सीअर क्लासमध्यें पुणें येथें शिकत आहेत.

रंगनाथ सदाशिव (१०) मृ. स. १८८६. सरकारी नोकरी होती. हे चांगले मूर्तिकार होते. भार्या काशी, वाईचे पेठे यांजकडील. कन्या कृष्णा, धुळें येथील टकले यांजकडे दिली.

दत्तात्रेय रंगनाथ (११) ज. वाई, स. १८६३; मृ. १९१९. बी.ए. (१८८६), एल्एल्. बी. (१८९०). उमरावती, तेल्हारा व खामगांव येथें वकील होते. गायन व तालीम यांची आवड होती. भार्या (१) अभ्यंकर यांजकडील. कन्या माणकुबाई, इंदोरचे बापट यांजकडे दिली. भार्या (२) भटगुरुजी यांजकडील. कन्या चिणकुबाई, अकोला येथील फडके यांजकडे दिली. भार्या (३) गंगाबाई (वय ६१), दिनकर विनायक आठवले यांची मुलगी. दत्तक पुत्र रामचंद्र.

***रामचंद्र दत्तात्रेय** (१२) हे फडके घराण्यांतून दत्तक आले. ज. स. १९०४. एम्. बी. बी. एस्. (१९२७) झाले आहेत, व यांचा दवाखाना घर नं. ८८१ सदाशिव पेठ येथें स्वतःचे मालकीचे घरांत आहे. भार्या कमलाबाई, ज. स. १९११, रंगनाथ भालचंद्र वैशंपायन यांची मुलगी. कन्या इंदुमती, ज. स. १९३२.

***दत्तात्रेय रामचंद्र** (१३) ज. स. १९३०. मराठी शिक्षण घेत आहे.

***यशवंत रामचंद्र** (१३) ज. स. १९३६.

नारायण सदाशिव (१०) मृ. सुमारें स. १९१५.

भास्कर रामचंद्र (८) भार्या वाराणशी ऊर्फ अन्नपूर्णा.

वासुदेव गोविंद (११) भार्या अन्नपूर्णा.

लक्ष्मण विश्वनाथ ऊर्फ बाबूराव (४) यांना नाईक म्हणत. हे अक्षी–नागांव या भागांत होते. भार्या रखमा.

बाळकृष्ण बाबूराव (५) भार्या राधा.

मोरो बाळकृष्ण (६) भार्या सरस्वती.

भास्कर बाळाजी (५) हे केळशीस राहात होते. यांना नाईक म्हणत असत. यावरून हे सावकार होते असें दिसतें. मुर्डी-आंजर्ले वादांत यांचा उल्लेख आला आहे (ऐ. प्र. क्रमांक ३ व ६ पहा).

नारायण केशव (३) भार्या लक्ष्मी.

रामचंद्र बळवंत (५) हे गोळप येथें महाजन होते. सोलापुरापासून पांच कोसांवर रामपूर नांवाचें गांव आहे, तेथें यांनीं शेती संपादन केली, घर बांधून स्थायिक झाले. अद्यापि तेथें यांचें घर व शेती आहे. हे जिलेदार होते. भार्या जानकी.

जगन्नाथ रामचंद्र (६) हे रामपूर येथें जिलेदार होते. कन्या झुंगाबाई, अर्जुनसोंड्याचे गोडबोले यांस दिली.

विष्णु रामचंद्र (६) सोलापुरास व्यापाऱ्याकडे नोकर होते. भार्या लक्ष्मी, जांभुळपाडयाचे मोडक यांची मुलगी.

गोविंद विष्णु (७) उमरावतीस सरकारी नोकर होते. भार्या सत्यभामा, जमखिंडीच्या गोखल्यांची मुलगी.

रामचंद्र विष्णु (७) ज. स. १८३०, मृ. स. १९२७. रामपुरास वडिलार्जित शेती करीत. भार्या जानकी, जोश्यांची मुलगी. कन्या (१) बनू, सोलापूरचे फडके यांस दिली. (२) ताई, साताऱ्चे लिमये वकील यांची पत्नी. (३) विठाबाई, गोडबोले यांजकडे दिली. (४) गोदू, गुलबर्ग्याचे नारायणराव अभ्यंकर वकील यांची पत्नी.

नारायण रामचंद्र (८) ज. स. १८७०; मृ. स. १९०३. बडनेऱ्यास वकील होते. भार्या सावित्री, परांजपे स्टेशनमास्तर यांची मुलगी. कन्या (१) बयो, भालचंद्रपंत गोखले यांस; (२) मनू, नागपूरचे काशीनाथपंत जोशी यांस दिली.

कृष्णाजी रामचंद्र (८) रामपुरास वडिलार्जित शेती करीत. भार्या रुक्मिणी, सोलापूरच्या दात्यांची मुलगी. कन्या साळू, गाडगीळ यांस दिली.

यशवंत रामचंद्र (८) ज. स. १८७८; मृ. स. १९२३. जपान ट्रेडिंग कंपनीचे एजंट होते. भार्या रमा, सोलापूरच्या गाडगिळांची मुलगी. कन्या लीला, नागपूरचे बाबूराव फाटक यांस दिली.

* **भगवान यशवंत ऊर्फ बापू** (९) ज. स. १९०४. बी. ए. मुंबईस कापसाचा व्यापार करतात. ज्योतिषाचा बराच व्यासंग आहे. भार्या इंदिरा, वाईच्या साठ्यांची मुलगी.

विनायक विष्णु (७) वऱ्हाडांत सरकारी नोकर होते. भार्या गंगा, सोलापूरच्या फडक्यांची मुलगी. कन्या कृष्णा, सोलापूरचे विनायकराव गोरे यांस दिली.

विष्णु विनायक (८) ज. स. १८६७; मृ. स. १९३०. वऱ्हाडांत सब रजिस्ट्रार होते. भार्या (१) राधा, खामगांवच्या वझ्यांची मुलगी. भार्या (२) राधा, सोलापूरचे चक्रदेव यांची मुलगी. भार्या (३) राधा, नगरचे लेले तारमास्तर यांची मुलगी. कन्या सुशीला, ज. स. १९२४.

* **पंढरीनाथ विष्णु** (९) ज. स. १९०६. शिक्षण बी. ए. पर्यंत. पत्ता— हमालपुरा, उमरावती. वडिलार्जित शेती करतात. भार्या विमला, भंडाऱ्याचे गोपाळराव रानडे यांची मुलगी. कन्या सरोजिनी, ज. स. १९३३.

* **अच्युत पंढरीनाथ** (१०) ज. स. १९२८.

* **वसंत पंढरीनाथ** (१०) ज. स. १९३०.

* **भालचंद्र पंढरीनाथ** (१०) ज. स. १९३२.

* **शरच्चंद्र पंढरीनाथ** (१०) ज. स. १९३६.

नारायण रामचंद्र (६) वऱ्हाडांत नायब तहसीलदार होते. भार्या राधा, सोलापूरच्या दात्यांची मुलगी. कन्या (१) काशी, निलंगें येथील दातारांकडे; (२) मथू,

विजापूरच्या गोखल्यांस; (३) सखू, पुण्याचे पानवाले भिडे यांस दिली.

सदाशिव नारायण (७) निजामच्या राज्यांत पेशकार (अवल कारकून) होते. भार्या उमा, आपटयांची मुलगी. कन्या (१) रंगू, औरंगाबादचे भोगले यांस; (२) अंबू, हिंगोलीचे गोगटे वकील यांस; (३) आऊ, पटवर्धनांकडे; (४) हरणी, भावे यांजकडे दिली.

शंकर सदाशिव (८) वऱ्हाडांत सर्कल इन्स्पेक्टर होते. भार्या (१) पार्वती, टकल्यांची मुलगी. कन्या सखू, पुण्यास गोखल्यांकडे दिली. भार्या (२) पार्वती, नागपूरचे नरहरपंत लिमयांची मुलगी. पुत्र श्रीनिवास, माधव व पुरुषोत्तम. कन्या लीला, काशीचे पुराणिक यांस दिली.

***श्रीनिवास शंकर** (९) ज. स. १९१२. इंटर पास. उमरावतीस ब्रुक बाँड कंपनीचे एजंट आहेत.

***माधव शंकर** (९) ज. स. १९१४. मॅट्रिक. नागपुरास महालांत पॉप्युलर स्टोअर्समध्यें नोकरी आहे.

***पुरुषोत्तम शंकर** (९) ज. स. १९२१. पुणें येथें मॅट्रिकच्या वर्गांत आहेत.

गोपाळ सदाशिव (८) ज. स. १८६७; मृ. स. १९३७. रेल्वे नोकर होते. केडगांवचे श्रीनारायणमहाराज यांचे हे शिष्य होते. भार्या सरस्वती, पुण्याचे यशवंत गोविंद नातू यांची मुलगी.

***दिगंबर सदाशिव** (८) ज. स. १८९४ आक्टोबर २४. नागपूर येथें जी. आय्. पी. रेल्वेच्या डी. टी. एस्. च्या ऑफिसांत नोकरी. भार्या यमुना (दुर्गा), सोमणांची मुलगी. कन्या (१) शकुंतला, ज. स. १९२३; (२) प्रमिला, ज. स. १९२५.

हरी नारायण (७) ज. स. १८४५; मृ. स. १९१७. वऱ्हाडांत रेव्हिन्यूखात्यांत नोकरी होती. भार्या भागीरथी, सोलापूरच्या राजवाडयांची मुलगी. कन्या यमू, औरंगाबादचे यज्ञेश्वर महादेव मराठे यांची पत्नी.

महादेव हरी (८) विद्यार्थिदशेंत मृत्यु.

***जगन्नाथ हरी** (८) ज. श. १७९२ ज्येष्ठ वद्य ८. बी. एन्. रेल्वेंत नोकरी होती. १९२२ सालीं सेवानिवृत्त झाले. सध्यां नागपुरास सुखवस्तु आहेत. भार्या (१) यशोदा, दर्यापूरचे कृष्णशास्त्री पर्वते यांची मुलगी. भार्या (२) यशोदा, टेंभीमाकोडी (वऱ्हाड) येथील ओकांची मुलगी. कन्या माई, आर्वीचे शंकर पांडुरंग दामले, वकील यांची पत्नी.

लक्ष्मण हरी (८) मॅट्रिकचा अभ्यास चालू असतां सन १८९५ सालीं मृत्यु.

***केशव हरी** (८) ज. श. १८०३ कार्तिक शु. १२. जपान कंपनींत एजंट होते. सध्यां (धनतोली) नागपुरास सुखवस्तु आहेत. भार्या सीता, जामनेरचे नारायण विठ्ठल दामले यांची मुलगी. कन्या (१) यमू, उमरावतीचे कृष्णराव वझे यांची पत्नी. (२) कृष्णा, नागपूरचे रामचंद्र चिंतामण जोगळे-

कर यांची पत्नी. (३) काशी, ज. स. १९२४. इंग्रजी २ री. (४) सिंधु, ज. स. १९२७. मराठी ४ थी. (५) दुर्गा, ज. स. १९३०.

* **गणेश केशव** (९) ज. स. १९०५. यवतमाळास पी. डब्ल्यू. डी. मध्यें नोकरी आहे. भार्या (१) इंदिरा, राळेगांवचे पुरुषोत्तम रामचंद्र खरे, मास्तर यांची मुलगी. कन्या तारा, ज. स. १९३२. भार्या (२) इंदिरा, वर्ध्याचे शंकर गोविंद पटवर्धन यांची मुलगी. पुत्र प्रभाकर.

* **प्रभाकर गणेश** (१०)

* **वासुदेव केशव** (९) ज. स. १९१२. मॅट्रिक. नागपुरास व्हेटर्नरीखात्यांत कारकून आहेत.

* **नारायण केशव** (९) ज. स. १९१४. मॅट्रिक. पुलगांवास पी. डब्ल्य. डी. मध्यें ओव्हरसीअर आहेत.

* **गंगाधर केशव** (९) ज. स. १९१७. हायस्कूल विद्यार्थी, नागपूर.

* **दामोदर केशव** (९) ज. स. १९२० आक्टो. १६. मॅट्रिक. नागपूर येथें खाजगी नोकरी चितळे यांजकडे आहे.

* **रामचंद्र केशव** (९) ज. स. १९३३.

गंगाधर नारायण (७) ज. स. १८४९; मृ. स. १८९४. उमरावतीस सरकारी नोकर होते. भार्या रमा, विजापूरच्या पटवर्धनांची मुलगी. कन्या (१) गोदू, नागपूरचे विनायक काशीनाथ वैद्य यांची पत्नी. (२) गंगू, पालशेतचे विठ्ठलराव ओक यांची पत्नी.

* **वामन गंगाधर ऊर्फ बाळाभाऊ** (८) ज. स. १८७४. उमरावतीस सरकारी नोकरी होती. सध्यां साधुवृत्तीनें असतात. भार्या लक्ष्मी, उमरावतीचे गणपतराव सहस्रबुद्धे यांची मुलगी. कन्या वेणू, नागपूरचे श्रीकृष्ण दामोदर रानडे यांची पत्नी.

* **दत्तात्रेय वामन** (९) ज. स. १९०४. उमरावतीस डेअरीचा व्यवसाय असून वडिलार्जित शेती पाहतात. भार्या मालती, नागपूरचे पांडुरंग लक्ष्मण सहस्रबुद्धे यांची मुलगी. कन्या मंदाकिनी, ज. स. १९३३.

त्र्यंबक गंगाधर (८) ज. स. १८७५; मृ. स. १९०८. वऱ्हाडांत पटवारी होते भार्या भागीरथी, चांदूरच्या नामजोश्यांची मुलगी.

लक्ष्मण रामचंद्र (६) रामपूर येथें शेती करीत. भार्या अन्नपूर्णा.

रामकृष्ण लक्ष्मण (७) ज. स. १८५५; मृ. स. १९२७. वऱ्हाडांत पटवारी होते. भार्या गोपिका, विजापूरच्या गोखल्यांची मुलगी. कन्या (१) बहिणा, उमरावतीचे नरसिंहराव मराठे यांची पत्नी. (२) सई, खामगांवचे बाजीराव भिडे यांची पत्नी. (३) चंद्रा, मूर्तिजापूरचे दामोदर चिंतामण केळकर (वैद्य) यांची पत्नी.

विठ्ठल रामकृष्ण (८) ज. स. १८८२; मृ. स. १९२४. भार्या सत्यभामा, विजापूर येथील.

विश्वंभर रामकृष्ण (८) ज. स. १८९४; मृ. स. १९३५. वऱ्हाडांत पटवारी होते. भार्या सगुणा. कन्या (१) पिलू, उमरावतीचे गजानन विनायक सहस्रबुद्धे यांची पत्नी. (२) वेणू, ज. स. १९२९.

* **प्रभाकर विश्वंभर** (९) ज. स. १९२२. हायस्कूल विद्यार्थी.

* **भास्कर विश्वंभर** (९) ज. स. १९२४. प्राथमिक विद्यार्थी.

* **वैजनाथ रामकृष्ण** (८) ज. स. १८९६. मॅट्रिक. रेव्हिन्यूखात्यांत नोकरी आहे. पत्ता—पांडुरंग गोविंद यांची चाळ, अकोला. भार्या (१) कमला, कल्याणच्या सोमणांची मुलगी. भार्या (२) कमला, केशव राजाराम आठवले, स्टेशनमास्तर यांची मुलगी. कन्या (१) इंदु, ज. स. १९२७. (२) मालती, ज. स. १९३४. पुत्र मनोहर व लक्ष्मण.

* **मनोहर वैजनाथ** (९) ज. स. १९२२.

* **लक्ष्मण वैजनाथ** (९) ज. स. १९२५.

* **सखाराम रामकृष्ण** (८) ज. स. १८९८. पटवारी आहेत. पत्ता–बुधवारा, कुशाभाऊ भावे यांचा वाडा, उमरावती. भार्या अन्नपूर्णा (सुभद्रा), उमरावतीचे कुशाभाऊ भावे यांची मुलगी. कन्या द्रौपदी, ज. स. १९२८.

* **जनार्दन सखाराम** (९) ज. स. १९२३. इंग्रजी ३ री.

* **श्रीराम सखाराम** (९) ज. स. १९२५. प्राथमिक विद्यार्थी.

[घराणें २ रें, गोळप—धामापूर]

(वंशावळ पृ. ७४ ते ७७)

या घराण्याचा मूळ पुरुष विष्णु. कोंकणांतील मूळ ठिकाण गोळप. तेथून हा शके १५४५ च्या सुमारास धामापूर येथें आला. हें धामापूर रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वर तालुक्यांतील होय. (याच नांवाचें गांव मालवणजवळ तसेंच देवरुखजवळहि आहे.) **ग्रामदेवता :**—वागजाई व नवसरी. ब्राह्मणांचीं घरें १८–२० व एकंदर घरें ५०० आहेत. पेंडसे यांचीं दोन घरें आहेत. या घराण्याची एक शाखा सध्यां धामणी, तालुके संगमेश्वर येथें आहे. ह्या गांवची बागाइती पाटाचे पाण्यावर आहे. ब्राह्मणांचीं घरें चार असून त्यांत दोन पेंडसे आहेत. गांवांत लक्ष्मीकेशवाचें देऊळ आहे. सध्यां या घराण्यांतील मंडळींचें वास्तव्य अलीबाग, इंदूर, काशी, खालापूर, चिरनेर, ठाणें, धामणी, धामापूर, नांदिवडें, नाशिक, पनवेल, पुणें, पोलादपूर, बुरंबाड, महाड, माखजन, मुंबई व यवतमाळ या गांवीं आहे. पूर्वीं यांचें वास्तव्य ग्वाल्हेर, नातेंपुतें, पैठण, रत्नागिरी, शंभुमहादेव व शहागड या गांवीं असल्याचें आढळतें.

कुलस्वामी–कुलदेवता :—कोळिसरें (ता. रत्नागिरी) येथील लक्ष्मीकेशव व स्थानिक ग्रामदेवता यांस देवदिवाळीस नैवेद्य दाखवितात. पोलादपूर शाखेपैकीं गंगाधर कृष्ण (९) हे लक्ष्मीनारायण, नवसरी व वरदायिनी (वर्धन) या देवतांना नैवेद्य दाखवितात. महाड शाखेंतील हरीकृष्ण (८) हे वाडेश्वर व जोगेश्वरी या कुलदेवता मानितात व देवदिवाळीशिवाय फाल्गुन वद्य द्वितीयेस नैवेद्य दाखवितात.

धामापूर येथील पाटाचे पाण्याच्या तंटयाबद्दलचें पंतप्रतिनिधींचें एक आज्ञापत्र आहे. (सु. ११७३ रबिलावर ७ श. १६९५) त्यांत या घराण्यांतील केसो राघोस (६) गणोबा व कृष्णंभट पेंडसे यांनीं त्रास देऊं नये अशी आज्ञा आहे. या आज्ञापत्राचे काळांत गणोबा व कृष्णंभट या नांवाच्या व्यक्ति या घराण्याचे उपलब्ध वंशावळींत आढळत नाहींत; यावरून पेंडसे कुलाची दुसरी एक शाखा धामापुरास या सुमारास असावी व पुढें तेथून दुसरीकडे गेली असावी. हेदवीचे (क्र. १९) घराण्यांत याच सुमारास गणेश व कृष्ण अशा व्यक्ति पिढी ३ व २ मध्यें अनुक्रमें आहेत. आज्ञापत्रांत दिलेल्या व्यक्ति याच असाव्या असें वाटतें. पुढें धामापूर सोडल्यावर त्यांचें वास्तव्य हेदवीस (ता. चिपळूण) झालें असावें. धामापूरचें घराणें ज्याप्रमाणें मूळ गोळपहून येथें आलें तसेंच हेदवीचें घराणेंहि आलें असावें.

या घराण्यांत पिढ्या १३, एकूण व्यक्ति १३६ व जिवंत व्यक्ति ६१ आहेत.

विष्णु (१) हा गोळप, तालुका रत्नागिरी या गांवचे खोत मुळे यांजपाशीं भांडण होई म्हणून भाऊबंदापासून निघाला व धामापूर येथें येऊन तेथील सरदेसाई मावळंगकर यांजपाशीं यानें जागा मागितली. तेथें भयंकर रान होतें तें तोडून शेती व बागाईत तयार करण्याचे अटीवर त्यांनीं जागा दिली. त्याप्रमाणें शेती व बागायत तयार करून व घर बांधून हा तेथें राहिला. ही वसाहत शके १५४५ च्या सुमारास झाली. हा अतिवृद्ध होऊन वारला. याचेपासून चार पुरुष धामापूर येथेंच शेती करून राहिले.

महादेवभट बाळाजी ऊर्फ म्हादोराम (३) यांची जमीन देसाई मावळंगकर यांनीं घेतली त्याबद्दल यांचे सांगण्यावरून यांचा नातू राघो केशव यांनीं श. १६४४ पूर्वी जी हकीकत लिहून ठेविली आहे ती अशी :—

"आगरचे रानडे यांनीं मावळंगकराचे रोप लावणींत रात्रीस नेमावणी केली. मग सकाळीं गरगशा झाला व गांवची खबर मामल्यास गेली. तेथून अर्जी विजापुरीं गेली. त्या काळीं फरमान झालें जे नेमावणी केली त्यास जमीन मुकरर आहे. आगर मोडलेवर पहिला वतनदार असेल त्यास मुभा असे. त्याजवर देसाई यांनीं रानडे याजपासून लेख घेतला कीं आगर मोडलेवर मावळंगकराची जमीन सोडीन. याजवर मावळंगकरास शेत नाहीं मग आमचे शेत चारी पाटया*

* चारी पाटया म्हणजे लांब रुंद बरीच म्हणजे सुमारें प्रत्येकीं १ एकर अशीं ४ शेतें. हल्लीं याचें पीक ४–५ खंडी भात व १०–१२ मण पावटे होतें.

त्यास दिल्हे. ते काळीं वगवशिला नव्हता. देसाई बोलिले बाग मोडिली म्हणजे ते शेत जागा मावळंगकरास बहाल होईल. तुझें शेत मावळंगकरापासून तुला देऊं. यावर विजापुरास दिवाणांत जावयास कोणी धजेना. धाकटा भाऊ जरत्कारी रोगी. मधला भामबा तो संतान नव्हे म्हणून गरज नाहीं बोलिला. मी महादेवभटानें जावें तरी घरीं बायको मुलें व आगर मोठें त्याजला शेण टाळ कसा होईल. मोगलाई सरकार, बोली भाषा न ये. मग गरीब राहिलों. तेव्हां एक पाटी खाजणाचे जवळ कांहीं भरड जमीन व पोहोडी* टाकून दिलेली होती ती केली व गांवांतून जातों ऐसा निरोप मागों लागलों. तेव्हां देसाई मायेनें बोलले. आणभाक देऊन म्हणो लागले कीं तुझ्या वडिलांनीं वसाहत केली. तूं वतनदार आम्हांस हवास. तुला शेतें उदंड देऊं. हें शेत एव्हां कर तुज कर्तेपण येऊं दे. तुझींच शेतें तुला देऊं. मग मी मायेस गुंतलों. कोठें गेलों नाहीं." हीं शेतें पेंडसे यांस पुन: मिळालीं नाहींत. यास २–३ मुली होत्या.

कृष्णाजी महादेव (४) हा तरुणपणीं वारला.

राघो कृष्ण (५) हे विजापूरकर यांचे पदरीं नोकर होते. यांस ७ मुलगे तीन मुली झाल्या, परंतु सर्व मेल्यामुळें यांनीं सडिये–पिरंदवणें येथील 'बाळ पेंडसा' याचा मुलगा केशव यास दत्तविधान करून दत्तक घेतला. यांनीं आपले घराण्याची माहिती श. १६४४ चे पूर्वीं लिहून ठेविली आहे.

केशव राघो (६) मृ. श. १७१९ माघ व. १३. हे येथें दत्तक आले. यांचे जनक वडील सडियें-पिरंदवणेचे 'बाळ पेंडसे' हे होत. हे धामापूर येथें शेती करून असत. भार्या गंगा.

सदाशिव केशव (७) मृ. श. १७१२ माघ व. १४. नातेंपुतें. वय ५०. विजापूरकडील भागांत सरकारी जमीनमहसुलाचा वसूल करणारे मामलतदार होते. यांनीं बराच पैसा मिळविला.

गोविंद सदाशिव (८) ज. श. १६९३; मृ. श. १७२४ मार्ग. शंभुमहादेव. हे स. १७९७ मध्यें पेशवे यांचे एकबेरजी दपतरांत कारकून होते. यांस रु २५० पगार व $\frac{५०}{२}$ आंखाचें कापड मिळत असे. (दुसरे बाजीराव रोजनिशी ३।२९) भार्या ताई ऊर्फ सत्यभामा. मृ. श. १७८० (ऐ. प्र. क्रमांक १२ पहा). कन्या २.

वासुदेव केशव (७) मृ. श. १७३८ आषाढ शु. ४. धामापुरास शेती व भिक्षुकी करून असत. भार्या आनंदी, मृ. श. १७६५ ज्येष्ठ व. ४.

विनायक वासुदेव (८) मृ. श. १७६० चे सुमारास. प्रथम नोकरी होती. नंतर शेती करून असत. शेवटीं संन्यास घेतला होता. यांची समाधि धामापूर येथें श्रीदत्तमंदिराचे पश्चिमेस बांधिलेली आहे.

---

*पोहोडी म्हणजे नदीचें पाणी आंत शिरून रुंद तोंड झालेली रोज भरती ओहटी असलेली जागा.

नरहरी विनायक (९) हे प्रथम ग्वाल्हेरकडे नोकरीस असत. नंतर विरक्त होऊन बैराग्याच्या वेषानें नर्मदातीरीं राहात. भार्या रमा, संगमेश्वर देवपाटचे फाटकांकडील.

नारायण नरहरी (१०) मृ. वय ३०. लहानसान उद्योगधंदा करून धामापुरास राहात. भार्या भवानी, बुरंबाडच्या विष्णुपंत सहस्रबुद्धयांची मुलगी. मृ. श. १८५७, वय ७५.

हरी वासुदेव (८) ज. श. १६९८; मृ. श. १७२१. स्त्री समागमें गेली.

विष्णु वासुदेव (८) मृ. श. १७२५.

राघो केशव (७) मृ. श. १७४२ भाद्र. शु. ९. वय अजमासें ६०. हे विजापुराकडे वसुली मामलेदार होते. मोडी हस्ताक्षर चांगलें होतें. भार्या सत्यभामा.

विसाजी राघो (८) मृ. पुणें श. १७४० पौष शु. ४. वय ५०. धामापुरास सुखवस्तु होते.

गंगाधर विसाजी (९) ज. श. १७१८. धामापुरास शेती करीत. हे दत्तभक्त होते म्हणून काशीनाथबोवा जोशी यांस यांनीं दत्तमंदिर बांधण्यास आपली जागा मोफत दिली. हे विरक्त होते. परमार्थचिंतनांत काळ घालवीत. भार्या दुर्गा.

वासुदेव गंगाधर (१०) भार्या अन्नपूर्णा (आऊ), कळंबुशीचे काशीनाथ बल्लाळ वेलणकर यांची मुलगी.

चिंतामणि गंगाधर (१०) हे धामापुरास शेती करीत. नंतर तें गांव सोडून पोलादपूर येथें कायमचे राहण्यास गेले. भार्या सरस्वती.

कृष्णाजी चिंतामणि (११) मृ. वय ६०. पोलादपुरास शाळामास्तर होते. प्रतापगडच्या श्रीभवानी देवीस इनाम असलेल्या पोलादपूरजवळील गांवची वहिवाट पाहात असत. भार्या राधा (भीमा), जनार्दन बाजी भागवत यांची मुलगी. कन्या (१) चंद्रा, माणगांवचे वामनराव भाटयांची पत्नी; (२) सुंदरा, वाईचे विश्वनाथपंत लेल्यांची पत्नी; (३) काशी, इंदूरचे नातू यांची पत्नी.

* **गंगाधर कृष्ण** (१२) वय ५५. पेन्शनर शाळामास्तर. सध्यां वास्तव्य पोलादपूर. भार्या भागीरथी, गोडश्यांकडील.
* **रामचंद्र गंगाधर** (१३) वय ३०. ठाण्यास मोटारड्रायव्हर आहेत.
* **चिंतामणि गंगाधर** (१३) वय २४. पोलादपुरास खासगी नोकरी आहे.
* **दत्तात्रेय गंगाधर** (१३) वय २०. अलीबागेस पोलिसकॉन्स्टेबल आहेत.
* **लक्ष्मण गंगाधर** (१३) वय १५. नाशिकास अनाथ विद्यार्थी गृहांत शिक्षण चालू आहे.
* **प्रभाकर गंगाधर** (१३) वय १०. पोलादपुरास मराठी ६ वींत आहे.
* **गजानन कृष्ण** (१२) वय ४२. पनवेल, सजा चिरनेरचे तलाठी आहेत. भार्या यमुना, विद्वांसांकडील.

* **बंडू गजानन** (१३) वय १५. पनवेलीस शिकत आहे.

* **विष्णु कृष्ण** (१२) वय ३७. जी. आय्. पी. रेल्वेंत मुंबईस नोकरी आहे. वास्तव्य, ४३ नवी ब्राह्मणवाडी, नौपाडा, ठाणें. भार्या गणपुल्यांकडील.

पुरुषोत्तम चिंतामणि (११) मृ. सुमारें वय ६०. गाडी हांकण्याचा धंदा करीत. अविवाहित होते.

केशव विसाजी (९) ज. श. १७२०. हे धामापुरास शेती वगैरे व्यवसाय करून असत. भार्या लक्ष्मी.

रामकृष्ण केशव (१०) मृ. वय सुसारें ६०. हे कोर्टदरबारी कामांत विशेष हुशार होते. भार्या भागीरथी.

गोविंद रामकृष्ण (११) हे पोलीसखात्यांत नोकर होते. कन्या सुंदरा (अन्नपूर्णा), जुन्नरच्या गणपुल्यांकडे दिली.

* **श्रीपाद गोविंद** (१२) हे मुंबईस 'हिंदी स्त्रियांचे युनिव्हर्सिटींत' नोकरीस आहेत. भार्या कमला, वाईचे विनायकशास्त्री रानडे यांची मुलगी. कन्या (१) शांता, वय ४; (२) कृष्णा.

मोरो रामकृष्ण (११) मृ. वय ६०. पुण्यास सर्व्हेखात्यांत नोकर होते. अविवाहित.

गजानन रामकृष्ण (११) हे इंदूरकडे नोकर होते असें कळतें.

* **मुकुंद गजानन** (१२) हे इंदूरकडे मोटारचे धंद्यांत असतात.

वासुदेव रामकृष्ण (११) हे रेव्हेन्यूखात्यांत नोकर होते. कन्या (१) मनू, गोखल्यांकडे; (२) अंबू, माहुली येथें; (३) गौरी, नाशिकच्या खऱ्यांकडे दिली.

सीताराम केशव (१०) मृ. वय ७६. धामापुरास सावकारी करीत.

वामन सीताराम (११) मृ. वय ५०. धामापुरास व्यापार करीत. यांनीं बराच पैसा मिळविला. यांना फौजदारी खटल्यांत कांहीं शिक्षा झाली होती.

विष्णु वामन (१२) वयाच्या २० व्या वर्षी क्षयानें मृत्यु.

* **कृष्णाजी वामन** (१२) वय ३२. अविवाहित. धामापुरास असतात.

* **श्रीधर सीताराम** (११) वय सुमारें ६८. धामापुरास सुखवस्तु आहेत.

* **अनंत श्रीधर** (१२) वय १८. मॅट्रिक. धामापुरास असतात.

श्रीराम केशव ऊर्फ पिलू (१०) मृ. वय सुमारें ५० ते ५५. काशीस राहून संस्कृत शिकले होते. वयाच्या ३०।३५ च्या सुमारास घरीं येऊन शेती करूं लागले. भार्या रखमा.

* **विठ्ठल श्रीराम** (११) वय सुमारें ३०।३५. खानदेशांत जंगलखात्यांत राउंड-गार्ड आहेत.

जयराम केशव (१०) पुण्यास कोर्टांत कारकून होते असें समजतें. भार्या गंगा.

गणेश जयराम ऊर्फ बन्या (११) मृ. वय सुमारें ६०. भस्मक रोगानें मृत्यु.

पुण्यास कोर्टांत कारकून होते. भार्या बुरंबाडच्या नामजोश्यांकडील. कन्या (१) धोंडी (रमा), रत्नागिरीचे बाबूराव वैद्य यांस; (२) दुर्गा (रमा), रत्नागिरीच्या लिमयांकडे दिली.

आत्माराम केशव (१०) मृ. वय सुमारें ७५. अविवाहित होते. यांनीं तीनचार वेळां पायीं काशी, रामेश्वर वगैरे तीर्थयात्रा केल्या. नेपाळांतून रुद्राक्षांचीं रोपें आणून धामापुरास लाविलीं. शेवटीं संन्यास घेतला होता. पोलादपूर येथें समाधिस्थ झाले.

रघुनाथ केशव (१०) शरीरानें सुदृढ होते. यांनीं पायीं यात्रा करून गंगेची कावड रामेश्वरास घालून तेथील सेतु नेऊन गंगेंत टाकला. कन्या कृष्णा (ताई), नांदिवडेचे भावे यांजकडे दिली.

महादेव विसाजी ऊर्फ आबा (९) ज. श. १७४१; मृ. स. १९००. हे धामापुराहून राजवाडी येथें आले व तेथून धामणी, तालुका संगमेश्वर येथें जाऊन राहिले व तेथें जमीन संपादन केली. यांस बागेचा फार शोक होता व स्वतःकरितां पाण्याचा पाट बांधून आणिला. हे धार्मिक वृत्तीचे होते. दरसाल शंभर ब्राह्मणांस पंचपक्वान्नाचें भोजन घालीत. सहस्रभोजनहि घातलें. व्यापारहि करीत असत. भार्या पार्वती, संगमेश्वरच्या (कसबा) जोश्यांकडील. कन्या (१) काशी, संगमेश्वरच्या जोश्यांकडे दिली. (२) बगू, सरंदचे सीतारामपंत भागवत यांची पत्नी.

बाळकृष्ण महादेव (१०) ज. धामापूर श. १७६२ कार्तिक व. १०; मृ. श. १८४३. हे धामणी येथें सावकारी व शेती करीत. धार्मिक वृत्तीचे व लोकप्रिय होते. हे पितृभक्त होते. प्रातःकाळीं उठल्याबरोबर वडिलांचे पायावर मस्तक ठेवावयाचें व सायंकाळीं त्यांचें पादसंवाहन करावयाचें हा यांचा नियम असे. यांनीं शेंबवणें, करजुंवे व गोळवली येथें मिळकत संपादन केली. यांचे घरावर दरवडा पडला असतां यांस बरेंच नुकसान आलें व मार बसला. भार्या (१) यमुना (वालू), बुरंबाडच्या बाळकृष्णपंत साठ्यांची मुलगी. पुत्र रावजी. कन्या सीता, नीवेंच्या (ता. संगमेश्वर) रामचंद्र केशव गोडबोल्यांची पत्नी. भार्या (२) आनंदी, ज. श. १७९६ आषाढ शु. ५; वाशीचे रावसाहेब भावे यांची चौथी मुलगी.

रावजी बाळकृष्ण (११) ज. धामापूर श. १७९१ वैशाख व. ६; मृ. श. १८४९. जलोदर. धामणीस सावकारी करीत. धार्मिक वृत्तीचे असून गायनाचा नाद होता. भार्या सावित्री (सुंदरा), खडपोलीच्या पद्माकर महादेव बापटांची मुलगी. कन्या (१) नर्मदा, ज. श. १८२३ वैशाख व. ४. कळंबुशीच्या महादेव आत्माराम भाव्यांची पत्नी. (२) कृष्णा, ज. श. १८२५ माघ व. ११ कोळवलीच्या पुरुषोत्तम कृष्णाजी साखरकरांची पत्नी. (३) गंगू, ज. श. १८३० माघ शु. ११. बुरंबाडच्या गोविंद सीताराम सहस्रबुद्धे यांची पत्नी.

(४) शांता, ज. श. १८३२ चैत्र शु. १०. देवरुखचे प्रल्हाद श्रीधर गोडबोले यांची पत्नी.

* **रघुनाथ रावजी** (१२) ज. श. १८२८, आषाढ शु. ५. धामणीस शेती व खोती करतात. यांच्याकडे धामणी व शेंबवणें गांवांची खोती आहे. भार्या यमुना (गंगू), ज. श. १८३१, अधिक श्रावण व. ५. केशव महादेव सहस्रबुद्धयांची मुलगी. कन्या (१) सुमति, ज. स. १९२७ आक्टोबर २१. मराठी शिकते. (२) इंदु. (३) यशोदा, ज. स. १९३३ जानेवारी १६.

* **बाळकृष्ण रघुनाथ** (१३) ज. श. १८५६. बुरंबाड.

* **जयंत रघुनाथ** (१३) ज. श. १८५८, वैशाख शु. ५. धामणी.

* **महादेव रावजी** (१२) ज. श. १८३४ फाल्गुन शु. १४. धामणी. धामणीस शेती करतात व शिवणकाम शिकतात.

* **पुरुषोत्तम रावजी** (१२) ज. श. १८३७ अधिक वैशाख शु. १५. धामणी. बुरंबाडास व्यापार करतात.

* **विनायक रावजी** (१२) ज. श. १८४३. चैत्र व. ४. धामणी. मराठी ७ वी.

* **शंकर रावजी** (१२) ज. श. १८४६ श्रावण शु. ११. धामणी. इंग्रजी पहिली.

हरी महादेव (१०) मृ. श. १८४३. जुलाब. धामणीस सावकारी करीत. कोर्टकचेरीच्या कामांत वाकबगार असत. भार्या (१) सगुणा. कन्या (१) मथुरा, वाशीच्या गानूंकडे दिली. (२) बनी, बुरंबाडच्या आत्माराम गंगाधर सहस्रबुद्धयांची पत्नी. (३) चंद्री, आंबवच्या गोविंद विश्वनाथ पोंक्ष्यांची पत्नी. भार्या (२) रमा (काशी), लक्ष्मण रामकृष्ण सहस्रबुद्धयांची मुलगी. कन्या (१) सई, ज. श. १८२० मार्ग. व. ५. बुरंबाडच्या सदाशिव अनंत साठ्यांची पत्नी. (२) ठकी, ज. श. १८२२ माघ शु. ९. संगमेश्वरच्या रामचंद्र भिकाजी जोश्यांची पत्नी. (३) सुंदरी, सत्कोंडीच्या दामोदर बल्लाळ जोगांची पत्नी. (४) गोदू, जळगांवच्या श्रीकृष्ण वामन जोश्यांची पत्नी. (५) रंगू, रत्नागिरीच्या विश्वनाथ भार्गव मराठ्यांची पत्नी.

* **दत्तात्रेय हरी** (११) ज. श. १८३०. बुरंबाड. धामणीस शेती व खोती करतात. भार्या लक्ष्मी (द्वारका), बुरंबाडच्या आत्माराम जगन्नाथ नामजोश्यांची मुलगी. कन्या (१) द्रौपदी, वय ५. (२) मालती, वय ३.

* **श्रीकृष्ण दत्तात्रेय** (१२) ज. श. १८५२. बुरंबाड. विद्यार्थी.

* **वसंत दत्तात्रेय** (१२) ज. श. १८५७. बुरंबाड.

* **गंगाधर हरी** (११) ज. स. १९१० ऑगस्ट १०. बुरंबाड. धामणीस पोलिस-पाटील आहेत. भार्या राधा (ऐलु), (कसबा) संगमेश्वरच्या चिंतामणि श्रीकृष्ण फाटकांची मुलगी.

* **यशवंत गंगाधर** (१२) ज. श. १८५६. धामणी.

* **दिनकर गंगाधर** (१२) ज. श. १८५८. धामणी.

* अनंत हरी (११) ज. श. १८४३ चैत्र शु. १ धामणी. मराठी ४ थी.

रावजी रघुनाथ (८) काशीस मृ. श. १७५८ आषाढ व. १०.

शिवराम रघुनाथ (८) ज. श. १७१७; मृ. श. १७४९ ज्येष्ठ शु. ३.

विठ्ठल रघुनाथ (८) ज. श. १६९८ फाल्गुन; मृ. श. १७३५ चैत्र. स्त्री समागमें गेली.

महीपति रघुनाथ (८) ज. श. १७०७.

बापूजी केसो ऊर्फ शंकर (७) मृ. श. १७५८ फाल्गुन शु. ४. हे श. १६९० च्या सुमारास पुण्यास आले. श्रीभीमाशंकरच्या मंदिराचे दुरुस्तीचें काम चालू होतें त्याकडे यांस कारकुनाची जागा मिळाली. तेथें २०।२५ वर्षे काम केल्यावर यांस पेशवे सरकारकडून दरमहा ३० रुपये पेन्शन मिळालें. पुढें हे धामापुरास जाऊन राहिले, व उरलेलें २५।३० वर्षांचें आयुष्य यांनीं ईश्वर उपासनेंत घालविलें. यांना लेखनाचा बराच नाद होता. यांनीं भारतांतील कांहीं पर्वें, रामविजय इत्यादि ग्रंथांच्या नकला व कांहीं नित्यकर्मोपयोगी पोथ्या लिहून ठेविल्या आहेत. यांचें अक्षर उत्तम वळणदार होतें.

मोरो बापूजी ऊर्फ आण्णा (८) ज. श. १७१५; मृ. श. १७८७ श्रावण शु. ८. वयाच्या १३ व्या वर्षी धामापुराहून पुण्यास आले. यांना ठाणें जिल्ह्यांतील बेलापूर सज्यास तलाठी नेमण्यांत आलें. नंतर श. १७५५ च्या सुमारास कोंकणपट्टीवर कस्टम खात्यांत सरकारकून म्हणून यांची नेमणूक झाली. यांनीं सावकारी करून बराच पैसा मिळविला. व्याज बेताचेंच घेत असत. यांनीं आपल्या कारकीर्दीतील जमाखर्च व्यवस्थित लिहून ठेविला आहे, त्यावरून त्या काळच्या परिस्थितीचें बरेंच ज्ञान होतें. यांचे वडील वारल्यानंतर भाऊबंदांनीं यांची सर्व इस्टेट वडिलांकडून खरेदी केल्याचा बनावट कागद तयार केलेला यांस दाखविला. तो पाहून मोरोपंत आण्णा यांनीं श्रीदत्तमंदिरांत जाऊन उपोषणास सुरुवात केली. तेव्हां तेथील बऱ्याच सभ्य मंडळींनीं भाऊबंदांनीं तयार केलेला खरेदीचा बनावट कागद भाऊबंदांकडून रद्द करविला. यांनीं आपले गुरु गोविंदभट चिमणभट पाटणकर यांस गहाणमुक्त केलें. यांनीं इतर दानधर्महि बराच केला. भार्या गंगा (मथुरा), घोटवडचाचे बल्लाळपंत नातूंची मुलगी. कन्या मनू, माखजनच्या रामचंद्र महादेव फाटकांची पत्नी.

दामोदर मोरो ऊर्फ बाबा (९) हे आपले चुलतबंधु जनार्दन नारायण यांच्या आश्रयानें वकिलीचा अभ्यास करून महाडास वकील झाले. तेथें यांनीं चांगला नांवलौकिक व पैसा मिळविला. आपल्या नित्यनैमित्तिक कर्मांत व्यत्यय येऊं नये म्हणून यांनीं काशी, रामेश्वर येथील यात्रा बैलगाडीनें केल्या. यांनीं शेवटीं संन्यास घेतला होता. यांची समाधि महाड येथें काकरतळ्यावर यांचे घराशेजारीं आहे. भार्या रमा, खेरशेतच्या जोश्यांकडील. कन्या (१) बाया

पोंक्ष्यांकडे; (२) आवडी, करमरकरांकडे; (३) गोदू, आपटयांकडे; (४) अनसूया, ओकांकडे दिली.

जगन्नाथ दामोदर (१०) वडिलांचे हाताखालीं कारकुनाचें काम करीत. भार्या लक्ष्मी, नामजोश्यांकडील. कन्या एक.

सदाशिव जगन्नाथ (११) भार्या सुंदरा, वामन कृष्णाजी चितळे यांची मुलगी.

***दामोदर सदाशिव** (१२) हे बुरंबाडास असतात.

***चिंतामणि जगन्नाथ ऊर्फ नथू** (११) मुंबईस 'आठवले-शहाडे आणि कंपनी-' मध्यें नोकर आहेत.

बाळकृष्ण दामोदर (१०) मृ. वय ५५, मधुमेह. हे कोर्टांत नोकर होते. भार्या सत्यभामा, दाबक्यांकडील.

***गोपाळ दामोदर** (१०) ज. श. १७९७ आषाढ व. २. बी. ए. (१९०२) होऊन रेव्हेन्यू खात्यांत नोकरीस लागले, व महालकरी होऊन पेन्शन घेतलें. सध्यां महाड येथें काकरतळचाजवळ स्वतःचे घरीं असतात. भार्या अन्नपूर्णा, मराठ्यांकडील. कन्या (१) माई, केळकरांकडे; (२) वेणू, पटवर्धनांकडे; (३) आऊ, सहस्रबुद्ध्यांकडे; (४) सुंदर, केळकरांकडे; (५) इंदु, पाटणकरांकडे दिली. (६) गंगू.

***महादेव गोपाळ** (११) ज. स. १९०४, महाड; शिक्षण इंटर आर्टस्पर्यंत. खालापुरास भाताची गिरणी चालवितात. भार्या सुशीला, बर्व्यांकडील. कन्या (१) सुमन, (२) मालती.

***विश्वनाथ गोपाळ** (११) ज. स. १९०६, गोरेगांव; काशीस हिंदु युनिव्हर्सिटीचे ग्रॅज्युएट आहेत. भार्या उमा, वैद्यांकडील. कन्या सरला.

***वसंत विश्वनाथ** (१२)

***कृष्णाजी गोपाळ** (११) ज. स. १९०८, गोरेगांव; बी. एस्सी. (इंजिनिअरिंग), मुंबई येथें ड्राय आइस कार्पोरेशन ऑफ इंडिया लि० दादर ह्यामध्यें असतात.

राजाराम मोरो (९) ज. श. १७६२ फा. शु. ७; मृ. श. १८३४ श्रा. शु. १३; अर्धांग वायूनें. यांनीं वकिलीचा अभ्यास केला होता व बंधु दामोदर मोरो यांचे मदतीस कांहीं दिवस महाडास असत. पुढें धामापुरास येऊन शेती व सावकारी करीत. परंतु सावकारींत यांस बरीच बूड आली. तथापि कोणावर फिर्याद केली नाहीं. यांनीं अनेक गरिबांचीं लग्नें केलीं व कांहींना घरें बांधून दिलीं. बाजीभट पेंडसे यांनीं स्थापन केलेल्या श्रीगणपतीचें मंदिर यांनीं बांधिलें. छत्तीस वर्षें असलेलें गांजाचें व्यसन यांनीं मातोश्रींच्या पायांची शपथ घेऊन एकदम सोडलें. यांचें माखजन पेठेंत कापडाचें दुकान होतें. हे पूर्ण कर्मठ असून इंग्रजी आचारविचार यांना आवडत नसत. भार्या

(१) भातगांवच्या रानड्यांची मुलगी. पुत्र बापूजी. कन्या यमुना, पाग–चिपळूणच्या विठ्ठल दिनकर रानड्यांची पत्नी. भार्या (२) आनंदी (यमुना), आंबवच्या परशुराम यादव पोंक्ष्यांची मुलगी, आज वय सुमारें ७५. पुत्र जनार्दन, केशव व दामोदर. कन्या (१) पिठी, ज. श. १८०८. चिपळूणच्या गजानन मोरेश्वर दातारांची पत्नी. (२) कृष्णा, ज. श. १८१४. नांदिवडेच्या भास्कर रामचंद्र जोगांची पत्नी.

बापूजी राजाराम (१०) ज. सुमारें श. १७७५; मृ. श. १८४३; अर्धांग वायूनें. इंग्रजी ६ वीपर्यंत शिक्षण झालें. बुद्धिमान होते. परंतु इंग्रजी शिक्षणानें आचार बिघडतो यामुळें वडिलांनीं पुढील शिक्षण घेऊं दिलें नाहीं. हे तालीमबाज होते. भजन चांगलें करीत. कापडाचें दुकान चालवीत. भार्या (१) भागीरथी, ढोकमळ्याचे रिसबुडांची मुलगी. भार्या (२) सरस्वती (बया), शिरळच्या काशीनाथपंत साठ्यांची मुलगी. पुत्र दत्तात्रेय व पुरुषोत्तम. कन्या (१) वाराणशी, ज. श. १८२१. दाभोळच्या बाळकृष्णपंत गोंधळेकरांची द्वितीय पत्नी. (२) ठकी, ज. श. १८२३. मोभारच्या (चिपळूण) आत्मारामपंत रानड्यांस; (३) सई, ज. श. १८२९ बुरंबाडचे जोश्यांकडे; (४) एशी, बुरंबाडचे शिवराम त्र्यंबक नामजोशी यांस; (५) रंगी, देवरुखचे डॉ. गोडबोले यांस; (६) शांती, विनायकराव दामल्यांस दिली.

दत्तात्रेय बापूजी (११) ज. श. १८२५ आश्विन व. १२, मृ. समयीं वय २०, आमांशानें. मॅट्रिक पास होते.

* **पुरुषोत्तम बापूजी** (११) ज. श. १८३३ अधिक ज्येष्ठ, धामापूर; मॅट्रिक. लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिटयूटची परीक्षा दिली आहे. भारत इन्शुअरन्स कंपनींत मुंबईस नोकर आहेत. कायद्याचा अभ्यास केला आहे.

* **जनार्दन राजाराम** (१०) ज. श. १८१० श्रा. शु. ११. धामापुरास शेती, खोती, सावकारी व व्यापार करतात. मावळंगें गांवांतील खोती हिस्सा यांनीं खरेदी केला आहे. जुन्या मोरोपंतादिकांच्या कवितांची यांना फार आवड आहे. हे अत्यंत कर्मनिष्ठ असून दत्तोपासक आहेत. गुरुचरित्राचीं अनेक पारायणें केलीं आहेत. वडिलांच्या वेळची हलाखीची स्थिति यांनीं सुधारली आहे. भार्या सीता, किन्हळच्या विसुतात्या दाबक्यांची मुलगी. कन्या सुंदरी (पार्वती), ज. श. १८३१ चैत्र शु. ५. बुरंबाडच्या भार्गव विठ्ठल नामजोश्यांची पत्नी.

* **श्रीराम जनार्दन** (११) ज. श. १८४४ वै. व. ३०. इंग्रजी २ री, माखजन.

* **नारायण जनार्दन** (११) ज. श. १८४८ अधिक ज्ये. व. १२, मराठी ३ री.

* **परशुराम जनार्दन** (११) ज. श. १८५२ आश्विन शु. १२, मराठी पहिली.

* **जयराम जनार्दन** (११) ज. श. १८५६.

* **केशव राजाराम** (१०) ज. स. १८९० डिसें. १९. पहिल्या वर्षाचे ट्रेंड. इंग्रजी

शिक्षण ६ वीपर्यंत. कौटुंबिक अडचणीमुळें पुढील शिक्षण घेतां आलें नाहीं. सध्यां नांदिवडेच्या मराठी शाळेचे हेडमास्तर आहेत. ट्रेनिंग कॉलेजचे परीक्षेस बाहेरून बसले व उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांस खाजगी रीतीनें शिकवितात, पण पैसे घेत नाहींत. खाजगी रीतीनें संस्कृत, ज्योतिष, वैद्यक, कायदा व जुन्या मराठी संत कवींचें काव्य यांचा अभ्यास केला आहे. स्वतःच्या ज्ञानाचा दुसऱ्यास पुष्कळ उपयोग करून दिला व त्याबद्दल मोबदला घेतला नाहीं. लेखन व काव्य यांचा नाद आहे व कांहीं लेख व काव्य निरनिराळ्या ठिकाणीं प्रसिद्ध झालें आहे. अद्यापि कित्येक लेख प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. कीर्तनाचा व्यासंग असून त्यांत स्वतः रचलेल्या आख्यानांचा उपयोग करतात. यांच्या खाजगी इंग्रजी शाळेच्या प्रयत्नांतूनच आजचें माखजन इंग्लिश स्कूल झालें आहे. कांहीं दिवस मुंबईस व्यंकटेश्वर प्रेसमध्यें नोकरी केली. अनेक खेळांत प्रावीण्य मिळविलें आहे. भार्या लक्ष्मी (यमुना), वय ३७. बुरंबाडच्या सखाराम विष्णु सहस्रबुद्धयांची मुलगी. कन्या (१) रंगी, ज. श. १८३८. रत्नागिरीच्या माधव चिंतामण दीक्षित पाटणकरांची पत्नी. (२) चंपी, ज. श. १८४३. मराठी ४ थी. (३) अहिल्या, ज. श. १८४७. मराठी ४ थी.

* **अच्युत केशव** (११) ज. श. १८५१ वै. व. १४. मराठी ३ री. विशेष बुद्धिमान् आहे.

* **गोविंद केशव** (११) ज. श. १८५३ मार्ग. व. ४. मराठी पहिली.

* **वासुदेव केशव** (११) वय ३.

* **दामोदर राजाराम** (१०) ज. श. १८२६ वै. व. ७. यांचें स्टेशनरी, कापड, किराणा वगैरे मालांचें दुकान आहे. मुळशी सत्याग्रहांत भाग घेतल्यामुळें यांना सहा महिने शिक्षा झाली होती. शरीरयष्टि अतिशय सुदृढ आहे. भार्या गंगा (येसू), ताम्हनमळ्याच्या नीळकंठ सखाराम गोखल्यांची मुलगी. कन्या (१) शकुंतला, वय ३. (२) सुमन, वय १.

* **श्रीकृष्ण दामोदर** (११) ज. श. १८५३. बालवर्ग.

विठ्ठल बापूजी (८) हे वडिलांबरोबर पुण्याकडे नोकरीस होते. तिकडेच वारले. मृ. श. १७३५ चै. शु. ४. यांच्या मृत्यूची वार्ता ऐकतांच यांची भार्या रखुमाई ही धामापुरास सती गेली.

रामचंद्र बापूजी (८) ज. श. १६९९.

नारायण बापूजी (८) हे धामापुरास असत. भार्या भागीरथी.

जनार्दन नारायण (९) ज. धामापूर; मृ. वय ८२. महाडास दुकानदारी करीत. भार्या लक्ष्मी, भागवतांकडील.

धोंडो जनार्दन (१०) मृ. वय ४५. प्रथम मराठी शिक्षक होते. नंतर वडिलांचें दुकान चालवूं लागले. भार्या पार्वती, पोंक्ष्यांकडील.

नारायण धोंडो (११) मृ. प्लेगनें १८ व्या वर्षी. नोकरी करीत.

* **रामचंद्र धोंडो** (११) ज. महाड, वय ५३. यवतमाळ येथील अवधूतवाडींतील दत्तमंदिराचे पुजारी आहेत. अविवाहित.

कृष्णाजी जनार्दन (१०) ज. धामापूर मृ. स. १९३२, वय ८२. महाडास कोर्टांत कारकून होते. यांनीं आपले वडील बंधूंचें कर्ज फेडून त्यांस ऋणमुक्त केलें. स्वभाव करारी व सद्वर्तनी. भार्या रखुमाई, जोश्यांकडील.

* **हरी कृष्ण ऊर्फ भाऊसाहेब** (११) ज. स. १८७८ मार्च २८; महाड. मॅट्रिक. मुंबईस अकौंटंट जनरलचे ऑफिसांत सीनिअर अकौंटंट होते. सध्यां पेन्शन घेतलें असून ठाण्यास नौपाडा ब्राह्मण को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटींत स्वतः-चें घर नं. ३७ मध्यें राहिले आहेत. सहकारी चळवळीची आवड आहे. यांनींच "नौपाडा ब्राह्मण को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी" स्थापन केली. तिचे ३ वर्षें अध्यक्ष होते. त्या कार्यांत बरेच श्रम झाले व थोडी झीजहि सोसावी लागली. कार्य निःस्वार्थ बुद्धीनें केलें. वसाहतींतील मुलांच्या शिक्षणाकरितां खाजगी मराठी शाळा स्थापन केली. "नौपाडा ग्रामपंचायत" स्थापन केली व स. १९३५ त या संस्थेचे सरपंच होते. नोकरीवर असतांना ऑफिसमध्यें "सहकारी पतपेढी" काढली. तिचे ५ वर्षें अध्यक्ष होते. ठाण्यास भाऊसाहेब पेंडसे या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांनीं बऱ्याच तीर्थयात्रा व प्रवास केला आहे. भार्या (१) गंगा, विवाह स. १८९९. काण्यांकडील. भार्या (२) भागीरथी, विवाह स. १९०१. कापरेकरांकडील. भार्या (३) लक्ष्मी, विवाह स. १९१४ पोंक्ष्यांकडील. पुत्र पद्माकर. कन्या (१) कमल, ज. स. १९२४. (२) कुसुम, ज. स. १९२७. (३) सुमन, ज. स. १९३६.

* **पद्माकर हरी** (१२) ज. स. १९३० फेब्रुवारी १३. बालवर्ग.

* **लक्ष्मण कृष्ण** (११) ज. स. १८८३ महाड. दक्षिणी सुबोध नाटक कंपनी १० वर्षें चालविली. कंपनीचें थिएटर जळालें त्यांत सर्वस्व गेलें. सध्यां यवतमाळास किराणा मालाचें दुकान आहे. यांनीं यवतमाळास अवधूतवाडींत दत्तमंदिर बांधिलें अहे.

* **विनायक कृष्ण** (११) जी. आय्. पी. रेल्वेंत मुंबईस ऑडिट ऑफिसांत नोकर आहेत. वास्तव्य ब्राह्मणवाडी ठाणें. भार्या सरस्वती, रानड्यांकडील. कन्या (१) यमुना, वय १६. (२) शकुंतला.

* **दिगंबर विनायक** (१२) इंग्रजी २ री, ठाणें.

* **प्रभाकर विनायक** (१२) बालवर्ग, ठाणें.

* **हनुमान विनायक** (१२) वय १.

* **वासुदेव कृष्ण** (११) वय ४६. मुंबई म्युनिसिपल वर्कशॉप खात्यांत नोकर आहेत. वास्तव्य ब्राह्मणवाडी, ठाणें. भार्या इंदिरा, परांजप्यांकडील. कन्या (१) कृष्णा, वय १३. (२) नलिनी, वय २.

* **भालचंद्र वासुदेव** (१२) इंग्रजी दुसरी.

* **वसंत वासुदेव** (१२) मराठी पहिली.
* **यशवंत वासुदेव** (१२) बालवर्ग.
* **रघुनाथ वासुदेव** (१२) ज. स. १९३६.
मोरो केसो (७) मृ. श. १६७९ आषाढ.
बाजी केसो (७) मृ.श.१७४४ आश्विन. शु. ११.हे धामापुरांत भिक्षुकी करीत. यांनीं आपले ठिकाणांत श्रीगजाननाची मूर्ति स्थापन करून लहानसें मंदिर बांधलें.
पांडुरंग बाजी (८) मृ. श. १७८०. हे आपले चुलते यांचे मांडीवर दत्तक बसले. मूळचें नांव पांडुरंग बापूजी. धामापुरास भिक्षुकी करीत. भार्या राधा.
गणेश पांडुरंग (९) मृ. श. १७८०. महाडास असत. भार्या यशोदा.
गोविंद पांडुरंग (९) मृ. श. १७८० पौ. व. ९. महाडास असत.
भामबा बाळाजी (३) साधुवृत्तीनें राहात. शहागडास गोदातीरीं स्त्रीसह तीर्थयात्रेस गेले व तेथेंच राहिले.
विसाजी भामबा (४) हे पैठण वगैरे ठिकाणीं व्यापारधंदा करीत.
नारायण विसाजी (५) हे वडीलमुखें ऐकीव माहितीवरून तपास करीत श. १५९०–९५ चे सुमारास धामापुरास वयाचे ६०–६५ वे वर्षीं आले व कायमचे तेथें राहण्याचे हेतूनें शहागड पैठणहून सामान आणण्याकरितां गेले ते परत धामापुरास गेले नाहींत. त्यांस मुली होत्या त्या पैठणाकडेच होत्या.

घराणें ३ रें, गोळप—चौल—श्रीवर्धन

(वंशावळ पृ. ७८ ते ८२)

या घराण्याचा मूळ पुरुष कृष्ण. हें घराणें मूळचें रत्नागिरी जिल्ह्यांतील गोळप येथील होय. तेथून वासुदेव त्र्यंबक (७) हे चौल येथें आले. तेथील यांचें वास्तव्य निदान १०० वर्षांपेक्षां अधिक असावें. नारायण गणेश (५) यांचे वंशज किहीम येथें आले व इतर मंडळी श्रीवर्धनचे बाजूस गेली. सध्यां यांचें वास्तव्य अलिपूर, अलिबाग, इंदूर, गोरेगांव, जबलपूर, डुमरा, दादर, नागपूर, पुणें, बडोदें, मुंबई, मुरूड, यवतमाळ, रेवदंडा, शीव, श्रीवर्धन व सांगली येथें आहे. पूर्वीं यांची वस्ती एलिचपूर, नागांव, महाड व सारळभाटी या गांवीं असल्याचें आढळतें.

श्रीवर्धन येथील पांच ग्रामस्थ कुळांस चाळीस खंडी भाताचें उत्पन्न वतन होतें. यांपैकीं पेंडसे, दामले, भट, व जोशी (चितळे) हे चार आहेत. श्रीवर्धनची नवीन सेटल्मेंट जाहली त्या वेळीं चाळीस खंडी भाताऐवजीं दहा रुपये खंडी-प्रमाणें किंमत करून नक्त नेमणूक रुपये ४०० करण्यांत आली. या घराण्यांत

श्रीवर्धनचे ग्रामोपाध्यांची उपाध्येगिरी आहे. नारायण यादव पेंडसे यांस श्रीमंत पेशवे सरकारकडून मिळालेलें वीस रुपयांचें वर्षासन रोहें महालांतून मिळत असतें.

कुलस्वामी-कुलदेवता :—वासुदेव त्र्यंबक (७) यांचे वंशज योगेश्वरी ही कुलदेवता मानितात व देवदिवाळीस कुलदेवतेबरोबर चौल येथील ग्रामदेवता श्रीरामेश्वर यांस नैवेद्य दाखवितात. याशिवाय इतर मंडळींची कुलदेवता प्रतापगडच्या पायथ्याशीं असलेली श्रीपारजाई देवी ही आहे. हीस रामवरदायिनी व सीतावरदायिनी असेंहि म्हणतात. पारपेठ किल्ले प्रतापगड येथील श्रीवरदायिनी व व श्रीरामवरदायिनी ह्या दोन देवतांस दसऱ्याचे दिवशीं २०० रुपये किंमतीचीं वस्त्रें देण्यांत आलीं असा उल्लेख पेशवे दप्तर भाग २२ क्रमांक १७१ त आहे. (ता. २५ सप्टेंबर १७६७.) सोमजाई, कुसुमादेवी, घृष्णेश्वर, हरिहरेश्वर, नारायण, गणपति, बहिरी (भैरवनाथ) यांस चैत्री, पौषी व माघी पौर्णिमेस नैवेद्य दाखवितात. हे देव श्रीवर्धन व हरिहरेश्वर येथें आहेत. शारदीय नवरात्र असतें. नवरात्रांत देवीचा जोगवा मंगळवारीं किंवा शुक्रवारीं मागण्याची चाल आहे. घरांतील मुख्य व्यक्तीस धान्यफराळ असतो. देवीचा गोंधळ घालण्याची चाल होती ती त्र्यंबकभट महादेवभट (६) यांनीं बंद केली असें म्हणतात. बाकीच्या घराण्यांत चालू आहे. नवरात्रांत नऊ दिवस दिवा, माळ असते. लग्न, मुंज वगैरे संस्कारांत बोडण भरण्याची चाल आहे.

यांच्यापैकीं कांहीं मंडळींस 'चांगबोले' या उपनांवानें श्रीवर्धन येथें ओळखीत असत. यांच्यापैकीं कोणी पूर्वज चांगला वक्ता होता म्हणून यांना हें टोपण नांव मिळालें अशी दंतकथा आहे. तसेंच कोणी फडणीस असल्यामुळें यांना फडणीस असेंहि म्हणतात.

या घराण्यांत पिढ्या १२, एकूण व्यक्ति १७१ व जिवंत व्यक्ति ७८ आहेत.

गणेश नारायण (४) भार्या लक्ष्मी.

महादेव गणेश (५) भार्या राधा.

त्र्यंबक महादेव (६) भार्या गंगा (उमा).

मोरेश्वर त्र्यंबक (७) भार्या यशोदा.

गोपाळ मोरेश्वर (८) हे श्रीवर्धनहून ७० वर्षांपूर्वीं गोरेगांवीं आले.

सखाराम गोपाळ (९) भार्या गंगा. या ७० वयाच्या आहेत.

गजानन सखाराम (१०) ज. श. १८०५. कन्या माई, वय २०.

* **अच्युत गजानन** (११) वय १६. गोरेगांवास शिकत आहे.

* **शिवराम सखाराम** (१०) वय ४२. गोरेगांवास वैद्यकी करतात. भार्या भागीरथी (यमुना), वय २८. विठ्ठल भास्कर मोन्यांची कन्या.

* **कृष्णाजी गोपाळ** (९) वय वर्षे ७८. गोरेगांव येथें सुखवस्तु आहेत.

* **परशुराम कृष्ण** (१०) ज. श. १८१४. गोरेगांवास स्टँपव्हेंडर आहेत. भार्या लक्ष्मी, वय ३५. वैद्यांकडील. कन्या चंद्रभागा, ज. श. १८४५. मराठी ४ थी,

* **धुंडिराज परशुराम** (११) ज. श. १८४३. मराठी ७ वी.
* **विश्वनाथ परशुराम** (११) ज. श. १८४९. मराठी ३ री.
* **काशीनाथ गोविंद** (१०) ज. श. १८१४. रेवदंड्यास मराठी शाळेंत हेड-मास्तर आहेत. भार्या अन्नपूर्णा, वय ३७, ओजळच्यांकडील. कन्या बगू, ज. श. १८४२. कलकत्त्यास पतीबरोबर असते.
* **त्र्यंबक काशीनाथ** (११) ज. श. १८४४. शिक्षण चालू.
* **मोरो काशीनाथ** (११) ज. श. १८४६. शिक्षण चालू.
* **गोपाळ काशीनाथ** (११) ज. श. १८४८. शिक्षण चालू.
* **रामचंद्र काशीनाथ** (११) ज. श. १८४९. शिक्षण चालू.
* **पुरुषोत्तम काशीनाथ** (११) ज. श. १८५३. शिक्षण चालू.

विश्वनाथ त्र्यंबक (७) शास्त्री होते. हे पुराण सांगत असत. यांनीं संन्यास घेतला होता. समाधि श्रीवर्धनास आहे. भार्या गंगा (सावित्री).

मुकुंद विश्वनाथ (८) मृ. जलोदरानें स. १८७० चे सुमारास. व्यवसाय भिक्षुकी व पुराण. भार्या गोदावरी.

सीताराम मुकुंद (९) ज. स. १८३५ चे सुमारास; मृ. स. १९०२ प्लेगनें. हे लहानपणीं पुण्यास आले व मधुकरी मागून विद्या केली. प्रख्यात वैद्य बापू मेहेंदळे यांचे हे शिष्य. यांस भोरचे राजे पंतसचिव यांजकडून ३५० रुपये वर्षासन होतें. तसेंच धारचे पवार व बडोद्याचे गायकवाड यांजकडूनहि कांहीं इनाम होतें. सांगलीचे इनामदार शितोळे पाटील यांनीं कांहीं जमीन बक्षिस दिली होती. हे उत्तम वैद्य म्हणून प्रसिद्ध होते. यांनीं अग्निहोत्र घेतलें होतें. भार्या लक्ष्मी, श्रीवर्धनचे वाडदेकरांकडील. कन्या (१) गंगा (सुभद्रा), जोश्यांकडे; (२) द्वारका (आनंदी), भोरच्या जोश्यांकडे; (३) वाराणशी, करमरकरांकडे दिली.

रघुनाथ सीताराम (१०) ज. स. सुमारें १८७० श्रीवर्धन; मृ. स. १९१२ नवज्वर. बी. ए. (ऑनर्स) १८९६. स. १९०४ त सासवडला मामलेदार झाले. नंतर पुण्यास कलेक्टरचे चिटणीस होते. पगार ३५० रु.; भार्या जानकी, जोश्यांकडील. कन्या (१) कृष्णा, परिंचाचे गोपाळ दत्तात्रेय परांजप्यांची पत्नी. (२) दुर्गा, विंझरच्या गणेश दामोदर पटवर्धनांची पत्नी.

* **यशवंत रघुनाथ** (११) वय ४२. पुण्यास केसरी-मराठा संस्थेमध्यें नोकरी आहे. वास्तव्य ५७० शनिवार, पुणें. भार्या (१) लक्ष्मी, पुण्याच्या मेहेंदळ्यांकडील. भार्या (२) यशोदा, पुण्याच्या दीक्षितांकडील. कन्या कमल, ज. स. १९३०. मराठी शिक्षण चालू.
* **सीताराम यशवंत** (१२) ज. स. १९२१. इंग्रजी ३ री.
* **मुकुंद यशवंत** (१२) ज. स. १९२८. मराठी २ री.
* **विश्वनाथ यशवंत** (१२) ज. स. १९३२.

* **नीळकंठ रघुनाथ** (११) ज. स. १९०३ डिसेंबर २६. पुण्यास व्यापार करितात. ५५६ नारायण पेठ, पुणें येथें स्वत:चे घरांत राहतात. भार्या गंगा, पुण्याच्या माधवराव सिधयांची मुलगी. कन्या शांता, वय ८.

* **प्रभाकर नीळकंठ** (१२) ज. स. १९२८ जानेवारी १३. मराठी ३ री.

* **पांडुरंग नीळकंठ** (१२) ज. श. १८५२ फा. शु. १५. मराठी.

* **रघुनाथ नीळकंठ** (१२) ज. स. १९३४ जाने. ६.

* **गोविंद नीळकंठ** (१२) ज. स. १९३६ डिसें. २४.

विश्वनाथ मुकुंद ऊर्फ बळवंत (९) कस्टम खात्यांत नोकरी होती. कन्या गंगू, सान्यांकडे दिली.

हरी विश्वनाथ (८) कन्या (१) मथुरा, विवाह स. १८९२. धुळ्याच्या दत्तात्रेय वि. सहस्रबुद्ध्यांची पत्नी; (२) यमुना, विवाह स. १८९८, गोपाळराव टकल्यांची पत्नी. (३) आक्का, विवाह स. १९०४, माधवराव थत्त्यांची पत्नी. (४) गंगू, विवाह स. १९०७, दांडेकरांकडे दिली.

* **दत्तात्रेय हरी** (९) ज. स. १८७८ आक्टो. १६. पेन्शनर सब्‌रजिस्ट्रार. यवतमाळला (जेलचे मागें) सुखवस्तु आहेत. भार्या भागीरथी, नामजोश्यांकडील. कन्या (१) मनू, ज. स. १९०५ एप्रिल ३. विवाह स. १९१८. अकोल्याच्या माधवराव पटवर्धनांची पत्नी; (२) सिंधु, ज. स. १९०९ डिसें. ३१. विवाह स. १९२२, मलकापूरच्या सदाशिवराव जोशी वकिलांची पत्नी; (३) कमला, ज. स. १९१४ एप्रिल ९. विवाह स. १९२७, बुलढाण्याच्या विठ्ठलराव सोमण वकिलांची पत्नी; (४) विमला, ज. स. १९१७ जानेवारी २१. विवाह स. १९३०. दर्यापूरच्या डॉ. काशीनाथपंत बडयांची पत्नी; (५) पद्मावती, ज. स. १९१९ जाने. २८. इंग्रजी ७ वी.

* **पुरुषोत्तम दत्तात्रेय** (१०) ज. स. १९०२ जून १४. मॅट्रिक. यवतमाळास शेती करितात. भार्या जानकी, बव्यांकडील. कन्या (१) विद्यावती (पुष्पावती), ज. स. १९३२ मे २, येवलें. (२) सुमन, ज. स. १९३७ फेब्रु. १५. मलकापूर.

* **विश्वनाथ दत्तात्रेय** (१०) ज. स. १९०७ डिसेंबर २१. बी. एस्‌सी., एल्‌एल्‌. बी. अलिपूरला (कलकत्ता) ई. स्टेट एजन्सींत नोकरी आहे.

* **मधुकर दत्तात्रेय** (१०) ज. स. १९२१ मार्च ११. इंग्रजी ४.

* **गणेश हरी** (९) ज. स. १८८७ फेब्रु. २३. यवतमाळास व्यापार करितात. भार्या सरस्वती, थत्त्यांकडील. कन्या (१) लीला, ज. नागपूर स. १९२१. इंग्रजी २ री. (२) शांता, ज. उमरावती स. १९२७. मराठी २ री.

* **देवीदास हरी** (९) ज. स. १८९९ जाने. ७. नॅशनल मॅट्रिक. यवतमाळास व्यापार करितात. भार्या लक्ष्मी, पंडितांकडील. कन्या (१) विजया, ज. चिखली स. १९३०. (२) उषा, ज. यवतमाळ स. १९३५ एप्रिल २४.

* **वसंत (जनार्दन) देवीदास** (१०) ज. स. १९२७ ऑगस्ट २६. मराठी ४.

*गोपाळ देवीदास (१०) ज. स. १९३३ जून ८.

काशीनाथ विश्वनाथ (८) भार्या पार्वती, जोश्यांकडील.

केशव काशीनाथ (९) मृ. स. १९२५ संग्रहणी. शिक्षण इंग्रजी ४ इयत्ता. जिल्हाबोर्डांत कारकून होते. भार्या दुर्गा, परांजप्यांकडील.

*नरहर केशव (१०) ज. नागपूर स. १८८९ एल्. एजी. यवतमाळला शेतकी खात्यांत ॲग्रिकल्चरल असिस्टंट आहेत. हस्तकौशल्याचें काम करण्याची आवड. उद्यम, भोळा शेतकरी वगैरे मासिकांतून कृषिविषयक लेख लिहितात. भार्या लक्ष्मी, आगाश्यांकडील. कन्या (१) उषा (सुशीला), ज. यवतमाळ स. १९२५, इंग्रजी २ री. (२) पुष्पलता, ज. उमरावती स. १९३०, मराठी १ ली. (३) सरला, ज. उमरावती स. १९३४.

*भालचंद्र नरहर (११) ज. वर्धा स. १९१४. इंटरमध्यें शिकत आहे. नागपूर.

*वसंत नरहर (११) ज. यवतमाळ स. १९२२, इंग्रजी ३ री.

*शरच्चंद्र नरहर (११) ज. मोर्शी स. १९२८, मराठी ३ री.

*रामचंद्र केशव (१०) ज. श्रीवर्धन स. १८९२. बी. ए., एल्एल्. बी., गोल बझार, लॉर्ड गंज, जबलपुरास वकील आहेत. यांनीं लग्न केलें नाहीं.

*श्रीकृष्ण केशव (१०) ज. परतवाडा स. १८९५. सेकंड क्लास मेकॅनिकल इंजिनिअर आहेत. वास्तव्य नागपूर. फाटक चाळ, जेलरोड. अविवाहित.

अनंत केशव (१०) ज. शेगांव स. १८९८; मृ. स. १९००. अपस्मार.

*श्रीपाद केशव (१०) ज. परतवाडा स. १९०२. बी. एस्सी., एल्एल्. बी. फाटक चाळ, जेल रोड, नागपूरला वकील आहेत.

*नीळकंठ केशव (१०) ज. परतवाडा स. १९०५. मॅट्रिक. मिलमध्यें स्पिनिंग खात्यांत नोकरी आहे. पत्ता–७ खानीपुरा रोड, जुना तोफखाना, इंदूर शहर. भार्या शांता (कृष्णा), विवाह १९३४, रामचंद्र चिंतामण चितळ्यांची मुलगी.

*विजय नीळकंठ (११) ज. वर्धा स. १९३५.

*दामोदर केशव (१०) ज. परतवाडा स. १९०७. बी. ए., एल्एल्. बी. वकील आहेत. पत्ता–फाटक चाळ, जेलरोड, नागपूर. मराठी लेखनव्यवसाय आहे. विहंगम मासिकाचे सहसंपादक होते.

*दत्तात्रेय केशव (१०) ज. वर्धा स. १९११. बी. एस्सी. आहेत. नागपूरला असतात.

गोविंद त्र्यंबक (७) भार्या काशी.

वासुदेव त्र्यंबक (७) हे वैदिक असून वृत्ति भिक्षुकीची. घरची अत्यंत गरिबी होती. त्यांत अग्निनारायणानें घर स्वाहा केलें. त्या वेळीं घरांतील फक्त देवांसहित देव्हारा घेऊन घराबाहेर पडले. चौल गांवचा पोवाडा आहे त्यांत तेथील श्रीरामेश्वराचे देवालयांत सुभाभटजी या नांवाचा एक तेलंगी ब्राह्मण राहात असे. त्यानें आपला नित्यपूजेचा बाण वासुदेवभट यांस दिल्याचा

उल्लेख आहे. तो बाण वडील घराण्यांत असावा असें त्यांचे वंशजांनीं ठरविल्याप्रमाणें सध्यां डॉ. काशीनाथ केशव (१०) यांजपाशीं आहे. त्यांची स्वाक्षरी 'ब्राह्मण' ग्रंथाची पोथी चौलचे पेंडसे यांचे उपाध्ये वे. शा. सं. नथुभटजी प्रथम यांजजवळ आहे. भार्या लक्ष्मी, थळच्या फाटकांकडील. कन्या (१) यमू, मेढे येथील महादेवपंत दांडेकरांची पत्नी. (२) बया, जंजिरा–मुरुडच्या सान्यांकडे दिली.

महादेव (अप्पा) वासुदेव (८) मृ. स. १८९२. मधुमेह. शिक्षणाकरितां मुंबईस येऊन कष्टांत दिवस काढून मराठी व थोडें इंग्रजी शिकून रेल्वेचे ऑडिट ऑफिसांत नोकरीस रु. १५ वर सुरुवात करून ४००–५०० पर्यंत चढले. यांनीं आपले लहान बंधूंस शिक्षणाकरितां मुंबईस आणिलें. भार्या उमा, नागांवचे सोहनी यांजकडील. यांनीं पतीचे पश्चात् पुतण्या परशुराम जनार्दन यांस दत्तक घेतलें व नांव त्र्यंबक ठेविलें.

त्र्यंबक महादेव (९) मृ. स. १८९४. धनुर्वातानें. हे दत्तक आले. पूर्वीचें नांव परशुराम जनार्दन.

गोपाळ वासुदेव (८) मृ. स. १८९१. अर्धांगवात. शिक्षण मराठी व थोडें इंग्रजी. रेल्वेचे ऑडिट ऑफिसांत नोकरी होती. लहान पगारापासून ४००–५०० पगारापर्यंत वाढ झाली. हे आपले खात्यांत सर्वांचे फार आवडते होते. स्वभाव दिलदार व धार्मिक असे. अध्यात्माची गोडी बरीच असून मुंबईचे ठाकुरद्वारचे श्रीमुनिस्वामी यांचे शिष्यवर्गांत ह्यांची व ह्यांच्या वडील भावजयीची गणना असे. ह्या स्वामींचे समाधीस परवानगी बऱ्हंशीं यांचेच खटपटीनें मिळाली. श्रीरामाचे मूर्तीपुढें समाधि आहे. असें इतरत्र मुंबईस दुसरीकडे नाहीं. मुंबईस भाड्यानें राहात असतां घरमालकांचा व यांचा मोरीचे बाबतींत मतभेद झाला. त्यामुळें भाड्याचे घरांत राहावयाचें नाहीं असा निश्चय करून व गिरगांवांत वाडी विकत घेण्याचें ठरवून यांनीं आपले बंधूस कळविलें. स्वतःजवळ फक्त सहा हजार रुपये असतां, कर्ज काढून छत्तीस हजारांस वाडी घेतली. स. १८८७ ते १९२४ पर्यंत ही वाडी यांचे वंशजाचें ताब्यांत होती. व 'पेंडसे वाडी' या नांवानें ओळखली जात असे. भार्या (१) रखमा, विनोदांची मुलगी, हिचा पुत्र केशव; भार्या (२) सत्यभामा, पावसच्या फडक्यांकडील.

केशव गोपाळ (९) ज. स. १८८१; मृ. स. १९१५, अर्धांगवात. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. चुलते गोविंदराव यांचेबरोबर मंगळदास मार्केटांत कापडदुकानाचा व्यवहार पाहात. पुढें उत्पन्नाचें वांटप झालें त्या वेळीं हें दुकान यांनीं इतरांचा हिस्सा विकत घेऊन स्वतःचे मालकीचें केलें. हे मोठे निस्पृह व व्यवहारकुशल असून यांनीं दुकान चांगलें वाढविलें. यांचे अकालीं निधनामुळें दुकानाचा व्यवहार आवरता घ्यावा लागला. यांस तालमीचा नाद असल्यामुळें



मागील उभे : १. बाळ, २. द्वारका, ३. सोनू. **खुर्चीमागील :** १. राधा, २. सत्यभामा, ३. उमा, ४. यमुना दांडेकर, ५. गंगा, ६. सावित्री, ७. अन्नपूर्णा. **खुर्चीवरील :** १. जनार्दन वासुदेव, २. गोपाळ वासुदेव, ३. महादेव वासुदेव, ४. लक्ष्मी, ५. सदाशिव वासुदेव, ६. गोविंद वासुदेव, ७. नारायण वासुदेव. **बसलेले :** १. मनू. २ काशीनाथ दांडेकर, ३. अनंत दांडेकर, ४. मथुरा, ५. बापूराव शुक्ल, ६. भास्कर जनार्दन, ७. केशव गोपाळ.



केशव गोपाळ सौ. आनंदीबाई
मांडीवर विठ्ठल केशव उभा काशीनाथ केशव

शरीरप्रकृति चांगली होती. भार्या आनंदी (सखू), ज. श. १८०९, पुण्याचे रामचंद्र गोपाळ देशमुख यांची कन्या. या बाई अतिशय व्यवहार-चतुर असून यांचेवर वैधव्याचा प्रसंग वयाचे २८ व्या वर्षीं आला. त्या वेळीं मुंबईंतील कापडदुकान बंद केलें. त्याचा सर्व व्यवहार व इतर गोष्टी यांनीं तळें (माणगांव) येथील आपले आजोळचे भट घराण्यांतील मंडळींचे सल्ल्यानें आवरल्या. मुंबईच्या वाडीची वांटणी, विक्री वगैरे बाबतींत योग्य धोरण ठेवून आपल्या एकुलत्या एक मुलाचा जम चांगला बसवून दिला. ह्या धार्मिक प्रवृत्तीच्या आहेत.

* **काशीनाथ केशव** (१०) ज. पुणें श. १८२४ ज्ये. व. ४. प्राथमिक व दुय्यम शिक्षण मुंबईस झालें. आर्यन् एज्युकेशन हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा स. १९१९ त दिली. कॉलेजचें पहिलें वर्ष एल्फिन्स्टन कॉलेजांत. सेंट झेव्हिअर कॉलेजांत इंटर सायन्सचे वर्गांत असतांना, स. १९२० चे असहकारितेचे चळवळींत कॉलेज सोडून पुण्यास टिळक महाविद्यालयांत ते दाखल झाले. तेथें स. १९२२ व स. १९२४त आयुर्विद्याविशारद व वाङ्मय-विशारद ह्या पदव्या मिळविल्या. नंतर पुणें बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें शिक्षण घेऊन एल्. सी. पी. एस्. ची परीक्षा दिली. स. १९२४ त मुंबईंतील वाडी इतर हिस्सेदारांचे आग्रहामुळें विकणें भाग पडल्यामुळें पुण्यास स्थायिक होण्याचा विचार ठरवून तेथें स्वतःकरितां घर नं. ३५० सदाशिव पेठ, विकत



उभे :—१. डॉ. काशीनाथ केशव, २. भालचंद्र काशीनाथ, ३. सौ. ताराबाई.
बसलेल्या :—१. आनंदीबाई, २. लीला.

घेऊन बांधिलें व पेरूगेटाजवळ भाडेकऱ्यांकरितां मुंबईसारख्या चाळी बांधिल्या. ते स्वतःचा दवाखाना काढून ५।६ वर्षें प्रॅक्टिस करीत आहेत. सार्वजनिक कामाची आवड असून वेदशास्त्रोत्तेजक सभेचे कार्यकारी मंडळाचे सभासद आहेत. प्रसंगविशेषीं गोरगरिबांस फुकट औषधोपचार करितात. भार्या उमा,

ऊर्फ तारा (गोदावरी), पुण्याच्या प्रो. शंकर गोपाळ साठ्यांची मुलगी. कन्या
लीला, ज. मंबई स. १९२६, फीमेल हायस्कुलांत इंग्रजी शिक्षण चालू.
***भालचंद्र काशीनाथ** (११) ज. पुणें स. १९३३ जाने २३.
जनार्दन वासुदेव (८) मृ. स. १८९३. मुंबईस रेल्वे ऑडिट ऑफिसांत नोकरी
होती. भार्या राधा, वरसईच्या जोश्यांकडील. कन्या (१) सोनू, कल्याणास
बाळांकडे; (२) द्वारका, म्हसकरांकडे दिली. (३) मथुरा, नागांवच्या बापूराव
त्र्यंबक मायदेव (शुक्ल) यांची पत्नी. (४) मनू, थळच्या नारायणराव जोश्यांची
पत्नी. (५) चंद्रा.
परशुराम जनार्दन (९) हे आपले चुलते महादेव वासुदेव यांस दत्तक गेले.
नंतरचें नांव त्र्यंबक महादेव.
भास्कर जनार्दन (९) वयाच्या १८ व्या वर्षी प्लेगनें मृत्यु. भार्या सरस्वती
(गंगू ऊर्फ जिजी), आगाशीच्या सखारामपंत ऊर्फ बापूसाहेब गद्र्यांची मुलगी.
मृ. स. १९३७. लग्न झाल्यावर केवळ एकच महिन्यानें यांचेवर वैधव्याचा
प्रसंग आला. यांनीं आपलें सर्व आयुष्य चांगल्या रीतीनें व धर्माचरणानें
घालविलें. या फार मनमिळाऊ व सात्त्विक वृत्तीच्या होत्या.
***मधुसूदन जनार्दन** (९) ज. श. १८१२. शिक्षण बी. ए. पर्यंत. अलीबागेस
म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते. पुण्यास टिळकमंदिराजवळ दातारांच्या
वाड्यांत सुखवस्तु राहतात. भार्या (१) सीता, आठवल्यांकडील; भार्या (२)
लक्ष्मी (गोदू), विष्णु केशव चाफेकरांची मुलगी.
सदाशिव वासुदेव (८) मुंबईस रेल्वेचे ऑडिट ऑफिसांत नोकरी होती. भार्या
गंगा, तळ्याच्या फडणिसांकडील.
***पांडुरंग सदाशिव** (९) ज. श. १८१२ सुखवस्तु. मुंबईस (कांदेवाडी नाका,
नवाकाळ वाडी) राहतात. भार्या रखमा, वरसईच्या डॉ. टिळकांची
मुलगी.
गोविंद वासुदेव (८) मृ. स. १९१२ संधिवात. शिक्षण मराठी व थोडें इंग्रजी.
मुंबईचें कापडाचें दुकान व चौल येथील शेतीची व्यवस्था पाहात असत. हे
फार व्यवहारकुशल असून यांची गुजराथी व्यापारी मंडळींत फार चहा
होती. यांचें दुकान हें कापडमार्केटमध्यें ब्राह्मणाचें पहिलेंच होतें. यांचेनंतर
गाडगीळ यांचें दुकान निघालें. भार्या (१) भागीरथी, ठोसरांकडील. भार्या
(२) सावित्री, पटवर्धनांकडील. पुत्र शंकर. कन्या (१) गंगू, बापूसाहेब
गोखले यांची पत्नी. (२) चिंगू, प्रो. रामचंद्र महादेव जोश्यांची पत्नी.
(३) कृष्णा.
***शंकर गोविंद** (९) मुंबई ज. स. १८९६. मॅट्रिक. व्यवसाय शेती. पुणें येथें
सदाशिव पेठेंत 'कृष्णकुटी' या नांवाचें घर नं. २००।५ बांधलें असून तेथें
राहतात. संगीत, बिलीअर्ड, टेनिस वगैरे खेळांची आवड असून त्यांत पारि-

तोषिकें मिळविलीं आहेत. भार्या इंदिरा, इचलकरंजीचे आपटे यांजकडील. विवाह स. १९१७. कन्या (१) उषा, ज. स. १९२१ जानेवारी. इंग्रजी सातव्या इयत्तेंत फीमेल हायस्कूल, पुणें. (२) वैजयंती ज. स. १९३२ जुलै.

* **माधव शंकर** (१०) ज. स. १९२३ सप्टेंबर. नाशिकला मिलिटरी स्कूलमध्यें इंग्रजी शिक्षण चालू.

रामचंद्र वासुदेव (८) हे विसाव्या वर्षी वारले. भार्या जानकी, किह्रीमच्या केळकरांकडील.

नारायण वासुदेव (८) मृ. स. १९०५. अर्धांग. रेल्वेमध्यें नोकर होते. भार्या अन्नपूर्णा, थळचे जोशी अग्निहोत्री यांजकडील.

केशव महादेव (६) भार्या भागीरथी.

विष्णु नारायण (८) भार्या यमुना.

यादव (जनार्दन) अनंत (८) ज. श्रीवर्धन श. १७३९; मृ. श. १८०२. हे हबसाण सरकारचे फडणीस होते. भार्या भागीरथी, बाळांकडील. कन्या (१) सीता, ज. श. १७९५, जोश्यांकडे; (२) गोदावरी, ज. श. १७९७, आठवल्यांकडे; (३) गंगू, ज. श. १७९९, शेंड्यांकडे दिली.

सदाशिव यादव (९) ज. श्रीवर्धन श. १७८७; मृ. श. १८४३. हे वडिलांप्रमाणेंच हबसाण सरकारचे फडणीस होते. भार्या उमा, केळकर यांजकडील.

जनार्दन सदाशिव (१०) ज. श्रीवर्धन श. १८१२; मृ. श. १८४०. मॅट्रिक. शिक्षक होते. भार्या राधा (गोदू), बाळकृष्ण कमळाकर जोश्यांची मुलगी.

* **केशव जनार्दन** (११) ज. श. १८४०. शिक्षण इंग्रजी ३ री. हरेश्वरला शेती करितात. ग्रामोद्योगाचे कार्यांत भाग घेतात.

* **महादेव सदाशिव** (१०) ज. श्रीवर्धन श. १८१४. मॅट्रिक व स्कूल फायनल; खाजगी शिक्षक आहेत. राष्ट्रीय शिक्षणाची आवड. सार्वजनिक कार्यकर्ते व प्रवचनकार. भार्या पार्वती, जोश्यांकडील.

* **वासुदेव सदाशिव** (१०) ज. श्रीवर्धन श. १८१८. श्रीवर्धनला शेती करितात. सार्वजनिक कार्यकर्ते. भार्या यशोदा, गांगलांकडील. कन्या (१) इंदु, ज. श्रीवर्धन श. १८५०. मराठी तिसरी. (२) गोदावरी, ज. श्रीवर्धन श. १८५७.

* **गजानन वासुदेव** (११) ज. श्रीवर्धन श. १८४६. इंग्रजी १ ली.

* **चिंतामणि वासुदेव** (११) ज. श्रीवर्धन श. १८५५.

* **रामकृष्ण सदाशिव** (१०) ज. श्रीवर्धन श. १८२०. वायरमन; मुंबईस खाजगी नोकरी आहे. भार्या जानकी, वैद्यांकडील. कन्या (१) सिंधु, ज. श. १८४६ इंग्रजी २; (२) अंबू, ज. श. १८५२; (३) कुसुम, ज. श. १८५५; (४) कुमुद, ज. श. १८५८.

* **अनंत रामकृष्ण** (११) ज. श. १८४९. मराठी ३ री.

* **गणेश सदाशिव** (१०) ज. श्रीवर्धन श. १८२४. वायरमन, मुंबईस खाजगी नोकरी आहे.

पांडुरंग यादव (९) ज. श्रीवर्धन श. १७८९; मृ. श. १८५५. जंजिरा–मुरुड येथें नामांकित वकील व म्युनिसिपालिटीचे कित्येक वर्षें चेअरमन होते. भार्या रखुमाई, मराठ्यांकडील. कन्या (१) सीता, ज. श्रीवर्धन श. १८१७, दांडेकरांकडे; (२) कृष्णा, ज. मुरुड श. १८२७, पाळंदे यांजकडे; (३) दुर्गा, ज. जंजिरा श. १८३६, पेठे यांजकडे दिली.

* **विनायक पांडुरंग** (१०) ज. श्रीवर्धन श. १८१४. एल्. सी. पी. एस्.; डुमरा (कच्छ) येथें खाजगी डॉक्टर आहेत. भार्या भागीरथी, भिड्यांकडील. कन्या विजया, ज. मुरुड श. १८५८.

* **रामचंद्र विनायक** (११) ज. श्रीवर्धन श. १८४४. इंग्रजी ४.

* **विष्णु पांडुरंग** (१०) ज. मुरुड श. १८१९. मुरुडला हायकोर्ट प्लीडर आहेत. भार्या (१) लक्ष्मी (मथुरा), खंडो लक्ष्मण मोन्यांची मुलगी. भार्या (२) लक्ष्मी, वर्तकांकडील. कन्या (१) सुधा, ज. जंजिरा श. १८५५. (२) लीला, ज. जंजिरा श. १८५६.

* **रघुनाथ विष्णु** (११) ज. गोरेगांव श. १८४८. मराठी ३ री.

* **प्रभाकर विष्णु** (११) ज. जंजिरा श. १८५३.

* **सुरेश विष्णु** (११) ज. जंजिरा श. १८५९.

* **हरी पांडुरंग** (१०) ज. मुरुड श. १८३०. जी. आय्. पी. रेल्वेंत दादरला मेकॅनिकल इंजिनिअर. भार्या इंदिरा (बनू), खंडो लक्ष्मण मोन्यांची मुलगी. कन्या शशिकला, ज. गोरेगांव श. १८५९.

* **दत्तात्रेय पांडुरंग** (१०) ज. जंजिरा श. १८३३. इंटर आर्टस्‌मध्यें विद्यार्थी.

अनंत यादव (९) ज. श्रीवर्धन श. १७९१; मृ. श. १८३९. शेती करीत. भार्या रमा, जोश्यांकडील.

* **नारायण यादव** (९) ज. श्रीवर्धन श. १७९३. शिक्षण इंटरपर्यंत. पेन्शनर शाळा-मास्तर. सध्यां वास्तव्य श्रीवर्धनला आहे. सार्वजनिक कार्यकर्ते. भार्या (१) लक्ष्मी, घैसासांकडील. भार्या (२) सत्यभामा, जोश्यांकडील. कन्या (१) द्वारका, ज. श्रीवर्धन श. १८३० मृत. (२) वालू, ज. श्रीवर्धन श. १८३२, गिम्हवण्याच्या जोश्यांकडे; (३) मथुरा, ज. श्रीवर्धन श. १८३४, रेवदंड्याच्या शेंड्यांकडे; (४) यमू, ज. श्रीवर्धन श. १८३८, पोयनाडच्या बापटांकडे दिली.

* **गोविंद नारायण** (१०) ज. श्रीवर्धन श. १८३६. मॅट्रिक. जंजिरा–मुरुडला म्यु. सेक्रेटरी आहेत. भार्या सुशीला, दोणवलीचे फडक्यांकडील.

* **भास्कर यादव** (९) ज. श्रीवर्धन श. १८०१. वास्तव्य श्रीवर्धन. वैराग्यमार्गी, सार्वजनिक कार्यकर्ते. संस्थानी राजकारणांत भाग घेणारे आहेत. संतवाङ्मयाचा अभ्यास आहे. भार्या सावित्री, वैद्यांकडील.

***भिकाजी बाळकृष्ण** (९) ज. श. १७८५. श्रीवर्धन येथें शेतकी करितात. भार्या भागीरथी, करमरकरांकडील. कन्या बया, ज. श. १८३७. दिवे–आगरच्या ठोसरांकडे दिली.

***गंगाधर भिकाजी** (१०) ज. श. १८३५. श्रीवर्धनास व्यापारी नोकरी आहे.

***सीताराम भिकाजी** (१०) ज. श. १८३९. वास्तव्य श्रीवर्धन.

श्रीधर रामचंद्र (७) भार्या दुर्गा.

वामन श्रीधर (८) मृ. स. १९२०. शेती करीत. भार्या अन्नपूर्णा (आनंदी), वासुदेव बल्लाळ जोश्यांची मुलगी.

केरो दामोदर (१०) ज. स. १८९८; मृ. स. १९३७. मॅट्रिक. नोकरी करीत.

त्र्यंबक वामन (९) ज. श्रीवर्धन श. १७८८; मृ. श. १८५०. शेती करीत. भार्या राधा, कानडे यांजकडील. कन्या सीता, ज. श. १८२९; मृ. श. १८४६. जोश्यांकडे दिली.

***महादेव त्र्यंबक** (१०) ज. श. १८२१. श्रीवर्धनास पौरोहित्य करितात. भार्या पार्वती, जोश्यांकडील.

***सीताराम महादेव** (११) ज. श. १८४८. मराठी ४ थी.

***भालचंद्र त्र्यंबक** (१०) ज. श. १८२४. श्रीवर्धनास शेती करितात. भार्या गंगा, दातारांकडील.

***लक्ष्मण त्र्यंबक** (१०) ज. श. १८२८. श्रीवर्धनास शेती करितात. भार्या इंदिरा, गोडबोल्यांकडील.

***गणेश त्र्यंबक** (१०) ज. श. १८३२. श्रीवर्धनास शेती करितात.

***पुरुषोत्तम त्र्यंबक** (१०) ज. श. १८३६. मॅट्रिकचे वर्गात.

शंकर वामन (९) मृ. स. १९२६ अपघात. नोकरी करीत. भार्या (१) पार्वती, जोश्यांकडील. भार्या (२) पार्वती, जोश्यांकडील. कन्या (१) द्वारका, शंकरराव गोऱ्यांची पत्नी. (२) सोनू (गौरी), ज. स. १९०८; शंकरराव लिमये यांची पत्नी.

बाळकृष्ण शंकर (१०) ज. श्रीवर्धन श. १८२०; मृ. स. १९१२ अतिसार. शिक्षण इंग्रजी सहा इयत्ता. नोकरी करीत. भार्या आनंदी, बापटांकडील.

***विठ्ठल शंकर** (१०) ज. मंगळवेढें स. १८९८ मे ४. बी. ए.; सांगलीस रेव्हेन्यू खात्यांत अव्वल कारकून आहेत. पत्ता–पागा फडणीस यांचा वाडा. चित्रकलेची आवड. भार्या रुक्मिणी, विवाह स. १९१६, गोखल्यांकडील. कन्या (१) दुर्गा, ज. स. १९२२. इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत. (२) गोदावरी, ज. स. १९२५. मराठी चौथींत.

***श्रीधर विठ्ठल** (११) ज. गव्हाण स. १९२० ऑगस्ट ७. इंग्रजी सहावी इयत्ता.

श्रीधर वामन (९) मृ. स. १९१९ क्षय. शिक्षण इंग्रजी सहावी इयत्ता. नोकरी करीत. भार्या गंगा, जोश्यांकडील.

* **मोरेश्वर श्रीधर** (१०) ज.स. १८९९. शिक्षण इंग्रजी पांचवी इयत्ता. मुंबईस नोकरी आहे. पत्ता–करसनदास चाळ, शीव, मुंबई. भार्या सरस्वती, जोश्यांकडील.

नारायण गणेश (५) भार्या भागीरथी.

कृष्णाजी नारायण (६) भार्या रमा.

चिंतामणि कृष्ण (७) बडोद्यास वरिष्ठ कोर्टांत नाझर होते. भार्या पार्वती.

हरी चिंतामणि (८) भार्या लक्ष्मी.

केशव चिंतामणि (८) भार्या आनंदी. कन्या यमुना, फडक्यांकडे दिली.

रघुनाथ केशव (९) अविवाहित.

नारायण केशव (९) मृ. सुमारें स. १९२७. कन्या सुमति, वय २७. कोल्हणाच्या (पालेज) विष्णु शंकर कानिटकरांची पत्नी.

* **राजाराम नारायण** (१०) ज. स. १९१५ मार्च २८. बडोदें कलाभवनमध्यें इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग डिप्लोमा कोर्सचा अभ्यास चालू आहे.

महादेव चिंतामणि (८) भार्या उमा. कन्या (१) कृष्णा, वय ४८. अहमदाबादच्या कार्लेकरांकडे; (२) सुंदरा, वय ३६. मुंबईच्या केळकरांकडे; (३) ही नडियादच्या आठवल्यांकडे दिली.

घराणें ४ थें, गोळप—अक्षी–नागांव

(वंशावळ पृ. ८३)

या घराण्याचा मूळ पुरुष नारायण. कोंकणांतील मूळ गांव गोळप. या घराण्यांतील मंडळींचें वास्तव्य सध्यां पुण्यास व वरसईस आहे. पूर्वी यांचें वास्तव्य अक्षी–नागांव व कोठिंबें या भागांत होतें.

कुलस्वामी व कुलदेवता :—भुवनेश्वर, नागेश्वर, जोगेश्वरी व वागेश्वरी या असून यांना देवदिवाळीस व धुळवडीस नैवेद्य दाखवितात. शारदीय नवरात्र असतें.

या घराण्यांत पिढ्या ९, एकूण व्यक्ति ३५ व जिवंत व्यक्ति ९ आहेत.

पेशवाईंत कोठिंबें गांवांत २१ ब्राह्मणांस जमीन इनाम मिळाली. यांत ३ पेंडसे, ४ मेहेंदळे, ३ शित्रे, २ केळकर, २ बापये, १ गोडसे, १ जोशी (घोगराळकर), १ जोशी (तिवरेकर), १ करमरकर व ३ इतर होते. ३ पेंडसे कुटुंबांपैकीं एक मूळ श्रीवर्धनचें. तेथून तें उकसाण येथें गेलें. त्यांतील एक शाखा कोठिंब्यास आली. या शाखेच्या वंशजांचें सध्यां तेथें वास्तव्य आहे. दुसरें मूळ गोळपचें. तेथून तें अक्षी-नागांव भागांत येऊन नंतर कोठिंब्यास आलें. या शाखेपैकीं सध्यां कोठिंब्यास कोणी नाहीं. त्यांचें इनाम विक्री–हक्कानें मेहेंदळे यांजकडे गेलें आहे. यांतील

विद्यमान पुरुष दत्तात्रेय कृष्ण हे वरसईस शिक्षक आहेत. तिसरे घराण्यांतील विद्यमान प्रभाकर विनायक हा वेणगांव येथें शिक्षण घेत आहे.

गणेश नारायण (४) हे गोसावी होऊन गेले. यांचा पत्ता बरींच वर्षे न लागल्यामुळें यांची उत्तरक्रिया यांचे मुलाचे उत्तरक्रियेबरोबर केली. कन्या, मिरजेच्या सदाशिवराव गोखल्यांची पत्नी.

रामचंद्र गणेश (५) मृ. स. १९०१–२. हे मुंबईस सरकारी नोकरी करीत. भार्या सीता, मंगळवेढ्याची. ह्यांस आनंदीबाई या नांवाची चुलती होती; पण चुलत्याचें नक्की नांव कळत नाहीं.

कृष्णाजी रामचंद्र (६) ज. स. सुमारें १८७३; मृ. प्लेग स. १९०१–२. हायकोर्ट वकील होते. भार्या राधा, बाळकृष्ण चिंतामण पाटणकरांची मुलगी.

*__दत्तात्रेय कृष्ण__ (७) ज. स. १९०० डिसें. ८. ट्रेनिंग कॉलेजची दुसऱ्या वर्षाची परीक्षा दिली. वरसईस मराठी शाळेंत शिक्षक आहेत. भार्या (१) सरस्वती, वर्तकांकडील. मृ. स. १९३०. पुत्र वसंत. कन्या इंदु, वय ८. भार्या (२) अन्नपूर्णा, विष्णु काशीनाथ मोन्यांची मुलगी, वय २५; कन्या सिंधु, वय १.

*__वसंत दत्तात्रेय__ (८) वय ११.

विठ्ठल नारायण (४) श. १६९२ त क्रमवंत ब्राह्मण पंक्त असल्याबद्दल जें संमतिपत्र चौल भागांतील ब्राह्मणांनीं दिलें त्यांत हे व ह्यांचे बंधु गणेश नारायण(४)यांच्या सह्या आहेत.

बाळाजी विठ्ठल (५) भार्या रखमा. कोंठिंब्यास यांचे नांवावर इनाम होतें. या श. १७९० त त्र्यंबकेश्वरीं यात्रेस गेल्या होत्या.

महादाजी रामाजी (४) भार्या लक्ष्मी.

पांडुरंग रामचंद्र ऊर्फ राव (४) हे कारकून शिलेदार असल्याचा स. १७९३ त उल्लेख सांपडतो. हे दुसरे मानाजी आंगरे यांस पेशवे यांजकडून दुखवटा घेऊन गेले होते (ऐ. प्र. क्रमांक २० पहा).

नारायण रामचंद्र (६) हे पुण्यास आले व सुगंधी सामानाचें दुकान सुरू केलें. भार्या उमा, गद्र्यांकडील.

विष्णु नारायण (७) मृ. स. १९१६, वय ७५. बडोदें संस्थानांत सबओव्हरसीअर होते. भार्या लक्ष्मी, बिवलकरांकडील. कन्या (१) काशी, (२) द्वारका, (३) मथुरा, (४) अंबू (गिरजा) बर्व्यांकडे दिली.

महादेव विष्णु (८) ज. पुणें सुमारें स. १८८२; मृ. प्लेग स. १९२२. मॅट्रिक. सेकंड क्लास मेकॅनिकल इंजिनिअर होते. भार्या पार्वती, नाशिकच्या मटंग्यांकडील. या सेवासदनांत शिक्षकीण आहेत. कन्या (१) कृष्णा (अक्का, राधा), वय २५, करमरकरांकडे; (२) द्वारका ऊर्फ इंदु (लक्ष्मी), वय २१, जोश्यांकडे दिली. (३) मथुरा ऊर्फ सिंधु, वय १८ मॅट्रिक; (४) काशी, वय १६ इं. ६ वी.

*__विनायक महादेव ऊर्फ सख्याहरी__ (९) ज. धार. वय २८. पुण्यास मिलिटरी

डेअरी फार्ममध्यें नोकरी आहे. पत्ता–५८१ सदाशिव पेठ, पुणें. भार्या सरला, विवाह स. १९३५, वेलदुऱ्याचे धोंडो हरी खऱ्यांची मुलगी.

शंकर विष्णु (८) मृ. वय २७. भार्या (१) काशी, भागवतांकडील. भार्या (२) दुर्गा, फाटकांकडील. म्हसकर सूतिका गृहांत हेड मेट्रन होत्या.

गोपाळ नारायण (७) मृ. प्लेग स. १८९९; वय सु. ४५. सुगंधी सामानाचे दुकानदार होते. भार्या रमा, मंगरुळच्या महादेव हरी भिडयांची मुलगी. कन्या (१) गंगा, फणश्यांकडे; (२) यमू, जोश्यांकडे दिली.

*हरी गोपाळ (८) वय ५०, पुण्यास मेकॅनिकल इंजिनिअर आहेत. पत्ता–बापटांचा वाडा, तिंबाळकर तालिमेजवळ, सदाशिव पेठ, पुणें. भार्या अन्नपूर्णा, पुण्याच्या घाणेकरांकडील.

* अनंत हरी (९) वय २१. मॅट्रिक. पुण्यास मिटिऑरॉलॉजी खात्यांत नोकरी आहे.

*दत्तात्रेय गोपाळ (८) वय ४५. खडकी अॅम्युनिशन फॅक्टरींत नोकरी आहे. पत्ता–५८१ शनिवार पेठ, पुणें. भार्या लक्ष्मी (मनू), गजानन नारायण भटांची मुलगी. कन्या (१) द्वारका, वय १३. मराठी ५ वीत. (२) सुमन, वय ७. (३) विजया, वय ५. (४) उषा, वय १.

*बाळकृष्ण दत्तात्रेय (९) वय १६. इंग्रजी चौथी.

*त्र्यंबक दत्तात्रेय (९) वय ९. मराठी पहिली.

*गोविंद गोपाळ (८) वय ४३. पुण्यास नोकरी करतात. पत्ता–पेंडसेवाडा, नारायण पेठ, पुणें. भार्या इंदिरा. कन्या कुंदा, वय १.

घराणें ५ वें, गोळप—नाशिक—धौम

(वंशावळ पृ. ८४)

या घराण्याचा मूळ पुरुष कृष्ण ऊर्फ लक्ष्मण. कोंकणांतील मूळ गांव गोळप. तेथून पेशवेकालीं नाशिक व धौमकडे ही मंडळी गेली. सध्यां यांचें वास्तव्य चिपळूण, नागपूर, बडोदें, परळ, विटें, सातारा इत्यादि ठिकाणीं आहे. पूर्वी यांचें वास्तव्य जुनागड, धुळें, धौम, नाशिक, भुसावळ वगैरे गांवीं झाल्याचें आढळतें.

धौमकडे गेलेल्या शाखेपैकीं म्हणजे लक्ष्मण नारायण (४) यांचे वंशज तुळजापूरची भवानी ही कुलदेवता सांगतात. नवरात्रांत देवावर फुलांचा गुच्छ बांधितात, अष्टमीस अगर दसऱ्यास बोडण भरतात.

नाशिककडे गेलेल्या मंडळींचा कुलस्वामी श्रीकीर्तिकेशव व कुलदेवता श्रीयोगेश्वरी कालीमाता ही होय. नवरात्रांत अखंड दिवा, फुलांची एकेरी माळ, मुख्य व्यक्तीस धान्यफराळ, अष्टमीस उपोषण व नवमीस पारणें असून ब्राह्मण, सुवासिनी

भोजनास सांगतात. जन्म, मुंज, लग्न व गर्भाधान या संस्कारांत बोडण भरतात. चंपाषष्ठीस नवशिक स्वीकारलेल्या खंडोबाचें पूजन, दिवटीबुधली ओवाळणें, तळी भरणें, ब्राह्मण व सुवासिनी भोजनास सांगणें इत्यादि कुलाचार आहेत. मंगळवारीं अगर शुक्रवारीं जोगवा मागतात. या घराण्यांत पिढ्या १०, एकूण व्यक्ति ४४ व जिवंत व्यक्ति २१ आहेत.

नारायण गणेश (३) हे कोंकणांतून नाशिकास आले. हे दशग्रंथी वैदिक होते.

विनायक नारायण (४) वैदिक होते. भार्या अन्नपूर्णा.

सीताराम विनायक (५) हे वैदिक होते. नाशिकास असत. भार्या भागीरथी.

भालचंद्र सीताराम (६) मृ. स. १८९९ जुलै २७. हे उत्तम वैदिक होते. यांना बडोदें संस्थानांतून दक्षिणा मिळत असे. नाशिकास असत. भार्या राधा, धुळ्याच्या सदाशिव बल्लाळ मोडकांची कन्या. मृ. स. १९०७ नोव्हेंबर ४. कन्या (१) गंगू, नाशिकच्या नारायणराव डोंगऱ्यांची पत्नी. (२) येसू, मृ. स. १९३७ फेब्रुवारी १३. नाशिकच्या काशीनाथपंत वैशंपायनांची पत्नी.

रामचंद्र भालचंद्र (७) ज. स. १८४७; मृ. स. १९१७ डिसेंबर ६. नाशिकास म्युनिसिपल पी. डब्ल्यू. डींत नोकर होते. भार्या सीता, नाशिकच्या वामन गणेश शारंगपाण्यांची मुलगी. मृ. स. १९०२ डिसेंबर १६. कन्या (१) वेणू, ज. स. १८७३; मृ. स. १९०९. नाशिकच्या बाळकृष्णपंत वैशंपायनांची पत्नी. (२) वाराणशी, मृ. स. १९००. नाशिकच्या फडक्यांकडे दिली.

*__गोविंद रामचंद्र__ (८) ज. श. १७९३ आश्विन कृष्ण १०. नाशिक. १८९१ त मॅट्रिक. नोकरीस सुरुवात रेल्वेंत नागपुरास रु. १५ वर झाली. पुढें अकौंटंट जनरलचे ऑफिसांत रु. २० वर, नंतर ३ वर्षें रेव्हेन्यू खात्यांत. १९०७ पासून नागपूर येथें ज्युडिशिअल कमिशनरचे ऑफिसांत १५ वर्षें सुपरिंटेंडेंट, पगार रुपये ४००. स. १९२७ त पेन्शन घेऊन नागपूर येथें स्वतःचें घर (नं. ३२८ धंतोली) बांधून सुखवस्तु आहेत. १९२३ त यांस रावसाहेब ही पदवी सरकारांतून मिळाली. पेंडसे कुलांत हे एकच सरकारी पदवीधर आहेत. भार्या भागीरथी, ज. स. १८७९. भडगांवच्या काशीनाथ केशवराव रानडे वकिलांची



रा. सा. गोविंद रामचंद्र

मुलगी. कन्या (१) काशी, ज. स. १९०१ जून २४. यवतमाळच्या बाळकृष्ण

हरी काण्यांची पत्नी. (२) आवडी, ज. स. १९०४ सप्टेंबर ११. मलकापूरच्या नीळकंठ दामोदर केळकरांची पत्नी. (३) सुमति, ज. स. १९२१ जून १३. अकोल्याच्या डॉ. रामचंद्र श्रीधर गानूंची पत्नी.

* **प्रभाकर गोविंद** (९) ज. स. १८९६ मार्च १. नागपुरास तारखात्यांत नोकरी आहे. भार्या सुलोचना (पुर्नविवाहित), ज. स. १९०० डिसेंबर २६. अमरावतीचे बालमुकुंद गंगाराम पांडे, कान्यकुब्ज ब्राह्मण, यांची मुलगी.

* **धनंजय प्रभाकर** (१०) ज. स. १९२७ सप्टेंबर. मराठी विद्यार्थी.

* **त्र्यंबक गोविंद** (९) ज. स. १८९७ नोव्हेंबर ३. बी. ए., एल्. टी. नागपुरास न्यू इंग्लिश स्कुलांत शिक्षक आहेत. भार्या गंगा (मनोरमा), ज. स. १९०५. उमरावतीच्या महादेवराव साठ्यांची मुलगी. कन्या नलिनी, ज. स. १९२९ जून २६. मराठी शिकत आहे.

* **वसंत त्र्यंबक** (१०) ज. स. १९२३ जाने. २३. हायस्कूल विद्यार्थी, नागपूर.

* **विनायक त्र्यंबक** (१०) ज. स. १९२७ एप्रिल ८. हायस्कूल विद्यार्थी, नागपूर.

* **मोरेश्वर गोविंद** (९) ज. स. १९१६ ऑक्टो. १४. एल्. एम्. पी. (सी. पी.) असून डॉक्टरीचें पुढील शिक्षण नागपुरास चालू आहे.

* **भास्कर गोविंद** (९) ज. स. १९१८ ऑगस्ट २५. नागपूर सायन्स कॉलेजांत बी. एस्सीचे वर्गांत आहेत.

वामन रामचंद्र (८) ज. स. १८८४; मृ. स. १८९९.

रघुनाथ भालचंद्र (७) ज. स. १८५४; मृ. स. १९०४ आक्टो. १३. नाशिक व मालेगांव येथें दुकान व खाजगी नोकरी होती. भार्या (१) पार्वती, मृ. स. १८८२. कठोऱ्याच्या कानिटकरांची मुलगी. कन्या चिमणी, ज. स. १८७३. चांदवडच्या गोविंदराव गोखल्यांची पत्नी. भार्या (२) पार्वती, मृ. स. १८९८. खामगांवच्या ओकांची मुलगी.

दामोदर भालचंद्र (७) ज. श. १७७८ माघ शु. २; मृ. स. १९३४ डिसेंबर ५. भुसावळ, नागपूर वगैरे ठिकाणीं जी. आय्. पी. रेल्वेकडे नोकरी होती. सन १९१२ पासून सेवानिवृत्त झाल्यावर नागपुरास राहात असत. स्वभाव करारी व साक्षेपी. भार्या अन्नपूर्णा, ज. स. १८६९; मृ. स. १९१८ नोव्हें. १८. नाशिकच्या सदाशिवराव वैशंपायनांची मुलगी. कन्या (१) दुर्गा, ज. स. १८९१ आक्टो. १२. खेडच्या (पुणें) दामोदर पुरुषोत्तम फाटकांची पत्नी. (२) द्रौपदी, ज. स. १८९४ आक्टो. २८. नाशिकच्या वामन रघुनाथ दातीरांची पत्नी. (३) चंद्रभागा, ज. स. १९०४ एप्रिल २७. जनार्दन कृष्ण जोगांची पत्नी. (४) गंगू, ज. स. १९०८ सप्टें. १७. नाशिकच्या लक्ष्मण महादेव मेहेंदळ्यांची पत्नी.

* **नारायण दामोदर** (८) ज. स. १८८६. वास्तव्य १८८६ ते १८९६ नागपूर, १८९७ ते १९०५ मुंबई, नंतर नागपूर. नागपुरास अकौंटंट जनरलचे ऑफिसांत सुपरिंटेंडेंट होते. पगार रु. ४५०. १९३७ पासून सेवानिवृत्त असून नागपुरास

(छोटी धंतोली, क्रॅडॉक टाऊन) स्वतःचे घरांत राहतात. थिऑसॉफिस्ट आहेत. भार्या (१) लक्ष्मी, मृ. स. १९२५ आक्टो. २९. जबलपूरच्या गोविंद भास्कर ओकांची मुलगी. पुत्र दत्तात्रेय. कन्या (१) कमला, ज. स. १९१० आक्टो. १३. मॅट्रिक. नागपूरच्या नरहर गणेश जोश्यांची पत्नी. (२) सीता, ज. स. १९१२ आक्टोबर १. कॉलेजचें दोन वर्षांचें शिक्षण झालें आहे. अमरावतीच्या विनायक आत्माराम आपट्यांची पत्नी. (३) यमुना, ज. स. १९१४ डिसें. २७. नागपुरास बी. ए. च्या वर्गांत आहे. (४) गोदावरी ऊर्फ चमकी, ज. स. १९२० जून २२. इंग्रजी ६ वी. भार्या (२) लक्ष्मी (पुर्नविवाहित), ज. स. १८९३ सांगलीच्या वामनराव उकिडव्यांची मुलगी. पुत्र रघुनाथ कन्या मालती (अनसूया), ज. स. १९३१ नोव्हेंबर १३. मराठी शिकत आहे.

* **दत्तात्रेय नारायण** (९) ज. स. १९१७ आक्टोबर २. नागपुरास कॉलेजचें पहिल्या वर्षाचें शिक्षण चालू आहे.

* **रघुनाथ नारायण** (९) ज. स. १९२८ जुलै २५. मराठी ४ थी.

लक्ष्मण गबाभट (५) यांची पत्नी नाशिकास स. १८२८ च्या सुमारास सती गेली.

विष्णु लक्ष्मण (६) हे नाशिक येथें वैदिक होते.

बळवंत विष्णु (७) हे बडोदें संस्थानांत रिसाल्यांतील एक ऑफिसर होते. यांना सालिना २०० रुपये पेन्शन मिळत असे. भार्या धुळच्याच्या टकल्यांकडील. कन्या (१) नातू घराण्यांत; (२) गोखले घराण्यांत दिली.

नारायण बळवंत (८) ज. स. १८६९ बडोदें; मृ. स. १९२५ मधुमेह. एम्. ए. (१८९४), एल्एल्. बी. (१८९७). जुनागडास 'बहाउद्दिन' कॉलेजमध्यें गणिताचे प्रोफेसर होते. यांस फ्रेंच, लॅटिन, पर्शियन, जर्मन या भाषा येत असत. सेंट जॉन एँब्युलन्सचे ब्रिगेडियर होते व सुवर्णपदक मिळालें होतें. मुंबई युनिव्हर्सिटींत बरींच वर्षे परीक्षक असत. यांस बडोदें संस्थानांतून १०० रु. वर्षासन मिळत असे. भार्या कृष्णा, धुळच्याच्या भिडयांकडील.

* **काशीनाथ नारायण** (९) ज. स. १९०९. मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत विद्यार्थी आहेत. भार्या लीला (कृष्णा), नाशिकच्या जोश्यांकडील.

* **विनायक काशीनाथ** (१०) ज. स. १९३७ फेब्रुवारी.

लक्ष्मण नारायण (४) हे धौमास आले असावे. वैदिक होते. वास्तव्य सातारा. कन्या, पुण्याच्या रामभाऊ गोरे वैद्यांस दिली.

नरहरी लक्ष्मण (५) मृ. श. सुमारें १८१९. हे धौमहून नेमाड प्रांतांत खरगोणला गेले. तेथें जमीन संपादन करून भिक्षुकी व शेती करून राहात होते. भार्या, बडोद्याच्या पटवर्धनांकडील.

* **नारायण नरहरी** (६) वय ४८. बडोद्यास दांड्या बाजारांत शिवणकाम करतात. भार्या लक्ष्मी (गौरी), बडोद्याच्या बेडेकरांकडील. वय ४०. कन्या (१) मैना (प्रमिला), वय २२, जकातवाडीचे विनायक सदाशिव गोडबोले

(हल्लीं बडोदें) यांची पत्नी. (२) कमल, वय १४. मॅट्रिकच्या क्लासांत. (३) तारा, वय १२. इंग्रजी ४ थी.

* **सुरेश नारायण** (७) वय १.

कृष्णाजी लक्ष्मण (५) ज. श. १८३९; मृ. कॉलऱ्यानें स. १८९४. हे धौमाहून बिराडसिद्धाचे कवठ्यास आले. यांनीं धारवाड जिल्ह्यांत मोजणीखात्यांत काम केलें. पुढें बुधगांव संस्थानांत भागकारकून होते. भार्या राधा, जोश्यांकडील. कन्या मथुरा, तासगांवच्या कृष्णाजी सदाशिव गोखल्यांची पत्नी.

* **दत्तात्रेय कृष्ण** (६) ज. स. १८६९. हे डिस्ट्रिक्ट प्लीडर असून स. १८९६ पासून विट्यास वकिली करतात. स. १९०५ च्या स्वदेशी चळवळीपासून देशी कापड वापरतात. १९२० पासून हातराहाटावर स्वतः सूत काढून, कापड विणून त्याचे कपडे वापरतात. यांच्या भार्येनेंहि खादी वापरण्याचें व्रत स्वीकारलें आहे. भार्या (१) भागीरथी, मोरोपंत साठ्यांची मुलगी; भार्या (२) पिंगला, मिरजच्या महादाजीपंत गोखल्यांची मुलगी; भार्या (३) भागीरथी, चाफळच्या फाटकांची मुलगी. कन्या (१) सुंदरा, शंकर चिंतामण गोळे–मर्ढेकरांची पत्नी. (२) गंगू, विट्याच्या लक्ष्मण विष्णु जोगांची पत्नी.

* **कृष्णाजी दत्तात्रेय** (७) ज. स. १९०४ जाने. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालें असून विट्यास शिवणकाम करतात. भार्या रखमा, पुण्याच्या जोगळेकरांची मुलगी.

* **गोपाळ दत्तात्रेय ऊर्फ गणेश** (७) ज. स. १९१९. सातान्यास न्यू इंग्लिश स्कुलांत सातवींत आहेत.

* **हरी दत्तात्रेय** (७) ज. स. १९२६ आक्टोबर ३. इंग्रजी १ ली. विटें.

* **रामचंद्र कृष्ण** (६) ज. स. १८८६. स. १९११ पासून १९२८ पर्यंत जी. आय्. पी. रेल्वेंत नोकरी केली. पुढें डोळ्यांच्या आजारामुळें सोडली. सध्यां चिपळुणास असतात. भार्या (१) सीता, जोश्यांकडील; (२) जानकी, ओगल्यांकडील. यांना दोन कन्या आहेत.

* **श्रीपाद रामचंद्र ऊर्फ बंडू** (७) ज. स. १९३३.

केळशी गटांतील घराणीं (६ ते १०)

पेंडसे कुलांतील पांच घराणीं मूळ केळशीचीं होत. केळशी हें गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली तालुक्यांत असून कुलाबा जिल्ह्याचे सरहद्दीजवळ आहे. येथील देवी महालक्ष्मी ही आसपासचे भागांत प्रसिद्ध आहे. या गांवचे महाजन पेंडसे आहेत. त्यामुळें या गांवचे पेंडसे कागदोपत्रीं महाजन असें आडनांव लावतात. सध्यां येथें पेंडसे यांचें वास्तव्य आहे.

घराणीं क्रमांक ७ व ९ हीं आदित्यनाथ योगेश्वरीस कुलस्वामी मानितात,

घराणें ७ चें वास्तव्य सध्यां केळशीस आहे व घराणें ९ ची केळशीहून गेल्याची स्मृति ताजी आहे. त्यामुळें दोन्ही घराणीं आदित्यनाथ मानितात. बाकीचीं तीन घराणीं महालक्ष्मी मानितात. ही महालक्ष्मी केळशीची असली पाहिजे; परंतु सर्व घराण्यांत तशी स्मृति राहिली नाहीं.

सर्व घराणीं मूळ गांव केळशी सांगत असलीं तरी वंशावळींत यांचा मूळ पुरुष एक दाखवितां येत नाहीं. सहाव्या घराण्यांतील महादेव (२) व आठव्या घराण्यांतील महादेव (१) कदाचित् एक असतील; परंतु निश्चित माहितीचे अभावीं हीं घराणीं निराळीं मानिलीं आहेत.

केळशीहून कांहीं मंडळी निघाली, ती उत्तरेकडील कुलाबा जिल्ह्यांतील तळें, शेकाची बिरवाडी (चणेरें), अवचितगड व रेवदंडा येथें राहिली. एक शाखा भीमाशंकरजवळील वाडें (जि. पुणें) येथें आली व स्थायिक झाली.

घराणें ६ वें, केळशी—तळें

(वंशावळ पृ. ८५)

या घराण्याचा मूळ पुरुष रघुनाथ. हें घराणें रत्नागिरी जिल्ह्यांतील केळशीहून तळें, ता. माणगांव, जिल्हा कुलाबा येथें आलें. कांहीं दिवस घोसाळें, ता. रोहें येथेंहि याची वस्ती होती. ही मंडळी आपलें मूळ ठिकाण केळशी सांगतात; परंतु केळशी येथील मिळालेल्या पेंडसे यांच्या वंशावळींत यांचा मूळ पुरुष रघुनाथ किंवा वंशावळींतील इतर कोणत्याहि व्यक्तींचा उल्लेख आढळत नाहीं. सध्यां यांची वस्ती तळें या गांवींच आहे.

कुलस्वामिनी :—केळशी येथील महालक्ष्मी तळें येथें आल्यावर श्रीगणपति व श्रीनाथसांप्रदायी सद्‌गुरूंच्या पादुका व विठ्ठल-रुक्मिणी यांचीहि उपासना सुरू जाहली. पादुकांचा उत्सव श्रावण श. ७ ते ११ पर्यंत व गणपतीचा उत्सव घोसाळें येथें भाद्रपद शु. १ ते ६ पर्यंत होत असतो. महालक्ष्मीचे नवरात्रांत घटस्थापना करून नऊ दिवस सुवासिनी भोजनास सांगतात. प्रत्येक महिन्याचे प्रतिपदेस कुलाचार म्हणून दोन ब्राह्मण भोजनास बोलावितात.

वे. लक्ष्मणभट पेंडसे व आबाजी रघुनाथ व महादाजी रघुनाथ पेंडसे वास्तव्य तळें. हे त्रिवर्ग बंधु व वडील रघुनाथ गोविंद यांचे श. १७१६ वैशाख व. ७ रोजीं झालेले वांटणीपत्रावरून असें दिसतें कीं, या घराण्यांत दोन सरकारी असाम्या होत्या; त्या आबाजी रघुनाथ व महादाजी रघुनाथ यांचे वांटणीस गेल्या. विद्यमान मंडळींकडून आलेल्या वंशावळींत आबाजी हें नांव आढळत नाहीं, परंतु गणेश हें आढळतें. त्यावरून आबाजी हें गणेशचें दुसरें नांव दिसतें. प्रत्येकाचे वांटणीस ४५-५० तोळे सोनें व इतर जिन्नस आले. यावरून त्या वेळीं या घराण्याची सांपत्तिक सुस्थिति होती असें दिसतें. शेणवली व आंबोली हे दोन गांवहि त्यांजकडे होते.

स. १८२४ त गांवांतील विठोबाचे देवालयाचे खर्चाकरितां बल्लाळ गणेश (बाळगोसावी) यांस सरकारांतून ५ रुपये मिळाल्याचा दाखला आहे.

या घराण्यांत पिढ्या ९, एकूण व्यक्ति ३२ व जिवंत व्यक्ति ११ आहेत.

गोविंद रघुनाथ (२) हे केळशीहून तळ्यास आले. त्यांस तळें येथील गडावर नोकरी होती. ते तेथें स्थायिक जाहले.

रघुनाथ गोविंद (३) शेती व व्यवहारधंदा करीत. यांनीं मौजे शेणवली तर्फ तळें, कोंड-कासेवाडी येथील जमिनीचा कौल संपादन केला. हे श. १७१६ त हयात होते.

गणेश रघुनाथ ऊर्फ आबाजी (४) हे तळें व घोसाळगडावर नोकर होते. यांनीं तळें येथील आपलें घर रामभट उपाध्ये यांस दिलें. यांस बरेच दिवस संतान नसल्यामुळें घोसाळें येथील ग्रामदेवता श्रीबहिरी व स्वयंभू गणपति यांची यांनीं बरीच सेवा केली. पुढें यांस एक मुलगा जाहला, त्यास बाळगोसावी म्हणत असत. भार्या सरस्वती.

बल्लाळ (बाळाजी) गणेश ऊर्फ बाळगोसावी (५) मृ. श. १७९८ माघ व. ३, शिक्षण मराठी. यांचे वडील हे अल्पवयी असतां मृत्यु पावल्यामुळें यांस तळ्याचे विठ्ठल त्र्यंबक गोविलकर यांनीं बरीच मदत केली. खोती व व्यापार करीत. यांचें कीर्तन, भजन, नामस्मरण यांकडे नेहमीं लक्ष असे. हे वयाचे ९।१० वर्षांपासून कीर्तन करीत. हमरापूर येथील सत्पुरुष श्रीएकनाथमहाराज यांचा गुरूपदेश यांनीं घेतला होता.त्यांची समाधि बांधण्याचे कामीं यांचा बराच पुढाकार होता. यांनीं तेथें नाथषष्ठीचा उत्सव सुरू केला. परमार्थांत लक्ष ठेवून यांनीं उत्तम तऱ्हेनें संसार केला. मौजे शेणवली हा खोतीगांव यांनीं मेहेंदळे यांजपासून खरेदी घेतला. मौजे पाणसई व मालाठें येथीलहि खोती करीत असत. यांनीं आपले गुरूंचा उत्सव श्रावण महिन्यांत सुरू केला. श. १७४० चे सुमारास जागा संपादन करून घर बांधून तळ्यास राहिले. तेथील श्रीविठोबाचे देवळांत कीर्तन करण्याबद्दल यांस सरकारांतून पांच रुपयांचें वर्षासन होतें. तें यांनीं स्वतःचे वंशांत न ठेवतां आबाजी बल्लाळ भावे यांचे नांवें करून दिलें. यांनीं शेवटीं चतुर्थाश्रम स्वीकारला होता. भार्या सावित्री, चौकच्या गोडबोल्यांकडील. कन्या वालू, तळ्याच्या बाळाजी गणेश वाडांची पत्नी.

रघुनाथ बाळाजी (अण्णा) (६) ज. तळें श. १७४८ श्रावण व. १०; मृ. तळें श. १८०८ आश्विन शु. ७, दमा. व्यापार व दलाली करीत. यांनीं मौजे पडवण व मौजे केळशी तर्फ तळें व मौजे कांदळगांव हे खोती गांव संपादन केले. तसेंच घोसाळें व हमरापूर येथें धान्याची जमीन संपादन केली. हमरापूर येथील जमिनीचें उत्पन्न तेथील श्रीनाथांचे उत्सवास खर्च होतें. हे वडिलांप्रमाणें भक्तिमार्गी होते व कीर्तन करीत. तळ्याच्या बाजारांतील मारुतीचे देवळाचा जीर्णोद्धार यांच्याच खटपटीनें झाला; व ह्यांनीं तेथील उत्सवाकरितां

कांहीं रक्कम काढून ठेविली आहे. मौजे उचेल तर्फ घोसाळें येथील गंगेच्या कुंडांचा जीर्णोद्धार करण्याचे बाबतींत यांनींच पुढाकार घेतला होता. भार्या (१) सावित्री, मेहेंदळ्यांकडील. भार्या (२) सावित्री, केळकरांकडील.

वासुदेव रघुनाथ (७) ज. तळें श.१७९० फा. व. २; मृ. श.१८३८ फा. शु.३, उदर. यांचें मूळचें नांव वासुदेव विष्णु. हे चुलत्याचे मांडीवर दत्तक बसले. शिक्षण मराठी. व्यापार करीत. भार्या सरस्वती, गोखल्यांकडील. यांच्या पत्नीनें यांचे पश्चात् पुतण्या अनंत कृष्ण यास दत्तक घेतलें.

* **अनंत वासुदेव** (८) ज. तळें श. १८२८ आषाढ शु. २. मराठी शिक्षण. शेती व खोती करतात. वास्तव्य तळें. यांचें मूळचें नांव अनंत कृष्ण असून हे चुलतीचे मांडीवर दत्तक बसले. भार्या रमा (यमू), विवाह श. १८५०, जोगळेकरांकडील. कन्या (१) सुभद्रा. (२) वत्सला.

* **रामकृष्ण अनंत** (९) ज. श. १८५८ आषाढ व. ८.

विष्णु बाळाजी (६) ज. तळें १७५८ मार्ग. व. १०; मृ. श.१८३६ आषाढ शु. ९, वात. यांनीं मृत्यूपूर्वीं एक वर्ष चतुर्थाश्रम स्वीकारला होता. नंतरचें नांव निजानंद. भार्या सत्यभामा, गोखल्यांकडील. कन्या धोंडूबाई, जांभूळपाडयाच्या पद्माकरपंत अभ्यंकरांची पत्नी.



१. निजानंद (विष्णु बाळाजी). २. वासुदेव रघुनाथ.

विठ्ठल विष्णु (७) ज. गोरेगांव श.१७८५ वै. शु. ११; मृत्यु श. १८२८ ज्येष्ठ शु. १. मराठी शिक्षण. व्यापार व देवघेव करीत. हे घरांतील सर्व व्यवहार वडिलांच्या हयातीपासूनच पाहात असत. यांनीं महुरे–भाणंद येथील खोतीचे हिस्से संपादन केले. बेलघर व पीतसई हेहि गांव गहाण घेतले होते. मौजे कदवणास घर व श्रीशंकराचें देऊळ बांधलें. भार्या राधा, गांगलांकडील. कन्या काशी.

* **पुरुषोत्तम विठ्ठल** (८) ज. तळें श. १८१९ चैत्र व. १३. यांचें मूळचें नांव पुरुषोत्तम गणेश हें असून हे चुलत्याचे मांडीवर दत्तक बसले. शिक्षण मराठी व इंग्रजी ४ इयत्तांपर्यंत झालें. खोती व शेती करितात. भक्तिमार्गाकडे प्रवृत्ति असून रोज दत्तपादुकांची पूजा करतात. यांचें घर तळें येथें बाजारपेठेंत आहे.

भार्या (१) गंगा (मनू), विवाह श. १८३८. सदाशिव आबाजी भट यांची मुलगी. पुत्र गोविंद. भार्या (२) अन्नपूर्णा (इंदिरा), विवाह श. १८५०. पटवर्धनांकडील. पुत्र वसंत. कन्या (१) काशी, वय ८.



श. १८६०.

उभी रांगः—१. अंबू, २. अन्नपूर्णा, ३. सावित्री, ४. मोरेश्वर विनायक.
कोचावरः—१. अनंत वासुदेव, २. रामकृष्ण अनंत, ३. पुरुषोत्तम विठ्ठल, ४ विनायक गणेश, ५. गोविंद पुरुषोत्तम.
पुढची रांगः—१. वत्सला, २. सुभद्रा, ३. वसंत पुरुषोत्तम, ४. काशी.

---

* **गोविंद पुरुषोत्तम** (९) ज. तळें श. १८४८ वै. व. ३. मराठी ४ थी.
* **वसंत पुरुषोत्तम** (९) ज. महाड श. १८५५ चै. शु. २.
वासुदेव विष्णु (७) हे आपले चुलते रघुनाथ बाळाजी यांस दत्तक गेले. नंतरचें नांव वासुदेव रघुनाथ.

गणेश विष्णु (७) ज. तळें श. १७९३ चै. व. ४; मृ. श. १८५३ चै. शु. १२. शिक्षण मराठी. शेवटीं यांनीं चतुर्थाश्रम घेतला होता. नंतरचें नांव सच्चिदानंद. हे, ह्यांचे वडील व आजे अशा त्रिवर्गांच्या समाधि तळें येथें आहेत. हे समाधिस्थ झाल्यावर एकत्र असलेलें कुटुंब जुलै १९३४ मध्यें विभक्त होण्याचें ठरून प्रत्यक्ष मार्गशीर्ष शु. १० शके १८५६ रोजीं विभक्त झालें. भार्या यशोदा, विवाह श. १८०७. रानडे यांजकडील. कन्या (१) कृष्णा, (२) मनू, (३) वेणू, (४) गोदू, नागपूरच्या दातारांकडे दिली.



सच्चिदानंद (गणेश विष्णु)

* **रघुनाथ गणेश** (८) ज. तळें श. १८१७ श्रा. व. ३. शिक्षण मराठी. वास्तव्य तळें. शेती व खोती करतात. भार्या सत्यभामा (बगू), वैद्यांकडील. कन्या अंबू.

पुरुषोत्तम गणेश (८) हे आपले चुलते विठ्ठल विष्णु यांस दत्तक गेले. नंतरचें नांव पुरुषोत्तम विठ्ठल.

* **विनायक गणेश** (८) ज. तळें श. १८२७ ज्ये. व. ३. मराठी शिक्षण. शेती व खोती करतात. वास्तव्य तळें. पार्थिव गणपतीची पूजा रोज नमानें करतात. भार्या (१) सावित्री (सखू) विवाह श. १८४५, गोखल्यांकडील. भार्या (२) सावित्री (येसू), विवाह श. १८५६. बापटांकडील.



रघुनाथ

* **मोरेश्वर विनायक** (९) ज. तळें श. १८५८ कार्तिक व. ६.

* **चिंतामणि गणेश** (८) ज. तळें श. १८२९ आषाढ व. ४. मराठी शिक्षण. शेती व खोती करतात. वास्तव्य तळें. भार्या आनंदी (कृष्णा), विवाह श. १८५८. आठवल्यांकडील.

कृष्णाजी विष्णु (७) ज. तळें श. १७९५ पौ. शु. १२; मृ. श. १८५१ पौ. व. ६. मराठी शिक्षण. भार्या (१) रखुमा, विवाह श. १८११, साठ्यांकडील. भार्या (२) पार्वती, विवाह श. १८३६, केळकरांकडील. कन्या (१) सीता, पालशेतच्या केळकरांकडे दिली. (२) गंगू, रोहयाच्या हरिभाऊ जोश्यांची पत्नी.

* **काशीनाथ कृष्ण** (८) ज. तळें श. १८१८ माघ व. १. मराठी व इंग्रजी ४ थी. शेती व खोती करितात. वास्तव्य तळें. भार्या (१) भागीरथी (बाळू), विवाह श. १८३५. गोखल्यांकडील. भार्या (२) जानकी, विवाह श. १८४४. बापटांकडील. भार्या (३) यमुना, विवाह श. १८४७. चाफेकरांकडील. भार्या (४) भागीरथी (बाळू), विवाह श. १८४९. ओकांकडील. पुत्र गजानन.

* **गजानन काशीनाथ** (९) ज. तळें श. १८५७ मा. शु. ७.

मुकुंद विष्णु (७) ज. तळें श. १७९७ माघ शु. १५; मृ. श. १८५७ वै. व. ६. मराठी शिक्षण. सुखवस्तु होते. भार्या लक्ष्मी, विवाह श. १८१५. परांजप्यांकडील. कन्या कोंडी, कुडलीच्या गोखल्यांकडे दिली.

वामन बाळाजी (६) ज. तळें श. १७६५ ज्ये.; मृ. श. १७८० फा. शु. १०.

महादाजी रघुनाथ (४) पुण्यास पेशव्यांकडे नोकरीस होते.

लक्ष्मण रघुनाथ (४) हे भिक्षुक होते. यांस रामचंद्र नांवाचा पुत्र होता व नारायण नांवाचा नातु होता. पुढें वंश नसल्यामुळें ह्यांची मिळकत यांचे बंधु आबाजी रघुनाथ यांचे वंशाकडे गेली.

महादेवभट रघुनाथ (२) भार्या येसुबाई. ही श. १६५२ त त्र्यंबकला गेल्याचा दाखला मिळतो.

घराणें ७ वें, केळशी

(वंशावळ पृ. ८६ ते ८८)

या घराण्याचा मूळ पुरुष तुकदेव. कोंकणांतील मूळ ठिकाण केळशी. या घराण्यांतील पेंडसे हे केळशीचे महाजन आहेत. यांचेपैकीं जनार्दन गणेश (४) यांचे वंशज कागदोपत्रीं महाजन आडनांव लावतात व भिकाजी गणेश (४) यांचे वंशज पेंडसे आडनांव लावतात. तथापि पहिल्यास आपलें मूळचें आडनांव पेंडसे असल्याबद्दल व दुसऱ्यास आपलें उपपद महाजन असल्याची जाणीव आहे.

सध्यां यांची वस्ती अकोला, इंदूर, उमरावती, कल्याण, केळशी, पुणें, मुरुड व यवतमाळ या गांवीं आहे. वरील गांवांशिवाय पूर्वीं यांची वस्ती आंजर्ले, करचोंड, घोटवडें, जांभुळपाडा, नागोठणें, मुंबई, वसई, वाशीम, वेणगांव, हरिपूर या गांवीं असल्याचें दिसतें.

अनंत सखाराम (७) यांचे घराण्यांत अलीबागच्या आंग्र्यांकडून १० मण उत्पन्नाची जमीन इनाम होती.

कुलस्वामी व कुलदेवता :—आदित्यनाथ व जोगेश्वरी. यांशिवाय वेशवीची देवी व केळशीची महालक्ष्मी व इतर ग्रामदेवता यांना देवदिवाळीस नैवेद्य दाखवितात. चैत्र शु. १५ स यथाशक्ति ब्राह्मण, सुवासिनी व कुमारिका यांस भोजन घालण्याची वहिवाट आहे. भिकाजी गणेश (४) यांच्या शाखेपैकीं लोक करचोंडे येथील सोमजाई, सोमेश्वर व मारुति या देवतांना देवदिवाळीस नैवेद्य दाखवितात. मंगल कार्यानंतर बोडण भरतात. आश्विनांतील नवरात्रांत अखंड दीप दुहेरी माळ व रोज सुवासिनी भोजनास सांगतात. घरांतील मुख्य स्त्रीनें नवरात्रांत धान्यफराळ करावयाचा असतो.

केळशीच्या महाजनांपैकींच एक शाखा रेवदंड्यास गेली आहे. केळशी येथें रेवदंडेकर-पेंडसे-महाजन यांचें एक ठिकाण अद्यापि दाखविलें जातें. रेवदंड्याचे पेंडसे आपलें आडनांव कागदोपत्रीं महाजन असें लावितात. परंतु रेवदंड्याची स्थानिक मंडळी त्यांना दिवाणजी या टोपण नांवानें संबोधितात.

या घराण्यांत पिढ्या १०, एकूण व्यक्ति १२६ व जिवंत व्यक्ति ३९ आहेत.

भिकाजी गणेश (४) भार्या अन्नपूर्णा. कन्या मथुरा, ही राघोबादादा पेशवे यांची तिसरी बायको. हें लग्न राघोबा इंग्रजांचे आश्रयास सुरतेस गेल्यावर झालें. ही सुरतेस मूलबाळ न होतां देवी येऊन इ. स. १७८० च्या जूनमध्यें वारली (ऐ. ले. ७ पृ. ३६६०).

गंगाधर विश्वनाथ ऊर्फ दाजीबा (७) भार्या पार्वती.

नारायण गंगाधर (८) ज. स. १८४३; मृ. स. १८८८. वऱ्हाडांत ए. व्ही. स्कुलांत शिक्षक होते. भार्या लक्ष्मी. कन्या (१) बयो, गणेश रामचंद्र पाटणकरांची पत्नी. (२) कृष्णा, बाळकृष्ण गंगाधर वझ्यांची पत्नी.

विश्वनाथ नारायण (९) ज. स. १८६८; मृ. स. १९०६. मॅट्रिक. प्रथम बी. एन्. रेल्वेंत नोकरी केली. पुढें यवतमाळास खाजगी नोकर होते. भार्या चितळ्यांकडील. कन्या कमला, नागपुरास दात्यांकडे दिली.

* **दत्तात्रेय नारायण** (९) ज. स. १८८६. उमरावतीस शिंपीकाम करीत असून शिवाय डेअरीचा व्यवसाय करतात. पत्ता—रामचंद्र विश्वनाथ काळे, इंजिनिअर यांचा वाडा, वकीलपुरा. भार्या रमा, उमरावतीच्या भागवतांची मुलगी. कन्या (१) इंदु, वय १६. (२) विमल. (३) तारी. (४) शालिनी.

* **गोपाळ दत्तात्रेय** (१०) वय ९. मराठी विद्यार्थी, उमरावती.

*वामन दत्तात्रेय (१०) वय ४.

*रामचंद्र नारायण (९) ज. स. १८८८. वऱ्हाडांत रेव्हेन्यू खात्यांत नोकर होते. सध्यां सेवानिवृत्त असून अकोल्यास रामदास पेठेंत सुखवस्तु आहेत. वैद्यकीचा व्यवसाय करतात. भार्या सीता, अकोल्याच्या लक्ष्मण गोविंद ओक वकिलांची मुलगी. कन्या (१) लीला, ज. स. १९२२. इंग्रजी ३ री. (२) शरयू, ज. स. १९३३.

*भास्कर रामचंद्र (१०) ज. स. १९१८. सरकारी शिल्पशाळेंतील विद्यार्थी, अकोला.

*पद्माकर रामचंद्र (१०) ज. स. १९२४. इंग्रजी ३ री.

*प्रभाकर रामचंद्र (१०) ज. स. १९२७. मराठी ४ थी.

*मुरलीधर रामचंद्र (१०) ज. स. १९२९. मराठी प्राथमिक विद्यार्थी.

*श्रीपाद रामचंद्र (१०) ज. स. १९३१.

गोविंद गंगाधर (८) ज. स. १८४५; मृ. स. १८९५. वऱ्हाडांत खाजगी नोकरी होती. शेतीहि करीत. भार्या भागीरथी. कन्या (१) भीमा. (२) काशी. (३) गोदी.

अनंत गोविंद (९) ज. स. १८९२; मृ. स. १९३०. पुलगांव मिलमध्यें नोकरी होती. कन्या अन्नपूर्णा, पनवेल हायस्कूलचे हेडमास्तर पुरुषोत्तम दामोदर वेलणकर यांची पत्नी.

विष्णु गंगाधर (८) वऱ्हाडांत सबरजिस्टर होते.

*धोंडो विष्णु (९) उमरावतीस डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरचे ऑफिसांत नोकरी आहे. पत्ता–आंबडेकर चाळ, बडनेरा रोड.

*गणेश विनायक (९) उमरावतीस सरकारी शेती फॉर्मवर नोकरी आहे.

*महादेव विनायक (९) यवतमाळला मोटारड्रायव्हर आहेत.

गणेश गंगाधर (८) भार्या गिरिजा.

सदाशिव भिकाजी (५) इ. स. १८१६ चे सुमारास रावबाजींनीं पुण्याजवळ फुलगांव येथें फुल शहर वसविण्याचें ठरवून ब्राह्मणांस घरें बांधण्यास रकमा दिल्या. त्यांत सदाशिवपंत पेंडसे यांस रु. दोन हजार दिले. यांनीं तेथें घर बांधिलें. पण राहात नाहींत असा उल्लेख आढळतो. (भा. इ. सं. मं. इतिवृत्त शक १८३५ पृ. २६२). ते सदाशिवपंत हेच असावेत. तसेंच मुर्डी गांवचे भट–पेंडसे वादांत साक्षीदारांचे यादींत सदाशिवपंत महाजन केळशीकर यांचें नांव आढळतें तें नांव यांचेंच आहे.

व्यंकटेश सदाशिव (६) आनंदीबाई पेशवे कोपरगांवास राहात असतां इ. स. १७८७मध्यें हे भाऊबीजेसाठीं तेथें गेल्याचा उल्लेख आहे (ऐ.प्र.क्रमांक १६पहा.)

गोपाळ भिकाजी (५) भार्या रमा.

काशीनाथ गोपाळ (६) भार्या उमा.

बापूजी भिकाजी (५) भार्या रखमा.

सखाराम बापूजी (६) अक्षीस शेती व भिक्षुकी करीत. भार्या आनंदी (बयो), अक्षीच्या भाटयांकडील.

अनंत सखाराम (७) अक्षीस शेती व भिक्षुकी करीत. भार्या राधा. कन्या (१) यशोदा, मेढयाच्या जोश्यांकडे; (२) बयो, सासवन्याच्या म्हसकरांकडे दिली.

गणेश अनंत (८) ज. स. १८५२; मृ. स. १९०२. अलीबाग तालुक्यांत मराठी शिक्षक होते. भार्या सरस्वती, थळच्या गोपाळराव रानडयांची मुलगी. कन्या (१) गोदू, किहीमच्या आठवल्यांकडे दिली. (२) सखू, नागांवच्या दामोदर भास्कर जोश्यांची पत्नी.

***कृष्णाजी गणेश** (९) ज. थळ स. १८८५. रेवदंडयास सुखवस्तु आहेत. अविवाहित.

***दत्तात्रेय गणेश** (९) ज. थळ स. १८९४ डिसें. १०. पनवेलीस सबजज्ज कोर्टांत क्लार्क आहेत. भार्या राधा, नागांवच्या अनंत गोविंद आपटयांची मुलगी.

***बापूजी गणेश** (९) ज. अक्षी स. १९०२. शिक्षक आहेत. भार्या सीता, पेणच्या प्रभाकर भास्कर भाटयांची मुलगी. कन्या (१) तारा, वय ९. मराठी शिकते. (२) शांता, वय ६. मराठी शिकते. (३) रेवती, वय १.

***चिंतामणि बापूजी** (१०) ज. अलीबाग वय १२. रेवदंडयास इंग्रजी शिकत आहे.

नारायण अनंत (८) ज. स. १८५५; मृ. स. १९०४. अलीबागच्या मिशन स्कुलांत शिक्षक होते. भार्या वेणू, खानावच्या वैशंपायनांकडील. यांस एक पुत्र असून ते पेणला शिवणकाम करितात असें कळतें.

शंकर अनंत (५) ज. स. १८६२; मृ. स. १९१६. अक्षीस भिक्षुकी व शेती करीत.

रामचंद्र जनार्दन (५) भार्या राधा.

कृष्णाजी रामचंद्र (६) भार्या दुर्गा.

परशुराम कृष्ण (७) यांच्या संबंधानें भोसलेकृत जंजिरा संस्थानचा इतिहास, पृ. १५४–५५ वर पुढीलप्रमाणें मजकूर आहे :—“ परशुराम कृष्ण या नांवाचा केळशीचा एक ब्राह्मण होता. त्यास खानसाहेबांनीं आपल्या गांवाचा वसूल करण्याकरितां कारकून ठेविलें होतें. त्यांनीं दहा वर्षें काम केल्यानंतर तो बेमान होऊन सरकारच्या वसुलाचा पैसा घेऊन ब्रिटिश हद्दींत पळून गेला. नबाब सरकारनें त्यास धरून आणून सहा महिनेपर्यंत अटकेंत ठेविलें. ही गोष्ट मुंबई सरकारास कळतांच त्यांनीं इ. स. १८६२ च्या आक्टोबर महिन्यांत एका लष्करी आगबोटींत ठाण्याचा कलेक्टर रॉबर्टसन यांस जंजिऱ्यांत पाठवून महाजन यास त्याच्या ताब्यांत देण्याविषयीं लिहून कळविलें. नंतर दीड वर्षानें मुंबई सरकारनें तीन हजार रुपये नुकसानीबद्दल घेऊन ते महाजन यांस देवविले.” भार्या जानकी. यांस एक कन्या होती. ती वेळासला दिली होती.

विष्णु गोपाळ (९) भार्या जानकी.
नारायण गोपाळ (९) भार्या यमुना.
दामोदर गोपाळ (९) भार्या लक्ष्मी.
गणेश परशुराम (८) भार्या वाराणशी.
केशव गणेश (९) भार्या भागीरथी.
विठ्ठल परशुराम (८) मृ. स. १८८७ वय सुमारें ३०. कस्टम खात्यांत नोकर होते. भार्या रखमा (आवडी), मृ. स. १९३६, वय ७२; पालगडच्या रामचंद्र बापूजी सान्यांची मुलगी.
* परशुराम विठ्ठल (९) ज. केळशी स. १८८४ डिसें. १८. वडील लहानपणीं वारल्यामुळें शिक्षण पालगड, दापोली, रत्नागिरी वगैरे ठिकाणीं झालें. रत्नागिरी हायस्कूलमधून स्कूलफायनल झाले. स. १९०३ मध्यें वऱ्हाडांत कापसाचा व्यापार करीत. १९०४ मध्यें मुंबईस गणेश विष्णु चिपळूणकर यांचे कापडाचे दुकानांत नोकरी होती. १९०६ ते १९३४ पर्यंत मुंबईस कमिशन एजंट. १९२८ मध्यें केसरीची एजन्सी घेतली. सध्यां केसरी संस्थेंत नोकरी आहे. १९१५ पासून राजकारणांत लक्ष घालूं लागले. १९१७–२० ठाणें जिल्हा होमरूल लीगचे कार्यवाह. १९२१–३१ महाराष्ट्र प्रां. काँग्रेस कमिटीचे कार्यवाह. वास्तव्य १९०७–१९३६ कल्याण. सध्यां पुणें, घर नं. ३८९ नारायण पेठ. भार्या (१) सरस्वती (भिकू), मालदोलीच्या विष्णु नारायण थत्त्यांची मुलगी. पुत्र रामचंद्र. भार्या (२) रमा (माणीक), सांगलीच्या सदाशिव बापूजी सहस्रबुद्ध्यांची मुलगी. पुत्र कृष्ण, विष्णु, जनार्दन व बळवंत. कन्या (१) गंगू, ज. स. १९२९. मराठी दुसरी. (२) मनू, ज. स. १९३४. भार्या (३) रमा (द्रौपदी), खेडच्या रंगनाथ नारायण दामल्यांची मुलगी.
* रामचंद्र परशुराम (१०) ज. स. १९१५. कल्याणास असतात.
* कृष्णाजी परशुराम (१०) ज. स. १९२२. इंग्रजी ६ वी.
* विष्णु परशुराम (१०) ज. स. १९२३. इंग्रजी ५ वी.
* जनार्दन परशुराम (१०) ज. स. १९२६. मराठी ४ थी.
* बळवंत परशुराम (१०) ज. स. १९३२.
* पुरुषोत्तम विठ्ठल (९) ज. केळशी स. १८८६. बी. बी. सी. आय्. रेल्वेंत कारनॅकबंदरला नोकरी आहे. वास्तव्य कल्याण. भार्या सत्यभामा, मांडवगण्याच्या श्रीधरपंत जोश्यांची मुलगी.
* लक्ष्मण पुरुषोत्तम (१०) ज. स. १९१६. फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंटरच्या वर्गांत आहेत. यू. टी. सी. मध्यें असतात.
* माधव पुरुषोत्तम (१०) ज. स. १९२१, इंग्रजी ६ वी. कल्याण.
* दत्तात्रेय पुरुषोत्तम (१०) ज. स. १९२६. मराठी ३ री. कल्याण.
गणेश कृष्ण (७) भार्या यशोदा.

सदाशिव जनार्दन (५) हे केळशीस होते. मुर्डी–आंजर्ले वादांत हे साक्षीदार होते. भार्या भवानी.

जनार्दन विसाजी (७) भार्या काशी.

बाबाजी विनायक (७) हे १०२–३ वयाचे असतांना केळशीजवळील आडें मुक्कामीं वारले.

श्रीधर बाबाजी (८) हे बडोदें संस्थानांत नोकर होते.

* **विनायक श्रीधर** (९) ज. श्रीवर्धन. वय ५०. खाजगी नोकरी आहे. अविवाहित असून संगीताची आवड आहे. पत्ता—महमदवाडी, फडणीस यांचा वाडा, बडोदें.

* **गणेश श्रीधर** (९) सेकंड इयर ट्रेंड असून मुरुड (जंजिरा) येथें मराठी शाळेंत हेडमास्तर आहेत. भार्या सरस्वती, पेठ्यांकडील.

* **मोरेश्वर गणेश** (१०) इंग्रजी सहावींत आहे.

* **गजानन गणेश** (१०) बालवर्गांत शिकतो.

सदाशिव श्रीधर ऊर्फ छबु (९) हे श्रीवर्धनास मराठे घराण्यांत दत्तक गेले व तेथील नांव कृष्णाजी लक्ष्मण आहे.

त्र्यंबक आप्पाजी (७) केळशीस शेती करीत. भार्या (१) लक्ष्मी, बेहेऱ्यांकडील. कन्या (१) गोदी, आडयाच्या परांजप्यांकडे; (२) वाली, मुर्डीच्या सहस्रबुद्धयांकडे दिली. भार्या (२) भागीरथी, रानडयांकडील. पुत्र गोविंद, जनार्दन व कृष्ण. कन्या (१) धोंडी, केळशीच्या रामचंद्र बल्लाळ वैद्यांची पत्नी. (२) बयो, वेळासच्या सदाशिव पुरुषोत्तम सोमणांची पत्नी. (३) काशी, केळशीच्या भास्कर गोपाळ परांजप्यांची पत्नी. (४) वेणू, महाडच्या नारायण गोविंद भुस्कुटयांची पत्नी.

* **गोविंद त्र्यंबक** (८) ज. केळशी श. १७९३. केळशीस शेती करतात. भार्या लक्ष्मी, बिवलकरांकडील. कन्या (१) येशी, बिरवाडीच्या दत्तात्रेय केशव गोखल्यांची पत्नी. (२) मथुरा, धोकवडयाच्या विष्णु रामचंद्र फडणिसांची पत्नी. (३) अंबी, बिरवाडीच्या काशीनाथ पांडुरंग पटवर्धनांची पत्नी. (४) बगी. (५) गंगी. (६) ठकी. (७) कमळी.

* **भास्कर गोविंद** (९) ज. केळशी श. १८३४. मुंबईस पेंटर आहेत. भार्या मालती, कोजरेकरांकडील, विवाह श. १८५७.

* **चंद्रकान्त भास्कर** (१०) ज. स. १९३७.

* **जनार्दन त्र्यंबक** (८) ज. केळशी, श. १८००. केळशीस शेती करतात. अविवाहित.

* **कृष्णाजी त्र्यंबक** (८) ज. केळशी, श. १८०८. केळशीस शेती करतात. भार्या राधा, जोश्यांकडील; विवाह श. १८३९. कन्या (१) शांती. (२) विमल. (३) येशी.

* **दत्तात्रेय कृष्ण** (९) ज. श. १८५५.

वासुदेव त्र्यंबक (८) हे केळशीस वर्तक घराण्यांत दत्तक गेले. तेथील नांव विष्णु नारायण वर्तक.

*हरी काशीनाथ (८) वय ६५. मिडल स्कूलचे हेडमास्तर होते. सध्यां पेन्शनर असून ३० नंदलालपुरा, इंदूर येथें राहतात. भार्या आनंदी, चक्रदेवांकडील, वय ५५.

सखाराम काशीनाथ (८) मृ. स. १९३७. वय ६२. इंदूरास मोज्यांचा व पातळें विणण्याचा कारखाना चालवीत. भार्या जानकी. कन्या उत्तरा, वय २५. मोडकांकडे दिली.

*वामन सखाराम ऊर्फ बाळ (९) वय २१. बी. ए. इंदूरास वडिलांचा मोजे व पातळें यांचा कारखाना चालवितात.

अनंत लक्ष्मण (८) भार्या सरस्वती.

घराणें ८ वें, केळशी—बिरवाडी

(वंशावळ पृ. ८९)

या घराण्याचा मूळ पुरुष महादेव. कोंकणांतील मूळगांव माहीत नाहीं. बिरवाडी (ता. रोहे) या गांवीं यांची वस्ती सुमारें शंभर वर्षें तरी असावी असें वाटतें. या घराण्यांतील सर्व मंडळींची वस्ती सध्यां बिरवाडीसच आहे.

बिरवाडीचे किल्ल्याचे पायथ्याशीं शेखाचे थडगें आहे. त्यामुळें या गांवास शेखाची बिरवाडी असेंहि म्हणतात. या गांवची वस्ती पूर्वी किल्ल्याचे पायथ्याशीं होती. परंतु सुमारें ७५–८० वर्षांपूर्वी किल्ल्यावरील वस्ती नाहींशी झाल्यामुळें गांवास सुरक्षितता कमी वाटूं लागली व लोक हल्लीचे गांवठाणावर घरें बांधून राहिले. पूर्वीच्या जागीं घरटे व विहिरी अद्यापि आहेत. गांवांत राणे, जोशी, करमरकर, लिमये व पेंडसे या ब्राह्मण घराण्यांची वस्ती आहे. राणे मूळचे केळशी-चे असून त्यांचें येथील ठिकाण बेंद्रे यांनीं विकत घेतल्याचें समजतें.

या घराण्याकडे चणेरें, बिरवाडी व टेमघर या तीन गांवांची खोती होती. सध्यां बिरवाडीची गोखले व टेमघरची भावे यांजकडे गेली आहे. चणेरें येथील मात्र अद्यापि यांजकडे आहे.

कुलदेवता :—महालक्ष्मी (वाडेश्वरी, जोगेश्वरी). महालक्ष्मी केळशीची असावी. या घराण्याचा ३ दिवसांचा सोवेर–सुतकसंबंध रेवदंडचाचे महाजन (दिवाणजी) यांच्याशीं थोडे वर्षांपर्यंत होता असें समजतें.

या घराण्यांतील जुने पाट वगैरे सामानांवर सदाशिव गणेश, महादाजी सदाशिव व गो. स. पेंडसे अशीं नांवें असल्याचें आढळतें, त्यावरून त्या नांवाचे पुरुष यांचे पूर्वज असावे असें दिसतें. परंतु त्यांचा संबंध आज उपलब्ध असलेल्या वंशावळीशीं दाखवितां येत नाहीं. तथापि बाजूस दर्शविल्याप्रमाणें वंशावळ असण्याचा संभव आहे. प्रकरण ९ मधील सुटक वंशावळ क्रमांक ४ मध्यें गणेश व सदाशिव हीं नांवें आढळतात. ते व येथील गणेश आणि सदाशिव एकच असावेत.

१ गणेश
२ सदाशिव
३ महादाजी गोविंद अगर गोपाळ
४ पांडुरंग

या घराण्यांत पिढ्या ७, एकूण व्यक्ति २३ व जिवंत व्यक्ति १२ आहेत.

मोरो पांडुरंग (३) भार्या सरस्वती. कन्या (१) वालू, बिरवाडीच्या करमरकरांकडे दिली. (२) माई, मेढ्याच्या पांडुरंग लक्ष्मण दांडेकरांची पत्नी.

कृष्णाजी पांडुरंग (३) भार्या गंगा.

पांडुरंग कृष्ण (४) मृ. श. १८००. हे केळशीचे पेंडसे–महाजन या घराण्यांतून दत्तक आले. भार्या रखमा, रेवदंड्याच्या गोखल्यांकडील.

हरी पांडुरंग (५) ज. श. १८००; मृ. स. १९२८. बिरवाडीस शेती करीत. भार्या सत्यभामा, गागोदेंच्या शंभुराव शिवाजी भाव्यांची मुलगी. कन्या (१) कृष्णा, पडघोलीच्या लक्ष्मण रामचंद्र मोडकांची पत्नी. (२) येसू, रोहयाच्या रघुनाथ नारायण आपटयांची पत्नी. (३) काशी, नांदगांवच्या कृष्णाजी केशव दारशेतकरांची पत्नी. (४) गंगू, शिरसोलीच्या महादेव सीताराम जोश्यांची पत्नी.

* **विष्णु हरी** (६) ज. स. १८९१. बिरवाडीस शेती व खोती करितात. भार्या (१) लक्ष्मी, रोहयाच्या सदाशिव नारायण साठयांची मुलगी. पुत्र दत्तात्रेय व गोविंद. भार्या (२) गंगा, अलीबागच्या शंकर गोविंद गोडबोल्यांची मुलगी. कन्या शांता, वय १४. पुत्र विनायक, दिनकर व श्रीधर.

* **दत्तात्रेय विष्णु** (७) ज. श. १८३६ मार्ग. शु. १५. बिरवाडीस शेती करितात. भार्या सुशीला, तळयाच्या वामनराव सोमणांची मुलगी.

* **गोविंद विष्णु** (७) ज. श. १८४१. मॅट्रिकपर्यंत शिक्षण. पुण्यास उद्योगमंदिरांत नोकरी आहे.

* **विनायक विष्णु** (७) वय १०. मराठी ४ थींत.

* **दिनकर विष्णु** (७) वय ६.

* **श्रीधर विष्णु** (७) वय १.

* **महादेव हरी** (६) वय २६. मराठी ७ वीपर्यंत शिक्षण.

गोविंद पांडुरंग (३) भार्या लक्ष्मी, बिरवाडीच्या काण्यांकडील.

काशीनाथ पांडुरंग (३) भार्या (१) राधा, भाव्यांकडील. भार्या (२) अन्नपूर्णा, या काशीस स्वर्गवासी झाल्या.

आप्पाजी काशीनाथ (४) मृ. श. १७८९. भार्या द्वारका, वय ८०. श्रीवर्धनच्या विष्णु शिवराम जोश्यांची मुलगी. यांनीं पतीचे मृत्यूनंतर पुत्र दत्तक घेतला.

*__अनंत आप्पाजी__ (५) वय ६९. हे दत्तक आले. हे मूळचे लाडघरचे वामनराव जोशी (गोत्र शांडिल्य) यांचे पुत्र होत. बिरवाडीस शेती करतात. भार्या सावित्री, वय ५८. नागांवच्या दामोदर हरी करंदीकरांची मुलगी. कन्या (१) यमू, (जं.) मुरुडच्या कृष्णाजी गंगाधर जोश्यांची पत्नी. (२) नर्मदा, नागांवच्या रंगो गोपाळ आठवल्यांची पत्नी. (३) गोदू, श्रीवर्धनचे कृष्णाजी रावजी घैसास (उपाध्ये) यांची पत्नी. (४) मनू, आवासचे गजानन पांडुरंग रानडे यांची पत्नी.

*__कृष्णाजी अनंत__ (६) वय ३७. बिरवाडीस शेती व व्यापार करतात. यांचा 'गुळवेलसत्व' कारखाना आहे. भार्या (१) राधा, पालीच्या धारपांकडील. भार्या (२) रखमा, कराडेच्या वैद्यांकडील. कन्या सुंदरा, वय ९. भार्या (३) लक्ष्मी, (जं.) मुरुडच्या नारायण भाऊ घैसासांची मुलगी. पुत्र शिवराम, गजानन व गोपाळ.

*__शिवराम कृष्ण__ (७) वय ५.

*__गजानन कृष्ण__ (७) वय ३.

*__गोपाळ कृष्ण__ (७) वय १.

घराणें ९ वें, केळशी—रेवदंडा

(वंशावळ पृ. ९० ते ९१)

या घराण्याचा मूळ पुरुष हरी. कोंकणांतील मूळ ठिकाण केळशी. तेथून हे रेवदंड्यास आले. केळशी येथील एक ठिकाण 'रेवदंडेकरांचें ठिकाण' म्हणून अद्यापि ओळखिलें जातें, यावरून हे तेथून रेवदंडा येथें गेले याबद्दलची स्मृति तेथें कायम आहे. केळशी येथील भिकाजी गणेश (४) यांचे शाखेप्रमाणेंच हे कागदोपत्रीं महाजन असें आपलें आडनांव लावतात. स्थानिक (रेवदंडा येथील) लोक यांना दिवाणजी या नांवानें ओळखतात. यांना दिवाणजी कां म्हणूं लागले याचें नक्की कारण समजत नाहीं. परंतु विद्यमान वृद्ध मंडळी पुढील तीन कारणें सांगतात—(१) रेवदंडा येथें पोर्तुगीजांच्या किल्लेदारांकडे यांच्यापैकीं प्रथम आलेल्या पुरुषानें दिवाणगिरी पत्करली. (२) विनायक बल्लाळ (५) हे रेवदंडा महालांत मुख्य कारकून होते; व (३) मोरो बल्लाळ (५) हे रेवदंडा येथील एका क्षत्रिय धनाढ्य सावकाराच्या

मिळकतीची व्यवस्था पाहात असत. सध्यां यांचें वास्तव्य ठाणें, मुंबई, रेवदंडा व सांगली या गांवीं आहे. या घराण्यांतील मंडळी पूर्वीं अवचितगड येथें होती.

कुलस्वामी व कुलदेवता :—आदित्यनाथ व केळशी येथील महालक्ष्मी. यांना व काळभैरवास चैत्र शुद्ध पौर्णिमा व कार्तिक शुद्ध प्रतिपदा या दिवशीं नैवेद्य दाखवितात.

या घराण्यांत पिढ्या १०, एकूण व्यक्ति ६६ व जिवंत व्यक्ति ४० आहेत.

पांडुरंग बाळाजी (३) भार्या गोपिका.

मोरो बल्लाळ ऊर्फ आबा (५) हे रेवदंड्यास एका क्षत्रिय धनाढ्य सावकाराच्या मिळकतीची वहिवाट पाहात असत. भार्या लक्ष्मी (ठकू).

नीळकंठ मोरेश्वर (६) भार्या पार्वती.

दिनकर मोरेश्वर ऊर्फ बापू (६) भार्या अन्नपूर्णा.

वासुदेव दिनकर (७) भार्या गंगा.

गणेश दिनकर (बापूजी) (७) ज. रेवदंडा श. १७६७; मृ. श. १८३३ वैशाख. शेती व सावकारी करीत. भार्या (१) गोपिका, आठवल्यांकडील. भार्या (२) आनंदी, गोखल्यांकडील.

* **मोरेश्वर गणेश** (८) ज. स. १८४४ जाने. २३. रेवदंड्यास सावकारी करतात. भार्या सावित्री, अलीबागच्या शंकर दिनकर वैद्यांची मुलगी.

* **अनंत मोरेश्वर** (९) ज. स. १९०८ मे २९. बी. ए., एल्एल्. बी. ठाण्यास वकिली करितात. भार्या आनंदी (इंदिरा), जोश्यांकडील.

* **विठ्ठल अनंत** (१०) ज. स. १९३३ नोव्हें. २७.

* **भार्गव अनंत** (१०) ज. स. १९३८ जुलै ३.

* **दिनकर मोरेश्वर** (९) ज. स. १९१० जुलै ३. सांगलीस विद्यार्थी–बोर्डिंग चालवितात. भार्या भागीरथी, केळकरांकडील. यांस एक मुलगा आहे.

* **यशवंत मोरेश्वर** (९) ज. स. १९१६ ऑगस्ट २९. मुंबईस बी. बी. सी. आय्. रेल्वेंत नोकरी आहे.

* **दत्तात्रेय मोरेश्वर** (९) ज. स. १९१९ जुलै १६. माटुंग्याच्या खालसा कॉलेजांत विद्यार्थी आहेत.

* **श्रीधर गणेश** (८) ज. श. १८१२ आषाढ व. ३. रेवदंड्यास सावकारी करतात. भार्या सगुणा, चिखल्याच्या पाटणकरांकडील. कन्या (१) सुंदरा, ज. श. १८३६ माघ शु. १२. नारायणराव आपट्यांची पत्नी. (२) मैना, ज. श. १८३८ कार्तिक शु. ७. जनार्दनपंत कार्लेकरांची पत्नी.

* **गजानन श्रीधर** (९) ज. श. १८४० आश्विन व. १. इंग्रजी ७ वी.

* **बल्लाळ श्रीधर** (९) ज. श. १८४२ भा. शु. ८. इंग्रजी ६ वी.

* **चिंतामणि श्रीधर** (९) ज. श. १८४५ आश्विन शु. १२. इंग्रजी ३ री.

* **हरी श्रीधर** (९) ज. श. १८४९ आषाढ शु. ११. इंग्रजी १ ली.

* भालचंद्र श्रीधर (९) ज. श. १८५२ श्रा. व. १४.

* मधुसूदन श्रीधर (९) ज. श. १८५४ फा. व. ५.

* गंगाधर श्रीधर (९) ज. श. १८५७ भा. शु. ४.

* विनायक श्रीधर (९) ज. स. १९३८ जून ९.

भिकाजी दिनकर (बापू) (७) शेती व सावकारी करीत. भार्या लक्ष्मी, सान्यांकडील.

* गोविंद भिकाजी ऊर्फ सावळाराम (८) ज. स. १८८८ एप्रिल १५. रेवदंडचास सावकारी करतात. भार्या उमा, नारंगीच्या विष्णु सदाशिव गोखल्यांची मुलगी. कन्या (१) येसू, ज. स. १९२२ ऑगस्ट ४. (२) लीला, ज. स. १९२२ मार्च १९. (३) रत्नू, ज. स. १९२५ सप्टेंबर ३. (४) सोनू ज. स. १९३६ मार्च २५

* वासुदेव गोविंद (९) ज. स. १९२७ मार्च ४. मराठी विद्यार्थी.

* सदाशिव गोविंद (९) ज. स. १९२८ नोव्हेंबर १०. मराठी विद्यार्थी.

* भास्कर गोविंद (९) ज. स. १९३१ मार्च १५. मराठी विद्यार्थी.

आत्माराम भिकाजी (८) भार्या, जालखंडच्या मुकुंदराव देवलांची मुलगी. कन्या सई, ज. स. १९२२ नोव्हेंबर १२.

* त्र्यंबक आत्माराम (९) ज. स. १९२५ सप्टेंबर १२. इंग्रजी ३ री.

विनायक दिनकर (बापू) (७) मृ. स. १९३६. वय ७३. फर्स्ट एलएल्. बी. होते. शेती व सावकारी करीत. भार्या भागीरथी, अलीबागच्या बाळकृष्णपंत गोंधळेकरांची मुलगी.

* केशव विनायक (८) ज. श. १८११ श्रा. शु. ११. रेवदंडचास शेती करतात. भार्या (१) आनंदी, सिद्धेश्वरच्या रामचंद्र गणेश गांगलांची मुलगी. भार्या (२) रमा, पेणच्या वामनराव परांजप्यांची मुलगी. कन्या यमुना, जालगांवच्या गोपाळ पांडुरंग जोगळेकरांची पत्नी.

* महादेव विनायक (८) ज. स. १९०० डिसेंबर १६. रेवदंडचास शेती करतात. भार्या लक्ष्मी, हर्णेच्या अवधूत नारायण गोळ्यांची मुलगी.

* बाळकृष्ण महादेव (९) ज. स. १९२७ एप्रिल ३. मराठी ४ थी.

* मधुकर महादेव (९) ज. स. १९३२ डिसें. २५.

परशुराम दिनकर (बापू) (७) मृ. वय ५९. शिक्षण इंग्रजी ५ इयत्ता. भार्या (१) जानकी, बापूजी जगन्नाथ कर्वे यांची मुलगी. भार्या (२) सीता, हाशिवऱ्याच्या कृष्णाजी गणेश करमरकरांची मुलगी.

* धोंडो परशुराम (८) ज. झिराड स. १९०१ मार्च ४. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. रेवदंडचांस शेती व सावकारी करतात. भार्या (१) पार्वती, सखाराम धोंडो थोरातांची मुलगी. पुत्र कृष्ण. भार्या (२) दुर्गा, प्रभाकर सदाशिव नेन्यांची मुलगी. पुत्र विश्वनाथ व गोपाळ. कन्या (१) द्रौपदी, वय १३. (२) कमळ, वय ७.

* कृष्णाजी धोंडो (९) ज. मुंबई स. १९२३ फेब्रु. ८.

* **विश्वनाथ धोंडो** (९) वय ९. मराठी विद्यार्थी.

* **गोपाळ धोंडो** (९) विद्यार्थी.

* **नारायण परशुराम** (८) ज. रेवदंडा स. १९१२ डिसें. २२. बी. ए. (१९३७). रेवदंड्यास असतात. भार्या लीला, पांडुरंगपंत टिळकांची मुलगी.

* **शरच्चंद्र नारायण** (९) वय १.

* **गणेश परशुराम** (८) ज. रेवदंडा स. १९१४ डिसें. ८. रेवदंड्यास तांदुळाचा व्यापार करितात. भार्या विमला, नागांवच्या विठ्ठल बळवंत लोंढ्यांची मुलगी.

* **परशुराम गणेश** (९) वय ४ महिने.

विनायक बल्लाळ (५) ज. रेवदंडा. श. १७२०; मृ. श. १७८१. रेवदंड्यास सरकारी महाल कचेरींत मुख्य कारकून होते. सावकारी करीत. भार्या (१) गोपिका, नागांवच्या चिंतामणशास्त्री जोश्यांची मुलगी. हिचे पुत्र जनार्दन व रामचंद्र. कन्या (१) कृष्णा, तळ्याच्या परशुराम ऊर्फ तात्या भटांची पत्नी. (२) बया, रेवदंड्याच्या चिंतोपंत देशमुखांची पत्नी. भार्या (२) रखमा, रेवदंड्याच्या मराठ्यांकडील. कन्या गंगा, नागांवच्या शुक्लांकडे दिली.

जनार्दन विनायक (६) ज. रेवदंडा स. १८३२; मृ. स. १९११. जनोबा दिवा-



सरस्वतीबाई जनार्दन विनायक

णजी या नांवानें हे प्रसिद्ध होते. गांवांतील पुढारी, धाडसी व स्पष्टवक्ते असत. हे भोर संस्थानांतील पिरंगूट येथें संस्थानी कोर्टांत नोकर होते. परंतु लवकरच वडील वारल्यामुळें रेवदंड्यास परत गेले. सार्वजनिक कामांत पुढाकार घेत

असत. स. १८७७ च्या सुमारास कुलाबा जिल्ह्यांत जंगलच्या जळाऊ लाकडांची फी सरकारनें वाढविली त्याविरुद्ध चाललेल्या चळवळींत यांनीं पुढाकार घेतला होता; व त्यासंबंधीं तक्रारी अर्ज घेऊन दोन तीन हजार लोकांच्या जमावासह हे अलीबागेस कलेक्टरसाहेबांची समक्ष गांठ घेण्यास गेले असतां, तेथें त्यांचा व यांचा धैर्यानें सडेतोड बोलण्याचे बाबतींत खटका उडाला व यांना अटक होण्याचाहि प्रसंग आला होता. परंतु अलीबागच्या कांहीं सभ्य गृहस्थांच्या मध्यस्थीनें तो प्रसंग टळला. यांच्या धैर्याचें दुसरें उदाहरण म्हणजे जंजिऱ्याचे राजपुत्र राजकुमार कॉलेजमध्यें शिक्षण घेण्यास जाते समयीं, त्यांचा जाण्याचा मार्ग रेवदंड्यावरून असल्यामुळें रेवदंडा गांवांतील सर्व मंडळींनीं जातांना त्यांना मानपत्र देण्याचें ठरविलें होतें, व सर्व तयारी केली होती. परंतु राजपुत्र जावयास निघाले असतां त्यांचेबरोबर असलेल्या त्यांच्या दिवाणांनीं उशीर होईल या निमित्तानें मानपत्र घेण्याचें नाकारलें व नबाबसाहेबांना घोडा पुढें चालविण्यास सांगितलें. घोडा चालू होतांच जनार्दनपंत दिवाणजींनीं धैर्यानें पुढें होऊन राजपुत्र यांचा घोडा लगाम धरून उभा केला व आपल्या अस्खलित भाषणानें राजानें प्रजेशीं कसें वागावें याविषयीं मुद्देसूद भाषण केलें. याचा नबाबसाहेबांच्या मनावर चांगला परिणाम होऊन,त्यांनीं सभास्थानीं जाऊन आनंदानें मानपत्र स्वीकारलें. हे दानशील असून कोणी कांहीं मागितल्यास सहसा नाहीं म्हणत नसत. एकदां एका गुजराथी भिक्षूनें 'मी मागेन तें मला देशील काय?' असा यांना प्रश्न केला असतां 'देईन' असें उत्तर दिलें. भिक्षूनें साक्षीदारांची अट घातली असतां गांवांतील दहा सभ्य गृहस्थांसमक्ष व घरची मंडळी विरोध करीत असतां 'तूं माझें सर्वस्व, देहसुद्धां मागशील तरी देईन' असें भिक्षूस सांगितलें. नंतर भिक्षू थोडा वेळ स्तब्ध राहिला व एकदम प्रेमातिशयानें दिवाणजींना कडकडून भेटला व 'तूं आपल्या वचनास जागलास हें पाहून मला अत्यानंद झाला. मला आतां कांहीं नको' असें म्हणाला व जेवण व किरकोळ कांहीं दक्षिणेचा भिक्षूनें स्वीकार केला. यांच्या निःपक्षपाती व न्यायी वागणुकीवर लोकांचा विश्वास असल्यामुळें गांवांतील व आसपासचे लोक आपसांतील तंटेभांडणें मिटविण्यास यांचेकडे येत असत. वक्तृत्व उत्तम होतें. भार्या सरस्वती (बालू), अलीबागच्या आंग्र्यांचे फडणीस पांडोबाअण्णा फडणीसांची (थत्ते) मुलगी. कन्या (१) येसू, चौलच्या दिनकरपंत मोडकांची पत्नी. (२) काशी, सासवन्याच्या प्रभाकरपंत अभ्यंकरांची पत्नी. (३) कृष्णा, रेवदंड्याच्या मनोहर (बापुराव) देशमुखांची पत्नी.

पुरुषोत्तम जनार्दन ऊर्फ रावजी (७) भार्या यशोदा.

* **पांडुरंग जनार्दन** (७) ज. रेवदंडा. स. १८७९. कॉलेजमध्यें पहिल्या वर्षाचें शिक्षण घेतलें. अलिबाग हायस्कूल व रेवदंडयाच्या इंग्रजी शाळेंत हेडमास्तर असतांना संस्कृत शिकवीत. उत्तम शिक्षक म्हणून हे यांचे विद्यार्थ्यांत प्रसिद्ध आहेत. वडिलांचा वक्तृत्वाचा गुण यांच्यांतहि आहे. सेवानिवृत्त होऊन रेवदंडयास राहतात. भार्या (१) रमा, नागांवच्या काशीनाथपंत लोंढयांची मुलगी. भार्या (२) अन्नपूर्णा, थळच्या काशीनाथ विनायक रानडयांची मुलगी. कन्या भीमा (राधा), ज. स. १९१७ जाने. ३. पळसप्याच्या गोपाळराव टिळकांची पत्नी.



स. १९३८

पांडुरंग जनार्दन

* **साईराम पांडुरंग** (८) ज. स. १९२० जाने. १८. मुंबई ऑफिस फर्निचर–वर्क्समध्यें आहेत.

* **वामन पांडुरंग** (८) ज. स. १९२२ सप्टेंबर २. व्ह. फायनल पास.

* **दिगंबर पांडुरंग** (८) ज. स. १९२४ सप्टें. १०. इंग्रजी ३ री.

* **जनार्दन पांडुरंग** (८) ज. स. १९२६ मार्च ८. इंग्रजी ३ री.

* **विष्णु पांडुरंग** (८) ज. स. १९२७ डिसें. १३. मराठी ५ वी.

* **दामोदर पांडुरंग** (८) ज. स. १९३३ जाने. २३.

रामचंद्र विनायक (६) भार्या राधा, अलीबागच्या गोखल्यांची मुलगी.

दत्ताजी बाळाजी (३) हे मूळ केळशीचे असून अवचितगडास राहात असल्याचा उल्लेख मुर्डी–आंजर्लें वादांत आढळतो (ऐ. प्र. क्रमांक ४ पहा). भार्या यशोदा.

हरी दत्ताजी (४) भार्या सत्यभामा. हे अवचितगडावर होते.

दिनकर हरी (५) हे अवचितगडावर होते.

घराणें १० वें, केळशी—वाडें

(वंशावळ पृ. ९२ ते ९४)

या घराण्याचा मूळ पुरुष वामन. हें घराणें केळशी, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी येथून वाडें (जिल्हा पुणें) येथें श. १६५० चे सुमारास आलें. नारो वामन (२) यांची पत्नी आपला अज्ञान मुलगा वामन यास घेऊन गोळे यांचे आश्रयानें वाडें येथें आली असें म्हणतात. सध्यां यांचें वास्तव्य इंदूर, दौन्ड, पुणें, बडोदें, बार्शी, भेलसा, मुंबई, मुरेना (ग्वाल्हेर), वाडें (जि. पुणें) येथें आहे.

मौजे चिखलगांव येथील कुलकर्णी व देशपांडे या वतनांचा हक्क या घराण्यांत आहे. मोकासा हक्क खरेदी घेतलेला आहे.

कुलदेवता कोल्हापूरची महालक्ष्मी म्हणतात. श्रीवाडेश्वर आदिकरून पांच देवतांस नैवेद्य दाखवावे लागतात. परंतु त्यांचीं नांवें माहीत नाहींत. नवसानिमित्त श्रीखंडोबा देव मानतात. आश्विनी नवरात्रांत श्रीदेवीपुढें नंदादीप असतो. श्रीखंडोबाचा कुळधर्म माघी, चैत्री व श्रावणी पौर्णिमांस व चंपाषष्ठीस असतो. विवाह जाहल्यावर वधूवरांनीं कोल्हापूरच्या श्रीजगदंबेच्या, तसेंच जेजुरीच्या खंडोबाचे दर्शनास जाण्याची वहिवाट आहे.

या घराण्यांत पिढ्या १०, एकूण व्यक्ति ८८ व जिवंत व्यक्ति २८ आहेत.

नारायण वामन (२) हे केळशी, ता. दापोली जि. रत्नागिरीहून आपले मातोश्रीसह गोळे यांचे आश्रयानें वाडें येथें आले असें म्हणतात. भार्या येसू.

वामन नारायण (३) भार्या राधा.

रामचंद्र वामन (४) भार्या जानकी. या पतीसह सती गेल्या.

महादेव रामचंद्र (५) वाड्यास शेती व सावकारी करीत. काशीयात्रेस जातांना मृत्यु. भार्या पार्वती.

रामचंद्र महादेव (६) ज. श. १७५३. हे वाड्यास गोळे यांचे दिवाण होते; व शेतीहि करीत. भार्या गंगा, जकातवाडीच्या कोंडोपंत बापू सहस्रबुद्ध्यांची मुलगी.

***बापू रामचंद्र** (७) ज. श. १८०३. सरकारी इंजिनिअर खात्यांत हेडक्लार्क होते. सध्यां पेन्शनर आहेत. पुण्यास शनिवार पेठ, घर नं. ४२५ या स्वतःचे मालकीचे घरांत राहतात. भार्या (१) सावित्री, पुण्याच्या धोंडोपंत गोडबोल्यांची मुलगी. (२) सावित्री (गोदू), पुण्याच्या धोंडोपंत मराठ्यांची मुलगी. (३) जानकी, पुण्याच्या नरहरराव भिड्यांची मुलगी. (४) जानकी, हरिहरराव जोशी, पंचनदीकरांची मुलगी. कन्या (१) आनंदी, भास्कर गणेश चितळ्यांची पत्नी. (२) कृष्णा, पुण्याच्या जोश्यांकडे दिली.

***श्रीकृष्ण बापू** (८) ज. स. १९२३. इंग्रजी शिकत आहे.

कृष्णाजी महादेव (६) कन्या दुर्गा.

मोरो रामचंद्र (५) भार्या सरस्वती. कन्या (१) सई, खेडच्या चिमणाजी दीक्षितांची पत्नी. (२) अंबू.

नारायण मोरो (६) भार्या सई.

चिंतामणि रामचंद्र (५) भार्या यशोदा.

कृष्णाजी वामन (४) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती व व्यापार करीत. भार्या लक्ष्मी.

गोपाळ कृष्ण (५) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती करीत. भार्या राधा.

विनायक गोपाळ (६) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती व व्यापार करीत. भार्या जानकी. कन्या (१) दुर्गा, धारच्या गोडश्यांकडे; (२) सोनू, पुण्याच्या जोश्यांकडे; (३) विठा, सोलापूरच्या दिवेकरांकडे दिली. (४) बाळी.

रामचंद्र विनायक (७) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती करीत. भार्या राधा, दातारांकडील.

शंकर रामचंद्र (८) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती करीत. भार्या उमा, दीक्षितांकडील. कन्या भीमा, वाडचास गोडश्यांकडे दिली.

राजाराम शंकर (९) ज. वाडें. शिक्षण मराठी. व्यापार करीत. भार्या अंबू, घाणेकरांकडील.

* **दामोदर शंकर** (९) ज. वाडें. वय २७. शिक्षण मराठी. मुंबईस खाजगी नोकरी आहे.

* **वामन शंकर** (९) वय २१. शिक्षण मराठी. मुंबईस खाजगी नोकरी आहे.

रंगो विनायक (७) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती करीत. भार्या आनंदी, काण्यांकडील. कन्या गोदू, खेडच्या दात्यांकडे दिली.

सखाराम गोपाळ (६) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती करीत. भार्या सीता.

विश्वनाथ सखाराम (७) ज. वाडें. शिक्षण मराठी व इंग्रजी. सांगलीकर यांजकडे नोकरी होती. भार्या मनू, न्हावरें (ता. शिरूर) येथील रिसबुडांकडील.

कृष्णाजी विश्वनाथ (८) खाजगी नोकरी होती. अविवाहित.

सीताराम विश्वनाथ (८) खाजगी नोकरी होती. पोटांतील आजारानें मृत्यु. अविवाहित.

केशव सखाराम (७) मृ. स. १८९८. वय ५९. मराठी शिक्षक होते. भार्या पार्वती, चासच्या नारायण गोपाळ पाटणकरांची मुलगी. कन्या (१) काशी, वय ३८. पुण्याच्या वासुदेव भिकाजी चिपळूणकरांची पत्नी. (२) कृष्णा.

* **चिंतामणि केशव** (८) ज. वाडें. स. १८८० जाने. १. शिक्षक होते. सध्यां पेन्शनर असून शेती करतात. भार्या (१) सीता, मोहोपाडचाच्या पुरुषोत्तम रघुनाथ पळनिटकरांची मुलगी. भार्या (२) यशोदा, वय ३५. खेडच्या त्र्यंबक विष्णु दीक्षितांची मुलगी. कन्या (१) द्वारका, वय १७. मालवणच्या पांडुरंग विश्वनाथ वझ्यांची पत्नी. (२) दुर्गा, वय ९. (३) वेणू, वय ६. (४) कृष्णा, वय ५. (५) शांता, वय ४.

* **श्रीराम चिंतामणि** (९) वय १२. मराठी ५ वी.

सदाशिव सखाराम (७) ज. वाडें. शिक्षण मराठी. हे काशीस २–४ वर्षें मौन-
व्रतस्थ होते. अविवाहित.

त्र्यंबक वामन (४) भार्या उमा.

भिकाजी त्र्यंबक ऊर्फ गोविंद (५) इंदूरास मामलेदार होते. भार्या राधा
(काशी), गणेश चिंतामणि गोळ्यांची मुलगी. कन्या (१) इंदूरच्या दातारां-
कडे; (२) वाईच्या केळकरांकडे; (३) पुण्याच्या गोखले वकिलांकडे दिली.

पांडुरंग भिकाजी (६) ज. पुणें; मृ. स. १९१४, वय सु. ४५. ग्वाल्हेर संस्था-
नांत पोलिसखात्यांत नोकरी होती. चांगले ज्योतिषी होते. भार्या लक्ष्मी (गंगू),
गणेश पांडुरंग सहस्रबुद्धे (सरंजामे) यांची मुलगी. कन्या अंबू, गुण्याच्या
रामकृष्ण विनायक वैद्यांची पत्नी.

* **माधव पांडुरंग** (७) वय ४५. बार्शी लाईट रेल्वेमध्यें नोकरी आहे. भार्या इंदिरा,
बीन्याच्या बापटांकडील.

* **श्रीकृष्ण माधव** (८) वय २.

* **मुकुंद पांडुरंग** (७) वय ४३. हेड सिग्नलर जी. आय्. पी. रेल्वे, दौंड येथें
आहेत. भार्या (१) लक्ष्मी (बाई), नारायणराव सोहन्यांची मुलगी. (२)
लक्ष्मी (काशी), काशीच्या मुकुंदशास्त्री राजाराम लेल्यांची मुलगी.

* **लक्ष्मण पांडुरंग** (७) वय ३६. भेलसा येथें व्यापार करितात. ग्वाल्हेर संस्थानचे
मजलीस–आमचे सभासद आहेत. त्यानिमित्त त्यांस रु. २०० चा पोषाख
मिळाला आहे. भार्या राधा, ग्वाल्हेरच्या लक्ष्मणशास्त्री थत्त्यांची मुलगी.

* **बाळ लक्ष्मण** (८) वय ३.

* **रामचंद्र पांडुरंग** (७) वय २९. मुरेनाच्या (ग्वाल्हेर संस्थान) कस्टम खात्यांत
गिरदावर आहेत. भार्या सीता, बीन्याच्या फडक्यांकडील.

* **गणेश भिकाजी** (६) वय ५८. कोर्ट ऑफ वॉर्डचे ऑफिसांत हेडक्लार्क होते.
सध्यां पेन्शनर असून इंदोरास भिस्ती गल्ली, कृष्णपुऱ्यांत राहतात. भार्या
सरस्वती, इंदोरच्या भय्याजी बापटांची मुलगी. कन्या (१) वेणू, देहलीच्या
सोमणांकडे दिली. (२) बनी.

* **श्रीनिवास गणेश** (७) वय २५. इंदोरच्या होम मेंबरचे ऑफिसांत नोकर
आहेत. भार्या महत्पूरच्या लक्ष्मण श्रीनिवास मोडकांची मुलगी.

गणेश वामन (४) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती व व्यापार करीत. कन्या
(१) गोदू, विष्णु गंगाधर दीक्षितांची पत्नी. (२) गंगू, अण्णा बापटांची पत्नी.

नारायण गणेश (५) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती व व्यापार करीत.
भार्या सावित्री, मराठ्यांकडील. कन्या येसू, चासकर जोश्यांकडे दिली.

हरी नारायण (६) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती व नोकरी करीत. भार्या
सत्यभामा, जुन्नरच्या आमडेकरांची मुलगी. कन्या (१) गंगू, पुण्याच्या
जोगळेकरांकडे दिली. (२) कृष्णी.

रघुनाथ हरी (७) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती व व्यापार करीत. भार्या अन्नपूर्णा (ठकू), करंदीकरांकडील.

दाजी नारायण ऊर्फ मुरारी (६) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती व नोकरी करीत. भार्या लक्ष्मी, साठ्यांकडील. कन्या (१) अंबू, पुण्याच्या सरदार गोखल्यांकडे; (२) काशी, आपट्याच्या वैशंपायनांकडे दिली. (३) बारू (गंगा), लिंबगोव्याच्या काशीनाथ गणेश वेलणकरांची पत्नी.

गणेश दाजी (७) ज. वाडें. शिक्षण मराठी व इंग्रजी. शेती व व्यापार करीत. भार्या सरस्वती, सावरकरांकडील.

नागेश गणेश (८) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती करीत. भार्या गिरिजा, वाईच्या कानिटकरांकडील.

***दत्तात्रेय गणेश** (८) वय ४९. व्यापार करितात. अविवाहित.

***मधुसूदन गणेश** (८) वय ४०. मोकासा हक्क आहे.

रामकृष्ण दाजी (७) हे आपले चुलते वामन नारायण यांना दत्तक गेले. नंतरचें नांव रामकृष्ण वामन.

***पुरुषोत्तम दाजी** (७) ज. वाडें. वय ७०. शिक्षण मराठी व इंग्रजी. शेतकी व मोकासा हक्क आहे. भार्या रमा, वय ६०, मांगदरीच्या आगाश्यांकडील. कन्या (१) आऊ, पुण्याच्या सीतारामपंत दातारांकडे; (२) इंदु, पुण्याच्या परांजप्यांकडे; (३) सिंधु, वैजनाथच्या कर्व्यांकडे; (४) कमला, चासच्या पाटणकरांकडे; (५) बारू, जळगांवच्या पाटणकरांकडे दिली.

प्रल्हाद पुरुषोत्तम (८) ज. वाडें, शिक्षण मराठी. शेती करीत. भार्या सगुणा, वय ३०. गाडगिळांकडील.

वामन नारायण (६) वास्तव्य वाडें. शेती व व्यापार करीत. भार्या रखमा, लोंढ्यांकडील. कन्या (१) सखू, चाफेकरांकडे; (२) द्वारका, बेहेऱ्यांकडे दिली.

रामकृष्ण वामन (७) ज. वाडें. शिक्षण मराठी व इंग्रजी. हे दाजी नारायण यांचे पुत्र असून वामन नारायण यांस दत्तक गेले. भार्या सीता, गाडगिळांकडील. कन्या (१) भीमा, वाईच्या दामल्यांकडे; (२) दुर्गा, पुण्याच्या फडक्यांकडे दिली.

***राजाराम रामकृष्ण** (८) वय ५२. वाड्यास खाजगत व्यापार करतात. भार्या (१) नर्मदा, पुण्याच्या सरदार गोखल्यांकडील; भार्या (२) जानकी, गोडबोल्यांकडील; भार्या (३) जानकी, जुन्नरच्या जोगळेकरांकडील. कन्या (१) तारा, वय २४. चासच्या पाटणकरांकडे दिली. (२) घारू, वय १२. (३) दमयंती वय १०.

***वामन राजाराम** (९) ज. वाडें. वय ८. मराठी विद्यार्थी.

***विष्णु राजाराम** (९) ज. वाडें. वय ६. मराठी विद्यार्थी.

काशीनाथ नारायण (६) ज. वाडें. शिक्षण मराठी. शेती व व्यापार करीत. भार्या (१) यमुना, दातारांकडील; भार्या (२) मथुरा, रास्त्यांकडील. कन्या वेणू.

श्रीधर नारायण (६) ज. वाडें. शिक्षण मराठी व इंग्रजी. धंदा नोकरी. भार्या (१) बगू (चंद्रभागा), भटांकडील. भार्या (२) उमा, करंजगांवच्या कर्व्यांकडील. कन्या (१) चंद्रा, कल्याणच्या केळकरांकडे; (२) कृष्णा, चिखल्याच्या पाटणकरांकडे दिली.

* नरहरी श्रीधर (७) वास्तव्य वाडें. वय ५०. शेती करतात. भार्या (१) सत्यभामा, गोडबोल्यांकडील. कन्या (१) गोदावरी, वय २४. चासच्या रहाळकरांकडे; (२) वत्सला, वय १७. कल्याणच्या केतकर वैद्यांकडे दिली. (३) विमला, वय १३. भार्या (२) सत्यभामा, वय २३. भिडयांकडील.

* वासुदेव नरहरी (८) वय ६. मराठी विद्यार्थी.

* व्यंकटेश श्रीधर (७) वय ४७. वाडें येथें शेती करितात. भार्या लक्ष्मी, वय ३४, नामजोश्यांकडील. कन्या मालती, कोठिंब्याच्या जोश्यांकडे दिली.

* मुरलीधर व्यंकटेश (८) वय ३.

* मुकुंद श्रीधर (७) ज. करंजगांव. वय ३९. लोकलबोर्ड शिक्षक आहेत. भार्या इंदिरा, वय २७, मेहेंदळयांकडील. कन्या कुसुम, वय २.

दामोदर नारायण (६) वास्तव्य वाडें. शिक्षण मराठी व इंग्रजी. शेती व व्यापार करीत. भार्या राधा, पळनिटकरांकडील. कन्या येसू, पुण्याच्या दिवेकरांकडे दिली.

केशव दामोदर (७) वास्तव्य वाडें. शिक्षण मराठी व इंग्रजी. व्यापार करीत. भार्या सावित्री, दामल्यांकडील.

गोपाळ दामोदर (७) वास्तव्य मोहपाडा. शिक्षण मराठी. नोकरी करीत. आत्महत्येनें मृत्यु. भार्या राधा, जोश्यांकडील.

* नीळकंठ गोपाळ (८) वय ३१. बडोद्याकडे पोलिसखात्यांत नोकरी आहे.

घराणें ११ वें, हुबळी

(वंशावळ पृ. ९४)

या घराण्याचा मूळ पुरुष सखाराम. यांचें कोंकणांतील मूळ गांव कोणतें याची माहिती मिळत नाहीं. सध्यां यांचे वंशजांचें वास्तव्य हुबळीस आहे. यांचे ताब्यांत जें घर व जमीन आहे त्यास फडणविशी म्हणतात; यावरून कोणी पूर्वज फडणविशीचे कामावर असावेत.

श्रीम्हालसांबा जोगेश्वरी देवतेला नैवेद्य अर्पण करितात. नारळी पौर्णिमेस परंपरागत कुळधर्माची चाल आहे.

या घराण्यांत पिढया ४, एकूण व्यक्ति ५ व जिवंत व्यक्ति १ आहे.

* शंकर पांडुरंग (४) वय सुमारें ७१. हे दत्तक आले. हे मूळचे नरगुंदचे गंगाधर दीक्षित जोशी यांचे पुत्र होत. यांच्या ताब्यांत जें घर व जमीन आहे त्यास फडणविशी असें नांव आहे. हुबळीस वैद्यकी करतात. हा व्यवसाय यांच्या जनक घराण्यांतील परंपरागत चालत आलेला आहे. भार्या पार्वती, चिरमूरकर दात्यांकडील.

गोविंद बाळाजी (३) हे लहानपणींच घरांतून निघून गेल्यामुळें अधिक माहिती मिळत नाहीं.

घराणें १२ वें, मुर्डी

(वंशावळ पृ. ९५ ते ९९)

मुर्डी (मरुत्तटी)

सामान्य माहिती

वेळास, केळशी, मुरुड वगैरे गांवांतून देवांचे जे उत्सव होतात त्यांसंबंधीं मुर्डी गांवास संस्कृत भाषेंत निमंत्रणपत्रिका येते. तीमध्यें या गांवाचा 'मरुत्तटी' असा उल्लेख केलेला असतो. गांव, किल्ले वगैरे स्थळांच्या नांवांचे संस्कृतिकरणाची वहिवाट पूर्वीपासून दिसून येते. उदाहरणार्थ, वेलातट (वेळास), कदली (केळशी), मुलवड (मुरुड), हिरण्यपूर (हर्णै), सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग इत्यादि. त्याचप्रमाणें मुर्डी गांवास मरुत्तटी हें नांव देण्यांत आलेलें दिसतें.

नांवाची व्युत्पत्ति

कै. रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं मुरुड गांवची बखर प्रसिद्ध केली आहे. शिलाहार वंशांतील जालंदर राजा जालगांव येथें राज्य करीत होता. त्याजपासून मुरुड गांवाला गुरचराईकरितां जागा मिळविली असें त्यांत लिहिलें आहे. याच बखरींत श्रीदेवीच्या उत्सवाकरितां चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशीं काय करावें तें सांगून 'आणि ते दिवशीं मुरुडी [स] सत्पुरुष ब्राह्मण आहे त्यासी प्रथम लिखीत लिहावें' असें लिहिलें आहे. म्हणजे मुरुड गांवापूर्वी मुर्डी गांव वसलेलें होतें हें सिद्ध आहे. मुर्डीखेरीज इतर गांवांस चतुर्थीस लिखितें लिहितात. इतिहासावरून शिलाहार वंशांतील राजे कोंकणांत स. ११५० पर्यंत राज्य करीत होते असें आढळून येतें. शिवाय मुर्डीचे महाजनकीचे वादांत 'आंजर्लें गांव वसल्यास दहा बाराशें वर्षें झालीं व त्यापूर्वीं मुर्डी वसली अशी दंतकथा आहे' असें

गांवाची स्थापना

सांगितल्याचें आढळतें. यावरून मुर्डी गांवचें अस्तित्व किमान हजार वर्षांपूर्वींचें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

खोत पेंडसे

मुर्डी हा खोती गांव आहे. पेंडसे कुळांतील कोणत्या पुरुषानें या गांवची खोती संपादन केली हें आज माहीत नाहीं. तथापि, भालेराईनें स. १६८८ चे सुमारास मुर्डी गांव उध्वस्त झाला होता. त्या वेळीं गांवचे कांहीं लोक हबसाणांत दिवें येथें तात्पुरते राहण्यास गेले होते. त्यांतील मुर्डीचे खोत महाजन कृष्णाजी बापूजी हे दिव्यास निपुत्रिक वारले. त्यांनीं आपली खोती, महाजनकी व मानपान वगैरे कृष्णाजी बल्लाळ पेंडसे (मुर्डी घराण्याचा मूळ पुरुष) यांस दिले. त्या हक्काचे वहिवाटीस आंजर्ल्यांचे महाजन–भट यांनीं हरकत घेतल्यामुळें वाद झाला. त्याची सविस्तर हकीकत व शेवटीं पेंडसे यांचे बाजूने निकालासंबंधींचे कागद प्रकरण ४ व ५ मध्यें छापिले आहेत. तेव्हांपासून आजमितीपर्यंत पेंडसे यांनीं मुर्डीची खोती स्वतःचे घराण्यांत कायम ठेवली आहे.

श्रीविमलेश्वर

मुर्डी गांवचें मुख्य दैवत श्रीविमलेश्वर आहे. याचें मंदिर कोणी व केव्हां बांधिलें याची निश्चित माहिती उपलब्ध नाहीं. मुर्डी महाजनकीचे वादांत हरी रघुनाथ व गणेश नारायण भट यांनीं दिलेल्या जबानींत पुढील मजकूर आहे. 'पूर्वी उभाघराचे पश्चिमभागीं स्वयंभू शिवालय आजरालेश्वर सन्निध गणपति महास्थानें होतीं. त्या नामेंकरून आंजर्लें असें नामाभिधान गांवास झालें. हल्लीं शिवालय आजरालेश्वर होता त्याजवरून समुद्र वाढून गेला. हल्लीं त्या भागावरून गलबतें चालतात. याप्रमाणें समुद्राची वृद्धि झाली व मुर्डीमध्यें शिवालय श्रीविमलेश्वर कोणी एका गुरवानें स्थापन केलें अशी दंतकथा आहे.' यावरून पावणेदोनशें वर्षांपूर्वी हें देवालय कोणीं बांधिलें हें नक्की माहीत नव्हतें व त्यासंबंधीं लोक दंतकथेची माहिती सांगत. म्हणून हें देवालय निदान चारशें वर्षांच्याहि पूर्वींचें असावें. इतकें जुनें मंदिर अगर इमारत मुर्डी–आंजर्लें गांवांत दुसरी नाहीं. हा विमलेश्वर माटे घराण्याचा कुलस्वामी आहे. या देवस्थानचे निरंतरचे उत्सवाकरितां अंताजी गोविंद पेंडसे व गोविंद हरी खाडीलकर यांनीं पुण्यास पेशवे यांस स. १८१६ त सरकारांतून उत्पन्न मिळावें म्हणून विनंति अर्ज केला. त्यावरून मुर्डीतील पावणेसहा बिघे जमिनीचा सरकारी दस्त रुपये २१ जमेस आलेला श्रीच्या नांवें खर्च लिहून उत्सवाकडे निरंतर घ्यावा असा कौल मिळविला. परंतु राज्यक्रांतीमुळें त्याचा प्रत्यक्ष अंमल झाला नाहीं. स. १८३५ त बाळाजी अनंत पेंडसे यांनीं इंग्रज सरकारकडे अर्ज करून दाद मागितली; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. याशिवाय या देवालयास पूर्वापार नवत नेमणूक रु. १४ ची असून ती मात्र हल्लीं चालू आहे.

श्रीगणपति

मुर्डी गांवांतील दुसरें देवालय विमलेश्वरासन्निध असलेलें श्रीगणपति मंदिर होय. हें पेंडसे यांनीं बांधिलें; परंतु त्याचा नक्की काळ आज उपलब्ध नाहीं. श. १८१८ चे चैत्रांत हें देवालय अग्निनारायणाचे भक्ष्यस्थानीं पडल्यामुळें पेंडसे मंडळींनीं त्याची तात्पुरती दुरुस्ती केली; त्यानंतर श. १८३९ त देवालयाचा जीर्णोद्धार सातशें रुपये खर्च करून केला व देवळावर मंगलोरी कौलें घातलीं. तसेंच जुनी दगडाची मूर्ति भंगल्यामुळें नवीन संगमरवरी पांढरी मूर्ति आणून तिची स्थापना शास्त्रोक्त पद्धतीनें श. १८५६ माघ शु. १३ शुक्रवार रोजीं नारायण गोपाळ पेंडसे (७) यांचे हस्तें करविली. या स्थापनेस सुमारें तीनशें रुपये खर्च पेंडसे मंडळींनीं केला. या देवाची श्रावण मासांत पूजा करण्याकरितां हर्णैंचे जोशी यांस रुपये चारची सरकारांतून नक्त नेमणूक आहे. तसेंच देवाची पूजा व देवालयाची झाडलोट करण्याकरितां सरकारांतून गुरवाच्या नांवें रु. ११ ची पावती आहे. उत्सवाकरितां सरकारांतून कांहीं उत्पन्न नाहीं. नारायण विनायक (७) यांनीं रु. ७५ कायमनिधि म्हणून दिले असून त्याचें येणारें व्याज देवाचे वार्षिक उत्सवाकडे खर्च करावयाचें आहे. याची व्यवस्था आत्माराम बाळकृष्ण (८), गोविंद गणेश (७) व दत्तात्रेय सीताराम (८) यांच्याकडे सोंपविली आहे. या निधीस धोंडो सीताराम (८) व मोरो सीताराम (८) यांनीं अनुक्रमें रु. ३५ व २५ दिले आहेत. नारायण गोपाळ (७) यांनीं त्यांची भार्या द्वारकाबाई यांच्या स्मरणार्थ रु. तीनशें दिले असून देवाची दैनिक पूजा ब्राह्मणाकरवीं होण्यासाठीं त्याचें व्याज खर्च करावयाचें आहे. केशव त्र्यंबक (६) यांनीं करून दिलेल्या बक्षिसपत्रान्वयें गोविंद गणेश हे उत्सवाकरितां वार्षिक सहा रुपये देतात. त्या रकमेंतून श्रीगणपति अथर्वशीर्षाचीं सहस्र आवर्तनें करावयाचीं असतात. वार्षिक उत्सव माघ वद्य ४ स होतो व दुसरे दिवशीं पेंडसे मंडळी महाप्रसाद करितात. जुने कागदपत्रांत मुर्डीस लक्ष्मीनारायणाचें देवालय असल्याचा उल्लेख आहे; परंतु सध्यां तें अस्तित्वांत नाहीं.

थोरवी

लोकसंख्येनें मुर्डी गांव लहान असला तरी तेथील लोकांनीं शिक्षणाचे बाबतींत चांगलें नांव मिळविलेलें दिसून येईल. प्राचीन विद्येंत नांव मिळविलेले शास्त्री, पंडित व वैदिक या गांवांत झाले. त्यांत कै. गणेश नारायण पेंडसे (६) हे उत्तम कीर्तनकार व वेदांती म्हणून प्रसिद्ध होते. आधुनिक विद्येंत नांवलौकिक मिळविलेल्या माणसांत हिंदुस्थानांतील पहिले सीनिअर रँग्लर डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांस अग्रपूजेचा मान आहे. ह्यांनीं पुण्याचे फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल, मुंबई प्रांतांत शिक्षणखात्याचे दिवाण, इंडिया कौन्सिलचे सभासद, लखनौ विश्वविद्यालयाचे व्हाईस चॅन्सेलर वगैरे नात्यानें पुष्कळ लोकसेवा केली आहे. दुसरा नामनिर्देश बडोदा कॉलेजचे प्रोफेसर गजाननराव पेंडसे यांचे चिरंजीव श्री. चंद्रकांत ऊर्फ बापूराव यांचा केला पाहिजे. हे बी स्टार रँग्लर असून “ शनीचीं वलयें ” या विषयावरील यांच्या निबंधा-

मुळें विशेष प्रसिद्ध आहेत. अशा विद्वद्रत्नांनीं हा लहान गांव कीर्तीनें मोठा केला आहे. गांवांत मराठी शाळा नसल्यामुळें मुलांना आंजर्ल्यास शिक्षणाकरितां रोज जावें लागत असे. ही गैरसोय दूर करण्याकरितां डॉ. परांजपे यांनीं प्राथमिक शिक्षणाची शाळा नुकतीच स्थापन केली आहे. शाळेचे जागेकरितां सुमारें ३५० रु. खर्च झाले आहेत. इमारतीकरतां रुपये ५००० व वार्षिक खर्चाकरितां रु. ७००० चे सरकारी रोखे रत्नागिरी डि. लोकलबोर्डाकडे यांनीं दिले आहेत. शाळेंत सर्व जातींच्या मुलांमुलींना शिक्षण फुकट व सक्तीनें दिलें जातें. अशा तऱ्हेची ही योजना महाराष्ट्रांत पहिलीच आहे. विद्वत्ता व औदार्य यांचें हें मधुर मीलन होय. शाळेची इमारत दुमजली असून वरचे मजल्यावर ग्रामस्थांकरितां वाचनालय उघडिलें आहे. त्याच्या खर्चाकरितां डॉ. रघुनाथरावांचे कनिष्ठ बंधु श्री. कृष्णाजीपंत परांजपे, इंजिनिअर, यांनीं रु. २००० चे सरकारी रोखे डि. लोकलबोर्डाकडे देण्याचें कबूल केलें आहे.

गांवांत ब्राह्मणांचीं सुमारें २५ घरें आहेत. त्यांत पेंडसे (१०), परांजपे (५), व जोशी, किडमिडे, विद्वांस, सहस्रबुद्धे, दांडेकर, काणे, वगैरेंची वस्ती आहे.

घराण्याची माहिती

या घराण्याचा मूळ पुरुष बल्लाळ. या घराण्यांतील मंडळींचें वास्तव्य मुर्डीस तीनशें वर्षांचेवर आहे. हे मूळ नेवरें (ता. रत्नागिरी) येथून आंजर्लें–मुर्डी येथें आले असावे. सध्यां यांचें वास्तव्य आंजर्लें, इचलकरंजी, केंब्रिज, कोल्हापूर, चिपळूण, दादर, दापोली, दारेसलाम, धुळें, नाशिक, पाथरडीहो, पुणें, बडोदें, मुंबई, मुर्डी व लंडन येथें आहे. पूर्वीं यांचें वास्तव्य तेरदळ, धारवाड, नडियाद, नवसरी, मिरज वगैरे ठिकाणीं झाल्याचें आढळतें.

मुर्डी गांवची खोती यांजकडे आहे. तसेंच आंजर्लें येथील चार चौगुल्यांपैकीं हे एक आहेत.

कुलस्वामी आदित्यनाथ व कुलदेवता योगेश्वरी आहे. आदित्यनाथ नेवरें येथें आहे. देवदिवाळीला या देवांस व ग्रामदेवतांस नैवेद्य दाखवितात. शारदीय नवरात्रांत दिवा, माळ व दसऱ्यास ब्राह्मण व सुवासिनी असते. बोडण किंवा गोंधळ घालण्याची चाल नाहीं. लग्न झाल्यावर पहिलीं पांच वर्षें महालक्ष्मीची पूजा करण्याची पद्धति आहे परंतु ही पूजा स्वतःचे घरीं करावयाची नसते.

चौक–पंचनदी घराण्यांतील बल्लाळ (२) यास कृष्ण व रामचंद्र (३) असे दोन पुत्र आहेत; तसेंच मुर्डी घराण्यांतील बल्लाळ (१) यासहि कृष्ण व रामचंद्र (२) या नांवाचेच दोन पुत्र आहेत. यावरून दोन्ही घराण्यांतील बल्लाळ ही व्यक्ति एकच असावी असें दिसतें व तें कालदृष्ट्याहि जमतें. तथापि निश्चित आधार न मिळाल्यामुळें हीं दोन घराणीं स्वतंत्र ठेविलीं आहेत.

वणोशी येथील घराणें नं. २० मधील दादोजी बल्लाळ(३)हे व या (१२ व्या) घराण्यांतील कृष्णाजी बल्लाळ (२) हे दोघेहि सन १६८८–८९ सालीं

झालेल्या कोंकणांतील भालेराईंत मुरुड–जंजिरा भागांत गेले होते. हे दोघे एकमेकांचे बंधु असतील काय? व तसें असल्यास १२, १३ व २० हीं घराणीं एकत्र होतील.

स. १७८१ मध्यें असलेल्या लोकांची एक यादी पेशवे दप्तरांत श्री. गोपाळराव आचवल यांस आढळली. त्यांत खालील व्यक्ति त्यांचे नांवासमोर दाखविलेल्या गांवीं रहात असल्याचा उल्लेख आहे.

गोविंद कृष्ण (३) आंजर्ले. महादाजी बल्लाळ (४) मुर्डी.

या घराण्यांत पिढ्या ९, एकूण व्यक्ति १४८ व जिवंत व्यक्ति ७८ आहेत.

कृष्णाजी बल्लाळ (२) मृ. स. १७५० चे पूर्वी. हे स. १६८८ चे सुमारास संभाजी महाराजांस पकडल्यामुळें रत्नागिरी जिल्ह्यांत भालेराई (राज्यक्रांति) झाली, त्या वेळीं आंजर्ले गांव उध्वस्त झाल्यामुळें जंजिरा संस्थानांत बोरली पंचातन गांवीं राहावयास गेले. तेथें मुर्डीचे महाजन कृष्णाजी बापूजी पेंडसे हेहि रहावयास गेले होते. त्यांस मृत्यु आला. मरणसमयीं त्यांनीं आपली सर्व मिळकत कृष्णाजी बल्लाळ हे त्यांचे दशांतले दायीज असल्यामुळें त्यांस देऊन आपली उत्तरक्रिया करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें उत्तरक्रिया करून यांनीं मिळकत आपले ताब्यांत घेतली. भार्या लक्ष्मी. (ऐ. प्र. क्रमांक ६ पहा).

बाळाजी कृष्ण (३) मुर्डी व आंजर्ले हे दोन गांव निराळे किंवा मुर्डी हा आंजर्ल्याचाच भाग हा वाद यांचे वेळीं सुरू झाला. स. १७५७ मध्यें हे हयात असल्याचा उल्लेख आहे. भार्या लक्ष्मी (गंगा). (ऐ. प्र. क्रमांक १–२–३–९ पहा).

महादेव बाळाजी ऊर्फ तात्या (४) मृ. श. १७२४ चे पूर्वी. हे स. १७८१ मध्यें मुर्डीस राहात असल्याचा उल्लेख आढळतो. हे स. १७७४ चे सुमारास पुरंदर मुक्कामीं येऊन मौजे मुर्डी, तालुके सुवर्णदुर्ग येथील पडजमीन आणि दर्यागर्क खाजणी जमीन लागवडीस आणून पिकाऊ करण्याबद्दल माफी व कमधारा मिळावा, तसेंच नवसाध्य ठिकाणांची लावणी व्हावी अशाकरितां पेशवे यांजकडे विनंति करतात व त्याप्रमाणें त्यांस कौल मिळाला आहे. (स. मा २–२४६. सु. ११७५ रम १७). यांनीं पेशव्यांच्या कर्नाटकांतील लढायांत भाग घेतला होता (ऐ. प्र. क्रमांक १३ व १५अ पहा). भार्या लक्ष्मी.

नारो महादेव (५) हे आपले चुलत चुलते कृष्णाजी गोविंद व अंताजी गोविंद यांजपासून श. १७२४ कार्तिक व. १३ स विभक्त झाले. भार्या (१) केळशीच्या केळकरांकडील. (२) माई. कन्या (१) सखूबाई, आसूदच्या जोश्यांकडे; (२) मुरुडच्या बिवलकरांकडे; (३) काशी, मुरुडच्या काण्यांकडे; (४) गोदू, गव्हेयाच्या केळकरांकडे; (५) नर्मदा, केळशीच्या परांजप्यांकडे दिली; (६) द्वारका, आंजर्ल्याच्या लक्ष्मणराव खांबेट्यांची पत्नी.

चिंतामणि नारायण (६). २०–२२ वयाचे असतांनाच वारले.

गणेश नारायण (६) मृ. १८८४, वय ५०. हे चांगले शास्त्री असून उत्तम कीर्तनकार होते. केळशीस गणपतीचे देवळांत कीर्तन करीत असतां शेवटचा

नमस्कार घातला, त्या वेळीं बेशुद्ध पडून वाचा बंद झाली व दुसरे दिवशीं (रथसप्तमी) वारले. यांस वेदान्त विषय चांगला अवगत असे, व वक्तृत्व शक्ति उत्कृष्ट होती. हे फार करारी, सत्त्वशील व सत्यनिष्ठ स्वभावाचे होते. भार्या सावित्री, जोश्यांकडील. कन्या (१) बयो, मुरुडच्या विष्णु तातो काळयांची पत्नी. (२) अंबू, बांधावरच्या मायदेवांकडे दिली.

महादेव गणेश (७) मृ. प्लेग १९०५. वय ४०. मुर्डीस शेती व खोती करीत. भार्या पार्वती, आडच्याच्या विष्णुपंत परांजप्यांची मुलगी.

त्र्यंबक महादेव (८) ज. स. १८९४; मृ. स. १९२८. हे बी. ए. (१९२०)होऊन रत्नागिरी जिल्ह्यांत रेव्हेन्यू खात्यांत नोकर होते. भार्या गिरिजा (सुभद्रा), चिपळूणच्या कृष्णराव थत्त्यांची मुलगी. कन्या (१) चंपी. (२) मथुरा.

* **वसंत त्र्यंबक** (९) वय १२. चिपळूणला आजोळीं आहे. मराठी ४ थींत.

रामचंद्र महादेव (८) ज. स. १८९८; मृ. स. १९१५.

पुरुषोत्तम महादेव (८) ज. स. १९००; मृ. स. १९१८. बी. एस्सी. चे वर्गांत असतांना मृत्यु. प्रीव्हिअसचे परीक्षेंत मेलव्हील मेमोरिअल स्कॉलरशिप मिळविली होती.

दत्तात्रेय महादेव (८) ज. स. १९०४; मृ. स. १९३५. बडोदें येथील कलाभवनमध्यें शिकल्यावर मुंबईस (इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजमध्यें) नोकरी होती. भार्या (१) केळशीच्या जोश्यांकडील. भार्या (२) वसुंधरा (अरुंधती), बेडेकरांकडील. कन्या रत्नप्रभा, ज. स. १९३५.

कृष्णाजी गणेश (७) मृ. स. १९२८, वय सुमारें ६०. शेती व वैद्यकी करीत. मुर्डीस आर्यवनौषधालय काढलें व चांगलें नांवारूपास आणून पैसा मिळविला. भार्या रखुमाई (कृष्णा), गिम्हवण्याच्या सदाशिवराव गोखल्यांची मुलगी. कन्या (१) धोंडी, आंजर्ल्याच्या महाजनांकडे दिली. (२) रोहिणी, वय २०. मुर्डीचे सदाशिव दत्तात्रेय विद्वांस (सारंगकर) यांची पत्नी. (३) रंगू, वय १४.

* **गणेश कृष्ण** (८) ज. मुर्डी स. १९०८. शेती करतात व औषधालय चालवितात. भार्या इंदिरा, आंजर्ल्याच्या गोविंदभट काळयांची मुलगी. विवाह स. १९२८. कन्या (१) सुधा, वय ५.

* **शरच्चंद्र गणेश** (९) वय ३.

* **रमेश गणेश** (९) वय १.


* **मोरेश्वर कृष्ण** (८) ज. मुर्डी, वय २६. रेडिओचे माहितगार असून त्याच कामाचा मुंबईस स्वतंत्र धंदा करतात.

* **चिंतामणि कृष्ण** (८) ज. मुर्डी, वय २०. इंग्रजी ४ थी.

* **विष्णु गणेश** (७) वय ६५. मुर्डीस औषधी कारखाना चालवितात आणि शेती व खोती करतात. गांवच्या पोलिसपाटिलकीचें काम यांजकडे आहे. दिपवाळी-करितां अत्तरांच्या पेट्यांची कल्पना मूळ यांनींच काढली. यांनीं आपली सर्व

मिळकत आपले बंधु कृष्णाजी गणेश यांचे मुलांस दिली. भार्या लक्ष्मी (चंद्री), मृ. स. १९३३. गुहागरच्या कृष्णाजी हरी परचुऱ्यांची मुलगी.

दामोदर गणेश (७) ज. स. १८७६; मृ. स. १९३३ बढवाहा (इंदूर संस्थान). हे ब्रह्मचारी असून दत्तात्रेयाची भक्ति करून पूर्ण साधुवृत्तीनें राहात असत. शेवटचीं १२ वर्षें मौनव्रत धारण केलें होतें.



दामोदर गणेश

* **गजानन गणेश** (७) ज. मुर्डी स. १८८० जून १८. आंजर्ल्याच्या शाळेंत मराठी शिक्षण झाल्यावर पुण्यास इंग्रजी शिक्षणाकरितां सन १८९३ त आले. १८९९ मध्यें मॅट्रिक झाले; त्या परीक्षेंत संस्कृतची पहिली जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळविली. १९०० त प्रीव्हिअस् परीक्षेंत फर्स्ट क्लासमध्यें दुसरे येऊन संस्कृतचें विनायक जगन्नाथ शंकरशेट बक्षिस व बाई दयाकुंवर विजभुखणदास स्कॉलरशिप मिळविली. १९०१ त इंटर आर्टस्‌मध्यें फर्स्ट क्लासांत पहिले येऊन वर्जीवनदास माधवदास संरक्त स्कॉलरशिप मिळविली. १९०३ त बी.ए. चे परीक्षेंत फर्स्ट क्लासमध्यें चौथे आले. संस्कृत विषयांत भाऊ दाजी बक्षिस व इतिहासांत "वर्ड्स्वर्थ स्कॉलरशिप अॅन्ड प्राइझ" मिळविली. १९०४–५ त डेक्कन कॉलेजांत फेलो होते. १९०५ त एम्. ए. झाले. शिवाय कॉलेजमधील कित्येक स्कॉलरशिपा व बक्षिसें मिळविलीं आहेत. घरची गरिबी असल्यामुळें सर्व उच्च शिक्षण स्वावलंबनानें केलें. मुर्डी घराण्यांतील हे विश्वविद्यालयाचे पहिले पदवीधर होत. यांच्याइतक्या शिष्यवृत्त्या व बक्षिसें पेंडसे कुलांत इतरांस मिळालीं नाहींत. १९०७ त पहिले पांच महिने अहमदाबादेच्या गुजराथ कॉलेजमध्यें गणिताचे प्रोफेसर होते. जून १९०७ पासून बडोदा कॉलेजमध्यें त्याच विषयाचे प्रोफेसर आहेत. बरींच वर्षें मुंबई विश्वविद्यालयांत परीक्षक होते. यांनीं फ्रेंच व जर्मन या पाश्चिमात्य भाषांचा व तसेंच गुजराथी, हिंदी वगैरे कांहीं एतद्देशीय भाषांचाहि अभ्यास केला आहे. हे आपल्या कुटुंबांतील मंडळींचा योग्य परामर्ष घेतात. यांनीं आपले वडील बंधूंच्या चार मुलांची विद्या केली; व आजपर्यंत आपल्या तीन मुलांस परदेशांत उच्च शिक्षणास पाठविलें. यांचा पुण्याचा पत्ता—भिडे यांचा वाडा,



उभे :—१. सहदेव गजानन, २. कुसुम, ३. पद्मनाभ गजानन, ४. शकुंतला.
बसलेले :—१. प्रो. गजानन गणेश, २. सरस्वतीबाई, ३. चंद्रकान्त गजानन, ४. विष्णु गणेश.

शिवाजी मंदिरासमोर, सदाशिव पेठ. भार्या सरस्वती (यमुना), ज. स. १८९४ फेब्रु २. विवाह स. १९०६, मुटाटच्या गणेश अनंत लेल्यांची मुलगी. कन्या (१) कुसुम, ज. बडोदें स. १९२३ मार्च १५. स. १९३८ त मॅट्रिक पास होऊन कॉलेजमधील पुढील शिक्षण घेत आहे. (२) शकुंतला, ज. नाशिक स. १९२५ मार्च २८. इंग्रजी चौथींत.

* **चंद्रकान्त गजानन ऊर्फ बापूराव** (८) ज. बडोदें स. १९०९ जुलै १९. स. १९२४ त बडोदा हायस्कूलमधून मॅट्रिक. बडोदा कॉलेज-मधून १९२८ त बी. एस्सी. पहिल्या वर्गांत पास झाले. नंतर लंडन युनिव्हर्सिटी कॉलेज-मध्यें जाऊन १९३० त तेथील गणित विषयांत बी. एस्सी. (दोन्ही विभाग) पास झाले व "एलन वॉटसन स्कॉल-शिप इन् अप्लाइड मॅथेमॅटिक्स" मिळ-विली. नंतर केंब्रिज येथें डाउनिंग कॉलेज-मध्यें प्रविष्ट होऊन १९३२ मध्यें मॅथे-मॅटिक्‌ल ट्रायपॉसमध्यें बी. स्टार रँग्लर झाले. नंतर तेथेंच रीसर्च स्कॉलर होऊन गणिताचा अधिक उच्च अभ्यास व संशोधन केलें. १९३४ त "सॅटर्नस् रिंग्ज्" (शनीचीं वलयें) या विषयावरील संशोधनात्मक निबंधा-बद्दल "रेले प्राईझ्" मिळालें; १९३४ त "शीपशँक्स एक्झिबिशन" नांवाची ज्योतिषांतील स्कॉलर्शिप व "आयझॅक न्यूटन स्टूडंट्शिप्" नांवाची त्या युनिव्हर्सिटीमधील सर्वांत उच्च दर्जाची स्कॉलर्शिप मिळाली. १९३६ त हिंदु-स्थानांत परत आले. हे महाराष्ट्रांतील ३ रे व कोंकणस्थांतील १ ले बी. स्टार रँग्लर होत. यांचे पूर्वी महाराष्ट्रांत हा मान प्रि. महाजनी व प्रो. नारळीकर यांस मिळाला. गणिताचा व विशेषतः अॅप्लाईड मॅथेमॅटिक्सचा इंग्लंडांत ७–७॥ वर्षें राहून इतका खोल अभ्यास केलेले हे बहुधा पहिलेच



चंद्रकान्त गजानन, बी. स्टार रँग्लर

एतद्देशीय गृहस्थ असें म्हणतां येईल. Cambridge युनिव्हर्सिटीचे प्रो.क्लार्क मॅक्सवेल यांचे १९ वे शतकांतील व डरहॅम युनिव्हर्सिटीचे प्रो. गोल्डसब्रो यांचे सन १९२१–२४ मधील Saturn's Rings वरील शोध ४–५ वर्षांपूर्वींपर्यंत प्रमाणभूत मानले जात असत. परंतु रा. बापूराव यांचे संशोधनामुळें ती समजूत चुकीची ठरली असून त्यांनीं केलेल्या सिद्धांतांतील दोष आतां दृष्टोत्पत्तीस आले आहेत. या विषयांवरील बापूराव यांचा निबंध फार उच्च प्रतीचा ठरला आहे. यांचे गणितांतील संशोधनाचे कांहीं निबंध इंग्लंडमधील या विषयांतील नियतकालिकांमध्यें (Journals) छापले गेले असून संशोधन पुढें चालू आहे.

* **शरत्कुमार गजानन** (८) ज. अमरेळी स. १९१६ जानेवारी १२. मॅट्रिक १९३०.



१. कमलाकान्त गजानन. २. शरत्कुमार गजानन.

बडोदा कॉलेजमधून बी. एस्सी.; १९३४ पहिला वर्ग. १९३५–३८ पर्यंत इंजिनिअरिंगचा अभ्यास केंब्रिज डार्विनग कॉलेजमध्यें केला व बी.ए. ची (मेकॅनिकल सायन्सेस ट्रायपॉस्) डिग्री मिळविली. आतां मँचेस्टर येथें कारखान्यांत प्रात्यक्षिक शिक्षण घेणार आहेत.

* **कमलाकान्त गजानन** (८) ज. बडोदें स. १९१८ मे १३. मॅट्रिक १९३२. रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्समधून बी. एस्सी. १९३७. सध्यां लंडन युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें वैद्यकीचा (मेडिसिन्) अभ्यास करीत आहेत.

* **पद्मनाभ गजानन** (८) ज. बडोदें स. १९२० डिसें. २७. मॅट्रिक १९३६. इन्टर आर्टस् १९३८. सध्यां बी. ए. चा अभ्यास करीत आहेत.

* **सहदेव गजानन** (८) ज. बडोदें स. १९३० जाने. १६. मराठी ४ थी इयत्ता.

नारायण गणेश (७) ज. मुर्डी. स. १८८१; मृ. दमा, स. १९३७ जाने. दापोली

व मुंबईस शिक्षक होते. भार्या अन्नपूर्णा (अंबिका), पुरुषोत्तमपंत दामल्यांची मुलगी. कन्या (१) लीला, ज. स. १९१५. अनगांवच्या लेल्यांकडे; (२) इंदुमती, ज. स. १९२०. बडोद्याच्या दीक्षितांकडे दिली. (३) द्रौपदी, ज. मुरुड. स. १९२३. (४) वत्सला, ज. मुरुड, स. १९३२. (५) कला, ज. मुरुड, स. १९३५.

* **श्रीपाद नारायण** (८) ज. मुर्डी, स.१९१३ जाने. २३. इंटर सायन्स पास. मुंबईस म्युनि. स्कूलमध्यें शिक्षक आहेत. ८० डोंगरेबाग दादर येथें राहतात.

* **निजानन्द नारायण** (८) ज. मुरुड, स. १९२६. इंग्रजी दुसरींत.

* **अनंत नारायण** (८) ज. मुरुड, स. १९२९. मराठी दुसरींत.

मोरेश्वर नारायण (६) मिरजेस उदरानें स. १८८७ त वयाचे ५० वे वर्षी मृत्यु. ट्रेनिंग कॉलेजची परीक्षा उत्तीर्ण होऊन मोडनिंब व मिरज येथें शिक्षक होते. भार्या गंगा, पतीनंतर ५–६ वर्षांनीं वारल्या. यांस पुत्र झाला नाहीं. कन्या चार. (१) द्रौपदी, मिरजेच्या गणेश गोपाळ पटवर्धनांची पत्नी. (२) दुर्गा, वय ५९, महाराष्ट्रांतील प्रसिद्ध पुढारी नरसिंह चिंतामण केळकरांची पत्नी. (३) कृष्णा, मिरजेच्या बाळकृष्णपंत नातूंची पत्नी. (४) वेणू, सांगलीच्या सखाराम पांडुरंग केळकरांची पत्नी. सध्यां एकटच्या दुर्गाबाई हयात आहेत. इतर तिघी अहेवपणीं वारल्या.

गोविंद कृष्ण (३) हे स. १७८१ मध्यें आंजर्ले येथें असल्याचा उल्लेख आढळतो. मुर्डी–आंजर्लें हा वाद यांनीं नेटास लावून त्याचा निकाल पेंडसे यांजतर्फे करवून घेतला. हे बरेच कर्तबगार असावेत (ऐ. प्र. क्रमांक ४, ५, ७, १०, १४ पहा). भार्या भागीरथी.

कृष्णाजी गोविंद (४) हे मुर्डी–आंजर्ल्याहून केळशीस जाऊन राहिले होते असें दिसतें. कारण मुर्डी–आंजर्लें वादांत केळशीकर म्हणून यांचा उल्लेख आढळतो. (ऐ. प्र. क्रमांक २५ पहा).


पांडुरंग कृष्ण (५) यांचे बंधु व हे श. १७४९ मध्यें विभक्त झाले. भार्या पार्वती. यांची कन्या मुरुडच्या वागुलांकडे दिली होती.

गणेश पांडुरंग ऊर्फ बल्लाळ (६) मृ. श. १७८५ चे पूर्वी. भार्या सरस्वती, केळकरांकडील.

हरी बल्लाळ (७) मृ. श. १७९४ चे पूर्वी. भार्या राधा. हिनें श. १८०२–३ मध्यें मुलगा दत्तक घेतला.

मुकुंद हरी (८) हे दत्तक आले. यांचें मूळचें नांव गोविंद प्रभाकर जोशी. आसूदचे राहणार. मृ. स. १९२६–२७. वय ४७. भार्या लक्ष्मी, मुरुडच्या सीतारामपंत बिवलकरांची मुलगी. कन्या भीमा, हर्णैच्या रामचंद्र गणेश जोश्यांची पत्नी.

रावजी बल्लाळ (७) मृ. श. १७९४ चे पूर्वी.



१. दुर्गाबाई. २. नरसिंह चिंतामण केळकर.

वामन पांडुरंग (६) हे पुण्यास सरकारी सैन्यास रसद पुरविणारे एजंट सायन्ना यांचेकडे १२ वर्षें नोकर होते. स. १८५७ सालीं यांची बदली उत्तर हिंदुस्थानांत झाल्यामुळें नोकरी सोडून आंजर्लें येथें परत गेले. त्यांनीं तेथें मिळकतहि घेतली. हे तत्कालीन लोकांत चाणाक्ष व विद्येची अभिरुचि असणारे समजले जात. भार्या दुर्गा, पालगडच्या खऱ्यांकडील.

गणेश वामन (७) विद्यार्थिदशेंत पुणें येथें मृत्यु. भार्या वेणू, आंजर्ल्याच्या नारायणराव बापटांची मुलगी.

बाळकृष्ण वामन (७) मृ. मधुमेह; स. १९०१ सप्टेंबर २२. इंग्रजी सात इयत्तांपर्यंत शिक्षण. एम्.एस्. एम्. रेल्वेंत बांधकाम चालू असतांनाचे कॅशिअर व पुढें धारवाड येथें पे–क्लार्क म्हणून स. १९०० पर्यंत नोकरी केली. नंतर स्वगृहीं मुर्डीस जाऊन राहिले. नांवलौकिक व पैसा मिळविला; व आप्तेष्टांस बरीच मदत केली.

भार्या लक्ष्मी (काशी), मुरुडच्या जनार्दनपंत केतकरांची मुलगी. कन्या (१) सुंदरी, मुरुडच्या नाना वैद्यांची पत्नी. (२) गंगू, आंजर्ल्याच्या केशव गणेश जोश्यांची पत्नी. (३) अंबू, रत्नागिरीचे यशवंत धोंडो फडक्यांची पत्नी.

* **सीताराम बाळकृष्ण** (८) ज. मुरुड श. १७९८ माघ व. १. मॅट्रिक. एस्. टी. सी.




श. १८६०

बसलेले :–१. सीताराम बाळकृष्ण, २. जानकीबाई. **उभी** :–कृष्णाबाई.

पुणें, नू. म. विद्यालय हायस्कूलमध्यें शिक्षकाची नोकरी केली. आंग्लभाषा-प्रवेश भाग १-२-३ (नवीन भाषांतरपाठमाला) या नांवाचीं नवीन धर्तीचीं स्वकृत क्रमिक पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. हे दत्तोपासक आहेत. पत्ता–जोहाऱ्याचें महादेवमंदिर, ३४७ सदाशिव पेठ, पुणें २. भार्या जानकी (बनू), म्हैसूर संस्थानांतील मामलेदार कृष्णाजी नारायण मोडकांची मुलगी. कन्या (१) यमू, (सावित्री), ज. बंगलोर स. १९०८ डिसें. नाशिकच्या विष्णु गोपाळ केळकरांची पत्नी. (२) कृष्णा, पुणें ज. श. १८३९ श्रावण शु. १५. एस्. पी. कॉलेजमध्यें सीनियर बी. ए.च्या वर्गांत आहेत. मुंबईच्या सरदारगृहाचे मालक बाबूराव साळवेकर यांनीं एस्.पी.कॉलेजमध्यें 'तत्त्वज्ञान' या विषयाकरितां दोन बक्षिसें ठेविलीं आहेत. "तुकारामाचें तत्त्वज्ञान" या विषयावरील निबंधास त्यांतील पहिलें बक्षिस स. १९३७–३८ सालीं मिळविलें आहे. स्त्रियांचे युनिव्हर्सिटीची प्रवेशपरीक्षाहि दिली असून डोमेस्टिक सायन्समध्यें पहिल्या आल्या व गोल्ड मेडल मिळालें आहे. यांस श्री. महाराणी चिमणाबाईसाहेब गायकवाड यांच्या ट्रस्ट फंडांतून दरमहा दहा रुपयांची शिष्यवृत्ति मिळत आहे.

* **गणेश सीताराम** (९) ज. पुणें श. १८३६ श्रावण व. ८. कॉलेजचे पहिले वर्षाचें शिक्षण घेऊन स. १९३६ त एल्. सी. पी. एस् होऊन धुळें येथें सरकारी नोकरी करितात. वैद्यकीय विषयांवर वर्तमानपत्रांत लेखहि लिहितात.



श. १८६०

डॉ. गणेश सीताराम

परशुराम बाळकृष्ण (८) ज. मुर्डी. श. १८०१; मृ. स. १९३४. हॉस्पिटल असिस्टंटची परीक्षा दिली होती. नडियाद म्युनिसिपालिटींत हेल्थ ऑफिसर होते. भार्या (१) सत्यभामा, पालगडच्या जोश्यांकडील. पुत्र मोरेश्वर व विष्णु. कन्या सुशीला (कलावती), केळशीच्या गोविंद परशुराम दांडेकरांची पत्नी. भार्या (२) सत्यभामा, बडोद्याच्या गोखल्यांकडील. कन्या विमल, वय १५; इंग्रजी ६ वींत.

* **मोरेश्वर परशुराम** (९) वय २३. बडोद्याच्या कलाभवनमध्यें शिक्षण घेऊन मुंबईस बॉंबे डाईंग वर्क्समध्यें नोकरी करितात.

* **विष्णु परशुराम** (९) वय २०, बडोद्यास मॅट्रिकचे वर्गांत आहेत. पत्ता— सरदार मुजूमदार यांचे वाडयासमोर जोश्यांचें घर, रावपुरा, बडोदें.

* **आत्माराम बाळकृष्ण** (८) ज. मुर्डी श. १८०५. मुर्डीस शेती, मसूंडें व चिखली हृया दोन गांवची खोती व किरकोळ व्यापार करितात. सार्वजनिक कामांत पुढाकार घेतात. भार्या (१) सावित्री, विवाह श. १८२८. वेरळच्या गोपाळ त्र्यंबक दामल्यांची मुलगी. भार्या (२) राधा, विवाह श. १८३२. पालगडच्या नारायण विनायक जोश्यांची मुलगी. कन्या (१) आवडी (लक्ष्मी), वय २४, आवासच्या दामोदर कृष्ण कर्व्यांची पत्नी. (२) अहिल्या (कमला), वय २१, दाभोळच्या विठ्ठल गोपाळ घैसासांची पत्नी. (३) इंदु (सरला), १५ पें. कु. वृ.

वय १८, गावडें आंबेऱ्याच्या विश्वनाथ दामोदर अभ्यंकरांची पत्नी. (४) प्रभावती, वय १० (५) कुमुदिनी, वय ४.

*__दिगंबर आत्माराम__ (९) ज. श. १८४४; इंग्रजी २ री.

*__अवधूत आत्माराम__ (९) ज. श. १८४७; मराठी ४ थी.

*__एकनाथ आत्माराम__ (९) ज. श. १८५२.

*__सुधाकर आत्माराम__ (९) ज. श. १८५५.

*__दत्तात्रेय बाळकृष्ण__ (८) ज. धारवाड श. १८१०. पुरुषोत्तमदास मथुरादास आणि कं. त कोल्हापुरास नोकरी आहे. दत्तभक्त आहेत. भार्या (१) रमा, अंजनवेलच्या मोरो जगन्नाथ आचवलांची मुलगी. भार्या (२) रमा, सांगलीच्या रामचंद्र विष्णू मराठ्यांची मुलगी. कन्या (१) प्रभावती, ज. पुणें स. १९२९ मराठी २ रींत. (२) सिंधु, ज. कोल्हापूर स. १९३५. (३) सुधा, ज. स. १९३७.

*__मधुसूदन दत्तात्रेय__ (९) ज. स. १९३२.

__शांताराम बाळकृष्ण__ (८) ज. धारवाड श. १८१५; मृ. श. १८५७. मुंबईस दलालीचा धंदा करीत असत. अविवाहित.

__भिकाजी वामन__ (७) नर्मदातीरीं साधुवृत्तीनें राहात. भार्या आनंदी, पाडले येथील लिमयांची मुलगी. कन्या (१) बयो, केळशीच्या गोपाळराव सोमणांची पत्नी. (२) द्वारका.

__केशव वामन__ (७) मुर्डीस शेती करीत होते. भार्या भागीरथी, केळशीच्या हरीभाऊ गोडबोल्यांची मुलगी.

__भार्गव केशव__ (८) वयाचे २७।२८ वे वर्षी मृत्यु. मुर्डीस राहात. अविवाहित.

__श्रीधर वामन__ (७) मृ. श. १८४७. मुर्डीस शेती व खासगी नोकरी करीत. भार्या गंगा, सवणसच्या केळकरांकडील. कन्या (१) तापी, मुरुडचे खऱ्यांकडे; (२) रंगू, मुरुडच्या परचुऱ्यांकडे दिली.

*__जयराम श्रीधर__ (८) ज. मुर्डी, श. १८१०. मुर्डीस शेती करितात. भार्या सीता, सोमणांकडील. विवाह श. १८३९. यांस तीन मुली आहेत.

*__मधुसूदन जयराम__ (९)

*__प्रभाकर जयराम__ (९)

__शिवराम वामन__ (७) मृ. श. १८४०, ताप व पोटदुखीनें. सदर्न मराठा रेल्वेंत असिस्टंट स्टेशनमास्तर होते. सेवानिवृत्त झाल्यावर मुर्डीस शेती करीत. भार्या यमुना (अंबू), केळशीच्या जोश्यांकडील. कन्या (१) काशी, आंजर्ल्याच्या गोविंद रामकृष्ण वापटांची पत्नी. (२) चंद्री, मुडकवलीच्या वामन चिंतामण वैद्यांची पत्नी.

__शंकर शिवराम__ (८) ज. मुर्डी श. १८२३; मृ. श. १८५३, तापानें. नडियादेस मेकॅनिकल इंजिनिअर होते. भार्या (१) गिरिजा, हर्णैच्या रानड्यांकडील.

विवाह श. १८४१. कन्या चंपू, पुण्यास कर्व्यांकडे दिली. भार्या (२) सुशीला, केळशीच्या बेंद्र्यांकडील. विवाह श. १८४८. या शिक्षकीण आहेत. पुत्र श्रीकृष्ण.

* **श्रीकृष्ण शंकर** (९) ज. केळशी, श. १८५१. मराठी दुसरींत आहे.

जगन्नाथ पांडुरंग (६) हे आपले चुलते रघुनाथ यांस दत्तक गेले.

रघुनाथ कृष्ण (५) भार्या जानकी.

जगन्नाथ रघुनाथ (६) ज. मुर्डी. मृ. वय ७३. यांचें मूळचें नांव जगन्नाथ पांडुरंग. हे दत्तक आले. शेती करीत. भार्या रमा, गुडघ्याचे दांडेकरांकडील. मृत्युसमयीं वय ५५. कन्या (१) मथुरा, वय ६९. केळशीच्या बाळाजी गोपाळ भटांची पत्नी. (२) अंबू, वय ५३. नागांवच्या वामन नारायण रिसबुडांची पत्नी.

रामचंद्र जगन्नाथ (७) ज. श. मुर्डी, १७९४; मृ. स. १९०२ कुत्रें चावून. स्कूल फायनल. पी. डब्ल्यु. डींत नोकरी होती. भार्या जानकी, गुहागरच्या खर्‍यांकडील.

* **रघुनाथ जगन्नाथ** (७) ज. श. १७९६. पब्लिक वर्क्स खात्यांत नोकर होते. पेन्शन घेऊन घ. नं. ६० वैशंपायन यांचा वाडा मेनरोड, नाशिक येथें राहतात. भार्या (१) आनंदी, करंजगांवच्या बापूजी जोश्यांची मुलगी. भार्या (२) आनंदी, महाडच्या जगन्नाथपंत पर्वत्यांची मुलगी. कन्या (१) यमुना, ज स. १९१५ डिसें. ३०; अकोल्याच्या दत्तात्रेय सदाशिव केळकरांची पत्नी. (२) विमल, ज. स. १९३१.

* **विश्वनाथ रघुनाथ** (८) ज. स. १९२४ मार्च ६. इंग्रजी सातवींत.

विष्णु कृष्ण (५) भार्या पार्वती.

वासुदेव विष्णु (६) ज. मुर्डी; मृ. स. १८८१. शेती करीत. भार्या रखमाई (वाराणशी), श्रीवर्धनच्या रामचंद्र नारायण ओजाळ्यांची मुलगी. कन्या (१) यमुना, नारायण विष्णु आपट्यांची पत्नी. (२) आवडी, वासुदेव आपाजी भागवतांची पत्नी. (३) सीता, शंकर विष्णु बागुलांची पत्नी. (४) भीमा, गोविंद रामचंद्र परांजप्यांची पत्नी. (५) बहिणा, आंजर्ल्याच्या भालचंद्र लक्ष्मण जोश्यांची पत्नी.

* **हरी वासुदेव** (७) ज. मुर्डी, स. १८६७. ट्रेनिंग कॉलेजचीं ३ वर्षें होऊन मराठी शाळेंत हेडमास्तर होते. सेवानिवृत्त होऊन मुर्डीस स्वतःचें घर बांधून राहतात. भार्या सरस्वती (भागीरथी), हुबळीच्या दिवाकर रामचंद्र आठवल्यांची मुलगी. विवाह स. १८९४. कन्या (१) अहिल्या (राधा), केशव सीताराम जोश्यांची पत्नी. (२) एसू (यमुना), वासुदेव गोविंद घैसासांची पत्नी. (३) यमुना (राधा), भिकाजी पुरुषोत्तम जोश्यांची पत्नी. (४) दुर्गा (वत्सला), वेळासच्या विष्णु कृष्ण वैद्यांची पत्नी.

* **अच्युत हरी** (८) ज. कोळथरें, स. १८९८; मॅट्रिक. पूर्व आफ्रिकेंत टांगानिका टेरिटरीच्या कस्टम खात्यांत नोकरी आहे. भार्या विमला (छबू), पालगडच्या


नारायण रामकृष्ण डोंगऱ्यांची मुलगी. विवाह स. १९३१. कन्या लीला, ज. श. १८५५ चैत्र शु. १४.

* **सदाशिव अच्युत** (९) वय ३.

* **जगन्नाथ हरी** (८) ज. पालगड स. १९१३. मुंबईस शिवणकाम करितात.

* **चिंतामणि हरी** (८) ज. मुर्डी स. १९१८. दापोली हायस्कुलांत ७ वींत आहे.

गोपाळ विष्णु (६) ज. मुर्डी श. १७५३; मृ. श. १८३७. नोकरींतून निवृत्त झाल्यावर मुर्डीस राहात. भार्या (१) आनंदी. भार्या (२) उमा, गणपुल्यांकडील. विवाह श. १७८८. पुत्र लक्ष्मण, नारायण, महादेव व वासुदेव. कन्या सई, करंजगांवच्या जोश्यांकडे दिली.



खुर्चीवर :—१.एकनाथ नारायण, २.नारायण गोपाळ, ३.द्वारकाबाई, ४.रामचंद्र नारायण.
उभे :—१. इंदिराबाई, २. गणेश वासुदेव, ३. सीताबाई.

* **नारायण गोपाळ** (७) ज. श. १७९६. मुर्डीस शेती व सावकारी करितात. भार्या द्वारका, साठ्यांकडील. विवाह श. १८१०. कन्या नर्मदा, जालगांवचे जोगळेकरांकडे दिली.

* **एकनाथ नारायण** (८) ज. श. १८२०. मुंबईस सॉलिसीटरचे फर्ममध्यें नोकरी

आहे. भार्या इंदिरा, वय २९. आंजर्ल्याच्या अनंत वासुदेव डोंगऱ्यांची मुलगी. विवाह श. १८४०. एक कन्या आहे.

* **गोविंद नारायण** (८) ज. श. १८२४. टाटा स्टीम कंपनींत नोकरी आहे. भार्या मालती (कृष्णा), वय २३. वडदच्या नरसो विश्वनाथ सोमणांची मुलगी. विवाह श. १८४९. दोन कन्या आहेत.

* **शंकर गोविंद** (९) ज. श. १८५३.

* **रामचंद्र नारायण** (८) ज. श. १८२७. मुंबई ट्रॅम कंपनींत नोकरी आहे. भार्या सीता (कृष्णा), वय २०. बुरंबाडच्या सदाशिव अनंत साठ्यांची मुलगी. विवाह श. १८५१.

* **विनायक रामचंद्र** (९) ज. श. १८५६.

पांडुरंग नारायण (८) हे आपले चुलतीचे मांडीवर दत्तक बसले. तेथील नांव गणेश वासुदेव.

* **महादेव गोपाळ** (७) ज. मुर्डी श. १८०३. पूर्वी व्यापार व सध्यां शेती करितात. भार्या कृष्णा, सोमणांकडील. कन्या (१) गोदू, बिवलकरांकडे; (२) शांता, गोखल्यांकडे दिली.

* **कृष्णाजी महादेव** (८) ज. मुर्डी श. १८३४. मुर्डीस शेती करितात. भार्या सुंदरी, सहस्त्रबुद्धयांकडील. विवाह श. १८५५.

* **वसंत कृष्ण** (९) ज. श. १८५८.

* **रंगनाथ महादेव** (८) ज. श. १८४३. मराठी ७ वींत.

वासुदेव गोपाळ (७) ज. मुर्डी श. १८०५; मृ. काळपुळी, श. १८५१. व्यापार करीत. भार्या (१) लक्ष्मी, बव्यींकडील. भार्या (२) रखुमाई, जोश्यांकडील. विवाह श. १८३७.

* **गणेश वासुदेव** (८) ज. मुर्डी श. १८३३. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. मुर्डीस शेती करितात. यांचें मूळचें नांव पांडुरंग नारायण असून हे चुलतीचे मांडीवर दत्तक बसले. भार्या यमुना (कमला), वय १८. पुण्याच्या धोंडो रामचंद्र करमरकरांची मुलगी. विवाह श. १८५७. एक कन्या आहे.

गोविंद कृष्ण (५) भार्या राधा.

अनंत गोविंद (४) मृ. श. १७७३ चे पूर्वी. मुर्डीस शेती करीत. भार्या अन्नपूर्णा. कन्या (१) सखू, (२) गोदू, (३) काशी. यांतील एक गांवधणीचे मायदेवांकडे दिली होती.

लक्ष्मण अनंत (५) मुर्डीस शेती करीत. यांचें चौघां धाकट्या भावांशीं न बनल्यामुळें एकटेच श. १७७३ त विभक्त झाले. चौघे एकत्रांत होते. ते श. १७८३ त विभक्त झाले. भार्या आनंदी.

दामोदर (नाना) लक्ष्मण (६) मुर्डींत शेती करीत. भार्या अन्नपूर्णा, मुरुडच्या भाव्यांकडील. कन्या (१) कृष्णा, केळशीचे सदाशिवभट आखव्यांची पत्नी. (२) बहिणी (भागीरथी), हर्णैचे त्र्यंबकराव दारशेतकर (भट) यांची पत्नी.

(३) सखू, मुर्डीचे सहस्रबुद्धे यांजकडे दिली. (४) द्रौपदी, कोळथऱ्याच्या गोपाळपंत बडव्यांची पत्नी. (५) चंद्रा, आंजर्ल्याच्या गोविंदराव जोश्यांची पत्नी. (६) सुभद्रा (गिरिजा), हर्णैचे हरीपंत जोशी दारुखाने यांची पत्नी.

पुरुषोत्तम दामोदर (७) मुर्डीस शेती करीत. भार्या लक्ष्मी.

* **गजानन पुरुषोत्तम** (८) ज. मुर्डी श. १८३३. मॅट्रिकपर्यंत शिक्षण. हैद्राबादेकडे खाजगी नोकरी करितात. भार्या केळशीच्या घैसासांकडील.

* **लक्ष्मण पुरुषोत्तम** (८) ज. मुर्डी श. १८३५. मुर्डीस शेती करितात.

सखाराम (बापू) दामोदर (७) वयाचे १४–१५ वे वर्षीं मृत्यु.

परशुराम अनंत (५) मुर्डीस शेती करीत. यांस ४ कन्या होत्या.

रामकृष्ण परशुराम (६) ज. मुर्डी. नोकरी करीत. भार्या जानकी, वैद्यांकडील.

अनंत रामकृष्ण (७) तेरदळास नोकरी करीत. यांस कन्या होत्या.


सदाशिव परशुराम (६) मृ. श. १८३९. मुर्डीस शेती करीत. भार्या मथुरा, जोश्यांकडील. कन्या (१) बयो, आसूदच्या हरी रामचंद्र दावक्यांची पत्नी. (२) गंगू, वासुदेव नीळकंठ जोश्यांची पत्नी. (३) द्वारका, वेळासच्या गणेश आत्माराम गैलाडांची पत्नी.

* **विठ्ठल सदाशिव** (७) ज. मुर्डी श. १८३१. दापोलीस मोटार ड्रायव्हर आहेत. भार्या रखुमा, गोडबोल्यांकडील, विवाह श. १८५८.

* ☐ विठ्ठल (८) ज. श. १८५९.

महादेव (तातो) अनंत (५) मृ. श. १८०३. परशुरामक्षेत्रीं यांनीं वेदाध्ययन केलें होतें म्हणून यांस तातंभट म्हणत. हे पांच बंधु असल्यामुळें लोक यांस पांडव म्हणत. हे तिसरे पांडव. या सर्व बंधूंची शक्ति व धाडस मोठें होतें अशी ख्याति अद्यापि वृद्ध लोक सांगतात. मुर्डीस शेती व खोती करीत. भार्या गोपिका (अंबा), मृ. श. १८२२; वासुदेव नारायण दावक्यांची मुलगी. कन्या (१) ठकू, आंजर्ल्याच्या गोविंदराव जोश्यांची पत्नी. (२) काशी, आंजर्ल्याच्या सखाराम पांडुरंग जोश्यांची पत्नी.


विनायक महादेव (६) ज. श. १७६१ ज्ये. व. ३०; मृ. श. १८४६ ज्ये. शु. १०. कोंकणांत मराठी शिक्षण झालें. नोकरीकरितां बडोदें संस्थानांत आल्यावर गुजराथी शिकले. न्यायखात्यांत कारकुनापासून नाझरपर्यंत चढले. यांची नोकरी नवसरी, कठोर व व्यारा या तीन गांवीं झाली. ३०-३२ वर्षें नोकरी केल्यावर स. १९०५ त सेवानिवृत्त झाले व मुलास पुण्यास नोकरी असल्यामुळें तेथें राहिले. स्वभाव शांत व स्वाभिमानी. कधींहि कोणाचा उपकार घेऊं नये अशी इच्छा असे. यांनीं मुलाकडून पणतू पाहिला. भार्या (१) गोदावरी, आंजर्ल्याच्या बापूराव निजसुऱ्यांची मुलगी. पुत्र सीताराम. भार्या (२) सरस्वती (मनू), मृ. श. १८४२ फा. शु. ८. हर्णैच्या रघुनाथ भालचंद्र जोशी, पंचनदीकरांची दुसरी मुलगी. घरची श्रीमंती नसतांहि गृहव्यवस्था



स. १९१३

उभ्या :—१. दुर्गाबाई ओक, २. मथुराबाई भावे, ३. सरस्वतीबाई, ४. रमाबाई.
खुर्चीवर :—१. गणेश हरी ओक, २. काशीनाथ श्रीधर भावे, ३. विनायक महादेव, ४. कृष्णाजी विनायक.
बसलेले :—१. मोरो सीताराम, २. वामन जनार्दन जोशी, ३. भालचंद्र काशीनाथ भावे, ४. नारायण विनायक. मांडीवर :—शांता भावे.

स्वाभिमानपूर्वक टापटिपीची ठेवण्यांत या फार दक्ष होत्या. पुत्र कृष्ण व नारायण. कन्या (१) वेणू (यमुना), ज. हर्णै श. १८०३ श्रा. व. ११; मृ. श. १८५९ मार्ग व. २. केळशीच्या गोविंद कृष्ण विद्वांसांची पत्नी. (२) मथुरा (गंगा), ज. नवसरी श. १८१५ ज्ये. शु. ३. मुंबईच्या अकाउंटंट जनरलचे ऑफीसमधील पेन्शनर काशीनाथ श्रीधर भाव्यांची पत्नी. (३) दुर्गा (सरस्वती), ज. नवसरी श. १८१८ आश्वि. शु. ४; मृ. श. १८३४ भाद्र.; पी. डब्ल्यू. खात्यांतील अकाउंटंट, नाशिकचे गणेश हरी ओक यांची पहिली पत्नी.



स. १९३६


१. वेणूबाई विद्वांस २. कृष्णाजी गोविंद विद्वांस.

सीताराम विनायक (७) ज. श. १७८३ आश्वि. व. १४; मृ. श. १८३१ माघ. अर्धांगानें. मराठी शिक्षण संपल्यावर मुर्डीस शेती करीत. गांवांतील सार्वजनिक कामांत यांचा पुढाकार असे. भार्या भागीरथी (सीता), सुखोंडीच्या भिकाजी गोविंद शित्र्यांची मुलगी. कन्या (१) गंगू (सुभद्रा), ज. श. १८१८ भाद्र. शु. ७; गिम्हवण्याचे वामन सखाराम मेहेंदळे, मराठी शाळेचे हेडमास्तर, यांची पत्नी. (२) काशी (गंगा), ज. श. १८२४ पौष व. ५; आसूदचे यशवंत महादेव रिसबूड, जी. आय्. पी. रेल्वेंत स्टेशनमास्तर यांची पत्नी.



स. १९३२

भागीरथीबाई



स. १९३६

उभे :—एकनाथ धोंडो. **खुर्चीवर** :—१. लीला, २. धोंडो सीताराम, ३. अनंत धोंडो, ४. सत्यभामाबाई, ५. शांता. **पुढची रांग** :—१. वसंत धोंडो, २. यशवंत धोंडो, ३. नरसिंह धोंडो.

*धोंडो सीताराम (८) ज. मुर्डी श. १८०७ माघ व. ९. मराठी ४ इयत्ता आंजर्ल्यास व ५–६ व्याऱ्यास झाल्या. नोकरीनिमित्त गुजराथी शिकले. इंग्रजी शिक्षण थोडें केळशीस झालें व खाजगी अभ्यासानें वाढविलें. गरिबीमुळें अधिक शिक्षण घेतां न आल्यामुळें बडोदें संस्थानांत कठोरास न्यायखात्यांत रु. १२ ची नोकरी पत्करिली. खात्यांतील दोन परीक्षा उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाल्यामुळें बढतीवर बडोद्यास बदली झाली. स. १९०९ त ती नोकरी सोडून जर्मन ईस्ट आफ्रिकेंत गेले व खाजगी नोकरी धरली. महायुद्धांत तो भाग इंग्रजांचे ताब्यांत गेल्यावर कस्टम खात्यांत नोकरी धरिली.



स. १९११

१. शारदाबाई. २. धोंडो सीताराम.

सध्यां दारेसलाम, टांगानिका टेरिटरी, येथें असून पगार रु. ३४०आहे. तेथें घर बांधिलें आहे. वडिलार्जित मिळकतींत असलेला आपला हिस्सा भावास दिला. सार्वजनिक कामाची आवड आहे. भार्या (१) शारदा (सीता), मुरुडच्या नारायण केशव बागुलांची मुलगी. मृ. स. १९१३ मे २५. पुत्र एकनाथ. भार्या (२) सत्यभामा (कृष्णा), भिल्याच्या पुरुषोत्तम महादेव केतकरांची मुलगी. पुत्र अनंत, नरसिंह, वसंत व यशवंत. कन्या (१) शांता, ज. दारेसलाम सन १९१९ ऑगस्ट ३१. इंग्रजी ७ वींत. (२) लीला, ज. दारेसलाम, स. १९२१ मार्च २. इंग्रजी ६ वींत.

*एकनाथ धोंडो (९) ज. मुरुड स. १९१२ मार्च ८. सर परशुरामभाऊ कॉलेजमधून इंटर सायन्स पास झाले व सध्यां पुण्यास बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें एल्. सी. पी. एस. चा अभ्यास करीत आहेत.

*अनंत धोंडो (९) ज. दारेसलाम स. १९२४ मार्च २३. इंग्रजी २ रींत.

*नरसिंह (बाचा) धोंडो (९) ज. दारेसलाम स. १९२६ जानेवारी २९ इंग्रजी दुसरींत.

*वसंत (बाळ) धोंडो (९) ज. दारेसलाम स.१९२९ जानेवारी १८. इं. १ लींत.

*यशवंत धोंडो (९) ज. दारेसलाम स. १९३१ मे २३. मराठी ३ रींत.

*दत्तात्रेय सीताराम (८) ज. मुर्डी श. १८११. शिक्षण मराठी. शेती करितात. भार्या सावित्री (यमुना), वय ३७. गोरेगांवच्या सदाशिवराव केळकरांची मुलगी.

कन्या (१) कमळा (सुशीला), वय २२ पालगडच्या महादेव गणेश डोंगऱ्यांची पत्नी. (२) चंद्रभागा, ज. श. १८४४ फाल्गुन शु. ४. (३) शकुंतला, ज. श. १८४९ फाल्गुन शु. ५. (४) सुधा, वय ६. (५) कुंदा, ज. श. १८५७ आश्विन शु. ८.

* जनार्दन दत्तात्रेय (९) ज. मुर्डी स. १९२० एप्रिल ४. शिक्षण मराठी. इचलकरंजीस विणकामाचें शिक्षण घेऊन तेथेंच गिरणींत काम करितात.


* विठ्ठल दत्तात्रेय (९) ज. श. १८४७. मराठी शिक्षण चालू.

* विनायक दत्तात्रेय (९) ज. श. १८५२.

* मुरलीधर दत्तात्रेय (९) ज. श. १८६०.

भास्कर सीताराम (८) मृ. स १९११ जुलै १२. विद्यार्थीदशेंत मृत्यु.

* मोरो सीताराम (८) ज. मुर्डी श. १८२० अधिक आषाढ शु. ७. शिक्षण मराठी



स. १९३८

मोरो सीताराम. सुमन.

व इंग्रजी आंजर्लें व पुणें येथें झालें. टांगानिका टेरिटरी, ईस्ट आफ्रिका येथें लँड खात्यांत नोकरी आहे. पगार रु. ३४०. यांनीं वडिलार्जित मिळकतींत असलेला आपला हिस्सा आपले भावास दिला. भार्या राधा (गोदावरी), गणपतराव बिवलकरांकडील. कन्या (१) विमला, ज. दारेसलाम स. १९२९ एप्रिल २. (२) मालती, ज. दारेसलाम स. १९३० जुलै २५. (३) कुसुम, ज. मुरुड स. १९३२ आक्टो. (४) सुमन, ज. दारेसलाम, १९३७ मार्च १६.

* कमलाकर मोरेश्वर (९) ज. दारेसलाम, स. १९३५ मे १७.



स. १९३६

खुर्चीवरील :—१. मालती, २. कुसुम, ३. विमला.
टेबलावर :—कमळाकर मोरो. **उभ्या** :—राधाबाई.

* **कृष्णाजी विनायक** (७) ज. नवसरी. श. १८०८ ज्ये. व. ३. शिक्षण नवसरीस मराठी चार इयत्ता झाल्यावर वडिलांची बदली कठोर येथें झाली. तेथें मराठी शाळा नसल्यामुळें गुजराथी शाळेंत २ वर्षें शिकून गुजराथी ७ वीची परीक्षा दिली. इंग्रजीच्या तीन इयत्ता घरीं शिकले. कठोरास इंग्रजी शाळा नसल्यामुळें बडोद्यास कै. रामचंद्र दिनकर फडके व कै. बाळकृष्ण परशुराम करंदीकर यांचे घरीं राहून तेथील हायस्कुलांत पुढील शिक्षण घेऊन सन १९०६ चे अखेरीस मॅट्रिक व स्कूलफायनलची परीक्षा दिली. हायस्कूलचे विद्यार्थ्यांत वरचा क्रमांक मिळाल्यामुळें बडोदें कॉलेजमध्यें शिष्यवृत्ति मिळाली. परंतु घरचे गरिबीमुळें कॉलेज शिक्षण घेणें शक्य झालें नाहीं व नोकरी पत्करणें भाग पडलें. १९०७ चे सुरुवातीस पुणें येथील मिलिटरी अकाउंटस् खातें व मुंबईचें कस्टमखातें यांतील प्रवेशपरीक्षा दिल्या. दोहोंत उत्तीर्ण झाल्यामुळें दोनहि ठिकाणीं नोकरी-वर बोलाविलें. पुण्यास कांहीं दिवस बिनपगारी उमेदवारी करावी लागणार असल्यामुळें मुंबईस कस्टमखात्यांत नोकरी पत्करली. वरील दोन परीक्षेचे निकाल लागेपर्यंत परळ येथील जी. आय्. पी. रेल्वेंत कॅरेज अँड वॅगन डिपार्टमेंटमध्यें रु. २० ची नोकरी ता. १४ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी

१९०७ म्हणजे ७ दिवस केली. कस्टम खात्यांत ता. २१ रोजीं कामावर रुजु होऊन २ जुलै १९०८ पर्यंत त्या खात्यांतील रिपोर्टर जनरलचे कचेरींत रु. २२–२४ पगारावर काम केलें. पुण्यास मिलिटरी अकाउन्टस डिपार्टमेंटमध्यें रु. ३० वर नेमणूक झाल्यामुळें कस्टमचे नोकरीचा राजीनामा दिला. स. १९१७ त सबॉर्डिनेट अकाउन्टस सर्व्हिसची परीक्षा उत्तीर्ण झाली व लगेच १।३।१९१७ ला अकाउंटंटची जागा (पगार ९०) मिळाली. वाढत



स. १९२७

इंदिराबाई. कृष्णाजी विनायक.
मांडीवर पद्मावती.

वाढत एप्रिल १९२० पासून पगार रु. ५००. स. १९२१ त मुंबईस ट्रेझर चेस्ट ऑफिसरचें काम केलें. पुण्याहून जानेवारी १९२७ त लाहोरला बदली झाली. तेथून रावळपिंडी, पेशावर वगैरे ठिकाणीं ग्याझेटेड ऑफिसरचें काम रु. ५८० पगारावर करून जाने. १९३३ त दृष्टि बिघडल्यामुळें पेन्शन घेतलें. पेन्शन रु. २५६॥–. मुर्डी येथील वडिलोपार्जित मिळकतीवरील आपला हक्क कांहीं एक मोबदला न घेतां दोघां बंधूंस दिला. सध्यां पुण्यांत स्वकष्टार्जित पैशानें विकत घेतलेल्या घरांत (घ. नं. २२३ अ सदाशिव पेठ.) वास्तव्य आहे. सार्वजनिक कामाची आवड आहे. मिलिटरी अकाउंटस् असोसिएशन स्थापन करण्यांत मुख्य पुढाकार यांचा होता. त्या संस्थेचे पहिलीं दोन वर्षें सेक्रेटरी होते व सध्यां उपाध्यक्ष आहेत. स. १९२५ त हिंदुस्थान सरकारच्या फायनॅन्स मेंबरकडे त्या संस्थेचें शिष्टमंडळ यांचे नेतृत्वाखालीं गेलें होतें. पुण्याच्या ब्राह्मण कार्यालयाचे पंचांपैकीं एक व कार्यवाह आहेत.

ऐतिहासिक स्थळें व तीर्थें पाहण्याची हौस असल्यामुळें सर्व हिंदुस्थानचा प्रवास व काश्मीरमधील अमरनाथाची यात्रा केली. भार्या (१) रुक्मिणी



स. १९३८

उभे :—१. नारायण विनायक, २. सुशीलाबाई, ३. सुरेश नारायण (कडेवर).
बसलेले :—१. कृष्णाजी विनायक, २. हृषीकेश कृष्ण, ३. जगदीश नारायण, ४. पद्मावती.

(गोजा), ज. श. १८१६ श्रावण व. २; मृ. श. १८३३ भाद्रपद व. २. ह्याचे वे. शा. संपन्न नारायण रामचंद्र दुगलांची दुसरी मुलगी. विवाह श. १८२५ ज्ये. व. ८. भार्या (२) रमा (अनसूया), ज. श. १८२१ माघ

श. ६; मृ. श. १८४३ कार्तिक व. ५; धारवाडचे गंगाधर बापूशास्त्री जोशी यांची ज्येष्ठ मुलगी. विवाह श. १८३४. भार्या (३) इंदिरा (गंगू), गुंजवणें येथील गोपाळ नारायण जोगदेव यांची ज्येष्ठ मुलगी. ज. श. १८२७ पौष व. १०; मृ. श. १८५१ ज्येष्ठ व. २. विवाह श. १८४४. हिचा पुत्र हृषीकेश. कन्या पद्मावती, ज. पुणें, श. १८४६ आश्विन शु. ३. इंग्रजी ४ थींत.

* **हृषीकेश कृष्ण** (८) ज. पुणें श. १८४८ श्रावण शु. ८. इंग्रजी ४ थींत.

* **नारायण विनायक** (७) ज. नवसरी श. १८२७ कार्तिक व. ५. पुणें येथें नवीन मराठी शाळा व न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मराठी व इंग्रजी शिक्षण झालें. फर्ग्युसन कॉलेजमधून इंटर सायन्स पास होऊन स. १९२७ त धनबाद येथील इंडियन स्कूल ऑफ माइन्स येथें जाऊन १९३१ त मायनिंगचा डिप्लोमा (A. I. S. M.) घेतला. दोन तीन खाणींवर असिस्टंट म्यानेजर, व मॅनेजरचें काम करून सध्यां बुलनबरारी कोलीयरी (झरीया, बिहार) मध्यें नोकरी आहे. पगार रु.१५०. भार्या सरला (सुशीला), पुण्याचे विष्णु यज्ञेश्वर चितळे यांची ज्येष्ठ मुलगी. ज. श. १८३९ वैशाख शु. ५. विवाह श. १८५४.

* **जगदीश नारायण** (८) ज. पुणें श. १८५५ कार्तिक शु. १५. बालवर्गांत.

* **सुरेश नारायण** (८) ज. पुणें श. १८५८. मार्गशीर्ष व. ४.

त्र्यंबक अनंत (५) ज. मुर्डी. मृ. मुर्डी श. १८१६, वयोमानाप्रमाणें. शिक्षण मराठी. धंदा शेती. हे बरींच वर्षें गांवधणी, तालुका दापोली येथें राहत असत. यांची बहीण त्या गांवचे मायदेव यांजकडे दिली होती. मायदेव यांचे भाऊबंद व आसपासचे गांवांतील कांहीं लोकांचे मनांतून विष्णुपंत मायदेव यांनीं त्या गांवीं राहूं नये असें असल्यामुळें त्यांचे घरावर दरोडे वगैरे पडत. म्हणून बहिणीस आधार म्हणून पांच भावांपैकीं एकजण त्या गांवीं जाऊन राहिले. ४० लोकांनीं दरोडा घातला असतां यांनीं धैर्यानें व युक्तीनें तो परतविला. भार्या लक्ष्मी, उंबर्लेच्या घांगुरड्यांकडील. कन्या दोन. एक भीमा, मुर्डीचे विष्णुभट रामकृष्ण विद्वांस (काशीकर) यांची पत्नी.

विष्णु त्र्यंबक (६) मृ. श. १८३४. शेती करीत.

शिवराम त्र्यंबक (६) ज. मुर्डी श. १७७६ ज्ये. शु. ३; मृ. मुर्डी स. १९२२; पोटांत पानथरी वाढल्यानें. शिक्षण घरगुती मराठी. खेडेगांवीं (गांवधणी) असल्यामुळें शाळेंतील शिक्षण नाहीं. मोठेपणीं नोकरीकरितां कानडी व गुजराथी भाषा शिकले. इंजिनिअर खात्यांत मिस्त्री, कारकून वगैरेसारखी हंगामी नोकरी पुणें, कर्नाटक, अहमदाबाद, पनवेल, ओरिसा,गोकाक, नातेंपुतें वगैरे ठिकाणीं केली. शाळेंतील शिक्षण व कोणाचा आधार नसतां स्वतःचे हिंमतीवर घराबाहेर पडून यांनीं नोकरी केली. भार्या नर्मदा(यमुना), आंजर्ल्याच्या परशुराम विष्णु जोश्यांची दुसरी मुलगी. कन्या(१)सीता(सरस्वती), ज. आंजर्लें श. १८२० अधिक आश्विन शु. ६. केळशीच्या गणेश महादेव जोश्यांची पत्नी.(२)शांता

(यमुना), ज. राजगोळी. श. १८२५ भाद्रपद शु. १४. उजगांवच्या बाळाजी कृष्ण वैद्यांची पत्नी. (३) कृष्णा (सावित्री), ज. पनवेल श. १८२९ कार्तिक व. ३०. वेळासच्या भास्कर हरी जोश्यांची पत्नी. (४) शकुंतला (यमुना), ज. मुर्डी, श. १८३४ श्रावण शु. ४. केळशीच्या गंगाधर परशुराम कोकण्यांची पत्नी. (५) द्रौपदी (शशिकला), ज. मुर्डी, श. १८४२ फाल्गुन व. २. पुण्याच्या विनायक चिंतामण गोखल्यांची पत्नी.



स. १९०६ स. १९३८

उभ्या :—१. नर्मदाबाई व कडेवर शांता.

बसलेले:—१. शिवराम त्र्यंबक, २. सीता, ३. पांडुरंग शिवराम.

* **पांडुरंग शिवराम** (७) ज. नातेंपुतें श. १८३७ आश्विन व. ३; शिक्षण मराठी ६ इयत्ता. पुण्यास खाजगी नोकरी आहे. पत्ता—३४३ शुक्रवार पेठ, पुणें.

केशव त्र्यंबक (६) ज. मुर्डी श. १७७८ माघ शु. ८; मृ. श. १८५१. शिक्षण घरगुती मराठी. वैद्यकीचें ज्ञान होतें. शेती करीत. हे अविवाहित होते. आयुष्याचे उत्तरार्धांत साधुवृत्तीनें राहात असत. आजारी मनुष्याच्या मृत्यूची वेळ अचूक सांगत.

बाळाजी अनंत (५) ज. मुर्डी श. १७३१ श्रावण वद्य ८; मृ. नवज्वर श. १८०३. शेती करीत. सरकार दरबारी कामकाजांत हुशार होते. भार्या (१) गंगा, खांबेटचांकडील. (२) गंगा, सोमणांकडील. विवाह श. १७८०. पुत्र गणपति.

* **गणेश बाळाजी** (६) ज. आंजर्लें. श. १७९० वैशाख. शेती करतात. भार्या राधा, दांडेकरांकडील. विवाह श. १८०१. कन्या (१) सीता, कोळथऱ्याच्या मोरेश्वर नारायण खांबेटयांची पत्नी. (२) यमुना, आंजर्ल्याच्या यशवंत

विनायक खांबेटयांची पत्नी. (३) भीमा, आंजर्ल्याच्या अनंत वासुदेव डोंगऱ्यांची (खरवळे) पत्नी. (४) सखू, केळशीच्या मनोहर रामकृष्ण विद्वांसांची पत्नी.

* **गोविंदशास्त्री गणेश** (७) ज. आंजर्लें श. १८१६ भाद्रपद. राजापूरच्या पाठशाळेंत संस्कृत शिक्षण झालें. शेती व खोती करतात. यांस सार्वजनिक कामाची हौस असून दापोली तालुका लोकलबोर्डाचे सभासद होते. प्रवचन करितात. स्थानिक चळवळींत यांचा पुढाकार असतो. भार्या जानकी, गणेश कृष्ण करंदीकरांची मुलगी. विवाह श. १८३४. कन्या (१) अंबू, वय १४. (२) काशी, वय ७. (३) सुंदरी, वय २.

* **अनंत गोविंद** (८) ज. श. १८४५. मराठी चौथींत.

* **दिनकर गोविंद** (८) ज. श. १८४८. मराठी तिसरींत.

* **नारायण गोविंद** (८) ज. श. १८५५.

* **वामन गणेश** (७) ज. आंजर्लें श. १८२९ श्रावण. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. मुंबई म्युनिसिपालिटींत आरोग्यखात्यांत नोकरी आहे. भार्या लक्ष्मी, जोश्यांकडील. विवाह श. १८५२. कन्या १.

रामाजी बल्लाळ (२) मुर्डी गांव पुनः वसला त्या वेळीं हे हयात होते. भट–पेंडसे वादांत यांजवर प्रतिपक्षांकडून देवस्थान पडलें व दोन वर्षें आजारी पडून मृत्यु पावले. यांची भार्या यांचेबरोबर सती गेली (ऐ. प्र. क्रमांक ३ व ९ पहा).

गणेश रामाजी (३) हे श. १६४० त त्र्यंबकेश्वर, नाशिक व सिद्धपूरला गेल्याचे दाखले मिळतात. तेथें गणेशपंत रामाजी असें नांव आढळतें.

घराणें १३ वें, चौक–पंचनदी

(वंशावळ पृ. १०० ते १०३)

या घराण्याचा मूळ पुरुष पिलदेव. हें घराणें गोळप, पावस, पंचनदी, श्रीवर्धन या भागांतून कुलाबा जिल्ह्यांतील कर्जत तालुक्यांतील चौक या गांवीं आलें. सध्यां यांचें वास्तव्य कल्याण, चौक, नाशिक, पुणें, बार्शी, बेलापूर, मिरज, मुंबई व दारेसलाम (आफ्रिका) या गांवीं आहे. याशिवाय पूर्वीं यांचें वास्तव्य इंदूर, चिखलगांव व तुपगांव या गांवीं असल्याचें आढळतें.

चौकचे ईशान्येस वरोसें म्हणून गांव आहे. तेथें जमिनीच्या खंडावर मणामागें एक अधोली खोती कर घेण्याचा पूर्वपरंपरागत हक्क महादेव रामचंद्र (४) यांचे वंशजांकडे आहे. मौजे तुपगांव येथील पोलिसपाटिलकी व मुलकीपाटिलकी अनंत हरी (४) यांचे वंशजांकडे आहे. गणेश कृष्ण (४) यांचे वंशांत पेण तालुक्यांतील पिंपळगांव व गागोदें येथील इनामाबद्दल नक्त नेमणूक अनुक्रमें

रुपये ९० व ३३; तसेंच बेलवाडें येथील सुमारें रुपये चारशें नेमणक आहे. किवळें येथील पेठ्यांचा बाग इंग्रज सरकारकडून यांस इनाम मिळाला आहे.

कुलस्वामी लक्ष्मीनारायण आहे. गुहागर येथील वाडेश्वर व तुपगांव येथील कमलजा देवी, जोगेश्वरी व माहेश्वरी देवी यांस नैवेद्य दाखवितात. शेवटच्या दोन देवता कोठें आहेत तें माहीत नाहीं. कार्तिक शु. १, मार्गशीर्ष शु. १ व होळी या दिवशीं कोंकणांतील देवांस नैवेद्य दाखवितात.

हें घराणें मुर्डी (१२) व वणोशी (२०) या घराण्यांत समाविष्ट होण्याचा संभव आहे. मुर्डी घराण्यांतील मूळ पुरुष बल्लाळ व त्याचे दोन पुत्र कृष्ण व रामचंद्र हे व या घराण्यांतील दुसरा पुरुष बल्लाळ व त्याचे दोन पुत्र कृष्ण व रामचंद्र हे एकच असावे. त्याचप्रमाणें वणोशी घराण्यांतील बल्लाळ (२) व या घराण्यांतील दुसरा पुरुष बल्लाळ हे एकच असावे. हें घराणें पंचनदी येथूनच चौक येथें आलें आहे त्यामुळें हें संभवतें.

या घराण्यांत पिढ्या ११, एकूण व्यक्ति १३७ व जिवंत व्यक्ति ५५ आहेत.

अनंत हरी (४) चौकची पोलिसपाटिलकी यांनीं मुसलमान पाटलाशीं भांडण-तंटा करून मिळविली.

सदाशिव अनंत (५) मृ. सुमारें स. १८३०. हे पेशवाईअखेर आकोळनेरकर जहागिरदार दाभोळकर यांजकडे दिवाण होते. हे नेहमीं नगरहून पुण्यास पायीं येऊन मुक्काम करून पहांटे चार वाजतां निघून खंडाळचाचे घाटांतून सायंकाळीं चौकास पोंचत असत. सहा फूट उंच, गोरे, धिप्पाड व विलक्षण धाडशी असत. मकराणी गार्दी यानें जंबियाचा वार करण्यास हात उचलला असतां यांनीं डाव्या हातानें त्याचें मनगट पकडून जोरानें दाबिलें व त्याचे रक्ताची चिळकांडी उडविली असें म्हणतात.

रावजी (विश्वनाथ) सदाशिव (६) मृ. स. १८५९. वय सुमारें ७०. पेशवाईचे अखेरीस बदलापूर, सुभा कल्याण येथें मामलेदार होते. स. १८१८ त इंग्रज सरकारनें पोलिटिकल कैदी म्हणून लोहगड क़िल्ल्यावर नजर कैदेंत ठेविलें. १८२० चे सुमारास सुटका करून ठाणें जिल्ह्याचे नायब दप्तरदाराची जागा दिली. स. १८५० मध्यें पेन्शनचे वेळीं नाशिक कलेक्टरचे मुख्य दफ्तरदार होते. पेन्शन रुपये १५० मिळे. भार्या मथुरा, जांभूळपाड्याच्या जोश्यांकडील.

बळवंतराव रावजी (विश्वनाथ) (७) ज. स. १८१९; मृ. स. १८८९. हे खानदेश, कुलाबा, पुणें वगैरे ठिकाणीं मामलेदार होते. यांना ज्योतिर्गणित चांगलें येत असे. पांच वर्षांचे पंचांगाचा फॉर्म यांनीं तयार करून पंचांग प्रसिद्ध केलें. या पंचांगांतील फलज्योतिषाचा भाग रहाळकर–जोशी नाशिक यांनीं केलेला आहे. नेत्रपल्लवी, करपल्लवी व आरशाचे कवडश्याची भाषा बसविली. 'अंकलिपी संक्षिप्त सौ. पिलुबाईची' हें पुस्तक यांनीं प्रसिद्ध केलें. यांनीं स. १८५० पासून मृत्यूपर्यंत स्वतःचे हातानें दैनंदिनी (रोजनिशी) लिहून ठेविली आहे. भार्या सरस्वती (बयो), करसोडेकर वैद्यांकडील. कन्या

(१) ताई, वाल्हयाच्या वासुदेवराव सोमणांची पत्नी. (२) दुर्गा, कृष्णराव विनायक शारंगपाणी, वरिष्ठ कोर्ट जज्ज बडोदें, यांची पत्नी.

सीताराम बळवंत (८) ज. स. १८४०; मृ. स. १९१०. सुखवस्तु. भार्या (१) सीता, विवाह स. १८५८ मांडवणेकर जोश्यांकडील. कन्या मनू, बदलापूरचे ओकांकडे दिली. भार्या (२) सगुणा, विवाह स. १८६७. परांजप्यांकडील. पुत्र विश्वनाथ. कन्या (१) सखू, कर्व्यांकडे; (२) भीमा, ज. श. सुमारें १८०२, इंदूरच्या कापश्यांकडे; (३) चंदू, ज. श. सुमारें १८०४, खऱ्यांकडे; (४) द्वारका, फणश्यांकडे; (५) नमू, ज. श. सुमारें १८०९. बी. पी. एन्. ए., लेडी नर्स, राजकोट. परांजप्यांकडे; (६) वारू, ज. श. सुमारें १८११, मिड-वाईफ बारामती, बर्व्यांकडे; (७) शिऊ, लेल्यांकडे दिली.

विश्वनाथ सीताराम (९) ज. स. १८७४; मृ. स. १९२२, हार्ट-डिसीज. मॅट्रिक. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसचे ऑफिसांत अकौंटंट होते. विनोदप्रिय स्वभाव. भार्या अंबू, विवाह स. १८९३, वय ५६, भटांकडील. कन्या (१) सुंदरा, ज. स. १९०२, स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची प्रीव्हिअस् पास, गोखल्यांकडे; (२) पुतळा, ज. स. १९०५. स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची प्रीव्हिअस् पास, खऱ्यांकडे; (३) दमयंती (चमू), ज. स. १९१०. बी. ए. (१९३३), गोखल्यांकडे दिली. पेंडसे कुळांतील मुंबई विश्वविद्यालयाच्या ह्या पहिल्या पदवीधर आहेत. (४) तारामती, ज. स. १९१३. जी. ए. पुणें. शिक्षकीण आहेत. स्त्रियांचे सार्व-जनिक कामांत भाग घेतात.

* **चिंतामणि (सुभाषचंद्र) विश्वनाथ** (१०) ज. महाड स. १८९९. बी. ए. (१९२१), एल्एल्. बी. (१९२२), वकील, पुणें. महाराष्ट्र वकील परि-षदेचे पहिले अधिवेशनाचे चिटणीस होते. साधा स्वभाव. डेक्कन जिमखान्यावर सरदेसाई यांचे बंगल्यांत राहतात. भार्या कमला (सरोजिनी), वय ३०, विवाह स. १९२५, साठ्यांकडील. कन्या (१) शैलबाला, ज. स. १९३१. (२) हेमबाला (हेमा), ज. स. १९३४.

* **रामचंद्र (शिवाजी) चिंतामणि** (११) ज. स. १९२७. इंग्रजी दुसरी.

* **प्रतापसिंह चिंतामणि** (११) ज. स. १९२८. इंग्रजी २ री.

* **अजितसिंह चिंतामणि** (११) ज. स. १९३२.

* **जयसिंह चिंतामणि** (११) ज. स. १९३५.

* **उदयसिंह चिंतामणि** (११) ज. स. १९३७.

* **महादेव (अण्णा) विश्वनाथ** (१०) ज. पुणें स. १९०८. बी. एस्सी. बार्शीस पोलिस सबइन्स्पेक्टर आहेत. खेळांची आवड आहे. टेनिस, पिंगपाँग व ब्रिज चँपियन आहेत. नूतन मराठी विद्यालयाच्या मुलांचे पार्लमेंटचे पहिले मुख्य प्रधान. भार्या सुमति, विवाह स. १९३७. मुरुडच्या कृष्णाजी शंकर दीक्षितांची मुलगी.

***विनायक (अप्पा) विश्वनाथ** (१०) ज. पुणें स. १९१७. पुण्यास एस्. पी. कॉलेजमध्यें बी. एस्सीचे वर्गांत आहेत. लेखनाची व वक्तृत्वाची आवड आहे. स्वतःचा मंगल बँड काढून उत्तम चालविला.

काशीनाथ (बाबासाहेब) बळवंत (८) ज. स. १८५०; मृ. स. १९१०. स. १८६७ त मॅट्रिकमध्यें जगन्नाथ शंकरशेटची संस्कृतची पहिली स्कॉलरशिप मिळाली. एल्फिन्स्टन कॉलेजमधून बी. ए. (१८७१). स. १८७२ त डेक्कन कॉलेजमध्यें फेलो. एम्. ए. (१८७३), भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृत स्कॉलर. फेलो असतांना संस्कृत, इंग्रजी व लॉजिक उत्तम शिकविण्याबद्दल यांची ख्याति होती. कृ. वि. शारंगपाणी, लोकमान्य टिळक, मनोहरपंत काथवटे, प्रो. धारप, इंदूरचे कौन्सिलर मुळे, वगैरे यांचे शिष्यवर्गांत होते. स. १८७२ त एकदम मामलेदाराची जागा मिळाली. स. १८७७ त पुण्यांत कमिशनरचे दफ्तरदार झाले. स. १८९७ पासून १९०६ त पेन्शन घेईपर्यंत नाशिकला सिटी मॅजिस्ट्रेट होते. नंतर पुण्यास येऊन राहिले. हे लोकमान्य टिळकांचे स्नेही होते. हे स्वतः सरकारी नोकरींत होते; तथापि 'स्वार्थरहित देशकार्यास वाहून घेतलेल्या पुरुषास प्रत्येक सरकारी व बिनसरकारी माणसानें मदत करणें हें त्याचें कर्तव्य आहे' असें हे म्हणत. टिळकांशीं स्नेहसंबंध ठेविल्यानें सरकारची आपणावर अवकृपा होईल असें यांनीं कधींहि मानलें नाहीं व स्नेह कायम ठेवून टिळकांस शक्य ती मदत केली. मंडालेहून येणाऱ्या टिळकांचे पत्रांत यांचा उल्लेख आढळतो. वेदांत विषयांवर यांचे लेख विविधज्ञानविस्तार व विश्ववृत्त नियतकालिकांत प्रसिद्ध झाले आहेत. भार्या लक्ष्मी, आपट्याच्या भालचंद्र गंगाधर वैशंपायनांची मुलगी. कन्या (१) साळू (सीता), रामचंद्र नारायण जोगळेकरांची पत्नी. (२) सीता, रामचंद्र भार्गव गाडगिळांची पत्नी. (३) आऊ (इंदिरा), वामन गोविंद कानिटकरांची पत्नी. (४) लक्ष्मी, मेजर जनरल गणपतराव रघुनाथ राजवाडे इन्स्पेक्टर जनरल आणि आर्मी मेंबर, ग्वाल्हेर स्टेट यांची पत्नी.

***पांडुरंग (तात्यासाहेब) काशीनाथ** (९) ज. स. १८८०. शिक्षण मॅट्रिकपर्यंत नूतन मराठी विद्यालय व पूना हायस्कूलमधून. डेक्कन कॉलेजांतून बी. ए. (१९०२); स. १९०२ ते १९०५ पर्यंत फेलो. एम्.ए. (१९०५). भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृत स्कॉलरशिप मिळविली; एल्एल्.बी. (१९०८). एल्एल्. एम्. (१९१०). ॲडव्होकेट (ओ.एस्.) (१९१३). स. १९१३ ते १९३५ पर्यंत मुंबईस प्रॅक्टिस करीत असत. सध्यां नाशिकास पंचवटींत लक्ष्मीबाग या नांवाचा बंगला बांधला आहे त्यांत राहतात. मुंबई युनिव्हर्सिटीचे मॅट्रिक, एल्एल्. बी. व एल्एल्. एम्. च्या परीक्षकाचें काम केलेलें आहे. मिताक्षराचें टीकेसहित इंग्रजींत भाषांतर होत आहे त्याचे मुख्य एडिटर आहेत. यांचा "ऋग्वेदसंबंधीं

कांहीं विचार" हा लेख चित्रमयजगत्‌मध्यें प्रसिद्ध झाला आहे. भार्या शर्मिष्ठा, बडोद्याच्या रघुनाथ महादेव केळकरांची मुलगी. कन्या (१) इंदुमति, ज. स. १९१५. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. (२) कमला, ज. स. १९१९, एल्फिन्स्टन कॉलेजांत इंटरचे वर्गांत.

* **बळवंत पांडुरंग** (१०) ज. स. १९०८ जानेवारी १. आर्यन एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूलमधून मॅट्रिक. विल्सन कॉलेजमधून एकॉनॉमिक्स विषय घेऊन बी. ए. (ऑनर्स) (१९३१). व सिडनहॅम् कॉलेजमधून बी. कॉम्. झाले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मुंबई शाखेंत नोकरी आहे. भार्या लक्ष्मी, भास्कर रावजी दीक्षित (वैशंपायन) यांची मुलगी.

कृष्णाजी काशीनाथ (९) ज. स. १८८४; मृ. स. १९०५. कॉलेजविद्यार्थी असतां मृत्यु.

अनंत सदाशिव (६) कन्या (१) सई, रेवदंडयाच्या वैद्यांकडे; (२) अंबा, भटांकडे दिली.

पांडुरंग अनंत (५) हे कवि होते. यांच्या कांहीं कविता यांचे वंशजांजवळ आहेत.

* **सखाराम दिनकर** (९) वय ४०. धुळ्यास जपान कॉटन कंपनीमध्यें नोकरी आहे. भार्या कर्जतच्या आठवल्यांकडील.

* **गोविंद दिनकर** (९) वय ३८. भिवंडीस सुखवस्तु राहतात.

* **विष्णु दिनकर** (९) वय ३५. शिक्षण मॅट्रिक. मिरजेस खाजगी नोकरी आहे.

* **दत्तात्रेय दिनकर** (९) वय २५. कल्याणास लोण्याचा व्यापार करितात.

* **दामोदर पांडुरंग** (९) वय ४०. मॅट्रिक. चौकास व्यापार करितात. भार्या लक्ष्मी (गोदू), पालीच्या केशव गोविंद करमरकरांची मुलगी. कन्या द्रौपदी, पुण्याच्या दामोदर गोविंद दातारांची पत्नी.

* **मोरेश्वर दामोदर** (१०) ज. स. १९२१, अ. वि. गृह, पुणें येथें इंग्रजी ५ वींत.

* **वासुदेव दामोदर** (१०) वय १५. इंग्रजी ४ थींत.

* **सदाशिव दामोदर** (१०) वय १३. मराठी ५ वींत.

* **दत्तात्रेय दामोदर** (१०) वय ११. इंग्रजी १ लींत.

* **रघुनाथ दामोदर** (१०) वय ८. मराठी ३ रींत.

* **मधुकर दामोदर** (१०) वय ५. बालवर्ग.

* **प्रभाकर दामोदर** (१०) वय १.

* **महादेव रामचंद्र** (९) वय ३०. मुंबईस नोकरी आहे.

* **मोरेश्वर महादेव** (१०)

अनंत भास्कर (७) भार्या अन्नपूर्णा.

विठ्ठल जनार्दन (६) हे संन्यास घेऊन नाशिकास १३ वर्षें होते. वयाच्या ७५ वे वर्षी श. १८०५ त समाधिस्थ जाहले.

* **शंकर (रावबा) गणेश** (८) ज. श. १७९७ माघ व. १. शिक्षण मॅट्रिक. चौकास

सुखवस्तु असतात. भार्या मैनावती, पटवर्धनांकडील.

* **गजानन शंकर** (९) ज. श. १८३६ वैशाख व. १३. मॅट्रिक. जी. डी. ए.; वेलापूरच्या साखर-कारखान्यांत नोकरी आहे.

* **विष्णु शंकर** (९) ज. चौक श. १८३८ भाद्रपद शु. ५.

* **दत्तात्रेय शंकर** (९) ज. श. १८४० फाल्गुन श. ११.

* **कृष्णाजी शंकर** (९)

* **रघुनाथ नारायण** (८)

विश्वनाथ हरी (४) हे स. १७६१ त घोडेस्वारांचे पथकांत होते व पानपतचे लढाईंत मारले गेले. वय अजमासें २५.

* **विष्णु भास्कर** (९) ज. श. १८१४. बी. ए. (१९१६); शिक्षक आहेत. पत्ता–१०५ शुक्रवार पेठ, पुणें. भार्या यमुना, ज. श. १८२०, पेणच्या मनोहरांकडील. कन्या (१) गोदू, ज. श. १८४८. मराठी चौथींत. (२) शांता, ज. श. १८५०. मराठी २ रींत.

* **मोरेश्वर विष्णु** (१०) ज. स. १९१७. मॅट्रिकचे वर्गांत, पुणें.


* **नारायण विष्णु** (१०) ज. श. १८४५. इंग्रजी ३ री, पुणें.



चिंतामणि त्र्यंबक

* **गोपाळ भास्कर** (९) ज. स. १८९६. बी. ए. (१९१९); एल्‌एल्. बी. (१९२२). पुण्यास वकील आहेत. पत्ता–४३५ नारायण पेठ. भार्या लक्ष्मी, आपट्यांकडील.

* **रघुनाथ गोपाळ** (१०)
* **विनायक गोपाळ** (१०)
* **प्रभाकर भास्कर** (९) ज. स. १९२०. इंग्रजी ५ वी, पुणें.
* **चिंतामणि भास्कर** (९) ज. श. १८४५. इंग्रजी २ री, पुणें.
त्र्यंबक मोरेश्वर (७) शिक्षण इंग्रजी ४. पुणें व बारामतीस नाझर होते. भार्या ठोसरांकडील.
चिंतामणि त्र्यंबक (८) मृ. प्लेग. शिक्षण इंग्रजी ६. इरिगेशन डिपार्टमेंटमध्यें नोकर होते. भार्या परांजप्यांकडील.
* **दिगंबर चिंतामणि** (९) ज. स. १९०७ डिसें. १४. मॅट्रिक. टांगानिका टेरिटरी,



दिगंबर चिंतामणि सुमतिबाई

पूर्व आफ्रिका येथें मिटिऑरॉलॉजिकल् खात्यांत नोकरी आहे. संगीत वाङ्मयाची आवड आहे. भार्या सुमति, विवाह स. १९३७. पुण्याच्या दत्तात्रय गणेश गाडगिळांची मुलगी.
* **एकनाथ बाळकृष्ण** (८)
दामोदर मोरेश्वर (७) मृ. वय ५२. शिक्षण मराठी. रेव्हेन्यू खात्यांत सर्कल इन्स्पेक्टर होते. भार्या भागीरथी, गोखल्यांकडील.
* **वासुदेव दामोदर** (८) ज. श. १८१० कार्तिक शु. ८. शिक्षण इंग्रजी. नीळकंठ फार्मसींत नोकरी आहे. पत्ता—६७५ सदाशिव पेठ, नव्या विष्णुजवळ, पुणें. भार्या (१) राधा, गोखल्यांकडील. पुत्र बाळकृष्ण. (२) राधा, करंदीकरांकडील. पुत्र वसंत. कन्या (१) शकुंतला, वय १०. (२) प्रभावती, वय ४. (३) सुमन, वय २.
* **बाळकृष्ण वासुदेव** (९) वय २३. मॅट्रिक. पुण्यास खाजगी नोकरी आहे.

* **वसंत वासुदेव** (९) वय ६. मराठी विद्यार्थी, पुणें.

दत्तात्रेय दामोदर (८) पुण्यास नोकरी होती.

रघुनाथ (राघो) महादेव (५) मृ. सुमारें स. १८३५. हे नाना फडणविसांचे विश्वासांतील कारकून होते. स. १८०० त नाना फडणविसांस पकडलें असतां त्यांचे घरचे कागद कोणाचे हातास लागूं नयेत म्हणून जाळून हे लोहगड किल्ल्यावर पळाले. यांस शिंद्यांनीं स. १७९८ त पकडून लष्करांत नेलें होतें (ऐ. प्र. क्रमांक २१, २२, २४ पहा). ऐतिहासिक उल्लेखांत यांचा 'राघोपंत' असा उल्लेख आहे; परंतु वडिलांचें नांव आढळत नाहीं. चौक येथील ऐकीव माहितीवरून राघोपंत म्हणजेच रघुनाथ महादेव असें दिसतें.

भिकाजी महादेव (८) ज. श. १७९३; मृ. श. १८२५. फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. (१८९४). पुष्कळ ठिकाणीं इंग्रजी शाळेचे हेडमास्तरचें काम केलें. सुगम सायन–निरयन वाद (स. १९०४) या नांवाचें पुस्तक लिहिलें. भार्या पार्वती, पुण्याच्या मराठ्यांकडील.

* **मुकुंद भिकाजी** (९) ज. श. १८१९. पुणें मिनर्व्हा टॉकीजमध्यें नोकरी आहे. हे वडिलांप्रमाणेंच सायन ज्योतिषी आहेत. पत्ता–६०९ सदाशिव पेठ, गद्रे यांचा वाडा. भार्या सत्यभामा, महाडच्या नरहर गोविंद पर्वत्यांची मुलगी. कन्या (१) शांता, वय ७. (२) सुमति, वय २.

* **वसंत मुकुंद** (१०) ज. श. १८५३, पुणें.

* **गोविंद मुकुंद** (१०) ज. श. १८५५, पुणें.

* **पुरुषोत्तम महादेव** (८) ज. श. १७९९. पोस्ट खात्यांतील पेन्शनर आहेत. सध्यां शेती करून चौक येथें असतात. नोकरी धारवाड जिल्ह्यांत ७ वर्षें, एडन–अरबस्थान १३ वर्षें व मुंबईस ८ वर्षें जाहली. भार्या लक्ष्मी, कराडचाच्या वैद्यांकडील.

* **रामचंद्र पुरुषोत्तम** (९) ज. श. १८२५. मुंबईस बी. बी. अँन्ड सी. आय्. रेल्वेच्या ऑडिट ऑफिसांत नोकरी आहे. भार्या अन्नपूर्णा, वसईच्या मराठ्यांकडील.

* **विश्वनाथ रामचंद्र** (१०) ज. श. १८५४, चौक.

* **लक्ष्मण पुरुषोत्तम** (९) ज. श. १८२९. बी. ए. (१९२९); एल्एल् बी. (१९३२). हायकोर्ट–प्लीडर असून मुंबईस चर्नीरोडजवळ सोमणबिल्डिंगमध्यें राहतात. भार्या सरस्वती, पेणच्या आगरकरांकडील.

* **माधव लक्ष्मण** (१०) ज. श. १८५७, मुंबई.

* **नरहरी पुरुषोत्तम** (९) ज. श. १८३६. पुणें, मॉडर्न हायस्कूलमधून मॅट्रिक. वास्तव्य चौक.

लक्ष्मण महादेव (५) नाना फडणवीस यांचे खातरजमेचे गृहस्थ म्हणून 'लक्ष्मणपंत पेंडसे' यांचा उल्लेख ऐ. ले. १०, ले. ५६०२ वगैरे ठिकाणीं आला आहे. परशुरामभाऊ पटवर्धन यांजकडे नानांकडून पत्र घेऊन गेले होते,

ते हेच असावेत. यांचे बंधु राघोपंत हेहि नानांचे अतिशय विश्वासांतील होते (ऐ. प्र. क्रमांक २३ पहा).

कृष्णाजी बल्लाळ (३) भार्या द्वारका.

गणेश कृष्ण (४) हे पेशवे दफ्तरांत पहिले बाजीरावाचे—किंबहुना बाळाजी विश्वनाथाचे—वेळेपासून महत्त्वाचे कामावर होते. हे स. १७५३ ते १७५५ पर्यंत राघोबादादा पेशवे यांजबरोबर उत्तर हिंदुस्थानचे स्वारींत होते. १८ ऑगस्ट स. १७५५ ला हे परत देशीं आले. हे भानूंचे हाताखालीं असून शिंद्यांकडील रामाजीपंत दाभोळकर यांचे ऋणानुबंधी होते. यांचीं २५–३० पत्रें उपलब्ध झालीं आहेत. तीं पाहिलीं म्हणजे हे मोठे मार्मिक लेखक असून स्पष्टवक्तेहि होते असें समजतें. काव्येतिहास संग्रह लेखांक १२२ चे लेखक हेच होत. यांचा उल्लेख पेशवे दफ्तर भाग २४, लेखांक १४९ मध्यें आला आहे (ऐ. प्र. क्रमांक ८ पहा). भार्या यमुना.

कृष्णाजी गणेश (५) हे पेशवे यांचे चालते दफ्तरांत स. १७७४ ते १७८८ या कालांत होते. यांस सालिना पगार ऐन रुपये ७००, सेवकार्थ रु. १२१ व १५० आंखांचें कापड मिळे. यावरून हे बरेच मोठे हुद्यावर होते असें दिसतें (सवाई माधवराव रोजनिशी ३–२०, २२, २९) (ऐ. प्र. क्रमांक १२ पहा).

गणेश कृष्ण ऊर्फ रावजी (६) ज. स. १७७२; मृ. स. १८६३ आक्टोबर २३. हे स. १७९७ त पेशवे दप्तरांत कारकून झाले व स्वतःची हुशारी व उद्योग यांचे जोरावर वाढत वाढत १८१२ पर्यंत फडणविसाचें मुख्य दुय्यम अधिकारी झाले. पेशवाई बुडाली त्या वेळीं हे दक्षिण कोंकणांत निघून गेले. दप्तरचा इतका माहितगार मनुष्य दुसरा कोणी नसल्यामुळें एल्फिन्स्टन साहेबानें यांस मे १८१८ त नोकरीवर बोलाविलें. हे १८१८ तील या साहेबाचे खानदेशाचे दौऱ्यांत बरोबर होते. सुरुवातीस यांस पगार रु. २०० दरमहा होता. तो पुढें रु. ३०० केला. नोकरी सोडल्यापासून सालिना रु. १२०० चें पेन्शनहि मिळावें असें ठरविलें. नोव्हेंबर स. १८२१ मध्यें यांचा त्या वेळचा एकुलता एक मुलगा वारल्यामुळें हे नोकरी सोडून काशीयात्रेस गेले त्या वेळीं यांस चॅप्लीन् साहेबानें मानाचा पोशाख दिला. यात्रेहून परत आल्यावर १८३१ मध्यें पेन्शनची याद दुरुस्त करण्यासाठीं कमिटीवर नेमिलें होतें. यांचें मन वळवून १८४७ मध्यें पुनः यांस नोकरीवर घेतलें. हे इनाम चौकशीचे कामावर होते. यांस पेशवेकालीन कागदपत्रांची पूर्ण माहिती असल्यामुळें खरे खोटे कागद ते ताबडतोब ओळखीत. तो काळ एक राज्य जाऊन दुसरें राज्य सुरू होण्याचा असल्यामुळें अनेक बनावट कागद, सनदा वगैरे तयार होऊन इंग्रज सरकारकडे येत. अशाच एका बनावट कागदाचे चौकशीच्या बाबतींत स. १८४६ मध्यें यांनीं दिलेली जबानी पेशवे दप्तर भाग ४१ ले. ३२२ मध्यें छापिली आहे. ती वाचिली असतां यांचें याविषयींचें ज्ञान किती मद्देसूद व

सूक्ष्म होतें हें सहज ध्यानांत येईल. यांचे शब्दास अशी किंमत असल्यामुळें यांनीं आपल्या बाजूनें निकाल द्यावा म्हणून किती सरदार दरकदार वगैरे लोक यांस प्रलोभनें दाखवीत असतील व यांनीं मनांत आणिलें असतें तर अपार संपत्ति कशी मिळविली असती याची कल्पना कोणासहि येईल. परंतु हा पुरुष इतका नेकीचा होता कीं, यानें एक पैहि कधीं कोणाजवळून घेतली नाहीं. उत्तर भाग, इनाम कमिशनरच्या १८ एप्रिल १८६० चे नं. ४७४ चे पत्रांतील खालील उतारा पाहून या पुरुषाबद्दल त्याचे वंशजांस अभिमान वाटणें कसें योग्य आहे हें ध्यानांत येईल.

"Few men have had the opportunities that he has had of making rapid fortunes, and fewer still of his school, who would have missed the chance, and the best proof of his integrity is, that though careful and frugal, Rawjee is comparatively speaking still not a rich man."

यांचे अमल्य सेवेबद्दल सरकारनें यांस किवळें येथील पेठ्यांची बाग (आकार रु. १२१) स.१८६१ मध्यें वंशपरंपरा इनाम दिली (हिंदु. सरकारचा हुकूम नं. ६५७, ता. २८।३।१८६१). पेशवे शकावली सन १७६१ पर्यंत आहे ती यांनीं तयार केली (राजवाडे खं. २) (ऐ. प्र. क्रमांक १२ व ३७ पहा). दापोली तालुक्यांतील कांगवई गांवचा खोती हक्क यांनीं खरेदी केला. यांचे घराण्यांत पिंपळगांव खुर्द, गागोदें व वेळवंड खुर्द येथील अनुक्रमें रु. ३६ व रु. ९० ची नक्त नेमणूक व रु. ४०० चें इनाम चालू आहे. २६ आक्टोबर १८६३ चे ज्ञानप्रकाशांत यांचा मृत्युलेख खालीलप्रमाणें आहे. "हे प्रसिद्ध जुनाट गृहस्थ. ह्यांनीं संन्यास नुकताच घेतला होता."

माधव गणेश उर्फ बाबा (७) ज. स. १८२१ नंतर; मृ. १८८७ ऑगस्ट. हे आपले वडिलांप्रमाणें पेशवे दप्तरांत कारकून होते. स. १८५१–५९ पर्यंतचे कांहीं कागदपत्रांत चांगलें काम करणारे गृहस्थ म्हणून यांचा उल्लेख आढळतो. यांचे मृत्यनंतर यांचा मृत्युलेख केसरींत आला, त्यांत "पेशवाई कारकीर्दी-तील यांना असलेली माहिती आज आम्हांस नाहींशीच झाली" असें लिहिलें आहे. यावरून त्या काळीं यांचें महत्त्व काय होतें हें समजतें. शिवकाव्य परिशिष्ट पृ. १२३ वर यांचेबद्दलचा उल्लेख "पुण्यांतील बहुश्रुत व वृद्ध गृहस्थ. यांस पेशवे दफ्तरची चांगली माहिती होती. यांनीं पुरुषोत्तम कविकृत संस्कृत शिवकाव्य २३ चमत्कारांचें पाहून परत केलें होतें." राजवाडे खं. १२ ले. ३६९ त यांचा उल्लेख आहे.

वासुदेव माधव (८) भार्या लक्ष्मी.

कृष्णाजी माधव(८)मृ. स. १८९०. हे पुण्यास सुखवस्तु असत. यांचे मृत्यूनंतर यांचे पत्नीनें पुत्र दत्तक घेतला, भार्या राधा, पंढरपूरच्या काशीनाथपंत

दात्यांची मुलगी. कन्या (१) पिलुबाई, पुण्याच्या नरहर कृष्ण पटवर्धनांची पत्नी. (२) माई, पुण्याच्या गोविंद विसाजी गोडबोल्यांची पत्नी. (३) काशी, ज. श. १८११ मार्गशीर्ष, शेंदुर्णीचे जहागिरदार व सातारचे कलेक्टर माधवराव जगन्नाथ दीक्षित (पाटणकर) यांची पत्नी.

* **सदाशिव कृष्ण** (९) ज. श. १८१० मार्गशीर्ष व. ८. शिक्षण बी. ए. पर्यंत. पुण्यास यांचें व्यायामोपयोगी सामानाचें दुकान असून शिवाय हे डेक्कन टॉकीज चालवितात. बुधवार पेठेंत घर नं. ६८६ या वडिलार्जित घरांत राहतात. हे दत्तक आले. मूळचें नांव विश्वनाथ गोविंद जोशी, राहणार गोळप. भार्या अन्नपूर्णा (गंगा), ज. श. १८१८ आषाढ व. ३०. सांगलीचे प्रो. गणेश रघुनाथ अभ्यंकर, वकील, यांची मुलगी. कन्या (१) लीलावती (लक्ष्मी), ज. स. १९१३ जुलै २०. मुंबईच्या जगन्नाथ गणेश परांजप्यांची पत्नी. (२) मालती (मनोरमा), ज. श. १८३८ वैशाख व. २. कोल्हापूरचे सराफ वासुदेव महादजी करमरकर यांची पत्नी. (३) शकुंतला, ज.श. १८४१ भाद्र. व. ३०. इंग्रजी ७ वींत. (४) माणिक, ज. स. १९२१ आक्टो. १०. इंग्रजी ७ वींत. (५) कुसुम, ज. स. १९२४ जाने. ६. इंग्रजी ३ रींत.

* **माधव सदाशिव ऊर्फ रावसाहेब** (१०) ज. श. १८४८ वै. शु. १२. इंग्रजी ३ री

* **यशवंत सदाशिव** (१०) ज. श. १८५० पौष शु. ४. मराठी ४ थींत. पुणें.

अण्णाजी माधव (८) भार्या सरस्वती.

घराणें १४ वें, मेटें

(वंशावळ पृ. १०४ ते ११७)

सामान्य माहिती

मेटें हें गांव कोंकणांतील रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यांतील आहे. चिपळूणजवळील प्रसिद्ध परशुरामक्षेत्रापासून हें गांव जवळ आहे. या गांवचे वस्ती-शेजारीं अगदीं जवळ आयनी (आंजणी) गांवची वस्ती आहे. ती इतकी जवळ आहे कीं, जणूं काय हीं दोन गांवें नसून एकच गांव असावें असें वाटतें. यामुळें या गांवास नुसतें मेटें न म्हणतां आयनी–मेटें या जोड नांवानें ओळखितात. या गांवास पोस्ट आयनी आहे. मेटें व आयनी हीं दोन्ही खेडचे खाडीवर बंदरें आहेत. जलमार्गानें मेटें येथें जाण्यास आयनी बंदर विशेष सोयीचें आहे. खेड–चिपळूण मोटार रस्त्यापासून आंत ४ मैलांवर मेटें आहे. गांवची वसाहत डोंगरांत आहे. गांवांत फारशा विहिरी नाहींत. आयनी व मेटें यांमध्यें एक लहान नदी आहे. तिचें

पाणी पाटानें दोन्ही गांवांत खेळविलें आहे. घरासभोंवतीं असणाऱ्या लहान परसांतील नारळी, पोफळी व फुलझाडें यांस हेंच पाणी देतात. येथील हवा साधारणतः उत्तम असून विशेषतः उन्हाळयांत आल्हादकारक असते. गांवांत पेंडसे, दामले, रिसबूड, पिंगळे, भट, वैद्य, ओक व जोगळेकर या ब्राह्मण घराण्यांची वस्ती आहे. त्यांत पेंडसे बहुसंख्य आहेत.

गांवांत ५ देवालयें आहेत. (१) **सोमेश्वर.** हें शंकराचें स्वयंभू स्थान आहे. हें देऊळ फार प्राचीन काळचें आहे. नित्यपूजा गुरव करितो. गांवांतील प्रत्येक घरीं रोज सोमेश्वरास नैवेद्य असतो. गुरव येऊन तो घेऊन जातो. श्रावणमासीं रुद्राभिषेक व ब्राह्मणभोजन होतें. (२) **झोलाई–मानाई.** ही ग्रामदेवता आहे. ह्या देवतेचें देऊळ सोमेश्वराजवळ आहे. गांवकीसंबंधीं सर्व कामें येथेंच चालतात व गांवांतील सर्व हिंदूंना येथें योग्य मानपान मिळतो. (३) **मुरलीधर.** याचें मंदिर दामल्यांनीं बांधिलें. देवाची पूजा, उत्सव वगैरे खर्चास त्यांनीं शेताचें उत्पन्न लावून दिलें आहे. देवाची सर्व व्यवस्था त्यांजकडून बिनचूक व शिस्तीनें चालते. (४) **गणपति.** हें मंदिर रिसबूड यांनीं बांधिलें. या देवाचा वार्षिक उत्सव मेटें येथील ग्रामस्थ करितात. भोजनास आयनीचे लोकहि असतात. रिसबुडांनीं देवाचे नित्यपूजेसाठीं एक शेत लावून दिलें आहे. त्या शेताची वहिवाट एक पेंडसे करितात व नित्य देवाची पूजा करितात. दामले यांजकडून उत्सवास वार्षिक मदत होते. (५) **मारुति.** हें देवालय सोमेश्वराजवळ असून वामन विश्वनाथ पेंडसे यांनीं बांधलें.

या घराण्याचा मूळ पुरुष नारायण. कोंकणांतील मूळगांव मेटें. या घराण्याचें वास्तव्य या गांवीं शक १६०० पासून असल्याचें आढळतें. घाटावरून सह्याद्रि उतरून बांदरपट्टा म्हणून कोंकणच्या भागांत हें घराणें गेलें. असें म्हणतात कीं, भोसले यांनीं ज्या वेळीं हा बांदरपट्टा (सह्याद्रीचें खोरें) आपले ताब्यांत घेतला, त्या वेळीं त्यांचा अंमल तेथील ८७ गांवांवर होता. पेंडसे हे भोसल्यांनीं उपाध्ये म्हणून बरोबर आणिले. भोसल्यांचे उपाध्ये म्हणून किंवा इतर कोणते तरी कारणानें या ८७ गांवांची जोशी, उपाध्ये व धर्माधिकाऱ्याची वृत्ति तेव्हांपासून पेंडश्यांकडे होती. त्या वेळीं पेंडसे शिरगांव (सांतगांव) बांदर येथें राहात. तेथें त्यांचे घराचा चौथरा अद्यापि दाखवितात. तेथून ते घाणेखुंट, सांत्वीणगांव व नंतर मेटें येथें राहावयास गेले. पुढें पेंडसे कुळांतील एक मुलगी परशुरामक्षेत्रांतील चितळे यांचे कुळांत दिली; व त्या मुलीस आंदण म्हणून ८७ पैकीं ४० गांवांची वृत्ति दिली. पुढें कोणी जोशी उपनांवाच्या गृहस्थानें जोसपणाबद्दल २० गांव बळकाविले, त्यामुळें तेथील उपाध्ये व धर्माधिकारी ही वृत्तीहि कालांतरानें नाहींशी झाली. बाकी राहिलेले २७ गांव अद्यापि या घराण्यांत चालू आहेत. मेटयाहून या घराण्याची मंडळी रत्नागिरी जिल्हयांत खेड, वेरळ, आंबिवली, खोपी, मंडणगड वगैरे ठिकाणीं गेली.

सध्यां या घराण्यांतील मंडळींचें वास्तव्य महाराष्ट्रांत–अहमदनगर, इचल-

करंजी, एरंडोल, कुर्ला, जत, तारळें, दादर, दापोली, धुळें, नांदगांव, नाशिक, पारोळें, पुणें, बेळगांव, भुसावळ, मुंबई, मुरुड (जंजिरा), मोर्डलिंब, मंडणगड, सोलापूर; वऱ्हाड–मध्यप्रांतांत उमरावती, नागपूर, हिंगणघाट व इतर प्रांतांत–अलाहाबाद, अहमदाबाद, कराची, ग्वाल्हेर, जोरार (रांची), व बडनगर येथें आहे. कागदोपत्रीं उल्लेखावरून कऱ्हाड, कसारा, खेडें, टेंभुर्णी, नेवरें, परशुराम, बडोदें, बिरवाडी (महाड), ब्रह्मावर्त, भादरण, माणगांव व हरिहरेश्वर या गांवींहि यांचें वास्तव्य पूर्वी झाल्याचें आढळतें.

या घराण्यांतील मंडळींना २७ गांवांची जोशीपणाची वृत्ति आहे. याशिवाय तारळें येथील कूटाला बडोदें संस्थानांतून तारळें येथील महाडिकांचे उपाध्याय म्हणून सालिना नक्त नेमणूक मिळत आहे.

कुलस्वामिनी :—बहिरी जो(यो)गेश्वरी. याशिवाय मेटें येथील सोमेश्वर, झोलाई-माला (ना) ई, दाभोळ येथील मल्लिकार्जुन, क्षेत्र परशुराम येथील भार्गवराम, खेड येथील खेडजाई व जाखमाता, केदार, सप्तेश्वर, वाघजाई, रेडजाई, चाळकोबा या स्थानपरत्वें असणाऱ्या ग्रामदेवतांनाहि मानितात. यांशिवाय ब्रह्मावर्ताकडे गेलेल्या कांहीं मंडळींनीं आपल्या पूर्वजांना गंगेमध्यें सांपडलेलें व्यंकटेश हें अधिक कुलदैवत मानिलें आहे. तसेंच या घराण्यांतील कांहींनीं देशावर आल्यावर जेजुरीचा खंडोबा, कोल्हापूरची महालक्ष्मी यांचाहि संग्रह केला आहे. वरील देवतांना देवदिवाळी, दसरा, श्रावणी पौर्णिमा, शिमगी पौर्णिमा या दिवशीं नैवेद्य घालतात. आश्विनांतील नवरात्रांत अखंड दीप, माळ, उठती बसती सुवासिनी सांगतात. बारसें, लग्न, मुंज इत्यादि मंगलकार्यांत बोडण भरतात. ब्रह्मावर्ताकडील मंडळींमध्यें बालाजीचें नवरात्र आश्विनांत असतें.

इ. स. १७८१ मध्यें असलेल्या लोकांची एक यादी पेशवे दप्तरांत श्री. गोपाळराव आचवल यांचे पाहण्यांत आली. त्यांत खालील व्यक्ति त्यांचें नांवांसमोर दाखविलेल्या गांवीं असल्याचा उल्लेख आहे.

रामभट–मेटें : हे रामभट गोविंद (४) असावेत.
लक्ष्मणभट–मेटें : हे लक्ष्मण केशव (५) असावेत.
भास्करभट–आयनी : हे भास्कर बाळंभट (५) असावेत.
नारायणभट–खेड : हे नारायण परशुराम (५) असावेत.
गणेशभट–घाणेखुंट : हे गणेश परशुराम (५) असावेत.

या घराण्यांतील पिढ्या १२, एकूण व्यक्ति ४४० व जिवंत व्यक्ति १६४ आहेत.

रामभट गोविंद (४) भार्या अन्नपूर्णा. हे स. १७८१ त मेटें येथें होते.

चिंतामणि रामभट (५) भार्या गंगा.

विष्णु चिंतामणि (६) हे श. १७३२ च्या सुमारास चोर–पेंढाऱ्यांच्या उपद्रवास कंटाळून काशीस जाऊन संन्यास घेऊन राहिले. पुढें सुमारें ४० वर्षें हे विद्यमान होते. भार्या लक्ष्मी.

विठ्ठल विष्णु (७) भार्या पार्वती.

चिंतामणि विठ्ठल (८) मृ. श. १७९४, वय ५०. हे अलीबागच्या आंग्र्यांचे आश्रित असून सरकारी शाळेंत शिक्षक होते. यांना ज्योतिष, गणित व रमलगणित यांची चांगली माहिती होती. भार्या जानकी, जोश्यांकडील. कन्या (१) मथुरा, ब्रिवलीच्या अनंतभट थत्त्यांची पत्नी. (२) कृष्णा (रमा), आंजणीच्या श्रीधर विश्वनाथ कान्हेऱ्यांची पत्नी. (३) साठ्यांकडे दिली.

* **विष्णु चिंतामणि** (९) वय ७६. पुराण सांगत. कीर्तन करीत. सध्यां मेटें येथें असतात. वैद्यकीची आवड आहे. भार्या लक्ष्मी, अंजनवेलचे बाळकृष्णपंत सहस्रबुद्धे यांची मुलगी. कन्या (१) सुंदरा, कारोळ्याचे गोविंद कृष्ण केळकर, शिक्षक यांची पत्नी. (२) नर्मदा, साखरप्याच्या केशवराव अभ्यंकरांची पत्नी.

* **नरहरी विष्णु** (१०) हे डभोईस बद्रिनारायण–पाठशाळेंत अध्यापक आहेत. यांनीं काशीस राहून संस्कृतचें अध्ययन केलें आहे. कन्या सुमति.

* **चिंतामणि नरहरी** (११) वास्तव्य डभोई.

* **सुधाकर नरहरी** (११) वास्तव्य डभोई.

* **श्रीपाद विष्णु** (१०) वास्तव्य मेटें.

यज्ञेश्वर चिंतामणि (६) भार्या भागीरथी.

रामभट यज्ञेश्वर (७) हे वैदिक होते. बडोद्यास श्रावणमास परीक्षेंत यांना शालजोडी मिळाली होती.

* **पांडुरंग रामभट** (८) ज. श. १८०१ वैशाख व. ७. हे निजाम स्टेटमध्यें शिक्षक होते. सध्यां पेन्शनर असून औंढा (नागनाथ) येथें राहतात. पूर्वी खंडोबाचें सातारें, मग जालना व नंतर परभणी जिल्ह्यांत यांची वस्ती होती. भार्या रुक्मिणी, वझ्यांकडील.

* **दामोदर पांडुरंग** (९) वय २२. औरंगाबादेस हायस्कुलांत मॅट्रिकचे वर्गांत शिकत आहे.

गणेश यज्ञेश्वर (७) भार्या राधा.

बाळ यज्ञेश्वर (७) दत्तक गेले. नंतरचें नांव कृष्णाजी काशीनाथ ऊर्फ बाळ पेंडसे.

बाळंभट रामभट (५) भार्या उमा.

जनार्दन बाळंभट (६) भार्या लक्ष्मी.

कृष्णाजी रामभट (५) भार्या जिऊबाई.

काशीनाथ कृष्ण (६) भार्या यशोदा.

कृष्णाजी काशीनाथ ऊर्फ बाळ (७) हे दत्तक आले. यांचें मूळचें नांव बाळाजी यज्ञेश्वर.

रावजी कृष्ण (६) दत्तक गेले.

परशुराम अनंत (४) भार्या आनंदी.

गोविंद वासुदेव ऊर्फ बगंभट (६) भार्या मुक्ताबाई.

जगन्नाथ गोविंद (७) भार्या सत्यभामा. कन्या कुसाबाई, दामल्यांकडे दिली.

विठ्ठल गोविंद (७) हे स. १८४० त सातारा कोर्टांत वकिली करीत असत. कन्या भागीरथी, बाळाजी नारायण चितळ्यांची पत्नी.

वासुदेव विठ्ठल (८) मृ. स. १९०४, वय ७५. जी. आय. पी. रेल्वेंत गुड्स्-क्लार्क होते. भार्या लक्ष्मी (अन्नपूर्णा), नागांवच्या परांजप्यांकडील. कन्या (१) धाकू (लक्ष्मी), बिलासपूरचे अनंतराव गाडगीळ, मालगुजार यांची पत्नी. (२) काशी (लक्ष्मी), बापूराव सोमणांची पत्नी. (३) नर्मदा, आंध्र ब्राह्मण नृसिंह तिम्मराज यांची पत्नी.

बळवंत वासुदेव (९) मृ. स. १९३५, वय ७०. जी. आय्. पी. रेल्वेंत डी. डी. एस्. ऑफिसांत नोकरी होती. भार्या लक्ष्मी (धोंडी), देवलांकडील. कन्या (१) मथुरा, त्र्यंबक गंगाधर साठ्यांची पत्नी. (२) द्वारका, मृ. स. १९००, परांजप्यांकडे दिली.

* **भास्कर बळवंत** (१०) ज. स. १८८७. भुसावळेस जी. आय्. पी. रेल्वेंत डी. टी. एस्. च्या ऑफिसांत नोकरी आहे. भार्या (१) अन्नपूर्णा, करंदीकरांकडील. भार्या (२) सखू, करंदीकरांकडील. भार्या (३) उमा, जोगदेवांकडील.

रामचंद्र बळवंत (१०) जी. आय्. पी. रेल्वेंत तिकीट कलेक्टर होते. भार्या जानकी, दाभोळचे परांजप्यांकडील.

वामन रामचंद्र (११) ज. स. सुमारें १९२४; मृ. स. १९३२. पोहतांना पाण्यांत बुडून मृत्य.

लक्ष्मण बळवंत (१०) ज. स. सुमारें १९०६; मृ. स. १९३१. सातारा आर्यांग्ल-वैद्यक-पाठशाळेंतील आयुर्वेदतीर्थ व कलकत्ता होमिओपाथिक कॉलेज-मधील एल्. एच्. एम्. एस्. होते. हाडें बसविण्याचें शास्त्रहि शिकलें होते. हें सर्व शिक्षण असहकारितेच्या चळवळींत शाळा सोडल्यावर झालें होतें. दादर येथें खाजगी दवाखाना चालवीत असत. यांच्या मोटारसायकलची व ट्रामची टक्कर झाल्यामुळें अपघातानें मृत्यु. यांचे स्मरणार्थ एलिचपुरास एक सार्व-जनिक विहीर बांधली आहे.

चिंतामणि वासुदेव (९) ज. खांडवा स. १८७०; मृ. विषमज्वर स. १९०५. नागपुरास गव्हर्नमेंट टेलिग्राफ ऑफिसांत टेलिग्राफ मास्तर होते. ज्योतिषाचा नाद होता. भार्या आनंदी, गुहागरच्या बळवंत हरी फाटकांची मुलगी. कन्या (१) श्यामा (लक्ष्मी), ज. नांदगांव. स. १८९०; मृ. स. १९०७. अको-ल्याच्या वासुदेवराव गोखल्यांची पत्नी. (२) सुंदरा (नर्मदा), ज. नांदगांव स. १८९३; मृ. स. १९२३. भाइंदरच्या शंकर हरी गोखल्यांची पत्नी. (३) माणिक (लक्ष्मी), ज. नांदगांव स. १९०२. दत्तात्रेय गणेश साठ्यांची पत्नी.

* **नारायण चिंतामणि** (१०) ज. अकोला स. १९०५. फर्ग्युसन कॉलेजमधून बी. एस्सी.; व नागपूरच्या लॉ कॉलेजमधून एल्एल्. बी.; हिंगणघाट येथें वकिली

करितात. भार्या उषा, विवाह स. १९३१, उमरावतीच्या लिमयांकडील. कन्या हेमलता, ज. नागपूर स. १९३४.

***चंद्रकान्त नारायण** (११) ज. नागपूर स. १९३२. प्राथमिक विद्यार्थी.

***सुरेश नारायण** (११) ज. नाशिक स. १९३६.

***मोरेश्वर वासुदेव** (९) ज. खामगांव वय ५५. प्रथम जी. आय्. पी. रेल्वेंत कोचिंग क्लार्क होते. नंतर किराणा मालाचें दुकान. पुढें विमा एजंट व त्यानंतर रेल्वेंत नोकरी व कांहीं दिवस स्टेशनरी दुकान. सध्यां पुण्यास घर नं. ५३६, शनिवार पेठ येथें सुखवस्तु. भार्या (१) रमा. `ार्या (२) रमा, आपटयांकडील. भार्या (३) मथुरा (पुर्नविवाहित), पटवर्धनांकडील.

***हरी मोरेश्वर** (१०) ज. सांगली स. १९१५. बालमोहन संगीत नाटक कंपनींत नट आहेत.

***अनंत मोरेश्वर** (१०) वय १४. मोडलिंबास उमा विद्यालयांत इंग्रजी ३ रींत आहेत.

भास्कर वासुदेव (६) भार्या यमुना.

नारायण गोपाळ (७) कन्या बयो, नगरच्या विठ्ठलराव गोखल्यांची पत्नी.

महेश्वर नारायण (८) ज. स. १८६९. थर्ड इयर ट्रेंड. पालशेतला मराठी शाळेचे हेडमास्तर होते. भार्या गिरिजा.

रामचंद्र वासुदेव (६) भार्या जानकी.

जनार्दन वासुदेव (६) भार्या भागीरथी. कन्या मेटचाच्या शंकरराव दामल्यांची पत्नी.

विष्णु जनार्दन (७) ज. स. १८०८; मृ. स. १८८८. खोती व शेती करीत. भार्या (१) राधा. पुत्र बळवंत व वामन. भार्या (२) राधा, ज. स. १८२८; मृ.स. १८९८. गिम्हवण्याच्या परांजप्यांची मुलगी. कन्या (१) द्रौपदी, ज. स. १८४७; मृ. स. १९३५. सुसेरीच्या वासुदेव मोरेश्वर बव्र्यांची पत्नी. (२) गोदू, ज. स. १८६२; मृ. स. १९३७. सवणसच्या महादेव गोपाळ केळकरांची पत्नी. (३) वालू, रावतळचाच्या गोविंदराव परांजप्यांची पत्नी. पुत्र जनार्दन व गणेश.

वामन विष्णु (८) भार्या रमा, सखाराम महादेव बर्वे यांची मुलगी. कन्या बयो, ज. श. १७८५. पोसऱ्याचे बगंभट सोमण यांची पत्नी.

***दामोदर वामन** (९) ज. श. १७९०. नोकरी होती. सध्यां खेडास सुखवस्तु आहेत. भार्या आनंदी, वासुदेव मोरो दारशेतकरांची मुलगी. कन्या काशी, ज श. १८२५, सुसेरीच्या विष्णु पांडुरंग साठ्यांची पत्नी.

***शंकर दामोदर** (१०) ज. स. १८९७. प्राथमिक शिक्षण महाराष्ट्रांत झाल्यावर काशी, कलकत्ता, दिल्ली, लाहोर वगैरे ठिकाणीं संस्कृत व इंग्रजी शिक्षण झालें. एम्. ए.; एम्. ओ. एल्. असून कलकत्त्याची वेदान्ततीर्थ व पंजाबची शास्त्री

ही पदवी मिळविली आहे. अमळनेरच्या फिलॉसॉफिकल इन्स्टिटयूटमध्यें शांकर तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास' हें पुस्तक यांनीं लिहिलें आहे. नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांत गेलीं १० वर्षें अध्यापक आहेत. नियतकालिकांतून यांचे लेख येत असतात. पत्ता–काँग्रेसनगर, नागपूर. भार्या मालती, ज. श. १८३०. केसरीचे मॅनेजर धोंडो वासुदेव विद्वांसांची मुलगी.



प्रो. शंकर दामोदर

* **बळवंत शंकर** (११) ज. स. १९२६. विद्यार्थी, नागपूर.

* **केशव शंकर** (११) ज. स. १९३२.

जनार्दन विष्णु (८) ज. स. १८४८; मृ. स. १९३३. शेती करीत. अविवाहित.

गणेश विष्णु (८) ज. स. १८६८; मृ. स. १९१८. मराठी शिक्षक. सेकंड इयर ट्रेंड. भार्या यमुना (बगी), ज. स. १८७७; मृ. स. १९१२. तळयाच्या बल्लाळ दामल्यांची मुलगी. कन्या द्रौपदी, ज. स. १९०६; मृ. स. १९१९. आयनीच्या विनायक रामचंद्र बेडेकरांची पत्नी.

* **गोविंद गणेश** (९) वय ४०. पुणें म्युनिसिपालिटींत सर्व्हेअर आहेत. पत्ता–७६८ सदाशिव पेठ. भार्या (१) लक्ष्मी, बोरघरच्या वासुदेवराव मोडकांची मुलगी. भार्या (२) लक्ष्मी (अंबू), रावतळयाच्या गोविंद सखाराम देवधरांची मुलगी. कन्या सुमीला, ज. स. १९३४.

* **विष्णु गोविंद** (१०) वय ८. मराठी ३ री.

* **दत्तात्रेय गोविंद** (१०) वय ५.

* **प्रभाकर गोविंद** (१०) वय १.

* **हरी गणेश** (९) ज. स. १९००. मंडणगड पेटयांत तलाठी आहेत. भार्या राधा (काशी), ज. स. १९०८. सुशेरीच्या पुरुषोत्तम प्रभाकर साठयांची मुलगी. कन्या (१) कमळी, ज. स. १९२४. (२) बनी, ज. स. १९२६. (३) मालती, ज. स. १९२८. (४) इंदु, ज. स. १९३४. (५) कुसुम, ज. स. १९३६.

* **गणेश हरी** (१०) ज. स. १९३२.

* **पांडुरंग गणेश** (९) ज. स. १९०२. खेडास पेंटर असून पेट्रोल कंपनींत नोकर आहेत. भार्या रखुमाई (भिकू), ज. स. १९१३. कोतवलीच्या पुरुषोत्तम चिंतामण बेडेकरांची मुलगी. कन्या (१) शांती, ज. स. १९३०; (२) विमल, ज. स. १९३४.

* **विनायक पांडुरंग** (१०) ज. स. १९३२.

* **श्रीराम पांडुरंग** (१०) ज. स. १९३७.

रघुनाथ जनार्दन (७) भार्या सीता. कन्या (१) बयो, मुरुडच्या विठोबा दातारांची पत्नी. (२) सखू, केळशीच्या विद्वांसांकडे दिली.

जयराम रघुनाथ (८) ज. स. १८५८; मृ. स. १९१८. शेती व खोती करीत. भार्या राधा, ज. स. १८७८; मृ. स. १९२९. कन्या (१) चंद्री, पागच्या जोश्यांकडे; (२) बयो, अजगणीच्या वैद्यांकडे; (३) सुंदरी, परशुरामच्या अभ्यंकरांकडे दिली. (४) अहिल्या.

* **रघुनाथ जयराम** (९) वय ४२. आंबवलीला शेती व खोती करितात. भार्या सीता (द्वारका), ज. स. १९०६, लव्हेलच्या गणेश विनायक गद्र्यांची मुलगी.

* **काशीनाथ जयराम** (९) ज. स. १८९९. मॅट्रिक. धोत्रामोहरास जी. आय्. पी. रेल्वेंत स्टेशनमास्तर आहेत. भार्या सावित्री (बयो), ज. स. १९०९. करंजाळीच्या सोमणांकडील. कन्या (१) मालती, (२) इंदु, (३) सिंधु, (४) सुमन.

* **वसंत काशीनाथ** (१०) वय १०. इंग्रजी दुसरी.

* **जयंत काशीनाथ** (१०) वय ३.

कृष्णाजी जयराम (९) ज. स. १९००; मृ. स. १९२८. सेकंड इयर ट्रेंड शिक्षक. भार्या राधा, ज. स. १९०९. वडदच्या जनार्दनपंत सोमणांची मुलगी. कन्या मालती, ज. स. १९२८.

गंगाधर रघुनाथ (८) ज. स. १८५६; मृ. स १९३१. जी. आय. पी. रेल्वेंत स्टेशनमास्तर होते. भार्या गंगा. कन्या (१) कृष्णा, वय ३३, अहमदनगरच्या गोपाळ जनार्दन फडक्यांची पत्नी. (२) सोनू, २५ वे वर्षी मृत्यु. नगरच्या काशीनाथ वासुदेव सहस्रबुद्ध्यांची पत्नी. (३) सीता, वय १७, इंदूरच्या दामोदर पुरुषोत्तम फाटकांची पत्नी.

* **दत्तात्रेय गंगाधर** (९) ज. स. १८९८ मार्च ९. भुसावळला डिव्हिजनल ट्रान्स्पोर्टेशन सुपरिंटेंडंटचे ऑफिसांत कारकून आहेत. पत्ता–जुना दवाखाना चाळ, घर नं. ८३. भार्या इंदिरा, विवाह स. १९१५, मेहेंदळ्यांकडील. कन्या (१) सुमति, ज. स. १९२७ सप्टें. ११. मराठी ४ थी. (२) लीलावती, ज. स. १९३४ एप्रिल १६. (३) पुष्पावती, ज. स. १९३६ आक्टो. २.

* **रामचंद्र दत्तात्रेय** (१०) ज. स. १९३२ जुलै ३.

रावजी जनार्दन (७) भार्या सावित्री.

नारायण परशुराम (५) हे मयत होऊन अंदाजें १५५ वर्षें झालीं. हे स. १७८१ मध्यें खेड येथें असल्याचा उल्लेख आहे.

भिकंभट नारायण ऊर्फ भास्कर (६) हे मयत होऊन अंदाजें १४० वर्षें झालीं. हे नाशिकास राहात असत. यांनीं नाशिकास श. १६९७ व १७०७ मध्यें घरें खरेदी केल्याबद्दलचीं खरेदीखतें आहेत. भार्या सावित्री.

विश्वनाथ धोंडभट (८) भार्या उमा.

कृष्णाजी विश्वनाथ (९) नाशिकास भिक्षुकी करीत. भार्या राधा.

केशव कृष्ण (१०) मृ. स. १८९७, वय ५०. रेल्वेंत नोकर होते. भार्या पार्वती.

नारायण कृष्ण (१०) ज. श. १७७०; मृ. स. १९३०. मॅट्रिक होते. प्रथम नगर, सातारा व नाशिक या जिल्ह्यांत मामलेदारीच्या हुद्यावर काम केलें. नंतर १० वर्षें अहमदनगर जिल्ह्यांत डेप्युटी कलेक्टर होते. होमिओपाथिक औषधें देत. भार्या जानकी, जलालपूरच्या नारायणराव गोखल्यांची मुलगी.

* **विश्वनाथ नारायण** (११) ज. स. १८९५, सातारा. हे दत्तक आले. यांचें मूळचें नांव विष्णु श्रीधर खरे. हे नाशिकास होमिओपाथिक वैद्यकी करतात. नाशिकसिटी पोस्टऑफिस यांचे घरांत आहे. (पगडबंद गल्ली, घर नं. १४७५–७६). भार्या राधा, विवाह स. १९१३, चिंचणी–तारापूरच्या भास्कर गोपाळ भटांची मुलगी.

चिंतामणि गणेश (९) हे सिद्धपूरला यात्रेस गेले असतां यांनीं तेथें लेख लिहून दिला आहे; त्यांत राहण्याचें मूळ गांव ब्रह्मावर्त सांगितलें आहे.

महादेव भिकाजी (७) भार्या वाराणशी.

कृष्णाजी महादेव (८) कन्या दोन (१) वेरळच्या दामल्यांकडे; (२) खड-पोलीच्या बापटांकडे दिली.

नारायण कृष्ण (९) मृ. वय ३५, केळवें–माहीमला तलाठी होते. भार्या अन्नपूर्णा (वारू), वय ४८, पुण्याच्या गंगाधरपंत जोश्यांची मुलगी.

* **राजाराम नारायण** (१०) ज. पुणें स. १९१४ मे २. वडील वयाच्या दुसरे वर्षी वारल्यामुळें मामांकडे पुण्यास आले. पुण्यांत म्युनिसिपालिटींत नोकरी आहे. पत्ता–घर नं. $\frac{३२५}{२}$, सदाशिव पेठ, पुणें.

पांडुरंग भिकाजी (७) ज. श. १७२७; मृ. श. १७९०. शेती करीत. भार्या सगुणा, मृ. श. १८१७. तारापूरच्या बव्यांकडील. कन्या दुर्गा, ज. श. १७७२; मृ. श. १८३९. चिपळूणच्या गणेश कृष्ण करंदीकरांची पत्नी.

वीरेश्वर पांडुरंग (८) ज. श. १७७५; मृ. श. १८३९. शेती व खोती करीत. भार्या अन्नपूर्णा (वालू), ज. श. १७९०; मृ. श. १८२९. खेडच्या बाळाजी गणेश आगाश्यांची मुलगी. कन्या (१) बयो, ज. श. १८१४; मृ. श. १८३२. आयनीच्या लक्ष्मण भार्गव बेडेकरांची पत्नी. (२) द्वारका, ज. श. १८१८; लव्हेलचे नारायण बाळकृष्ण ओकांची पत्नी. (३) सुंदरा, ज. श. १८२२; मृ. श. १८४०. सुसेरीच्या भिकाजी रामचंद्र बव्यांची पत्नी. (४) कृष्णा, ज. श. १८२५; मृ. श. १८४१, बुरंबाडच्या सहस्रबुद्ध्यांकडे दिली.

* **भिकाजी वीरेश्वर** (९) ज. श. १८१२. नोकरी व शेती करितात. सार्वजनिक काम करण्याची हौस. भार्या सावित्री (दुर्गा), ज. श. १८१८, पालगडच्या

गंगाधर लक्ष्मण ओकांची मुलगी. कन्या (१) वेणू, ज. श. १८३९. सागव्याच्या महेश्वर गंगाधर भिडयांची पत्नी. (२) मालती, ज.श. १८५६.
*पांडुरंग भिकाजी (१०) ज. श. १८३६. इंग्रजी ४ थींत.
*रघुनाथ भिकाजी (१०) ज. श. १८४२. विद्यार्थी.
*जगन्नाथ भिकाजी (१०) ज. श. १८४५. विद्यार्थी.
*हनुमंत भिकाजी ऊर्फ मारुति (१०) ज. श. १८४९. विद्यार्थी.
*जनार्दन भिकाजी (१०) ज. श. १८५४.
आत्माराम वीरेश्वर (९) ज. श. १८१८; मृ. श. १८३९. भार्या लक्ष्मी (सीता), पाग–चिपळूणच्या महादेव बाळाजी बर्व्यांची मुलगी.
धोंडो पांडुरंग (८) ज. श. १७५५; मृ. श. १८३१.
गणेश पांडुरंग (८) ज. श. १७६७; मृ. श. १७८७.
सखाराम विश्वनाथ (८) ज. श. १७६०; मृ. श. १८२५. याज्ञिक व दशग्रंथी वैदिक. शेती करीत. भार्या रखमाई, बिवलींच्या दामोदरपंत थत्त्यांची मुलगी.
*मोरेश्वर सखाराम (९) ज. श. १८०१ श्रावण शु. १. मॅट्रिक. खोती व वैद्यकी करितात. सार्वजनिक कामांची आवड आहे. तालुका लोकल बोर्डाचे अध्यक्ष. भार्या सरस्वती (नर्मदा), ज. श. १८०८. परशुरामच्या त्र्यंबक रघुनाथ बेहऱ्यांची मुलगी. कन्या कृष्णा, ज. श. १८२६. पालगडच्या कृष्णाजी सखाराम जोशी, वरवडेकरांची पत्नी.
*सखाराम मोरेश्वर (१०) ज. श. १८२९. साताऱ्याचे आयंग्लवैद्यकशाळेंतील शिक्षण घेतलें आहे. खेडला वैद्यकी करितात. भार्या सीता (बयो), ज. श. १८३७. परशुरामच्या विठ्ठल हरी थत्त्यांची मुलगी. कन्या (१) कमल, ज. श. १८५२. (२) मथुरा, ज. श. १८५५.
*नारायण सखाराम (११) ज. श. १८६०.
*कृष्णाजी मोरेश्वर (१०) ज. श. १८३७. कॉलेजांत शिकत आहे.
*गजानन मोरेश्वर (१०) ज. श. १८४१. मॅट्रिक.
बहिरव भिकंभट (७) भार्या लक्ष्मी.
अनंत नारायण (६) भार्या सत्यभामा.
रामचंद्र दामोदर (८) स. १८५७ त करवीचे माधवराव पेशवे यांचे पालनकर्ते म्हणून ब्रिटिश सरकारनें यांची नेमणूक केली होती. यांच्यासंबंधाचें तत्कालीन एका इंग्रज ग्रंथकाराचें मत ऐतिहासिक प्रकरणामध्यें (क्रमांक ३६ व ४०) पाहावें. यांचे पूर्वज पेशव्यांच्याबरोबर कानपुराकडे गेले. हे काशीस पेशव्यांच्या देवळाचे व्यवस्थापक होते.
विनायक रामचंद्र (९) ज. काशी. व्यवसाय जमीनदारी. भार्या सरस्वती, सखाराम विश्वनाथ काळ्यांची मुलगी.
*श्रीधर विनायक (१०) ज. काशी. संवत १९५५. यांना यांचे मातामह सखाराम

विश्वनाथ काळे यांचेकडून छोटानागपूरच्या नागवंशीय क्षत्रिय राजघराण्याचें 'राजगुरु' पद प्राप्त झालें आहे. ही परंपरा पेंडसे घराण्यांत पुरुषवंश असे-पर्यंत चालावी अशी सनद महाराजांकडून मिळाली आहे. याबरोबर १४ गांवें इनाम मिळालीं आहेत. राजकुटुंबांत गायत्रीचा व कालीचा मंत्रोपदेश करण्याची कामगिरी यांच्याकडे आहे. सध्यां हे जोरार (जि. रांची) येथें असतात. भार्या शांता (यमुना), सोलापूरच्या काशीनाथ गोपाळ रानड्यांची मुलगी.

***प्रभाकर श्रीधर** (११) ज. पुणें स. १९२५ एप्रिल १०. इंग्रजी ४ थी. वास्तव्य रांची.

***सुधाकर श्रीधर** (११) ज. सोलापूर स. १९३० डिसेंबर ६. बालवर्ग, नागपूर.

***मधुकर श्रीधर** (११) ज. रांची. स. १९३६ मे ३०.

विठ्ठल चिंतामणि (८) ज. श. १७६३; मृ. श. १८२३. नोकरी होती. भार्या (१) यमुना, अंजनवेलचे नारायण मोरेश्वर आचवल यांची मुलगी. भार्या (२) सुभद्रा, ज. श. १७९०; मृ. श. १८५०. सुसेरीच्या गणेश रामकृष्ण देवधरांची मुलगी. पुत्र चिंतामणि व शंकर. कन्या (१) नर्मदा, ज. श. १८०६, तळचाच्या गोविंद बल्लाळ काण्यांची पत्नी. (२) ठकी, ज. श. १८०८; मृ. श. १८५६. पालगडच्या यज्ञेश्वर केशव देवधरांची पत्नी. (३) तापी, ज. श. १८१०. वेरळचे पांडुरंग बल्लाळ दामले यांची पत्नी.

***चिंतामणि विठ्ठल** (९) ज. श. १८११. व्यापार व नोकरी करितात. भार्या उमा (काशी), ज.श. १८२०.पालगडच्या सखाराम जोशी वरवडेकरांची मुलगी.

***नारायण चिंतामणि** (१०) ज. श. १८३९. मराठी ७ वी. व्यापार करितात.

***शंकर विठ्ठल** (९) ज. श.१८१३. मराठी शाळेंत शिक्षक.भार्या पार्वती, तळेमांड-व्याच्या रामचंद्र कृष्ण दामल्यांची मुलगी. कन्या (१) यमू, ज. श. १८४६. (२) सखू, ज. श. १८५०. (३) वत्सला, ज. श. १८५४.

***कृष्णाजी शंकर** (१०) ज. श. १८४८.

***दिगंबर शंकर** (१०) ज. श. १८५९.

वामन रामकृष्ण (८) कन्या गंगू, पालगडच्या महेश्वरपंत खऱ्यांची पत्नी.

केशव वामन (९) मृ. प्लेग, श. १८२७. मुलकी खात्यांत नोकर होते. भार्या सीता (तापी), दापोलीच्या गोविंदराव दांडेकरांची मुलगी.

लक्ष्मण केशव (१०) मृ. स. १९०९. वर्ध्यास वकिलांकडे कारकून होते. भार्या आनंदी, परशुरामच्या दांडेकरांची मुलगी.

***दत्तात्रेय केशव** (१०) ज. श. १८१५ आश्वि. व. २. सेकंड इयर ट्रेंड असून मुंबईस म्युनिसिपल शाळेंत शिक्षक आहेत. पत्ता—गोरेगांवकर प्रिमायसेस, ए ब्लॉक, सेकंड फ्लोअर, खोली नं. ३७, दादर. भार्या राधा (अंबू), देवगडच्या पर-शुरामपंत जोश्यांची कनिष्ठ मुलगी. कन्या सिंधु, ज. श. १८५४ चैत्र शु. ९.

***वसंत दत्तात्रेय** (११) ज. श. १८४६ मार्ग. व. २. इंग्रजी ३ री.

***गोपाळ दत्तात्रेय** (११) ज. श. १८५१ आषाढ व. ३. मराठी ३ री.

हरी नारायण (६) भार्या यशोदा. या सती गेल्या.

भास्कर हरी (७) हे खेडच्या पेंडसे घराण्यांतून दत्तक आले. यांचे जनकघरचे बंधु विठ्ठलपंत हे होत. भार्या अन्नपूर्णा. कन्या (१) नर्मदा, कळमणीच्या हरिभाऊ आपटयांची पत्नी. (२) वाली, रिसबुडांकडे दिली.

मोरेश्वर भास्कर (८) भार्या (१) सरस्वती, पालगडच्या जोश्यांकडील. पुत्र विनायक व दामोदर. कन्या (१) द्वारका, आयनीच्या गोविंदपंत बेडेकरांची पत्नी. (२) वेणू, चिपळूणच्या रानडयांकडे दिली. भार्या (२) यशोदा, सुसेरीच्या परांजप्यांकडील. पुत्र हरी. कन्या यमुना, मृ. समयीं वय ११.

विनायक मोरेश्वर (९) मृ. स. १९२०. खेडास कचेरींत नोकरी होती.सदाचारी,



उभे :—१. नारायण विनायक, २. गोविंद विनायक. स. १९१३
बसलेले :—१. सत्यभामाबाई, २. दत्तात्रेय विनायक, ३. विनायक मोरेश्वर, ४. भास्कर विनायक, ५. गंगाबाई व मांडीवर सीता.

धार्मिक, कष्टाळु व स्वावलंबी वृत्ति. भार्या लक्ष्मी (भीमाताई), पालगडच्या शंकर आप्पा करंदीकरांची मुलगी. सुस्वभावामुळें अत्यंत लोकप्रिय होती.

भास्कर विनायक (१०) मृ. स. १९१४. इंग्रजी शिक्षण मामा बाळकृष्णपंत करंदीकर यांच्या पेण येथील वसतिगृहांत झालें. जी. आय्. पी. रेल्वेंत क्लार्क होते. सार्वजनिक कामाची आवड. भार्या गंगा, वय ४९; लवेलच्या ओकांकडील. कन्या सीता, वय २९, कोल्हापूरच्या गोखल्यांकडे दिली.

दत्तात्रेय विनायक (१०) मृ. स. १९२६. रत्नागिरी जिल्ह्यांत मराठी ७ वींत पहिला नंबर. इंग्रजी शिक्षण पेण येथें मामांकडे वसतिगृहांत झालें. जी. आय्. पी. रेल्वेंत क्लार्क होते. भार्या सत्यभामा, मुरुडच्या जोश्यांकडील.



नारायण विनायक

* **नारायण विनायक** (१०) ज. पालगड, स. १८९७. बी. एजी. (१९२३). इंग्रजी ५ वीपासून पुढील शिक्षण पुणें अनाथ विद्यार्थी गृहाच्या मदतीनें झालें. शेतकी व ग्रामसंघटना शिक्षणासाठीं स. १९२५ सालीं यूरोपांतील प्रवास झाला. सार्वजनिक कामाची आवड असल्यामुळें विद्यार्थिदशेपासून राष्ट्रीय उत्सव व खेड्यांतील शिक्षण यांमध्यें भाग घेत. स. १९२६पासून स. १९३७ अखेरपर्यंत नाशिक येथील अ. वि. गृहाचे चालक. हे अनाथ विद्यार्थी गृहाचे आजीव सेवक असून याच संस्थेच्या लोकसंग्रह छापखान्यांतील काम पाहतात. यांनीं मुळशी व सोन्यामारुति सत्याग्रहांत भाग घेतला होता. पत्ता :–अनाथ विद्यार्थी गृह, ६२४



स. १९३८

रांग पहिली :—१. अनंत नारायण, २. सरस्वतीबाई व मांडीवर रामचंद्र नारायण, ३. नारायण विनायक व मांडीवर अरविंद नारायण, ४. यशवंत नारायण.

रांग दुसरी :—१. केशव ऊर्फ बलवंत नारायण, २. कमल, ३. वासुदेव नारायण.

सदाशिव पेठ, पुणें २. भार्या सरस्वती (गोदू), वय ३०. अत्यंत प्रेमळ व सुस्वभावी. पडघवलीच्या विठ्ठल सदाशिव फाटकांची मुलगी. कन्या कमल, वय ८. मराठी २ री.

* **यशवंत नारायण** (११) वय १२. मराठी ६ वी.

* **अनंत नारायण** (११) वय १०. मराठी ३ री.

* **वासुदेव नारायण** (११) वय ६. बालवर्ग.

* **केशव ऊर्फ बलवंत नारायण** (११) वय ४.

* **अरविंद नारायण** (११) वय २.

* **रामचंद्र नारायण** (११) वय १.

* **गोविंद विनायक** (१०) ज. पालगड, वय ३५. यांचें शिक्षण पुणें व चिंचवड अनाथ विद्यार्थी गृहाच्या मदतीनें झालें. टिळकमहाविद्यालयाचा इंजिनिअरिंगचा कोर्स पुरा केला. नाशिक जिल्ह्यांत लोकलबोर्ड ओव्हरसीअर आहेत. भार्या इंदिरा, वय २७, हर्णैच्या दांडेकरांकडील. कन्या (१) मालती, वय ६. (२) कुंदा, वय ४. (३) सुनंदा, वय २.



स. १९२९

उभे :—१. रखमाबाई, २. सत्यभामाबाई व कडेवर अनंत नारायण, ४. इंदिराबाई.
खुर्चीवर :—१. नारायण विनायक, २. यशोदाबाई, ३. गोविंद विनायक.
बसलेला :— मधुसूदन फाटक.



दामोदर मोरेश्वर

दामोदर मोरेश्वर (९) ज. स. १८७०; मृ. स. १९२५. हे दापोली हायस्कुलांतून मॅट्रिक झाले. मुरुड–जंजिऱ्यास शिक्षक होते. गणित विषयाची आवड असून लोकप्रिय शिक्षक होते. बुद्धिबळांचे खेळांत प्रवीण असत. मुरुड–जंजिऱ्यास घर–शेतीवाडी करून स्थायिक झाले. भार्या (१) राधा, विवाह स. १८८६. मृ. स. १९०५. दापोलीच्या विष्णुपंत भागवतांची मुलगी. पुत्र कृष्ण, रामचंद्र व लक्ष्मण. कन्या (१) गोदावरी, परशरामच्या विनायकभट बेहेऱ्यांची पत्नी. (२) बयो (सुभद्रा), गुडघ्याच्या बाळकृष्णपंत दांडेकरांची पत्नी. भार्या (२) सावित्री, वय ५०, विवाह स. १९०६. तळघरच्या भाऊराव बर्व्यांची मुलगी. पुत्र दत्तात्रेय, गणपति (गंपू), रघुनाथ व जगन्नाथ. कन्या सोनू (द्रौपदी), श्रीवर्धनच्या वैद्यांकडे दिली.

* **कृष्णाजी दामोदर** (१०) ज. स. १८९२. ड्रॉईंग मास्तर, डी. टी. सी.; नागपूरच्या सुळे हायस्कूलचे आजीव सभासद असून तेथेंच ड्रॉईंग शिक्षक आहेत. भार्या (१) अन्नपूर्णा, विवाह स. १९११, वेरळच्या दामल्यांची मुलगी. भार्या (२) जानकी, विवाह स. १९१२, गुडघ्याच्या भास्करराव दांडेकरांची मुलगी. भार्या (३) लक्ष्मी, ज. स. १९०५, उजगांव; मृ. स. १९३५ फेब्रु. १७. विवाह स. १९१९. पालशेतच्या जोश्यांची मुलगी. यांचा स्वभाव मनमिळाऊ व बाणेदार होता. पुत्र वसंत व यशवंत. कन्या (१) विमल, ज. स. १९२७. मराठी ३ री. (२) प्रमिला, ज. स. १९२९.

* **वसंत कृष्ण** (११) ज. स. १९२४. इंग्रजी २ री.

* **यशवंत कृष्ण** (११) ज. स. १९३१. प्राथमिक विद्यार्थी.

* **दत्तात्रेय दामोदर** (१०) ज. तळघर. स. १९०९ मार्च १८. मॅट्रिक, स्कूल-फायनल व ड्रॉइंगची इंटरमीजिएट ग्रेड पास. जंजिरा–मुरुडच्या हायस्कुलांत



रांग पहिली :—१. प्रमिला, २. कृष्णाजी दामोदर, ३. विमल. बसलेले :—१. यशवंत कृष्ण, २. वसंत कृष्ण.



लक्ष्मीबाई

शिक्षक आहेत. लेखन, अध्यापन व समाजसेवा यांची आवड आहे. समर्थ व्यायामशाळेचे कार्यवाह (स. १९२७ ते १९३१); विद्यार्थ्यांसाठीं हिंदुस्थानी खेळ (स. १९३२–३३); वादविवाद मंडळाचे प्रमुख चालक (स. १९३४–३५); हरिजनांचे शिक्षक (स. १९३६–३७); प्रभावी कवि. सह्याद्रि, चित्रमयजगत्, किर्लोस्कर वगैरे बऱ्याच प्रमुख नियतकालिकांतून सुमारें ६०–७० कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. उदयोन्मुख लेखक. गद्यगीतें, लघुनिबंध, लघुकथा, नाट्यछटा वगैरेहि प्रसिद्ध झाल्या आहेत. यांचा काव्यसंग्रह 'जीवन-प्रभा' या नांवानें प्रसिद्ध होत आहे. यांनीं आपले व आपल्या एका मित्राचे लघुनिबंध 'संगम' या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले आहेत. भार्या इंदिरा, वय २१ विवाह स. १९२९, रेवदंड्याच्या वैद्यांची मुलगी. कन्या शशिकला, वय २.



दत्तात्रेय दामोदर

* **रघुनाथ दामोदर** (१०) ज. जंजिरा, स. १९१९. उमरावतीच्या विदर्भ आयुर्वेद विद्यालयांत शिक्षण चालू आहे.

* **जगन्नाथ दामोदर** (१०) ज. जंजिरा, स. १९२१. जंजिऱ्यास मॅट्रिकचे वर्गांत आहेत.


हरी मोरेश्वर (९) मृ. समयीं वय २५. भार्या रखमा, वय ५०, वेरळच्या केशवराव दामल्यांची मुलगी.

रामचंद्र परशुराम (७) यांनीं व दामले यांनीं वेरळ गांव विकत घेऊन तेथें वस्ती केली. त्यापूर्वी खेडास राहात असत.

लक्ष्मण परशुराम (७) भिक्षुकी करीत. भार्या रमा (गोदावरी), खेडच्या दाजी नारायण बेडेकरांची मुलगी. कन्या यमू, परशुरामच्या नारायण गोपाळ बेहेऱ्यांची पत्नी.

नारायण लक्ष्मण (८) ज. स. १८४०; मृ. स. १९२०. व्यवसाय शेती. भार्या लक्ष्मी (बया), ज. स. १८६७. लव्हेलच्या नारायण नीळकंठ सोमणांची मुलगी. कन्या (१) चंद्री, ज. स. १८८६. आयनीच्या मोरेश्वर परशुराम

काणे दीक्षितांची पत्नी. (२) द्वारका, ज. स. १८८९. लव्हेलच्या नारायण विष्णु बेडेकरांची पत्नी.



वरील रांग :—१. सावित्रीबाई, २. सोनूताई.
मध्यभागीं :—१. इंदिराबाई व मांडीवर शशिकला, २. दत्तात्रेय दामोदर.
खालील रांग :—१. रघुनाथ दामोदर (भाई), २. जगन्नाथ दामोदर.

रामचंद्र नारायण (९) ज. वेरळ श. १८१२; मृ. स. १९३६. शेती करीत. शीघ्र कवि होते. भार्या सीता (मैना), ज. स. १८९७. भिल्याच्या पुरुषोत्तम हरी केतकरांची मुलगी. कन्या मथुरा (चंपी), ज. स. १९१३, तळ्याच्या सदाशिव गोविंद दामल्यांची पत्नी.

पिलाजी परशुराम (७) ज. स. १८१३; मृ. स. १९०६. रोडक्लार्क होते. यांनीं अग्निहोत्र घेतलें होतें. हे कोंकणांतून वऱ्हाडांत शिवणी–छपारा या भागांत आले. भार्या सगुणा, दामल्यांकडील.

जनार्दन पिलाजी (८) ज. वेरळ स. १८५७; मृ. पक्षघात स. १९२४. खान-

देशांत कोर्टांत कारकून होते. भार्या अंबिका, बव्र्यांकडील. कन्या (१) कृष्णा, ज. स. १८८५. दत्तात्रेय रावजी जोश्यांची पत्नी. (२) वेणू, ज. स. १८८७. नाशिकच्या रामचंद्र नीळकंठ गोडबोल्यांची पत्नी.

* **गणेश जनार्दन** (९) ज. शिरपूर स. १८८९. प्रथम सरकारी नोकरी. नंतर जपान कंपनींत नोकरी. सध्यां धुळ्यास जनरल मर्चंट व एजंट आहेत. भार्या सरस्वती, संगमनेरच्या का. गो. गणपुल्यांची मुलगी.

* **यशवंत गणेश** (१०) ज. धुळें स. १९२०. इंग्रजी ५ वी.

* **भास्कर गणेश ऊर्फ जयवंत** (१०) ज. संगमनेर स. १९२२. धुळ्यास टेक्निकल स्कुलांत सुतारकाम शिकत आहे.

* **लक्ष्मण गणेश** (१०) ज. संगमनेर स. १९२५. मराठी ६ वी.

* **वसंत गणेश** (१०) ज. धुळें स. १९३०.

* **माधव जनार्दन** (९) ज. शिरपूर स. १८९१. प्रथम इंजिनिअरिंग खातें, नंतर कोर्ट व सध्यां पोलिसखात्यांत डेप्युटी अकौंटंट आहेत. पत्ता–खोलगल्ली देशमुख यांचा वाडा, धुळें. भार्या राधा, टिटवाळ्याच्या विठ्ठल भास्कर केतकरांची मुलगी. कन्या (१) कुसुम, ज. धुळें स. १९३० मार्च २८. (२) लीलावती, ज. ठाणें स. १९३२ जून १.

* **दामोदर माधव ऊर्फ प्रभाकर** (१०) ज. धुळें स. १९३४.

* **अनंत माधव** (१०) ज. धुळें स. १९३६.

* **परशुराम पिलाजी** (८) ज. वेरळ स. १८७०. स्कूल फायनल. प्रथम रेव्हेन्यू खात्यांत नोकरी; नंतर रायसिंगपूर संस्थानचे दिवाण होते. सध्यां धुळ्यास सुखवस्तु आहेत. भार्या जानकी, अहमदनगरच्या विठ्ठल बल्लाळ दामल्यांची मुलगी. कन्या (१) गोदावरी, ज. भडगांव स. १८९९. धुळ्याच्या विष्णु विठ्ठल वाळांची पत्नी. (२) गंगू, ज. धुळें स. १९०९. दांडेकरांकडे दिली.

* **विष्णु परशुराम** (९) ज. धुळें स. १९०४. धुळें टेक्निकल स्कूलचा तीन वर्षांचा व नागपूर हँडीक्रॅप्ट कोर्स पुरा केला. धुळ्यास सुतारकाम करतात.

सदाशिव पिलाजी (८) ज. वेरळ स. १८७५; मृ. स. १९१३, मूळव्याध. स. १९०४ त बी. ए. झाले. सेकंड क्लास मॅजिस्ट्रेट होते. संस्कृत व मराठी कविता करीत असत. भार्या उमा, विश्वनाथपंत करंदीकरांची मुलगी.

* **भालचंद्र सदाशिव** (९) ज. जत स. १९०२. शिक्षण इंटरपर्यंत. धुळ्यास इंपीरियल बँकेंत हेडक्लार्क आहेत. पत्ता–पांचवी गल्ली, धुळें. भार्या (१) शारदा, पुण्याच्या रसाळांकडील. पुत्र अच्युत. भार्या (२) शारदा, परचुऱ्यांकडील. पुत्र चंद्रशेखर.

* **अच्युत भालचंद्र** (१०) ज. पुणें स. १९२८. पुण्यास इंग्रजी २ री.

* **चंद्रशेखर भालचंद्र** (१०) ज. धुळें स. १९३४.

दाजी नरसो (७) ज. स. १८०६; मृ. स. १८७६. हे केळशीस भिक्षुकी करीत.

भार्या यशोदा (घारी), पालगडच्या महादेव गोविंद करंदीकरांची मुलगी. कन्या (१) तारा, वेरळच्या दाजी पांडुरंग दामल्यांची पत्नी. (२) बाली, पाग–चिपळूणच्या बाळाजी रावजी जोश्यांची पत्नी. (३) भीमा, आसूदच्या बाळकृष्ण बापूजी दावक्यांची पत्नी. (४) काशी, इचलकरंजीच्या बळवंतराव भाटयांची पत्नी.

आप्पाजी दाजी ऊर्फ सदाशिव (८) ज. स. १८३६; मृ. स. १९२६. भिक्षुकी, शेती व खोतीकाम करीत. कीर्तन करीत. पुराण सांगत. हजरजबाबी. भार्या पार्वती (तारा), तळें–मांडव्याच्या कृष्णाजी वासुदेव दामल्यांची मुलगी. कन्या (१) तापी, ज. स. १८७८. खेडच्या गणेश केशव जोश्यांची पत्नी. (२) गंगू, ज. स. १८८४; मृ. स. १९१०. कोळथऱ्याच्या व्यंकटेश आघारकरांची पत्नी. (३) मनी, ज. स. १८८६; मृ. स. १९०६. मुरुडच्या सखाराम विष्णु काण्यांची पत्नी. (४) गोदू, ज. स. १८९०; पाग–चिपळूणच्या भास्कर यज्ञेश्वर चितळ्यांची पत्नी. (५) गौरी, ज. स. १८९८; मृ. स. १९३७. खेडच्या गदाधर उद्धव काण्यांची पत्नी. (६) रंगू, ज. स. १९०४. आसूदच्या जनार्दन काशीनाथ जोश्यांची पत्नी.

* **श्रीराम आप्पाजी** (९) ज. श. १८००. मराठी ७ वी पास. वेरळेस भिक्षुकी, शेती व खोती करतात. भार्या अन्नपूर्णा (बनू), ज. स. १८८७. वेरळच्या गणेश दाजी दामल्यांची मुलगी. कन्या (१) वेणू, ज. स. १९०९. कोतवलीच्या कृष्णाजी हरी बेडेकरांची पत्नी. (२) यमू, ज. स. १९१५. कारोळच्या महादेव गोविंद केळकरांची पत्नी.

* **दिनकर श्रीराम** (१०) ज. स. १९०७ जून ४. सेकंड इयर ट्रेंड. खेडास शिक्षक आहेत. ज्योतिष व मोजणीचें काम जाणतात. सार्वजनिक कामाची आवड असून 'बालचर' चळवळींत भाग घेतात. भार्या (१) राधा (चंद्री), ज. स. १९१५; मृ. स. १९३६. करबोण्याच्या बाळकृष्णपंत केतकरांची मुलगी. कन्या (१) द्वारका, ज. स. १९३२. (२) इंदु, ज. स. १९३४. भार्या (२) सरस्वती (कृष्णा), ज. स. १९१८. कळंबुशीच्या पद्माकर त्र्यंबक भाव्यांची मुलगी.

* **सीताराम श्रीराम** (१०) ज. श. १८४०. व्हर्ना. फायनल पास असून इंग्रजी शिक्षण चालू आहे.

* **रामकृष्ण श्रीराम** (१०) ज. श. १८४४. मराठी शिक्षण चालू.

* **जयराम आप्पाजी** (९) ज. श. १८१२. ठाणें म्युनिसिपालिटींत क्लार्क आहेत. वास्तव्य कुर्ला. भार्या लक्ष्मी (गोदी), जव्हारच्या महादेव हरी ओकांची मुलगी. कन्या नलिनी, ज. स. १९३५.

* **गोविंद जयराम** (१०) ज. श. १८५१.

* **गजानन जयराम** (१०) ज. श. १८५५.

* **गंगाधर आप्पाजी** (९) ज. श. १८२०. वेरळेस शेती व भिक्षुकी करतात. भार्या सगुणा (सुंदरी), परशुरामच्या हरी कृष्ण अभ्यंकरांची मुलगी. कन्या सुशीला, ज. स. १९३१.

* **गोपाळ गंगाधर** (१०) ज. श. १८५४.

* **विष्णु गंगाधर** (१०) ज. श. १८५६.

* **शशिकांत गंगाधर** (१०) ज. स. १९३७.

शंकर दाजी (८) ज. स. १८४०; मृ. स. १९२२. नोकरी होती. भिक्षुकी करीत व पुराण सांगत असत. भार्या सरस्वती (धोंडी), कोरेगांवच्या धारु जोश्यांची मुलगी. कन्या सोनी, ज. स.१९१२. केतकीच्या महादेव गोपाळ केतकरांची पत्नी.

गणेश परशुराम (५) हे स. १७८१ त घाणेखुंटास असल्याचा उल्लेख आढळतो.

लक्ष्मण केशव (५) हे स. १७८१ त मेटें येथें असल्याचा उल्लेख आढळतो.

वासुदेव लक्ष्मण (६) भार्या यमुना.

विश्वनाथ वासुदेव (७) भार्या लक्ष्मी. कन्या आवडी.

सखाराम विश्वनाथ (८) मृ. स. १९०१ च्या सुमारास. वय ८० वर्षें. कुळवंडी येथें शेती व सावकारी करीत. यांनीं काशीयात्रा पायीं करून तेथून गंगेची कावड आणून आपले आजोबा व आजी यांस स्नान घातलें. भार्या सावित्री (बया), बिवलीच्या महादेव बाळंभट थत्त्यांची मुलगी.

पांडुरंग सखाराम (९) मृ. श. १८०३ आषाढ कृ. १३. भुसावळेस रेल्वेंत नोकर होते. भार्या रखमाई (काशी), मृ. श. १८५९ ज्येष्ठ कृ. ४. वय ७५ वर्षें, तळ्याच्या (खेड) दामोदर परशुराम दामल्यांची मुलगी.

* **गणेश पांडुरंग** (१०) ज. भुसावळ स. १८८१ एप्रिल १५. मराठी शिक्षण आयनीस व इंग्रजी चिपळूण व मुंबई येथें झालें. पोस्टखात्यांत नाशिक डिव्हिजनमध्यें नोकरी झाली. सध्यां पेन्शनर असून पुण्यास ७०२ सदाशिव पेठ येथें राहतात. पेन्शन रु. ८२॥. भार्या (१) लक्ष्मी (गंगू), वेरळच्या केशव हरी दामल्यांची मुलगी. भार्या (२) इंदिरा (सीता), ज. स. १८९७ जाने. ३०. पुण्याचे कीर्तनकार गोविंद गणेश मुरुडकर (पाटणकर) यांची मुलगी. कन्या (१) कमला, ज. श. १८३८ आश्विन कृ. ३०. नाशिकच्या शंकर गंगाधर घारपुऱ्यांची पत्नी. (२) सुशीला, ज. श. १८५४ मार्ग. शु. १५. (३) प्रभावती, ज. श. १८५६ चै. कृ. ४.

अनंत सखाराम (९) मृ.स. १८९५. वय ३०. मुंबईस नोकरी करीत. अविवाहित.

गोविंद विश्वनाथ (८) मेटें येथें असत. घरसंसार पाहात.

भार्गव गोविंद (९) अथणीस कापसाचा व्यापार करीत. यांस एक कन्या होती.

वामन विश्वनाथ (८) ज. स. १८३२; मृ. मेढें, स. १९१४. पेणला स्टँपव्हेंडर होते. नंतर मेटयास उपाध्येपणाची वृत्ति चालवीत व शेती करीत. शेवटीं पुण्यास भिक्षुकी करीत. भार्या (१) सगुणा, कळंबस्त्याच्या रामचंद्र भैरव



सन १९३८

उभे :—१. गणेश पांडुरंग, २. कमळा घारपुरे, ३. कडेवर इंदु घारपुरे.
बसलेल्या :— १. इंदिराबाई, २. सुशीला, ३. प्रभावती.

गानूंची मुलगी. पुत्र विष्णु. भार्या (२) सगुणा, चिपळूणच्या भाऊ श्रीधर भागवतांची मुलगी. पुत्र वासुदेव, दिनकर, कृष्ण व विश्वनाथ. कन्या मनू, खडपोलीच्या विनायक जनार्दन बापटांची पत्नी.

* **विष्णु वामन** (९) ज. श. १७८९. वऱ्हाडांत जीन प्रेसमध्यें नोकरी केली; नंतर दामल्यांकडे खाजगी नोकरी. शेवटीं मुंबईस ए. के. जोशी कंपनींत कारकून होते. सध्यां अहमदनगरला सुखवस्तु असतात. यांनीं आपला पुतण्या दत्तक घेतला. भार्या पार्वती, सोनगांवच्या सीताराम वासुदेव बर्व्यांची मुलगी. कन्या काशी, कुर्ल्याच्या विनायक परशुराम गोडबोल्यांची पत्नी.

* **गणेश विष्णु** (१०) ज. स. १९२५. दत्तक, पूर्वीचें नांव गजानन कृष्ण पेंडसे. इंग्रजी ५ वी.

* **वासुदेव वामन** (९) ज. स. १८८४. मेटचास पोलिसपाटील आहेत. शेती व भिक्षुकी करितात. भार्या लक्ष्मी (तारा), रावतळ्याच्या सीताराम गंगाधर देवधरांची मुलगी. कन्या (१) भीमा (लक्ष्मी), भिल्याच्या हरी बाळकृष्ण केतकरांची पत्नी. (२) कृष्णा, मेटच्याच्या जनार्दन शिवराम ओकांची पत्नी.

* **मोरेश्वर वासुदेव** (१०) ज. स. १९२५, इंग्रजी ४ थी.

* **दिनकर वामन** (९) ज. स. १८८९. मॅट्रिक. डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा दिली. पोलिस प्रॉसिक्युटर आहेत. अविवाहित.

* **कृष्णाजी वामन** (९) ज. स. १८९१. मॅट्रिक. मनोरा ऑबझर्व्हेटरींत नोकरी आहे. भार्या (१) मंडणगडच्या जोश्यांकडील. भार्या (२) राधा, परशुरामच्या चितळ्यांकडील. कन्या (१) कमल, वय ११. (२) विमल, वय ९. (३) सुशीला, वय ५. सर्व अपत्यें दुसरीचीं.

* **यशवंत कृष्ण** (१०) ज. स. १९२२. कराचीस इंग्रजी ७ वींत.

गजानन कृष्ण (१०) चुलत्यास दत्तक. नंतरचें नांव गणेश विष्णु.

* **शंकर कृष्ण** (१०) ज. स. १९३१. मराठी ३ री.

* **विश्वनाथ वामन ऊर्फ गोपाळ** (९) ज. स. १८९३. काशीस वेदांताचें अध्ययन केलें. स. १९२१ त हिमालयांत तीर्थयात्रेस गेले. पत्ता नाहीं. अविवाहित.

नारायण वासुदेव (७) भार्या गंगा, पागमळ्याच्या चितळ्यांकडील.

श्रीधर नारायण (८) जव्हारेस नोकरी होती. नंतर खोपीस भिक्षुकी करीत. भार्या राधा.

बाळकृष्ण श्रीधर (९) मृ. स. १९३७. हे खोपीस असत. यांस मुली आहेत.

हरी वासुदेव (७) भार्या आनंदी. पेन्शनर सर्व्हेअर होते व मेटें येथें राहात.

सदाशिव हरी (८) ज. स. १८४६. वरसोलीस मराठी शाळेंत हेडमास्तर होते.

शंकर सदाशिव (९) मुंबईस जी. आय्. पी. रेल्वेंत नोकर होते. यांस एक कन्या होती.

मोरेश्वर वासुदेव (७) कुळवंडी येथें सावकारी व भिक्षुकी करीत.

उद्धव मोरेश्वर (८) कुंभाड येथें भिक्षुकी व सावकारी करीत. भार्या (१) वेरळच्या दामल्यांकडील. पुत्र रंगनाथ. कन्या बगी. भार्या (२) वेरळच्या दामल्यांकडील.

* **रंगनाथ उद्धव** (९) वय ४८. मुंबईस शिवणकाम करितात. अविवाहित.

त्र्यंबक मोरेश्वर (८) हे घोलवडास शाळामास्तर होते.

* **महादेव त्र्यंबक** (९) यांस मुलें आहेत.

बाळकृष्ण वासुदेव (७) कुळवंडीस सावकारी व भिक्षुकी करीत. कन्या वालू, चिपळूणच्या कान्हेऱ्यांकडे दिली.

सीताराम बाळकृष्ण (८) तुपटाकळी येथें शिक्षक होते. पुढें शेती करीत.

बाबू सीताराम (९) तुपटाकळीस शेती करीत.

केशव काशीनाथ (७) मेटें येथें सावकारी करीत.

गोपाळ केशव (८) मेटें येथें भिक्षुकी करीत.

गणेश गोपाळ (९) नोकरी होती. भार्या सरस्वती.

* **त्र्यंबक गणेश** (१०) मेटचास असतात. सात्वीणगांवास किराणा मालाचें दुकान आहे.

* **केशव त्र्यंबक** (११)

वामन केशव (८) मेटचास सुखवस्तु होते. भार्या जानकी, भिल्याच्या केतकरांकडील. कन्या (१) मनी, पंढरपूरच्या विष्णुपंत काणे वकिलांची पत्नी. (२) काशी, चिपळूणच्या काशीकरांकडे दिली.

नारायण वामन (९) मेटचास सुखवस्तु. भार्या मेटचाच्या रिसबुडांकडील.

भिकाजी गंगाधर (९) भार्या लक्ष्मी. कन्या (१) मनू, (२) काशी.

विष्णु भिकाजी (१०) ज. स. १८४७. अबकारी इन्स्पेक्टर होते. भार्या सरस्वती, ओकांकडील. कन्या (१) गंगू, सोमणांकडे; (२) यमू, आगाशांकडे; (३) कृष्णा, सहस्रबुद्धे यांजकडे दिली.

रामचंद्र विष्णु (११) ज. स. १८७८; मृ. स. १९२० नवज्वर. एल्. सी.पी.एस्. होते. भार्या (१) जानकी, बापटांकडील. भार्या (२) जानकी, मोडकांकडील. कन्या (१) दुर्गा, बिवलकरांकडे; (२) अंबू, नामजोश्यांकडे दिली. (३) यशोबाला.

* **नारायण रामचंद्र** (१२) ज. स. १९०८. पुण्यास इलेक्ट्रिक कंपनींत नोकरी आहे. पत्ता–लिमयेवाडी, मोडक यांचा बंगला, पुणें.

* **गणेश विष्णु** (११) ज. स. १८९७. पुण्यास स्टँडर्ड ऑप्टिकल कंपनींत नोकरी आहे. भार्या शारदा, जोश्यांकडील. कन्या विमल.

कृष्णाजी भिकाजी (१०) मृ. स. १९१६. वय ७५. सरकारी नोकरी होती. भार्या (१) राधा. भार्या (२) रमा, डोंगऱ्यांकडील. भार्या (३) अन्नपूर्णा, मोन्यांकडील. वय ५०. पुत्र ४. कन्या शांता (सीता), वय ३५. महादेव त्र्यंबक जोश्यांची पत्नी.

* **शंकर कृष्ण** (११) ज. स. १९०७. पुण्यास केसरी–मराठा ऑफिसांत नोकरी आहे. पत्ता–५६६ नारायण पेठ, पुणें. भार्या मंदाकिनी, खाडिलकरांकडील.

* **रघुनाथ कृष्ण** (११) वय २७. पुण्यास सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटींत नोकरी आहे. भार्या सुशीला, दातारांकडील.

* **सदाशिव कृष्ण** (११) वय २५. सोलापुरास हरीभाई देवकरण हायस्कुलांत शिक्षक आहेत.

* **अनंत कृष्ण** (११) वय २२. केसरी–मराठा संस्थेंत नोकरी आहे.

बळवंत नीळकंठ (७) हे कोंकणांतून गरिबीमुळें ३ मुलगे व १ मुलगी बरोबर घेऊन हैद्राबादेकडे बीड-अंबाडें गांवीं राहण्यास आले. बाजीराव पेशवे ब्रह्मावर्तास गेले त्या वेळीं हे सहकुटुंब तिकडे राहावयास गेले (ऐ. प्र. क्रमांक ३०–३१ पहा). भार्या सुंदरा. कन्या सरस्वती, हिचें लग्न दुसरे बाजीराव पेशवे यांजबरोबर माहुलीस झालें (भा. वर्ष. पं. प्र. श. पृ. ९९). सरस्वतीबाईची एकोत्तिष्ठता बाजीराव पेशवे यांनीं केली. तिचे बत्तीस ग्रास घ्यावे लागतात. ते घेणाऱ्यास बत्तीस लाख रुपये दिले. घेणारा ब्राह्मण गोमांतकाकडील होता. तो पैसा त्याचे घरीं पावता केला (भा. इ. स. मं. त्रैमासिक व. १८ अं. ४ पृ. १४६ व १४८).

अमृत बळवंत (८) हे दुसरे बाजीराव यांची पत्नी सरस्वतीबाईचे ज्येष्ठ बंधु यांस पदरीं १०० स्वार व १०० पायदळ बाळगून स. १८१७–१८ चे इंग्रजांबरोबरचे लढाईंत सरस्वतीबाईचें रक्षण करण्याचे कामावर नेमलें होतें. (ऐ. प्र. क्रमांक ३२ व ३४ पहा). शाहीर प्रभाकर यानें केलेल्या दुसरे बाजीरावाचे पोवाडयांत पुढील उल्लेख आला आहे:—

"बाईसाहेबांना तशिच घोडयावर पाठीस बांधुनी।
नेलें काढुनियां अमृतराव बळवंत ज्येष्ठ बंधूनि॥"

(य. न. केळकरकृत ऐतिहासिक पोवाडे, पृ. ४००)

कृष्णाजी अमृत (९) हे बिथुराहून ग्वाल्हेरास राहावयास गेले. भार्या राधा.

वामन कृष्ण (१०) हे चुलत्यास दत्तक गेले. तेथील नांव वामन गोविंद.

गोविंद अमृत (९) भार्या रखमा.

* **वामन गोविंद** (१०) ज. श. १७८०. ह्यांचें मूळचें नांव वामन कृष्ण असून हे आपल्या चुलत्यास दत्तक गेले. बडोदें राज्यांत तुरुंगखात्यांत अकाउंटंट असतांना स. १९१५ त पेन्शन घेतलें. सध्यां अहमदाबादेस (दिवाणजीचा वाडा, भद्र) राहतात. भार्या सुंदरा (मथुरा), गोखल्यांकडील. कन्या मीरा.

* **वासुदेव वामन** (११) ज. श. १८३२. अहमदाबादेस पोष्टखात्यांत नोकरी आहे.

* **ज्ञानदेव वामन** (११) ज. श. १८५०. गुजराथी तिसरे इयत्तेंत शिक्षण चालू.

गणेश बळवंत (८) मृ. बिथुरास स. १८५४ चे सुमारास. दुसरे बाजीराव पेशवे यांची पत्नी सरस्वतीबाई हिचे रक्षणाचे कामावर हे होते (ऐ. प्र. क्र. ३२–३३ पहा). भार्या सरस्वती. कन्या मनकर्णिका, ग्वाल्हेरच्या माधवराव लवाटयांची पत्नी.

रामचंद्र गणेश (९) ज. स. १८२७-२८; मृ. स. १९०२. बिथुराहून वयाचे २१ वे वर्षी उद्योगधंद्यासाठीं ग्वाल्हेरीस आले. लष्करीखात्यांत नोकरी करून पेन्शनचे वेळेस (स. १८९९) पर्सनल असिस्टंट टु क्वार्टरमास्टरजनरल झाले. धार्मिक प्रवृत्ति असून नियमानें रुपयांतील दोन आणे धर्मादायाकरितां काढून ठेवीत असत. भार्या (१) जानकी; भार्या (२) अन्नपूर्णा; भार्या (३) जानकी; भार्या (४) सीता, पुण्याच्या सहस्रबुद्धयांकडील. पुत्र पुरुषोत्तम. कन्या (१) गोदू, ग्वाल्हेरच्या गंगाधर विठ्ठल आगाश्यांची पत्नी. (२) सखू, ग्वाल्हेरच्या बळवंतराव परांजप्यांची पत्नी.

* **पुरुषोत्तम रामचंद्र** (१०) ज. ग्वाल्हेर स. १८८१. मॅट्रिक स. १९०२. कॉलेजमधील शिक्षण २ वर्षे घेऊन ग्वाल्हेरास कांहीं वर्षे नोकरी केली. नंतर अलाहाबादेस अकाउंटंट जनरल यु. पी. चे ऑफिसांत सीनिअर सुपरिंटेंडेंटचे जागेवर आहेत. पगार ४४०. पत्ता–साऊथ मलाका १३६-२, अलाहाबाद. भार्या (१) राधा, मृ. स. १९१८, ग्वाल्हेरच्या जोश्यांची मुलगी. पुत्र गजानन. भार्या (२) सत्यभामा, प्रभाकर बळवंत भिडयांची मुलगी.

* **गजानन पुरुषोत्तम** (११) ज. स. १९०८. अलाहाबादेस बी. एस्सी. (ऑनर्स) स. १९२९ व एम्. एस्सी. स. १९३१ त झाले. कामताप्रसाद कक्कड यांची रीसर्च स्कॉलरशिप (इंडियन ड्रग्ज) दरमहा रु. १०० ची दोन वर्षें मिळाली. सध्यां ग्वाल्हेरास व्हिक्टोरिया कॉलेजांत लेक्चरर आहेत. पगार रु. १००. पत्नी शांता, देवासच्या काशीनाथराव नातूंची मुलगी.

गंगाधर चिंतामणि (९) कन्या योगा.

* **चिंतामणि गंगाधर** (१०) ज. स. १८५९. विजापूर, रत्नागिरी वगैरे जिल्ह्यांत मामलेदार होते. सध्यां पेन्शनर. मुक्काम जत. पूर्वजांस रामदुर्ग संस्थानांतून शंभर रुपये तैनात मिळत असे. भार्या (१) गंगा (मृत). भार्या (२) गंगा, (मृत) पटवर्धनांकडील.

* **गंगाधर (आप्पा) चिंतामणि** (११) ज. स. १८९७. एल्. सी. पी. एस्. जतचे चीफ मेडिकल ऑफिसर आहेत. भार्या इंदिरा, ज. इचलकरंजी १९०६. विवाह स. १९२०, फडणिसांकडील. ह्या नाटक, कादंबरी व लघुकथालेखिका आहेत.

रामचंद्र चिंतामणि (११) ज. स. १९००; मृ. आत्महत्या वय २८. बी. एजी. (१९२५), असून सरकारी नोकरी होती. भार्या जानकी.

* **वसंत चिंतामणि** (११) ज. स. १९१५. कॉलेज शिक्षण चालू. पुणें.

विनायक गंगाधर (१०) मृ. अर्धांग वायु. मॅट्रिक. शाळाखात्यांत नोकरी होती. भार्या भागीरथी.

* **शंकर विनायक** (११) मॅट्रिक. बेळगांवला विमा एजंट आहेत. भार्या सुशीला.

गोविंद गंगाधर (१०) मृ. अर्धांग वायु. स्कूलफायनल पास. भार्या चंद्रा. कन्या द्वारका.

* शंकर सदाशिव (१०) ज. बडनगर. वय ४६. महक्मा कागजातदेहीमध्यें पटवारी आहेत. भार्या पार्वती. नरगुंदच्या पटवर्धनांकडील. कन्या कावेरी, उज्जयिनीस जोश्यांकडे दिली.

* व्यंकटेश (राजा) शंकर (११) वय १५. इंग्रजी चौथी.

* लक्ष्मण (गजानन) शंकर (११) वय १३. इंग्रजी तिसरी.

* गोपाळ (बबन) शंकर (११) वय ७. बालवर्ग.

* विष्णु सदाशिव (१०) वय ४१. महक्मा कागजातदेहीमध्यें पटवारी आहेत. भार्या सत्यभामा, दातारांकडील. कन्या विमल.

* कमलाकर विष्णु (११) वय १९. इंग्रजी पांचवी.

* दत्तात्रेय (बाबू) विष्णु (११) वय १५. इंग्रजी चौथी.


* दिगंबर विष्णु (११) वय १०. बालवर्ग.

विनायक महादेव (६) भार्या रखमा.

विठ्ठल विनायक ऊर्फ बाबा (७) भार्या भागीरथी.

रामचंद्र विठ्ठल (८) भार्या सीता, भिल्याच्या केतकरांकडील.

* विनायक रामचंद्र (९) ज. मेटें सुमारें श. १७९५. मॅट्रिक. विद्याव्यासंगी व कुशाग्रबुद्धीचे असून संस्कृत व गणित चांगलें जाणत. उमरावतीस कै. दादासाहेब खापर्डे यांच्याजवळ पंचदशी श्रवण केली. श. १८२३ त वाईस आले व तेथें ३ वर्षें श्रीप्रज्ञानंदस्वामीं-जवळ वेदान्ताचें श्रवण केलें. श. १८२९ त माहुलीस श्रीब्रह्मानंदस्वामींचे शिष्य श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी यांच्या-कडून संन्यासदीक्षा घेतली. नंतरचें नांव श्री पूर्णानंद सरस्वती. माहुली व वाई या भागांत २–३ वर्षें वास्तव्य करून आय-



श्रीपूर्णानंद सरस्वती

नीस गेले. तेथें मठांत राहून वेदान्ताचा पाठ सांगत असत. २२ वर्षांपूर्वी नर्मदातीरीं गेले. हिमालयांत विष्णुप्रयागाला २ वर्षांपूर्वी होते असें कळतें.

भार्या रखमाई, कोतळुकच्या ओकांकडील. कन्या (१) पालगडचे जोश्यांकडे दिली.

कृष्णाजी रामचंद्र (९) ज. मेटें; मृ. स. १९११, पोटांत गळू होऊन. उमरावतीस महादेव गंगाधर दामले वकिलांकडे कारकून होते. भार्या राधा, परशुरामच्या गणपुल्यांकडील. कन्या (१).

* **गोविंद रामचंद्र** (९) ज. मेटें श. १८०४. शिक्षण मराठी. पूर्वी वणीस राहात. सध्यां अकोल्यास किराणा मालाचें दुकान आहे. पत्ता—आगरवेसजवळ के. वाय्. देशपांडे वकील यांचे घरीं. भार्या लक्ष्मी, दोणवलीच्या फडक्यांकडील. कन्या (१) गोडश्यांकडे दिली.

* **सदाशिव गोविंद** (१०) ज. दोणवली, श. १८३१. अकोल्यास गिरणींत मेकॅनिकल खात्यांत टर्नरचें काम करितात. भार्या उमा (मालती), ओकांकडील.

बाळंभट अनंत (४) भार्या रखमा.

भास्कर बाळंभट (५) भार्या रखमा. हे स. १७८१ त आयनीस (आंजणी) असल्याचा उल्लेख आढळतो.

जनार्दन भास्कर ऊर्फ बापू (६) भार्या आनंदी.

कृष्णाजी जनार्दन (७) मृ. स. १९१२, वय ८०. मेटचास शेती करीत. भार्या रुक्मिणी, पालगडच्या गोखल्यांकडील. कन्या (१) आका, भोंकरच्या पांडुरंग लक्ष्मण ओकांची पत्नी. (२) दुर्गा, जालगांवच्या महादेव पुरुषोत्तम जोश्यांची पत्नी. (३) मथुरा, नांदगांवच्या भास्कर गणेश कोपरकरांची पत्नी.

गोपाळ कृष्ण (८) मृ. स. १९१०, वय ६०. शेती करीत. भार्या गंगा (भीमा), वेरळच्या दामल्यांकडील. कन्या (१) घारू, पांडुरंग विश्वनाथ दीक्षित (काणे) यांची पत्नी. (२) कृष्णा (अन्नपूर्णा), पागमळ्याच्या पांडुरंग केशव चितळ्यांची पत्नी.

लक्ष्मण गोपाळ (९) मृ. स. १९०९ वय ३८. भार्या सावित्री, केशव गणेश देवधरांची मुलगी.

* **वैजनाथ लक्ष्मण** (१०) ज. स. १९०२, मार्च १६. मुंबई म्युनिसिपालिटीच्या असेसमेंट अॅन्ड कलेक्शन डिपार्टमेंटमध्यें कारकून आहेत. पत्ता—लक्ष्मीबाईची चाळ, झावबाची वाडी, मुंबई नं. २. भार्या बनू, विठ्ठल केशव फडक्यांची मुलगी. कन्या (१) लतिका, वय १०. इंग्रजी पहिली. (२) लीला, वय ५.

* **माधव वैजनाथ** (११) वय २.

* **गजानन लक्ष्मण** (१०) ज. स. १९०८. मुंबई म्युनिसिपालिटींत असेसमेंट अॅन्ड कलेक्शन डिपार्टमेंटमध्यें कारकून आहेत. पत्ता—चिचघर चाळ, पहिला मजला, खोली नं. १५, आगरबझार, दादर. भार्या बाबी (आवडी), श्रीधर परशुराम चितळ्यांची मुलगी.

* **श्रीकृष्ण गजानन ऊर्फ मधु** (११) वय ३.

* **पुरुषोत्तम गोपाळ** (९) वय ४०. मुंबईस ट्रामकंपनींत नोकरी आहे. पत्ता— लक्ष्मीबाईची चाळ, झावबाची वाडी. भार्या रमा, लक्ष्मण गणेश कान्हेऱ्यांची मुलगी.

* **पंढरीनाथ पुरुषोत्तम** (१०) वय २०. दादर येथें कापडाचे दुकानांत नोकरी आहे.

भार्गव कृष्ण (८) मृ. स. १९३३. हे मेटयास भिक्षुकी करीत. भार्या आनंदी, वैद्यांकडील.

* **रघुनाथ भार्गव** (९) वय ३८. खाजगी नोकरी आहे. भार्या सीता.

* **वामन भार्गव** (९) वय ३६. खोपीस मराठी शाळामास्तर आहेत.

वासुदेव कृष्ण (८) मृ. समयीं वय ३२. जळगांवास म्युनिसिपालिटींत नोकर होते. भार्या यशोदा, चक्रदेवांकडील.

परशुराम कृष्ण (८) वयाच्या १८ व्या वर्षी विद्यार्थिदशेंत मृत्यु.

* **जनार्दन कृष्ण** (८) ज. श. १७९३ पौ. व. ७. खानदेशांत पोलिस खात्यांत नोकरी होती. जमादार असतांना पेन्शन घेतलें. सध्यां सेवानिवृत्त असून पुण्यास (घर नं. २०० अ, शनिवार पेठ,) असतात. भार्या उमा (यमू), पालगडच्या रामचंद्र वामन जोश्यांची मुलगी. कन्या (१) गोदावरी (लक्ष्मी), ज. श. १८२४. शेंदुर्णीच्या गणेश रामचंद्र ओकांची पत्नी. (२) कमल, ज. श. १८४८ आषाढ शु. ११. मराठी ४ थी.

* **दत्तात्रेय जनार्दन** (९) ज. श. १८२६ कार्तिक व. १. पुण्यास जी. आय्. पी. रेल्वेंत नोकरी आहे. भार्या सुशीला (आवडी), सुसवेरीच्या माधवराव सहस्रबुद्ध्यांची मुलगी.

* **नरहरी जनार्दन** (९) वय ३०. मेटयास शेती करितात.

* **गोविंद जनार्दन** (९) ज. श. १८३९ अधिक भाद्र. शु. १५.

महादेव भास्कर (८) मृ. श. सुमारें १८११. मेटयास शेती करीत.

हरी महादेव (९) मेटयास शेती करीत.

* **बाळकृष्ण हरी** (१०) ज. स. १९१८. इंग्रजी ४ थींत.

* **मुरलीधर हरी** (१०) मराठी विद्यार्थी.

* **घनश्याम हरी** (१०) मराठी विद्यार्थी.

बाळंभट नारायण (२) हे आयनीमेटयाहून तारळें येथील जहागिरदार महाडीक हे तारळयास आले त्या वेळीं त्यांजबरोबर त्यांचे उपाध्याय असल्यामुळें तेथें आले. भार्या मनुबाई.

सदाशिव महादेव (४) भार्या उमा.

महादेव सदाशिव (५) हे कल्याण सुभ्यावर सुभेदार होते असें म्हणतात. भार्या पार्वती.

विश्वनाथ महादेव (६) मृ. श. १८१८ वय ७५. यांस बडोदें सरकारकडून इनाम रुपये तीनशें मिळत असे. तें सध्यां कांहीं कमी होऊन त्यांचे वंशजांकडे

चालू आहे. तारळचाचे महाडीक यांची कन्या बडोद्याचे गणपतराव गायकवाड महाराज यांस दिली; व पेंडसे हे महाडिकांचे उपाध्याय असल्यामुळें त्यांना हें इनाम बडोदें सरकारकडून मिळालें आहे.

बाळकृष्ण विश्वनाथ (७) मृ. स. १९३६ एप्रिल ११; वय ५५. हे आपल्या चुलत्यांना दत्तक आले. मूळचें नांव यशवंत सदाशिव पेंडसे. भार्या राधा, मोरगिरीच्या महादेव गणेश जोश्यांकडील. कन्या (१) आवडी (आऊ), बडोद्याच्या दत्तात्रेय भाऊ दामल्यांची पत्नी. (२) यशोदा, साताऱ्याच्या चिंतामणि नारायण गोडबोल्यांची पत्नी. (३) गंगू, वाईच्या दत्तात्रेय कृष्ण ओकांची पत्नी.

* **गणेश बाळकृष्ण** (८) ज. स. १९१४ फेब्रु. १९. मॅट्रिक व थर्ड इयर ट्रेंड शिक्षक, भावे प्राथमिक स्कूल पुणें येथें आहेत. पत्ता—वेलणकरांचा बंगला, लिमयेवाडी, सदाशिव पेठ. भार्या लीलावती, नाशिकच्या गणेश त्र्यंबक भावे वैद्यांची मुलगी. विवाह श. १८५९.

* **रघुनाथ बाळकृष्ण** (८) वय २०. व्हर्ना. फायनल. कलकत्त्याची संस्कृत प्रथमा उत्तीर्ण. सध्यां इचलकरंजी प्राज्ञपाठशाळेंत शिक्षण चालू.

* **पुरुषोत्तम बाळकृष्ण** (८) वय १५. व्हर्ना. फायनल पास. तारळचाच्या ए. व्ही. स्कूलमध्यें इंग्रजी शिक्षण चालू.

* **विष्णु बाळकृष्ण** (८) वय ११. मराठी ६ वी, तारळें.

सदाशिव महादेव (६) मृ. श. १८२७. वय ८७. भार्या जानकी, वय ९८. कन्या (१) बगू, चाफळच्या गोविंदराव फाटकांची पत्नी. (२) गोदू, पाडळीच्या माधवराव कानिटकरांची पत्नी. (३) द्वारका (अन्नपूर्णा), लिंबच्या बाळाजी पांडुरंग वेलणकरांची पत्नी. (४) भीमा, इंदोलीच्या विनायकराव पटवर्धनांची पत्नी.

* **महादेव सदाशिव** (७) वय ६५. तारळचास भिक्षुकी व शेती करतात. भार्या पार्वती, साताऱ्च्या गणेश वासुदेव गणपुल्यांची मुलगी. कन्या (१) कुसाताई, वय २६, माहुलीच्या वासुदेव हरी गोडबोल्यांची पत्नी. (२) विमल, वय १८, गंगाधर दामोदर बापटांची पत्नी. (३) सुंदर, वय १४. (४) सुशीला, वय ५.

* **विश्वनाथ महादेव** (८) वय ३३. मॅट्रिक. तारळचाच्या लोकलबोर्डशाळेंत शिक्षक आहेत. भार्या भागीरथी, साताऱ्च्या जनार्दन शिवराम बेडेकरांची मुलगी. कन्या (१) कमल, वय ८. (२) सुमन, वय ६. (३) सिंधु, वय १.

* **सीताराम विश्वनाथ** (९) वय ५.

* **मुकुंद विश्वनाथ** (९) वय ३.

* **सदाशिव महादेव ऊर्फ बंडू** (८) वय २८. मुंबईस (सोमण बिल्डिंग, केनडी पुलाजवळ) आयुर्वेदिक व होमिओपाथिक वैद्यकी करतात. भार्या मालती, डोंगरच्या गोखल्यांकडील.

पांडुरंग महादेव (८) हे साताऱ्याच्या गणपुले घराण्यांत दत्तक गेले.
* **अनंत महादेव** (८) ज. स. १९१४ जाने. ३१. शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें आहे.
* **मारुति महादेव** (८) ज. स. १९१६ जुलै २३. पुण्यास गव्हर्नमेंट हॅन्डवीव्हिंग इन्स्टिटयूटमध्यें शिक्षण घेत आहेत.
* **विनायक महादेव** (८) वय १३. मराठी ६ वी, तारळें.
* **नारायण महादेव** (८) वय ११. मराठी ६ वी, तारळें.

यशवंत सदाशिव (७) हे आपले चुलत्यास दत्तक गेले. नंतरचें नांव बाळकृष्ण विश्वनाथ.
गोपाळ बाळंभट (६) भार्या रखमा, विटयाच्या कानडयांकडील.
भास्कर सदाशिव (५) हे कऱ्हाडास मुजुमदार होते. भार्या सावित्री.
केशव भास्कर (६) भार्या लक्ष्मी.

घराणें १५ वें, कोचरें

(वंशावळ पृ. ११८ ते १२७)

या घराण्याचा मूळ पुरुष रामभट (सखाराम). कोंकणांतील मूळ गांव वेंगुर्ले तालुक्यांतील कोचरें. ह्या गांवीं शके १३१३ वैशाख व. ३०, सौम्यवासर, प्रजापति संवत्सर या दिवशीं २४ ब्राह्मणांस २५ वृत्ति, विजयनगरचे राजातर्फे देण्यांत आल्या. त्याचा ताम्रपट उपलब्ध झाला आहे (मठगांवचा शिलालेख आणि कुडाळ प्रांताचा प्राचीन इतिहास–परिशिष्ट लेखांक १. अ. ब. वालावलकरकृत, पहा). या २४ ब्राह्मणांत भारद्वाजगोत्री ५, वाशिष्ठगोत्री ३, अत्रिगोत्री ६, कौशिकगोत्री २, कुत्सगोत्री १, जामदग्न्यवत्सगोत्री २ व जामदग्न्यगोत्री ५ होते. जामदग्न्यगोत्री ब्राह्मणांत या घराण्याचा पूर्वज असेल काय ? या गांवीं भातपिकाची जमीन पुष्कळ असून येथें पूर्वी बरीच ब्राह्मणवस्ती होती. भटवाडी या नांवाचा एक भाग अद्यापिहि तेथें आहे; परंतु सध्यां तेथें ब्राह्मणांचीं एकदोनच घरें आहेत. पेंडसे, नातू, करंदीकर, मराठे व शिधये यांची येथें पूर्वी वस्ती होती. पेंडसे व नातू यांचे वस्तीची जागा अद्यापिहि तेथें त्यांचेच नांवानें ओळखितात. या गांवीं आज पेंडसे यांचें वास्तव्य नाहीं.

कोचरें येथून यांची कांहीं मंडळी पटवर्धन संस्थानिक यांचे आश्रयास मिरज–सांगलीकडे व कांहीं गायकवाड सरकारचे आश्रयास बडोद्याकडे गेली. सध्यां यांचें वास्तव्य अकलूज, आजरें, आंवळेगांव, इचलकरंजी, उगार, कवळें (गोवा), कासेगांव, कोडोली, कोरेगांव, कोल्हापूर, खानापूर, गडहिंग्लज, गणेशवाडी, गुळधुवें, गोरेगांव (मुंबई), गंगरवा (गुजराथ), जमखिंडी, धारवाड, पुणें, पेडणें (गोवा), बडोदें

बेळगांव, बैलहोंगल, मुंबई, सांखळी (गोवा), सांगली, सातारा, सावंतवाडी, सोलापूर, हरीपूर व हैद्राबाद या गांवीं आहे. पूर्वी यांचें वास्तव्य आजगांव, ओरोसखुर्द, इंद्रूर, कडावली, कापशी, चांदा, जांभूळपाडा, ठिकरी–खानापूर, नवसरी, पेण, पेणें, भुसावळ, मसूर, मालवण, मिरज व शिराळी वगैरे गांवींहि झाल्याचें आढळतें.

घाटावर आल्यावर या मंडळींपैकीं कांहीं मंडळी पुन्हां कोंकणांत परत गेली. त्यांचें वास्तव्य सध्यां गोवें प्रांतांतील कवळें व सावंतवाडी संस्थानांतील आंवळेगांव व गुळधुवें येथें आहे.

या घराण्यांत हरीपूर येथें श. १७२८ मध्यें पटवर्धन संस्थानिकांकडून तीन पेंडसे मंडळीस इनाम मिळालेली जमीन अद्यापि त्यांचे वंशजांकडे चालत आहे. (ऐ. प्र. क्रमांक २८ व २९ पहा). कोल्हापूर संस्थानांतील गडहिंग्लज गांवीं, तसेंच मौजे चांदेवाडी ता. आजरें येथेंहि इनाम जमीन मिळाली आहे. बडोद्याकडे गेलेल्या शाखेंत गंगाधर रामचंद्र (६) यांस दान मिळालेली सुमारें दीड एकर इनाम जमीन मौजे वेजलपूर (नवसरी) येथें आहे.

कुलस्वामी व कुलदेवता :—कोचरें येथील भावेश्वरी (भाव्यै) व मूळ पुरुष या देवतांना, तसेंच कांहीं मंडळी कोचऱ्यापासून ८।१० मैलांवर असलेल्या वेळणेश्वर देवास व कांहीं मंडळी जोगेश्वरी देवतेस नैवेद्य दाखवितात. कवळें येथील मंडळी वरील भावेश्वरी व योगेश्वरी या देवतांशिवाय देवीच्या गाभाऱ्यांत असलेल्या इतर तीन देवता व भावेश्वरी देवळाच्या समोर असलेली श्रीसांतेरी या देवता मानतात. कृष्णंभट विनायक (४) यांच्या कूटांतील कांहीं मंडळी आदित्यनाथ व योगेश्वरी या कुलदेवता मानतात. आजऱ्यास आलेले लोक भावेश्वरी व आदित्यनाथ, यांशिवाय आजगांव येथील वेताळ व आजरें येथील काशीविश्वनाथ, रवळनाथ, ब्रह्मनदेव व रांगणाई या देवास नैवेद्य दाखवितात. हरीपूर येथील मंडळी भावाई, वेळणेश्वर, महापुरुष, वेताळ व जोगेश्वरी व इतर पांच ग्रामदेवता यांना नैवेद्य दाखवितात.

नवरात्रांत अखंड दीप, माळ व उठती बसती सुवासिनी व ब्राह्मण सांगणें व एकानें धान्यफराळ करणें व बोडण भरणें हा सामान्य कुलाचार आहे. कांहीं घरीं बोडण त्रैवार्षिक असतें. कवळें (गोवा) येथें असणारे कूटांत मोटन (बोडण) भरण्याचा विशेष प्रकार आहे तो असा :—दरसाल दसऱ्यास बोडण भरावयाचें, घरांत गायीचें दुभतें असेल तरच बोडण भरावयाचें, म्हशीचें असल्यास नाहीं. वरीलप्रमाणें दसऱ्यास बोडण न घडल्यास वर्षांतून केव्हां तरी पांच सुवासिनी, कुमारिका व ब्राह्मण यांना भोजन घालतात. बोडण भरीत नाहींत. या घराण्यांतील बऱ्याच मंडळींची श्रावणमहिन्यांत लघुरुद्र करण्याची वहिवाट आहे. मार्गशीर्ष पौर्णिमेस श्रीजोगेश्वरीचा वाढदिवस म्हणून ब्राह्मण, सुवासिनी व कुमारिका यांस भोजनास सांगणें, तसेंच पौषांतील एका मंगळवारीं देवीचा जोगवा

मागणें अशी कांहींजणांत चाल आहे. देशावर आल्यावर कांहीं मंडळींनीं खंडोबा हें नवशिक दैवत अधिक स्वीकारलें आहे.

भावेश्वरी (भावै–भावाई–भाव्यै) या कोचरें येथील देवीस पेंडसे या व्यतिरिक्त नातू, मराठे, करंदीकर व शिधये हेहि कुलदेवता मानितात असें समजतें. सध्यां बेळगांवचे करंदीकर हे या देवीचे देवळांत सांजवात लावण्यासाठीं खर्च देतात. मळ पुरुषाचें देऊळ कोचरें येथें पेंडसे या नांवाच्या ठिकाणामध्यें आहे. या देवळाचा जीर्णोद्धार शके १८५७ सालीं बिश्वनाथ वासुदेव (७) राहणार कवळें यांनीं केला.

या घराण्यांत पिढ्या १०, एकूण व्यक्ति ३६१ व जिवंत व्यक्ति १२२ आहेत.

गोपाळ महादेव (३) हे मूळ कोचऱ्याचे राहणारे. यांस श. १७२८ त पटवर्धनांकडून हरीपुरास उत्तम वैदिक म्हणून आठ बिघे जमीन इनाम मिळाल्याची सनद आहे (ऐ. प्र. क्रमांक २९ पहा).

भिकाजी गोपाळ (४) मृ. सुमारें श. १८१८. हरीपुरास राहात असत. भार्या अनसूया. कन्या (१) कुसाबाई; (२) यमू; (३) काशी; (४) गोदू.

* **कृष्णाजी बळवंत** (६) वय ६८. हे पूर्वी पुण्यास लोण्याचा व्यापार करीत. बुद्धिबळें खेळण्याची विशेष आवड आहे. राहणी टापटिपीची व व्यवस्थित. भार्या अन्नपूर्णा (रुक्मिणी). कन्या यमू, विवाह स. १९१७. पुण्याच्या छत्र्यांकडे दिली.

* **गजानन कृष्ण ऊर्फ पंडित** (७) ज. स. सुमारें १९०४.

महादेव भिकाजी (५) मृ. स. १८९८. वय ६०. भार्या पार्वती. कन्या (१) आऊ, गोपाळराव आठवल्यांची पत्नी. (२) अंबू, वाईच्या अनंतराव जोश्यांची पत्नी.

गणेश महादेव (६) मृ. प्लेग स. १८९८, वय २८. भार्या सरस्वती, हरीपूरच्या गोपाळभट ताम्हनकरांची मुलगी.

नारायण महादेव (६) हे रामचंद्र श्रीधर पेंडसे यांची भार्या सीताबाई हिचे मांडीवर स. १८९६ त दत्तक बसले. सीताबाई ही यांची मावशी होती. कोल्हापूर संस्थानांत शिक्षक होते. अविवाहित.

विठ्ठल महादेव (६) मृ. स. १९३४, वय ५२. वैदिक होते. कोल्हापुरास भिक्षुकी करीत. भार्या सत्यभामा, मिरजेच्या केळकरांकडील.

* **गोविंद महादेव** (६) वय ४०. पूर्वी भिक्षुकी करीत. सध्यां पुण्यास चित्रशाळा छापखान्यांत कंपॉझिटर आहेत. सदाशिव पेठचे हौदाजवळ सोहनी यांच्या वाड्यांत राहतात. भार्या राधा, विवाह स. १९१५. शहापूरच्या अनंत रामचंद्र केळकरांची मुलगी. कन्या शकुंतला, वय ८.

* **बंडो गोविंद** (७) वय ३.

* **बाळ गोविंद** (७) वय १.

रामचंद्र भिकाजी (५) ज. हरीपूर स. १८५५; मृ. स. १९११. बेळगांवास मुख

त्यार वकील होते. भार्या सीता, इचलकरंजीच्या गोखल्यांकडील. कन्या वाराणशी, पुण्याच्या श्रीपाद हरी दांडेकरांची पत्नी.

दत्तात्रेय रामचंद्र (६) ज. शहापूर स. १८७६; मृ. स. १९२३ आक्टोबर २५. मॅट्रिक. पोस्टखात्यांत नोकरी. एडनला सहा वर्षें नोकरीवर होते. ठाण्यास डेप्युटी पोस्टमास्तर होते. नमस्काराची आवड. शरीर उत्तम. भार्या यशोदा, विवाह १८९४. बेळगांवच्या लक्ष्मण गणेश केळकरांची मुलगी. कन्या (१) कमळा, रायबागच्या रामचंद्र अनंत नातूंची पत्नी. (२) कृष्णा, ज. स. १९२५. इंग्रजी २ री.

* **अनंत दत्तात्रेय** (७) ज. स. १९०५ जुलै १. मॅट्रिक. सातान्यास सिटीपोस्टांत क्लार्क आहेत. वडील लवकरच वारल्यामुळें अधिक शिक्षण घेतां आलें नाहीं. पत्ता—३९३ सोमवार पेठ. भार्या इंदिरा, सांगलीच्या कृष्णाजीपंत कोल्हटकरांची मुलगी. कन्या सुमन, ज. स. १९३२ मार्च २०.

* **श्रीराम अनंत** (८) ज. स. १९२८ ऑगस्ट २६. मराठी २ री.

* **विनायक रामचंद्र** (६) ज. इचलकरंजी, वय ४३. बी. ए. (१९१८); एल्‌एल् बी. (१९२७). ओरिएंटल लाइफ इन्शुअरन्स कंपनीच्या पुण्याच्या एजन्सींत नोकरी आहे. पत्ता—९४३ सदाशिव पेठ, पुणें. खेळाची आवड आहे. भार्या (१) सरस्वती, विवाह स. १९०७, गोखल्यांकडील. भार्या (२) सरोजिनी, विवाह स. १९२१, जोश्यांकडील.

बाळंभट वासुदेव (४) हे पुण्याकडे होते.

अनंत रामचंद्र (४) भार्या गंगा.

रामचंद्रभट अनंत (५) ज. सुमारें स. १७८८; मृ. स. १८६०, दमा. हे स्मार्ताग्नि बाळगीत. वैदिक, मोठे विद्वान् व धर्मशास्त्रज्ञाते होते. श्री. गोपाळराव मैराळ यांच्यातर्फे हरबाजी खंडेराव हे गायकवाडींत नवसरी येथें सुभेदार होते त्यांचे आश्रयास आले. तेथें यांस घर मिळालें व कायमचे राहिले. भार्या अन्नपूर्णा, दाभोळच्या ओगल्यांकडील. ज. श. १७४४; मृ. श. १८२६. कन्या (१) वेणू, ज. स. १८४७; मृ. स. १९३२. चिमणराव दिनकर बेहऱ्यांची पत्नी. (२) यमुना, ज. स. १८५०; मृ. स. १९१६. बाळशास्त्री काशीनाथ दुगलांची पत्नी.

गंगाधर रामचंद्र ऊर्फ बाळंभट (६) ज. दाभोळ स. १८४२ नोव्हें. १५; मृ. श. १८३८ आषाढ शु. ६, ताप. याज्ञिक, संस्कृत व गुजराथी उत्तम जाणत. बडोदें संस्थानांत अव्वलकारकून व तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटचे हुद्यावर होते. पेन्शन घेतल्यावर सुखवस्तु राहात. भार्या म्हाळसा (गोदावरी), ज. स. १८४९. विवाह स. १८५६, लेल्यांकडील. कन्या (१) कृष्णा, ज. श. १८०१, आश्विन शु. १३; मृ. श. १८५१, ज्येष्ठ शु. १४. सखाराम सीताराम जोश्यांची पत्नी. (२) काशी, ज. श. १८०६ माघ शु. ६. पुरुषोत्तम हरी पटवर्धनांची

पत्नी. (३) नर्मदा, ज. श. १८०९ भाद्रपद व. ५; मृ. श. १८३० आषाढ व. ३. शिवराम सदाशिव मनोहरांची पत्नी.

* **वामन गंगाधर** (७) ज. नवसरी. श. १७९३ भाद्रपद व. १. शिक्षण गुजराथी ६ वी इयत्ता व नंतर बी. ए. (स. १८९८). ठाणें जिल्ह्यांत रेव्हेन्यूखात्यांत रु. ३० वर नोकरीस सुरुवात. मामलतदार व पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट झाले. पगार रु. ३७०. वसईस मामलतदार असतांना स. १९२९ त पेन्शन घेतलें. संस्कृत वाङमय, विशेषतः तत्त्वज्ञानाची आवड आहे. सध्यां बडोद्यास स्वतःचे घरांत (शास्त्रीपोळ, रावपुरा) सुखवस्तु आहेत. भार्या (१) लक्ष्मी, ज.श.१७९६; मृ. श. १८२१ भाद्रपद व. १. विवाह श. १८०६. माहीमच्या पेठ्यांकडील. भार्या (२) लक्ष्मी, ज. श. १८०९; मृ. श. १८४१ पौष शु. ८. विवाह श. १८२१. सुरतच्या रामचंद्र महादेव दामल्यांची मुलगी. पुत्र कमलाकर. कन्या भीमा, ज. श. १८२६ ज्येष्ठ शु. ६; मृ. श. १८५८ मार्ग. शु. १०. विवाह स. १९१६. महादेव चिंतामण लेल्यांची पत्नी.

* **कमलाकर वामन** (८) ज. श. १८३२ भाद्रपद व. ११. बी. एस्सी. (एंजिनिअरिंग इलेक्ट्रिकल मेकॅनिकल) हिंदु विश्वविद्यालय. बडोदें संस्थानांत रेल्वे वर्कशॉपमध्यें अप्रेंटिस आहेत. भार्या शारदा (कुसुम), ज. श. १८४० आश्विन शु. १. मॅट्रिकचे वर्गांत; आगाश्यांकडील.

वासुदेव गंगाधर (७) ज. नवसरी श. १७९५ फाल्गुन व. ९; मृ. श. १८५५ ज्ये. शु. ६ रक्तक्षय. बी. ए. (१९०४). बडोदें संस्थानांत रु. ३० वर मुलकी खात्यांत नोकरीस सुरुवात होऊन नायबसुभे झाले. पगार ३५०. स्वारीकामदार म्हणून श्रीमंत गायकवाड यांजबरोबर दोन वेळ विलायतेस गेले होते. भार्या राधा, ज. श. १८०४ कार्तिक शु. १२. विवाह श. १८१४. कन्या (१) चंद्रभागा, ज. श. १८२५ वैशाख व. ४; मृ. श. १८५० फाल्गुन शु. १. पुरुषोत्तम सखाराम फाटकांची पत्नी. (२) इंदु, ज. श. १८४१ ज्येष्ठ शु. ११. मॅट्रिकचे वर्गांत. (३) गोदावरी, ज. श. १८४३ पौष शु. ५. इंग्रजी ६ वींत.

* **पद्माकर वासुदेव** (८) ज. श. १८३० श्रावण शु. १५. एम्. बी. बी. एस्. (१९३४); किंग एडवर्ड मेमो. हॉस्पिटल् परळ, मुंबई येथें नोकरी होती. सध्यां बडोदें राज्यांत 'खाद्यपेय तपासणी खातें' नुकतेंच सुरू करण्यांत आलें आहे. त्या खात्याचे मुख्य अधिकारी म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. पत्ता—शास्त्रीपोळ, रावपुरा, बडोदें. भार्या सरस्वती (गौर), ज. श. १८३६ आषाढ शु. १३. ह्या गृहीतागमा आहेत. साठ्ये यांजकडील.

लक्ष्मण अनंत (५) भार्या लक्ष्मी.

धोंडभट लक्ष्मण (६) ज. स. १८२९; मृ. स. १९१५. सांगलीस वैदिक होते. वैदिक मंडळींत यांस अग्रपूजेचा मान होता. यावरून यांस सांगलीस पाध्ये-

पेंडसे या नांवानें ओळखीत. यांचे चिरंजीव या नांवानेंच ओळखले जातात. भार्या रमा, केशवभट दातारांची मुलगी. कन्या (१) आऊ, हरीपूरच्या नारायण केशव फडक्यांची पत्नी. (२) मथुरा, सांगलीचे नरगुंदे यांस दिली.

गणेश धोंडभट (७) काशीचे वझे यांस दत्तक गेले.

प्रभाकर धोंडभट (७) मृ. वय ५५. सांगलीस वैदिक होते. भार्या लक्ष्मी.

हरी धोंडभट (७) याचें मूळचें नांव दत्तात्रेय विश्वनाथ. हा आपले चुलत्याचे मांडीवर दत्तक बसला. वयाच्या विसाव्या वर्षी मृत्यु. भार्या लक्ष्मी, सांगलीच्या केशवराव खाडिलकरांची मुलगी.

* **नारायण धोंडभट** (७) ज. श. १८०५ माघ शु. ९. यांचें मूळचें नांव नारायण कृष्ण पेंडसे असून धोंडभट यांस दत्तक गेले. हुबळीस वर्कशॉपमध्यें काम केलें. पुढें इस्लामपूर कचेरींत उमेदवार, नीरा कॅनॉल पिकाचे मोजणीदार, सांगली संस्थानांत जंगलखात्यांत कारकून; नंतर व्यापाऱ्याकडे कारकून. सध्यां सांगलीस लोखंडी सामानाचें दुकान आहे. भार्या (१) गौरी, कुरुंदवाडचे नीळकंठराव करंदीकरांची मुलगी. भार्या (२) लक्ष्मी, कौलापूरच्या (सांगली) विष्णुपंत गोखल्यांची मुलगी. कन्या शांता, कोरेगांवच्या बोडसांस दिली. भार्या (३) रुक्मिणी, जमखिडीच्या नारायणराव वैद्यांची मुलगी. कन्या गोदावरी, ज. स. १९२१.

विश्वनाथ लक्ष्मण (६) ज. कोचरें, मृ. वय ७५, दमा. वैदिक. हे सांगलीहून बडोद्यास गेले. तेव्हांपासून यांचे वंशज बडोदें संस्थानांत आहेत. भार्या उमा, रानडयांकडील. कन्या कृष्णा, ज. श. १७९४, उज्जैनच्या भिकाजीपंत दातारांची पत्नी.

विठ्ठल विश्वनाथ (७) ज. बडोदें; मृ. सुमारें श. १८३६. मराठी शिक्षण. नोकरी करीत. भार्या (१) रुक्मिणी, सहस्रबुद्ध्यांकडील. भार्या (२) रुक्मिणी, चोळकरांकडील. कन्या (१) नर्मदा, बाबूराव नारायण जोश्यांची पत्नी. (२) द्वारका, कडीचे पाटणकरांकडे दिली. (३) दुर्गा, ज. स. १९१६. गजानन नारायण आपटे, बडोदें यांची पत्नी. (४) यशोदा, ज. श. १८१२. इंदोरच्या नीळकंठ बाळकृष्ण दामल्यांची पत्नी.

* **शंकर विठ्ठल** (८) ज. स. १८९३ आक्टोबर २४. बडोदें संस्थानांत अबकारी खात्यांत नोकरी आहे. पत्ता—जुना तोफखाना, रावपुरा, बडोदें. भार्या उमा, देव (दीक्षित) यांजकडील. कन्या (१) मथुरा, ज. स. १९१६. मे १. अजमेरच्या वामन विष्णु थत्त्यांची पत्नी. (२) तारा, ज. स. १९२१ जून ४.

* **भालचंद्र शंकर ऊर्फ बापू** (९) ज. स. १९१९ मार्च ११. मॅट्रिकचे वर्गांत.

* **रामचंद्र शंकर** (९) ज. स. १९२३ जाने. १०. इंग्रजी दुसरींत.

* **लक्ष्मण शंकर** (९) ज. स. १९२४ जुलै २६. इंग्रजी दुसरींत.

* **पुरुषोत्तम शंकर** (९) ज. स. १९२६ मार्च १२. इंग्रजी पहिलींत.

* **मधुकर शंकर ऊर्फ सदाशिव** (९) ज.स. १९२९ ऑगस्ट ३०. मराठी पहिलींत.

* **वसंत शंकर ऊर्फ यशवंत** (९) ज. स. १९३१ फेब्रु. २२.

* **मुकुंद शंकर** (९) ज. स. १९३५ मार्च ७.

दत्तात्रेय विठ्ठल (८) मृ. वय २९, न्यूमोनिआ. शिक्षण इंग्रजी ६ इयत्ता. नोकरी होती. भार्या रमा, कार्लेकरांकडील.

* **गजानन विश्वनाथ** (७) ज. श. १८०० भाद्रपद शु. ६. बडोद्यास न्यायखात्यांत नोकरी आहे. सुरसागरावर, जुन्या तोफखान्याजवळ बडोद्यास राहतात. भार्या (१) सरस्वती, मृ. वय २१. पटवर्धनांकडील. भार्या (२) सरस्वती, मृ. वय १८. रानड्यांकडील.

* **दामोदर गजानन** (८) ज. श. १८२५ पौष शु. ७. बी. बी. अँन्ड सी. आय्. रेल्वेंत नोकरी, गोरेगांव येथें आहे. भार्या इंदिरा, दिवेकरांकडील. कन्या नर्मदा.

* **प्रभाकर दामोदर** (९) ज. स. १९३२.

* **अनंत दामोदर** (९) ज. स. १९३६.

* **विश्वनाथ गजानन** (८) ज. श. १८२८ फाल्गुन व. १२. जकातखात्यांत बडोदें संस्थानांत गंगरवा येथें नोकरी आहे.

दत्तात्रेय विश्वनाथ (७) हे आपले चुलते धोंडभट यांस दत्तक गेले. नंतरचें नांव हरी धोंडभट.

लक्ष्मण महादेव (३) हे परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पदरीं होते असें दिसतें. भाऊ कैदेंत असतां त्यांजकरितां दंड भरून त्यांची सुटका करावयाचें घाटत होतें, त्या वेळीं पुण्याहून पटवर्धनांकडील मंडळींची यादी रा. बाबा काळे यांनीं मिरजेस पाठविली; त्यांत लक्ष्मण महादेव पेंडसे यांचें नांव असून त्यांनीं रु. १६०० द्यावयाचें दाखविलें आहे (ऐ. प्र. क्रमांक २३ अ. पहा).

सखंभट रामचंद्र (६) हे दत्तक होत.

सीताराम नारायण (६) मृत्युसमयीं वय ७०. वैदिक होते. भार्या ताई, मायदेवांकडील, वय सुमारें ७०.

प्रभाकर सखाराम (५) हे वेदाध्ययनाकरितां कोंकणांतून देशावर आले. भार्या यशोदा, गाडगिळांकडील. कन्या काशी, गोडश्यांकडे दिली.

रामकृष्ण प्रभाकर (६) ज. आरोस. सुमारें ८५ वर्षांपूर्वी. इंग्रजी शिकत असतां वयाचे १८ वे वर्षी प्लेगनें मृत्यु. भार्या जानकी, आपट्यांकडील.

गोविंद प्रभाकर (६) ज. आरोस. मृ. स. १९१९, वातविकारानें ६० वे वर्षी. यांस शेतीची आवड होती. यांनीं कुटुंबनिर्वाहापुरती शेती व घर संपादन केलें. शेती करीत. भार्या लक्ष्मी, वय ५०, म्हसकरांकडील. कन्या (१) अंबा, नातूंकडे दिली; (२) बाया, ओगल्यांकडे दिली.

* **शिवराम गोविंद** (७) ज. आंवळेगांव. श. १८२४. आंवळेगांवीं शेती व किरकोळ भिक्षुकी करतात. भार्या (१) सीता, विवाह श. १८४३, दातारांकडील. भार्या

(२) गंगा, विवाह श. १८४८, फडक्यांकडील. कन्या (१) वय ११. (२) वय ५.

* **गोविंद शिवराम** (८) वय ९.

* **रामकृष्ण शिवराम** (८) वय ७.

* **प्रभाकर शिवराम** (८) वय ३.

गणेश सखाराम (५) यांना गुंडभट म्हणत.

विष्णु गणेश (६) मृत्युसमयीं वय ६०. हे आरोसहून जवळच्या वर्देगांवीं राहावयास गेले. भार्या फडक्यांकडील. कन्या (१) काशी, पेंडूरचे (मालवण) श्रीधर रावजी डोंगऱ्यांची पत्नी. (२) द्वारका, दाभोळीच्या (वेंगुर्ले) मोरेश्वर लक्ष्मण गोखल्यांची पत्नी.

दत्तात्रेय बाळकृष्ण (७) ज. भोयघर. सुमारें श. १८१०; मृ. स. १९३२, यकृतविकार. स्वसंपादित जमिनीची शेती करीत. भार्या सरस्वती, वय ३५, आपट्यांकडील.

गणेश महादेव (५) हे दत्तक होत. जनकपिते मोरभट.

सदाशिव गोविंद (३) उत्तम वैदिक. कोचऱ्यास राहात असत. यांस श. १७२८ त संस्थानिक पटवर्धन यांच्याकडून हरीपूरास अठरा बिघे जमीन उत्तम वैदिक म्हणून मिळाल्याबद्दल सनद आहे (ऐ. प्र. क्रमांक २८ पहा).

पांडुरंग गोविंद (३) उत्तम वैदिक. वास्तव्य हरीपूर. भार्या सगुणा.

धोंडभट पांडुरंग (४) वैदिक. हरीपूरास असत. भार्या सावित्री. कन्या तीन, सगुणा व आणखी दोन.

पांडुरंग धोंडभट (५) हे म्हैसाळचे रामभट अनंतभट पेंडसे यांचे पुत्र असून स. १८८० मध्यें दत्तक आले. त्यासमयीं यांचें वय १९–२० असावें. पूर्वीचें नांव नारायण. हे उत्तम वैदिक म्हणून प्रसिद्ध होते. यांच्या नित्याच्या अध्ययनाचा ध्वनि घरांतील पाटणीच्या किलच्यांतूनहि निघत असे अशी आख्यायिका आहे. हे पुढें आपले जनकघरचे बंधु गोविंदभट यांचे सांगण्यावरून गाणगापुरास राहावयास गेले. तेथें त्यांनीं श्रीच्या पूजेसाठीं एक बाग तयार केली. ती हल्लीं पेंडसे यांची बाग म्हणून प्रसिद्ध आहे असें समजतें. तेथेंच हे विहिरींत पडून मृत्यु पावले. भार्या आनंदी, टाकळीच्या बाळंभट कृष्णंभट दातारांची मुलगी. कन्या गंगू, मिरजेच्या दामोदर मोरेश्वर भटांची पत्नी.

* **दत्तात्रेय पांडुरंग** (६) ज. स. १८९१. हरीपूरास शेती करतात. सांगलीस नऊ वर्षें छापखान्यांत कंपोझिंगचें काम केलें. भार्या सावित्री, कोल्हापूरच्या विठ्ठल जनार्दन गोडबोल्यांची मुलगी.

चिंतामणि रामभट (२) यांस गडहिंग्लजला सेनापति संताजीराव घोरपडे, कापशी, यांजकडून श. १७०८ त जमीन इनाम मिळाली होती. श. १७२८ त

यांस पटवर्धनांकडून १४ बिघे जमीन इनाम मिळाली. ती अद्यापि यांचे वंशजांकडे चालू आहे.

नागेश चिंतामणि (३) यांचे पूर्वज कोचऱ्याहून आजऱ्यास आले. तेथें त्यांस इचलकरंजीकरांकडून दोन बिघे जमीन इनाम मिळाली. गडहिंग्लज येथेंहि यांना दहा बिघे जमीन इनाम आहे. हे करवीर संस्थानांत शिरोली येथें मोकाशी होते. भार्या भागीरथी ऊर्फ रमा.

विष्णु नागेश (बाबूभट) (४) हे आजऱ्यास राहात असत. भार्या सगुणा. कन्या वेणू, इचलकरंजीच्या मोरभट भाव्यांची पत्नी.

गणेश विष्णु (५) आजऱ्यास अग्निहोत्री होते. भार्या आनंदी.

गोपाळ गणेश (६) आजऱ्यास भिक्षुक होते. भार्या सगुणा.

दाजी गणेश ऊर्फ नारो (६) इचलकरंजीस श्रीव्यंकटेशाची पूजा करीत होते. भार्या उमा.

चिंतामणि विष्णु ऊर्फ बाळंभट (५) आजऱ्यास भिक्षुकी करीत. भार्या गंगा, इचलकरंजीच्या विनायकभट जोश्यांची मुलगी. कन्या साळू, इचलकरंजीच्या विश्वनाथपंत दात्यांची पत्नी.

* **दिनकर चिंतामणि** (६) ज. स. १८७०. उत्तम वैदिक. वास्तव्य इचलकरंजी. भार्या (१) लक्ष्मी, चंदूरच्या (इचलकरंजी) बाबाजीपंत दात्यांची मुलगी. भार्या (२) योगाबाई, बेळगांवच्या गोविंदशास्त्री गाडगिळांची मुलगी. कन्या (१) बनू, बोडसांस दिली. (२) गोदू, इचलकरंजीच्या दत्तात्रेय कृष्ण नातूंची पत्नी.

* **भालचंद्र दिनकर** (७) ज. स. १९१३. मुंबईस म्युनिसिपालिटींत ओव्हरसीअर आहेत. भार्या सुशीला, सांगलीच्या दत्तात्रेय केशव उत्तूरकरांची मुलगी.

दत्तात्रेय चिंतामणि (६) विसाव्या वर्षी मृत्यु. भार्या गंगा, कानिटकरांची मुलगी.

वासुदेव विष्णु (५) ५० व्या वर्षी मृत्यु. मुके होते.

हरी विष्णु (५) ८ व्या वर्षी मृत्यु. मुके होते.

बाबूभट चिंतामणि (३) भार्या उमा.

नारायण बाबूभट (४) हे आजऱ्याहून गुळधुव्यास आले. भार्या लक्ष्मी. कन्या (१) काशी, मळवाडीच्या सखाराम हरभट मराठ्यांची पत्नी. (२) सखू, वेंगुर्ल्याच्या रघुनाथभट फाटकांची पत्नी. (३) कृष्णा, मांजऱ्याचे कृष्ण आचारी यांची पत्नी.

बाबूभट नारायण (५) कन्या (१) मनू, आजगांवचे नारायण वासुदेव आपटे यांची पत्नी. (२) आवडी, तळवण्याच्या आत्माराम नरसिंह परांजप्यांची पत्नी.

दत्ताराम बाबूभट (६) मृ. स. १९२३. वय ५५. गुळधुव्यास शेती करीत. भार्या लक्ष्मी, आरोसचे अनंत सदाशिव अभ्यंकरांची मुलगी.

* **बाबूभट दत्ताराम** (७) वय २५. गुळधुव्यास घरची व्यवस्था पाहून असतात. भार्या भीमा, आजगांवच्या नरसिंह श्रीधर गोखल्यांची मुलगी.

* **सखाराम दत्ताराम** (७) वय २०. पेडणेस भिक्षुकी करतात.

विश्वनाथ नारायण (५) मृ. स. १९०८. वय ७०. गुळधुव्यास शेती करीत. भार्या गंगा, आजगांवच्या गणेश रामचंद्र गोखल्यांची मुलगी. कन्या चिमा, तुळशीच्या वासुदेव कृष्ण गोऱ्यांची पत्नी.

* **वासुदेव विश्वनाथ** (६) वय ७०. गुळधुव्यास शेती व सावकारी करितात. भार्या द्वारका, तळवण्याच्या रामचंद्र गणेश बर्व्यांची मुलगी. कन्या यमू, वय २८. पाल्याच्या गणेश प्रभाकर केळकरांची पत्नी.

* **गोविंद वासुदेव** (७) वय ४२. गुळधुव्याला घरव्यवसाय पाहतात. भार्या राधा, आरोसचे दामोदर नारायण शिधये यांची मुलगी.

* **कृष्णाजी वासुदेव** (७) वय ३८. सावंतवाडीस शिक्षक आहेत. पत्ता—लेले यांचा वाडा. भार्या रखमा, तळवण्याच्या बाळकृष्ण विष्णु खाडिलकरांची मुलगी.

* **गणेश वासुदेव** (७) वय ३६. बैलहोंगलास व्यापाऱ्याकडे कारकून आहेत. भार्या सरस्वती, मळेवाडच्या रामकृष्ण नारायण पाटणकरांची मुलगी.

* **श्रीपाद गणेश** (८)

* **भास्कर वासुदेव** (७) वय ३३. रत्नागिरीस सर्व्हे खात्यांत नोकर आहेत. भार्या पार्वती; तळकटच्या रामचंद्र घनश्याम बर्व्यांची मुलगी.

* **नारायण विश्वनाथ** (६) वय ६०. गुळधुव्यास शेती व सावकारी करितात. भार्या मथुरा, मळेवाडीच्या वासुदेव दत्तात्रेय नातूंची मुलगी. कन्या (१) सखू, वय २८; तुळशीच्या गोविंद श्रीधर परांजप्यांची पत्नी. (२) चिमा, वय १८; तळकटच्या भास्कर नारायण महाबळांची पत्नी. (३) चंद्रा, वय १४. (४) अंबा, वय ९.

* **विश्वनाथ नारायण** (७) वय २२. गुळधुव्यास घरव्यवस्था व शेती पाहतात. भार्या कृष्णा, तळकटच्या भालचंद्र भास्कर जोश्यांची मुलगी.

केशव रामभट (४) भार्या जानकी.

विनायक केशव ऊर्फ दाजी (५) भार्या उमा.

केशव विनायक (६) हरीपूरास दशग्रंथी वैदिक होते. भार्या राधा.

अनंत केशव (७) ४० व्या वर्षी मृत्यु. प्रथम पोस्टांत नोकरी. नंतर सांगलीस वकिली करीत. यांना तीन अपत्यें होतीं. यांचा वंशविस्तार पुढें नाहीं.

रामचंद्र केशव (७) ज. स. १८८२; मृ. स. १९१७. नागपूरकडे मेकॅनिकल इंजिनिअर होते. भार्या जानकी, शिंगणापूरच्या म्हसकरांची मुलगी.

विष्णु विनायक (६) ज. स. १८६३; मृ. स. १९३६. हरीपूरास भिक्षुकी करीत. भार्या लक्ष्मी, शेडबाळच्या हरी जनार्दन जोगांची मुलगी. कन्या (१)

गंगू, पुण्याच्या अनंत यज्ञेश्वर जोशी वैद्यांची पत्नी. (२) कृष्णा, कोल्हापूरचे शंकर दत्तात्रेय गद्रे, गवई यांची पत्नी.

* **चिंतामणि विष्णु** (७) ज. स. १८८९. हरीपूरास सुखवस्तु आहेत. भार्या सरस्वती, कोल्हापूरच्या दत्तात्रेय सीताराम गद्र्यांची मुलगी. कन्या (१) सोनू, साताराच्या विश्वनाथ सीताराम सोहन्यांची पत्नी. (२) दुर्गा, ज. स. १९२८.

* **विनायक चिंतामणि** (८) ज. स. १९१५. यांची सांगलीस मोटार सर्व्हिस आहे.

* **सदाशिव चिंतामणि** (८) ज. स. १९२५. मराठी ४ थी.

* **गंगाधर चिंतामणि** (८) ज. स. १९३४.

दत्तात्रेय विष्णु (७) हे आत्माराम बळवंत पेंडसे यांस दत्तक गेले.

श्रीधर रामभट (४) वैदिक. वास्तव्य हरीपूर. यांच्या पूर्वजांस पटवर्धन संस्थानिकाकडून इनाम जमीन आहे. भार्या सगुणा.

बळवंत श्रीधर (५) वैदिक. वास्तव्य हरीपूर. भार्या उमा. कन्या (१) कृष्णा. (२) काऊ.

दादोबा बळवंत (६) हरीपूरास वैदिक होते. अविवाहित.

आत्माराम बळवंत (६) कारकुनी करीत. भार्या रखमा, हरीपूरच्या गणेशशास्त्री फडक्यांची मुलगी.

* **दत्तात्रेय आत्माराम** (७) ज. स. १८९४. हे दत्तक आले. मूळचें नांव दत्तात्रेय विष्णु पेंडसे. कीर्तनकार. वास्तव्य हरीपूर. भार्या उमा, हरीपूरचे वासुदेव-शास्त्री वाटवे यांची मुलगी. कन्या (१) शकुंतला, वाईच्या श्रीपाद कृष्ण वैद्यांची पत्नी. (२) इंदु, ज. स. १९२३. इंग्रजी ३ री. (३) शांता, ज. स. १९२५. मराठी ४ थी. (४) सुमन, ज. स. १९३५.

* **नारायण दत्तात्रेय** (८) ज. स. १९३०. मराठी २ री.

रामभट श्रीधर (५) भार्या सीता. हिनें आपले बहिणीचा मुलगा नारायण (महादेव भिकाजी पेंडसे यांचा मुलगा) यास स. १८९६ त दत्तक घेतला.

नारायण रामभट (६) यांचें मूळचें नांव नारायण महादेव. दत्तक घरचें यांचें नांव कळत नहीं. हे कोल्हापूर संस्थानांत शिक्षक होते. अविवाहित.

शिवराम महादेव (५) हे खानापुरास आले. भार्या लक्ष्मी.

* **विनायक शिवराम** (६) वय ६६. खानापुरास भिक्षुकी करतात. यांना संगीताची आवड आहे. भार्या राधा, सहस्रबुद्ध्यांकडील. कन्या कमळा (राधा), बेळ-गांवच्या विष्णुपंत नातूंची पत्नी.

* **विश्वनाथ विनायक** (७) ज. श. १८२८. पुण्यास मोटारीचें शिक्षण घेत आहेत.

* **वासुदेव विनायक** (७) ज. खानापूर श. १८३२. मॅट्रिक. बेळगांवास व्यापार करतात. यांनीं स. १९३० व १९३२ सालीं सत्याग्रहांत भाग घेतला होता. त्या वेळीं यांना १४ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. यांना गायन

व व्यायामाची आवड आहे. पत्ता–विष्णु कृष्ण नातू आणि मंडळी, कडोलकर गल्ली. भार्या शालिनी, विवाह स. १९३७. डोंगऱ्यांकडील.

महादेव शिवराम (६) हे स्टँपव्हेंडर होते. भार्या रमा, बेहेऱ्यांकडील. कन्या इंदु (अन्नपूर्णा), सांखळीच्या अनंतराव जोशयांची पत्नी.

* **सीताराम महादेव** (७) ज. खानापूर श. १८३६.

* **श्रीकान्त महादेव** (७) वय ८. बालग्रहानें पीडित असून सांखळीस बहिणीजवळ असतो.

* **काशीनाथ शिवराम** (६) वय ५२. गडहिंग्लजला शेतकी व भिक्षुकी करितात. भार्या सीता, परचुऱ्यांकडील.

* **गणेश काशीनाथ** (७) वय १८. सांगलीस अनाथ विद्यार्थी आश्रमांत इंग्रजी ४ थी.

* **गोविंद काशीनाथ** (७) वय ४.

कृष्णंभट विनायक (४) भार्या गंगा.

नीळकंठ कृष्ण (५) भार्या भागीरथी.

गोविंद कृष्ण (५) आजऱ्यास वैदिक होते. भार्या राधा, कन्या (१) वेणू; (२) बजू; (३) मनू; (४) सखू.

वामन गोविंद (६) आजऱ्यास वैदिक होते. भार्या लक्ष्मी, बेडगच्या (मिरज) नारायण केशव लेल्यांची मुलगी. कन्या आकू, गुलबुर्ग्यास बोडसांकडे दिली.

* **विष्णु वामन** (७) ज. स. १८८५. कोल्हापूर दरबारचे असिस्टंट खाजगी कारभारी आहेत. भार्या (१) राधा, मलकापूरच्या कद्यांची मुलगी. भार्या (२) आनंदी, गोवंडे यांची मुलगी. कन्या माणिक, कोल्हापूरचे डॉ. काशीनाथपंत छत्रे हेल्थ ऑफिसर यांची पत्नी. भार्या (३) सत्यभामा, हिंदळचाच्या वासुदेव हरी मेहेंदळचांची मुलगी. हिचे पुत्र माधव व मधुकर. कन्या इंदु, ज. स. १९२९. मराठी ४ थी.

* **माधव विष्णु** (८) ज. श. १८५० फा. शु. १०. मराठी ४ थी.

* **मधुकर विष्णु** (८) ज. स. १९३५ आक्टोबर २२.

रावजी गोविंद (६) व्यापार करीत.

* **कृष्णाजी रावजी** (७) वय २०. कोल्हापूर कॉलेजांत शिकत आहेत.

* **महादेव रावजी** (७) वय १८. उगारला शिक्षण चालू.

* **वसंत रावजी** (७) वय १४. उगारला शिक्षण चालू.

मोरेश्वर धोंडभट ऊर्फ जीवभट (५) मृ. श. १८२४. हे ४० व्या वर्षी आजऱ्याहून गोमांतकांत कवळें येथें बायकामुलांसह गेले. हे चांगले वैदिक असून तेथें भिक्षुकी करीत. गरिबी पत्करली, पण ऋण नको हा यांचा बाणा होता. भार्या रमा, बेहेऱ्यांची मुलगी.

वासुदेव मोरेश्वर ऊर्फ दत्तात्रेय (६) ज. आजरें; मृ. श. १८३६ दम्यानें. वैदिक होते. श्रीशांतादुर्गा देवस्थानचें पौरोहित्य पांडुरंग कृष्ण जोशयांचे तर्फे करीत. जोशी यांच्या घरीं अंबाबाईचा मुलगा दत्तात्रेय या नांवाचा होता. तो नुकताच वारला

होता; त्याचें स्मरण न व्हावें म्हणून अंबाबाई जोशी दत्तात्रेय मोरेश्वर यास वासुदेव या नांवानें हांक मारूं लागल्या व तेंच नांव प्रचलित झालें. यांनीं आपले यजमान जोशी यांचा कारभार चांगल्या रीतीनें करून स्वतःच्या कुटुंबासहि ऊर्जितावस्था आणली. यांनीं ईशचिंतन करीत असतां देह ठेविला. भार्या पार्वती, बर्व्यांकडील.

* **धोंडो वासुदेव** (७) ज. ढवळी श. १८०९. कवळचास श्रीशांतादुर्गा देवस्थानांत सप्तशतीचें अनुष्ठान करतात. श. १८२६ पासून यांना अपस्माराची व्यथा आहे. भार्या रमा, गोगट्यांकडील.

* **नारायण धोंडो ऊर्फ विष्णु** (८) ज. ढवळी, श. १८३५. मुंबईकडे असतात.

* **यशवंत धोंडो** (८) ज. ढवळी, श. १८४१. मुंबईस इंग्रजी शिक्षण व भिक्षुकी करितात.

* **मोरेश्वर धोंडो** (८) ज. ढवळी, श. १८४३. सांगलीस वेदाभ्यास करीत आहेत.

* **सदाशिव वासुदेव** (७)ज. ढवळी, श. १८१३. कवळचास किराणा व धान्याचे व्यापारी आहेत. वडील बंधु धोंडो वासुदेव यांच्या कुटुंबाचा हे परामर्ष घेतात. भार्या उमा, फडक्यांकडील. विवाह श. १८३४.

* **रामनाथ सदाशिव**(८)ज. ढवळी, श. १८४०. पोर्च्युगीज इयत्ता ३ री.

* **वासुदेव सदाशिव ऊर्फ देवीदास** (८) ज. कवळें, श. १८५१. मराठी २ री.

* **विश्वनाथ वासुदेव** (७) ज. ढवळी, श. १८१५. कवळचाच्या श्रीशांतादुर्गा देवस्थानांतील पुरोहित. यांनीं जमीन घेतली असून शेतीहि करतात. यांनीं कोचऱ्याचे 'ब्राह्मण' नामक मूळ पुरुषाच्या देवळाचा सुमारें रु. ३०० खर्चून जीर्णोद्धार श. १८५७ सालीं केला. भार्या सरस्वती, भाव्यांकडील. विवाह श. १८३५.

* **बाळकृष्ण विश्वनाथ** (८) ज. कवळें, श. १८५५.

* **नारायण विश्वनाथ** (८) ज. कवळें, श. १८५७.

* **गणेश वासुदेव** (७) ज. ढवळी, श. १८१९. कवळें येथें वडील बंधु सदाशिव वासुदेव यांच्यासमवेत व्यापार करतात. भार्या सत्यभामा, केळकरांकडील. विवाह श. १८४५.

बाळकृष्ण मोरेश्वर (६) ज. ढवळी; मृ. श. १८२१. देवस्थानचे पुरोहित होते. भार्या रखमा, म्हसकरांकडील.

रामभट धोंडभट (५) भार्या जानकी.

सदाशिव धोंडभट (५) ज. श. सुमारें १७६१; मृ. श. सुमारें १८१३. हें वैदिक होते. वास्तव्य आजरें. भार्या अंबा.

* **श्रीपाद पांडुरंग ऊर्फ बाबू** (७) ज. श. १८२५. आजऱ्यास भिक्षुकी व हातमागावरील कापड विणण्याचा उद्योग करतात. भार्या सावित्री, फाटकांकडील. कन्या नलिनी, वय ५.

* **पांडुरंग श्रीपाद** (८) वय २.
पद्माकर सदाशिव (६) भार्या गौरा.
दामोदर सदाशिव (६) ज. श. सुमारें १७८९; मृ. श. सुमारें १८२६. आजऱ्यास वैदिक होते. भार्या सरस्वती, वाटव्यांकडील. कन्या (१) आक्का, ज. श. १८१२. कोल्हापूरच्या गोपाळ गणेश आपटयांची पत्नी. (२) रंगू, ज. श. १८२४. कागवाडच्या कृष्णाजी केशव बोडसांची पत्नी. (३) बाळूताई, ज. श. १८२५. इचलकरंजीच्या विष्णु अप्पाजी फडक्यांची पत्नी.
* **गुंडभट दामोदर** (७) ज. हलकर्णी, श. १८१८ वै. व. १२. वैदिक असून आजऱ्यास भिक्षुकी करतात. भार्या लक्ष्मी, वय ३५, केळकरांकडील.
* **सीताराम गुंडभट ऊर्फ आबा** (८) ज. श. १८४३ फा. शु. ११. मराठी ७ वी.
* **दामोदर गुंडभट** (८) ज. श. १८४६ फा. शु. ५. मराठी विद्यार्थी.
* **वामन गुंडभट** (८) ज. श. १८५७ आषाढ व. १.
सखाराम विश्वनाथ (५) आजऱ्यास वैदिक होते. यांचे वंशांत चांदेवाडीला (आजरें) इनाम जमीन आहे. भार्या सरस्वती.
लक्ष्मण सखाराम (६) भार्या यशोदा.
भलंभट सखाराम (६) हे सुप्रसिद्ध वैदिक होते. पुण्याचे वे. दत्तात्रेय दीक्षित किंजवडेकरांचें शिक्षण यांचेजवळ झालें.
विश्वनाथ सखाराम ऊर्फ भाऊ (६) हे आजऱ्यास वैदिक व कीर्तनकार होते.
दिनकर विश्वनाथ (७) मृ. स. १९१८, वय ५०. आजऱ्यास वैदिक असून कीर्तनकारहि होते. भार्या कमला, गणेशवाडीच्या वाटव्यांकडील. कन्या (१) कृष्णा (लक्ष्मी), अनंत सीताराम गाडगिळांची पत्नी. (२) वेणू, वय २१; (३) सुंदरा, वय १९; (४) इंदु, वय १७.
त्र्यंबक दिनकर (८) मृ. स. १९१३. विद्यार्थिदशेंत सिगलबारवरून पडून मृत्यु.
* **रामचंद्र दिनकर ऊर्फ भाऊ** (८) ज. आजरें, स. १९०८ जून ५. आजऱ्यास खाजगी नोकरी. भार्या जानकी, मठच्या मराठ्यांकडील. विवाह श. १८५७.
लक्ष्मण दिनकर (८) हे क्षयरोगानें २४ वर्षांचे असतांना स. १९३६ मध्यें वारले.
रामकृष्ण रघुनाथ (७) भार्या पार्वती.
परशुराम रघुनाथ (७) भार्या सरस्वती. या बडोद्यास असतात, असें कळतें.
सदाशिव महादेव (४) हे नामांकित विद्वान् होते. कोंकणांत शेती करून असत व चार महिने पुण्यास येऊन भिक्षुकी करीत.
हरभट सदाशिव (५) चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांनीं सांगली गांव वसविलें; त्या वेळीं तेथें विद्वान् ब्राह्मण मंडळी वस्तीकरतां आणिली त्यांत हरभट हे प्रमुख होते. यांना तेथें राहावयास घर दिलें. हरभट पुढें कॉलऱ्यानें वारले, त्या वेळीं त्यांची भार्या अन्नपूर्णाबाई यांनीं सर्वस्व दान केलें व आपले लहान ३ मुलगे व १ मुलगी यांस पारावर ठेवून त्या सती गेल्या.

बाळंभट हरभट (६) यांच्या मातोश्रींनीं सहगमन केलें त्या वेळीं हे बारा वर्षांचे होते. नंतर ते कोठें गेले त्याचा पत्ता नव्हता. परंतु कालांतरानें बाळंभट पेंडसे या नांवानें चांगलेच प्रसिद्धीस आले असें म्हणतात.

वासुदेव हरभट (६) यांची आई सती गेली त्या वेळीं हे दोन वर्षांचे होते. पुढें यांचें संगोपन बाळाजीपंतदादा पथकफडणीस यांनीं केलें व मोठे झाल्यावर आपले घरचा कारभार त्यांजकडे सोंपविला व पथकांत कारकुनीची जागा देऊन अडीच विघे जमीन इनाम दिली. भार्या रमा, सांगलीच्या विश्वनाथभट केळकरांची मुलगी. कन्या काशी, श्री. धुंडिराजपंत ऊर्फ तात्यासाहेब सांगलीकर यांची प्रथम पत्नी. श्री. तात्यासाहेब आजारी असतांना त्यांचे वडील आप्पासाहेब यांच्या नजरेस ही मुलगी आली. त्या वेळीं श्री. तात्यासाहेब लवकर बरे झाल्यास त्यांना हीच मुलगी करून घेईन असें ते बोलले व त्याप्रमाणें श्री. तात्यासाहेबांना आराम वाटला व श्री. आप्पासाहेबांनीं आपलें वचन खरें केलें. या संबंधामुळें सांगलीकरांकडून पांचशें रुपये उत्पन्नाची जमीन, पांचशें रुपयांची तैनात व राहावयास घर मिळालें. कालांतरानें इनाम व तैनात बंद झाली (ऐ. प्र. क्रमांक ३८–३९ पहा).

कृष्णाजी वासुदेव (७) ज. श. १७६६ मार्ग. व. ७; मृ. स. १९२३. सांगली संस्थानांत सरकारी नोकर होते. पुढें पेन्शन घेतल्यावर साताऱ्यास आले व तेथें घर बांधून स्थायिक झाले. भार्या अन्नपूर्णा (सुंदरा), सोनीच्या गंगाधरपंत परचुऱ्यांची मुलगी. कन्या (१) गोदू, तासगांवच्या रामचंद्र गुंडो ओकांची पत्नी. (२) बया, मिरजेच्या वासुदेव रघुनाथ लागूंची पत्नी.

* **गणेश कृष्ण** (८) ज. श. १७८४ पौ. शु. १४. सातारा जिल्ह्यांत रेव्हेन्यू खात्यांत नोकर होते. सध्यां पेन्शन घेऊन साताऱ्यास (६७ सोमवार पेठ) सुखवस्तु आहेत. धार्मिक प्रवृत्ति. नियमानें गीतापाठ करतात. भार्या सरस्वती (अंबू), सांगलीच्या केशव जनार्दन खाडिलकरांची मुलगी. कन्या (१) कृष्णा, गारगोटीच्या रघुनाथपंत परांजप्यांची पत्नी. (२) मथुरा (चंपी), साताऱ्याच्या विश्वनाथ दामोदर जोश्यांची पत्नी. (३) यमू ऊर्फ लळी, सांगलीचे सदाशिव रामचंद्र जोशी, सराफ यांची पत्नी. (४) मनी, सातारचे वामन भास्कर माटे, वैद्य यांची पत्नी. (५) काशी, सातारच्या मोरेश्वर सदाशिव माटयांची पत्नी.

केशव गणेश (९) ज. श. १८१० वै. कृ. १२; मृ. स १९३०. पुणें जिल्ह्यांत ओव्हरसीअर होते. भार्या (१) रमा (येसू), जमखिंडीच्या मल्हारपंत मराठ्यांची मुलगी. हिची कन्या माणकी, पुण्याच्या चिंतामण यशवंत मराठ्यांची पत्नी. भार्या (२) इंदिरा (जान्हवी), पुण्याच्या बापू रघुनाथ मोडकांची मुलगी.

* **वामन गणेश** (९) ज. श. १८१२ माघ शु. १२. मॅट्रिक. पत्ता —६७ सोमवार

पेठ. साताऱ्यास पोस्ट ऑफिसांत कारकून आहेत. महायुद्धाचे वेळीं सहा वर्षे बसरा येथें होते. भार्या (१) सत्यभामा (आवडी), सांगलीचे बळवंतराव नरगुंदे यांची मुलगी. भार्या (२) आनंदी (रंगू), साताऱ्च्या हणमंत नारायण दिवेकरांची मुलगी. पुत्र गंगाधर, भालचंद्र, पुरुषोत्तम व प्रभाकर. कन्या चिंगू, ज. श. १८४५ माघ व. ९. इंग्रजी पहिली.

* **गंगाधर वामन ऊर्फ बाळू** (१०) ज. श. १८४८ ज्येष्ठ व. ५. इंग्रजी पहिली.

* **भालचंद्र वामन** (१०) ज. श. १८५२ पौ. कृ. ७. मराठी पहिली.

* **पुरुषोत्तम वामन** (१०) ज. स. १९३४ जून २३.

* **प्रभाकर वामन ऊर्फ धर्मराज** (१०) ज. स. १९३७ मे २८.

* **लक्ष्मण गणेश** (९) ज. श. १८२९ चै. शु. १२. मेकॅनिकल इंजिनिअर. साताऱ्यास **पेंडसे मेटल** वर्क्सचे चालक आहेत. पत्ता—६७ सोमवार पेठ, सातारा. भार्या ऊर्मिला (सोनू), सांगलीचे वासुदेव महादेव परांजपे, ड्रॉइंग मास्तर ट्रेनिंग कॉलेज, पुणें यांची मुलगी. कन्या सिंधु, ज. स. १९३७ नोव्हेंबर १३.

* **शरच्चंद्र लक्ष्मण** (१०) ज. स. १९३० आक्टोबर ६. मराठी पहिली.

* **विश्वनाथ लक्ष्मण ऊर्फ वसंत** (१०) ज. स. १९३२ नोव्हेंबर २९.

* **दामोदर लक्ष्मण** (१०) ज. स. १९३४ डिसेंबर ८.

* **हरी कृष्ण** (८) ज. श. १८०२ पौ. शु. ४. नगर जिल्ह्यांत ओव्हरसीअर होते. महायुद्धांत दोन वर्षें एडन येथें मिलिटरी इंजिनिअरिंग सर्व्हिसमध्यें व नंतर साताऱ्यास राष्ट्रीय शाळेंत शिक्षक होते. १९२२ सालीं सत्याग्रहाच्या चळवळींत नोकरीचा राजीनामा दिला. सध्यां (६७ सोमवार पेठ) साताऱ्यास पेंडसे मेटल वर्क्सचे चालक आहेत. भार्या गंगा (ठकू), जमखिंडीच्या कृष्णाजी गंगाधर लेल्यांची मुलगी. कन्या (१) द्वारका, वजीरचौंडेच्या (सांगली) शंकर रघुनाथ खाडिलकरांची पत्नी. (२) वाराणशी, साताऱ्च्या नरहर कृष्ण जोश्यांची पत्नी. (३) विजया, तासगांवच्या परशुराम मोरेश्वर नातूंची पत्नी.

* **हणमंत हरी** (९) ज. श. १८३१ माघ शु. ४. मॅट्रिक. इंदूर संस्थानांत जंगल खात्यांत दोन वर्षें नोकरी केली. सध्यां साताऱ्यास पेंडसे मेटल वर्क्समध्यें आहेत. भार्या कमळा (सखू), साताऱ्च्या हणमंत नारायण दिवेकरांची मुलगी. कन्या मथुरा, ज. श. १८५७ चै. शु. ११.

नारायण कृष्ण (८) हे सांगलीस दत्तक गेले. नंतरचें नांव नारायण धोंडो.

विष्णु वासुदेव (७) क्षेत्र औदुंबर येथील सांगलीकरांच्या अन्नछत्रांत कारकून होते. भार्या लक्ष्मी (दुर्गा), समरोळीच्या (तासगांव) आपटयांची मुलगी. कन्या (१) गंगू, सांगलीच्या आपटयांकडे; (२) सखू, सांगलीच्या कान्हेऱ्यांकडे; (३) काशी, सांगलीच्या दातारांकडे; (४) येसू, सांगलीच्या लेल्यांकडे; (५) चंद्रा, कुरुंदवाडच्या लेल्यांकडे दिली.

* **रामचंद्र विष्णु** (८) ज. स. १८७२. मुंबईस दाजी आबाजी खऱ्यांकडे कारकून होते. कायद्याचा अभ्यासहि केला होता. पुढें औदुंबरास वडिलांची जागा मिळाली; व २०।२२ वर्षें ही नोकरी केली. हल्लीं सांगलीस सुखवस्तु आहेत. पत्ता–जुनी सांगली, अकेलीरोड, घर नं. २२. भार्या सीता, जमखिंडीच्या चिंतोपंत भिडयांची मुलगी.

विश्वनाथ रामचंद्र ऊर्फ बापू (९) ज. स. १९०२; मृ. स. १९३०. कोरेगांवच्या मधुकर छापखान्याचे मॅनेजर होते. मिलिटरी रिझर्व्ह फोर्समध्यें बेळगांवास जात असत. यांनींच सांगलीच्या 'विजय' पत्रास चालना दिली होती.

* **वासुदेव रामचंद्र** (९) ज. स. १९०७. कोरेगांवास श्रीनिवास छापखान्याचे व्यवस्थापक आहेत. भार्या शालिनी, सोलापूरच्या लिमयांची मुलगी.

* **श्रीपाद रामचंद्र** (९) ज. स. १९११. सांगलीस प्रभा प्रेसमध्यें कंपॉझिटर आहेत. गायनाची आवड आहे.

* **भालचंद्र रामचंद्र** (९) ज. स. १९१७. सांगलीस शिवणकाम करतात.

* **महादेव विष्णु** (८) ज. स. १८९२. द. हैद्राबादेस सिनेमा ऑपरेटर होते. हल्लीं फोटोग्राफीचा व्यवसाय आहे. पत्ता–नं. १३५३, इसामिया बझार, हैद्राबाद. भार्या पार्वती, सोलापूरच्या बेंद्रयांची मुलगी.

* **गणेश महादेव** (९) वय १४. सोलापुरास हायस्कूल विद्यार्थी आहेत.

गोविंद वासुदेव (७) ज. स. १८४९ डिसेंबर २०; मृ. श. १८५८ का. शु. ४. सांगली संस्थानांत बागकामगार, पागाकामगार व शेवटीं खाजगी कारभारी होते. रोज नियमानें पांचशें नमस्कार घालीत. भार्या (१) राधा (द्वारका), कोल्हापूरच्या चिंतामणराव चिपळूणकरांची मुलगी. भार्या (२) राधा, तासगांवच्या पांडुरंग नीळकंठ महाबळांची मुलगी. कन्या (१) द्वारका (उमा), ज. स. १९०३. सांगलीच्या काशीनाथ नारायण दातारांची पत्नी. (२) सुभद्रा (रुक्मिणी), ज. स. १९१४. मिरजेच्या रामचंद्र श्रीपाद वाटव्यांची पत्नी. (३) कमळ, ज. स. १९२४.

* **चिंतामणि गोविंद** (८) ज. श. १८२८ भाद्र. शु. ९. पूर्वी समर्थ नाटक मंडळींत नट होते. सध्यां बळवंत संगीत नाटक मंडळींत आहेत. चित्रकलेचा व्यासंग आहे. पत्ता–पेंडसेवाडा, जुनी सांगली. भार्या लक्ष्मी, मिरजेच्या भिकाजी केशव जोश्यांची मुलगी. विवाह स. १९३३.

* **दामोदर चिंतामणि** (९) ज. श. १८५८ ज्येष्ठ शु. १५.

* **दत्तात्रेय गोविंद** (८) ज. स. १९०९ ऑगस्ट १४. पुण्यास परांजपे मोटार संघांत मोटार ड्रायव्हर आहेत.

* **गोपाळ गोविंद** (८) ज. श. १८३४ वै. शु. २. मुंबईस शिवाजी व्यायाममंदिरांत शिक्षक आहेत.

पुरुषोत्तम गोविंद (८) ज. स. १९१८; मृ. स. १९३०.

गणेश चिमण (७) भार्या गौरा ऊर्फ धोंडूबाई.

केशव महादेव (४) हे त्रिंबकराव रघुनाथ कुरुंदवाडकर पटवर्धन यांचे लष्करांत स. १७९१ डिसें. ७ रोजीं असल्याचा उल्लेख आहे (ऐ. प्र. क्रमांक १९ पहा).

नारायण केशव (५) भार्या (१) पुत्र भास्कर. भार्या (२) पुत्र गोविंद, दामोदर व पुरुषोत्तम.

भास्कर नारायण (६) भार्या (१) विठाबाई. पुत्र विनायक. भार्या (२) विठाबाई. पुत्र मोरो व गणेश.

गोविंद विनायक (८) कन्या वेणू.

* **महादेव विनायक** (८) वय अंदाजें ४०. कोडोली पारगांव येथें यांचे चुलत्यांचे वेळेस दत्ताचें स्थान बांधलें आहे, त्याची पूजाअर्चा व सेवा करीत असतात.

गोविंद नारायण (६) मृ. स. १८०४ चै. व. १ मंगळवार. वय सुमारें ७५. हे भागवतपारायणशील सत्पुरुष होते. यांनीं आजन्म कोरान्न मागून श्रीभागवत ग्रंथाचें अध्ययन व अध्यापन केलें व त्या वेळचे पिढींत भागवत सांप्रदायाचें नवचैतन्य भरलें. यांच्या पादुका कोल्हापुरास खासबारदार यांच्या वाड्यांत आहेत. येथील बरेच मोठमोठे लोक यांच्या शिष्यशाखेंत होते. दरवर्षी ज्ये. व. १२ स भंडारा होतो. कन्या दुर्गा, इचलकरंजीच्या डॉ. दामोदरपंत जोश्यांची पत्नी.

धोंडो गोविंद (७) भार्या सरस्वती, हरीपूरचे कारभारी मराठे यांची मुलगी. या सुमारें ८० वर्षें वयाच्या असून कोल्हापुरास असतात.

दामोदर नारायण (६) हे कोल्हापुराजवळील ज्योतिबाच्या डोंगरावर असत.

पुरुषोत्तम नारायण (६) यांचे बंधु गोविंदशास्त्री यांच्या हस्तें कोडोली, पेटा पन्हाळा येथें दत्ताच्या पादुका स्थापन झाल्या, तेथें हे असत. यांनीं मातृसेवा व वासुदेवसेवा विशेष निष्ठेनें केली. यांचे सेवेनें संतुष्ट होऊन ह्यांस श्रीदत्ताचा दृष्टांत झाला व एक कुष्ट भरलेला ब्राह्मण श्रीनरसोबाचे वाडीस सेवेस होता त्यास दृष्टांत होऊन कोडोलीस यांचेजवळ जाण्यास सांगितलें. तेथें गेल्यावर त्याचें कुष्ट गेलें व त्यानें दत्ताचें देऊळ बांधिलें असें म्हणतात.


भास्कर महादेव (६) हे इचलकरंजीस असत.

गणेश केशव (५) भार्या सरस्वती.

राजाराम बल्लाळ (६) भार्या सीता.

वासुदेव बल्लाळ (६) हे इचलकरंजीस असत. यांची एक नाटक कंपनी होती. भार्या रमा, इचलकरंजीच्या गोडबोल्यांची मुलगी. कन्या (१) ताई, सांगलीच्या रामचंद्र विष्णु मराठ्यांची पत्नी. (२) यमू, महांकाळ कवठ्याच्या विष्णु सखाराम गोऱ्यांची पत्नी.

बाळकृष्ण वासुदेव (७) वयाच्या १३ व्या वर्षी मृत्यु.



गोविंदशास्त्री नारायण

नारायण हरभट (३) भार्या मथुरा.
पांडुरंग गोविंद (५) भार्या लक्ष्मी.
रामभट गोविंद (५) भार्या गंगा.
विश्वनाथ रामभट (२) हे कोचऱ्याहून गणेशवाडीस आले. यांना अक्कलकोटकर श्री. फत्तेसिंग भोसले व पटवर्धन संस्थानिक यांजकडून जमिनी इनाम मिळाल्या. हे उत्तम वैदिक होते.

नारायण विश्वनाथ (३) हे नामांकित वैदिक होते. वास्तव्य गणेशवाडी.
गंगाधर नारायण (४) वैदिक. भार्या उमा.
विश्वनाथ गंगाधर (५) वैदिक. भार्या काशी.
चिंतामणि विश्वनाथ ऊर्फ आप्पा (६) वैदिक व मांत्रिक होते. भार्या सरस्वती.
वामन विश्वनाथ (६) मृ. ७५ व्या वर्षी. वास्तव्य गणेशवाडी. भार्या सीता, सांगलीच्या गोपाळ विठ्ठल परांजप्यांची मुलगी. कन्या गंगू, गणेशवाडीच्या भालचंद्रभट पंचनदीकरांची पत्नी.
गणेश वामन (७) ज. श. १७८६; मृ. श. १८२९ प्लेग. प्रथम मराठी शिक्षक. नंतर गणेशवाडीस किराणा मालाचें दुकान होतें. भार्या सरस्वती, रामदुर्गच्या बिवलकरांची मुलगी. कन्या (१) अक्कू, म्हैसूरच्या नागेशराव अभ्यंकरांची पत्नी. (२) गंगू, सांगलीच्या कृष्णराव आपटयांची पत्नी.
* **वामन गणेश ऊर्फ बन्या** (८) ज. स. १९०४. अकलूजला यांत्रिक कामाची खाजगी नोकरी आहे. भार्या आनंदी, फाटकांकडील.
* **हरी वामन ऊर्फ प्रभाकर** (९) ज. स. १९३१ सप्टेंबर.
* **गंगाधर वामन** (७) ज. श. १७९३. गणेशवाडीस शेती व भिक्षुकी करतात. अविवाहित.
वासुदेव विश्वनाथ (६) ज्योतिषी होते. वास्तव्य गणेशवाडी. भार्या रखमा. कन्या (१) यमुना, केंपवाडच्या जोश्यांकडे दिली. (२) ठकू (सीता), शिरढोणच्या रामचंद्र वासुदेव वेलणकर मास्तरांची पत्नी.
विश्वनाथ वासुदेव (७) ज. श. १७७९; मृ. श. १८२४. गणेशवाडीस याज्ञिक होते. भार्या लक्ष्मी, सांगलीच्या घारपुऱ्यांची मुलगी. कन्या (१) दुर्गा, हरीपूरास; (२) द्वारका, सांगलीस आपटे मास्तरांस दिली.
कृष्णाजी विश्वनाथ (८) ज. श. १८०४; मृ. श. १८५५. शास्त्री व याज्ञिक होते. वास्तव्य सांगली. भार्या रखमा, उगारच्या तुळपुळयांची मुलगी. कन्या सोनू, मिरजेच्या गिरणीवाले केळकरांकडे दिली.
* **दामोदर कृष्ण** (९) वय १८. सांगलीस सिटीस्कुलांत विद्यार्थी.
चिंतामणि विश्वनाथ ऊर्फ आप्पा (८) ज. श. १८१९; मृ. श. १८५५. सांगली संस्थानांत मराठी शिक्षक होते. भार्या राधा, सांगलीच्या छत्र्यांची मुलगी.
हरभट विश्वनाथ (६) ज. श. १७३७; मृ. श. १८०९. गणेशवाडीस शेती करीत. अविवाहित.
केशव गंगाधर (५) वैदिक. वास्तव्य गणेशवाडी. भार्या राधा. कन्या (१) मन, गणेशवाडीच्या दामोदरभट गाडगिळांची पत्नी. (२) भागू, कुरुंदवाडच्या गाडगिळांकडे दिली. (३) बया, सांगलीच्या जिवाजीपंत केळकरांची पत्नी. (४) आऊ, कुरुंदवाडच्या ओकांकडे दिली,

गणेश केशव (६) गणेशवाडीस वैदिक होते. भार्या सावित्री, गणेशवाडीच्या पंचनदीकर जोश्यांची मुलगी. कन्या जिऊ, गणेशवाडीच्या नारायणभट मराठ्यांची पत्नी.

नारायण केशव (६) गणेशवाडीस सुखवस्तु होते. अविवाहित.

धोंडभट केशव (६) मृ. श. १८१४ आश्वि. शु. ८. वय ७०. गणेशवाडीस वैदिक होते. भार्या जानकी, रामदुर्गच्या विनायक महादेव बापटशास्त्र्यांची मुलगी. कन्या (१) बहिणा, सांगलीच्या पांडुरंग रामकृष्ण केळकरशास्त्र्यांची पत्नी. (२) चिमा, मिरजेचे शिवराम महादेव गोखले, गवई यांची पत्नी. (३) वेणू, सांगलीस ताम्हनकरांकडे दिली.

* **गोपाळ धोंडभट** (७) ज. श. १७८२. याज्ञिक व मांत्रिक. वास्तव्य उगार-खुर्द. भार्या राधा, कुरुंदवाडच्या केशवबोवा पलुसकर गाडगिळांची मुलगी. कन्या (१) अंबू, गाणगापूरच्या वासुदेव कृष्ण फाटकांची पत्नी. (२) मनू, कोल्हापूरच्या नारायण गणेश म्हसकरांची पत्नी.

रामचंद्र गोपाळ (८) ज. श. १८१४; मृ. श. १८५६. सांगली संस्थानांत पोलिसखात्यांत नोकर होते. भार्या सीता, किन्हईच्या बळवंतराव लिमयांची मुलगी. कन्या सुंदर, पुण्यास आगाश्यांकडे दिली.

* **लक्ष्मण गोपाळ** (८) ज. श. १८१८. उगार येथें मराठी शिक्षक आहेत. भार्या गिरिजा, इचलकरंजीच्या नरसोपंत साठ्यांची मुलगी. कन्या (१) नर्मदा, म्हैसाळचे बाबू गणेश जोगळेकर, कीर्तनकार यांची पत्नी. (२) सिंधु, म्हैसाळच्या मोरेश्वर शंकर देवलांची पत्नी. (३) वेणू, वय ८. (४) तारा, वय १॥. ही व हिचा भाऊ यशवंत हीं जुळीं भावंडें आहेत.

* **मोरेश्वर लक्ष्मण** (९) वय १३. हायस्कूल विद्यार्थी, जमखिंडी.

* **यशवंत लक्ष्मण** (९) वय १॥.

सदाशिव धोंडभट (७) ज. श. १७८६; मृ. श. १८५७. जमखिंडीस नामांकित वकील होते. भार्या अन्नपूर्णा, इंगळीच्या गणेशपंत परांजप्यांची मुलगी. कन्या (१) योगा, जमखिंडीच्या लक्ष्मण बाबा वैद्यांची पत्नी. (२) रंगू, नरगुंदच्या अनंतराव गोडश्यांची पत्नी. (३) शांता, जमखिंडीच्या शंकरराव आपट्यांची पत्नी. (४) कृष्णा, जमखिंडीच्या बंडोपंत साठ्यांची पत्नी.

* **भालचंद्र सदाशिव** (८) ज. श. १८३०. बी.ए. (१९३१); एल्‌एल्.बी. वकील, जमखिंडी. भार्या सावित्री.

* **रघुनाथ सदाशिव** (८) ज. श. १८३५. जमखिंडीस व्यापार करतात.

दामोदर धोंडभट (७) ज. श. १७८९; मृ. श. १८२५. अथणीस वकिलांचे कारकून होते. भार्या यशोदा, टाकळवाडीच्या साम्यांची मुलगी.

* **दत्तंभट धोंडभट** (७) ज. श. १८०१. गणेशवाडीस वैदिक. भार्या गंगा, जमखिंडीच्या विष्णु लक्ष्मण गोवंडे ऊर्फ साठ्यांची मुलगी. कन्या (१) आऊ,

सांगलीच्या नारायण भास्कर जोश्यांची पत्नी. (२) चंपा, समदोळीच्या (सांगली) दामोदर व्यंकटेश आपट्यांची पत्नी. (३) येसू, इचलकरंजीच्या विष्णु त्र्यंबक जोश्यांची पत्नी. (४) भागू, सातारच्या यशवंत विष्णु केळकरांची पत्नी. (५) यमू, म्हैसाळच्या लक्ष्मण मुकुंद देवलांची पत्नी. (६) मथू, जमखिंडीच्या रामचंद्र केशव कोल्हटकरांची पत्नी.

* **विश्वनाथ दत्तात्रेय** (८) ज. श. १८३८. गणेशवाडीस वेदाध्ययन करतात.

* **केशव दत्तात्रेय** (८) ज. श. १८४४ कार्तिक. सांगलीस सिटीस्कुलांत विद्यार्थी आहेत.

* **धुंडिराज दत्तात्रेय** (८) ज. श. १८४६. मराठी ३ री.

गोविंद धोंडभट (७) ज. श. १८०९; मृ. श. १८२५. विद्यार्थिदशेंत मृत्यु.

जीवभट नारायण (४) उत्तम वैदिक, धर्मशास्त्रज्ञ व याज्ञिक.वास्तव्य गणेशवाडी.

श्रीधर जीवभट (५) वैदिक. वास्तव्य गणेशवाडी. कन्या धोंडू, गणेशवाडीच्या गोविंदभट कानिटकरांची पत्नी.

बाळंभट श्रीधर (६) हे दत्तक आले. यांचें मूळचें नांव बाळंभट त्र्यंबकभट पेंडसे. गवई होते. वास्तव्य गणेशवाडी. भार्या उमा, चंदूरच्या (बेळगांव) विनायकभट वझ्यांची मुलगी.

श्रीधर बाळंभट (७) उत्तम गवई होते. लाहोरास विष्णुबोवा पलुस्कर यांजबरोबर श. १८२५ त होते. भार्या आनंदी, बोरगांवच्या (बेळगांव) फडक्यांची मुलगी.

* **नारायण श्रीधर** (८) ज. श. १८२४ आषाढ शु. ४. कासेगांवास यांची पिठाची गिरणी आहे. भार्या यशोदा, सांगलीच्या भिडयांची मुलगी. कन्या (१) भीमा. (२) सुशीला. (३) विमला.

* **मुरलीधर नारायण** (९) वय ७.

* **गोविंद नारायण** (९)

गुंडो बाळंभट (७) वयाच्या १५ व्या वर्षी मृत्यु.

त्र्यंबकभट जीवभट (५) उत्तम जटापाठी वैदिक, धर्मशास्त्रज्ञ व याज्ञिक. वास्तव्य गणेशवाडी. भार्या रमा.

दामोदर त्र्यंबक (६) वैदिक. वास्तव्य गणेशवाडी.

जगन्नाथ त्र्यंबक (६) वैदिक. वास्तव्य गणेशवाडी. भार्या सत्यभामा. हरीपूरच्या मराठ्यांची मुलगी. कन्या अंबू (जानकी), बडोद्याच्या रामचंद्र दिनकर फडक्यांची पत्नी.

विनायक जगन्नाथ (७) ज. स. १८७२; मृ. स. १८९७. शास्त्री होते. ड्राइंगच्याहि परीक्षा दिल्या होत्या. भार्या रमा, इचलकरंजीच्या महादेव वासुदेव लेल्यांची मुलगी.

* **त्र्यंबक विनायक ऊर्फ बाबा** (८) ज. स. १८९६. सांगलीस मराठी शाळेंत ड्राइंगमास्तर आहेत. पत्ता-मारुतीचे देवळाजवळ, सहस्रबुद्धे यांचा वाडा, जुनी सांगली.

वैद्यकी करितात. यांचें 'भीष्मप्रतिज्ञा' औषधालय आहे. भार्या उमा, मेणवलीच्या नरहर विष्णुशास्त्री जोश्यांची मुलगी. कन्या (१) मालती, ज. स. १९२४ जून १७. ड्राइंगच्या ३ परीक्षा पास.. इंग्रजी दुसरींत. (२) सिंधु, ज. स. १९२९ जून २७. मराठी २ री. (३) कमल, ज. स. १९३४ ऑगस्ट २८.

***हणमंत त्र्यंबक** (९) ज. स. १९३७ एप्रिल १५.

बाळंभट त्र्यंबक (६) हे आपल्या चुलत्यास दत्तक गेले. तेथील नांव बाळंभट श्रीधर.

विष्णु त्र्यंबक (६) वैदिक. जन्मांध होते. अविवाहित. वास्तव्य गणेशवाडी.

घराणें १६ वें, वाडखोल

(वंशावळ पृ. १२८ ते १२९)

या घराण्याचा मूळ पुरुष बल्लाळ (बळिराम ऊर्फ दादा). कोंकणांतील मूळ गांव वाडखोल (असोली, पोस्ट अरवली, जि. रत्नागिरी). या ठिकाणीं यांचें वास्तव्य सन १७२० पासून असल्याचें दिसतें. मूळ हे केळशी, श्रीवर्धन, मुर्डी किंवा पनवेल येथून वाडखोल येथें गेले असावे असें म्हणतात; परंतु निश्चित माहिती नाहीं. वाडखोल येथून यांची मंडळी बांबर्डें (तेरसें), वज्राट, हंपीहोळी, कुरुंदवाड, सांगली इत्यादि ठिकाणीं गेली. सध्यां यांचें वास्तव्य इंदूर संस्थानांतील खातेगांव, गड-हिंग्लज, गुलबर्गा, बडोदें, वाडखोल व संकेश्वर या गांवीं आहे. यांशिवाय पूर्वीं यांचें वास्तव्य ओझरखोल, काशी, पुणें व श्रीवर्धन या गांवीं होतें असें दिसतें.

कुलदेवता :—महाविष्णुप्रमुखपंचायतन. असोली येथील ग्रामदेवता श्रीदेव नारायण व वज्राट येथील गिरोबा या देवतांना नैवेद्य दाखवितात. बोडण भरण्याची चाल आहे.

या घराण्यांत पिढ्या ८, एकूण व्यक्ति ६२ व जिवंत व्यक्ति १४ आहेत.

बळिराम ऊर्फ बल्लाळ ऊर्फ दादाभट (१) यांच्या वडिलांचें नांव बाबूभट असावें. परंतु नक्की कळत नाहीं. हे चांगले वैदिक होते. यांनीं शेवटीं संन्यास घेतला होता. यांनीं वाडखोल मौजे आसोली येथें सुमारें ८ एकर जमीन संपादन केली; व सावंतवाडी संस्थानाकडून जमिनीचा कायमधारा करून घेतला. हे स. १७२० च्या सुमारास रत्नागिरी जिल्ह्याच्या उत्तर भागांतून वाडखोल येथें राहावयास आले असावे.

बाबूभट बळिराम (२) हे बांबर्डें (पेटा कुडाळ) येथें गेले व तेथें कांहीं जमीन संपादन केली.

कृष्णशास्त्री बाबूभट (३) हे बांबडर्चाहून हंपीहोळीला गेले व तेथें यांनींहि कांहीं जमीन संपादन केली. भार्या रखमा.

लक्ष्मण कृष्ण (४) भार्या राधा.

कृष्णाजी चिंतामणि (५) हे गुलबर्ग्यास नगदी कारकून होते.

दत्तात्रेय कृष्ण (६) मृ. स. सुमारें १९३२. गुलबर्ग्यास कारकून होते. यांस भार्या तीन. पहिलीचा पुत्र अंबादास. तिसरी सीता, हीस पुत्र गुंडो व कल्लेश्वर. कन्या कमल, वय ५.

अंबादास दत्तात्रेय ऊर्फ नारायण (७)

* **गुंडो दत्तात्रेय** (७) वय १०. गुलबर्गा येथें असतो.

* **कल्लेश्वर दत्तात्रेय** (७) वय ८.

नारायण बळिराम (२) हे वाडखोलहून कुरुंदवाडास गेले.

जनार्दन नारायण (३) हे आपले चुलते महादेव बळिराम यांस दत्तक गेले. तेथील नांव जनार्दन महादेव.

महादेव बळिराम (२) हे वाडखोलास वडिलार्जित इस्टेट संभाळून असत. यांनीं आपले बंधु नारायण यांचा तिसरा मुलगा जनार्दन यास दत्तक घेतलें. नांव जनार्दनच ठेविलें. यांनीं वज्राटच्या (सं. सांवतवाडी) श्रीदेव गिरेश्वर किंवा गिरोबा याचा अभिषेक पत्करला व तेथें वतनवाडी संपादन केली. हे व यांचा औरस मुलगा शिवराम यांनीं १७७० मध्यें वाडखोलास रामेश्वरप्रमुख-पंचायतनाचें मंदिर बांधून त्यास सावंतवाडी संस्थानाकडन कांहीं नेमणूक करून घेतली.

रामेश्वर जनार्दन (४) यांनीं आपले बंधु नारायण यांचा मुलगा बाबू यास दत्तक घेतलें.

कृष्णाजी बाबूभट (६) मृ. स. १९०३. यांनीं सावंतवाडी, कोल्हापूर, उज्जैन, वगैरे गांवीं कांहीं दिवस राहून मेडिकल-स्कूलची शेवटची परीक्षा दिली व सात आठ वर्षें ग्वाल्हेर संस्थानांत प्रॅक्टिस करून पुढें पन्ना संस्थानांत स्टेट मेडिकल ऑफिसरची जागा पत्करली. भार्या लक्ष्मी. या मिडवाईफ असून गुलबर्गा येथें प्रायव्हेट प्रॅक्टिस करितात.



कृष्णाजी बाबूभट

प्रभाकर चिंतामणि (५) भार्या भागीरथी.

* **महादेव प्रभाकर** (६) ज. स. १८७८. यांनीं गरिबींतून दिवस कंठीत मॅट्रिक व मेडिकलस्कूलची शेवटची परीक्षा दिली व इंदूर संस्थानांत नोकरी केली.

सध्यां पेन्शनर असून ख़ातेगांव (सं. इंदूर) येथें राहतात. भार्या सत्यभामा आपटयांकडील.



१. महादेव प्रभाकर, २. सत्यभामाबाई.

* जनार्दन महादेव (७) ज. स. १८९८. बी. ए., एल्‌एल्. बी., वकील खातेगांव. भार्या भागीरथी, परांजप्यांकडील.

* चिंतामणि जनार्दन (८) ज. स. १९३२.

* बल्लाळ जनार्दन (८) ज. स. १९३७.

विनायक चिंतामणि (५) भार्या सावित्री, तुळसच्या बाळकृष्ण गोविंद गोऱ्यांची मुलगी. कन्या (१) गोदू, आरोसचे अभ्यंकरांकडे; (२) बनी, अनगांवच्या बेहेऱ्यांकडे दिली.

* चिंतामणि विनायक (६) ज. श. १८०७. शेती व भिक्षुकी करतात. वास्तव्य वाडखोल. भार्या भागीरथी, वाटव्यांकडील.

* शिवराम चिंतामणि (७) ज. स. १९१९. वाडखोलास शेती व भिक्षुकी करतात.



जनार्दन महादेव

* **रामकृष्ण विनायक** (६) ज. श. १८०४. संकेश्वरास यांचें चहाचें दुकान व खाणावळ आहे. भार्या लक्ष्मी, फाटकांकडील.

* **गोविंद रामकृष्ण** (७) ज. स. १९२१. मॅट्रिकच्या वर्गात. गडहिंग्लजला आहेत.

* **श्रीकान्त रामकृष्ण** (७) ज. स. १९२५.

* **जनार्दन रामकृष्ण** (७) ज. स. १९२८.

* **विनायक रामकृष्ण** (७) ज. स. १९३१.

* **मेघश्याम रामकृष्ण** (७) ज. स. १९३४.

गोपाळ बळिराम (२) हे वाडखोलहून सांगलीस आले.

वासुदेव रामचंद्र (४) हे सांगलीस असत. पुढें काशीस जाऊन दशग्रंथी वैदिक झाले.

बाळंभट वासुदेव (५) यांनीं काशीस जाऊन दशग्रंथांचा अभ्यास केला. लष्कर, इंदूर व बडोदें येथें परीक्षा दिल्या. बडोद्यास राहून भिक्षुकी करीत व पुराण सांगत. भार्या सरस्वती, सावंतवाडीच्या जोगांकडील. कन्या (१) गंगू, केळकरांकडे; (२) सुंदर, केळकरांकडे; (३) चंद्रा, गाडगिळांकडे दिली. (४) अनसूया. (५) अंबू, म्हसकरांकडे दिली. (६) शांता.

विनायक वासुदेव (५) यांना एक मुलगी होती.

नारायण रामचंद्र (४) भार्या गंगा.

घराणें १७ वें, केळवें—माहीम

(वंशावळ पृ. १३० ते १३२)

या घराण्याचा मूळ पुरुष विश्वनाथ. हें घराणें मूळचें परचुरी, तालुका संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील असून तेथून नाशिकास व नंतर केळवें-माहीम येथें आलें. सध्यां यांचें वास्तव्य दहिसर, दादर, परळ, पालघर, बडोदें, बार्शी, मुंबई व साखरवाडी या गांवीं आहे.

कुलस्वामी:—श्रीमल्हारीमार्तंड (खंडेराव) म्हणतात. मूळचें कोंकणांतील कुलदैवत कोणचें हें नक्की माहीत नाहीं. परंतु महालक्ष्मी असेल असें कांहींचे सांगण्यांत येतें. देवीचा जोगवा महालक्ष्मीचे नांवानें मागतात. शारदीय नवरात्रांत घट वगैरे नसून देवाजवळ समई असते. नऊ दिवस धान्यफराळ करून दसऱ्यास पारणें असतें. सध्यां मल्हारीमार्तंड (खंडोबा) हेंच मुख्य दैवत मानीत असून चंपाषष्ठी व माघी पौर्णिमेस उत्सव करितात. देवदिवाळीस नैवेद्य घालीत नाहींत.

अठराव्या घराण्यांतील चौथ्या पिढींतील विश्वनाथ व या घराण्यांतील मूळ पुरुष विश्वनाथ एक असतील काय ? दोन्ही घराण्यांचें मूळ गांव परचुरी आहे.

या घराण्यांत पिढ्या ८, एकूण व्यक्ति ९५ व जिवंत व्यक्ति ३३ आहेत.

विश्वनाथभट (१) यांस दोन कन्या होत्या.

रामकृष्ण विश्वनाथ (२) कन्या (१) अंबा, अंताजीपंत देवधरांची पत्नी. (२) यमुना, दाजी जोश्यांची पत्नी. (३) गंगा, मोरभट फडक्यांची पत्नी.

सिद्धेश्वर रामकृष्ण (३) दुसरी भार्या, येवलेकर साठ्यांकडील. कन्या (१) वामनभट घनवटकरांची पत्नी. (२) बाळाजी अमृत दुगलांची पत्नी.

पांडुरंग रामकृष्ण (३) कन्या (१) वारू, अंताजीपंत सोहनी, नाशिककरांची पत्नी. (२) गंगा, कृष्णाजीपंत थत्ते, गंगापूरकरांची पत्नी.

महादेव पांडुरंग (४) कन्या बहिणा.

* **दत्तात्रेय रामकृष्ण** (६) ज. श. १८१०. बडोदें संस्थानांत जंगलखात्यांत नोकरी आहे. बडोद्यास शहापुऱ्यांत राहतात. भार्या (१) सावित्री, डोंगऱ्यांकडील. भार्या (२) सावित्री, साठ्यांकडील.

* **गणेश रामकृष्ण** (६) वय ४०. बडोद्यास शहापुऱ्यांत घड्याळ-दुरुस्तीचें काम करितात. भार्या सरस्वती, सोमणांकडील. कन्या (१) गंगू (मालती), वय ५. (२) काशी.

* **शरच्चंद्र गणेश** (७) वय ८. बडोद्यास मराठी शिक्षण चालू.

* **चंद्रकान्त गणेश** (७) वय २.

यादवभट शिवरामभट (३) हे नाशिकहून केळवें-माहीमास आले. तेथें यांस ओक घराण्यांतील एका बाईनें श्रीलक्ष्मीनारायणाच्या मूर्ति असलेलें घर दिलें. देवाची पूजा व नैवेद्य करून राहावें, या शर्तीवर रुपये ५० उत्पन्न येणारी जमीन दिली. यांनीं संन्यास घेतला.

रघुनाथ यादव (४) कन्या (१) भनू, सुरतचे जोगळेकरांकडे; (२) काशी, अनगांवच्या पिंपळखऱ्यांकडे दिली.

चिंतामणि रघुनाथ (५) भिक्षुकी करीत. यांच्या हयातीपर्यंत पेशव्यांकडून यांस वर्षासन चालू होतें. कन्या (१) चिमणा, माहीमच्या भटांकडे; (२) माई, साताऱ्च्या थत्त्यांकडे दिली.

मोरेश्वर चिंतामणि (६) ज. केळवेंमाहीम; मृ. वय ८२. शिक्षण मराठी. व्यवसाय शेती. विशेष गुण—उदारता, मल्लविद्या, निःस्वार्थी मैत्री. भार्या लक्ष्मी, आठवल्यांकडील. कन्या (१) सरस्वती, ज. स. १८२६, गणपतराव बामांची पत्नी. (२) लीला, ज. श. १८३६, कृष्णराव आपट्यांची पत्नी.

* **लालजी मोरेश्वर** (७) ज. व्यारा, श. १८२०. मॅट्रिक. लेखक, साहित्यिक व मजूर पुढारी. यांनीं 'गुन्हेगार समाज व जीवन' वगैरे बरेच ग्रंथ लिहिले आहेत. मोकळेपणा, समरसता व चिकाटी हे गुण असून सामाजिक कार्याची आवड आहे. पत्ता—नं. ४, नवलकर लेन, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४.

* **रघुनाथ मोरेश्वर** (७) ज. सातारा, श. १८२८. मॅट्रिक. मुंबईस वायरलेस इंजिनिअर आणि लेक्चरर आहेत. स. १९३३ त लंडन येथें गेले होते. एफ्. आर्.

टी. आय्. १९३३. एम्. आर्. एस्. १९३६. तालीमबाज असून सार्वजनिक कामाची आवड आहे.पत्ता—नं. ४, नगरकर लेन, विठ्ठलभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई. विवाह स. १९२४. भार्या सीता, जोश्यांकडील.

*विश्वनाथ मोरेश्वर (७) ज. व्यारा, श. १८३१. मॅट्रिक. मुंबईस व्यापारी नोकरी आहे. पत्ता—नं. ८, दुभाष लेन, गिरगांव येथें राहतात. भार्या ताराबाई, या पाठारे प्रभु राव यांजकडील आहेत व सिव्हिल मॅरेज केलें आहे.

*गोविंद मोरेश्वर (७) ज. व्यारा, श. १८३३. मॅट्रिक, साहित्यिक, लेखक. नं. ४ नवलकर लेन, विठ्ठलभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई येथें राहतात.

गंगाधर चिंतामणि (६) ज. केळवेंमाहीम. वैदिक होते. हे अविवाहित होते. मल्लविद्या व बागाईत यांची आवड असून उदार होते.

भास्कर चिंतामणि (६) मृ. वय ५४, कफक्षय. भार्या (१) दुर्गा, जोश्यांकडील. भार्या (२) दुर्गा, मोडकांकडील. कन्या मथुरा, ज. बडोदें. बडोद्याच्या श्रीधर सखाराम डोंगऱ्यांची पत्नी.

*भालचंद्र भास्कर (७) ज. बडोदें, स. १९१२ मार्च १२. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. बडोद्यास को-ऑपरेटिव्ह सोसायटींत नोकरी आहे. यांना गायनाची आवड आहे. रावपुऱ्यांत खारीबावजवळ सीतारामबुवाचे गौखान्यांत राहतात. भार्या प्रमिला, विवाह स. १९३७, जोश्यांकडील.

*विनायक भास्कर (७) ज. बडोदें, वय १८. बडोद्यास साइनबोर्ड पेंटर आहेत.

नीळकंठ रघुनाथ (५) कन्या कल्याणच्या करमरकरांकडे दिली.

*आत्माराम नीळकंठ (६) वय वर्षें ७०. दहिसरास डॉक्टर आहेत. कन्या यशोदा, दत्तात्रेय विठ्ठल केळकरांची पत्नी.

*त्र्यंबक आत्माराम (७) वय ३५. दहिसर येथें जंगलखात्यांत नोकरी आहे. भार्या सुभद्रा, डहाणूच्या नारायणशास्त्री फाटकांची मुलगी. कन्या प्रभावती.

बाळाजी काशीनाथ (५) ज. माहीम. शिक्षण मराठी. नोकरी करीत. भार्या पार्वती.

शामराव बाळाजी (६) भार्या सगुणा. यांना एक कन्या आहे.

चिमणाजी काशीनाथ (५) ज. माहीम; अविवाहित होते.

रंगनाथ काशीनाथ (५) ज. माहीम; मृत्यु वय ३५. शिक्षण मराठी. रेव्हिन्यू खात्यांत तलाठी होते. भार्या सीता (आवडी), वसईच्या कापरेकरांकडील.

*विष्णु रंगनाथ (६) ज. माहीम. श. १८०८ माघ व. ८. शिक्षण मराठी व गुजराथी. पालघरास कमिशन एजंट आहेत. देवधर्माकडे प्रवृत्ति. भार्या लक्ष्मी (बनू), बर्व्यांकडील. कन्या (१) येसू, मराठी ५ वी. (२) नर्मदा, मराठी ३ री. (३) सिंधु, मराठी ३ री.

*श्रीपाद विष्णु (७) ज. पालघर, वय ३.

दत्तात्रेय रंगनाथ (६) ज. माहीम. शिक्षण मराठी. भार्या गंगा, बडोद्याच्या कार्लेकरांकडील. कन्या चंद्रा, मराठी ३ री.

* जगन्नाथ दत्तात्रेय (७) ज. पालघर, वय १६. इंग्रजी ५ वी.

केशव शिवराम (३) कन्या (१) बगू, नाशिकच्या विठ्ठल दीक्षित जोगळेकरांची पत्नी. (२) सखू, सुरतचे काण्यांकडे दिली. (३) अंबा, चिमणाजीपंत पेठे–शिरगांवकर यांची पत्नी. (४) दुर्गा, मोरोबा दांडेकर–चिंचणीकर यांची पत्नी.

बाळकृष्ण त्र्यंबक (५) भार्या जानकी.

महादेव बाळकृष्ण (६) भार्या पार्वती.

वामन त्र्यंबक (५) कन्या (१) यमुना, तारापूरच्या बर्व्यांकडे; (२) कृष्णा, डहाणूस केळकरांकडे दिली.

* **रामचंद्र केशव** (७) ज. स. १८८९. मुंबईस सॉलिसिटरकडे नोकरी आहे. नं. ११ डोंगरे बाग, दादर येथें राहतात. पत्नी जानकी, लेल्यांकडील.

* **मधुसूदन रामचंद्र** (८) ज. स. १९१९. मॅट्रिक. मुंबईस गव्हर्नमेंट कमर्शिअल क्लासमध्यें शिकत आहेत.

* **दत्तात्रेय रामचंद्र** (८) ज. स. १९३०. शिक्षण मराठी.

नारायण जनार्दन ऊर्फ भाऊराव (६) भार्या गंगा. कन्या यमुना.

वासुदेव त्र्यंबक (५) ज. केळवें–माहीम. मृ. स. १८९६. मुखत्यार वकील होते. भार्या रखमा, पेठ्यांकडील. कन्या (१) गंगू, केळकरांकडे; (२) वेणू, कर्व्यांकडे; (३) काशी, जोश्यांकडे दिली.

मोरेश्वर वासुदेव (६) ज. माहीम, मृ. वय ३५. माहीम येथें शेती करीत. भार्या मनू.

* **केशव मोरेश्वर** (७) वय ३५. बडोद्यास सरकारी छापखान्यांत नोकरी आहे. बाबाजीपुऱ्यांत लक्कड पिठा, लक्ष्मीनारायणमंदिरांत राहतात. भार्या रमा, बापटांकडील.

सीताराम वासुदेव (६) ज. केळवें–माहीम, सप्टेंबर १८८३; मृ. १९३१ जून, ब्लडप्रेशरनें. बी. ए. (१९०६). फेलो, बडोदा कॉलेज; थर्ड ग्रेड ड्राइंगची परीक्षा पास. हिन्दी येत होतें. स. १९१२ मध्यें श्री. सयाजीराव गायकवाड यांनीं राजपुत्र धैर्यशीलराव यांचे शिक्षक म्हणून यांस विलायतेस पाठविलें. त्या वेळीं टी. डी. पी. (लंडन); एम्. सी. पी. आणि एफ्. आर्. सी. आय्. (लंडन) या पदव्या मिळविल्या. परत आल्यानंतर असिस्टंट कमिशनर ऑफ् एज्युकेशन या जागेवर नेमलें. स. १९२५ त श्री. युवराज प्रतापसिंह राजे यांचे शिक्षक म्हणून नेमणूक करण्यांत आली. त्यानंतर यांस बडोदें प्रांताचे सुभे म्हणून नेमिलें. हे लेखक, कवि व चित्रकार होते; व 'इलियड मेमोरिअल् स्कॉलर इन् इंग्लिश' होते. यांचीं पुस्तकें : **प्रकाशित**:---(१) संस्कृत

वाङ्मयाचा इतिहास, (२) रसतरंगिणी, (३) पद्य–सुमनांजलि (काव्य), (४) शिशु–संमेलनोत्सव (काव्य), (५) श्रीमद् जयसिंहविवाह (काव्य), (६) महाराजा शिवाजी, (७) गद्यसुमनहार, (८) बडोदें राज्याचा इतिहास, (९) बडोदें राज्याचा भूगोल, (१०) हिंदुस्थानचा भूगोल, (११) काव्यकलिका गुच्छ, (१२) रसतरंगिणी–रसोल्लास, (१३) मध्यप्रान्त–वऱ्हाड भूवर्णन (मराठी), (१४) मध्यप्रांत–वऱ्हाड भूवर्णन (हिंदी), (१५) Companion to the study of marathi, (१६) Notes on special method in Geography, (१७) Matriculation Poetry Book with notes 1912, (१८) Matriculation Poetry Book with notes 1913, (१९) Matric prose with notes 1912, (२०) एकीकरण (गुजराथी): **अप्रकाशित ग्रंथ**:—(१) हिंदुस्थानचा इतिहास, (२) मूर्तिपूजा, (३) साक्षात्कार, (४) शिष्टाचार, (५) इटली (प्रवासात्मक), (६) स्वित्झर्लंड (प्रवासात्मक), शिवाय अनेक कविता आणि लेख उद्यान, काव्यरत्नावली, चित्रमय जगत्, व मासिकमनोरंजनमध्यें प्रसिद्ध झाले आहेत. भार्या लक्ष्मी, फडक्यांकडील. कन्या (१) विमल. (२) इंदिरा. (३) कमला.

* **भालचंद्र सीताराम** (७) ज. बडोदें, स. १९०९. एम्. बी. बी. एस्. (१९३५); मुंबईस के. ई. एम्. हॉस्पिटलमध्यें डॉक्टर आहेत. बडोदा कॉलेजमध्यें स्कॉलर आणि इंटर सायन्समध्यें युनिव्हर्सिटीचे परीक्षेंत उच्च मार्क मिळाल्यानें भावनगरची स्टेट स्कॉलर्शिप मिळाली. भार्या कमला, विवाह स. १९३२; करमरकरांकडील.

* **श्रीकान्त सीताराम** (७) ज. बडोदें, स. १९११. बी. एस्सी. (१९३१); एल्-एल्. बी. (१९३३); बडोदा कॉलेज व मुंबई लॉ कॉलेजमध्यें स्कॉलर होते. भांडारकर लॉ प्राइज्मन. बडोदें येथें वरिष्ठ कोर्टांत वकिली करतात. यांचें प्रकाशित पुस्तक : गाइड टु एफ. वाय्. ए. फिजिक्स.

* **मधुकर सीताराम** (७) ज. बडोदें, स. १९१७. बडोदा कॉलेजांत बी. ए. चे वर्गांत आहेत. "क्लार्क मेमोरिअल् इंग्लिश प्राइज्मन."

रामचंद्र केशव (४) भार्या रमा.

गोपाळ रामचंद्र (५) भार्या सावित्री.

* **विनायक गोपाळ** (६) ज. केळवें–माहीम, स. १८७६. शिक्षण मराठी इयत्ता ७. कोर्टांत कारकून होते. सध्यां पेन्शनर. फलटणजवळील साखरवाडीस असतात. भार्या सीता, ज. बदलापूर स. १८८५; मृ. स. १९२०. बदलापूरच्या चाफेकरांकडील.

* **दत्तात्रेय विनायक** (७) ज. बदलापूर, स. १९०५. एल्. एम्. ई. साखरवाडीस (फलटण) साखरेचे कारखान्यांत इंजिनिअर आहेत. विवाह स. १९२७. भार्या लक्ष्मी, ज. नाशिक स. १९१४. केळकरांकडील. कन्या (१) सुशीला, ज.

विलेपार्ले स. १९२९. मराठी ३ री. (२) सुमन, ज. नाशिक, स. १९३७.
* **विद्यासागर दत्तात्रेय** (८) ज. नाशिक, स. १९३५.
* **विष्णु गोविंद** (६) वय सुमारें ५२. हे मुंबईस एका कंत्राटदाराकडे नोकरीस असतात.
त्र्यंबक गोविंद (६) भार्या अन्नपूर्णा.
चिमणाजी नारायण (३) कन्या (१) साळू, गणेशभट कर्वे, पेशव्यांचे उपाध्ये यांची पत्नी. (२) सिद्धेश्वरभट फडके–टोकेकरांची सून.
गंगाधर चिमणाजी (४) यांना एक मुलगा असून तो परशुरामास राहात असे.
गोपाळ चिमणाजी (४) हे ग्वाल्हेरीस होते.
चिंतामणि विश्वनाथ (२) पहिल्या भार्येचा पुत्र हरभट. दुसऱ्या भार्येच्या कन्या (१) कावेरी, अंबादासभट चितळ्यांची पत्नी. (२) बगू, नेऱ्याच्या कर्व्यांकडे दिली.
हरी चिंतामणि (३) हे मोठे पट्टीचे विद्वान् असून पेशवाईंत आगाशीस आले. कन्या तारू, गोविंदपंत कान्हेरे–शिरगांवकर यांची पत्नी.
विनायक हरी (४) हे आगाशीस अग्निहोत्री होते.
चिंतामणि विनायक (५) हे मूळचे आयनी-मेटचाचे कान्हेरे घराण्यांतील होत. पेंडसे-कुळांत दत्तक आले. शिक्षण मराठी. सुरुवातीस गरिबीमुळें यांनीं लोकांकडे धोतरें धुण्याचें वगैरे काम केलें. नंतर पोलिसखात्यांत नोकरी धरली. अंगचे हुशारीमुळें कुलाबा जिल्ह्यांत पोलिस सुपरिंटेंडेंटच्या हुद्या-पर्यंत चढले. यांची नोकरी ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत झाली. करडे अंमलदार म्हणून यांची ख्याति असे. पेन्शन घेतल्यावर हे गोंडळ स्टेटमध्यें मुख्य पोलिस अंमलदार म्हणून ५०० रुपये पगारावर गेले. ब्रिटिशमधील पेन्शन रु. १२५ मिळत असे. उतार वयांत हे आगाशीस राहावयास आले. यांस बागबगीचाची आवड असल्यामुळें एक छोटेंसें घर बांधून आसपास बागबगीचा केला. तारा-पुराजवळ यांनीं आपले पत्नीचे नांवानें एक विहीर बांधली आहे. ३० वर्षांहून अधिक पेन्शन घेऊन हे स. १९१४ मध्यें वारले. भार्या यमुना, केतकरांकडील. कन्या बाबी.
विनायक चिंतामणि (६) मृ. स.१९३०, हृदयक्रिया बंद पडून. बी. ए. (ऑनर्स) १९०२. अलाहाबाद येथें फेलो म्हणून बोलाविलें असतां सरकारी नोकरी करा-वयाची नाहीं असा यांनीं जबाब दिला. नागपूर येथें मोटारचा व मुंबई येथें स्वदेशी कागदाचा धंदा यांनीं केला. दोन्ही धंदे बुडाले व ते आगाशीस जाऊन राहिले. टाइम्स वगैरे पत्रांतून मधून मधून लेख लिहून हे चरितार्थ करीत. आयुष्य स्वतंत्र रीतीनें घालविलें. परंतु उत्पन्न व पैशाचा पाठपुरावा असूनहि यांचें आयुष्य भरभराटींत गेलें नाहीं. पत्नी रमा. कन्या (१) गोदावरी, लाहोरचे हायकोर्ट जज्ज माधव विष्णु भिडे, आय्. सी. एस्. यांची पत्नी.

विवाह स. १९१२. (२) कमल, पुण्याचे इंजिनिअर व कॉंट्रॅक्टर मराठे यांजकडे दिली. विवाह स. १९३५.

***महादेव चिंतामणि** (६) वय अजमासें ६४. शिक्षण प्रीव्हिअसपर्यंत. सरकारी नोकरी करावयाची नसल्यामुळें नोकरीपेशा पत्करला नाहीं. स. १९०५ पासून स्वदेशी चळवळींत यांनीं भाग घेतला. काळ वर्तमानपत्रांत 'चिनी ब्राह्मणाचीं पत्रें' म्हणून यांचे तीस लेख प्रसिद्ध जाहले. पैसाफंड उत्पादक काळे यांजबरोबर सुरुवातीचे काळांत ते गांवोगांव हिंडले. त्या वेळीं यांनीं 'महाराष्ट्र पुराण' लिहिलें. 'मेळ्यांचा विचार' या नांवाचें यांचें पुस्तक सरकारनें जप्त केलें. पाद्री लोकांचे चळवळीस उत्तर म्हणून 'भिक्षुक होणारा अर्जुन' व 'पाद्रीभटाची खटपट' अशीं ज्ञानवान् ग्रंथमालेतर्फे एक पै किंमत ठेवून पुस्तकें छापून वांटलीं. यांनीं 'गणपति अथर्वशीर्षाचें मराठी भाषांतर', 'अष्टसिद्धिविनायक वर्णन', 'प्राकृत सत्यनारायणाची पोथी' वगैरे पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. म्हैसूरला जाऊन साखर बनविण्याची कृति शिकून येऊन स्वदेशीच्या चळवळींत 'साखर बनविणारी मंडळी वसई प्रांत लिमिटेड', 'छत्र्यांचा कारखाना', सुकेळ्यांचा व भाजीचा धंदा, डेअरी, औषधी धंदा, मृताच्या अस्थि गंगेंत टाकण्याचा धंदा वगैरे उद्योग केले. सध्यां 'कलंकी-पंथ-गाथा' लिहून झाली आहे व त्या ग्रंथाचा प्रसार करण्याचा विचार आहे. गोव्यांत आबासाहेब यांजकडे ते कांचकाम शिकण्यास गेले होते. पूर्व वयांत महाराष्ट्रप्रवासी म्हणून प्रवास केला आहे. यांनीं नाशिक ते पंढरपूर, नाशिक ते औरंगाबाद, बार्शी ते पुणें, अलीबाग ते रत्नागिरी इत्यादि ठिकाणचा प्रवास उतार वयांत पायीं केला आहे. यांना वनस्पतीविषयीं उत्तम माहिती आहे. प्रवासांत दुर्मिळ वनस्पती मिळविणें व औषधी समजून घेणें हीं कामें तें करतात. पत्ता—नं. २७ न्यू झवेरी बिल्डिंग, पोयबावडी, मार्केट समोर, परळ. भार्या उमा (सखू), त्रिंबक कृष्ण लेल्यांची मुलगी. कन्या (१) गंगू (लक्ष्मी), विवाह १९१३, गजानन गंगाधर छत्रे, मुक्काम पेठंबे यांची पत्नी. (२) दुर्गा (सुशीला), विवाह १९१९, कालवणच्या केशव लक्ष्मण जोगदेवांची पत्नी. (३) यमू (आनंदी), विवाह १९२४, नागांवच्या विष्णु रामचंद्र गोखल्यांची पत्नी. (४) द्वारका (गंगा), विवाह १९२६, मुंबईच्या शंकर काशीनाथ साठ्यांची पत्नी. (५) कुसुम, विवाह १९३३, पुण्याच्या यशवंत नरहर गोडबोल्यांची पत्नी.

दामोदर महादेव (७) ज. आगाशी स. १८९८; मृ. स. १९१४. शिक्षण मराठी. शेतकी करीत.

***परशुराम महादेव** (७) ज. आगाशी, स. १९०२ मे १०. १९२० सालीं असहकार चळवळींत शाळा सोडून राष्ट्रीय विद्यालयांत शिकून १९२२ मध्यें टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची प्रवेश-परीक्षा दिली. मुंबईस नॅशनल मेडिकल

कॉलेजमध्यें एक वर्ष घालविलें. स्वावलंबनानें शिक्षणाचें जमलें नाहीं म्हणून तें सोडून कापडाचे गिरणींत सहा महिने विणकर म्हणून सांचे चालविले. पण नोकरी न मिळाल्यामुळें कंपाउंडरच्या कामाचें शिक्षण घेतलें. सध्यां मुंबईस औषधांची 'बलभीम एजन्सी' चालवीत असून बचुबाई धर्मार्थ दवाखाना व नायगांव सोशल सर्व्हिस सेंटर, दादर अशा दोन ठिकाणीं नोकरी करतात. यांचीं मलेरिया तापावर हिंवताप शत्रु व ज्वरघ्नमधु; झटपट गुणी बाम, गॅरंटीचें गजकर्ण मलम व केशवर्धक माकेल (ब्राह्मी भृंगराज तेल) हीं औषधें खात्रीचीं म्हणन प्रसिद्ध आहेत. श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम, हिंदुसभा, वगैरे संस्थांचीं स्वयंसेवक म्हणून कामें हौसेनें करतात. भार्या वत्सला, विवाह स. १९२७, वरसईच्या मुकुंद गणेश गोखल्यांची मुलगी. कन्या मालती, ज. श. १८५५ मार्गशीर्ष शु. ११.

* **रघुनाथ परशुराम** (८) ज. मुंबई श. १८५१ माघ शु. १५. मराठी १ ली.

* **वैजनाथ परशुराम** (८) ज. श. १८५४ चै. शु. ११.

* **चिंतामणि परशुराम** (८) ज. श. १८५७ भाद्रपद व. २.

* **विष्णु महादेव** (७) ज. कासारवाडी स. १९०४. इंग्रजी ६ वी. बार्शीच्या रघुनाथ छापखान्यांत आहेत. भार्या (१) कमला, दात्यांकडील. भार्या (२) विमल, सांगलीचे म्हसकरांकडील. कन्या कुमुदिनी, ज. स. १९३६.

* **प्रद्युम्न विष्णु** (८) ज. स. १९३१.

घराणें १८ वें, गिम्हवणें

(वंशावळ पृ. १३३)

या घराण्याचा मूळ पुरुष केशव. कोंकणांतील मूळ ठिकाण परचुरी (जिल्हा-रत्नागिरी). तेथून ही मंडळी इंदूरला गेली होती. सध्यांचें यांचें कायमचें वास्तव्य गिम्हवणें (ता. दापोली) येथें असून उद्योगानिमित्त कांहीं मंडळी चिपळूण, दादर, दापोली व नागोठाणें या गांवीं आहेत. याशिवाय पूर्वीं यांची वस्ती अमरेळी, बडोदें, मुंबई, मोर्वी, सातारा व हर्णै या गांवीं होती असें दिसतें.

कुलस्वामी व कुलदेवता :—सोमेश्वर व महालक्ष्मी. यांबरोबर परचुरी येथील मानाय, चेंडकी (चांडकोबा), राम व लक्ष्मण, वणंद येथील पद्मावती, जाखमाता व काळकाय व गिम्हवणें येथील भानेश्वर, अमृतेश्वर व भैरी यांस देवदिवाळी, श्रावणी पौर्णिमा (जागर) व फाल्गुनी पौर्णिमा या दिवशीं नैवेद्य दाखवितात.

सतराव्या घराण्यांतील मूळ पुरुष विश्वनाथ व या घराण्यांतील चौथ्या

पिढींतील विश्वनाथ एक असतील काय ? दोन्ही घराण्यांचें मूळ गांव परचुरी आहे.

या घराण्यांत पिढ्या १२, एकूण व्यक्ति ४५ व जिवंत व्यक्ति १४ आहेत.

बाळाजी धोंडदेव (७) हे इंदूरास कारभारी होते असें समजतें. हे नामांकित वैद्य होते. भार्या रखमा, जोश्यांकडील. कन्या काशी, मुरुडच्या बाळंभट वैशंपायनांची पत्नी.

नारायण बाळाजी (८) मृ. श. १७७०. हे दशग्रंथी वैदिक होते. भार्या लक्ष्मी, उपाध्यांकडील. कन्या (१) वाली, ज. श. १७५०. आंजर्ल्याच्या हरी गोपाळ जोश्यांची पत्नी. (२) आवडी, ज. श. १७५५. बडोद्याच्या बाबजीभट देवधरांची पत्नी. (३) दुर्गा, ज. श. १७५९. मुरुडच्या वामनराव काण्यांची पत्नी.

वामन नारायण (९) ज. श. १७४८; मृ. श. १८२३. हे हर्णैस कारकून होते. खोतीहि करीत. भार्या सरस्वती, जोश्यांकडील. कन्या यमुना, ज. श. १७८७. गिम्हवण्याच्या महादेव वासुदेव मेहेंदळ्यांची पत्नी.

* **सीताराम वामन** (१०) ज. श. १७९०. गिम्हवण्यास शेती व भिक्षुकी करतात. भार्या दुर्गा, मोडकांकडील. कन्या (१) येसू, ज. श. १८२६. गिम्हवण्याचे वासुदेव गोविंद सहस्रबुद्ध्यांची पत्नी. (२) गोदू, ज. श. १८३१. आसूदचे रघुनाथ पांडुरंग जोश्यांची पत्नी. (३) द्वारका, ज. श. १८४१. कोरेगांवच्या दत्तात्रेय विष्णु जोगळेकरांची पत्नी.

* **नारायण वामन** (१०) ज. श. १८००. दापोलीस आचारी आहेत. अविवाहित.

त्र्यंबक नारायण (९) ज. श. १७५३; मृ. श. १८३२. हे दशग्रंथी वैदिक असून शेती व भिक्षुकी करीत. भार्या पार्वती, बव्र्यांकडील.

अनंत त्र्यंबक (१०) ज. श. १७७७; मृ. श. १८४१. गिम्हवण्यास भिक्षुकी करीत. भार्या गंगा, जोश्यांकडील. कन्या (१) अंबा, ज. श. १८०४. कोळथऱ्याच्या गंगाधर चिंतामण बडव्यांची पत्नी. (२) काशी, गिम्हवण्याच्या नारायण विष्णु जोश्यांची पत्नी. (३) धोंडी, ज. श. १८२५ मुरुडचे गणेश नारायण रिसबुडांची पत्नी.

* **भास्कर अनंत** (११) ज. श. १८०२. गिम्हवण्यास शेती व भिक्षुकी करतात. भार्या आनंदी, परांजप्यांकडील. कन्या सखू, ज. श. १८३३. करंद्याचे लक्ष्मण भिकाजी फडक्यांची पत्नी.

* **बाळकृष्ण भास्कर** (१२) ज. श. १८३८. नागोठण्यास पी. डब्ल्यू. खात्यांत नोकरी आहे.

* **गणेश अनंत** (११) ज. श. १८१०. चिपळुणास पी. डब्ल्यू खात्यांत नोकरी आहे. हे सार्वजनिक कामांत लक्ष घालणारे आहेत. भार्या सरस्वती, गोऱ्यांकडील. कन्या (१) भीमा, ज. श. १८४८. (२) कृष्णा, ज. श. १८५०. (३) प्रभावती, ज. श. १८५८.

* **विष्णु गणेश** (१२) ज. श. १८५६.

हरी अनंत (११) ज. श. १८१२; मृ. श. १८५८. मुंबईस कंपौंडर होते. भार्या राधा, वैद्यांकडील.

* रामचंद्र अनंत (११) ज. श. १८१४. गिम्हवण्यास शेती व भिक्षुकी करतात. भार्या सीता, ओकांकडील. कन्या (१) तापी, ज. श. १८५१. (२) वेणू, ज. श. १८५६. (३) आवडी, ज. श. १८५८.

* पांडुरंग रामचंद्र (१२) ज. श. १८५०. मराठी पहिली.

* मोरेश्वर रामचंद्र (१२) ज. श. १८५३.

* चिंतामणि रामचंद्र (१२) ज. श. १८५५.

* महादेव अनंत (११) ज. श. १८२०. दापोलीस शेती व लिहिण्याचें काम करतात. भार्या पार्वती, शित्र्यांकडील. कन्या (१) यमू, ज. श. १८५१. (२) दुर्गा, ज. श. १८५४. (३) गंगू, ज. श. १८५७.

केशव त्र्यंबक (१०) ज. श. १७८३; मृ. श. १८४०. हे काठेवाडांतील मोर्वी रेल्वेंत हेडक्लार्क होते. यांनीं कुंडार्क, चरणव्यूह व केतकी ग्रहगणिताची सारणी वगैरे ग्रंथ छापून प्रसिद्ध केले. भार्या लक्ष्मी, गोडबोल्यांकडील. कन्या गंगू, ज. श. १८२२. अंधेरीच्या बापूजी नारायण गोखल्यांची पत्नी.

* शंकर केशव (११) ज. स. १९१० आक्टोबर १२. बी. ए. (१९३५). हे दादरला किंग जॉर्ज इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक आहेत.

* विठ्ठल त्र्यंबक (१०) ज. स. १८७१ मार्च ३. रेल्वे खात्यांत नोकरी होती. सध्यां सेवानिवृत्त असून गिम्हवण्यास राहतात. यांनीं आपला मुलगा परशुराम याचे स्मरणार्थ मॅट्रिक परीक्षेस संस्कृत विषय घेऊन दापोली एज्यु. सोसायटीच्या हायस्कूलमधून गुणानुक्रमें पहिला येणाऱ्यास बक्षिस देण्याकरितां सोसायटीच्या हवालीं ४६० रुपये केले आहेत. त्याच्या ३॥ टक्क्यांच्या ५०० रु. च्या दर्शनी किमतीच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा सोसायटीनें घेऊन ठेविल्या आहेत. भार्या रखमा, जोश्यांकडील.

परशुराम विठ्ठल (११) ज. श. १८२९; मृ. श. १८५६. हे व्यापार करीत. भार्या अन्नपूर्णा, खऱ्यांकडील.

गोविंद नारायण (९) ज. श. १७५७; मृ. श. १८१७. हे गायकवाड संस्थानांत अमरेळी येथें वकील होते. भार्या राधा, परांजप्यांकडील.

* मोरेश्वर गोविंद (१०)

बाळकृष्ण नारायण (९) ज. श. १७६१; मृ. श. १८१२. हे बडोद्यास मराठी शाळेंत शिक्षक होते. भार्या रखमा, सहस्रबुद्ध्यांकडील. कन्या सीता (लक्ष्मी), आडच्याच्या विष्णु लक्ष्मण चितळ्यांची पत्नी.

विष्णु नारायण (९) ज. श. १७७१; मृ. श. १८२०. हे दशग्रंथी वैदिक असून मुंबईस असत. भार्या सावित्री, दामल्यांकडील.

घराणें १९ वें, हेदवी

(वंशावळ पृ. १३४)

या घराण्याचा मूळ पुरुष महादेव. कोंकणांतील मूळ गांव हेदवी, तालुका चिपळूण, जि. रत्नागिरी, हें होय. तेथून या घराण्यांतील मंडळी मिरजेचे बाजूस आली. सध्यां या घराण्यांतील मंडळींचें वास्तव्य दादर, पुणें, मिरज, लक्ष्मेश्वर, विजापूर व हुबळी येथें आहे. पूर्वी खेड व गुहागर येथें वास्तव्य झाल्याचें आढळतें.

कुलस्वामी हेदवी येथील लक्ष्मीनारायण असून, हेदवी येथील बहिरी, सिद्धेश्वर, महामाया, साखरी-आगर येथील गणपति व वेळणेश्वर येथील वेळणेश्वर या देवांस नैवेद्य दाखवितात. कांहीं मंडळी वाडेश्वर, दुर्गादेवी व गोपाळकृष्ण यांसहि नैवेद्य दाखवितात. घराण्यांत कांहीं शुभ कार्य झाल्यास देवीचें बोडण भरण्याची चाल आहे. या घराण्यांतील देव ' सांब ' हा साखरी—आगर या गांवीं गणपतीचे देवळांत नेऊन ठेवल्याचें समजतें. परंतु कोणी, कधीं व कां ठेविला तें समजत नाहीं.

धामापूर येथील पाटाचे पाण्याचे तंटयाबद्दलचें श. १६६५ ज्ये. शु. ९ चें (सु.॥ ११७३ रबिलावर ७) पंतप्रतिनिधींचें एक आज्ञापत्र आहे. त्यांत गणोबा व कृष्णंभट पेंडसे अशा दोन व्यक्तींचा उल्लेख आहे. या दोघांनीं केसो राघो पेंडसे (२—६) यास पाटाचे बाबतींत त्रास देऊं नये अशी आज्ञा आहे. या घराण्यांतील पिढी ३ व २ मध्यें हीं नांवें याच काळांत चुलता—पुतण्या संबंधांत आढळतात. धामापूरचे (क्र. २) वंशावळींत हीं नांवें या सुमारास नाहींत. यावरून हेदवी घराण्यांतील गणेश बल्लाळ व कृष्णाजी महादेव हे पूर्वी धामापुरास राहात होते व तेथून ते हेदवीस राहावयास गेले असावे. मूलस्थान प्रकरणांत पृष्ठ १८ वर केलेल्या अनुमानास या माहितीनें पुष्टि मिळते.

या घराण्यांत पिढ्या ८, एकूण व्यक्ति ३३ व जिवंत व्यक्ति १३ आहेत.

त्र्यंबक गणेश (४) भार्या लक्ष्मी.

नारायण त्र्यंबक (५) हे आपले चुलत बंधु विष्णु रामचंद्र यांच्यासह कोंकणांतील हेदवीहून मिरज संस्थानांत आले. हे मिरज संस्थानांत मामलेदार असून शेवटीं पेन्शन घेऊन मिरजेस स्थायिक झाले होते. पहिल्या भार्येचा पुत्र महादेव. भार्या (२) अन्नपूर्णा, हिचे पुत्र बळवंत (पांडुरंग), गोविंद व गोपाळ.

महादेव नारायण (६) मिरज संस्थानांत कारकून होते. भार्या सरस्वती, यांना एक कन्या होती.

बळवंत नारायण ऊर्फ पांडुरंग (६) ज. स. १८४०; मृ. स. १९०१. मिरज संस्थानांत कारकून होते. भार्या रुक्मिणी, मिरजेच्या गोविंद बाजी साठ्यांची

मुलगी. कन्या (१) गोदू, केंपवाडच्या रामचंद्र काशीनाथ जोश्यांची पत्नी. (२) यमू, मिरजच्या सीताराम नारायण कोल्हटकर, पेन्शनर पोस्टमास्तरांची पत्नी.

* **श्रीपाद बळवंत** (७) ज. श. १७९७ मार्ग. शु. ११. मिरज संस्थानांत पोलिसखात्यांत नोकरी केली. शेवटीं फौजदार असतांना स. १९३१ त पेन्शन घेतलें. वास्तव्य मिरज, ब्राह्मणपुरी. यांनीं गणेश चिंतामणि मराठे यांच्या नांवानें एक हजार रुपयांचा ट्रस्ट करून, सदरहू रक्कम स. १९२८ त मिरज संस्थानाधिपति यांच्या स्वाधीन केली आहे. सदर रकमेचें दरसालचें व्याज मिरज सरकारी हायस्कुलांतून इंग्रजी ६ वींत पहिला येऊन ७ वीमध्यें जाणाऱ्या ब्राह्मणविद्यार्थ्यास देणगी म्हणून देण्याची व्यवस्था केली आहे. भार्या (१) अन्नपूर्णा, जमखिंडीच्या दिनकरपंत रानड्यांची मुलगी. भार्या (२) जानकी, मिरजेच्या गणेश चिंतामणि मराठ्यांची मुलगी. कन्या येसू, लक्ष्मेश्वरच्या रामचंद्र कृष्ण दातारांची पत्नी. पुत्र पांडुरंग.

पांडुरंग श्रीपाद (८) अल्प वयांत मृत्यु.

वासुदेव बळवंत (७) वयाच्या २५ व्या वर्षीं मृत्यु. मिरजेस कारकून होते.

भास्कर बळवंत (७) विद्यार्थिदशेंत मृत्यु.

गणेश बळवंत (७) वयाच्या ४० व्या वर्षीं मृत्यु. मिरजेस कारकून होते. भार्या अन्नपूर्णा, मिरजेच्या गणेश भास्कर गोखल्यांची मुलगी.

* **गोविंद गणेश** (८) वय २०. सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजांत पहिल्या वर्षाचे विद्यार्थी आहेत.

* **वामन गणेश** (८) वय १८. मिरजेस हायस्कुलांत विद्यार्थी आहेत.

गोविंद नारायण (६) मृ. स. १९१३. मिरज संस्थानांत पोलिस–फौजदार होते. बारा वर्षें पेन्शन उपभोगिलें. भार्या (१) लक्ष्मी, केंपवाडच्या जोश्यांकडील. पुत्र त्र्यंबक. कन्या बजू, साताऱ्च्या विष्णुपंत केळकरांची पत्नी. भार्या (२) लक्ष्मी.

त्र्यंबक गोविंद (७) स. १९०१ त विद्यार्थिदशेंत मृत्यु.

गोपाळ नारायण (६) हे कोल्हापूर, मिरज इत्यादि ठिकाणीं पोस्टमास्तर होते. भार्या राधा, मोडलिंबच्या बळवंतराव साठ्यांची मुलगी. कन्या (१) येसू, गोखले घराण्यांत; (२) विठा, फडक्यांकडे दिली.

* **रामचंद्र गोपाळ** (७) ज. श. १८११. पुण्यास डेक्कनसभेंत नोकरी आहे. पत्ता–५९४, सदाशिव पेठ. भार्या जानकी, मिरजेच्या बापूराव नातूंची मुलगी. कन्या शकुंतला, ज. श. १८५३.

* **नारायण गोपाळ** (७) ज. श. १८२४ पौ. शु. ५. मुंबईस पोस्ट व तारखात्यांत नोकरी आहे. दादर, नं. ११९ हिंदु कॉलनींत राहतात. भार्या लक्ष्मी, केतकरां-

कडील. कन्या (१) सुहासिनी, ज. स. १९३० मार्च २६. (२) कुमुदिनी, ज. स. १९३३ जानेवारी ५.

* **अविनाश नारायण** (८) ज. स. १९३६ मार्च १.

विष्णु रामचंद्र (५) हे हेदवीहून मिरज संस्थानांतील लक्ष्मेश्वराला येऊन कारकुनी पेशांत नोकरी करून स्थायिक झाले.

गणेश विष्णु (६) भार्या सरस्वती.

त्र्यंबक विष्णु (६) भार्या जोगळेकरांकडील.

* **नारायण त्र्यंबक** (७) ज. स. १८९२. लक्ष्मेश्वरला पोलिसखात्यांत नोकर आहेत. भार्या लक्ष्मी, जोश्यांकडील. कन्या (१) वेणू, सिद्धापूरच्या प. का. गोडबोल्यांची पत्नी. (२) कृष्णा, कळसगांवच्या व्यंकटेश विष्णु गद्र्यांची पत्नी. (३) यमू, वय १४. (४) शकुंतला, वय ११. (५) गंगू, वय ३.

* **विष्णु नारायण** (८) ज. स. १९१९. विजापुरास इंग्रजी ७ वी.

* **दत्तात्रेय नारायण** (८) ज. स. १९२९. लक्ष्मेश्वरास कानडी ४ थींत.

* **शंकर नारायण** (८) ज. स. १९३१.

* **गंगाधर रामचंद्र** (७) हे हुबळीस असतात.

* **शिवराम गंगाधर** (८)

* **राजाराम गंगाधर** (८)

घराणें २० वें, वणोशी—पंचनदी

(वंशावळ पृ. १३५)

या घराण्याचा मूळ पुरुष कृष्ण. कोंकणांतील गांव पंचनदीगांवाजवळील वणोशी (तालुका दापोली). येथून यांची मंडळी भालेराईमुळें हर्णै व निजामपूर येथें जाऊन राहिली होती. यांशिवाय मुरुड-जंजिरा व दाभोळ येथेंहि मंडळी राहात असत. कांहीं पुण्यासहि राहात असत.

या घराण्याचा संबंध मुर्डी घराण्याशीं असावा असें वाटतें. मुर्डी घराण्यांतील दुसरा पुरुष कृष्णाजी बल्लाळ व या घराण्यांतील तिसरा पुरुष दादो बल्लाळ हे समकालीन असल्यामुळें बंधु असण्याचा संभव आहे. कारण दोघेहि दापोली तालुक्यांतील असून सन १६८९ सालीं झालेल्या भालेराईंत या दोघांसहि आपलें गांव सोडून जंजिरा संस्थानांत जाऊन राहावें लागलें होतें.

याशिवाय या घराण्याचा संबंध चौक घराण्याशींहि कदाचित् असण्याचा

संभव आहे. कारण हें घराणें पंचनदीहून चौककडे गेलें आहे व चौक घराण्यांतील तिसरा पुरुष कृष्ण हा या घराण्याचा मूळ पुरुष असण्याचा संभव आहे.

मुर्डी घराण्यांतील मूळ पुरुष बल्लाळ व त्याचे दोन पुत्र कृष्ण व रामचंद्र हे आणि चौक घराण्यांतील दुसरा पुरुष बल्लाळ व त्याचे दोन पुत्र कृष्ण व रामचंद्र हे एकच असावे; व अशा रीतीनें चौक व मुर्डी हीं दोन घराणीं संलग्न असू शकतील.

वरील एकंदर माहितीवरून वणोशी, चौक व मुर्डी हीं तीनहि घराणीं एकच असावीं असें वाटतें; परंतु खात्रीलायक आधार न मिळाल्यामुळें तीं स्वतंत्र ठेविलीं आहेत.

या घराण्यांत पिढ्या ८, एकूण व्यक्ति १२ व जिवंत व्यक्ति कोणीहि नाहीं.

गणेश कृष्ण (२) यांचें दुसरें नांव बल्लाळ असें होतें.

दादो गणेश (३) हे भालेराईंत (सुमारें स. १६८९) वणोशी गांव सोडून परागंदा झाले. हे तेथील खोत होते (ऐ. प्र. क्रमांक १५ पहा).

रामाजी दादो (४) यांचे वडील ज्या वेळीं परागंदा झाले त्या वेळीं हे एक वर्षाचे होते. हे मोठे झाल्यावर आपल्या गांवीं वस्ती करण्याच्या हेतूनें हर्णैस आले. त्या वेळीं तिकडे नुकताच स्वराज्याचा अंमल सुरू झाला होता. हे श. १६६४ च्या सुमारास महायात्रेस जाऊन आले. हे राजापूर सुभ्यांत निजामपुरास कांहीं दिवस राहिले होते. पुढें श्रीमंत पेशवे यांचेकडन यांचा वणोशी गांव यांना परत मिळाला व तेथील खोती हक्काचा बराच कालपर्यंत यांनीं उपभोग घेतला. हे वृद्धपणीं हर्णैस जाऊन राहिले होते व तेथेंच यांचा शेवट झाला. (ऐ. प्र. क्रमांक १५ पहा).

बाबूराव रामाजी ऊर्फ रघुनाथ (५) हे पुण्यास स. १७६७ त कोतवाल होते (पेशवे दप्तर भाग २२ क्रमांक १७२ पहा). हे पुण्यास नोकरीवर असल्यामुळें कोंकणांतील वणोशी गांवाच्या खोतीच्या हक्काबद्दल वाद उत्पन्न झाला. त्यांत यांच्यातर्फे निकाल होऊन श्रीमंत पेशवे यांच्याकडून यांना वणोशी गांवाच्या खोतीचे हक्काची सनद श. १७०३ त पुन्हां मिळाली (ऐ. प्र. क्रमांक ११–१५ पहा).

मोरो बाबूराव (६) यांनीं वणोशी गांव श. १७५७ च्या सुमारास परांजपे व निबकर यांस रुपये २१६७ स गहाण दिला. भार्या दुर्गा.

वामन मोरो ऊर्फ मुला (७) मृ. स. १८८४. भार्या लक्ष्मी, मुरुडच्या जोश्यांकडील.

महादेव वामन (८) भार्या रखमा (नर्मदा). या सध्यां कल्याणला आपल्या बहिणीकडे असतात. या घराण्यापैकीं फक्त याच आज विद्यमान आहेत. यांच्याशिवाय कोणीहि आज विद्यमान नाहींत.

सदाशिव मोरो (७) भार्या पार्वती, पालगडच्या जोश्यांकडील. कन्या बहिणी, पंचनदीच्या वासुदेवराव मनोहरांची पत्नी.

गणेश सदाशिव (८) ज. स. १८४९; सुमारें १९ वे वर्षी मृत्यु.

नारायण मोरो (७) भार्या राधा, सोनगांवच्या बर्व्यांकडील. कन्या वेणू, मुरुडच्या बाळकृष्णपंत दातारांची पत्नी.

हरी नारायण (८) ज. स. १८५३.

घराणें २१ वें, करंजगांव

(वंशावळ पृ. १३५)

या घराण्याचा मूळ पुरुष कृष्ण. कोंकणांतील मूळ गांव कोणतें हें यांना माहीत नसून करंजगांव हें पेशव्यांचे उपाध्याय कर्वे यांना इनाम मिळालें तेव्हांपासून यांची वस्ती करंजगांव (तालुका मावळ, जि. पुणें) येथें असावी असें वाटतें. सध्यां यांचें वास्तव्य पुणें व सोलापूर या गांवीं आहे.

कुलस्वामिनी कोल्हापूरची महालक्ष्मी आहे.

या घराण्यांत पिढ्या ६, एकूण व्यक्ति २२ व जिवंत व्यक्ति ९ आहेत.

गोपाळ वासुदेव (३) भार्या भागीरथी.

कृष्णाजी गोविंद (४) ज. स. १८४४; मृ. स. १९०७. पुणें कोर्टांत बेलिफ होते. यांनीं स. १८७४ व स. १८८० त दोन पुर्नविवाह केले. भार्या (१) रखमा (विठा). भार्या (२) गोदू. या दोघी पुर्नविवाहित व देशस्थांकडील होत्या.

* **यशवंत कृष्ण** (५)

* **वामन कृष्ण** (५) ज. स. १८९७. पोस्टांत नोकर होते. सध्यां नोकरी नाहीं.

* **लक्ष्मण कृष्ण** (५) ज. स. १९०२. प्रथम फळांचा व्यापार करीत असत. सध्यां पुण्यांत मोटार एजंट आहेत. मद्यपान निषेधाच्या चळवळींत भाग घेतल्यामुळें यांना दंड झाला होता. यांना करंजगांव, देवनांवें व नावडचांची वाडी येथें इनाम होतें. पत्ता–९०३/४, शुक्रवार पेठ, पंचमुखी मारुतीजवळ, पुणें. भार्या (१) कमळा. भार्या (२) रमा, भोसेकरांकडील.

हरी वासुदेव (३) करंजगांवला शेती करीत.

श्रीधर हरी (४) हुटगीस स्टेशनमास्तर होते, नंतर हुबळीस रेल्वे जनरल स्टोअरमध्यें कारकून होते. कन्या (१) सखू. (२) मनू. (३) द्वारका.

नारायण श्रीधर (५) हे ब्रह्मचारी होते.

दामोदर हरी (४) हुबळीस रेल्वे वर्कशॉपमध्यें फाउंडरी हेडक्लार्क होते. भार्या राधा, वय ६५. कन्या काशी.

* **गोपाळ दामोदर** (५) वय ४८. अंध आहेत. सोलापुरास बंधूजवळ असतात. भार्या यमुना, वय ३९.

*अनंत गोपाळ (६) वय २०. सोलापुरास गिरणींत नोकर आहेत.

*गोरख गोपाळ (६) वय ५. मराठी विद्यार्थी.

*दत्तात्रेय दामोदर (५) वय ४२. सोलापूर गिरणींत कारकून आहेत. पत्ता—अत्रे यांचा वाडा, दक्षिण कसबा, घर नं. ५२९, सोलापूर. भार्या लक्ष्मी, वय ३४. कन्या (१) नागू, वय १०. (२) सखू, वय ५.

*धुंडिराज दत्तात्रेय (६) वय १.

*मोरेश्वर दामोदर (५) वय ३४. सोलापूर गिरणींत नोकर आहेत. पत्ता—अत्रे यांचा वाडा, दक्षिण कसबा, घर नं. ५२९, सोलापूर. भार्या सरस्वती, वय २४. कन्या छबू, वय ४.

घराणें २२ वें, सोमेश्वर—आवास

(वंशावळ पृ. १३६ ते १३७)

या घराण्याचा मूळ पुरुष महादेव. हें घराणें आवास (इंद्रपै), ता. अलीबाग, जिल्हा कुलाबा येथें येऊन निदान १५० वर्षें झालीं. त्याच्यापूर्वी कोठें होतें याची माहिती लागत नाहीं. रत्नागिरी जवळील सोमेश्वरहून कांहीं मंडळी शेकाची बिरवाडी व सासवनें या भागांत गेल्याचें आढळतें (प्रकरण ९ मधील सुटक वंशावळ ५ पहा). त्यावरून कदाचित् हें घराणें मूळ सोमेश्वरचें असावें. सध्यां यांचें वास्तव्य आवास, दादर, पुणें, मुंबई, सासवनें व हाशिवरें या गांवीं आहे.

कुलदेवता :—श्रीजोगेश्वरी. लग्न अगर मुंज झाल्यास बोडण भरण्याची वहिवाट आहे.

या घराण्यांत पिढ्या ९, एकूण व्यक्ति ६१ व जिवंत व्यक्ति ३२ आहेत.

महादेव कृष्ण (३) भार्या उमा.

कृष्णाजी महादेव (४) भार्या राधा.

रघुनाथ कृष्ण (५) भार्या आनंदी.

कृष्णाजी रघुनाथ (६) ज. आवास. हे मुंबईंत शास्त्री होते. यांनीं शब्दरत्नाकर कोश बनविला. भार्या सत्यभामा, दामल्यांकडील. वयाचे ७५ वे वर्षीं मृत्यु.

महादेव कृष्ण (७) भार्या (१) उमा. भार्या (२) गंगा.

***श्रीनिवास महादेव** (८) वय ४६. मुंबई जनरल पोस्ट ऑफिसांत नोकरी आहे. भार्या मनू, शिधयांकडील.

***शंकर महादेव** (८) वय ४०. मुंबईस अकौंटंट जनरलचे ऑफिसांत नोकरी आहे. भार्या पार्वती, दातारांकडील.

त्र्यंबक कृष्ण (७) भार्या गिरिजा.
* **नीळकंठ त्र्यंबक** (८) वय ४०. मुंबईस जी. आय्. पी. रेल्वे एजंटच्या ऑफिसांत नोकरी आहे. भार्या सत्यभामा, जोश्यांकडील.
* **भालचंद्र नीळकंठ** (९) वय ९. मराठी ३ रींत.
* **जयंत नीळकंठ** (९) वय ४.
* **रंगनाथ त्र्यंबक** (८) वय ३६. मुंबईस कार्टिंग एजंटचा व्यवसाय करितात. भार्या रमा (शांता), गोडबोल्यांकडील.
* **केशव रंगनाथ** (९) वय ९. मराठी २ रींत.
* **हरी रंगनाथ** (९) वय ७. मराठी १ लींत.
* **प्रभाकर रंगनाथ** (९) वय ५.
* **वसंत रंगनाथ** (९) वय ३.
* **मनोहर रंगनाथ** (९) वय १.
* **महीपति त्र्यंबक** (८) वय ३३. पुणें येथें इन्कमटॅक्स ऑफिसांत इन्स्पेक्टर आहेत. पत्ता--१९६–४७ सदाशिव पेठ. भार्या मालती, साठ्यांकडील.
* **माधव महीपति** (९) वय ७. मराठी ३ रींत.
* **पद्माकर महीपति** (९) वय ५.
* **रामकृष्ण त्र्यंबक** (८) वय २१. मॅट्रिक पास. पुण्यास लघुलेखनाचा अभ्यास चालू आहे.
* **गजानन कृष्ण** (७) वय ६१. आवासला शेती करितात. भार्या सरस्वती (सगुणा), चोळकरांकडील.
* **रघुनाथ गजानन** (८) वय २४. मुंबईस व्यापारी शिक्षण चालू आहे.
* **नारायण गजानन** (८) वय १२. इयत्ता ५ वी.

जनार्दन कृष्ण (५) भार्या सगुणा.

वासुदेव जनार्दन (६) आवासला शेती करीत. भार्या अन्नपूर्णा.
* **गणेश वासुदेव** (७) ज. आवास. वय ७५. हाशिवऱ्यास शेती करितात. भार्या भागीरथी, करमरकरांकडील.
* **चिंतामणि गणेश** (८) ज. आवास. वय ३६. इंग्रजी ६. रिझर्व्ह बँकेंत मुंबईस नोकरी आहे. पत्ता–डोंगरेबाग, दादर. भार्या सीता (गंगा), जोश्यांकडील.
* **श्रीधर चिंतामणि** (९) वय ५.
* **सदाशिव गणेश** (८) ज. आवास. वय २२. मॅट्रिक पास. जी. आय्. पी. रेल्वे, वाडीबंदर, मुंबईस नोकरी आहे.

रघुनाथ वासुदेव ऊर्फ रावजी (७) ज. आवास. मृ. वय ४०. शेती करीत. भार्या आनंदी, सहस्रबुद्ध्यांकडील.
* **जनार्दन रघुनाथ** (८) ज. आवास. स. १९०१. शिक्षण मराठी ७ वी व इंग्रजी.

मुंबईस रिझर्व बँकेंत नोकरी आहे. पत्ता—रंगाऱ्याची चाळ नं. ३, खोली नं. ३, दादर. भार्या इंदिरा (नमू), विष्णु वामन ऊर्फ धोंडो वेलणकरांची मुलगी.

* **अच्युत जनार्दन** (९) वय १०. इंग्रजी पहिलींत.

* **कृष्णाजी जनार्दन** (९) वय ७. मराठी पहिलींत.

* **परशुराम जनार्दन** (९) वय १.

* **विष्णु रघुनाथ** (८) ज. आवास. वय २४. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. मुंबईस चंदुलाल आणि कंपनीमध्यें ऑडिटर आहेत. पत्ता—रंगाऱ्याची चाळ, नं. ३, खोली नं. ३. दादर, मुंबई १४.

बापूजी वासुदेव (७) ज. आवास. मृ. वय ५२. मराठी शाळामास्तर होते. भार्या सीता, म्हसकरांकडील.

* **अनंत बापूजी** (८) वय ११. मराठी ३ रींत. सासवनें.

* **गोपाळ वासुदेव** (७) ज. आवास. वय ५१. आवासला शेती करितात. भार्या राधा, जोश्यांकडील.

* **दत्तात्रेय गोपाळ** (८) ज. आवास. वय २५. मराठी ७ व इंग्रजी. सध्यां वास्तव्य आवास. शेती करतात.

गोविंद जनार्दन (६) भार्या रखमा.

नारायण कृष्ण (५) भार्या जानकी.

विनायक नारायण (६) भार्या सरस्वती.

* **नारायण विनायक** (७) ज. आवास. वय ६७. आवासला शेती करितात. जोड-धंदा कागद लिहिणें. भार्या भीमा, म्हसकरांकडील. यांचें मूळचें नांव बाळकृष्ण वासुदेव असून हे चुलतचुलते यांस दत्तक गेले.

रामचंद्र नारायण (८) मृ. वय ३५. मराठी सेकंड इयर ट्रेंड—शाळामास्तर. भार्या जानकी, थोकवड्याच्या गोऱ्यांकडील.

* **वामन रामचंद्र** (९) वय ११. मराठी शाळेंत विद्यार्थी.

जयराम बापू (६) भार्या लक्ष्मी.

विठ्ठल महादेव (४) भार्या लक्ष्मी.

घराणें २३ वें, श्रीवर्धन—तळें

(वंशावळ पृ. १३८ ते १३९)

या घराण्याचा मूळ पुरुष रघुनाथ. हें घराणें मूळचें श्रीवर्धनचें असून, श्री-वर्धन गांव उध्वस्त झाला तेव्हां सरदार आंग्रे यांचे आश्रयास तळें, जि. कुलाबा येथें राहावयास गेलें. तेथून कांहीं मंडळी नागोठणें येथें व कांहीं श्रीवर्धन येथें परत

गेली. सध्यां यांचें वास्तव्य अडखळ, इंदूर, जळगांव, दादर, दिवें, आगर, नागोठणें, बिरवाडी, मुरुड (जंजिरा) व श्रीवर्धन या गांवीं आहे. पूर्वी यांची वस्ती पुणें व भिवंडी या गांवीं असल्याचें आढळतें. या घराण्यास दोनशें वर्षांपूर्वी अग्निहोत्री या नांवानें ओळखीत असत.

इ. स. १७८१ मध्यें असलेल्या लोकांची एक यादी पेशवे दफ्तरांत श्री. गोपाळराव आचवल यांचे पाहण्यांत आली. त्यांत कृष्णंभट रघुनाथ पेंडसे केळशीस असल्याचा उल्लेख आहे. ह्या घराण्यांतील दुसरा पुरुष कृष्ण हा व वरील यादींतील कृष्णंभट एकच असावे; व हें घराणें मूळ केळशीचें असावें असें मानण्यास आणखीहि एक आधार आहे. तो म्हणजे या घराण्याची कुलदेवता महालक्ष्मी असून केळशीस ती देवी आहे व केळशीहून बाहेर पडलेलीं इतर घराणीं (६, ८, ९ व १०) हीच देवी म्हणजे महालक्ष्मी आपली कुलदेवता मानितात हा होय. या घराण्यापैकींच कोणी एक बिरवाडीस राहावयास गेल्याची दंतकथा या घराण्यांत प्रचलित आहे व बिरवाडीचें म्हणजे घराणें ८ वें हें केळशीचें आहे. यावरून वरील विधानास पुष्टि मिळते.

कुलदेवता :—महालक्ष्मी. कोणी जोगेश्वरीहि मानतात. आश्विनांत नवरात्र, नऊ दिवस धान्यफराळ व माळ. लग्न, मुंज वगैरे शुभकार्यानंतर देवीचें बोडण भरण्याची चाल आहे. वर्षांतून एकदां बोडण भरतात.

या घराण्यांत पिढ्या ७, एकूण व्यक्ति ७३ व जिवंत व्यक्ति ४१ आहेत.

रघुनाथ (मूळ पुरुष) (१) ज. स. १७३० चे सुमारास. आंग्रेदरबारीं खजिनदार होते. श्रीवर्धन गांव उध्वस्त झाला तेव्हां तेथून पळ काढून सरदार आंग्रे यांचे आश्रयास तळचास गेले असें म्हणतात.

कृष्णंभट रघुनाथ (२) दशग्रंथी वैदिक. वेदशाळा चालवीत. पेशव्यांकडून दक्षिणा मिळत असे. हे तळचाहून नागोठण्यास आले.

बल्लाळ कृष्ण (३) दशग्रंथी वैदिक होते. यांस पेशव्यांकडून नागोठण्यास असलेलें घर इनाम मिळालें. भार्या भागीरथी, टिळकांकडील.

गणेश बल्लाळ (४) शिक्षण मराठी. व्यापार करीत. भार्या लक्ष्मी, टिळकांकडील. अर्धांगवातानें मृत्यु.

रंगो ऊर्फ बळवंत गणेश (५) ज. नागोठणें; मृ. संग्रहिणी. ट्रेनिंग कॉलेजचें पहिलें वर्ष होऊन शिक्षक होते. भार्या राधा, खाडिलकरांकडील. कन्या (१) भीमा, गांगलांकडे; (२) द्वारका, ज. स. १९०२. चौलच्या जोगळकरांकडे दिली.

***शंकर रंगो** (६) ज. स. १९०८ आक्टोबर १०. नागोठणें येथें टाटा कंपनीकडे नोकरी आहे. भार्या लक्ष्मी, म्हसकरांकडील. यांस एक मुलगा आहे.

महादेव बल्लाळ (४) शिक्षण मराठी. व्यापार करीत. भार्या रखमा, जोश्यांकडील.

***विष्णु महादेव** (५) ज. स. १८८५ डिसें. १८. सुरतेस डेप्युटी पोस्टमास्तर



उभे :—१. नारायण विष्णु, २. यमुबाई. **खुर्चीवर** :—१. हरीभाऊ गोगटे, २. सगुणाबाई गोगटे, ३. गणेश विष्णु, ४. विष्णु महादेव, ५. भागीरथीबाई, ६. महादेव विष्णु, ७. पार्वतीबाई दाते, ८. त्र्यंबकराव दाते. **मांडीवर** :—१. प्रभाकर दाते, २. जयंत दाते. **बसलेले** :—१. विश्वनाथ विष्णु, २. सिंधु, ३. सीताराम विष्णु, ४. शांता दाते, ५. सुमन दाते.

आहेत. यांचें मूळचें नांव विष्णु गणेश असून आपल्या चुलत्याचे मांडीवर बसले. भार्या भागीरथी, लोंढ्यांकडील. कन्या (१) चंद्रा (सगुणा), ज. स. १९०७ जून १२. दादरच्या हरी परशुराम गोगट्यांची पत्नी. (२) सुंदरा (पार्वती), ज. स. १९११ आक्टो १. नाशिकच्या त्र्यंबक बळवंत दात्यांची पत्नी. (३) यमू, ज. स. १९२३ मार्च ७. मराठी ५. (४) सिंधु, ज.स. १९२७ नोव्हेंबर १९.मराठी ३.

* **गणेश विष्णु** (६) ज. स. १९१४ जून ३०. बी. ए. असून पुढील अभ्यास चालू आहे.

* **महादेव विष्णु** (६) ज. स. १९१८ डिसें. २१. इंटर सायन्सचे वर्गांत.

* **नारायण विष्णु** (६) ज. स. १९२१ फेब्रु. २६. इंग्रजी ५ वी.

* **विश्वनाथ विष्णु** (६) ज. स. १९२५ डिसें. १०. इंग्रजी १ ली.

* **सीताराम विष्णु** (६) ज. स. १९३३ जाने. २.

बहिरव रघुनाथ (२) ज. स. १७६० चे सुमारास; मृ. स. १८२५. तळचास पेशव्यांकडे नोकर होते. तेथील यांचें घर जळून वाताहत जाहल्यामुळें म्हातारपणीं श्रीवर्धनला जाऊन राहिले.

वासुदेव बहिरव (३) ज. तळें स. १८०० चे सुमारास; मृ. स.१८७५ चे सुमारास. दशग्रंथी वैदिक. पुराण सांगत असत. उत्तम विद्वान् म्हणून यांची ख्याति असून धार्मिक बाबतींत निर्णय मागण्याकरितां यांचेकडे पत्रें येत असत. श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांनीं श्रीवर्धनचा हुशार मुलगा म्हणून यांस विद्याभ्यास करण्यास उत्तेजन दिलें व दक्षिणा देऊन गौरव केला. भार्या वाकणकरांकडील. कन्या (१) गोदावरी, वैद्यांकडे; (२) बाया, मराठ्यांकडे दिली.

बहिरव वासुदेव (४) ज. श्रीवर्धन, स. १८४५; मृ. स. १८९५, उदर रोग. गोकर्णास वेदशास्त्राध्यापन करीत व पुराण सांगत. जुने ग्रंथ स्वहस्तानें लिहिणें व तीर्थयात्रा करणें यांची आवड होती.

गोविंद बहिरव (५) ज. श्रीवर्धन स. १८६२; मृ. स. १९२६, ज्वर. गरिबीमुळें इंदूरला वार लावून वकिलीची परीक्षा दिली. इंदूरला वकील होते व तेथें सुखवस्तु म्हणून राहिले. सार्वजनिक कामाची हौस असे.भार्या राधा, दांडेकरांकडील. कन्या (१) आवडी (लक्ष्मी), ज. इंदूर स. १८९६; मृ. स. १९२३. चिंतामण महादेव देशमुख (देसाई) यांची पत्नी. (२) गोदावरी, ज.स. १८९८.

* **नारायण गोविंद** (६) ज. श्रीवर्धन स. १९००. इंदूरास घर नं. २२, कृष्णपुऱ्यांत सुखवस्तु राहतात. शिक्षण बी. ए. पर्यंत. भार्या यमुना, मोडकांकडील.

* **गणेश नारायण** (७) ज. स. १९२७. इंग्रजी ३ री.

* **गोविंद नारायण** (७) ज. स. १९२९. मराठी ३ री.

* **विष्णु नारायण** (७) ज. स. १९३३.

* **कृष्णाजी नारायण** (७) ज. स. १९३६.

रामकृष्ण वासुदेव (४) ज. श्रीवर्धन स. १८५०; मृ. स. १९०६. गरीब असून

स्वतःचे हिंमतीवर व्यापारधंदा करून गांवांत श्रीमंत म्हणून गणले गेले. सार्वजनिक कामाची आवड. भार्या काशी, दामल्यांकडील. कन्या (१) रंगू, देशमुखांकडे; (२) गंगू, सान्यांकडे; (३) द्वारका, वैशंपायनांकडे; (४) सुभद्रा, केळकरांकडे दिली.

* **जगन्नाथ रामकृष्ण** (५) वय ४२. श्रीवर्धनास सावकारी व व्यापार करतात. भार्या भागीरथी, खऱ्यांकडील.

* **रामकृष्ण जगन्नाथ** (६) वय १५. इंग्रजी विद्यार्थी.

* **रामचंद्र रामकृष्ण** (५) वय ३५. बी. ए. (१९३२); एल्एल्. बी.; जंजिरा-मुरुड येथें वकील आहेत. भार्या कमला, गोडबोल्यांकडील.

* **शंकर रामचंद्र** (६) वय ३.

* **प्रभाकर रामचंद्र** (६) वय १.

सीताराम वासुदेव (४) ज. श्रीवर्धन स. १८६२; मृ.स.१९३४. पूर्ववयांत कीर्तन व पुराण सांगत. त्यानिमित्तानें पुष्कळ प्रवास जाहला. नंतर तो व्यवसाय सोडून व्यापार व सावकारी करीत. सार्वजनिक व धार्मिक कार्याची आवड असे. भार्या गंगा, पेठ्यांकडील. कन्या (१) यमुना, वर्तकांकडे; (२) काशी, रानड्यांकडे दिली.

* **विनायक सीताराम** (५) वय ४३. श्रीवर्धनास शेती व सावकारी करतात. भार्या सत्यभामा, वाडदेकरांकडील. कन्या (१) इंदु, रानडे यांजकडे दिली. (२) गोदू.

* **रघुनाथ विनायक** (६) वय १५. इंग्रजी ३ री.

* **अच्युत विनायक** (६) वय १२. इंग्रजी १ ली.

* **गणपति विनायक** (६) वय ९. मराठी शिक्षण चालू.

* **विष्णु विनायक** (६) वय १.

* **गजानन सीताराम** (५) वय ३८. पोस्ट व तारखातें यांत नोकरी आहे. पत्ता— राधाभवन, देवधर रोड, माटुंगा स्टेशनजवळ, मुंबई १९. भार्या (१) लक्ष्मी, दांडेकरांकडील. मृ. स. १९३७ सप्टें. ४. पुत्र विश्वनाथ व द्वारकानाथ. भार्या (२) केळशीच्या मोरेश्वर लक्ष्मण घैसासांची मुलगी.

* **विश्वनाथ गजानन** (६) वय ९. मराठी शिक्षण चालू.

* **द्वारकानाथ गजानन** (६) वय ४.

* **वासुदेव सीताराम** (५) वय ३३. पोस्ट व तारखात्यांत नोकरी आहे. पत्ता— राधाभवन, देवधर रोड, माटुंगा स्टेशनजवळ, मुंबई १९. भार्या रखमा, वैद्यांकडील. कन्या सुशीला.

* **माधव वासुदेव** (६) वय ९. मराठी शिक्षण चालू.

कमळाकर नारायण (४) ज. श्रीवर्धन; मृ. वय ६०–७०. पुराणिक व कीर्तनकार होते. भार्या रखमाई, जोश्यांकडील. हे बिरवाडीस राहूं लागले.

नारायण कमळाकर (५) ज. बिरवाडी; मृ. वय ४०, प्लेग. भिक्षुकी करीत.
गजानन कमळाकर (५) ज. बिरवाडी; मृ. वय ३०-३२. डोंगरे कंपनींत नट होते. भार्या सरस्वती, धारपांकडील.
***रामचंद्र कमळाकर** (५) ज. बिरवाडी, स. १८७१ मे १३. मराठी शिक्षक. सध्यां पेन्शनर असून बिरवाडीस राहतात. भार्या सीता (जानकी), मोडकांकडील.
***दत्तात्रेय रामचंद्र** (६) ज. बिरवाडी, स. १९०२ एप्रिल २. बिरवाडीस स्टेशनरीचें दुकान आहे. भार्या अन्नपूर्णा, गोखल्यांकडील.
***महादेव रामचंद्र** (६) ज. बिरवाडी स. १९०७ एप्रिल २३. बिरवाडीस दुकानदार आहेत. भार्या पार्वती, साठ्यांकडील.
***नथू रामचंद्र** (६) ज. बिरवाडी स. १९१८ मे २९. बिरवाडीस दुकानदार आहेत.
***शिवाजी रामचंद्र** (६) ज. बिरवाडी, स. १९२० मे २३. घरव्यवसाय करतात.
रघुनाथ नारायण (४) ज. श्रीवर्धन; मृ. वय ६०. कीर्तनकार होते. यांचे वडील पेवें गांवांत तलाठी असत. त्यामुळें यांचें लग्न अडखलास झालें. तेव्हांपासून यांची वस्ती अडखलास झाली.
***रामचंद्र (बाळा) रघुनाथ** (५) ज. श. १७९६. अडखलास शेती करतात. भार्या सीता, काशीकरांकडील.
***महादेव रामचंद्र** (६) वय ३०. शेती करतात. भार्या गंगा, केळकरांकडील.
***गोविंद रामचंद्र** (६) वय २७. शेती करतात. भार्या राधा, बेडेकरांकडील.
***गोपाळ रामचंद्र** (६) वय १४. मराठी शिक्षण चालू.
***रघुनाथ रामचंद्र** (६) वय ११. मराठी ४ थी.
गंगाधर रघुनाथ (५) ज. सुमारें श. १८०६; मृ. वय ४५. यांचें मुंबईस गिरगांवांत पेंडसे आणि मंडळी या नांवाचें किराणा मालाचें दुकान होतें. ते दिवेआगर येथें स्थायिक झाले. भार्या (१) पार्वती विवाह श. १८२८, गद्र्यांकडील. भार्या (२) पार्वती, ज. श. १८२४. विवाह श. १८३७; अभ्यंकरांकडील. कन्या (१) काशी, ज. श. १८४४. मराठी ७ वी. (२) येसू, ज. श. १८४९. मराठी २ री.
***नारायण गंगाधर** (६) ज. दिवें-आगर, स. १९२१ जुलै २५. मुंबईस इंग्रजी ५ वी.
***बाळकृष्ण गंगाधर** (६) ज. दिवें-आगर, स. १९२४ जून १. इंग्रजी २ री.
***यशवंत गंगाधर** (६) ज. दिवें-आगर, स. १९२६ आक्टो. ११. मराठी ४ थी.

घराणें २४ वें, रोहें

(वंशावळ पृ. १४० ते १४१)

या घराण्यांतील मूळ पुरुष रामचंद्र. कोंकणांतील मूळ ठिकाण पावस अगर आयनी–मेटें असावें असें म्हणतात. तेथून या घराण्यांतील मंडळी पुणें, नसरापूर, माणगांव व तळें येथें गेली. सध्यां यांचें वास्तव्य ठाणें, तळें, नाशिक, नांदगांव, पेण, पुणें, मुरुड, रोहें व शिरवली येथें आहे. याशिवाय काशी व महाड येथें यांचें वास्तव्य पूर्वी असल्याचें आढळतें.

शिरवली येथें कांहीं जमीन या घराण्यांत इनाम, तसेंच बोरघरची अर्धी खोती आहे. पूर्वी भोर संस्थानांतील नसरापूरच्या बनेश्वराच्या देवळाच्या व्यवस्थेसाठीं ५।६ बिघे जमीन इनाम होती. सध्यां ती या घराण्यांत नाहीं.

कुलस्वामी केशवराज व कुलदेवता जोगेश्वरी या असून देवदिवाळीस हरिहरेश्वर, महाकाळी व रवळनाथ यांसहि नैवेद्य दाखवितात. पूर्वीपासून नवरात्रांत देवावर एक दिवस कुर्डुचा झुबका बांधितात. सध्यां दिवा व माळ असते व सुवासिनी भोजनास बोलावितात. लग्न, मुंज व बारसें झालें म्हणजे बोडण भरण्याची चाल आहे.

या घराण्यांत पिढ्या ८, एकूण व्यक्ति ५४ व जिवंत व्यक्ति २५ आहेत.

रामचंद्र (मूळ पुरुष) (१) पुण्यास भिक्षुक होते.

कृष्णाजी रामचंद्र (२) पुणें व शिरवलीस भिक्षुक होते. भार्या राधा.

वासुदेव गोपाळ (४) भार्या पार्वती.

नारायण गोपाळ (४) भार्या लक्ष्मी.

विष्णु नारायण (५) वास्तव्य शिरवली (निजामपूर). भार्या अंबू. कन्या काशी, पेण येथें लेले घराण्यांत दिली.

मोरेश्वर विष्णु (६) जन्म शिरवलीस झाला. लहानपणीं आईबाप वारले. शिरवलीहून पेणेस आले. पेणेस कोल्हटकरांच्या काशीबाई (जिजी) यांनीं आपल्या घरीं यांचें संगोपन केलें. लग्नकार्य करून संसारास मदत केली. पेणेस यांचेकडेच हे कारकून होते. शरीरप्रकृति अत्यंत सुदृढ व भव्य होती. सार्वजनिक कार्यांत पुढाकार घेत असत. भार्या सरस्वती (मनू), पेणच्या निळोपंत मोडकांची मुलगी. कन्या अंबू (लक्ष्मी), वय २८. पेणच्या दत्तात्रेय रामचंद्र गोखल्यांची पत्नी.

अनंत मोरेश्वर ऊर्फ नथू (७) कल्याणास प्लेगनें १९ व्या वर्षी मृत्यु.

* **विनायक मोरेश्वर** (७) ज. स. १९०२, धावटें (पेण) येथें झाला. शिक्षण मराठी ६ इयत्ता झालें असून थोडें इंग्रजी येतें. पेणला यांची मोटारसर्व्हिस चालू आहे. भार्या सारजा (गंगू), ज. श. १८३२; नागांवच्या शंकरराव रिसबुडांची मुलगी. कन्या कमला, ज. श. १८४८.

विठ्ठल नारायण (५) भार्या अन्नपूर्णा. कन्या (१) कृष्णा, तळचाच्या (माणगांव) सदोबा फडणीसांकडे (रिसबूड); (२) गंगू, सिद्धेश्वरच्या (भोर) गद्रयांकडे; (३) मनू, काचल्याच्या (महाड) आठवल्यांकडे दिली.

* **विश्वनाथ विठ्ठल** (६) हे शिरवलीस (पेण) असतात.

* **परशुराम विठ्ठल** (६) सर्व्हेखात्यांत (फाळणी पार्टी) नाशिक जिल्ह्यांत नोकर आहेत. भार्या (१) जानकी. भार्या (२) गंगा. यांस मुलगा आहे असें कळतें.

आप्पा भिकाजी (४) हे स. १८९०–९२ चे सुमारास वसईकडे गेले.

केशव कृष्ण (३) दशग्रंथी भिक्षुक. तळचास वैद्यकी करीत. भार्या गोपिका. कन्या (१) तळचाच्या सोमणांकडे; (२) तळचाच्या रिसबुडाकडे; (३) शिरवलीच्या परांजप्यांकडे दिली.

सदाशिव केशव (४) मृ. स. १८९९. वय सुमारें ७०. भिक्षुक व वैद्य होते. यांनीं बोरघरची खोती सहस्रबुद्धयांकडून विकत घेतली. भार्या पार्वती, बोरघरच्या गोपाळ बल्लाळ सहस्रबुद्धे यांची मुलगी. कन्या (१) धोंडी, तळचाच्या पांडुरंग धोंडदेव रानडयांची पत्नी. (२) बया, शिरवलीच्या धोंडो परांजप्यांची पत्नी.

रामचंद्र सदाशिव (५) भार्या जानकी. कन्या (१) रंगी, रेवदंडयास नारायणराव दामल्यांकडे दिली. (२) अल्प वयांत मृत्यु.

* **बाळकृष्ण रामचंद्र** (६) ज. श. १७९४. रेव्हेन्यूखात्याचे पेन्शनर व सनदी वैद्य. वास्तव्य मुरुड (जं.). भार्या लक्ष्मी, भालगांवच्या भाव्यांकडील. कन्या (१) काशी, म्हशेळच्या दातारांकडे दिली. (२) गंगू, चौलच्या गोपाळराव मनोहरांची (फके) पत्नी.

* **मोरेश्वर बाळकृष्ण** (७) ज. स. १९०३. आयंग्लवैद्यकी धंदा आहे.

* **नरहरी बाळकृष्ण** (७) ज. स. १९०४. मुरुडास वैद्यकी करितात. भार्या सरस्वती, नरवण्यांकडील.

* **केशव बाळकृष्ण** (७) ज. स. १९०७. मुरुड येथें रेव्हेन्यूखात्यांत तलाठी आहेत. भार्या सत्यभामा, वोरलीकर-अभ्यंकरांकडील.

* **पिलाजी केशव** (८) ज. स. १९३३.

* **पांडुरंग रामचंद्र** (६) ज. श. १७९७. तळें येथें वैद्यकी करितात. भार्या (१) रमा, म्हशेळचाच्या घैसासांकडील (उपाध्ये). भार्या (२) रखमाई, माणगांवच्या वासुदेवराव बर्व्यांची मुलगी.

* **रामचंद्र पांडुरंग** (७) ज. स. १९११. तळचास वैद्यकी करितात.

* **विनायक पांडुरंग** (७) ज. स. १९२५. मराठी शाळेंतील विद्यार्थी.

* **जयराम पांडुरंग** (७) ज. स. १९२७. मराठी शाळेंतील विद्यार्थी.

* **नारायण रामचंद्र** (६) ज. स. १८८७. प्रथम रेव्हेन्यखात्यांत नोकर होते. सध्यां

रोह्यास वैद्यकी करितात व पेटंट औषधें बनवितात. भार्या राधा, श्रीवर्धनच्या रामकृष्ण रघुनाथ जोश्यांची मुलगी. कन्या (१) कृष्णा, वय १९ (२) चंद्रभागा, वय ७. (३) दुर्गा, वय १.

* **अनंत नारायण** (७) ज. स. १९२१. मराठी शिक्षण होऊन इंग्लिश व शास्त्रीय शिक्षण चालू आहे. वैद्यकी अवगत आहे.

* **चिंतामणि नारायण** (७) ज. स. १९२५. इंग्रजी पहिल्या इयत्तेंत.

* **श्रीधर नारायण** (७) ज. स. १९२८. मराठी दुसरींत.

* **वामन रामचंद्र** (६) ज. श. १८१२. पुण्यास आर्यांग्लवैद्यकी धंदा करितात भार्या अन्नपूर्णा, सातघरच्या विनायकराव बापटांची मुलगी. कन्या नर्मदा, वय १७.

* **गजानन वामन** (७) ज. स. १९२३. इंग्रजी २ री.

* **लक्ष्मण वामन** (७) ज. स. १९२८. मराठी ३ ऱ्या इयत्तेत.

* **विष्णु वामन** (७) ज. स. १९३०. मराठी शिक्षण चालू.

कृष्णाजी सदाशिव (५) भार्या रखमा.

दामोदर कृष्ण (६) ज. श. १७९१; मृ. स. १८९५. मॅट्रिक. पनवेलला रेव्हेन्यूखात्यांत नोकर होते. भार्या नागांवच्या जोश्यांकडील.

चिंतामणि बाळाजी (५) कन्या (१) दुर्गा. (२) बहिणा.

* **गणेश बाळाजी** (५) वास्तव्य ठाणें. भार्या यमुना.

* **वामन गणेश** (६)

* **गोविंद गणेश** (६)

* **शंकर गणेश** (६)

गोविंद रामचंद्र (२) भार्या अन्नपूर्णा.

घराणें २५ वें, कोठिंबें

(वंशावळ पृ. १४१)

या घराण्याचा मूळ पुरुष गोविंद किंवा मोरेश्वर होय. कोठिंब्यास मिळालेल्या माहितीवरून मोरेश्वर असावा असें दिसतें. परंतु गोविंद नारायण (४) हे त्र्यंबकेश्वरीं गेले असतां त्यांनीं आपले आज्याचें नांव विनायक गोविंद असें सांगितल्याचें आढळतें. उकसाणच्या घराण्याशीं (क्रमांक २६) यांचा तीन दिवसांचा सोयेर-सुतकाचा संबंध आहे, परंतु या दोन घराण्यांतील वंशावळीचा सांधा जुळविण्यासारखी माहिती आज उपलब्ध नाहीं. घराणें क्रमांक २४ मध्यें (रोहें) गोविंद व मोरेश्वर हीं दोनहि नांवें पिढी २ मध्यें आढळतात व ते बंधु असल्यामुळें पणजो-

वाचे नांवाचा घोटाळा झाला असावा असें वाटतें व तसें मानल्यास २४ व २५ हीं दोन घराणीं एक होऊं शकतील. पेशवाईंत कोठिंबें गांव २१ ब्राह्मणांस इनाम दिला त्यांत तीन पेंडसे कुटुंबें होतीं. त्यांतील हें एक होय. दुसरें कुटुंब, घराणें क्रमांक ४ पैकीं व तिसरें क्रमांक २६ पैकीं होय. तिसऱ्या कुटुंबाचें वास्तव्य सध्यां कोठिंबें येथें आहे.

या घराण्यांत पिढ्या ६, एकूण व्यक्ति ७ व जिवंत व्यक्ति २ आहेत.

नारायण विनायक (३) भार्या लक्ष्मी.

गोविंद नारायण (४) हे दत्तक आले. पूर्वीचें नांव प्रभाकर गंगाधर पेंडसे.

***विनायक गोविंद** (५)

***प्रभाकर विनायक** (६) वय १४. मराठी पांचवींत. वास्तव्य वेणगांव.

घराणें २६ वें, उकसाण—वावशी

(वंशावळ पृ. १४२ ते १४४)

या घराण्याचा मूळ पुरुष बाळंभट. कोंकणांतील मूळ ठिकाण हरेश्वर-श्रीवर्धन असल्याचें सांगतात. श्रीत्र्यंबकेश्वरीं मिळालेल्या माहितींत या घराण्याच्या पूर्वजांनीं हरेश्वर हेंच आपलें राहावयाचें गांव सांगितलें आहे. सध्यां या घराण्यांतील मंडळींचें वास्तव्य अकोला, उरण, कल्याण, कोठिंबें, खोचिवडें, ठाणें, पाली, बडोदें, मिरज, वणी, वावशी, वेणगांव व सातारा येथें आहे. यांचें वास्तव्य याशिवाय उकसाण, करंजगांव, कसारा, बोरजें, विल्होळी, श्रीवर्धन, संगमेश्वर, सांगली व हरेश्वर येथें झाल्याचें आढळतें.

या घराण्यांतील व्यक्ति पूर्वी अग्निहोत्री व दीक्षित या नांवानें संबोधिल्या जात. उकसाण येथें पेशवाईंत यांस अग्निहोत्री म्हणून कांहीं जमीन इनाम मिळाली होती. तसेंच कोठिंबें येथेंहि इतर ब्राह्मण मंडळींबरोबर यांस जमीन इनाम मिळाली. यावरून हें घराणें पेशवाईंत कोंकणांतून घाटावर आलें असावें. यांना दीक्षित म्हणून काशी येथें जमीन इनाम होती. पेशवाईंतील श्रीहरेश्वर क्षेत्रांतील ४२ तीर्थोपाध्यायांची एक यादी आढळते. त्यांत खालील दोन व्यक्तींचा उल्लेख आढळतो. त्या या घराण्यांतील दुसऱ्या पिढींतील कृष्णंभट व रामभट असण्याचा संभव आहे.

१ कृष्णंभट पेणसे. २ रामभट पेणसे–घर आडाजवळ, ब्रह्मतीर्थासमीप.

कुलस्वामिनी :—कुसुमादेवी. ही बहुधा श्रीवर्धनची असावी. या घराण्यापैकीं कांहीं व्यक्ति कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची भवानी, जोगेश्वरी व परशुराम

या देवतांसहि नैवेद्य दाखवितात. नवरात्रांत अखंड दिवा असतो व दसऱ्याचे दिवशीं दांपत्य भोजनास बोलावितात.

या घराण्यांत पिढ्या १०, एकूण व्यक्ति १०४ व जिवंत व्यक्ति ३० आहेत.

भिकाजी सदाशिव (४) यांच्या घराण्यांत श्री. पेशवे सरकारकडून अग्निहोत्राबद्दल ७।८ एकर जमीन इनाम मिळाली आहे. भार्या लक्ष्मी.

बाळकृष्ण गोपाळ (७) मृ. वय ५२. हे तलाठी होते. भार्या रखमाई.

वासुदेव बाळकृष्ण (८) मृ. वय ३८. खाजगी नोकरी करीत असत. भार्या सारजा.

त्र्यंबक बाळकृष्ण (८) मृ. वय २१.

सदाशिव बाळकृष्ण (८) मृ. वय २१. व्ह. फायनल पास होते.

शंकर बाळकृष्ण (८) मृ. वय ७.

दामोदर गोपाळ (७) मृ. वय ५८. वावशीस सुखवस्तु असत. भार्या (१) दुर्गा. भार्या (२) सरस्वती.

*विनायक दामोदर (८) वय ५३. वावशीस सुखवस्तु असतात. भार्या टिळकांकडील.

*वामन विनायक (९) वय २५. मॅट्रिक. बडोद्याकडे नोकरी आहे.

गजानन दामोदर (८) मृ. वय १८.

*गंगाधर दामोदर (८) वय ३५. रेल्वेंत नोकर होते. सध्यां वास्तव्य वावशी.

गोविंद गोपाळ (७) मृ. वय ३५. खाजगी नोकर होते.

विश्वनाथ भिकाजी (५) भार्या सावित्री.

धोंडो विश्वनाथ (६) ज. वावशी; मृ. वय ७५. वऱ्हाडांत सर्व्हेखात्यांत नोकर होते. भार्या यमुना, दिवेकर यांजकडील. कन्या तापी, रेवदंड्याच्या सीताराम वामन देशमुख इंजिनियरांची पत्नी.

रघुनाथ विश्वनाथ ऊर्फ दाजी (६) ज. वावशी; मृ. वय ६०. खासगी नोकरी होती. भार्या भागीरथी, भिड्यांकडील. कन्या एक.

*विष्णु रघुनाथ ऊर्फ बाळ (७) वणीस खाजगी नोकरी आहे.

केशव विश्वनाथ (६) ज. वावशी; मृ. श. १८१८, वय ४०, प्लेगनें. मुंबईस खाजगी नोकरी होती. भार्या आनंदी, आवळसच्या रानड्यांकडील.

*विठ्ठल केशव (७) ज. श. १८१२. शिक्षण वणीस झालें. स. १९०९–१२ तलाठी. १९१२त बारामतीस रु. २० पगारावर तारमास्तर. हातरुणास ४ वर्षें. १९२२ पासून अकोल्यास जपान कंपनींत २ वर्षें नोकरी; नंतर एक वर्ष पुसद. गेलीं १३ वर्षें अकोल्यास वाचनालयांत नोकरी आहे. पत्ता—काणे यांचा वाडा, आगरवेस. भार्या (१) सावित्री, पेणच्या जोगळेकरांकडील. भार्या (२) रखमा (तारा), पुण्याच्या गोगट्यांकडील. कन्या (१) अंबू. (२) इंदु. (३) सिंधु.

*वसंत विठ्ठल (८)

वामन विश्वनाथ (६) मृ. वय ४०.पांढरकवड्यास खाजगी नोकर होते. भार्या गोपिका.

कृष्णाजी वामन (७) मृ. वय २७, क्षय. कल्याणास रेल्वेकडे नोकरी होती.

गंगाधर भिकाजी (५) कन्या (१) साळू, रेवदंड्याच्या गोपाळराव ढबूंची पत्नी. (२) बनू, पानमंगरुळास थत्त्यांकडे दिली.

कोंडदेव गंगाधर (६) मृ. वय ८०. हे सुखवस्तु होते.

* **काशीनाथ कोंडदेव** (७) वय ५६. कोठिंब्यास शेती करतात.

* **विश्वनाथ काशीनाथ** (८) वय २५. कोठिंब्यास शेती करतात. भार्या चंपू, भिड्यांकडील.

* **नरहरी काशीनाथ** (८) वय २१. कोठिंब्यास शेती करतात.

मोरेश्वर गंगाधर (६) ज. स.१८५६; मृ. स. १९१८. वऱ्हाडांत मराठी शिक्षक होते. भार्या इंदिरा, पेणच्या गोपाळराव छत्र्यांची मुलगी. कन्या गोदावरी, नवलाख उंबऱ्याच्या गोविंद केशव नामजोश्यांची पत्नी.

* **रामचंद्र मोरेश्वर** (७) ज. स. १८९७. प्रीव्हिअसपर्यंत शिक्षण. भाई पेंडसे या नांवानें यांना ओळखतात. रामदास पेठ, अकोला येथें वर्तमानपत्राचे बातमीदार आहेत. भार्या जानकी (गोदू), अकोल्याच्या पुरुषोत्तम सदाशिव साठ्यांची मुलगी. या नर्स आहेत. कन्या रजनी, ज. स. १९३७.

प्रभाकर गंगाधर (६) हे कोठिंब्याच्या पेंडसे घराण्यांत दत्तक गेले. तेथील नांव गोविंद नारायण.

भास्कर गंगाधर (६) मृ. वय ७०. ग्वाल्हेरकडे मराठी शिक्षक होते.

बापूजी भिकाजी ऊर्फ सदाशिव (५) भार्या पार्वती. कन्या वेणू (गोपिका), पेणच्या लिमयांकडे दिली.

गणेश बापूजी (६) मृ. वय ८५. वावशीस सुखवस्तु होते. भार्या लक्ष्मी. कन्या चंद्रभागा, पेणच्या दांडेकरांकडे दिली.

* **विष्णु गणेश** (७) वय ३२. हे दत्तक आले. मूळचें नांव रामचंद्र पांडुरंग. वावशीस शेती करतात. भार्या गंगा, वरसईच्या विष्णु वैजनाथ जोश्यांची मुलगी. विवाह स. १९२२.

* **सदाशिव विष्णु** (८) वय ८. मराठी २ री. वावशी.

शिवराम बापूजी (६) संग्रहणीनें ५० व्या वर्षी मृत्यु. शिक्षक होते. कन्या (१) दुर्गा (लक्ष्मी), वय ५४, आपट्याच्या वामनराव गोखल्यांची पत्नी. (२) कावेरी (अन्नपूर्णा), पेणचे शिक्षक वामन सखाराम परांजप्यांची पत्नी.

* **श्रीरंग शिवराम** (७) ज. स. १८८६ सप्टेंबर ११. वेणगांवास मराठी शिक्षक आहेत. भार्या अन्नपूर्णा, गोगट्यांकडील. कन्या (१) येसू, ज. स. १९२३ आक्टो. २७. विवाह श. १८६०. रामकृष्ण कमळाकर परांजप्यांची पत्नी. (२) शांता, ज. स. १९२९ एप्रिल २६. (३) कुसुम, ज. स. १९३४ ऑगस्ट १६.

*सदाशिव श्रीरंग (८) ज. स. १९२० जून २१. इंग्रजी ३ री.

*मोरेश्वर श्रीरंग (८) ज. स. १९२६ एप्रिल ९. मराठी ५ वी.

गोपाळ शिवराम (७) मृ. वय ३६. खाजगी नोकरी होती. कन्या यमू.

जगन्नाथ शिवराम (७) रेल्वे ऑडिटमध्यें नोकर होते.

*दत्तात्रेय जगन्नाथ (८) वय १२. मराठी ५ वी. वास्तव्य पालें.

चिंतामणि शिवराम (७) कॉलऱ्यानें १४ व्या वर्षी मृत्यु.

पांडुरंग बापूजी (६) ज. वावशी; मृ. श. १८५६, वय सुमारें ७५. खासगी नोकरी करीत. भार्या (१) यशोदा, वरसईच्या केशवराव रहाळकरांची मुलगी. पुत्र श्रीधर, लक्ष्मण, रामचंद्र व कृष्ण. कन्या काशी, कोहीळच्या पुरुषोत्तम जगन्नाथ जोश्यांची पत्नी. भार्या (२) नर्मदा, थोपवडच्याच्या पांडुरंग नारायण फाटकांची मुलगी. कन्या (१) गोदावरी, निफाडच्या गणेश भिकाजी जोगळेकरांची पत्नी. (२) गंगू, कोहीळचे गणेश त्र्यंबक पावगी यांची पत्नी. (३) अनू, मुंबईच्या दत्तात्रेय यशवंत केतकरांची पत्नी.

श्रीधर पांडुरंग (७) मृ. श. १८५८, वय सुमारें ४५. सुमारें १३ वर्षें तलाठी होते. तलाठी संघाचे प्रेसिडेंट असून स. १९१८ सालीं तलाठ्यांचा संप झाला, त्या वेळीं यांनीं नोकरी सोडली. पुढें कांहीं दिवस खाजगी नोकरी केली व शेवटीं बाँड रायटर होते. भार्या पार्वती, वावशीचे जोश्यांकडील. कन्या सोनू, अक्षीचे कर्व्यांकडे दिली. पुत्र चिंतामणि. भार्या (२) खोचिवडचाच्या विश्वनाथ सदाशिव जोश्यांकडील. पुत्र नारायण व एक कन्या.

*चिंतामणि श्रीधर (८) वय १७. इंग्रजी विद्यार्थी. उरण.

*नारायण श्रीधर (८) वय २. खोचिवडें.

*लक्ष्मण पांडुरंग (७) वय ३६. व्ह. फायनल व सर्व्हेखात्यांतील सर्व परीक्षा झाल्या आहेत. गरिबीमुळें वार लावून विद्या केली. नोकरीस सुरुवात १९१७ सालीं २० रुपयांवर झाली. सध्यां ठाण्यास सर्व्हेखात्यांत ७० रु. पगारावर सर्व्हेअर आहेत. गायनाची आवड आहे. पत्ता—मखमली तलाव, सोहनी यांचा वाडा, ठाणें. भार्या उमा, पुण्याच्या रामचंद्र कृष्ण करमरकरांची मुलगी, विवाह स. १९२०.

*माधव लक्ष्मण (८) वय ८. मराठी २ री.

*शंकर लक्ष्मण (८) वय ४.

*मधुसूदन लक्ष्मण (८) वय १.

रामचंद्र पांडुरंग (७) हे दत्तक गेले. नंतरचें नांव विष्णु गणेश.

*कृष्णाजी पांडुरंग (७) ज. वावशी, वय २९. ठाणें स्कूलबोर्डांत मराठी शिक्षक आहेत. वास्तव्य ठाणें. भार्या रुक्मिणी, वेणगांवच्या वामन महादेव शित्र्यांची मुलगी. विवाह स. १९३२.

विष्णु दाजी (६) मृ. वय ६०. खाजगी नोकरी करीत. भार्या पार्वती.

* **हरी विष्णु** (७) वय ४०. मिरज येथें असतात.

पुरुषोत्तम दाजी (६) भार्या राधा (गोदावरी), वसईच्या वैजनाथपंत जोश्यांकडील. कन्या बयो, बदलापूरच्या मोरेश्वर रामचंद्र पाटणकरांची पत्नी.

रामकृष्ण पुरुषोत्तम ऊर्फ केरो (७) मृ. स. १९३०, वय ५८. कणें येथें मराठी शाळेंत शिक्षक होते. दुसऱ्या वर्षाचें सर्टिफिकेट होतें. भार्या (१) सगुणा, नागोठण्याच्या शिदोऱ्यांकडील. कन्या कृष्णा, दर्यापूरच्या शंकरराव पाळंद्यांची पत्नी. भार्या (२) सत्यभामा (यमुना), नेरळच्या रघुनाथ व्यंकटेश जोगळेकरांची मुलगी. कन्या (१) सोनू (सरस्वती), भडगांवच्या गणेश रामकृष्ण सहस्रबुद्धयांची पत्नी. (२) शांता (रमा), पुण्याच्या गंगाधर गोविंद रानडयांची पत्नी. (३) द्रौपदी, वय १६. पुत्र शंकर, मुकुंद व त्र्यंबक.

* **शंकर रामकृष्ण** (८) वय २५. मुंबई म्युनिसिपालिटींत नोकरी आहे. भार्या शकुंतला, घाटकुपरच्या दत्तोपंत आपटयांची मुलगी. यांस एक लहान मुलगा आहे.

* **मुकुंद रामकृष्ण** (८) वय १९. पेण येथें इंग्रजी ६ वी.

* **त्र्यंबक रामकृष्ण** (८) वय १४. पेण येथें मराठी ५ वी.

जनार्दन पुरुषोत्तम (७) मृ. स. १९३०. वय ५०. अविवाहित होते.

मुकुंद पुरुषोत्तम (७) मृ. वय २५. पोस्टांत नोकर होते.

सदाशिव बहिरव (४) कुरुंदवाडकरांच्या घोडेस्वारांच्या पथकांत अधिकारी होते. भार्या गंगा.

नीळकंठ सदाशिव (५) कुरुंदवाडकरांच्या घोडेस्वारांच्या पथकांत होते. पुढें उकसाणास आले. नंतर विरक्त होऊन काशीस गेले. भार्या पार्वती, मंगळवेढयाच्या खाडिलकरांची मुलगी.

जनार्दन नीळकंठ (६) ज. स. १८५७; मृ. स. १९१८. प्रथम सातारा हायस्कुलांत शिक्षक. नंतर कुलाबा जिल्हयांत असि. डेप्युटी एज्यु. इन्स्पेक्टर होते. पेन्शन घेतल्यावर सातारा व उकसाण येथें राहात. भार्या सीता, साताऱ्च्या महादेव लक्ष्मण गाडगिळांची मुलगी. कन्या (१) चंपू, पुण्याच्या डॉ. केशव भास्कर लेल्यांची पत्नी. (२) कृष्णा ऊर्फ सोनू, पुण्याच्या गणेश दामोदर केळकरांची पत्नी.

* **दामोदर जनार्दन** (७) ज. स. १८८८. सातारा येथें न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक आहेत. भार्या रमा, तासगांवच्या शंकर रघुनाथ कोल्हटकर वकिलांची मुलगी. कन्या शकुंतला, ज. स. १९२९. मराठी २ री.

* **केशव दामोदर** (८) ज. स. १९३६ डिसेंबर.

केशव जनार्दन (७) ज. स. १८९०; मृ. स. १९१३, प्लेग. डेक्कन कॉलेजांत विद्यार्थी होते.

केशव नीळकंठ (६) अल्प वयांत मृत्यु.

रामचंद्र नारायण (४) भार्या (१) जानकी. भार्या (२) लक्ष्मी.

घराणें २७ वें, राहुरी

(वंशावळ पृ. १४५)

या घराण्याचा मूळ पुरुष गोविंद. कोंकणांतील मूळ गांव आंजर्ले, पावस किंवा तळें–घोसाळें असावें असें म्हणतात. सध्यां यांचें वास्तव्य अहमदनगर, ठाणवी (यवतमाळ), नागपूर, बेलापूर, मेहकर (बुलढाणा), राहुरी व विजापूर या गांवीं आहे. पूर्वीं यांचें वास्तव्य कोपरगांव, पेडगांव, बिरवाडी, वांबोरी व हातगांव या गांवीं असल्याचें आढळतें.

कुलदेवता:—आंब्याची जोगेश्वरी. शिवाय कोंकणांतील चार देव (नांवें माहीत नाहींत) यांना देवदिवाळीस नैवेद्य दाखवितात. नवरात्रांत अखंड दिवा असतो. पंचमीस व अष्टमीस कागदाचा फुलवरा वाहातात. नवमीस कुलधर्म असून सुवासिनी व ब्राह्मण भोजनास सांगतात. मार्गशीर्ष पौर्णिमेस कुलधर्म असतो. लग्न, मुंज व पुत्रजन्म या प्रसंगीं बोडण, गोंधळ व मार्ग मळणें इत्यादि असतात.

या घराण्यांत पिढ्या ७, एकूण व्यक्ति २९ व जिवंत व्यक्ति १७ आहेत.

बजाजी बाळाजी (३) हे राहुरीस शाई विकण्याचा धंदा करीत असत. भार्या राधा.

नारायण बजाजी (४) मृ. स. १८८९, संधिवात. मराठी शिक्षक होते. भार्या वेणू, जोश्यांकडील. कन्या (१) मथुरा, लवाट्यांकडे; (२) काशी, बापटांकडे दिली.

त्र्यंबक नारायण (५) ज. जामखेड स. १८७३; मृ. स. १९२४, अर्धांग. थर्ड इयर ट्रेंड शिक्षक होते. दरमहा ३ रुपयांपासून पगारास सुरुवात होऊन शेवट ८० रुपये मिळत असत. भार्या (१) उमा, बापटांकडील. पुत्र सिद्धेश्वर. भार्या (२) साठ्यांकडील. पुत्र धोंडो. कन्या लीला, वय १८.

* **सिद्धेश्वर (शामराव) त्र्यंबक** (६) ज. राहुरी स. १९०२ नोव्हें. २१. मॅट्रिक. मेहकरास व्हर्नाक्युलर मिडल स्कूलमध्यें इंग्रजीचे शिक्षक आहेत. पगार रु. ३०. भार्या पार्वती, विवाह स. १९२७. वाशीमच्या दातारांकडील.

* **विनायक सिद्धेश्वर** (७) ज. स. १९३१ मार्च २३. मराठी १ ली.

* **प्रभाकर सिद्धेश्वर** (७) ज. स. १९३२ नोव्हेंबर २२.

* **मुकुंद सिद्धेश्वर** (७) ज. स. १९३५ डिसें. २८.

* **धोंडो त्र्यंबक** (६) ज. टाकळी स. १९१७ जुलै ५. मॅट्रिक पास. नागपूर येथें लघुलेखनाचा अभ्यास चालू.

* **माधव नारायण** (५) ज. जामखेड स. १८७६ ऑगस्ट १. तिसरें वर्ष ट्रेंड. शाळाखात्यांत सुपरवायझर होते. सध्यां पेन्शनर असून अहमदनगर येथें जैनगल्लींत राहतात. भार्या रमा, विवाह स. १९००, गोडश्यांकडील. कन्या (१) शांता, गाडगिळांकडे दिली. (२) यमू (कमल), वय १३.

*चिंतामणि माधव (६) ज. नेवासें, वय २२. अहमदनगरास शिवणकाम करतात. भार्या रुक्मिणी, विवाह स. १९३६. भिडयांकडील.

*प्रभाकर (मनोहर) माधव (६) ज. भिंगार वय १९. अहमदनगरास मोहनप्रेसमध्यें कंपॉझिटर आहेत.

*रामचंद्र नारायण (५) ज. जामखेड श. १८०१. सेकंड क्लास मेकॅनिकल इंजिनिअर, भूतनाळ टँक, विजापूर; पगार रु.१२५.भार्या (१) जानकी, जळगांवच्या गाडगिळांकडील. कन्या आवडा, शेगांवच्या डॉ. भाव्यांकडे दिली. भार्या (२) सीता, सातारच्या दामल्यांकडील. पुत्र नारायण, व्यंकटेश व पुरुषोत्तम. कन्या कृष्णा, ज. स. १९२४.

*नारायण रामचंद्र (६) ज. स. १९२०; इंग्रजी सहावी.

*व्यंकटेश रामचंद्र (६) ज. स. १९२५; मराठी सातवी.

*पुरुषोत्तम रामचंद्र (६) ज. स. १९३२; बालवर्ग.

केशव बजाजी (४) मराठी शिक्षक होते. भार्या बापटांकडील.

*एकनाथ केशव (५) वय ५२. पहिलें वर्ष ट्रेंड असून अहमदनगर म्युनिसिपल शाळेंत शिक्षक आहेत. पगार रु. ४०. भार्या सरस्वती, देवधरांकडील.

*बाळासाहेब एकनाथ (६) वय २५. अहमदनगरला स्टेशनरीचें दुकान आहे.

*बंडो एकनाथ (६) वय ४.

*पुरुषोत्तम केशव (५) ज. जामखेड वय ४७. तिसरें वर्ष ट्रेंड शिक्षक असून यवतमाळ जिल्हयांत ठाणवीस हेडमास्तर आहेत. पगार रु. ४५. परमार्थ विषयाची आवड आहे. भार्या सत्यभामा, घाणेकरांकडील.

विठ्ठल बाळाजी (३) हे राहुरीस सावकारी करीत. हे स. १८७३ मध्यें हयात होते. यांनीं आपली मिळकत आपले पुतणे अनंत गंगाधर यांस दिली.



पुरुषोत्तम केशव स. १९३८

गंगाधर बाळाजी (३) भार्या गोपिका. हे राहुरीस स्थायिक झाले.

वासुदेव गंगाधर (४) भार्या रखमा.

अनंत गंगाधर (४) ज. राहुरी. मृ. वय ४५, सुमारें स. १९१३. मराठी शिक्षक होते. पेन्शन घेऊन राहुरीस रहात असत. भार्या लक्ष्मी (मनू), मुरुडचे गोपाळ विष्णु बागुलांची मुलगी.

* नागेश अनंत ऊर्फ नरहरी (५) ज. राहुरी वय २६. दोन वर्षांचे असतांना वडील



स. १९३८

नागेश अनंत   सुशीलाबाई   लक्ष्मीबाई

वारले. त्यामुळें स्वतःचे हिंमतीवर मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतलें. कायदेभंगाचे चळवळींत स. १९३० त ६ महिने व १९३२ त ९ महिने असा दोन वेळ कारावास. १९३३ त स्टेशनरीचें दुकान काढलें. नंतर वर्तमानपत्राचे एजंटाचें व बातमीदाराचें काम सुरू केलें व त्यांत जम ठीक बसला आहे. वास्तव्य राहुरी. राहुरी तालुका कांग्रेस कमिटी, ब्राह्मणसंघ, ग्रामोद्धारमंडळ व हिंदुमहासभा-शाखा यांचे कार्यवाह. भार्या सुशीला (कमळा), विवाह स. १९३६. मुरुडच्या त्र्यंबक वासुदेव गोडबोल्यांची मुलगी.

घराणें २८ वें, शहापूर—माहुली

(वंशावळ पृ. १४६)

या घराण्याचा मूळ पुरुष गोविंद. कोंकणांतील मूळ गांव श्रीवर्धन असावें असें दिसतें. तेथून ठाणें जिल्ह्यांतील शहापूर तालुक्यांतील माहुलीस या घराण्यांतील मंडळींची वस्ती झाली. सध्यां वास्तव्य दादर (मुंबई) येथें आहे. पूर्वी उंबरगांव, केळवें–माहीम, डहाणु, तारापूर, पनवेल व फळसत या गांवीं वास्तव्य झाल्याचें दिसतें.

कुलस्वामिनी :—माहुली किल्यावरील अंबाबाई (एडकाबाई) मानितात. दसऱ्यास कांहीं देवांस नैवेद्य दाखवितात. परंतु नांवें माहीत नाहींत.

माहुलीच्या त्र्यंबक भिकाजी ठोसरांचे श. १७१८ चे जमाखर्चांत केसो गोविंद पेंडसे यांचा उल्लेख ३–४ वेळ आला आहे. यावरून मूळ पुरुष गोविंद यास केशव या नांवाचा दुसरा मुलगा असावा असें दिसतें.

या घराण्यांत पिढ्या ७, एकूण व्यक्ति १८ व जिवंत व्यक्ति ४ आहेत.

कृष्णाजी गोविंद (२) हे माहुलीस असत. माहुलीच्या (खालापूर) रा. त्रिंबक भिकाजी ठोसरांचे कागदांत कृष्णाजी पेंडसे व गोविंद पेंडसे यांचा श. १७१८ त उल्लेख आढळतो.

सखाराम कृष्ण (३) माहुलीस (जि. ठाणें) असत. कन्या बेलापूरच्या नारायणराव ठोसरांची पत्नी. यांचे नांवाचा उल्लेख माहुलीच्या विसाजी कृष्ण ठोसरांचे कागदांत श. १७२६ त आढळतो. तेथेंच "सगुणाबाई पेंडसी" असाहि उल्लेख आहे.

आबाजी सखाराम (४) मृ. स. १८८५. हे सरकारी कस्टमखात्यांत नोकर होते. लवकरच पेन्शन घेऊन पनवेलीस किरकोळ सावकारी व स्टँपव्हेंडरचें काम करीत. भार्या जानकी. कन्या (१) बडोद्याचे आठवल्यांकडे दिली. (२) बडोद्याच्या गोपाळराव भटांची पत्नी. (३) यमू, पनवेलच्या गणेश विष्णु नातूंची पत्नी. मृ. स. १९१३.

कृष्णाजी आबाजी (५) मलखांबावरून पडून हात मोडल्यामुळें त्या आजारांत मृत्यु. भार्या वेढीच्या (आगाशी) गोखल्यांकडील.

सखाराम आबाजी (५) मृ. स. १८९८, वय सुमारें २६. पनवेलीस व्यापाऱ्यांकडे खासगी नोकरी करीत. भार्या भागीरथी, त्र्यंबकेश्वरचे हरिदास, हरिशास्त्री चिंतामणि फडक्यांची चौथी मुलगी. मृ. स. १९१३. कन्या (१) सुंदरा, ज. स. १८९४. आडिवऱ्याच्या धुंडिराज नारायण दात्यांची पत्नी. (२) चंद्रा, मृ. स. १९०५.

* **त्र्यंबक सखाराम** (६) ज. पनवेल, स. १८९६. हे तीन वर्षांचे असतांना वडील वारल्यामुळें शिक्षणाची आबाळ झाली. यांच्या आतेनें यांचें संगोपन केलें. इंग्रजी ६ वीपर्यंत शिक्षण झाल्यावर स. १९२२ पासून पांच सहा ठिकाणीं नोकरी केली. नंतर सन १९२५ त दादरला किराणा मालाचें दुकान काढलें आहे. पत्ता—नं. ३१ डोंगरेबाग, दादर. भार्या (१) पार्वती, पनवेलच्या मराठ्यांकडील. मृ. स. १९१३. भार्या (२) गंगा, पनवेलच्या नारायण कृष्ण देवधरांची मुलगी. मृ. स. १९२२. भार्या (३) गिरिजा, भिडयांकडील. मृ. स. १९३७. पुत्र प्रभाकर, सुधाकर व भालचंद्र.

* **प्रभाकर त्र्यंबक** (७) ज. धुळें, स. १९२५. विद्यार्थी. दादर.

* **सुधाकर त्र्यंबक** (७) ज. धुळें, स. १९३०.

*भालचंद्र त्र्यंबक (७) ज. दादर, स. १९३४.
केशव भिकाजी (५) भार्या सावित्री.
गोपाळ भिकाजी (५) भार्या राधा.
गणेश सदाशिव (४) भार्या सरस्वती.

घराणें २९ वें, गुहागर—किवळें

(वंशावळ पृ. १४६)

या घराण्याचा मूळ पुरुष जनार्दन. कोंकणांतील मूळ ठिकाण गुहागर. किवळें हा गांव सरदार पेठे यांस श्री. बाळाजी बाजीराव पेशवे यांजकडून सुमारें सन १७४७ जिल्हेज़ २४ रोजीं इनाम मिळाला. त्या वेळीं भिडे, रानडे व पेंडसे हे तेथें राहावयास आले. सध्यां यांची वस्ती किवळें व पुणें येथें आहे. यापूर्वी यांची वस्ती काशी, नाशिक, बडोदें, मसूर व मुंबई या गांवीं असल्याचें आढळतें.

कुलस्वामी :—गुहागर येथील वाडेश्वर. यास व जेजुरीच्या खंडोबास देवदिवाळी, चंपाषष्ठी व माघ शुद्ध पौर्णिमा या दिवशीं नैवेद्य दाखवितात.

या घराण्याचा मूळ पुरुष जनार्दन व प्रकरण ९ मधील सुटक वंशावळ क्रमांक २६ मधील तिसऱ्या पिढींतील जनार्दन हे एकच असावे असें वाटतें. कारण दोघांनीं नाशिक हें वास्तव्याचें गांव सांगितलें आहे.

या घराण्यांत पिढ्या ६, एकूण व्यक्ति १८ व जिवंत व्यक्ति ५ आहेत.

रामाजी जनार्दन (२) नाशिकहून सरदार पेठे किवळ्यास राहावयास आले तेव्हां त्यांचे बरोबर भिडे, पेंडसे व रानडे अशीं तीन कुटुंबें आलीं, त्यांत हे आले. भार्या जानकी.

विसाजी रामाजी (३) भार्या अन्नपूर्णा.

गोपाळ विसाजी (४) भार्या आनंदी.

आबाजी रामाजी (३) यांनीं किवळ्यास रामाचें मंदिर बांधलें.

गोविंद रामाजी (३) भार्या राधा.

वामन गोविंद (४) हे बडोदें संस्थानांत डॉक्टर होते. भार्या गंगा.

श्रीधर वामन ऊर्फ बाबूराव (५) मृ. स. १९१४. हे व्हेटरनरी डॉक्टर होते व मसूरला खाजगी प्रॅक्टिस करीत. भार्या रमा (अंबू), भालचंद्र गणेश लेल्यांची मुलगी. कन्या लीला (लक्ष्मी), वय २६. यशवंत आत्माराम भागवतांची पत्नी.

***विनायक गोविंद** (४) ज. श. १७७९. किवळें येथें शेतकी व व्यापार करितात. भार्या राधा, गणपतराव पाटणकरांची मुलगी. कन्या (१) शांता, अनंत विना-

यक रानड्यांची पत्नी. (२) येसू, काशीच्या व्यंकटेश गणेश दामल्यांची पत्नी. (३) दुर्गा, शिवराम गोपाळ लेल्यांची पत्नी.

* **नीळकंठ विनायक** (५) ज. श. १८१९. शेती व व्यापार करतात. भार्या (१) पार्वती, तिकोन्याच्या वासुदेवराव लिमयांची मुलगी. भार्या (२) सुशीला, रावडीच्या फाटकांची मुलगी. कन्या कुसुम, वय १.

* **गोपाळ विनायक** (५) ज. श. १८२१. पुण्यास व्यापार करतात. पत्ता–घर नं. ३३१, सदाशिव पेठ. भार्या इंदिरा (सत्यभामा), जमखिंडीच्या गोपाळराव सुभेदार जोश्यांची मुलगी. कन्या (१) सुमन, ज. श. १८४७. मराठी ५ वी. (२) कमल, ज. श. १८५१. मराठी २ री. (३) प्रमिला, ज. श. १८५५. (४) पुष्पा, ज. श. १८५८.

* **सुरेंद्र गोपाळ ऊर्फ नारायण** (६) ज. श. १८५३. मराठी विद्यार्थी.

* **विष्णु गोविंद** (४) ज. श. १७८७. खाजगी नोकरी आहे. भार्या लक्ष्मी, करंजगांवकर वैद्यांची मुलगी.

त्र्यंबक रामाजी (३) भार्या पार्वती.

घराणें ३० वें, चौक—मेटें

(वंशावळ पृ. १४७)

या घराण्याचा मूळ पुरुष बाळाजी. यांचे कोंकणांतील मूळ गांव आयनी–मेटें असें म्हणतात. सध्यां या कुटुंबांतील मंडळींचें वास्तव्य पुणें येथें आहे. पूर्वीं यांचें वास्तव्य कल्याण, चौक, पेण, भिवंडी व श्रीवर्धन या गांवीं झालें असावें असें दिसतें. यांना मौजे तुपगांव व आसरोटी या गांवीं जंगलगर्क जमीन लागवडीस आणण्याबद्दल सनद मिळाली आहे. नवरात्रांत दिवा व माळ असून ब्राह्मण व सुवासिनी भोजनास सांगतात.

या घराण्यांत पिढ्या ७, एकूण व्यक्ति २३ व जिवंत व्यक्ति ३ आहेत.

विश्वनाथ पांडुरंग (३) भार्या अन्नपूर्णा.

बाळकृष्ण विश्वनाथ (४) मॅजिस्ट्रेट होते. भार्या जानकी.

सदाशिव बाळकृष्ण (५) मृ. स. १८८२. हे वकिली करीत. भार्या (१) सावित्री भार्या (२) सई. भार्या (३) मथुरा, थत्त्यांकडील. यांनीं पतिनिधनानंतर मुलगा दत्तक घेतला.

* **गोपाळ सदाशिव** (६) ज. श. १८३१ मार्ग. शु. ११. हे दत्तक आले. मूळचें नांव दत्तात्रेय विष्णु केतकर. हायस्कूलचें शिक्षण पनवेल व पुणें येथें झालें. कॉले-

जचें शिक्षण पुणें येथें झालें. बी. ए. (१९३४); एल्एल्. बी.; पुण्यास (अनाथ विद्यार्थी गृहासमोर, सदाशिव पेठ) वकिली करतात. हिंदु संघटनेच्या कार्याची आवड असून तें कार्य करितात. भार्या इंदिरा (वेणू), वामन रामचंद्र कानिट-करांची मुलगी.

* **यशवंत गोपाळ** (७) ज. श. १८५८ मार्ग.

लक्ष्मण हरी (५) भार्या आनंदी.

भास्कर पांडुरंग (३) यांना सुमारें सन १७९० त आसरोटीची जंगलगर्क जमीन लागवडीस आणण्याबद्दल सनद मिळाली आहे. हे तुराडें येथें राहात असत (ऐ. प्र. क्रमांक १८ पहा).

आबाजी बल्लाळ (२) हे तुराडयास राहात. यांना स. १७९० च्या सुमारास तुपगांवची जंगलगर्क जमीन लागवडीस आणण्याबद्दल सनद मिळाली आहे (ऐ. प्र. क्रमांक १७ पहा).

वासुदेव बल्लाळ (२) भार्या अन्नपूर्णा.

महादेव वासुदेव (३) भार्या लक्ष्मी.

आबाजी महादेव (४) भार्या गोदावरी.

काशीनाथ आबाजी (५) भार्या गिरिजा.

वासुदेव काशीनाथ (६) हे नाटक कंपनींत असत. भार्या लक्ष्मी.

गणेश वासुदेव (५) भार्या यशोदा.

महादेव गणेश (६) हे भिवंडी तालुक्यांत तलाठी होते.

* **विश्वनाथ महादेव** (७) हे पुण्यास केमिस्टचे दुकानांत नोकरीस आहेत असें कळतें.

घराणें ३१ वें, गोळप—आगाशी

(वंशावळ पृ. १४७)

या घराण्याचा मूळ पुरुष गोविंद. हें घराणें मूळचें गोळप, जि. रत्नागिरी येथील होय असें त्र्यंबक येथील माहितीवरून समजतें. सध्यां यांचें वास्तव्य आगाशीस आहे. पूर्वीं नाशिक व बडोदें येथें यांचें वास्तव्य होतें.

जोगेश्वरीस कुलदेवता मानितात. खंडोबा हें दैवत देशावर आल्यावर घेतलें आहे. शारदीय नवरात्र व चंपाषष्ठी पाळितात.

या घराण्यांत पिढ्या ७, एकूण व्यक्ति २४ व जिवंत व्यक्ति ३ आहेत.

नारायण महादेव (४) हे श. १७८३ चे सुमारास त्र्यंबकला गेले होते.

गोपाळ यज्ञेश्वर (५) मृ. वय ७०, संग्रहणी. बडोद्यास वैदिक होते. भिक्षुकी व महादेवाची पूजा करीत. भार्या रमा.

शंकर गोपाळ (६) मृ. वय ६३, संग्रहणी. खाजगी नोकरी होती. नंतर भिक्षुकी व पूजा करीत. शेवटीं शाळेंत शिक्षक होते. फोटोग्राफी येत होती. भार्या लक्ष्मी (साळू), विनायकराव फाळक्यांची मुलगी. कन्या (१) रेवती, वय २८, नाशिकच्या राजाराम काशीनाथ बापटांची पत्नी. कन्याशाळेंत नोकरी करितात. (२) शांता, वय १८, ठाण्याच्या त्र्यंबक मोरेश्वर फडक्यांची पत्नी. (३) इंदु, वय १६, शंकर हरी आपटयांची पत्नी.

***रामचंद्र शंकर** (७) वय २५. दादरला कचकड्याच्या खेळण्यांच्या दुकानांत नोकरी आहे. आगाशीस राहतात.

***चिंतामणि शंकर** (७) वय १४. आगाशीस इंग्रजी ४ थींत.

***मोरेश्वर शंकर** (७) वय १०. मराठी ४ थींत.

प्रकरण ८ वें

सामान्य विचार

ऐतिहासिक कागदपत्र, वंशावळी, घराण्यांची व व्यक्तींची माहिती यांचा जो संग्रह या पुस्तकांत केला आहे त्यावरून सुचणारे कांहीं सामान्य विचार येथें द्यावयाचे आहेत. हे विचार सामान्यतः सर्व कोंकणस्थ घराण्यांस लागू पडण्यासारखे असूं शकतील व अनेक घराण्यांचे कुल-वृत्तान्त तयार झाल्यावर त्यांवरून कोंकणस्थ किंबहुना सर्व ब्राह्मणज्ञातीविषयींहि सामान्य अनुमानें काढण्यास उपयुक्त पडतील असें वाटतें.

उपनांवाचा काल

पेंडसे कुलांत जास्तींत जास्ती १३ पिढ्या आढळल्या. उपलब्ध माहितीवरून सर्व कुलाचा मूळ पुरुष एक आहे असें दाखवितां आलें नाहीं. पेंडसे कुलाचीं ३१ घराणीं आहेत. पैकीं एक आज अविद्यमान आहे, म्हणजे त्यांत एकहि पुरुषव्यक्ति जिवंत नाहीं. अधिक माहिती उपलब्ध झाल्यास ह्या ३१ घराण्यांपैकीं कांहीं एकत्र होण्याचा संभव आहे. निश्चित माहितीच्या अभावीं आज तीं जोडलीं नाहींत. जुळण्याचा जेथें संभव आढळला तेथें त्या घराण्याच्या प्राथमिक माहितींत तो

संभव व त्याचें कारण नमूद करून ठेविलें आहे; त्याचा संशोधनास उपयोग होईल. वंशावळींतील जिवंत व मृत अशा एकूण व्यक्तींची संख्या या कुळांत अनुक्रमें ९९९ व १५९६ आहे. मेटें (क्रमांक १४) घराण्यांत विद्यमान व्यक्तींची संख्या १६४ आहे. ही संख्या इतर सर्व घराण्यांहून अधिक असल्यामुळें वंशविस्ताराचे दृष्टीनें हें घराणें पहिलें ठरतें. दुसरा क्रमांक कोचरें (क्रमांक १५) घराण्याचा लागतो. या ग्रंथांत योजिलेल्या व्यक्ति शब्दाचा अर्थ लहानापासून वृद्धापर्यंत सर्व "पुरुष-व्यक्ति" असा आहे.

१३ पिढ्यांची माहिती म्हणजे सरासरी ३०० वर्षांची माहिती उपलब्ध झाली. १००–१२५ वर्षांत लोकसंख्या दुप्पट होते असें म्हणतात. त्याप्रमाणें पाहिल्यास शक १७५० मध्यें पेंडसे पुरुषव्यक्ति ५०० असाव्या असें म्हणतां येईल. याप्रमाणें मागें जातां जातां एक पुरुषव्यक्ति असण्याचा काळ शके ११००–१२०० येतो; व याच वेळेस पेंडसे हें उपनांव अस्तित्वांत आलें असावें. सर्व पेंडसे कुळाचा मूळ पुरुष कोण होता हें समजण्यास आपणांस ६००–७०० वर्षांची माहिती मिळाली पाहिजे. आज ३०० वर्षांचे मागची माहिती मिळत नाहीं, तेव्हां मूळ पुरुष एक दाखविण्याची कल्पना सध्यां तरी शक्य नाहीं.

कोंकणस्थांतील पेंडसे यांचें स्थान

१. संख्या

इ. स. १९३१ मध्यें कोंकणस्थांची शिरगणती सुमारें १ लक्ष ४० हजार होती. ६–७ वर्षांत ही संख्या थोडी वाढली असेल. कोंकणस्थांत ३०० चे वर उपनांवें आहेत. म्हणजे एका उपनांवाची सरासरी स्त्रीपुरुषसंख्या सुमारें ४०० व केवळ पुरुष संख्या २०० येते. गोखले व परांजपे या उपनांवांची पुरुषसंख्या अनुक्रमें १७३१ व १५९२ आहे. म्हणजे सरासरीच्या मानानें ही सुमारें ८ पट होते. यावरून कांहीं उपनांवांची संख्या अत्यल्प असावी हें उघड आहे. उदाहरणार्थ गोळे १९७ व आचवल फक्त ५९ आहेत. दोनशेंच्या खालचीं उपनांवें अल्पसंख्य व एक हजारावरचीं बहुसंख्य असें मानिलें तर पेंडसे हें मध्यमसंख्य ठरतें. कोंकणस्थांचीं मूळ उपनांवें ६० होतीं, हें मत खरें मानिलें तर प्रत्येक उपनांवाची पुरुषसंख्या आज एक हजाराचे सुमारास असली पाहिजे; पण आज अनेक उपनांवांची संख्या त्याहून फार कमी आहे. म्हणून तीं नांवें मागाहून पडलीं असावींत असें अनुमान निघेल. मूळ ६० नांवांत पेंडसे हें नांव आहे व त्याची संख्या एक हजाराजवळ आहे. त्यामुळें दोहोंपैकीं कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी पेंडसे हें नांव जुनें आहे असें म्हणतां येतें.

२. व्यवसाय

पेंडसे कुलांत जोशी वृत्तीचें घराणें एकच असून तें मेटें येथील आहे. चौक व मुर्डी येथील घराण्यांप्रमाणें बरीचशीं घराणीं पूर्णपणें गृहस्थबाण्याचीं आहेत.

एकंदर घराण्यांपैकीं फक्त पांचच घराण्यांत भिक्षुकी करणारे आढळतात. त्यांची संख्या अवघी १९ आहे. या १९ पैकीं ११ कोचरें घराण्यांतील आहेत. यावरून एकंदरींत भिक्षुकी करणारीं माणसें फारच थोडीं आहेत. कुलांतील धंदेवारीचे आंकडे खालीं दिले आहेत. कोंकणस्थ समाजाबद्दल पुढें सामान्य अनुमानें काढावयास उपयुक्त व्हावें म्हणून एकाच पद्धतीनें आंकडे देणें अवश्य आहे. या दृष्टीनें परांजपे, थत्ते वगैरे कुल–वृत्तान्तांत आंकडेवार माहिती देण्याची जी पद्धति अंगीकारिली आहे त्याच पद्धतीनें येथें आंकडे दिले आहेत.

सरकारी नोकर	७४	शेतकरी, खोत इनामदार, सुखवस्तु	११४
निमसरकारी नोकर	१०		
सेवानिवृत्त	३२	भिक्षुक	१९
शिक्षक	३३	एकूण	१३३
रेल्वे-नोकर	१७	डॉक्टर–वकील	३५
खाजगी नोकर	८८	इतर स्वतंत्र धंदेवाले	३६
एकूण नोकर	२५४	व्यापारी	३७
		एकंदर स्वतंत्र धंदेवाले	१०८

एकूण ४९५

इतर कुलांचे आंकड्यांशीं तुलना करण्यासाठीं शेंकडेवारीचे आंकडे खालीं मांडिले आहेत. कांहीं व्यक्तींचे अनेक व्यवसाय असतात; त्यांपैकीं येथें एकच मुख्य व्यवसाय वर्गीकरणाचे सोईसाठीं धरिला आहे.

मुख्य धंद्याच्या दृष्टीनें शेंकडेवारी

धंदे	पेंडसे	परांजपे	थत्ते	गोळे	चितळे	जोशी	मोने	वेलणकर
नोकरी	५२	५४	५५	४९	४४	४६	२९	५०
स्वतंत्र धंदे	२१	३५	२३	२९	२५	१५	२२	२३
शेती	२२	५	१४	२२	१७	२२	२९	२१
भिक्षुकी	५	६	८	०	१४	१७	२०	६
	१००	१००	१००	१००	१००	१००	१००	१००

वर पेंडसे व्यतिरिक्त आज उपलब्ध असलेल्या ७ कुलांतील आंकडे दिले आहेत. त्यावरून पेंडसे यांचे शेतीचें व नोकरीचें प्रमाण वरच्यांतील चार कुलांप्रमाणेंच आहे. दिवसेंदिवस ब्राह्मणवर्गास सरकारी व निमसरकारी नोकरी मिळणें कठीण होत चाललें आहे. ही अडचण पेंडसे मंडळीस बरीच जाणवेल असें दिसतें. याचें कारण स्वतंत्र धंद्यांत पेंडसे यांचें प्रमाण इतर सहा कुलांचे मानानें कमी

आहे, तेव्हां कालमानाप्रमाणें यांनीं व्यापारधंद्याकडे अधिक लक्ष वळविल्यास तरणोपाय दिसतो. गोळे वगळल्यास इतरांचे मानानें भिक्षुकींत पेंडसे यांचें प्रमाण कमी आहे. तथापि यापुढें त्या धंद्यांत पडल्यास उदरनिर्वाह चालणें कठीण दिसतें.

३. शिक्षण

मुलें व विद्यार्थी यांची शेंकडेवारी

पेंडसे कुलांत लहान मुलें १६२, प्राथमिक विद्यार्थी १८४, हायस्कल विद्यार्थी १३२ व कॉलेज विद्यार्थी २६ असून एकूण मुलें व विद्यार्थी ५०४ आहेत. यांची शेंकडेवारी खालीं दिली आहे.

मुलें व विद्यार्थी	पेंडसे	थत्ते	गोळे	चितळे	जोशी	मोने	वेलणकर
लहान मुलें	३१	३०	२३	३१	३०	३६	३७
प्राथमिक विद्यार्थी	३६	३७	२८	३१	४४	४४	३९
हायस्कल विद्यार्थी	२७	२५	४२	२९	२५	१५	१९
कॉलेज विद्यार्थी	६ *	८	७	९	१	५	५
	१००	१००	१००	१००	१००	१००	१००

* औद्योगिक शिक्षण घेणाऱ्यांचा समावेश कॉलेज विद्यार्थ्यांत केला आहे.

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत थत्ते, गोळे व चितळे यांचे मानानें पेंडसे कमी आहेत. उच्च शिक्षण घेण्यास मुख्यतः सांपत्तिक स्थिति अनुकूल लागते. उपलब्ध माहितीवरून पेंडसे कुलांत ज्यांस श्रीमान् म्हणतां येईल अशांची संख्या गोळे, आपटे, गोखले वगैरेंच्या मानानें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच भरेल; व त्यामुळें उच्च शिक्षण घेतलेल्यांची संख्याहि कमी असणें स्वाभाविक आहे. विद्यमान व अविद्यमान पदवीधरांची संख्या ५६ आहे; यावरून उच्च शिक्षण किती कमी आहे हें ध्यानीं येईल. थत्ते व गोळे या कुलांत विद्यमान पदवीधर अनुक्रमें ३० व २० आहेत. हीं कुलें अल्पसंख्य आहेत त्या मानानें पदवीधरांची संख्या बरीच आहे. पेंडसे कुलांतील व्यक्तींनीं खालील पदव्या मिळविल्या आहेत.

बी. स्टार. रँग्लर	१	एम्. एस्सी.	१
एल्. एल्. एम्.	१	बी. एस्सी.	१३
एल्एल्. बी.	१७	बी. काम्.	१
एम्. ए.	१	बी. एजी.	१
बी. ए.	३२	एम्. ओ. एल्.	१
		एम्. बी. बी. एस्.	३

इंजिनिअरींगच्या पदव्या वरच्या यादींत दिसत नाहींत. एकादा दुसरा मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व मायनिंग इंजिनिअर आढळतो; . पण सर्वसाधारणरीत्या या विषयाकडे पेंडसे यांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. हल्लींच्या यांत्रिक काळांत मागें राहावयाचें नसल्यास याकडे असें दुर्लक्ष करून चालणार नाहीं. विमानविद्येसारख्या नवीन निघणाऱ्या शास्त्रांत प्रवेश मिळविल्यास उन्नतीचा मार्ग लवकर हातीं लागण्याचा संभव आहे. पेंडसे कुलांत मुंबई विश्वविद्यालयाची पदवीधर स्त्री (बी. ए.) एक आहे. स्त्रियांच्या विश्वविद्यालयाच्या जी. ए. २–३ आहेत.

शहरवासीयांस विद्येचीं साधनें सुलभ असतात, त्यामुळें त्यांच्यांत शिक्षणाची प्रगति जास्त होऊं शकते. पुढील काळांत शिक्षणाची प्रगति किती प्रमाणांत होईल याचा अंदाज बांधण्यास पुढें दिलेले, वसतिस्थानें या सदरांतील लोकवस्तीचे तुलनात्मक आंकडे बोधप्रद होतील.

४. वसतिस्थानें

सोबतच्या तक्त्यांत पेंडसे यांच्या लोकवस्तीचे आंकडे शेंकडेवारीनें दिले आहेत. आणि त्या त्या भागांतील प्रत्यक्ष आज असलेली पेंडसे यांची लोकवस्ती खालीं दिली आहे. त्यावरून महाराष्ट्रांतील कुलाबा, पुणें व रत्नागिरी या जिल्ह्यांतून पेंडसे मंडळी बरीच आहेत असें दिसून येईल. दक्षिण कानडा जिल्ह्यामध्यें कोंकणस्थांचीं निरनिराळ्या चाळीस आडनांवांचीं कुटुंबें वास्तव्य करून आहेत. त्यांत पेंडसे किंवा जामदग्न्यगोत्री कोणी नाहींत.

रत्नागिरी	१३७	सातारा	३४
पुणें	१३०	नाशिक	७
दक्षिण संस्थानें	८२	खानदेश	२२
कुलाबा	१९३	सोलापूर	१५
वऱ्हाड-मध्यप्रांत	७८	नगर	११
ठाणें	६१	इंदूर, बडोदें, हैद्राबाद वगैरे	१२२
मुंबई बेट	१०७		

एकूण ९९९

(९९९ जिवंत व्यक्ति. १४५ वसतिस्थानें)

जिवंत पुरुषव्यक्तींचें वास्तव्य ज्या गांवांमध्यें आहे, तीं गांवें पुढें अकारादि क्रमानें दिलीं असून त्यांच्यापुढें व्यक्तींचा आंकडा मांडिला आहे. कांहीं व्यक्तींचें गांव निश्चित समजलें नाहीं म्हणून त्यांचा समावेश त्यांचे मूळ गांवांत केला आहे. हीं वास्तव्याचीं गांवें सर्वांचीं कायमचीं नसून नोकरी, धंदा किंवा विद्याभ्यास यांसाठीं कांहीं व्यक्ति आज त्या त्या गांवीं आहेत असें समजावें. ९९९ जिवंत व्यक्ति १४५ गांवांत आहेत. पुणें व मुंबई येथें अधिक संख्या आढळते. प्रत्येक व्यक्तीचें राहण्याचें गांव वंशावळींत दाखविलें आहे.

कोंकणस्थांची प्रांतवार लोकसंख्या

प्रांत	संख्या हजारांत	एकंदर कों. ची शें. वारी वस्ती	पेंडसे शेंकडेवारी	थत्ते शेंकडेवारी	गोळे शेंकडेवारी	चितळे शेंकडेवारी	जोशी शेंकडेवारी	मोने शेंकडेवारी	वेलणकर शेंकडेवारी
रत्नागिरी	२८	२०	१३	१९॥।	५॥	२८।	१०॥।	२३	२३॥
पुणें	२१।	१५	१३।	११॥	३०	१३।	७॥।	२।	९
दक्षिण संस्थानें	१८	१३	८	२	०	१।	०	०	५
कुलाबा	१३॥	१०	१९।	२।	-॥-	३।	४८॥	१९॥।	६
वऱ्हाड-मध्यप्रांत	१२	८॥	८	९॥	१६	१२।	१॥	५	५
ठाणें	९	६॥	५॥।	३।	९॥	२॥	५॥	१०॥।	५
मुंबई बेट	६॥	४॥	११	९॥।	१०	१०॥	१८।	४	२६
सातारा	६	४।	३॥	३	३	८॥	-॥-	०	६
नाशिक	४	३	·॥।·	८॥	४॥	१।	-॥।-	१।	०
खानदेश	४	३	२।	४	२	३।	-॥।-	०	१॥
सोलापूर नगर	३। १॥	२। १	१॥ १।	३॥	०	१॥	-॥-	१०॥।	३॥
इंदूर, बडोदें, हैद्राबाद व इतर	१३	९	१२॥	२३	१९	१४।	५।	२३।	९॥
	१४० स्त्री व पुरुष	१००	१००	१००	१००	१००	१००	१००	१००

अकलूज	२	गर्डाहिंग्लज	३	पालघर	४
अकोला	१६	गणशवाडी	४	पाळें	१
अडखल	५	ग्वाल्हेर	१	पुणें	१२०
आंबवली	१	गिम्हवणें	८	पुलगांव	१
अलाहाबाद	१	गुलबर्गा	२	पेडणें	१
अलीबाग	२	गुळधुवें	५	पेण	२
अहमदनगर	९	गोरेगांव	९	पोलादपूर	३
अहमदाबाद	३	गंगरवा (गुजराथ)	१	बडनगर (ग्वाल्हेर)	८
आगाशी	३	चिपळूण	५	बडोदें	३२
आजरें	७	चेंबूर	१	बार्शी	५
आंजर्लें	५	चौक	१६	बिरवाडी (महाड)	६
आंवळेगांव	४	जत	२	बिरवाडी (शेखाची)	११
आवास	४	जबलपूर	१	बुरंबाड	२
इचलकरंजी	३	जळगांव	४	बेळगांव	२
उगार	५	जमखिंडी	२	बेलापूर	२
उमरावती	२०	जोरार (रांची)	२	बैलहोंगळ	२
उरण	१	ठाणवी	१	भिवंडी	१
औंढा-नागनाथ	१	ठाणें	२४	भुसावळ	३
औरंगाबाद	१	डभोई (गुजराथ)	३	भेलसा (ग्वाल्हेर)	२
इंदूर	१०	डुमरा (कच्छ)	१	महाड	२
करंजगांव	२	तळें	११	मंडणगड	२
कराची	४	तारळें	९	माखजन	१
कलकत्ता	१	दहिसर	१	माणगांव	२
कल्याण	९	दादर	४०	मिरज	५
कवळें	८	दापोली	५	मुर्डी	२६
काशी	१	दारेसलाम (पू.आफ्रिका)	६	मुरुड (जं.)	१९
कासेगांव	३	दिवें-आगर	३	मुंबई	८०
किवळें	३	दौंड	१	मेटें	११
कुर्ला	३	धामणी	१३	मेहकर	५
केळशी	४	धामापूर	९	मोर्डालिंब	१
केंब्रिज	१	धुळें	१४	मुरेना (ग्वाल्हेर)	१
कोठिंबें	३	धोत्रा-मोहोर	३	यवतमाळ	१३
कोडोली	१	नागपूर	३७	रत्नागिरी	१
कोरेगांव	१	नागोठणें	२	रांची (बिहार)	१
कोल्हापूर	६	नांदगांव	५	रेवदंडा	१९
खातेगांव (इंदूर)	४	नांदिवडें	४	रोहें	५
खानापूर	१	नाशिक	६	लक्ष्मेश्वर	३
खालापूर	१	पनवेल	४	लंडन	१
खेड	२०	परळ	२	वाडखोल	२
खोचिवडें	१	पाथरडीही (बिहार)	३	वणी	१
खोपी	२	पारोळें	१	वरसई	२

वाडें	११	श्रीवर्धन	२३	संकेश्वर	५
वावशी	५	साखरवाडी	३	हरीपूर	८
विजापूर	५	सांखळी	२	हाशिवरें	१
विटें	३	सांगली	१७	हिंगणघाट	३
विलेपारलें	१	सातारा	१६	हुबळी	४
वेणगांव	४	सांवतवाडी	१	हैद्राबाद (दक्षिण)	१
वेरळ	७	सासवनें	३	१४५	९९९
शिरवली	१	सोलापूर	८		

पुणें व मुंबई येथें अधिक संख्या आहे असें वर सांगितलें. ही सर्व वस्ती बहुधा नोकरीधंद्यानिमित्तानें तात्पुरती आहे. मुंबईस एकहि कुटुंब स्वतःचें घर बांधून राहिलेलें आढळत नाहीं. पुण्यास १२० पुरुषव्यक्ति आहेत, म्हणजे पुरुष-स्त्री मिळून २४० माणसें आहेत. यांत ज्यांचीं स्वतःचीं घरें आहेत अशीं फक्त ८ कुटुंबें आहेत. यावरून कुलांतील व्यक्तींच्या सांपत्तिक स्थितीचें थोडेसें दिग्दर्शन होईल.

५. वयोमान

जिवंत व्यक्तींचे वयोमानाचे आंकडे पुढें दिले आहेत. इतर कुलांतील आंकड्यांशीं त्यांची तुलना करण्याकरितां शेंकडेवार आंकडेहि मांडिले आहेत.

जिवंत व्यक्ति, जिवंत जनक, जिवंत आजे व पणजे यांचे पेंडसे कुळांतील प्रत्यक्ष आंकडे व जिवंत व्यक्तींशीं जनक व आजे यांचें शेंकडा प्रमाण पुढीलप्रमाणें:—

	पेंडसे		चितळे	जोशी	मोने	थत्ते	गोळे	वेलणकर
	प्रत्यक्ष आंकडे	शें. प्रमाण	शेंकडा प्रमाण					
जनक	२५१	२५·७	२६·७	२४·१	२७·७	२९	२६	२२·८
आजे	२७	२·१	३·२	२·८	३·५	३·३	३	२·७

पेंडसे कुलांत एकहि जिवंत पणजोबा नाहीं. चितळे व थत्ते कुलांत प्रत्येकीं एक आढळला.

पेंडसे कुलांतील बहुतेक विद्यमान पुरुषांचे जन्मकाल या पुस्तकांत आले आहेत. त्यावरून पिढी किती वर्षांची धरावी हें ठरवितां येतें. बापलेकांच्या जन्मकालांतील अंतर म्हणजे पिढी, अशी व्याख्या गृहीत धरून व या पुस्तकांतील सुमारें २५० आंकडे घेऊन सरासरी मान काढलें; तेव्हां तें ३१·७ वर्षें आलें. चितळे (जोशी व मोने धरून), थत्ते व गोळे या कुलांतील हे आंकडे अनुक्रमें ३३, २९ व ३३ असे आहेत. दिवसेंदिवस वधूवरांचे विवाहाची वयोमर्यादा वाढत चालली असल्यामुळें पिता व पुत्र यांचे वयांतील अंतर जास्त होऊं लागलें आहे. त्यामुळें वर दिलेलें सरासरीचें मान यापुढें टिकेल असें नाहीं.

पेंडसे कुलांत विद्यमान पुरुषव्यक्ति ९९९ आहेत. शिरगणतीचे आंकडे पाहिले असतां त्यामध्यें पुरुषांच्या इतकीच स्त्रियांची संख्या सामान्यतः आढळते. यावरून

वयवारीचे आंकडे

वय	पेंडसे व्यक्ति संख्या	पेंडसे शेकडा प्रमाण	गोळे शेकडा प्रमाण	थत्ते शेकडा प्रमाण	चितळे शेकडा प्रमाण	जोशी शेकडा प्रमाण	मोने शेकडा प्रमाण	वेलणकर शेकडा प्रमाण
०– ५	१६२	१५	१२	१५	१५	१३	१६	१७
६–१०	१२५	१२	१३	१३	१३	१२	१६	१४
११–१५	१२३	१२	१३	९	११	११	९	११
१६–२०	८९	९	११	९	१०	९	८	५
२१–२५	७६	८	७	८	१०	१३	६	९
२६–३०	७०	७	५	११	६	१२	८	६
३१–३५	६५	७	१०	८	८	७	६	८
३६–४०	७३	७	६	५	६	५	६	५
४१–४५	५०	५	४	५	५	४	५	८
४६–५०	५५	६	६	५	४	४	४	६
५१–५५	२९	३	४	३	३	२	४	४
५६–६०	२६	३	३	३	४	२	५	२
६० च्यावर	५६	६	६	६	५	६	७	५
	९९९	१००	१००	१००	१००	१००	१००	१००
६१–६५–२० } ५६								
६६–७०–२४								
७१–७५– ५								
७६–८०– ५								
८१–८५– २								

पेंडसे कुलांतील जिवंत व्यक्तींचें सरासरी आजचें वयोमान २६.२ पडतें तें वेलणकर यांचें सरासरी २५ येतें.

आज पेंडसे कुलांत जिवंत स्त्रीव्यक्तींची संख्या सुमारें एक हजार असून स्त्री व पुरुष मिळून सुमारें दोन हजार संख्या आहे. कोंकणस्थब्राह्मणसंख्या सुमारें १ लक्ष ४० हजार आहे. म्हणून प्रत्येक ७० व्यक्तींत १ पेंडसे आहे असें ठरतें. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या कोंकणस्थांच्या कुलवृत्तान्तांवरून असें दिसतें कीं, एकंदर संख्येच्या एक नवमांशाची माहिती प्रसिद्ध झाली आहे. त्यांत पेंडसे कुलांतील दोन हजारांची भर या वृत्तान्तानें पडत आहे. म्हणजे एकंदर समाजांतील एक अष्टमांश व्यक्तींची माहिती आज प्रसिद्ध झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा अष्टमांश, कोंकणस्थ ज्ञातीविषयीं सामान्य अनुमानें काढण्यास शितावरून भाताची परीक्षा करितात त्याप्रमाणें समाजशास्त्रज्ञांस उपयोगी पडेल.

कुलदेवता

पेंडसे कुलांतील सर्व घराण्यांचा कुलस्वामी अगर कुलदेवता एक नाहीं. निरनिराळीं घराणीं निरनिराळे कुलस्वामी मानितात. चारपांच घराणीं श्रीआदित्यनाथ यास, तीन लक्ष्मीनारायणास व इतर घराण्यांपैकीं कोणी लक्ष्मीकेशव, कोणी कीर्तिकेशव, कोणी केशवराज व कोणी वाडेश्वर यास कुलस्वामी मानितात.

कुलदेवतेच्या बाबतींत जरी एकवाक्यता नसली तरी कुलस्वामीविषयीं जितका मतभेद दिसतो तितका या बाबतींत दिसत नाहीं. कोंकणस्थांतील अनेक कुलांप्रमाणें बहुतेक घराणीं यो(जो)गेश्वरी हीस कुलदेवता मानितात. योगेश्वरीचे जोडीला किंवा स्वतंत्रपणें कांहीं मंडळी महालक्ष्मीस कुलदेवता म्हणतात. कोचरें घराणें भाव्यै (भावेश्वरी) हीस मुख्य कुलदेवता मानितें व तिचे जोडीस योगेश्वरीसहि तें मानितें.

आदित्यनाथ हें सूर्याचें नांव आहे. सर्व ग्रंथांत सूर्याचे पत्नींची संख्या एकच दिली नाहीं. कोठें एक व कोठें दोन तर कोठें तीन किंवा चारहि सांगितल्या आहेत. त्यांचीं नांवें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं दिलीं आहेत. तीं म्हणजे राज्ञी, निक्षुभा, सवर्णा, छाया, सुवर्चसा, द्यौ व संज्ञा हीं होत. जेथें दोन पत्नींचा उल्लेख आहे तेथें राज्ञी व निक्षुभा हीं नांवें सांगितलीं आहेत. श्रीआदित्यनाथाचें स्थान हें रत्नागिरी जिल्ह्यांतील नेवरें येथें आहे; व तेथें पूर्वी पेंडसे यांचें वास्तव्य होतें असें सिद्ध झालें असल्यामुळें तेथील आदित्यनाथ पेंडसे यांचा कुलस्वामी होय. नेवरें येथील ग्रामदेवता हीच आहे. देवालय बरेच वर्षांपूर्वींचें आहे. सध्यां असलेली मूर्ति भंगल्यामुळें नवीन मूर्तीची स्थापना ग्रामस्थ मंडळी लवकरच करणार आहेत. नवीन मूर्ति बडोद्याचे प्रसिद्ध शिल्पकार कोल्हटकर यांनीं तयार केली आहे. या गांवांतील इतर देवता वरदाय, मानाई, धरणकरीण, पावणाई, बीर, भूमकारीण व चंडिका ह्या आहेत. रत्नागिरी तालुक्यांतील गांवडें-गुळें, सांडें-लावगन व वाटद या गांवींहि आदित्यनाथाचीं देवालयें आहेत. वेंगुर्लें तालुक्यांतील आजगांव येथेंहि आदित्यनाथाचें देवालय आहे असें कळतें. लक्ष्मी-केशवाचें देऊळ रत्नागिरीजवळ कोळीसरें येथें आहे व वाडेश्वराचें गुहागरला आहे.

योगेश्वरीचें मूलस्थान कोठें आहे हें निश्चित कोणास माहीत नाहीं. त्यामुळें कांहीं लोक बीड जिल्ह्यांतील आंबें येथील जोगाई हीच कुलदेवता असावी असें म्हणतात. आंबें हें गांव कोंकणांत नसून घाटावर देशांत आहे. कोंकणस्थांचें वास्तव्य अनेक शतकें कोंकणांत असल्याचें दिसतें; त्यामुळें इतक्या दूरच्या देवीस ते आपली कुलदेवता मानतील असें समजणें बलवत्तर पुराव्याशिवाय योग्य होणार नाहीं. कोंकणांत जोगेश्वरीचें स्थान कोठेंच नसतें तर देशावरील स्थान हें आदिस्थान मानणें प्राप्त होतें. परंतु आडिवरें, टोळवाडी, असगणी, महाड व अंधेरी-जवळील जोगेश्वरी या कोंकणांतील ठिकाणीं योगेश्वरीचीं स्थानें आहेत. आडिवरें येथें योगेश्वरीची स्थापना फार जुनी म्हणजे शक ११०० मधील आहे. त्या वेळीं तिची स्थापना श्रीशंकराचार्यांनीं केली. शक १२०० अखेर मूर्ति जीर्ण झाली म्हणून तिच्याऐवजीं महाकाली, रवळनाथ व महासरस्वती यांच्या मूर्ति आणून बसविल्या. टोळवाडी येथील योगेश्वरीचें देऊळहि ३–४ शें वर्षांपूर्वींचें आहे.

महालक्ष्मीचें मुख्य स्थान कोणी केळशी व कोणी कोल्हापूर मानितात. ही देवता मानणारीं बरींचशीं घराणीं मूळ केळशीचीं असल्यामुळें तेथील देवीच त्यांची कुलस्वामिनी असावी. देवतेच्या मूलस्थानाचें विस्मरण झाल्यावर कोल्हापूरची देवी महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध असल्यामुळें तेंच आपल्या देवतेचें मूलस्थान असेल असें स्वाभाविकपणें वाटणें शक्य आहे. विठ्ठलनामाबरोबर पंढरपूर व विश्वनाथ म्हटल्याबरोबर काशीक्षेत्र यांची जशी आठवण आपणांस होते, त्याप्रमाणें महालक्ष्मी म्हटल्याबरोबर कोल्हापूर डोळ्यांसमोर उभें राहातें म्हणून कांहीं मंडळी कोल्हापूर हें गांव सांगत असावेत. भाव्यै देवीचें स्थान वेंगुर्लें तालुक्यांतील कोचरें हें आहे. ही त्या गांवची ग्रामदेवता आहे. श्रीआदित्यनाथ व जोगेश्वरी यांचीं छायाचित्रें पुस्तकारंभीं दिलीं आहेत. श्री भावेश्वरीचें छायाचित्र पृ. ६८ वर व श्रीतुळजा भवानीचें पृ. ३६२ वर दिलें आहे.

कुलाचार

सर्वसाधारण कुलाचार म्हटले म्हणजे देवदिवाळीस कुलस्वामी व कुलदेवतेस, तसेंच ग्रामदेवतेस नैवेद्य दाखविणें, वार्षिक वा कार्यविशेषीं बोडण भरणें व शारदीय नवरात्रांत दिवा व माळ असणें, हे आहेत.देशावर आल्यावर कांहीं मंडळींनीं खंडोबा व व्यंकटेश (बालाजी) हे नवशिक देव स्वीकारले आहेत.भक्त तसा देव या न्यायानें कोंकणस्थांचे देव व कुलाचाराची पद्धति हीं दोन्हीहि त्यांचे परिस्थितीस अनुसरून गरिबीचींच आहेत. देशावरील लोकांत आढळणारे अधिक खर्च लागणारे कुलधर्म व शारदीय नवरात्रांतील उत्सव वगैरे गोष्टी कोंकणस्थांत फारशा आढळत नाहींत. सामान्य कुलाचार या प्रकारचे असले तरी निरनिराळ्या घराण्यांतून कुलाचारांत थोडाफार फरक आढळून येतो. याचें मुख्य कारण मूळ ठिकाण सुटल्यावर वास्तव्याचीं निरनिराळीं झालेलीं स्थानें हें होय. कांहीं बाबतींत घराण्यांतील वडील पिढी, विशेषतः स्त्रिया, नवीन पिढी संसाराचा बोजा अंगावर घेण्यापूर्वीं

नाहींशी होणें हेंहि कारण असूं शकेल. कुलाचाराबद्दल प्रश्न-पत्रिकेंत माहिती विचारली असतां एका गृहस्थानें असें सांगितलें कीं, "चालू गाडा ढकलण्याची पंचाईत असल्यानें मागील माहिती काढून कोंकणांतील नसतीं कुलंगडीं उत्पन्न करून अंगाशीं लावून घेण्यास सवड नाहीं." यावरून दारिद्र्य हेंहि एक सर्वसामान्य कारण आहे असें म्हणतां येईल.

पेंडसे हे जामदग्न्य आहेत. प्रसिद्ध जमदग्निपुत्र व विष्णूचा सहावा अवतार परशुराम हा त्यांच्याच कुलांतील आहे. तथापि पेंडसे कुलांत तो कुलस्वामी मानला जात नाहीं; इतकेंच नव्हे तर, चितळे वगैरे इतर कांहीं कोंकणस्थ मंडळींप्रमाणें परशुरामजयंतीचा उत्सवहि विशेष प्रकारें कोणी करीत नाहीं; व देवदिवाळीस त्यास कोणी नैवेद्यहि दाखवीत नाहीं. ही एक विशेष लक्षांत येण्यासारखी गोष्ट आहे. परशुरामाचीं देवळें असणाऱ्या गांवीं म्हणजे देवाचें गोठणें, चिपळूण (श्रीक्षेत्र-परशराम) व आडें या गांवीं पेंडसे यांचें वास्तव्य अलीकडे नसावें असेंहि अनुमान त्याच्यावरून निघूं शकेल.

शरीरसंबंध

पेंडसे यांचे इतर घराण्यांशीं लग्नव्यवहारामुळें झालेल्या अंदाजें १३५० शरीरसंबंधांची माहिती या पुस्तकांत आली आहे. कोंकणस्थांत टिळकपंचांगांतील यादीप्रमाणें ३१० आडनांवें आहेत. पेंडसे यांचें गोत्र जामदग्न्य आहे, त्यामुळें धर्मशास्त्रदृष्ट्या यांचा शरीरसंबंध जामदग्न्य व वत्सगोत्रीय लोकांशीं होत नाहीं. या दोन गोत्रांचीं २५ आडनांवें सोडून देतां बाकी राहिलेल्या २८५ आडनांवांशीं यांचें शरीरसंबंध होणें शक्य आहे. तथापि फक्त १७५ आडनांवांशींच संबंध झालेले दिसतात. याचें कारण कदाचित् कांहीं आडनांवें आज अस्तित्वांत नसतील किंवा फारच अल्पसंख्य असतील. सर्व आडनांवांचे लोकांशीं सारखेच संबंध झाले नाहींत. संबंध जवळपास राहणारे लोकांशीं जास्त होतात हें जरी खरें असलें, तथापि ज्या आडनांवांचे लोकांची संख्या जास्त, त्यांच्याशीं संबंध अधिक होणें स्वाभाविक आहे. जास्त संबंध झालेलीं २० आडनांवें पुढें दिलीं आहेत. हीं आडनांवें कोंकणस्थांत बहुसंख्य असावींत. जोशी हें नांव वृत्तिवाचक असल्यामुळें सोडून दिलें तरी हें अनुमान गोखले, परांजपे, आपटे व बर्वे यांचे प्रसिद्ध झालेले कुलवृत्तान्तांवरून खरें ठरतें.

जोशी	१४९	दामले	२९	ओक	२०
गोखले	५५	गोडबोले	२६	बर्वे	२०
केळकर	४४	फडके	२४	दांडेकर	१९
परांजपे	३५	आपटे	२२	पटवर्धन	१९
साठे	३३	रानडे	२२	फाटक	१९
वैद्य	३०	दातार	२१	सोमण	१९
सहस्रबुद्धे	३०	मराठे	२१		

खालील उपनांवांचे लोकांशीं पेंडसे यांचे शरीरसंबंध झाले आहेत. परंतु हीं उपनांवें पंचांगांत दिलीं नाहींत. यावरून पंचांगांत दिलेल्या यादींत सर्व आडनांवांचा समावेश झाला नसावा किंवा कोंकणस्थांत अद्यापिहि नवीन नांवें रूढ होत असावींत.

ओजळे	ढबू	पंडित
उत्तूरकर	दीक्षित	पुराणिक
गैलाड	नरगुंदे	फडणीस

वर सांगितलेले शरीरसंबंध पूर्वपरंपरागत रुढीस धरून झालेले आहेत. त्याप्रमाणें कऱ्हाडे व देशस्थ या महाराष्ट्र ब्राह्मणांतील पोटजातींशीं शरीरसंबंध झाल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत. रूढ पद्धतीविरुद्ध झालेले विवाहांत स. १८७४ त कृष्णाजी गोविंद (२१–४) यांनीं केलेला पुनर्विवाह हा पहिला होय. याच गृहस्थाचा दुसरा पुनर्विवाह स. १८८० त झाला. पुनर्विवाह केलेल्या तीन व्यक्ति सध्यां विद्यमान आहेत. यांपैकीं एक विवाह कान्यकुब्ज ब्राह्मणविधवेशीं झालेला आहे.

वर उल्लेखिलेल्या विवाहांत वधूवर ब्राह्मणजातीचे आहेत. इतर प्रांतीय ब्राह्मणांशीं झालेल्या विवाहाचें एक उदाहरण आहे. तें म्हणजे एका स्त्रीचा आंध्र ब्राह्मणाशीं झालेला शरीरसंबंध हें होय. ब्राह्मणेतरांशींहि शरीरसंबंध झालेला आहे. त्यांतील वर पेंडसे असून वधू पाठारे प्रभूज्ञातींतील आहे.

जुनीं व नवीं नांवें

या पुस्तकांत आलेल्या व्यक्तींचीं नांवें तपासलीं तर त्यांत पूर्वजांचें नांव पुनः पुनः ठेवण्याची प्रथा पूर्वीं होती असें दिसतें. परंतु हल्लीं ती चाल मोडत चालली असून परप्रांतीय व विशेषेंकरून बंगाली पद्धतीचीं नांवें ठेवण्याची आवड दिसून येते. ९९९ विद्यमान व्यक्तींत निरनिराळीं १२३ नांवें आढळतात. यांपैकीं ४२ नांवांची प्रत्येकीं एकेकच व्यक्ति आहे. उलट दत्तात्रेय या एका नांवाच्या ४१ व्यक्ति आहेत. यावरून हें नांव या शतकांत फार प्रचलित झालेलें दिसतें. गेल्या शतकांत पेंडसे-कुलांत फक्त एकच 'दत्ताजी' आढळतो. थत्ते, मोने व परांजपे या कुलांत पेंडसे कुलाप्रमाणेंच या दत्तात्रेय नांवानें पहिला क्रमांक मिळविला आहे. यावरून अलीकडच्या शेंसवाशें वर्षांत दत्तोपासनेकडे लोकांचा अधिकाधिक कल वळत चालला आहे हें उघड दिसतें. जिवंत व्यक्तींतील बहुसंख्य १८ नांवें खालीं दिलीं आहेत.

नांव	संख्या	नांव	संख्या	नांव	संख्या
दत्तात्रेय	४१	रामचंद्र	२८	रघुनाथ	२२
नारायण	३४	चिंतामणि	२५	विश्वनाथ	२२
विष्णु	३२	मोरेश्वर	२३	महादेव	२१
गणेश	३१	वसंत	२३	अनंत	२०
विनायक	३०	कृष्ण	२२	वामन	२०
गोविंद	२९	प्रभाकर	२२	शंकर	२०

पेंडसे–कुलांत पूर्वीं रूढ असलेलीं खालील नांवें विद्यमान व्यक्तींत दिसत नाहींत.

कडंभट	तुकदेव	बाजी	वाग्भट
काशीभट	दाजी	बाबल	वीरेश्वर
कोंडदेव	दादंभट	भांबा	शामभट
खंडो	बचाजी	मल्हारी	साबाजी
गबाभट	बजाजी	मुरारी	
चिमणाजी	बहिरव	म्हादोराम	
जीवभट	बळिराम	यज्ञेश्वर	

समारोप

पेंडसे कुलाबद्दल उपलब्ध माहिती व त्यावरून सुचणारे कांहीं विचार आतांपर्यंत सांगून झाले. पहिल्या (प्रयोजन) प्रकरणांत म्हटल्याप्रमाणें कुलवृत्तांताचे एक ऐतिहासिक व दुसरा परिचयात्मक असे दोन विभाग पडतात. पहिल्या विभागांतील भूतकालीन अनुभवाचा उपयोग भविष्यकाळांत पाऊल टाकतांना व्हावयाचा असतो. कुलवृत्तांतांत फक्त लोकोत्तर व्यक्तींचाच निर्देश करावयाचा नसून कुलांतील सर्व लहानथोर व्यक्तींचा समावेश करावयाचा असतो. लोकोत्तर व्यक्तींचीं चरित्रें त्यांच्या उत्कट गुणांमुळें स्वतंत्ररीत्या प्रसिद्ध होतातच. त्या त्या कुलाचा कुलवृत्तांत प्रसिद्ध होईपर्यंत तीं थांबत नाहींत. यामुळें भीष्म, कर्ण, पुंडलिक, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, श्रीमंत रमाबाई पेशवे, अहिल्याबाई होळकर, न्या. रानडे, सार्वजनिक काका, लो. टिळक, म. गांधी व सेनापति बापट यांसारख्या फक्त थोर व्यक्तींचीं चरित्रें अशा पुस्तकांत वाचण्याची कोणीहि अपेक्षा करणार नाहीं. असें जरी असलें तरी 'पिंडीं तें ब्रह्मांडीं' असावयाचेंच. या न्यायानें लहान प्रमाणांत का होईना अनुकरणीय गुणांच्या व्यक्ति यांतहि अनेक आढळतील. प्रकरण ४ मध्यें ऐतिहासिक कालांतील कागदपत्रांची पाहणी करितांना त्या कालांतील गुणवैशिष्टयानें युक्त अशा व्यक्तींचा उल्लेख येऊन गेलेलाच आहे. प्रस्तुत ठिकाणीं त्याच्या अलीकडील काळांतील अशा व्यक्तींच्या गुणांचें नुसतें दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे.

दारिद्र्याशीं टक्कर देऊन स्वावलंबनानें विद्यार्जन करून होणारा विद्वान्, स्वतःस विद्यार्जनासाठीं पडलेल्या कष्टांची आठवण ठेवून इतरांस त्या कामीं साहाय्य करणारा, परदेशांत जाऊन विद्येंत उच्च प्रतीचा मान मिळविणारा, विश्वविद्यालयाच्या सर्व परीक्षांत मिळविण्यासारखीं सर्व पारितोषिकें व शिष्यवृत्त्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मिळविणारा विद्यार्थी, कर्तृत्वानें लहान नोकरीवरून त्यांतील उच्चतम पदास पोंचणारा, कुळकथा लिहून ठेवणारा इतिहासप्रेमी, सर्व आयुष्यांतील व्यवहाराची दैनंदिनी व्यवस्थित लिहून ठेवणारा, पैन्‌पैचा जमाखर्च ठेवणारा हिशेबी, गुजराथी कापडबाजारांत महाराष्ट्रीयांचें पहिलें दुकान उघडणारा व्यापारी, श्रीमंती असतांहि दुर्व्यसनास बळी न पडतां तालीम करून शरीर उत्तम

राखणारा व्यायामप्रेमी, गारद्यानें मारण्याकरितां उगारलेला जंबीयाचा हात वरचेवर डावे हातानें धरून तो दाबून त्यांतून रक्ताची चिळकांडी उडविणारा सामर्थ्यवान्, राजपुत्राचा घोडा अडवून त्यास मानपत्र घेण्यास भाग पाडणारा धाडशी, गरिबी पत्करली पण ऋण नको अशा ब्रीदाचा संसारी, सर्व आयुष्यांत कधींहि शेजाऱ्यांकडे उसनें न मागणारी गृहिणी, आपले कुलांतील वतन जामात मागत असतांहि कन्याप्रेम बाजूस सारून तें स्वकुलांतील दायादास देणारा कुलाभिमानी, निपुत्रिक बांधवास परलोकांत सद्गति प्राप्त व्हावी म्हणून स्वपुत्रदान (दत्तक) देणारा स्वकुल–प्रेमी, मुळशी सत्याग्रहांत व असहकारितेच्या चळवळींत आनंदानें कारावास पत्करणारा तरुण, वंगभंगाचे चळवळीपासून निष्ठेनें स्वदेशी व्रत पाळणारा वृद्ध, तारुण्यसहज नटवेपणाचा मोह आवरून शुद्ध खादी परिधान करणारी तरुण पत्नी, चालत आलेली सरकारी नोकरी देशाभिमानानें नाकारणारा तडफदार, सेवाधर्म पत्करिला असतांहि देशाभिमान जागृत ठेवून तत्पोषक साधनांत मनापासून भाग घेणारा अधिकारी, सतत ३६ वर्षें असलेलें गांजाचें व्यसन मातेची आज्ञा पाळावी म्हणून तिचे पायांवर हात ठेवून एकदम कायमचें सोडणारा दृढनिश्चयी मातृभक्त, नित्य प्रातःकाळीं वडिलांचे चरणांवर मस्तक ठेवणारा व त्यांचें नियमानें पादसंवाहन केल्याशिवाय न निजणारा पितृभक्त, आप्तेष्टांचे विरोधास न जुमानतां याचकास मागशील तें देईन असें छातीठोक सांगणारा उदार, ऋणकोनें कर्ज परत न केलें तरी मनाच्या मोठेपणानें न्यायालयाची पायरी न चढणारा कनवाळु, स्वखर्चानें गरिबांस घरें बांधून देणारा व गरिबांचीं लग्नें लावून देणारा दानशूर, आपले उत्पन्नांतून नियमितपणें आयुष्यभर एक अष्टमांश दानधर्माकरितां खर्च करणारा धार्मिक, दरसाल नियमानें शंभर ब्राह्मणांस पंचपक्वानांचें भोजन देणारा तसेंच सहस्रभोजन घालणारा अन्नदाता, नित्यनैमित्तिक कर्माचा लोप होऊं नये म्हणून आधुनिक कालांतील आगगाडीसारख्या सुखसाधनांचा त्याग करून बैलगाडीनें काशीयात्रा करणारा कर्मनिष्ठ, इंग्रजी शिक्षणानें आचारविचार बिघडतात म्हणून त्या शिक्षणापासून मिळणाऱ्या फायद्यांचा लोभ न धरतां मुलांस इंग्रजी न शिकविणारा आचारनिष्ठ, सरकारांतून देवालयाप्रीत्यर्थ स्वतःला मिळालेलें वर्षासन स्वकुलांत न ठेवितां दुसरे कुलांतील मनुष्याचे नांवानें करून देणारा निर्लोभी, पूर्व काळाप्रमाणें आयुष्याचे उत्तरार्धांत आजोबा ते नातू अशा लागोपाठ तीन पिढ्यांतील संन्यासाश्रम पत्करणाऱ्या वैराग्यशील व्यक्ति, अल्पवयी तीन चार मुलें पारावर ठेवून पतीबरोबर सहगमन करणारी सती, विवाहानंतर एक महिन्याचे आंत पति मृत झाला असतां सर्व आयुष्य सदाचरणांत घालविणारी साध्वी, आयुष्यभर कोरान्न मागून भागवतधर्माचा प्रचार करणारा सत्पुरुष, 'अंतकालेच मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्' या गीतेंतील वचनाप्रमाणें अंतकाळीं आप्तेष्टांचा निरोप घेऊन सावधानतेनें नामस्मरणांत देह ठेवणारा ईश्वरभक्त, पूर्ववयांत वैराग्यसंपन्न होऊन चतुर्थाश्रम पत्करणारे स्वामी, यांसारखीं अनेक आदर्शभूत उदाहरणें सांगतां

येतील. या व्यक्तींच्या चारित्र्यांत कुलबंधूंना अनेक गोष्टी मननीय आढळतील व त्यांतून शक्त्यनुसार चांगला भाग आचरणांत आणण्यास त्या कित्यासारख्या उपयोगी पडतील. हा या विभागाचा फायदा म्हणतां येईल.

दुसरा विभाग म्हणजे परिचयात्मक भाग होय. हा वर्तमानकालीन असल्या-मुळें त्याचा उपयोग सद्यःस्थितींत कसा करून घ्यावयाचा हा प्रश्न विचारार्ह आहे. या बाबतींत अनेक सूचना असूं शकतील. परंतु कांहीं थोडयांचा येथें नामनिर्देश केला आहे. मोठया स्वार्थत्यागावर उभारलेल्या योजना सर्वकाळ टिकत नाहींत व सर्वांस आचरणांत आणतांहि येत नाहींत. म्हणून स्वार्थाची हानि न होतां परार्थ (कुलार्थ) साधतां येण्यासारख्या सूचनांचाच उपयुक्ततेच्या दृष्टीनें विचार करणें योग्य होय. "एकमेकां साहाय्य करूं, अवघे धरूं सुपंथ" या वचनांतील सहकारी तत्त्वाचाच अवलंब करणें योग्य होईल.

इतर सर्व समाजाप्रमाणे पेंडसे हे खेडीं व शहरें या दोन्ही भागांत आहेत. या पुस्तकांतील माहितीवरून कोण कोठें असतो, काय व्यवसाय करतो वगैरे कळेल. त्या माहितीचा उपयोग सद्यःस्थितींत शक्य तितका करून घेतल्यास ती एकत्रित केल्याचें कांहीं सार्थक झालें असें म्हणतां येईल. सध्यांचे यांत्रिक युगांत खेडे-गांवची वस्ती मोडून शहरांची वाढ होणें क्रमप्राप्त आहे. शहरांत रहाण्यापासून जसे कांहीं फायदे असतात तशाच कांहीं अनिष्ट गोष्टीहि पदरांत पडतात. म्हणून 'खेडेगांवीं परत चला' अशा तऱ्हेची घोषणा अलीकडे होऊं लागली आहे. खेडे-गांवांत पोट भरत नाहीं व शहरांत आरोग्य राहत नाहीं असा अनुभव आहे. या अडचणीचा परिहार करण्याचा मध्यम मार्ग म्हणजे उद्योगधंदे शहरांत करावे परंतु वर्षांतून कांहीं काल खेडेगांवीं घालवावा हाच दिसतो. मुंबई पुण्यासारख्या ठिकाणीं पुष्कळ मंडळी कोंकणांतून येऊन राहिली आहे. त्यांतील बरेचजणांचें कोंकणांत आतां घरदार राहिलेलें नसल्यामुळें त्यांना जरी थोडीफार वेळेची फुरसत मिळाली तरी शहर सोडून कोठें जातां येत नाहीं व खेडेगांवचे रहाणीचा आरोग्यदृष्टचा फायदा घेतां येत नाहीं. खेडेगांवांत शिक्षणाची सोय नसल्यामुळें व शहरांत शिक्षणाकरतां मुलें कोठें ठेवावयाची व्यवस्था नसल्यानें खेडयांतील मुलें शिक्षणांत मागें राहतात व आजकालचे धकाधकीचे मामल्यांत त्यांचा टिकाव लागणें अशक्य होतें. नगरवासी व ग्रामवासी लोकांच्या अशा अडचणींचा विचार करून शहरवासियांनीं आपले कुलबंधूंकडे खेडयांत कांहीं दिवस राहावयास जावें व परतफेड म्हणून त्यांचे मुलांस विद्यार्जनासाठीं शहरांत आणावें ही सूचना कांहींजणांस विचारार्ह वाटेल. यांत परस्परांची सोय, आपले कुलबंधूंस साहाय्य व कुलाचे अभ्युदयास मदत होईल.

प्रत्येक स्वतंत्र राष्ट्र स्वतःच्या देशांतील उद्योगधंद्यांस संरक्षण देऊन राष्ट्र-संवर्धनास मदत करतें. त्याप्रमाणें आपले कुलबंधूंनीं तयार केलेला माल वापरून त्यांचे उद्योगधंद्यास उत्तेजन देणें हें प्रत्येकाचें कर्तव्य ठरतें. हाच आपलेपणा दुकान-दारींतहि दाखवितां येईल. कुलबंधूनें चालविलेल्या दुकानांतून माल विकत घेऊन

त्यास मदत करणें अगदीं सहज शक्य आहे. 'चॅरिटी बिगिन्स ॲट होम' (परोपकाराला सुरुवात घरापासूनच होते) या न्यायानें आपले दानधर्माचा ओघ अशा रीतीनें वळवावा कीं त्याचा परिणाम स्वकुलांतील व्यक्तींचे दुःखपरिमार्जनांत व्हावा. याच आशयाचें मनुस्मृतींतील पुढील वचन ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

शक्तः परजने दाता स्वजने दुःखजीविनि ।
मध्वापातो विषास्वादः स धर्मप्रतिरूपकः ॥ ९ ॥

—मनुस्मृति, अध्याय ११.

(स्वतःजवळ द्रव्य असून त्याचा उपयोग स्वजनांचें दुःख परिमार्जन करण्याकडे न करितां तें परक्या लोकांस जो दान देतो त्याचें हें कृत्य धर्म नसून धर्माभास उत्पन्न करणारें आहे; कारण हें मधानें व्याप्त असलेल्या विषाप्रमाणें होय.)

कांहीं विषयांतील तज्ज्ञांनीं, डॉक्टर, वैद्य, इंजीनियर व वकील वगैरेंनीं यथाशक्ति आपले ज्ञानाचा उपयोग आपले कुलबांधवांस विनामूल्य—निदान सवलतीनें करूं द्यावा. पुण्यांतील डॉ. गोखल्यांनीं आपले कुलांतील व्यक्तींस विनामूल्य औषधोपचार करण्याचें कांहीं वर्षांपूर्वीं जाहीर केलें होतें, हें गोखलेसमाचार मासिकाचे वाचकांस स्मरत असेल. हें उदाहरण गिरविण्यासारखें खास आहे.

संपत्ति व मानपान स्वकुलांतच रहावे या हेतूनें कृष्णाजी बापूजी पेंडसे यांनीं आपली महाजनकी व मिळकत जामात मागत असतांहि अपत्यप्रेम बाजूस सारून कुलप्रेमानें प्रेरित होऊन आपले दाईजास दिली ही गोष्टहि निर्विवाद अनुकरणीय म्हणतां येईल. दुर्दैवानें औरस संतति नसल्यास दत्तक घेण्याचा प्रसंग कित्येकांवर येतो. शास्त्राधारें स्वकुलांतील मुलगा दत्तक घेणें विहित आहे. परंतु तसा नच मिळेल तर परकुलांतील घेण्यास अनुज्ञा आहे व रूढिहि सर्वसाधारण तशीच आहे. परंतु पुष्कळदां पतीच्या पश्चात् स्त्रीस दत्तक घ्यावा लागतो व अशा वेळीं माहेरच्या मंडळीच्या किंवा इष्टमित्रांच्या वजनामुळें परगोत्री मुलगा दत्तक घेतला जातो. अशा परकुलांतील दत्तकास, दत्तककुलाबद्दल अभिमान किंबहुना आपलेपणाहि वाटत नाहीं हें अनेकदां पाहण्यांत येतें. कुलांतील मुलगा दत्तक घेतल्यास संपत्ति स्वकुलांत राहील व त्याच्या उन्नतीस कारणीभूत होईल.

कालमानानुसार ही दत्तकाची प्रथा आतां अस्तित्वांत राहील किंवा नाहीं याची शंकाच आहे. दत्तक घेऊं नये असें वाटणाऱ्या कांहीं व्यक्ति आपल्या संपत्तीचा विनियोग सार्वजनिक कार्याकरितां व्हावा म्हणून विश्वस्त वगैरे नेमून व्यवस्था करितात ही गोष्टसुद्धां प्रशंसनीयच आहे. मात्र असें करतांना त्या निधीचा उपयोग स्वकुलांतील व्यक्तीस प्रथम व्हावा अशी योजना करणें अधिक श्रेयस्कर होय. स्वकुलबांधवाचे अभावीं अशा निधीचा उपयोग स्वजातीयांस व इतरांस व्हावा. अशी क्रमवार योजना केल्यास त्यांचे संपत्तीचा योग्य उपयोग होऊन कुलाचाहि फायदा होईल. अशा तऱ्हेचें उदाहरण म्हणून पुण्याच्या आनंदाश्रमाचे संस्थापक कै.


महादेव चिमणाजी आपटे, धारवाडचे कै. रावजी बाळाजी करंदीकर व पुण्याचे कै. कृष्णाजी भास्कर चितळे यांचा नामनिर्देश करतां येईल.

याप्रमाणें आम्हांस जे विचार सुचले ते येथें संक्षेपतः मांडिले आहेत. याव्यतिरिक्त निराळे विचार अनेकांस सुचणें संभवनीय आहे. सर्वांचा मुख्य हेतु इतकाच कीं स्वकुलबांधवांमध्यें परस्परपरिचय व सहानुभूति अधिक वाढावी व परस्परांस एकमेकांचा उपयोग व्हावा. या ग्रंथाचा या दिशेनें थोडाफार उपयोग झाल्यास हें प्रसिद्धीकरण सफल झालें असें म्हणतां येईल. अशी बुद्धि सर्वांस देण्याची परमेश्वराजवळ प्रार्थना करून हें प्रकरण पुरें करूं.

सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

श्रीतुळजा भवानी



तुळजापूर (सोलापुराहून २८ मैल)

प्रकरण ९ वें


संशोधनार्थ

श्रीक्षेत्र त्र्यंबक, नाशिक, डाकोर, सिद्धपूर वगैरे क्षेत्रांतून आम्हांस जी माहिती मिळाली तिच्या आधारावर ज्या वंशावळी तयार करतां आल्या त्या पुढें दिल्या आहेत. ज्या लेखांवरून वंशावळ तयार करतां आली नाहीं ते लेख तसेच उद्धृत केले आहेत. प्रकरण ६ मध्यें दिलेल्या वंशावळींशीं यांचा संबंध आज जुळवून दाखवितां येत नाहीं. तथापि, मिळालेल्या माहितीचा जास्त संशोधनाकरितां येथें संग्रह केला आहे. संशोधनास उपयुक्त व्हावें म्हणून या वंशावळींचा अगर लेखांचा संबंध कोठें जुळणें संभवनीय दिसतें त्याचें शक्य तेथें दिग्दर्शन केलें आहे.

या वंशावळी तयार करण्याकरितां जेथून माहिती मिळाली त्या क्षेत्राचें नांव, उपाध्यायाचें नांव, वहीचा व पानाचा क्रमांक आणि तीर्थयात्रेस जाणाऱ्या व्यक्तीनें ज्या गांवांचा उल्लेख लेखांत केला आहे तीं गांवें जवळच दिलीं आहेत. यात्रेस गेलेल्या व्यक्तीचें नांव जाड ठशांत दाखविलें आहे. ज्या व्यक्तींचे पितापुत्र संबंध समजले नाहींत, परंतु त्या व्यक्ति त्या पिढींत होत्या इतकेंच समजलें आहे, त्या कोणाशीं न जोडतां सुटयाच दाखविल्या आहेत.

गांवांचीं नांवें नमूद केलीं आहेत; त्यावरून हल्लीं त्या त्या ठिकाणीं असलेल्या कुटुंबांतील लोकांस पूर्वापरसंबंध पाहण्यास सुलभ होईल. जरी आतां वास्तव्याचीं गांवें बदललीं असलीं तरीहि पूर्वींची ऐकीव माहिती बहुधा असते, त्यामुळें गांवें सोडून दुसरीकडे राहणाऱ्या लोकांसहि या माहितीचा उपयोग होऊं शकेल.

१



त्र्यंबकेश्वर–धों. फडके १।३५।७३. त्र्यं. फडके १४।२८. वा.पाटणकर १०।९.खेड,टेंभुर्णी, पंढरपूर, शिवणें, नरसीपूर.

या वंशावळीचा संबंध घराणें १६ वाडखोल यांशीं असावा असें वाटतें. त्या वंशावळींतील दुसऱ्या पिढींत यांतील तिसऱ्या पिढीप्रमाणें महादेव, गोपाळ व नारायण हीं नांवें आढळतात. वाडखोल वंशावळींतील मूळ पुरुषाचें बळिराम हें टोपण नांव आहे, त्याचें खरें नांव गणेश असलें तर या दोन वंशावळी एक होण्याचा संभव आहे.

२

१ वासुदेव

२ गणेश

३ केसो (शामराव)

४ { गणेश लक्ष्मण — त्र्यंबक — रामाजी

५ { गोविंद बाबाजी — केसो कृष्ण — विश्वनाथ गोपाळ

६ आबा — राघोबा

त्र्यंबकेश्वर–पाटणकर १७।११–२८, बंद ६८. श्रीवर्धन, चौक, पंचनदी, दासगांव, वसई.

वरील क्रमांक एकमध्यें अनुक्रमें पिढी १, २, ३ व ४ यांमध्यें आढळणारीं नांवें केशव, गणेश, गोपाळ व रघुनाथ हीं या क्रमांकांत अनुक्रमें पिढी ३, ४, ५ व ६ यांत आढळतात.

३

१ विठ्ठल — सदाशिव

२ { चिमण = जानकी, मोरो = गंगा — सखो

३ { विठ्ठल = रखमा, अनंत, तात्या

त्र्यंबकेश्वर–ग. घैसास २२।२२,४४।१०० ४७।३२–३७, अक्षी–नागांव.

या क्रमांकांतील चिमण व सखो हे चुलत बंधु असल्याचें जानकीबाई सांगते.

घराणें क्रमांक ४ गोळप–अक्षी-नागांव-मधील ४ थ्या पिढींतील विठ्ठल व या क्रमांकांतील विठ्ठल एक असतील काय?

४

१ वाग्भट

२ भिकाजी — केशव

३ गणेश — राघो

४ सदाशिव

त्र्यंबकेश्वर–त्र्यं. फडके १६।५ आवास. शके १६६३.

घराणें क्र. ८, केळशी-बिरवाडीची माहिती पृ. २०० वर दिली आहे. तेथें गणश व सदाशिव हे दोघे पितापुत्र संबंधांत त्या घराण्यांत असावे असें अनुमान केलें आहे. ह्यांतील गणेश व सदाशिव व आठवे घराण्यांतील गणेश व सदाशिव एकच असतील काय?

५

त्र्यंबकेश्वर—त्र्यं. फडके ६३।३१. सोमेश्वर, शेकाची बिरवाडी, सासवनें शके १७८२.

१ महादेव
२ नारायण
३ बाळाजी = गंगा
४ विठ्ठल, नारायण, हरी

६

त्र्यंबकेश्वर—त्र्यं. फडके १९।३३. सोमेश्वर, शेकाची बिरवाडी, सासवनें.

१ काशीभट
२ केशवभट = अन्नपूर्णा

७

त्र्यंबकेश्वर – पाटणकर – कळमकर १७।१५. कोचरें.

१ विश्वनाथ
२ कडंभट
३ **विश्वनाथ**

८

त्र्यंबकेश्वर—त्र्यं. फडके ३६।२०. कोचरें, आचरें, बेळगांव, पुणें.

१ विश्वनाथ
२ कृष्ण
३ **विश्वनाथ** अाप्पाभट
४ पांडुरंग

९

त्र्यंबकेश्वर—ग. घैसास ६८।३३. धामापूर, पुणें.

१ नारायण
२ विश्वनाथ
३ बाजी = पार्वती
४ सदाशिव = उमा
५ गणपति, दत्तात्रेय, सदाशिव

१०

त्र्यंबकेश्वर-पाटणकर-कळमकर २९।६८ घैसास २२।२२, ३१।४५, ५३।८६ कोचरें, गोठणेंनाट, मुंबई.

१ नारायण
२ { कृष्ण, महादेव }
३ { सदाशिव, **जनार्दन** बाळंभट }
४ **रामचंद्र**
५ { सदाशिव, नारायण }

या क्रमांकांतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या पिढींतील अनुक्रमें नारायण, महादेव व बाळंभट हीं नांवें क्रमांक १२ मध्यें अनुक्रमें पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या पिढींत आढळतात.

११

१ नारायण
२ सखाराम
३ महादेव
= लक्ष्मी
४ गोपाळ बापूराव
= राधा = रखमा
५ नारायण भास्कर

त्र्यंबकेश्वर–घैसास ७६।३१, ९३।४९ कासारवेली, परतवाडा.

या क्रमांकांतील दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या पिढींतील सखाराम (रामभट), महादेव व गोपाळ हीं नांवें घराणें क्रमांक १५ कोचरेंमध्यें १, २ व ३ या पिढींत आढळतात.

१२

१ नारायण
२ महादाजी विनायक
३ बाळाजी = लक्ष्मी, मोरभट, रामभट; नारायण, भास्कर, वासुदेव; बाळंभट

त्र्यंबकेश्वर–धों. फडके ३८।४६. वावोशी, पेण.

या क्रमांकांतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या पिढींतील अनुक्रमें नारायण, महादाजी व बाळाजी हीं नावें क्रमांक १० मध्यें अनुक्रमें १, २ व ३ या पिढ्यांत आढळतात.

१३

त्र्यंबकेश्वर–पाटणकर-कळमकर १९।५. वावोशी–कोंठिंबें, श्रीवर्धन.

जानकीबाई भ्र. रामचंद्र लक्ष्मण दि. गोविंद.

क्रमांक १७ शीं यांचा संबंध असेल काय ?

१४

१ विष्णु
२ महादेव
३ गंगाधर
= भागीरथी
४ कृष्ण शके १७२३
= रखमा
५ रामचंद्र, गोविंद शके १७५४, मल्हारी = उमा

नाशिक–काळे १९।४७. नाशिक–पाराशरे १०२।३१. त्र्यंबकेश्वर–त्र्यं. फडके ४७।२, ५४।१४५. श्रीवर्धन, गुळसुंदें, कराडें, मोहपाडा.

या क्रमांकांतील पिढी ३ व ४ यांतील गंगाधर व महादेव हीं नांवें क्रमांक १५ मध्यें आढळतात. परंतु तेथें महादेव याचा पिता गोविंद सांगितला आहे व येथें विष्णु आहे.

१५

त्र्यंबकेश्वर–त्र्यं. फडके १९।३२. श्रीवर्धन, गुळसुंदें.

भागीरथीबाई भ्र. महादेवभट गोविंदभट, पुत्र गंगाधर.

या क्रमांकांतील गंगाधर व महादेव हीं दोन नांवें क्रमांक १४ मध्यें आढळतात. परंतु त्या क्रमांकांत महादेव याचा पिता विष्णु सांगितला आहे व येथें गोविंद आहे.

१६

त्र्यंबकेश्वर–त्र्यंबक फडके ५१।७१. मोहपाडा.

सगुणाबाई भ्र. गोविंदपंत सा. रामाजी गोविंद.

१७

त्र्यंबकेश्वर–पाटणकर-कळमकर २२।२७. श्रीवर्धन–नवघर.

विश्वंभरभट कृष्णंभट, अजा रघुनाथभट, बंधु नारंभट व अंताजीपंत, पुतणे विठ्ठल, रामचंद्र व गोविंद अग्निहोत्री.

क्रमांक १३ शीं याचा संबंध असेल काय ?

१८

त्र्यंबकेश्वर–ओक २।१९. हरिहरेश्वर.
बाळंभट गोपाळभट, बंधु शंकरभट, वामनभट व रामभट.

१९

१ केशव
२ रामभट
३ **आबाभट** (अग्निहोत्री)

त्र्यंबकेश्वर–पाटणकर-कळमकर १७।११.श्रीवर्धन.
या क्रमांकांतील केशव व रामचंद्र हीं दोन नांवें घराणें क्रमांक १७ केळवें-माहीम यामध्यें पिढी ३ व ४ यांत आढळतात.

२०

त्र्यंबकेश्वर–धों. फडके ४८।१६. दाभोळ, पालगड.
जानकीबाई भ्र. रामचंद्र नाना, चुलत दीर महादेव, सासू राधाबाई.

२१

१ महादेव
२ हरी
३ दामोदर = **भवानी** बाळाजी; महादाजी; जगन्नाथ = सगुणा
४ हरी; मोरो

त्र्यंबकेश्वर—पाटणकर ३२।३९,४९।१४. चौक, हसनवली.

पुढील २२ क्रमांकांत सगुणाबाई ही अजेसासरा गोविंद सांगते व या क्रमांकांत सगुणाबाईचा अजेसासरा महादेव आहे. बाकीचीं भ्रतार, सासरा वगैरे नांवें सारखीं आहेत; यावरून कोणता तरी एक लेख चुकीचा असावा.

२२

डाकोर–हरीहरभाई. कल्याण.
सगुणाबाई भ्र. जगन्नाथ, सासरे हर गोविंद.

२३

त्र्यंबकेश्वर – पाटणकर - कळमकर १५।९९. काशी बिंदुमाधव घाट.

हरी दीक्षित, अनंत दीक्षित, जयकृष्ण दीक्षित.

घराणें क्रमांक २६ उकसाण–वावोशी या घराण्यांतील मंडळीस दीक्षित म्हणून काशीस इनाम होतें. या क्रमांकांतील मंडळी दीक्षित म्हणवीत असून गांव काशी सांगतात. यावरून यांचा वावोशी घराण्याशीं संबंध असावा. क्रमांक ४२ मधील अनंतदेव व यांतील अनंत दीक्षित एक असतील काय ?

२४

त्र्यंबकेश्वर–त्र्यं. फडके १६।१७.ओक ३।१७. केळशी, बिरवाडी.

१ आप्पाजी
|
२ हरी
| |
३ **राघो** बाळाजी (बाजी)
= जानकी

२५

त्र्यंबकेश्वर–पाटणकर–कळमकर २१।९०, २४।५०. गुहागर, किवळें.

सावित्रीबाई भ्र. दामोदरभट, सा. बाळकृष्णपंत, नातू विष्णु नारायण चु. चुलत सासरा दाजीबाचे पुत्र गणपतराव व गोविंदराव.

२६

त्र्यंबकेश्वर–त्र्यं. फडके ५४।१५१ शके १७५४. नाशिक,पळसाणें.

१ गोपाळ
|
२ विष्णु
|
३ जनार्दन = धोंडूबाई
|
४ **नारायण**

या क्रमांकांतील जनार्दन हा घराणें क्रमांक २९ गुहागर-किवळें याचा मूळ पुरुष दिसतो.

२७

त्र्यंबकेश्वर–ग. घैसास २६।३५. खेडें व सडें-पिरंदवणें.

रामभट गोविंदभट, अजे महादेव गोविंद, बंधु लक्ष्मणभट, चुलत बंधु गणेशभट पुतणे सदाशिव, बाळा, सखाराम. चुलत पुतणे महादाजीपंत, कृष्णंभट व अनंतभट.

वरील लेखावरून बाजूस दिलेली वंशावळ बनवितां येईल.

१ गोविंद
|
२ महादेव
| |
३ गोविंद ?
| | |
४ रामभट लक्षमणभट गणेश
| | | |
५ { बाळा सखाराम } सदाशिव महादाजी अनंत कृष्ण

२८

त्र्यंबकेश्वर–त्र्यं. फडके १४।२१, १८।१५ शके १६५८. गोळप, औरंगाबाद.

रामाजी गोविंद, अजे कृष्णाजी, चुलत बंधु गोपाळपंत, भा. जानकी.

त्र्यंबकेश्वर–पाटणकर-कळमकर १७।३५. गोळप, पावस.

गोपाळभट, पिते नारायणभट, अजे कृष्णाजी, चुलते गोविंद.

१ कृष्ण
२ गोविंद नारायण
३ रामाजी गोपाळ

वरील दोन लेख मिळन बाजूस दिलेली वंशावळ तयार होईल.

घराणें क्रमांक २ (धामापूर), ३ (चौल-श्रीवर्धन) व ५ (नाशिक-धौम) यांतील अनुक्रमें पिढी चौथी, पहिली व पहिली यांमधील कृष्ण व या क्रमांकांतील मूळ पुरुष कृष्ण एक असावे; कारण हे सर्व मूळ ठिकाण गोळप गांव सांगतात.

२९

त्र्यंबकेश्वर–ओक, गोळप–वसोली.

नारोबा बाळंभट, बंधु जिवाजी.

त्र्यंबकेश्वर—ओक, वसोली.

बिसोबा, पिते नारोबा, बंधु विठोबा, पुतणे नारायण.

३०

त्र्यंबकेश्वर—अग्निहोत्री २।३. भाटी.

अंताजी पिते कृष्णाजी, बंधु महादाजी.

त्र्यंबकेश्वर–ओक ३।३९. मोरगिरी (पाटण).

महादाजी कृष्ण, आजे नारायण

१ नारायण
२ कृष्ण
३ अंताजी महादाजी

वरील दोन लेख मिळून बाजूस दिलेली वंशावळ तयार होते.

३१

त्र्यंबकेश्वर–ओक ४।८. शिरोळी, प्रांत पाटण.

द्वारकाबाई भ्र. भिकंभट बाळाजी. पेंडसे महाजन.

३२

त्र्यंबकेश्वर–पाटणकर १७।२७. वाडखोल खुर्द (पाटण) शिरसी.

१ बापदेव
२ महादेव
३ **रामकृष्ण**

३३

त्र्यंबकेश्वर–ओक २१।२. औरंगाबाद.

१ विष्णु
२ गोविंद
३ **रामाजी**

३४

त्र्यंबकेश्वर–ओक २१।२. गोबरखेड, तारोळें.

मनुबाई सासरे केशव बाळंभट, चुलत सासरे नारायणभट, चुलत दीर बाळंभट, पुत्र महादेवभट.

३५

१ शामजी
२ खंडो
३ बाळाजी

त्र्यंबकेश्वर–त्र्यं. फडके ७।१८ शके १६४६. विजनेरें, औरंगाबाद.

३६

१ अंताजी
२ मोरो
३ रामचंद्र
४ अंताजी

काशी–चितळे ५ रत्नागिरी, कऱ्हाड.

३७

काशी–चितळे २१. माहुली.

यमुनाबाई भ्र. विठ्ठलपंत, सासरे कृष्णाजीपंत, पुत्र सखाराम.

३८

गणेश बाळकृष्ण—हे ग्वाल्हेर संस्थानांत नोकर होते. यांनीं ग्वाल्हेर येथें सन १९०१–२ चे सुमारास गणपतिमंदिर बांधिलें. भार्या सरस्वती. कन्या एक, रामचंद्र गणेश आगाशे यांची पत्नी. यांचेबद्दल जास्त माहिती मिळाली नाहीं. त्यामुळें यांचा कोणतेहि घराण्यांत समावेश करतां आला नाहीं.

३९

जीवेश्वर गंगाधर—हे पुण्यास भिक्षुकी करीत. घर मेटचास गणपतिमंदिराजवळ होतें. भार्या, खेडच्या घारोभट काणे यांची बहीण. अधिक माहितीच्या अभावीं यांचें नांव घराणें १४ त दाखवितां आलें नाहीं.

४०

नारायणभट लक्ष्मणभट—ऐ. प्र. क्रमांक २६।२७ मध्यें यांना मिळालेल्या इनामाचा उल्लेख आहे. हे कोणते घराण्यांतील व यांचे वंशज कोठें आहेत हें कळलें नाहीं.

४१

विष्णुभट--हे गुर्लहोसूर येथें इ. स. १८२५ मध्यें वेदाध्ययन करीत असल्याचा उल्लेख ऐ. प्र. क्र. ३५ मध्यें आहे. हे कोण, हें समजलें नाहीं.

४२

खालील माहिती एका गृहस्थानें कळविली आहे. हे अनंतदेव कोणत्या घराण्यांतील हें समजलें नाहीं. क्र.२३ मधील अनंत दीक्षित व हे एकच असतील काय ?

" 'अनंतदेव' नांवाच्या एका गृहस्थानें आश्वलायन गृह्यसूत्रावर सारांशरूपाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत सोळा संस्कार व धर्मशास्त्रव्यवस्था असा विषय आहे. बहुतेक शक १७ शतकांतील (पेशवाईच्या काळांतील) तो ग्रंथ असल्याचें मला आठवतें आहे. काशींतील शीतळाघाटावर 'जडे' यांच्या घरीं तो वाचला आहे असें वाटतें. 'इदं पुस्तकं पेंडसे इत्युपाव्ह अनन्तदेवेन लिखितं' असें पुस्तकाचे शेवटीं आहे; परंतु चांगलेंसें निश्चित स्थळ आठवत नाहीं. "

घराणें १० वें, केळशी–वाडें (पृ. २०८ पहा)



ता. १९–११–१९३८

१. चिंतामणि केशव, २. वासुदेव भिकाजी चिपळूणकर, ३. काशीबाई चिपळूणकर, ४. सीताराम नारायण गोखले, ५. मनूताई चिपळूणकर.

परिशिष्ट

कुलवृत्तान्त-प्रसिद्धीकरितां झालेल्या खर्चाची व्यवस्था

माहिती जमविण्यास आरंभ केल्यापासून पुस्तक छापून प्रसिद्ध होईपर्यंत एकंदर खर्च रु. ११५० झाला आहे. यांत छायाचित्रांचे ब्लॉक तयार करविणें, छपाई व बांधणी यांकरितां रु. ८७० चा खर्च आहे. आम्ही हें काम केवळ कुलासंबंधीच्या कर्तव्यबुद्धीनें अंगिकारिलें असल्यामुळें त्या श्रमाप्रीत्यर्थ कांहीं एक खर्च वर दिलेल्या रकमेंत नाहीं. आमचे सर्व श्रम विनामूल्य झालेले आहेत. प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचाच हा आंकडा आहे. पेंडसे कुलांत विद्यमान पुरुषव्यक्ति (बालापासून वृद्धापर्यंत) ९९९ आहेत. म्हणजे सरासरीनें २५० कुटुंबें आहेत. सर्व घरधन्यांनीं हें पुस्तक विकत घेतल्यास २५० प्रती विकल्या जाणार. परंतु सर्वजण हें पुस्तक विकत घेऊं शकणार नाहींत हें उघड आहे. पेंडसे कुलाव्यतिरिक्त इतर कोणास या पुस्तकाचा उपयोग नसल्यामुळें हें पुस्तक ते विकत घेणार नाहींत हें सांगावयास नको. ह्या गोष्टीचा विचार करून प्रती थोड्या काढिल्या आहेत. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या कुल-वृत्तान्तांच्या विक्रीच्या अनुभवावरून अशा पुस्तकांच्या प्रती फारच थोड्या विकल्या जातात व त्या विक्रीपासून येणारी रक्कम अगदीं थोडी असते. त्यामुळें प्रकाशकास बराच बुडीत खर्च स्वतः सोसावा लागतो. या वस्तुस्थितीच्या जाणिवेनें या बुडीत खर्चाकरितां ज्या गृहस्थांकडून देणगी आली त्यांचीं नांवें, देणगीचे रकमेसह पुढें दिलीं आहेत. या कुलबंधूंनीं पुस्तकप्रसिद्धीपूर्वी विश्वासानें आम्हांकडे रक्कम पाठविली याबद्दल यांचे व ज्यांनीं देणगीचीं आश्वासनें दिलीं आहेत त्याबद्दल त्यांचे आम्हीं आभारी आहों. कांहीं व्यक्तींकडून त्यांचें छायाचित्र पुस्तकांत छापण्याबद्दल झालेल्या खर्चापुरती रक्कम रु. ११॥ आली आहे.

प्रत्यक्ष देणगी, आश्वासनें व छायाचित्रखर्च मिळून रु. ३११ होतात. एकंदर झालेल्या खर्चांतून ही रक्कम वजा करितां रु. ८३९ बाकी राहतात. तिची तूर्तची विभागणी खालीं दिली आहे.

रु. २८० प्रो. गजानन गणेश (१२–७) बडोदें
रु. २८० आमचे पुतणे रा. धोंडो सीताराम व मोरो सीताराम (१२–८)
रु. २८० आम्ही स्वतः (१२–७)

वरील त्रिवर्गांनीं या मोठ्या खर्चांत आम्हांबरोबरीनें भागीदार होण्याचें ठरविलें यावद्दल या त्रिवर्गांचे आम्ही फार आभारी आहों. अशा पुस्तकप्रकाशनास बुडीत खर्च येतो याची माहिती कांहीं कुलबंधूंस नसण्याचा संभव आहे व त्यामुळें त्यांनीं रक्कम पाठविली नसेल. ज्यांना या कामाकरितां देणगी देण्याची इच्छा असेल त्यांनीं ती अवश्य पाठवावी. तिचा साभार स्वीकार होईल व त्यांचे नांवांस प्रसिद्धी दिली जाईल.

खालील सर्व आंकडे निव्वळ देणगीचे नसून कांहीं रकमांत देणगी देणाऱ्यांचे छायाचित्राच्या छपाईकरितां दिलेल्या रकमांचा समावेश आहे. किती चित्रांचा खर्च त्या रकमेंत आहे हें तीसमोर कंसांत आंकडे देऊन दाखविलें आहे.

(अ) बुडीत खर्चाकरितां आगाऊ आलेल्या रकमा

रा. पुरुषोत्तम रामचंद्र	(१४–१०)	अलाहाबाद	रु. ५०	
डॉ. काशीनाथ केशव	(३–१०)	पुणें	रु. ३९	(३ छायाचित्रें)
रा. विष्णु महादेव	(२३–५)	सुरत	रु. ३५	(१ छायाचित्र)
रा. गणेश पांडुरंग	(१४–१०)	पुणें	रु. १५	(१ ,,)
रा. सदाशिव वासुदेव	(१५-७)	कवळें	रु. १३॥	(भावेश्वरी देवीच्या छायाचित्राचा खर्च)
रा. नारायण दामोदर	(५–८)	नागपूर	रु. १०	
रा. सा. गोविंद रामचंद्र	(५–८)	नागपूर	रु. १०	(१ छायाचित्र)
रा. दिगंबर चिंतामणि	(१३–९)	दारेसलाम	रु. १०	(२ छायाचित्रें)
रा. नारायण गोपाळ	(१२–७)	मुर्डी	रु. १०	(१ छायाचित्र)
रा. परशुराम महादेव	(१७–७)	परळ	रु. २	
			एकूण १९४॥	

(आ) बुडीत खर्चाकरितां आश्वासित रकमा

डॉ. काशीनाथ केशव	(३–१०)	पुणें	रु. २५	
डॉ. प्रभाकर महादेव	(१६–६)	खातेगांव	रु. २५	(३ छायाचित्रें)
रा. पुरुषोत्तम विठ्ठल	(६–८)	तळें	रु. २५	(४ ,,)
रा. हरी कृष्ण	(२–११)	ठाणें	रु. १०	
रा. रघुनाथ जयराम	(१४–९)	आंबिवली	रु. १०	
रा. रामचंद्र नारायण	(७–९)	अकोला	रु. १०	
			एकूण १०५	

व्यक्ति-सूचि

(१) पेंडसे कुलांतील जिवंत व मृत अशा सर्व पुरुषव्यक्तींची संख्या २५९५ आहे. ही गणना करतांना पेंडसे कुलांतून पेंडसे कुलांतच दत्तक गेलेल्या व्यक्तीचें नांव दोनदां म्हणजे जनक घरचें व दत्तक घरचें असें आलें आहे. परकुलांतून आलेल्या व्यक्तीचें नांव एकदांच दत्तक घरचें आलें आहे.

(२) या सूचींत सर्व व्यक्तींचीं नांवें अकारादि क्रमानें दिलीं असून वर्णानुक्रम संस्कृताप्रमाणें ठेविला आहे. श्रीकान्त, श्रीधर इत्यादि नांवें शकारामध्यें पाहावीं. ज्ञ अक्षर शेवटीं दिलें आहे.

(३) सारखीं नांवें आलीं तेथें बापाच्या नांवापुढें आजोबाचें, क्वचित् पणजोबाचेंहि नांव दिलें आहे. कांहीं व्यक्तींच्या नांवांमध्यें थोडा बदल करून त्यांचा उच्चार किंवा उल्लेख करितात. उदाहरणार्थ, महादेव–महादाजी, बाळ–बळवंत–बल्लाळ–बाळाजी, रघुनाथ–राघो, मोरेश्वर–मोरो, अनंत–अंताजी, विश्वनाथ–विसाजी इत्यादि. ही गोष्ट ध्यानीं धरून सूचि पाहावी. टोपण किंवा ऊर्फ नांवें येथें सर्वत्र दिलीं नसून त्यांचा निर्देश 'घराणें व व्यक्ति यांची माहिती' या सातव्या प्रकरणांत केला आहे.

(४) जिवंत व्यक्तींच्या नांवांमागें * ही खूण केली आहे.

(५) नांवांपुढें घातलेल्या दोन आंकड्यांपैकीं पहिला आंकडा वंशावळीच्या पृष्ठाचा असून दुसरा माहितीच्या पृष्ठाचा आहे. ज्या व्यक्तींची माहिती मिळाली नाहीं त्यांच्या नांवांपुढें फक्त वंशावळीचा पृष्ठांक दिला आहे.

शुद्धिपत्र

पृष्ठ	अशुद्ध	शुद्ध
१२७ पिढी ७	गुंडो हें नांव सुटें दाखविलें आहे.	गुंडो हे बाळंभट श्रीधरचे पुत्र.
१५७ ओळ २६	राघो केशव	राघो कृष्ण
१८७ ओळ ४	ज. श. १८३९	ज. स. १८३९
१९६ ओळ २१	शंकर अनंत (५)	शंकर अनंत (८)